म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११६५६५

# काम-पुरुषार्थ

REFBK-0010254

डॉ. ग. सी. पेंडसे

काम-पुरुषार्थ

# काम-पुरुषार्थ

अथवा

( यशस्वी विवाहाची भारतीय मीमांसा )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २४८५० वि.
क्रमांक ११६४ नों: दि:

लेखक

डॉ. ग. सी. पेंडसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 10250
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

कुळकर्णी ग्रंथागार पुणे २

REFBK-0010254
REFBK-0010254

किंमत दहा रुपये

प्रकाशक
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार, पुणें २.

प्रथमावृत्ति
१४ जानेवारी १९५९

मुद्रक
ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

अनुक्रम २४९५० दि: ...... १ डिसें
क्रमांक ......७७५६...... नों: दि: ...... २००७

# अनुक्रमणिका

पृष्ठ

पुरस्कार : डॉ. प. कृ. गोडे

प्रस्तावना :

प्रकरण १ लें : जीवनासंबंधीं भारतियांचा दृष्टिकोन १

ग्रंथहेतु — भारतियांचा त्रिविध दृष्टिकोन — वर्णसंस्था — अद्वैत सिद्धांत — चतुर्विध पुरुषार्थ — स्मृति, महाभारत, भगवद्गीता, अर्थ, काम, वैद्यक व काव्य या सर्व शास्त्रांत पुरुषार्थ ही मूलभूत कल्पना — धर्म आणि अर्थ या कल्पना — अर्थासंबंधीं दोन महत्त्वाचे नियम — कामकल्पना.

प्रकरण २ रें : वात्स्यायनीय कामसूत्र ४२

पूर्वाचार्य — वात्स्यायनाचा काल — वात्स्यायनाची कांहीं माहिती — या शास्त्राचें प्रयोजन — वात्स्यायनाचा ग्रंथ शास्त्रीय — ग्रंथाचें सिंहावलोकन — त्रिवर्गसाधन हाच उद्देश — काम-पुरुषार्थ व विषयवासना — काम शब्दाची व्याख्या — विवाह-विधि व काव्य यांतील कामासंबंधीं कांहीं संदर्भ.

प्रकरण ३ रें : यशस्वी विवाह ६८

वैवाहिक यशाचीं तीन साधनें — यशस्वी विवाहाचें मोजमाप — विवाहपूर्व विचार — भावनोद्रेक हा विवाहाचा पाया अयोग्य — वात्स्यायनीय प्रीतिप्रकार — वैदिक विवाह-संस्कार.

प्रकरण ४ थें : सुप्रजा ९३

सुप्रजाजननशास्त्र — भारतियांचा सुप्रजेसंबंधीं विचार — सुप्रजा

हा विवाहाचा मुख्य उद्देश — हा उद्देश स्पष्ट कां केला ? — पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचीं मतें — सुप्रजेच्या दृष्टीनें विवाहपूर्व विचार — पुरुषप्रधान संतति कशाकरितां ? — 'संततिहीनत्व' हा कौटुंबिक जीवनमरणाचा प्रश्न — संस्कृत वाङ्मयांतील अनपत्यत्वाचीं वर्णनें — प्रजाहीनत्वाच्या परिणामविषयीं पाश्चिमात्य मतें — प्रजाहीनत्व — भारतियांस संततिहीनत्वांत द्विभार्यात्व मान्य — प्रजाहीनत्वांत स्त्रीमनाचा विचार — प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नत्व. ( Differential Fertility )

प्रकरण ५ वें : रतिशास्त्र १२०

वैवाहिक सुखाचें दुसरें साधन उत्तम रति — रतिसुखाचें प्रथम कारण आरोग्य — प्रजोत्पादक इंद्रियशक्तीचा सहजव्यापार — शृङ्गारात्मक भावनात्मकता रतिसुखास पोषक — प्रौढावस्थेंतील नैसर्गिक समस्या — याकडे पहाण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन — इंद्रियविज्ञानांतील मूलभूत प्रक्रिया व तिचें कार्य — भारतीय दृष्टिकोन 'ब्रह्मचर्य' — डॉ. किन्से यांचा अभ्यास — मनावरील दडपण — कामवासनेसंबंधीं योग्य दडपणांचे उपयोग — दडपणांचे दुष्परिणाम — पाश्चिमात्य आचार घातुक — पुनश्च डॉ. किन्से — कामवासनेवरील मानसिक दडपणांची कारणें व उपाय — भावनोद्रेकांचे शारीरिक परिणाम — संस्कृत वाङ्मयांत शृङ्गार प्रमुख — प्रतिक्रियेसंबंधीं विचार — रतारंभावसानिक — आनंदमय समाप्तिमध्येंहि स्त्रीपुरुषभिन्नता — कामवासनेचें मूलतः वैविध्य.

प्रकरण ६ वें : पक्षवृद्धि (व्यक्तिमत्वाचें एकीकरण) १५४

व्यक्तिमत्वाची घडण — समाजांतील आद्यघटक कुटुंब — संस्कारपरंपरा — भारतियांचे निश्चित ध्येयाचार — मूल्यविचार- मनुस्मृतिप्रणीत स्त्री-आचार — कामसूत्रकारांची मतप्रणाली — भारतियांचा मूल्यविचार.

**प्रकरण ७ वें : भारतीय ध्येयाचारांचें लोकशिक्षण आणि प्रत्यक्ष आचार १८८**

ध्येयें आचारांत आणण्याची भारतीय पद्धति — ध्येयाचारांचा सामान्य समाजावर परिणाम — ध्येयाचारांची दुःस्थिति होण्याची कारणमीमांसा — विविधता अपरिहार्य — विवाहनिश्चयाचा कांहीं वेळीं स्त्रीस अधिकार — विवाहाचे आठ प्रकार — स्त्रीकरितां आपद्धर्म — सपत्नीकत्वाची कारणमीमांसा — बहुभार्यात्वाची भारतीय चाल — वेश्याव्यवसाय — भारतीय दृष्टिकोन.

**प्रकरण ८ वें : पाश्चिमात्य संस्कृतिसंघर्ष व सद्यःस्थिति २२०**

युरोपीय संस्कृतीचा त्रोटक वृत्तांत — कुटुंबसंस्थेचें कार्य व त्यांतील बदल — बदल म्हणजे प्रगति नव्हे — कौटुंबिक बदलांचा विशेष विचार — कुटुंबविघटनाचीं कारणें — कुटुंबविघटनेचे दृश्य परिणाम — पाश्चिमात्यांचा कुटुंबसुधारणेचा विचार — पाश्चिमात्यांचा विवाहविषयक कायदा — भारतीय व पाश्चिमात्य व्यवहारांतील फरक — ब्रिटिश आमदानींतील सामाजिक स्थित्यंतर — विष्णुशास्त्र्यांचा पहिला हल्ला — कामवासना व सद्यःपरिस्थिति — पाश्चिमात्यांचें वैवाहिक अपयश.

**प्रकरण ९ वें : उपसंहार २७१**

पाश्चिमात्यांचे सद्‌गुण — शास्त्रपद्धति व वर्गीकरण — निरनिराळ्या शास्त्रांची प्रगति — पाश्चिमात्यांचीं अनुमानें कांहीं वेळां अग्राह्य — श्रद्धेचें स्थान — भारतीय संस्कृतीचें सातत्य — बुद्धिगम्यतेचा अर्थ — ध्येय व आचार यांतील सनातन तफावत — स्त्रीपुरुषसमानता — सद्यःस्थितींत तडजोड — वैचारिक सुधारणा — विवाहपूर्व आचार — विवाहांतर्गत विचार — कांहीं महत्त्वाच्या सूचना.

**परिशिष्ट** ( Appendix ) ३०२

**परिभाषा** ( Terminology ) ३१५

**संदर्भग्रंथ** ( Bibliography ) ३१६

**सामान्य सूचि** ( General Index ) ३२२

# पुरस्कार

* * *

माझे परममित्र डॉ. पेंडसे यांच्या प्रस्तुत ग्रंथाशीं हा शाश्वत संबंध जोडण्यास मला फार आनंद वाटतो. त्यांचा व माझा परिचय प्रथम १९४२ सालीं झाला. त्यावेळीं ते ' इंडियन ड्रग्ज रीसर्स ॲसोसिएशन ' या संघटनेची स्थापना करण्याच्या कार्यांत व्यग्र होते. आज ही संस्था नांवारूपास आलेली असून, संस्थेची पदव्युत्तर संशोधनाची एक प्रयोगशाळा पुण्यांत कार्य करीत आहे. वैद्यकीय संशोधनाबाबत पुष्कळ उपयुक्त व महत्त्वाचें शास्त्रीय संशोधन डॉ. पेंडसे यांच्या मार्गदर्शनाखालीं येथें चालू आहे. डॉ. पेंडसे हें नेत्रतज्ज्ञ म्हणून जरी उद्योग करीत असले, तरी समाजाचे दृष्टिदोषहि ते शास्त्रीय चष्म्यांतून पाहतात. या त्यांच्या शास्त्रदृष्टिमुळेंच त्यांच्या व माझ्या परिचयाचें कालांतरानें स्नेहांत रूपांतर होऊन त्यांच्या कार्याचें व महत्त्वाकांक्षांचें मर्म मी चांगलें ओळखू शकतो.

प्रस्तुत ग्रंथांत त्यांनीं चर्चेस घेतलेला विषय सध्याच्या गोंधळाच्या समाजस्थितींत अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. वैवाहिक जीवनांतील यशापयश हा मनुष्याच्या मूलभूत समाधानाशीं संपूर्णतः संगत असलेला विषय असून, हें स्त्रीपुरुषांच्या एतद्विषयक वर्तणुकीवर वा आचारावर पुष्कळसें अवलंबून आहे, ही गोष्ट नाकारतां येण्यासारखी नाहीं. आपण हल्लीं निरनिराळ्या पंचवार्षिक योजना व अर्थसंकल्प ऐकत असतो. परंतु आमच्या तथाकथित सुधारणावाद्यांनीं मानवी आचारास कांहीं गमक होईल असा कोणताहि बुद्धिगम्य दृष्टिकोन फारसा चर्चेंसहि घेतलेला दिसत नाहीं. मग त्याचा आचार कसा घडवितां येईल, याचा विचार फारच दूर. पाश्चिमात्य संस्कृतिसंघर्षानंतर आमच्या मूलभूत सांस्कृतिक कल्पना भराभर लुप्त होण्याच्या मार्गास लागल्या. कुटुंबविघटनेचे निरनिराळे पाश्चिमात्य प्रश्न येथेंहि तसेच उत्पन्न होऊं लागले. चतुर्विध पुरुषार्थ म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. भारतियांचा जीवनासंबंधीं हा एक मूलभूत दृष्टिकोन असून, आमच्या संस्कृतींत तो उदयास येऊन भारतीय जीवनावर त्याचा कांहीं परिणाम आज तीन हजार वर्षांचा आहे. यांतील गुणग्रहण करून, त्यांतील उपयुक्तता लक्षांत घेऊन, सद्यः स्थितींतील

नव्या नव्या समस्यांना परिहार कसे काढतां येतील याचा चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करणाऱ्या नवीन समाजसुधारकांची आज अत्यंत आवश्यकता आहे.

डॉ. पेंडसे यांचा प्रस्तुत ग्रंथ या दृष्टीनें विचारांस चेतना देणारा कदाचित् पहिलाच प्रयत्न दिसतो. यशस्वी विवाह हाच कामपुरुषार्थाचा खरा उद्देश दिसतो. साधारण १८३५ सालीं मेकॉलेची प्रसिद्ध शिक्षणविषयक सुधारणा झाल्यानंतर या देशांत एक स्वाभिमानशून्यत्वाची लाटच उसळली. भारतीय संस्कृतीला व जीवनाला तो एक मोठा तडाखाच होता. भारतियांच्या पुरुषार्थासंबंधीं मूलभूत तत्वप्रणालीशीं शिक्षित समाजाची फारकत होऊन, जुन्या शास्त्रांसंबंधीं अनादर उत्पन्न झाला. तत्कालीन शिक्षणसुधारणांमधून जे पुष्कळसे नोकरपेशांतील लोक ब्रिटिश राजवटींत निर्माण झाले, त्यांच्यांत जुन्या भारतियांच्या सर्व कल्पनांबद्दल आदरापेक्षां तिरस्कारच जास्त असे. तेव्हां काम-पुरुषार्थ अथवा यशस्वी विवाहासंबंधीं भारतीय दृष्टिकोन त्या कालीं उमगण्यांत आला नाहीं, यांत आश्चर्य नाहीं.

डॉ. पेंडसे यांनीं हा दृष्टिकोन विषद करून आधुनिक शास्त्रांतून निर्माण झालेल्या पाश्चात्य माहितीशीं त्याची तुलना करण्यांत पुष्कळच परिश्रम घेतले आहेत. जुन्या भारतीय शास्त्रज्ञांनीं याविषयीं उत्पन्न केलेला ध्येयवाद व यशस्वी विवाहासंबंधींच्या साधनसामुग्रीचा विचार, आधुनिक एतद्विषयक शास्त्रकल्पनांशीं जुळता आहे, हा डॉ. पेंडसे यांच्या प्रस्तुत अभ्यासाचा निष्कर्ष असून, त्याच्याशीं मी संपूर्ण सहमत आहें. प्रो. बोमन, रसेल, एलिस इत्यादि आधुनिक अभ्यासकांनीं यशस्वी विवाहाची मूलभूत कल्पना तीन भागांतच वर्णन केलेली दिसत आहे. ते तीन भाग म्हणजेच ‘ सुप्रजा ’, ‘ व्यक्तिमत्वाची जुळणी ’ व ‘ रतिसुख ’. या गोष्टी मिळविण्याच्या मार्गाचा विचार व आचार यासंबंधीं पौर्वात्य व पाश्चिमात्य यांत पूर्वपश्चिम एवढें अंतर असून, तें रहाणें सध्यांच्या पाश्चिमात्यांच्या अनिश्चित व प्रायोगिक सामाजिक परिस्थितींत अपरिहार्यच दिसतें.

सामाजिक कायदे हे ध्येयात्मक कल्पना समाजावर लादण्यास उपयोगी पडणार नाहीत. सामाजिक गुन्हेगारीला कांहीं आळा घालून त्यांना तारेच्या कुंपणांत ठेवण्यापुरताच कायद्याचा उपयोग मर्यादित असतो. तेव्हां यशस्वी विवाहाचा हा मूलभूत विचार समाजावर ठसविण्याचें कार्य हें मुख्यतः समाजधुरीण व सुशिक्षित सुधारणावाद्यांचें खरें कार्य असावयास हवें. सद्यःस्थितींतील याविषयींच्या

गाढ निद्रेंतून खडबडून जागृतावस्था उत्पन्न करण्यास प्रस्तुत ग्रंथांतील चिकित्सक चर्चेचा भरपूर उपयोग होईल.

डॉ. पेंडसे यांचा ग्रंथ नुसता अभ्यास आहे एवढेंच नव्हे, तर त्यांनीं सद्यः-स्थितीला धरून याविषयीं शैक्षणिक सुधारणाहि सुचविली आहे. या सूचना स्वागतार्ह असून, त्यांचा सर्व संबंधित मंडळींनीं सखोल विचार करून काहीं आचारास हात घातला पाहिजे. प्रजोत्पादनक्षमतेच्या विषमतेसंबधीं त्यांनीं ग्रंथांत व शेवटीं परि-शिष्टांत दिलेली माहिती वाचकांस उद्‌बोधक वाटेल. या विषयाचा सांगोपांग अभ्यास व्हावयास हवा. त्याकरितां पुणे हें ठिकाणहि फार सोईचें आहे. पुण्यांतच महर्षि कर्वे, कै. आगरकर इत्यादि समाजसुधारक निर्माण झाले. या विषयाशीं संबंधित अशा शास्त्रज्ञांचा वर्गहि येथें आहे. ही सर्व मंडळी एकत्र येऊन डॉ. पेंडसे यांनीं केलेल्या उपयुक्त सूचनांना सर्वांनीं चालना देणें जरूर आहे, असेंच माझें मत आहे. या विषयाला चालना देण्यांतच एतद्विषयक नवीन सुधारणांचा उगम होईल.

शेवटीं डॉ. पेंडसे यांनीं पुष्कळ कष्ट व परिश्रम करून केलेला हा विचार-प्रक्षोपक अभ्यास प्रसिद्ध होत आहे, याबद्दल त्यांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

डॉ. प. कृ. गोडे, एम्. ए. डी. लिट्.
भांडारकर ओरिएंटल रीसर्च इंस्टिटयूट,
पुणें २.

प. कृ. गोडे

# प्रस्तावना

योग्य विचार हा निश्चित आचाराचा व तदंगभूत मानसिक समाधानाचा पाया आहे. हें तत्व मान्य केलें, तरी योग्य विचार कशास म्हणावें, यासंबंधीं विसाव्या शतकांत शिक्षित समाजांत एकवाक्यता दिसणें कठिण आहे. याचें मुख्य कारण त्यांच्यातील परंपरागत श्रद्धा नाहींशा होत असून, नव्या श्रद्धा निर्माण होत आहेत किंव कांहीं अश्रद्धच आहेत. मनुष्याच्या भौतिक ज्ञानांत एकसारखीं भर पडत असल्यानें, नित्याच्या ऐषआरामांत, यंत्रसामुग्रींत प्रवासाच्या नवीन साधनांत व युद्धसामुग्रींतहि नित्य नवे बदल अस्तित्वांत येत आहेत. यामुळें ‘ बदल म्हणजे प्रगति ’ असा आभास सर्वच क्षेत्रांत उत्पन्न झालेला दिसतो. प्रवासाच्या साधनांत जास्त गतिमान् वाहनें अस्तित्वांत आलीं, यास गतीचें दृष्टीनें प्रगति म्हणणें रास्तच होईल. परंतु स्त्री-पुरुषांच्या पोशाखांत, वेषभूषेंत, कुटुंबपद्धतींत व वर्तणुकींत जे नित्य बदल होतांना दिसतात, यास प्रगति म्हणणें जरा कठिणच होईल. कारण त्यांत ध्येय व साधनें यांचा स्पष्ट विचार असत नाहीं. मुद्दा एवढाच कीं, बदल हा नेहमींच प्रगतीचा निदर्शक असतो असें नव्हे. तेव्हां सर्व क्षेत्रांत सर्व ठिकाणीं असा भ्रम उत्पन्न होऊं नये, याची जरूर काळजी घेतली पाहिजे.

व्यष्टिसमष्टीचे दृष्टीनें समाधान व शांति हा जगांतील सर्व उद्योगांचा एकमेव शेवट किंवा ध्येयवाद असावा, यासंबंधीं विशेष मतभिन्नता दृष्टीस पडत नाहीं. परंतु या ध्येयाप्रत पोहोंचण्याच्या साधनविचारांत मात्र रुचिवैचित्र्याप्रमाणें बरीच भिन्नता दृष्टोत्पत्तीस येते. निरनिराळे धर्मवाद, अर्थवाद, समाजसत्तावाद, राष्ट्रांचें सैनिकीकरण, समतावाद, औद्योगीकरण, इत्यादि नानाविध वाद व दृष्टिकोन निरनिराळ्या कालीं व स्थलीं प्रचलित होते व आहेत. भारतियांच्या दृष्टिकोनास ‘ पुरुषार्थवाद ’ अशी संज्ञा देणें शक्य होईल. आमच्या मतें, हा वाद किंवा दृष्टिकोन कांहीं बुद्धिगम्य तत्वप्रणालीवर आधारलेला आहे. स्थिरस्वरूप मूल्यावर त्याचें अधिष्ठान आहे. त्यामुळें हा दृष्टिकोनहि स्थिरस्वरूप आहे. तेव्हां त्यास सहजच खऱ्या अर्थानें सनातनत्व प्राप्त झालेलें आहे. कोणत्याहि व्यष्टिसमष्टीस स्थलकाल-

निरपेक्षत्वानें तो लावून दाखवितां येईल. त्याचा विचार, प्रचार व आचार केल्यास व्यष्टिसमष्टीचें समाधान व शांति, हेंच फल निर्माण होईल. एवढ्याचकरितां आज विसाव्या शतकांतहि या भारतियांच्या सिद्धांताचा कांहीं अभ्यास व आचार प्रचलित व्हावा, याकरितां आम्हीं प्रस्तुत ग्रंथरूपानें प्रयत्न केला आहे.

समाधान व शांति या गोष्टी पुष्कळ कारणांनीं उत्पन्न होणारे अंतिम परिणाम आहेत, हें प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. यास 'बहुकारणयोग' अशी उत्तम संज्ञा देतां येते. यास तर्कशास्त्रांत 'पॉलिकॉझल' ( Polycausal ) परिणाम अशी इंग्रजी संज्ञा आहे. मनुष्यप्राण्याच्या सर्व प्रकारच्या वासनांचा योग्य परामर्ष या दृष्टिकोनांत घेतला असून, त्यांचें समष्टीस उपकारक असें कार्य घडावें, याकरितां भारतियांचे प्रस्तुत दृष्टिकोनांत मुख्य खटाटोप केलेला दिसून येतो. यामुळें उपरि-निर्दिष्ट सर्व वादांचा यांत साकल्यानें विचार असून, त्यांतील निरनिराळे फायदे व गुण यांत एकत्रित आणण्याचा प्रयत्न आहे. वासना हे सर्व इंद्रियार्थ, महत्त्वाकांक्षा व कार्य यांचें मूल कारण धरलें, तर वासना नाहींशी करणें हें जसें निष्फळ आहे, तसें वासनांची गति अनियंत्रित होऊं देणें, हें पण असमाधानाचें व अशांततेचें मूळ कारण आहे. तेव्हां, प्रवृत्ति व निवृत्ति यांचा समष्टीस उपकारक असा मेळ जर घालतां आला नाहीं, कामात्मता व अकामता यांतील वासनांचा 'सुवर्णमध्य' जर साधतां आला नाहीं, तर व्यक्तिगत असमाधान व सामाजिक अशांतता यांचें पोषण नेहमींच होत रहणार. स्त्रीपुरुषांच्या सर्व मूलभूत वासनांचा 'सुवर्णमध्य' किंवा 'समत्वयोग' भारतियांनीं 'पुरुषार्थवादां'त ग्रथित केलेल्या तत्त्वांत साधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. म्हणूनच हा वाद आमच्या देशांत मोठ्या प्रतिष्ठेस पावला. श्रीशंकराचार्यांपासून तों छत्रपति शिवाजीसारख्या राजकारणधुरंधरापर्यंत सर्वांनीं हा दृष्टिकोन ग्राह्य धरला. यामुळेंच भारतीय संस्कृति ही मुख्यतः शांतताप्रधान व परमतसहिष्णु झाली. आज विसाव्या शतकांतहि भारतीय संस्कृतींत मुरलेले हे गुण पाश्चिमात्य संस्कृतीचे इतके आघात झाल्यावरहि, उचल खात असून, महात्मा गांधीप्रणीत अहिंसावाद आणि पं. नेहरूचें शांततावादी धोरण या गोष्टी यांतूनच निर्माण झालेल्या दिसतील.

पुरुषार्थवादाची उभारणी स्थिरस्वरूप चिरस्थायी मूल्यावर केलेली आहे. मानवी वासनांच्या सर्व पसाऱ्यांत कांहीं स्थिरभाव आहेत. वैद्यक व्यवसायाचें स्वरूप उपकरणात्मक साधनांमुळें व ज्ञानाचे प्रगतींत कितीहि बदललें, तरी वैद्याचें, आरोग्य

हें ध्येय व नीति बदलत नाहींत. वैद्यास कांहीं अर्थनिरपेक्षत्वानें चिकित्सा करण्याची संवय असणें जरुरीचें आहे. तो नुसता अर्थप्रधान बनेल, तर त्याचा परिणाम त्याच्यावर व शास्त्रावर वाईटच होणार. शिक्षणांतहि पण्यवृत्ति शिरली तर विद्येची हानि होणें अपरिहार्यच असतें. सैन्यांत ढिलाई शिरली तर त्या संघटनेस मारकच ठरते. तेव्हां सैन्यांत शिस्त, शिक्षणांत व वैद्यकीत पण्यवृत्तीचा अभाव, हीं मूल्यें त्या त्या क्षेत्रांत स्थिरस्वरूप आहेत. त्यांची जरुरी हजारों वर्षांपूर्वी जेवढी होती तेवढीच आज आहे व पुढें राहील. म्हणूनच या मूल्यांस आम्ही 'चिरस्थायी स्थिरभाव' वा 'स्थिरस्वरूप मूल्यें' असें नामाभिधान करतों.

काम-वासनेंतहि अशींच स्थिरस्वरूप मूल्यें आहेत. स्त्रीचें खरें समाधान मातृत्वांतच राहाणार. उत्तम कुटुंबच सुप्रजेची जननी ठरणार. सुप्रजाच माता पितरांचें परम समाधानाचें स्थान होणार. सुप्रजाच शेवटीं समष्टिरूप राष्ट्राचें वैभव वाढविणार. विश्वास व प्रेम हींच मूल्यें पतिपत्नींमध्यें खरा ओलावा उत्पन्न करणार. तेव्हां सुप्रजा, विश्वास, प्रेम, याच गोष्टी शेवटीं कुटुंबसंस्थेच्या दृष्टीनें स्थिरस्वरुप असून, हीं मूल्यें न बदलणारीं अतएव सनातन स्वरूपाचीं आहेत. राष्ट्रोत्कर्षास उपयुक्त पतिपत्नीप्रजात्मक कुटुंब सिद्ध होण्यास याच मूल्यांची जोपासना स्थलकालनिरपेक्षत्वानें करणें इष्ट ठरणार आहे. मग विवाहसमारंभ कसाहि बदलो, पोशाख, वेषभूषा व पद्धतींत कांहींहि बदल होवो. अशा प्रकारच्या सर्व बदलांचा कांहींहि परिणाम या स्थिरस्वरूप मूल्यांवर होणार नाहीं. भारतियांनीं हे स्थिरभाव लक्षांत घेऊनच पुरुषार्थवादाची उभारणी केली असल्यानें, त्यांचा हा दृष्टिकोन भक्कम पायावर उभा आहे. त्यास कोणत्याहि सांस्कृतिक विकृतींचा वा ॲटमबॉंबचा धक्का लागणार नसून, हीं स्थिरस्वरूप मूल्यें, जे जे समाज विसरतील, जे जे तद्विरुद्ध वर्तन करतील, ते दुःखी होतील व आपल्या समष्टीचा नाश आपणच ओढवून घेतील. प्रत्येक कार्यक्षेत्रांतील हीं स्थिरस्वरूप मूल्यें समाजांत चिरस्थायी व्हावीं, याकरितां भारतियांनीं फार मोठा खटाटोप केलेला आहे. त्यांत मुख्यतः संस्कार येतो. परंपरा येते. ध्येय व प्रत्यक्ष परिस्थिति यांची सांगड घालावी लागते. मूळ स्थिरस्वरूप मूल्यास विरोध उत्पन्न न करतां, नैसर्गिक व परिस्थितिजन्य वैचित्र्य लक्षांत घेऊन, विविधतेनें नटलेल्या प्रत्यक्ष आचाराचा विचार करावा लागतो. बहुभार्यात्व, पारदारिकत्व व वेश्याव्यवसाय, इत्यादि आचारांवरील भारतीय दृष्टिकोन या दृष्टीनें अभ्यसनीय आहे. भारतियांच्या या विचारप्रणालींतून व

संस्कारपरंपरेंतूनच आमच्या देशांत कोणताहि एकपत्नीकत्वाचा कायदा नव्हता तेव्हांहि बहुजनसमाजांत एकपत्नीकत्वाचाच आचार स्वेच्छेनें नांदत होता. भूतकालांत आमच्या देशांत याच संस्कारपरंपरेंत अगणित कर्तृत्ववान् स्त्रीपुरुष जन्मास आले. त्यांचा पराक्रम कोणत्याहि परकीय देशांतील कर्तृत्ववान् मंडळीपेक्षां कमी तर नव्हताच, पण शांतताप्रधान ध्येयांची खरी जोपासना भारतांमध्येंच झालेली दिसेल.

भारतियांचा हा 'पुरुषार्थवाद' म्हणजेच धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ. प्रस्तुत ग्रंथांत त्यापैकीं 'काम' हा पुरुषार्थ सिद्ध करण्याकरितां भारतियांनीं केलेला विचार व आचार एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबरोबरच त्यासंबंधीं बुद्धिगम्य विचार व कांहीं ठिकाणीं पाश्चिमात्य संस्कृतीशीं तुलना असा सर्व विषय प्रस्तुत ग्रंथांत आणण्याचा प्रयत्न केला आहे.

जगांतील बहुसंख्य स्त्रियांना विवाह हें एक अत्यंत महत्त्वाचें कार्यक्षेत्र पूर्वीं होतें व आजहि आहे. कांहीं अल्पसंख्य स्त्रिया जरी कांहीं काल इतर विविध क्षेत्रांत कर्तृत्वाची चमक दाखवितांना दिसतात, तरी शेवटीं स्त्रीहृदयाचें व वासनांचें खरें समाधान मातृत्वाभोंवतींच असतें, हें विसरून चालणार नाहीं. तेवढेंच समाधान त्यांना कुटुंबनिरपेक्ष एकाकीं स्थितींत लाभेल, असें म्हणण्याचें धाडस आम्हांस करवत नाहीं. स्त्रीचें अंतिम समाधान स्त्रीत्वाच्या परिणतींत असून तिच्या पुरुषीकरणांत नाहीं, हा सामान्य सिद्धांत म्हणून धरून चालण्यास हरकत नाहीं. म्हणून भारतियांस स्त्रीपुरुषांची स्पर्धा कोणत्याहि परिस्थितींत मान्य नसून, त्यांचें परस्परपूरकत्वच अभिप्रेत आहे.

कोणत्याहि कार्यक्षेत्रांतील सुयश आणि उच्च पदवी प्राप्त करून घेण्यास मोठ्या कष्टाची व त्यागाची जरुरी नेहमींच असतें. मग तो पुरुष असो वा स्त्री असो. पुरुषासहि आपल्या निवडलेल्या कार्यक्षेत्रांत हेच गुण दाखवावे लागतात. नाहींतर त्यांतहि अपयश ठरलेलेंच असतें. परंतु ही उमेदवारी व कष्ट संपल्यानंतर त्या व्यक्तीस मानमान्यता व सहकाऱ्यांचा विश्वास या गोष्टी आपोआपच मिळतात. त्याच्याकरितां भांडणाचा प्रसंग सहसा येत नाहीं. स्त्रीसहि तिच्या कार्यक्षेत्रांत याच गतीनें पुढें जावें लागतें. आदर, विश्वास, प्रेम, त्याग, सुप्रजा व एकपत्नीकत्व या एकापुढें एक पायऱ्या असून, त्या कालांतरानें परस्परांच्या साहचर्यांत उत्पन्न होणाऱ्या आहेत, हें ओळखणें जरूर आहे. भारतियांची कामपुरुषार्थविषयक सर्व

शिकवण वरील तत्त्वास धरून आहे, हें या ग्रंथपरीक्षणानें वाचकांस दिसून येईल. मधुपर्कविधींत सुरवात व सप्तपदींत शेवट, हा विवाहविधि हीच श्रेणी दर्शवितो. याउलट अनादरांत सुरवात झाल्यास, अविश्वास, अप्रीति, हक्कांचे तंटे, प्रजाहीनत्व घटस्फोट व कुटुंबनाश हीच परंपरा प्रत्ययास आली तर आश्चर्य काय ?

येथें अशी एक शंका येईल कीं, इतकें सर्व ज्या देशांत होतें, तेथें वैवाहिक अपयश असूंच नये. प्रयत्न व फल यांचा शंभर टक्के संबंध सहसा कोणत्याहि कार्यक्षेत्रांत असत नाहीं. पुष्कळ गोष्टी मनुष्यकर्तृत्वाच्या पलीकडे असतात, हें सर्वमान्य आहे. प्रयत्नानंतर यशप्राप्तीचा संभव वाढतो, किंवा अपयशाचा संभव कमी होतो, एवढेंच. भारतियांच्या या मतप्रणालींत पुरुषापेक्षां स्त्रीपासून विवाहांतर्गत अपेक्षा जास्त आहेत हें खरें. स्त्रीस यांत जास्त बंधनें व त्याग अभिप्रेत आहे, असें दिसतें. याचा भरपूर मोबदला गृहिणीपदप्राप्तीनंतर मिळावा, अशीहि सोय त्यांत केलेली दिसते. परंतु पुरुष नेहमींच निसर्गतः सहजस्वतंत्र असल्यानें, स्त्रीस त्यागानंतरहि कित्येक वेळां मानहानि व दुःख सोसावें लागत असे. परंतु या उदाहरणामुळें मूळ सिद्धांतास बाध येत नाहीं. यांत मुख्य कारणें, शास्त्रापेक्षां कित्येक वेळां बलिष्ठ झालेल्या घातुक रूढी व व्यक्तिगत अमर्याद स्वार्थ, हीं असून, यामुळें भारतियांच्या तत्वज्ञानाचा प्रवाह कोठें कोठें गढूल झालेला दिसतो. प्रस्तुत ग्रंथांत हें मूळ तत्वज्ञान व स्वार्थजनित रुढी यांचें प्रसंगानुरूप दिग्दर्शन केलेलें वाचकांस आढळेल. सामाजिक सुधारणा करतांना हा हंसाचा ‘ जलक्षीरन्याय ’ उपयोगांत आणतां आला पाहिजे. तरच सुक्याबरोबर ओलेंहि जळून जाण्यानें होणारे अपघात टळण्याची शक्यता आहे.

विसाव्या शतकांत जे सामाजिक व कौटुंबिक बदल अस्तित्वांत येत आहेत, ते विशेषतः उच्चवर्णीयांत दिसत असून, ते मुख्यतः पाश्चिमात्य स्वरूपाचे दिसतात. त्यामुळें समाजाच्या या थरांत विवाह व कुटुंबविषयक जे जे नवे प्रश्न उत्पन्न झालेले दिसतात, ते सर्व पाश्चिमात्य समाजांत यापूर्वीच अस्तित्वांत असलेले दिसून येतील. भारतांमध्येंहि अशा प्रकारची प्रयोगावस्था एका कालांत होऊन गेली असावी असा तर्क करणें फारसें अवास्तव होणार नाहीं. स्थिरस्वरूप मूल्यांचें दर्शन होण्यास प्रत्येक कार्यक्षेत्रांत कांहीं घडामोड व प्रयोग होऊन जाणें अपरिहार्यच असतें. त्यामुळें आज भासणारे नवे प्रश्न येथेंहि होऊन गेले असल्याशिवाय भारतीय

ऋषींनीं एवढे निश्चित आचार फक्त कल्पनातरंगांवर बांधले, असें म्हणणें संयुक्तिक होणार नाहीं. चार्वाकासारखी मतप्रणाली घेतल्यास आज कोणताहि नवमतवादी त्यापुढें फिका पडलेला दिसेल. असो. पाश्चिमात्यांच्या अभ्यासरहित अंधानुकरणानें नवीन उत्पन्न होत असलेल्या कांहीं प्रश्नांचा थोडा परामर्ष प्रस्तुत ग्रंथांत घेतलेला आढळेल. त्याचा विचार वाचक अभ्यासू वृत्तीनें करतील अशी आशा आहे.

मनुष्याच्या मूलभूत समाधानांत भर टाकण्यांत यशस्वी विवाह व गृहसौख्य या गोष्टींचा प्रामुख्यानें हात येतो. या दृष्टीनें भारतियांनीं फार खोल व विस्तृत विचार केलेला दिसतो. यशस्वी विवाह व तदंगभूत गृहसौख्य या प्रश्नां-वरील भारतियांचा दृष्टिकोन म्हणजेच कामपुरुषार्थ. प्रस्तुत ग्रंथांत यशस्वी विवाहाचीं तीन मुख्य साधनें म्हणजे सुप्रजा, उत्तम रति व व्यक्तिमत्त्व ची जुळणी, यासंबंधीं भारतीय दृष्टिकोन, तात्त्विक चर्चा, त्यास धरून भारतीय ध्येयाचार, पाश्चिमात्य संस्कृतीशीं कांहीं तुलना, सद्यःस्थितीस धरून स्थिरस्वरुप मूल्यांची जोपासना, इत्यादि विषय प्रस्तुत ग्रंथांत एकत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. विस्तारभयास्तव सूत्रबद्धता ठेवणें अपरिहार्यच असतें. तर्कशुद्ध पद्धतीनें चर्चा करतांना, विषयाचें विवेचन जेवढें करतां आलें तेवढेंच केलें आहे. विवाहविषयक कायदा, लोकसंख्येचे नानाविध प्रश्न, वेश्याव्यवसायासारखे विवाहबाह्य आचार, इत्यादि विषयांचा विस्तृत विचार या ग्रंथांत करणें अशक्य आहे. फक्त जरूर ती तात्त्विक चर्चा व कांहीं महत्त्वाचे मुद्देच येथें आणतां आले आहेत.

भारतियांचा हा मूळ प्रवाह कितीहि शुद्ध आहे असे गृहीत धरलें, तरी कालांतरानें मानवाच्या स्वार्थप्रवृत्तीमुळें, रूढीनें आणि शेवटीं पाश्चिमात्य संस्कृति-संघर्षानें, मूळ तत्वप्रणालीशीं आज आपली फारकत झालेली दिसते. त्यामुळें; स्त्रीची आर्थिक, सामाजिक व बौद्धिक गुलामगिरी, पुरुषाची अनिर्बंध सत्ता, स्त्रीची चूल व मूल यांकरितां चार भिंतींत डांबवणूक, एकत्र कुटुंबांत नववधूचा छळ, आणि म्हाताऱ्यांचे बारा वर्षांच्या मुलींशीं विवाह म्हणजे भारतीय संस्कृति, अशी समजूत शिक्षित समाजांत सर्वत्र प्रसृत झालेली दिसते. मराठी व इतर देशी भाषांतील वाङ्मयांतहि याचें प्रतिबिंब दृष्टीस पडतें. आचारहीनतेंत ब्राह्मणत्व समजण्याइतकीच ही विचारसरणी मूलतः दूषित आहे. ब्राह्मणत्वास जन्म व आचार या दोहोंचीहि सारखीच जरुरी आहे, असा स्मृतिकारांचा अभिप्राय आहे. किंबहुना, आचारास

कित्येक वेळां प्राध्यान्यहि दिलेलें दिसेल. परंतु हें सर्व बाजूस सारून स्वार्थप्रेरित हेतूनें, कांहीं ब्रह्मबंधूनीं स्वतःच्या सोयीचें असें तत्वज्ञान प्रचलित केलें. ब्राह्मणत्वास जन्म असला म्हणजे पुरे असें ठरविलें व त्यामुळें कांहीं आचारहीन वृत्तींच्या लोकांना जरी ब्राह्मणत्वाची प्रतिष्ठा कांहीं काळ मिरवितां आली, तरी शेंवटीं हें सर्व आज ढासळूं पहात आहे. यास प्रत्यक्ष वेगळ्या पुराव्याची जरुरी नाहीं. पाश्चिमात्यांच्या अनुकरणानें जे बदल आपण उच्चवर्णीयांत या शतकांत आलेले पाहतो, त्यामुळें वैवाहिक यश मिळविणें सद्यःस्थितींत कठिण होत चाललें आहे. दोन स्वतंत्र तऱ्हेनें वाढलेल्या व्यक्तिमत्वांची स्पर्धा विवाहांत डोकावूं लागल्यामुळें ही जास्त कठिण समस्या सोडविणें सहजच बिकट होतें. त्यांत कांहीं प्रजोत्पादनासारख्या सहज उत्पन्न होणाऱ्या नैसर्गिक गोष्टीमुळें व सामाजिक व इतर अडवणुकीमुळें उच्चवर्णीयांत स्त्रीपुरुषांचे एकत्र संसार जरी चाललेले दिसले, तरी यांतून परस्पर-विश्वास, प्रेम व आदर यांचा अभाव जास्त जाणवत राहणें शक्य असून, त्यामुळें खरें समाधान दूर जात आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

विसाव्या शतकांत स्त्रीसंबंधीं जे नवे बदल अस्तित्वांत आलेले दिसतात, ते यापुढें तसेच राहाणें अपरिहार्यच आहे. अर्थस्वातंत्र्य, समाजस्वातंत्र्य, स्त्रीपुरुष-समता, स्त्रीची पुरुषांबरोबर स्पर्धा व तसेंच शिक्षण, या सर्व गोष्टीमुळें चार भिंतीं-तून स्त्रीचें जरी विमोचन झालेलें दिसलें आणि त्यामुळें ती सुखी आहे असें भासूं लागलें, तरी तिच्याभोंवतीं नवीं दुःखेंहि निर्माण होत आहेत, हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां स्त्रीचें जें प्रमुख कार्यक्षेत्र विवाह त्यास धरून हे बदल किती प्रमाणांत व कसे असावेत यांच्या योग्य मर्यादा ओळखतां न आल्यास त्याचा कुटुंबएकता, गृहसौख्य व सुप्रजा, इत्यादि विविध मूलभूत मानवी समाधानाच्या मूल्यांवर परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. याबाबत पाश्चिमात्य समाजांत जे परिणाम दिसून येतात, त्यापेक्षां येथें वेगळें घडेल असें म्हणण्यास फारसा पुरावा दिसत नाहीं.

विसाव्या शतकांत बुद्धिगम्यतेच्या गप्पा सर्वत्र ऐकूं येत असतां, उपरि-निर्दिष्ट जिव्हाळ्याच्या विषयावर शिक्षणांत वा बाहेर कांहीं बुद्धिगम्य विचार वा प्रचार अस्तित्वांत नसावा हें नवल होय. पाश्चिमात्यांकडे यासंबंधीं विचार व चळवळी चालूं करणें क्रमप्राप्त झालें असून, विवाह व तदनुषंगिक विषयांवर शिक्षणक्रमांतच तरतूद करण्याकडेहि प्रवृत्ति दिसून येते.

यांत्रिक प्रगति, युद्धसामुग्रींत प्रगति व ऐषआरामाच्या साधनांत प्रगति म्हणजेच केवळ मानवाच्या मूलभूत वासनांच्या समाधानांत भर टाकणें नव्हे, हें सत्य पाश्चिमात्यांच्या निदर्शनास येऊं लागलें आहे. मानवी मनाचें खरें चिरस्थायी समाधान ( Solid or robust Satisfaction of Life ) मिळविण्याकरितां मनुष्यानें स्वतःसंबंधींचाच अभ्यास व विचार जास्त बारकाईनें केला पाहिजे, हें पण त्यांना उमगूं लागलें आहे. शास्त्रीय प्रगति वगैरे पुष्कळ गप्पा ठोकल्या, तरी भौतिक शास्त्रांच्या मानानें मानवासंबंधींची सर्व शास्त्रें अजून पुष्कळ परिणत झाल्याशिवाय पुढें तरणोपाय नाहीं, असेंहि त्यांना दिसूं लागलें आहे. शेवटीं राष्ट्रांचें उत्कर्षापकर्ष फक्त भौतिक शास्त्रांच्या प्रगतीवर अवलंबून नसून सुप्रजेवर असतात कीं काय, अशी शंकाहि डोकावत आहे. तेव्हां सद्यःपरिस्थितींत शिक्षणांत हा सर्व विचार आणणें अत्यंत योग्य व जरुरीचें आहे. भारतियांच्या दृष्टिकोनांतहि स्त्रीस शिक्षण होतेंच, पण मुख्य कार्यक्षेत्रास पोषक होतें एवढेंच. पाश्चिमात्य संस्कृतीसंबंधीं आम्ही घेतलेला परामर्ष कदाचित् पूर्वग्रहदूषित आहे कीं काय, असा संशय येण्याची शक्यता आहे. परंतु पाश्चिमात्यांचें गुणग्रहण त्याबरोबरच केलेलें पाहिलें म्हणजे ‘ पाश्चिमात्य म्हणून त्याज्य ’ असा आमचा अभिप्राय नाहीं, एवढें सूज्ञ वाचक ओळखतीलच. भारतियांचा दृष्टिकोन सांगतांना लेखकानें सद्यःस्थितीकडे दुर्लक्ष केलें आहे, अशी शंकाहि कदाचित् येईल. परंतु भारतीय संस्कृति व दृष्टिकोन याबाबत ग्राह्य आहे असें ठरल्यास, त्यांतील स्थिरभावांचें जतन कसें करतां येईल, एवढाच मुद्दा आमचे दृष्टीनें महत्त्वाचा आहे. हें साधण्यांतच भारतीय संस्कृतीचें खरें संधर्वन होणार आहे.

भारतीय संस्कृतींत हा ‘ पुरुषार्थवाद ’ व ‘ स्थिरभाव ’ जगांतील मानवाच्या हितार्थ व उपकारार्थ उत्पन्न झालेले असून, स्थलकालनिरपेक्षत्वानें त्यांचा प्रचार व आचार करणें शक्य आहे असा आमचा दावा आहे. देशकालाच्या मर्यादा त्यांस नसल्यानें खऱ्या अर्थानें ते ‘ जागतिक ’ व ‘ सनातन ’ असून, त्यांचा आचार व्यक्तिगत समाधान व विश्वशांति उत्पन्न करण्यास पोषकच ठरणार आहे. भारतियांचा हा मूलग्राहि दृष्टिकोन कोणत्याहि देशांतील व धर्मांतील समाजांना ग्रहण करतां येणें शक्य आहे. तसें करण्याचीं कारणें व फायदे सर्वत्र सारखेच आहेत. म्हणूनच भारतियांच्या या समाजशास्त्रीय शोधाचा प्रचार सर्वत्र करणें भारतियांचें कर्तव्य आहे.

ग्रंथाचें नामकरण ' काम ' या शब्दावरून अश्लील मानणें चुकीचें होईल हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. कामपुरुषार्थास धरून कामवासनेसंबंधीं सर्व चर्चा संपूर्ण श्लील व शास्त्रीय आहे असा भारतीय दृष्टिकोन आहे. कोणतीहि लैंगिक चर्चा व अश्लीलता, हा संबंध जास्त पाश्चिमात्य स्वरूपाचा असून, त्यांचेकडे एकंदर कामवासनेकडे पहाण्याचा दृष्टिकोन मूलतः सदोष असल्यानें व पुरुषार्थ-विचार खिश्चन धर्मांत अस्तित्वांतच नसल्यानें, सर्व कामवासना एका कालीं त्याज्य व अश्लील ठरविली गेली. आतां त्यांचेकडे याबाबत दुसरें टोंक येत आहे. लैंगिक भूक भागविण्यांत अश्लीलतेचा प्रश्नच येत नसून, उलट यासंबंधीं कांहींहि धार्मिक व नैतिक बंधनें नसल्यास बरें, असाहि दृष्टिकोन अस्तित्वांत येऊं पहात आहे. भारतियांचा दृष्टिकोन हाच यांत सुवर्णमध्य असून, प्रस्तुत ग्रंथाच्या मुखपृष्ठावरच भगवद्गीता-कारांच्या शब्दांत तो मुद्दाम घातलेला आहे. पाश्चिमात्यांना तो केव्हांतरी समजावून घ्यावा लागेल. परंतु तत्पूर्वी आपण मात्र ' पाश्चिमात्यांचें अनुकरण म्हणजे प्रगति ' असा भ्रम टाकून देऊन भारतीय संस्कृतींतील या महत्त्वाच्या पैलूचें नीट जतन व पोषण करणें आपलें कर्तव्य आहे.

ज्यांत अभ्यास व विचार जास्त अशा ग्रंथास देशी भाषांत वाचक व प्रकाशक मिळणें कठिणच ! तरीहि सध्यांची या विषयासंबंधींची वैचारिक वाण व त्यामुळें चालू असलेली हानी लक्षांत घेऊन आमचे उत्साही प्रकाशक श्री. पंडितराव कुलकर्णी यांच्या सहाय्यानें लेखकानें वर्षानुवर्ष केलेले परिश्रम वाचकांच्या हातीं देणें शक्य झालें आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या कामीं बाम्बे एशिॲटिक सोसायटी, भांडारकर रीचर्स इन्स्टिटयूट, मराठी ग्रंथालय, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, डेक्कन कॉलेज व एस्. पी. कॉलेज इत्यादि ग्रंथालयांची बहुमोल मदत झाली. त्याचप्रमाणें विचार-विनिमयाच्या दृष्टीनें प्रो. प. कृ. गोडे, प्रो. ना. अ. गोरे, डॉ. एन्. के. भिडे इत्यादि स्नेह्यांची पुष्कळ मदत झाली. या सर्व संस्थांचे व व्यक्तींचे आम्हीं ऋणी आहोंत. टिप्पणें, ग्रंथलेखन व प्रकाशन इत्यादि खटाटोपांत सौ. विजयाबाई पेंडसे, श्री. चित्राव, कु. भिडे, कु. कुलकर्णी इत्यादि मंडळींनीं मदत केली, त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे. श्री. मेहेंदळे यांनीं मुद्रणाचे कामीं व श्री. स्मार्त यांनीं प्रुफ–दुरुस्तीस जे कष्ट घेतले त्यांचे आम्हीं आभार मानतो. डॉ. प. कृ. गोडे यांना

आम्ही प्रस्तुत ग्रंथास पुरस्कार लिहिण्यासंबंधीं केलेली विनंति त्यांनीं आनंदानें मान्य केली, याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतों. प्रो. गोडे यांचेशीं केवळ विद्याव्यासंगामुळें आमचा आलेला पुष्कळ वर्षांचा संबंध या घटनेमुळें कायम स्वरूपांत राहिला आहे.

शेवटीं आमच्या परमपूज्य माता-पित्यांनीं आमचेवर जें संस्करण केलें, त्यामुळेंच हा विषय आज आम्हांस नीट उमगूं शकला. त्यांच्या ऋणांतून कांहीं-अंशीं मुक्त होण्याच्या दृष्टीनें आम्ही हा प्रयत्न त्यांनाच अत्यंत आदरानें समर्पण करीत आहों.

ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें आम्ही हे कष्ट पुरे करूं शकलों, त्या सर्वपुरुषार्थांस आद्यचेतना देणाऱ्या सद्ब्रह्माचें स्मरण करून, त्याची अशीच कृपा लाभल्यास ऋषिऋण फेडण्याचा हा उद्योग आणखीहि पुढें चालू ठेवतां येईल असा आम्हांस विश्वास वाटतो. मुद्रणासंबंधीं जेवढी काळजी प्राप्त परिस्थितींत घेतां आली तेवढी घेऊनहि जे दोष राहिले आहेत, त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी. पुढच्या आवृत्तीचा प्रसंग आल्यास याबाबत जास्त सुधारणा करणें शक्य होईल.

अशा प्रकारच्या विषयांत मतभिन्नता रहाणें अपरिहार्यच असतें. शिवाय विषय फार विस्तृत स्वरूपाचा असल्यामुळें ग्रंथांत उणीवा राहाणेंहि पुष्कळ शक्य असतें. या सर्व गोष्टींची आम्हांस भरपूर जाणीव आहे. परंतु आमचे सूज्ञ वाचक प्रस्तुत ग्रंथांतील मुख्य प्रमेयाशीं सहमत होतील अशी आम्हांस आशा आहे. उणीवा आमचे नजरेस आणल्यास पुढच्या आवृतीच्या वेळीं उपयोग होईल. दोषदृष्टिबरोबर त्यांतील कांहीं गुणांचेंहि ग्रहण झाल्यास या अभ्यासाचें चीज होईल. या ग्रंथानें कांहीं विचारी व अभ्यासू समाजसुधारकांचें लक्ष जरी या विषयाकडे गेलें, तरी या ग्रंथाचें कार्य झालें असें आम्हीं समजूं.

डॉ. ग. सी. पेंडसे,
९५५ सदाशिव,
पुणें २.

ग. सी. पेंडसे

... ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ..................
क्रमांक .......................... नोंः दिः ..............

"धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।" भगवद्गीता ७।२१

# काम-पुरुषार्थ

अथवा

## यशस्वी विवाहाची भारतीय मीमांसा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२५८
दा. क्र. ........
शाखा (स्थळ प्रत)

## प्रकरण १ लें

### जीवनासंबंधीं भारतियांचा दृष्टिकोन

**ग्रंथहेतु–भारतियांचा जीवनावरील मानवी त्रिविध दृष्टिकोन–वर्णसंस्था–अद्वैतसिद्धान्त–चतुर्विध पुरुषार्थ–स्मृति, महाभारत, भगवद्गीता, अर्थ, काम, वैद्यक व काव्य या सर्व शास्त्रांत पुरुषार्थ ही मूलभूत कल्पना–धर्म आणि अर्थ या कल्पना–अर्थासंबंधीं दोन महत्त्वाचे नियम–कामकल्पना.**

**ग्रंथ हेतु :** कांहीं वर्षांपूर्वी प्रथम जेव्हां प्रस्तुत विषयावर ग्रंथरचना करावी अशा कल्पनेचा मनांत प्रादुर्भाव झाला, त्या वेळीं अशा विषयावर इंग्रजीमध्यें जें विपुल साहित्य–शास्त्रीय, अशास्त्रीय, लौकिक आणि प्रचारकी असें निघत असतें, त्यांतील 'फिजिऑलॉजी ऑफ सेक्स' या डॉ. वॉकरच्या त्रोटक पण बहुगुणी पुस्तकाचा

निष्कर्ष मराठी वाचकांस द्यावा, एवढाच विचार होता. परंतु वाचन आणि विचार यांच्या प्रकर्षाबरोबर हा प्रथम संकल्प भराभर मागें पडत गेला. नाना शंका मनांत गोंधळ घालूं लागल्या. त्यांचें निराकरण करण्यास जास्त अभ्यासाची जरुरी भासूं लागली, आणि त्याबरोबरच विषयाचा विस्तारहि वाढत गेला. ' काम ' या कल्पनेचा एकाकी विचार करणें रास्त होणार नाहीं असें वाटूं लागून मानवी आयुष्याच्या एकंदर नकाशांतील हा एक भाग म्हणूनच याचा विचार केल्यास तो योग्य आचाराच्या मर्यादा अवलोकन करण्यास सोयीचा ठरेल असा निश्चय होत गेला. त्यामुळें सहजच मानवी जीवनाचे धर्म, नीति, समाज, संस्कृति, राज्ययंत्र, कायदा, इत्यादि सर्व अंगांचा जरूर तो अभ्यास करणें क्रमप्राप्त झालें. एवढें करूनहि मनाचें समाधान होईना. कारण, आपण ज्या देशकालपरिस्थितींत राहतो त्यांस धरून या कल्पनेची मांडणी करतां न आली तरी आजच्या देशकालपरिस्थितींत काय करतां येईल व काय करणें आवश्यक आहे याचा विचार करणें दुरापास्त होतें. परंतु स्वजातीच्या देशकालपरिस्थितीचा विचार म्हणजे थोडा पूर्वेतिहास व आपली जुनी घडण आणि त्यांवर झालेले पाश्चिमात्य संस्कार यांचा ताजा इतिहास या गोष्टी पाहिल्याशिवाय सद्यःपरिस्थितींत आपली प्रगति आहे कीं परागति आहे, ' काम ' पुरुषार्थास कांहीं ' सनातन ' नियम आहेत कीं नाहींत हें लक्षांत घेऊन आपण कुठें चाललों आहों याचा निष्कर्ष काढणें कठिण. एवंच, हें मारुतीचें शेपूट लांबतच चाललें. ज्ञानप्रकर्षाबरोबर बुद्धीचा अहंकार लुप्त होणें अपरिहार्यच असतें. पोपच्या कवितेंतील " *Alps over Alps arise.* " या ओळीची आठवण होऊन ' **तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम्** ' या उक्तीप्रमाणें हा ज्ञानसागर ओलांडण्याचें धाडस माझ्यासारख्या बेडकानें करणें हा हास्यास्पद प्रयत्न असून शेवटीं विद्वानांच्या करुणेचा विषय आपण बनणार तर नाहीं ना असाहि संशय मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं. कित्येक वेळां, हा 'रिकाम्या न्हाव्याचा उद्योग' सोडून देऊन इतर सर्वसाधारण गर्दींत घुसून उंच स्वरानें घडीचा घोष घेऊन ' झिंदाबाद ' अशी आरोळी ठोकून मोकळें व्हावें असेंहि वाटलें. परंतु चिकित्सक ज्ञानाच्या सतत उद्योगामुळें बुद्धीचा अहंकार तर कमी होतोच; पण शिवाय, शास्त्रीय प्रगतीची खोली काय आहे हें कळून येऊन अज्ञानाचा प्रांत किती विस्तृत आहे याचीहि कल्पना येते. अल्प ज्ञानानें उत्पन्न होणारी घमेंड ही कोत्या ज्ञानाचा उत्तम पुरावा आहे, हें पटतें. ज्ञानाचा ज्ञात प्रांत माहीत झाल्यानें जीवनांतील बाबींचें योग्य मूल्यमापन करतां येणें शक्य कोटींत येऊन

अज्ञात प्रांताकडे नम्रतेनें पाहण्याची संवय लागते आणि आपल्याजवळील कष्टानें जमविलेलें भांडार दुसऱ्यास देऊन मोकळें झालें म्हणजे या ज्ञानसागरांत आपला थेंब टाकल्याचें अल्प समाधान प्राप्त होईल या कल्पनेनें हा निबंध अधिकार नसतांनाहि नेटानें पुरा करावयाचें ठरविलें.

प्रस्तुत विषयाचा विस्तृत पट मनश्चक्षूंसमोर येऊन या निबंधाची कल्पना मनांत स्थिर झाल्यावर एक निरपेक्ष आनंद झाला. नवकल्पनेची धारणा अंतर्मुख होऊन भोगण्याचें समाधान असून याची तुलना स्त्रीहृदयास होणाऱ्या गर्भधारणेच्या आनंदाशीं करतां यावी असें वाटतें. परंतु गर्भधारणेनंतर संवर्धनास कांहीं कालावधि जाणें अपरिहार्यच नव्हे तर जरुरीचें असतें, तद्वतच नवकल्पनेचें संवर्धन व पोषण, अभ्यास आणि विचार यांच्या अन्नानें झाल्याशिवाय ती कागदावर उतरविणें कधींहि योग्य होणार नाहीं. घाईनें कागदावर ‘ कल्पनातरंग ’ उडवून दिले तर कवि आणि शास्त्रवेत्ता यांत कांहींच फरक शिल्लक राहणार नाहीं. हेंच या दोहोंतील खरें महदंतर आहे. कविकल्पना उंच भरारीनें प्राप्त होते आणि ताबडतोब शब्दांत येते. त्या शब्दांचा कीस काढीत बसावयाचें नसतें. उलट, शास्त्रवेत्त्यास कल्पना उत्पन्न करतांना उंच भरारीच मारावी लागत असली तरी त्यास अभ्यास व विचार यांची जमीन कधींच सोडून चालत नाहीं. कविकल्पना कशीहि असो त्यानें फारतर कोणा वाचकाचें मनरंजन होईल, कोणाचें होणार नाहीं; परंतु, शास्त्रवेत्त्याची कल्पना त्या त्या शास्त्राच्या प्रगतीवर व तदनुरोधानें मनुष्यसमाजाच्या इतिहासावर कांहीं कायमचे ठसे उमटवीत असते आणि त्याचे दूरगामी परिणाम होऊन ते पोषक किंवा घातक ठरतात. याच कारणाकरितां कोणताहि शास्त्रज्ञ ताबडतोब कागदावर कल्पना मांडण्याचें धाडस करीत नाहीं. अर्थात्, त्यामुळें अशी कल्पना संस्कारान्वित होऊन प्रत्यक्षांत येण्यास कालावधि लागणें अपरिहार्यच असतें. एवंच, प्रस्तुत निबंधलेखनांत जो कालावधि गेला तोहि विषयाचा विस्तार लक्षांत घेतां फार आहे असें म्हणवत नाहीं.

प्रस्तुत निबंधांत या विषयाचा सांगोपांग व संपूर्ण ऊहापोह करणें दुरापास्त आहे. तेव्हां ग्रंथविस्तार करतांना काय विशिष्ट हेतु नजरेसमोर ठेवून ग्रंथकार चालतो, हें प्रथम स्पष्ट करणें जरूर असतें.

प्रेम आणि स्त्रीविषयक विचार हल्लीं मोकळ्या मनानें निरनिराळ्या प्रसंगीं

चर्चेस घेतले जातात. मागच्या शतकांतील यासंबंधींच्या मूकपणावर जणूं चालू शतकांत सूड उगवला जात आहे. स्त्रीसभांतून स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीसंबंधीं कायदे, स्त्रीपुरुषांतील समानता, वैवाहिक जीवन वगैरे अनंत नैतिक व सामाजिक प्रश्नांवर मतप्रदर्शन आणि प्रचार नेहमीं चालू असतो. कायदेमंडळांतूनहि कित्येक कायदे भावनांच्या भरांत व स्त्रीदाक्षिण्याच्या मोहांत जणूं हे सर्व अमर व अक्षर सिद्धान्तच आहेत अशा आत्मविश्वासानें आणि थाटांत प्रसृत केलेले दिसतात. वाङ्मयांतहि पाहिलें तर बहुतेक लघुकथा, बृहत्कथा, नाटकें, कादंबऱ्या आणि निबंध याच विषयावर आधारलेले असल्याचें आढळतें. कोणी म्हणतात, 'संततिनियमन करा', कोणी म्हणतात, 'पुरुषांचीं सर्व कामें स्त्रियांनीं उचललीं पाहिजेत', कोणी म्हणतात, 'स्त्रीजीवन पुरुष-निरपेक्ष व्हावें' काहीं प्रतिपादन करतात कीं, 'स्त्रीजीवन पुरुषाच्या बंधनांतच असावें', कांहीं सांगतात, 'स्त्रीशिक्षणाशिवाय तरणोपाय नाहीं' तर दुसरे कांहीं स्त्रीशिक्षणाचे तोटेच दाखवितात. या सर्व मतामतांच्या गलबल्यांत आणि परस्परविरुद्ध प्रचारांत साहित्यिक, राजकारणी, समाजसुधारक इत्यादि स्त्रीपुरुषांची बरीच गर्दी दिसते. पण यांत नेमकी शास्त्रीय अभ्यासकांची मोठी वाण कोणाहि विचारवन्ताच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. उपरिनिर्दिष्ट परस्परविरुद्ध सिद्धान्त प्रथम बरेवाईट ठरविण्यास निकष (*standards*) काय असावेत, अशा प्रकारचे कांहीं प्रश्न अभ्यासण्याची पद्धति कोणती, आजपर्यंत अशा प्रकारचे कांहीं अभ्यास झाले असल्यास त्यांचा निष्कर्ष काय आहे, इत्यादि तदनुषंगानें उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा सखोल विचार पाहण्यास सहसा सांपडत नाहीं. तात्पर्य, या सर्व खळबळाटांत नवीन पिढीस स्वतःचें जीवन सुखमय करण्यास जरूर तें ज्ञान मिळत नाहीं. प्रस्तुत प्रश्नासंबंधीं बुद्धिनिष्ठ विचार करण्यास कांहीं साधन लाभत नाहीं आणि परिस्थितीशीं जुळेल असें प्रवाहपतित जीवन जगण्याशिवाय दुसरें कांहींच शक्यतेच्या कोटींत बसत नाहीं.

बहुसंख्य स्त्रीपुरुषांच्या जीवनांत विवाह ही अपरिहार्य आणि निश्चित सुखदुःखाची बाब असूनहि या सर्व जीवनासंबंधीं कोणतीहि तर्कशुद्ध माहिती नसावी, ती शिक्षणाच्या कोणत्याहि क्षेत्रांत त्यांना पद्धतशीर मिळूं नये, ही एक दुर्घटना असून तिचे दुष्परिणाम थोडे नाहींत. एकदां 'परंपरा' (*tradition*) नांवाची शिक्षणसंस्था रद्द केल्यावर आणि बुद्धिनिष्ठ (*Rational*) आचाराची घोषणा केल्यावर, ज्या आचाराचे परिणाम जन्मभर भोगावयाचे असतात त्या आचाराची

तयारी कशी करावी, त्यांतील गुंतागुंतीचे प्रश्न काय आहेत, त्यासंबंधीं शास्त्रांत काय माहिती आहे, अज्ञानाचा प्रांत कोणता, जुने आचार व प्रामाण्यें काय होतीं, नवीन कोणते आचार प्रचलित आहेत, नवीन आचारांचा कांहीं प्रमाणशुद्ध अभ्यास उपलब्ध आहे काय वगैरे माहिती करून न देतां ललितवाङ्मयांतील, कांहीं इंग्रजी वाङ्मयापासून भाषांतरित केलेल्या प्रेमकथा, आणि सरकारी कायदे व प्रचार अशांसारख्या भांडवलावर प्रत्येक व्यक्तीस आपापल्या कल्पनेप्रमाणें असेल ती बुद्धि चालविण्यास स्वतंत्र सोडणें हें बुद्धिप्रामाण्याचें विडंबन नव्हे काय ! माझी मुलगी बी. टी. झाली आहे, किंवा मुलगा एम्. बी. बी. एस्. झाला आहे, तिला वा त्याला त्याचें सर्व वैवाहिक हित समजतें असे उद्गार पुष्कळ वेळां ऐकूं येतात. पण त्यांना या दोन्ही पदवीशिक्षणांत याचा कोठेंहि थोडासुद्धां विचार किंवा ज्ञान दिलेलें नसतें. असें असूनहि जीवनांतील एका मोठ्या गुंतागुंतीच्या प्रश्नाची कांहींहि माहिती नसतांना ' आहे ' असें गृहीत धरून या तरुण मुलांना स्वतःची स्वतंत्र बुद्धि चालवण्यास वाव देणें, यांत कांहीं वावगें न वाटणें, यांत कोणती बुद्धिगम्य कल्पना आहे हें आमच्या अल्पमतीस कळण्याच्या पलीकडील आहे.

ज्या पाश्चिमात्यांच्या संस्कृतीचें येथें फक्त अंधानुकरण चालू आहे त्या अमेरिकेंत सध्यां ६३२ विद्यापीठांतून विवाह व तत्संबंधीं शिक्षण देण्याची व्यवस्था आहे. कोणाला एखादें असें चांगलें पुस्तक पाहण्याची इच्छा असेल त्यानें " आधुनिकांकरितां विवाह " (*Marriage for moderns*) हा ग्रंथ पाहावा. त्यांत विवाहविषयक आणि तत्सम विषयावर सांगोपांग माहिती दिली आहे. साधारण ५०,००० विद्यार्थी याचा फायदा घेत आहेत. याशिवाय विवाहविषयक सल्ला देण्यासाठीं (' मॅरेज कौन्सेलिंग ') निरनिराळ्या जबाबदार संघटना आहेतच. या संघटनांत काम करण्याकरितां कांहीं शिक्षण ( कॉलेजांतील पदवीचें नव्हे ) घ्यावें लागतें. त्या व्यक्तीला मनुष्यस्वभावाची फार मार्मिक माहिती असावी लागते. तरच आधुनिक विवाहांत उत्पन्न होणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रेमद्वेषमत्सरादि प्रसंगांतून कोणत्या निश्चित मार्गानें जावें हें सांगण्याची पात्रता येते. प्रस्तुत ग्रंथांत विवाह या जीवनाच्या महत्त्वाच्या मुद्यावर ' बुद्धिनिष्ठ विचार ' जागृत व्हावा याकरितां जरूर ती माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्याकडेहि यासंबंधींच्या परंपरागत कल्पना भराभर

नाहींशा होत आहेत. नवीन कल्पना व कायदे मोठी बुद्धि चालवून आणलेले दिसत नाहींत. तेव्हां, परंपरेचीं दारें बंद झालेलीं, आहे ती बुद्धि चालविण्याची जरुरी, अशा परिस्थितींत निदान शिक्षणांत या विषयाचा समावेश झाल्यास माहिती काय द्यावयाची असा प्रश्न निर्माण होणारच. तेव्हां अशा शिक्षणांत ज्या माहितीचा समावेश होणें अवश्य आहे अशी माहिती या ग्रंथांत एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे पुढेंमागें जेव्हां विद्यापीठांना स्त्रीपुरुषजीवनांतील या महत्त्वाच्या विषया-संबंधीं तरुण पिढीस माहिती देण्याची बुद्धि सुचेल त्या वेळीं या ग्रंथाचा उपयोग व्हावा. त्याचप्रमाणें सध्यां नवीन सामाजिक सुधारणेमुळें विवाहविषयक जीवनांत महत्त्वाचे प्रश्न उत्पन्न होत असून शिक्षित समाजांत तर त्यांचा मोठा खल चाललेला असतो. या प्रश्नासंबंधीं तरुण पिढीला योग्य तो सल्ला या ग्रंथाच्या वाचनानें मिळा-ल्यास ग्रंथकारास समाधान लाभेल. सध्यांची सामाजिक बदलाची वाटचाल अशीच पुढें चालू राहिली तर केव्हांतरी येथेंहि ' मॅरेज कौन्सेलिंग ' अस्तित्वांत आल्या-शिवाय राहणार नाहीं. सध्यांहि ' संततिनियमन ' हा विषय ' सरकारी ' होत असल्यानें संततिनियमन म्हणजे संततिनिरोधन यासंबंधीं जरूर ती तांत्रिक वा उपकरणात्मक माहिती लोकांना देण्याचा कार्यक्रम सुरू आहेच. परंतु ' संततिनिरोधन ' एवढाच शिक्षित समाजांतील विवाहविषयक संबंधाचा महत्त्वाचा मुद्दा नाहीं. शिवाय या उप-करणात्मक माहितीचा फैलाव इतरत्र होत असल्यानें आम्हीं तिकडे लक्ष पुरविलें नाहीं. आतां त्यांतील इष्टानिष्टतेसंबंधीं ' लोकसंख्यांचे प्रश्न ' या नांवाखालीं जे विचार प्रसृत होत आहेत, त्यांचाहि आम्हीं येथें फारसा परामर्श घेतलेला नाहीं. कारण, तो एक वेगळा ग्रंथच होईल. पण जरूर तेथें त्याची थोडी छाननी केलेली आढळेल. मुख्यतः ' कामपुरुषार्थ ' ही मनुष्याच्या आत्मिक समाधानाची आणि समाज-हिताची महत्त्वाची बाब असून ती उत्पन्न करण्याचा विवाह हा समाजाचा शिक्का-मोर्तब असलेला एकमेव मार्ग आहे हें लक्षांत घेऊन तो यशस्वी होण्यावर हें ' गृहसौख्य ' नांवाचें विवाहजन्य समाधान अवलंबून असतें हें लक्षांत आणून, तो यशस्वी करण्यास ज्या ज्ञानाची आवश्यकता आहे अशा गोष्टी मुख्यतः या ग्रंथांत समाविष्ट करण्याचा लेखकाचा मानस आहे.

विवाह यशस्वी व्हावा ही कल्पना नवी नाहीं. ती आपल्या देशांत फार पुरातन काळापासून अस्तित्वांत आहे. हा विचार निरनिराळ्या अंगांनीं आमच्या संस्कृतींत झालेला असल्याचें, किंबहुना विवाह यशस्वी व्हावा म्हणून आमच्या

पूर्वजांनीं विवाहांतर्गत कित्येक सूक्ष्म गोष्टींचें मार्मिक विवेचन निरनिराळ्या ठिकाणीं केलेलें आढळेल. ‘ काम ’ हा पुरुषार्थ सिद्ध व्हावा म्हणून जे नियम त्यांनीं बांधले आणि ज्या कल्पना प्रसृत केल्या त्या कामशास्त्रासारख्या एतद्विषयक ग्रंथांपासून कवि, पंडित व स्मृतिकारांपर्यंत आणि कामशास्त्रापासून तों कविकुलगुरु कालिदासांच्या उत्कृष्ट प्रेमकथांपर्यंत सर्वत्र सारख्या ओतप्रोत भरून राहिलेल्या दिसतात. जणू कांहीं शास्त्रकार आणि साहित्यिक हे सर्व एका कटांत सामील झाले असून तेच नियम आणि विचार, तींच प्रामाण्यें (*Standards*) आणि मूल्यें (*Values*) सर्वत्र प्रसंगानुरूप सांगत आहेत. यामुळें देशांतील विचारवंत लोकांनीं एकविचाराची सांस्कृतिक पातळी निर्माण केल्यासारखें दिसत असून परंपरेनें हीं सांस्कृतिक मूल्यें (*Cultural values*) एका पिढीपासून दुसऱ्या पिढींत आपोआप संक्रांत होत आलीं आहेत. या परंपरेंत कांहीं रूढी मध्यंतरीं घुसलेल्या दिसतील, त्यांत कांहीं अतिरेक झालेलेहि नजरेस पडतील आणि त्यामुळें परंपरेचा हा प्रवाह काळाच्या ओघांत गढूळ झालेलाहि दिसून येईल; परंतु त्यामुळें मूळ सांस्कृतिक मूल्यास बाध येऊं शकत नाहीं. मात्र मूळ ओघ कोणता आणि तो गढूळ करणारी रूढी कोणती याचा विवेक करतां येणें जरूर आहे. तात्पर्य एवढेंच कीं, विवाह यशस्वी करण्याकरितां आमच्या विचारवंतांनीं कांहीं निश्चित आंखणी करून दिलेली आहे ती ‘बुद्धिगम्य’ आहे कीं नाहीं, आधुनिक कालांत तिची इष्टता, शक्यता इत्यादि प्रश्न वेगळे असून त्यांचा विचारहि वेगळा करावा लागेल आणि तो योग्य स्थळीं करण्याचा प्रयत्नहि या ग्रंथांत आढळेल. परंतु आमची पूर्वपरंपरा समजून घेतांना तिची नुसती ऐतिहासिक उजळणी करण्याचा नेहमींचा शिरस्ता ठेवून शिवाय तींत मूळ सांस्कृतिक प्रवाह कोणता, रूढीचें आक्रमण कोणतें, त्या मूळ प्रवाहाचा सर्व संस्कृत वाङ्मयांतील सारखेपणा, सध्यांच्या कालांत फरक काय झाला आणि त्याची ‘ बुद्धिगम्य इष्टानिष्टता ’ इतका विषय शक्य तों सांगोपांग या ग्रंथांत यावा असा हेतु आहे.

मागच्या हजारों वर्षांत या देशांत जें घडलें नाहीं तें मागच्या १००-१५० वर्षांच्या ब्रिटिश अमदानींत घडलें आहे. मूळ परंपरेला खरा धक्का फक्त याच कालांत आणि तोहि पाश्चिमात्य संस्कृतीनें दिलेला दिसतो. जें इतर कोणत्याहि संस्कृतीला, मुसलमानांना तलवारीच्या जोरावर पुष्कळ शतकें येथें राज्य करूनसुद्धां, जुलूम करून आणि इतर अनंत साधनांनींहि साधतां आलें नाहीं तें ब्रिटिश

लोकांनीं एका शतकांत या देशांत प्रत्यक्ष करून दाखविलें. याचें प्रात्यक्षिक स्वातंत्र्याच्या कालांतहि भारतीय संस्कृति नांवाची गोष्ट एतद्देशीय भाषांच्या फैलावांत, सरकारी अशोकचक्रांकित राजचिह्नांत, त्यावर सहज बसवून दिलेल्या एका ' सत्यमेव जयते ' या वचनांत किंवा पूर्वसंस्कृतीचें कांहीं प्रदर्शन व्हावें म्हणून केलेल्या एखाद्या यज्ञासारख्या उत्सवांत दिसून येते तेवढीच. यापेक्षां मानवी जीवनावरील भारतीय दृष्टिकोन काय होता, तो दृष्टिकोन मानवी जीवनास पोषक आहे कीं घातुक आहे, पाश्चिमात्य सामाजिक दृष्टिकोन आपल्या दृष्टिकोनाशीं तुलना करतांना काय आढळतो, जीवनाच्या निरनिराळ्या समस्या सोडविण्याची त्यांची कांहीं निश्चित आंखणी आहे काय, असल्यास त्या मूल्यांची आपल्या कल्पनांशीं तुलना केल्यास काय निष्पन्न होतें वगैरे प्रश्नांचा सखोल विचार बराच दुर्लभ दिसतो. अशा प्रकारचा थोडासा विचार आम्हीं या ग्रंथांत प्रसंगानुरूप आणण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् ' आर्यत्वा ' चे निकष काय याचा विचार इतका विस्तृत होईल कीं, तो एका वेगळ्या ग्रंथांतच करावा लागेल. पण त्यासंबंधीं येथें जरूर तें थोडें दिग्दर्शन केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. कारण, तो पुढील मूल्यविचारांचा अत्यंत महत्त्वाचा पाया आहे. तोच भारतीय संस्कृतीचा मानवी जीवनावरील अढळ दृष्टिकोन आहे. किंबहुना मानवी समाजांत जीवन सुखी करण्यास आणि जीवनांतील पुष्कळ समस्या सोडविण्याचा तो आमच्या पूर्वजांनीं फार विचारपूर्वक उत्पन्न केलेला त्यांतल्यात्यांत निर्दोष मार्ग आहे. म्हणून त्याचें थोडें यथाशक्ति दिग्दर्शन प्रथम करणें जरूर आहे. आम्ही येथें 'हिंदु' हा शब्दप्रयोग न करतां आर्य वा भारतीय असा शब्दप्रयोग केला आहे. 'हिंदु ' या नांवाखालीं खपणाऱ्या कल्पनांनीं प्रस्तुत विषयाचा निर्वाह होत नसल्यानें आणि ' आर्य ' वा ' भारतीय ' हे शब्द जास्त योग्य व व्यापक असल्यानें ते येथें आम्हांस ग्राह्य वाटतात.

**भारतियांचा मानवी जीवनावरील त्रिविध दृष्टिकोन :**

भारतीय समाज व आर्यत्व यांसंबंधीं अनक विचारवंतांनीं आपापले विचार प्रगट केलेले दिसतात. जो समाज आज अनेक शतकें पृथ्वीच्या पाठीवर परकीय आक्रमणांपासून बचाव करून ' शीरसलामत ' राहिला त्यांत कांहीं विशेष नाहीं असें म्हणणारा सुज्ञ विरळाच. तेव्हां भारतीय समाजांत कांहींतरी विशेष आहे हें पुष्कळ मंडळी निःसंकोच कबूल

करतात. या मंडळींत फक्त एतद्देशीय विद्वानच आहेत असें नव्हे तर कित्येक युरोपीय अभ्यासूहि आहेत.

" When the Greeks, towards the end of the fourth century B. C. invaded the North-west, the Indians had already fully worked out a national culture of their own, unaffected by foreign influences, and, in spite of successive waves of invasion and conquest by Persians, Greeks, Scythians, Muhamadans, the national development of the life and literature of the Indo-Aryan race remained practically unchecked and unmodified from without down to the era of British occupation "

( N. R. Macdonell p. 7 )

यांत कांहीं मुद्दे ठळक आणि स्पष्ट आहेत. भारतिय संस्कृतिला कांहीं स्वत्व आहे. कोणत्याहि परकीय संस्कृतींतून हें उसने घेतलेलें नसून तें याच भूमीवर आर्य लोकांनीं स्वतःच्या विचारानें उत्पन्न केलेलें ' स्वत्व ' आहे. या विशेष प्रकृतीमुळेंच या संस्कृतीला ग्रीक, पर्शियन, सीथियन इत्यादि पुरातन संस्कृतींपासून तों थेट मुसलमानांपर्यन्त सर्व परकीय आघातांस टक्कर देणें शक्य झालें. एवढेंच नव्हे तर त्या सर्व आघातांतून ही संस्कृति बचावली गेली. एतद्देशीय संस्कृतींत जीवन आणि विद्या ब्रिटिश अमदानीपर्यंत येथें अशा स्वतंत्रपणें आणि जागांतील इतर संस्कृतींपासून अत्यंत भिन्नत्वानें उर्जितावस्थेस पोहोंचल्या आहेत. किंबहुना ' चीन ' हा एक देश सोडल्यास भाषा आणि विद्या, समाज आणि धर्म इत्यादिबाबत एवढी जुनी हजारो वर्षांची अभिन्न परंपरा जगांत कोठेंहि नाहीं. ही गोष्ट येथील ब्रिटिश राज्यकर्त्यांनाहि कशी पटली होती याचें एक उदाहरण म्हणून खालीं कॉटन ( H. J. S. Coton ) नामक एका राज्यधुरंधर अभ्यासकाचें १८८५ सालीं झालेलें मत उद्धृत करीत आहोंत.

" Hindooism is still vigorous and the strength of its metaphysical subtlety and wide range of influence are yet instinctive with life. In the future its distinctive conceptions will be preserved and incorporated into a higher faith. " ( Coton p. 138 ) यांत कॉटन स्पष्टपणें नमूद करतात कीं, ' हिंदुत्वा 'चा जोर अजून मुळींच कमी झालेला नाहीं आणि ' हिंदुत्वांत ' कांहीं ' विशेष कल्पना '

( Distinctive conceptions ) असून जागतिक धर्म उत्पन्न करण्यास त्यांचा चांगला उपयोग होईल.

परंतु हें हिंदुत्व म्हणजे निश्चित काय आहे, त्याचें स्वत्व कशांत आहे, हिंदुत्वांत विशेष कल्पना कोणत्या कीं ज्यांचा जगासहि विचार करावा लागेल, हिंदु संस्कृतीची ही विशेष प्रकृति आहे काय कीं जीमुळें परकीय विकृतीस मुसलमानांपर्यंत कांहीं करतां आलें नाहीं. या हिंदुत्वविशेषांचा उठाव कोठें आहे, त्यांची वाढ कशी झाली, त्यांचा समाजजीवनांत काय उपयोग होत आहे, त्यांचें सध्यांच्या परिस्थितींत इष्टानिष्टत्व इत्यादि शंकांचें निरसन करणारा आणि या सर्व मुद्यांचें सांगोपांग आणि साधार विवेचन मराठी वा इंग्लिश वाङ्मयांत फारसें आढळत नाहीं. यांतील कांहीं भाग त्रोटक वा विस्तारानें, कांहीं विशिष्ट मतप्रतिपादन करतांना किंवा ग्रंथकाराच्या मूळ विषयाला धरून ठिकठिकाणीं येतो. परंतु उपरिनिर्दिष्ट समग्र मुद्यांचा सांगोपांग विचार एखाद्या स्वतंत्र ग्रंथांत केलेला सांपडणें दुरापास्त आहे.

येथें या विषयासंबंधीं अभ्यासानें उत्पन्न झालेले कांहीं विचार आम्ही नमूद करीत आहोंत. यामुळें हिंदुत्वाच्या विचारास चालना मिळावी हा एक उद्देश आहे. हे मूलभूत विचारच आज आपण ज्यास हिंदुसमाज म्हणून संबोधितों त्या समाजाच्या सर्व सामाजिक शास्त्रांचें आणि जीवनाच्या सर्व शाखोपशाखांत मूलभूत असे अस्तित्वांत असलेले आढळतील. ‘ काम ’ हा जीवनाचा एक प्रधान भाग असल्यानें हे मूलभूत विचार थोड्या साकल्यानें येथें मांडल्यास ‘ काम ’ या ‘ पुरुषार्थाचें ’ भारतीय जीवनाच्या समग्र पार्श्वभूमीवर अवलोकन केल्यासारखें होईल.

हिंदुधर्मासंबंधीं ऐतिहासिक व लौकिक विचार पुष्कळ ठिकाणीं सांपडतील. तदनुरोधानें हिंदु हा शब्द कसा झाला, हिंदु कोण !, हिंदुत्व कशांत आहे वा हिंदुधर्माचें वैशिष्ट्य काय अशा शंकांचीं उत्तरें निरनिराळ्या लेखकांनीं दिलेलीं आहेत. वेदप्रामाण्य, साधनांचें अनेकत्व, शास्त्रोक्त आचार वगैरे असलेला अशीं हिंदुत्वाचीं लक्षणें समजावीं असें लो. टिळकांनीं सांगितलें आहे. ‘ वेद किंवा वेदमूलक ग्रंथ ’ यांचें प्रामाण्य हें एकच हिंदुत्वाचें पुरेसें लक्षण आहे अशी विद्यानिधि चित्रावशास्त्री यांनीं व्याख्या केली आहे. “ इतर धर्मांत न दिसणारी सहिष्णुता ही हिंदुधर्माचें मुख्य वैशिष्ट्य आहे ” असें म. म. काणे यांनीं प्रतिपादन केलें आहे. शिवाय वेद, उपनिषदें, इत्यादि ग्रंथप्रामाण्य मानणें, संस्कृत भाषा ही धर्मभाषा वगैरेहि

अनुक्रम ... वि. ... क्रमांक ... नों.

या धर्माचीं वैशिष्ट्यें म्हणून त्यांनीं सांगितलीं आहेतच. हिंदुधर्मशास्त्राचा एकंदर ऐतिहासिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन अशा सर्व प्रकारांचा आढावा घेण्याचें विस्तृत कार्य म. म. काणे यांचें असल्यामुळें त्यांनीं फक्त हिंदुत्वाचीं विशेष लक्षणें या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहिलेलें दिसत नाहीं. श्री. गो. म. जोशी हे सनातन हिंदुधर्माच्या निरनिराळ्या अंगांचा आधुनिक पाश्चिमात्यांच्या ग्रंथाधारें खल करीत असल्यानें त्यांनींहि हिंदुत्वाच्या विशेष गमकांकडे लक्ष दिलेलें दिसत नाहीं. फक्त जातां जातां होईल तेवढाच निर्देश केला आहे. उदाहरणार्थ " या संस्कारांनीं हिंदुत्वाचें मुख्य गमक जी जातिसंस्था ती सुस्थितींत ठेवलेली आहे. " ( गो. म. जोशी पा. २८ ) यावरून ' जातिसंस्था ' हें एक हिंदुत्वाचें गमक म्हणून श्री. जोशी मानतात ऐवढें खरें. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं ' हिंदुत्व ' या ग्रंथांत हिंदुत्वाचीं लक्षणें काय असा प्रश्न निर्माण करून त्याचा खल करण्याचा यत्न केला आहे. परंतु हिंदु लोकांचे थोडे ऐतिहासिक धागेदोरे देऊन शेवटीं ' हिंदुत्वा ' वर त्यांनीं पाश्चिमात्य देशाभिमानाची छाप उठवलेली दिसते. पाश्चिमात्य देशांत शिक्षणानें झालेला देशाभिमानाचा संस्कार शेवटीं स्वतः हिंदुस्थानांतील हिंदु या नात्यानें हिंदुत्वावर आणून बसविलेला दिसतो. तेव्हां यामुळें हिंदुत्वासंबंधीं शास्त्रीय व सखोल विवेचन येथें झालेलें दिसत नाहीं. तात्पर्य, मराठी वाङ्मयामध्यें ' हिंदुधर्म ' आणि ' हिंदुत्व ' यांसंबंधीं बरेंच वाङ्मय असूनहि या हिंदुत्वाचीं विशेष गमकें काय कीं ज्यायोगें हिंदुसमाजाच्या आचारविचारांची गुरुकिल्ली त्यांत सांपडेल. अशा गोष्टींचा प्रामुख्यानें विचार फारसा कोठें आढळंत नाहीं. येथें एका ग्रंथाचा विशेष उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे प्रो. राधाकृष्णन् यांचा " हिंदू धर्माचीं मूलतत्वें " (Hindu view of life) त्यांच्या ऑक्सफर्ड येथील व्याख्यानांचें हें संकलन असून त्याचें मराठी भाषांतर श्री. बाळूभाई मेहता या एकनिष्ठ गांधीभक्तानें मोठें चांगलें केलेलें आहे. अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें सोडल्यास या सर्व देशी, परदेशी लेखकांचीं मतें आणि विचार लक्षांत घेऊनहि हिंदुत्वाची अखंड पार्श्वभूमि लक्षांत येत नाहीं. म्हणून ज्या वाङ्मयांतून ह्या मूळ हिंदुत्वाचा उगम दिसेल तेथें जाणें प्राप्त आहे. तें मूळ म्हणजे संस्कृत वाङ्मय. संस्कृत वाङ्मयाच्या अथांग सागराचें संशोधन या दृष्टीनें झाल्याशिवाय या हिंदुत्वाच्या कल्पनेला बरोबर उजळा मिळणें कठिण आहे. हें कार्य मोठें व विस्तृत आहे हें खरें. तरी तें एकदां केल्याशिवाय हिंदुत्वाच्या कल्पनेची खरी मूर्ति घडविणें कठिण आहे. संस्कृत वाङ्मय हेंच हिंदुत्वाची कल्पना

शोधण्याचें एकमेव साधन आहे हें मत विद्वन्मान्य आहे. प्रो. विलियम्स् ( M. Williams ) यांनीं इंडियन विज्डम् ( Indian Wisdom ) या ग्रंथांत स्पष्टपणें नमूद केलें आहे कीं, " Sanskrit literature is the only source to know Hinduism. " ' हिंदुत्वा ' च्या अभ्यासाकरितां संस्कृत वाङ्मय हें एकच खरें साधन. या साधनाचा भरपूर उपयोग पाश्चिमात्य संशोधकांनीं करून घेतला आहे आणि आजहि घेत आहेत.

साधारणतः संहिताब्राह्मणादिकरून वेदवाङ्मय, उपनिषदें, सूत्रवाङ्मय, स्मृति, धर्म, अर्थ, काम, कला, वैद्यक, ज्योतिष, व्याकरण, वेदान्त इत्यादि शास्त्रवाङ्मय, पुराणादि ग्रंथ आणि शेवटीं पण लोकशिक्षणाच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचें म्हणजे काव्यवाङ्मय इतका हा कोट्यवधि ग्रंथांचा पसारा एका आयुष्यांत अवलोकन करणेंहि अशक्य आहे. यांत बरेच ग्रंथ प्रकाशांत आहेत, तरी पुष्कळ वाङ्मय अप्रकाशितहि आहे. किंबहुना हजारों वर्षांच्या कालावधींत वृद्धिंगत झालेलें हें वाङ्मय, त्यांतील पुष्कळ लुप्त होऊनसुद्धां, आज विपुल उपलब्ध आहे हें आमचें केवढें भाग्य ! या समग्र उपलब्ध वाङ्मयाची उलथापालथ करणें आमच्या शक्तीबाहेरचें आहे. परंतु कांहीं निवडक वाचनानें, स्वतःच्या विचारानें आणि जुन्या परंपरेच्या चिकित्सक अभ्यासानें व अवलोकनानें जे विचार उत्पन्न होऊन दृढ होत गेले ते येथें नमूद करीत आहों.

' हिंदुत्व ' किंवा ' हिंदुधर्म ' यांत ईश्वर, नैतिक आचार वा इतर कांहीं विधिनिषेध या सर्वसामान्य गोष्टींसंबंधीं विचार असणें हें सरळच आहे. असत्य भाषण कर, असें कोणताच धर्माचार सांगणार नाहीं किंवा परमेश्वरावर श्रद्धा ठेवूं नकोस असेंसुद्धां कोणताहि धर्मग्रंथ प्रतिपादन करीत नाहीं. पण या सर्वसामान्य विचाराहून कांहीं विशेष कल्पना आमच्या पूर्वजांनीं उत्पन्न केल्या. त्यांत व्यक्ति व समष्टि यांचा ऐहिक अभ्युदय आणि पारमार्थिक वा आत्मिक समाधान जास्तींतजास्त कसें उत्पन्न करतां येईल याविषयीं मुख्यतः सर्व विचार आहेत, असें दिसतें. हें खरें असेल, तर त्यांना व्यक्तीसंबंधीं, म्हणजेच व्यक्तीच्या शरीरमनांच्या रचनासंवेदनांचा परामर्ष घेणें अपरिहार्य होतें. त्यांना व्यष्टिसमष्टींचे संबंध, त्यांचीं परस्परावलंबित सुखदुःखें यांचा मेळ घालणें क्रमप्राप्त होतें. त्यांना व्यक्तिगत आशाआकांक्षा, भावनाविवंचना यांचा विचार करणें जरूर होतें. स्पर्धा, द्वेष, मत्सर

इत्यादि विकारांचा आढावा घेणें त्यांना आवश्यक होतें. समाजाची घडण आणि स्थायीभाव उत्पन्न करण्याकरितां कांहीं रचना तत्कालीन सामाजिक प्रश्न विचारांत घेऊन करावयाची होती. व्यष्टि-समष्टि-संबंध, स्त्रीपुरुषसंबंध, नोकरमालकसंबंध, पतिपत्नीसंबंध, पितापुत्रसंबंध, गुरुशिष्यसंबंध वगैरे झाडून निसर्गतः वा समाज-रचनेला धरून निर्माण होणाऱ्या संबंधांचा त्यांना विचार करावयाचा होता. हें सर्व करतांना कांहीं बुद्धिगम्य विचार, कांहीं वस्तुनिष्ठ ( objective ) तर्क, कांहीं पद्धतशीर माहिती इत्यादि जमवाजमव त्यांना करावी लागली नसेल असें कसें म्हणतां येईल ? हा सर्व खटाटोप केला नसेल तर जी कांहीं योजना आणि रचना कांटेकोरपद्धतीनें कायद्यांच्या स्वरूपांत, परंपरेच्या स्वरूपांत आजहि आढळते ती केवळ वेळ घालविण्याकरितां एखाद्या प्रेयसीकडे पाहतां पाहतां सहजस्फूर्त काव्यकल्पना म्हणून निर्माण झाली काय ? असें असेल तर ही ‘ कविकल्पना ’ लोकांनीं हजारों वर्षें आचारांत कशी आणली ? कीं त्या काळीं क्रांतिकारकच नव्हते ? चार्वाकाची क्रांत्यात्म मतप्रणाली प्रसिद्धच आहे. अर्थात् जुन्या परंपरेची, कायद्यांची व आचारांची कांटेकोर पद्धति पाहिली म्हणजे आमच्या पूर्वजांनीं ही जी रचना आणि योजना उत्पन्न केली ती अभ्यासपूर्वक, तर्काधिष्ठित आणि विचारानें सिद्ध केल्यासारखी दिसते. येथें एक गोष्ट नमूद केली पाहिजे कीं, जगांत आजसुद्धां असा एकहि आचार नाहीं सामाजिक शास्त्रांत तर नाहींच नाहीं, कीं जो संपूर्ण निर्दोष आहे. हें सत्य सनातन आहे. तें भगवद्गीताकारांनीं अर्ध्या श्लोकांतच स्पष्टपणें मांडलें आहे.

**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः** ॥ भ. गी. १८।४८

तात्पर्य, कोणताहि आरंभ सर्वस्वीं निर्दोष असूं शकत नाहीं हें लक्षांत घेतल्यास पूर्वाचार्यांनीं जी मानवी आयुष्याच्या वेगवेगळ्या आणि वैचित्र्यपूर्ण समस्यांची छाननी करून कांहीं सिद्धांत बांधले व ते लोकाचारास पात्र केले, त्यांनीं ते कविकल्पनेनें केले नसून अभ्यासपूर्ण विचारांनीं केले असेंच मानणें क्रमप्राप्त आहे. त्यांत प्राप्त परिस्थितींत कांहीं दोष दिसत असल्यास ते पूर्वजांचें कर्तृत्व नव्हे. हा सर्व जुन्या शास्त्रकारांचा बुद्धिगम्य विचार तीन प्रकारच्या कल्पनांत मांडतां येईल असें आम्हांस वाटतें. या तीन कल्पना आर्यधर्माच्या वा हिंदूधर्माच्या विशेष कल्पना ( Distinctive features ) असून भारतीय समाजाचें विषेशत्व सिद्ध करण्यास ह्या कल्पनांचा जगांतील इतर कोणत्याहि समाजांतील अभाव वा अनास्तित्व एवढी

एकच गोष्ट पुरेशी आहे. हिंदुस्थानांतच या गोष्टी दिसतात, बाहेर नाहींत, म्हणूनच हीं भारतियांचीं वैशिष्ट्यें. अर्थात् यांना हिंदुत्वाचीं गमकेंहि म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. यामुळें हीं तीन अंगें कोणतीं याचा त्रोटक विचार पुढें देत आहोंत.

**वर्णसंस्था :** प्रथमतः वर्णसंस्था हें भारतीय समाजाचें वा हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा विशेष सर्वांना मान्य आहे. हल्लीं या कल्पनेला व्यवहारांत जातिसंस्थेचें स्वरूप आहे. वर्ण व जाति हे शब्द एकाच अर्थाचे नाहींत, यासंबंधीं सर्वांचें एकमतच असलेलें आढळून येईल. वर्ण हा मोठा वर्ग ( bigger class ) असून जाति हा लहान वर्ग ( smaller class ) आहे. येथपर्यंतहि विद्वानांचें एकमत आहे. म. म. काणे म्हणतात, " अशी जाति-संस्था जगांत कोठेंहि नाहीं. " ( काणे पृ. ४९ ) मूळची चातुर्वर्ण्यसंस्था आज विकृत स्वरूपांत जातिसंस्था म्हणून दिसते, असें त्यांचें मत आहे. ही योजना निर्माण करतांना आर्यांनीं तत्कालीन निकृष्ट लोकांना स्वतःमध्यें सामावून घेण्याकरितां अतिशय सहनशीलता दाखविली आणि ही ' मोठी महत्त्वाची योजना ' प्राचीन आर्यांनीं बसविली अशी त्यांनीं कबुली दिलेली आहे. वर्ण हा शब्द ऋग्वेदांत येत असून सायणाचार्यांनीं त्याचा केलेला काम आणि वय हा अर्थ ओढाताणीचा असून आर्य आणि दास या दोन वर्गांना उद्देशून वर्ण शब्दाची योजना केलेली आहे असें श्री. काणे यांचें म्हणणें आहे. वर्ण म्हणजे एका विवक्षित रंगाच्या कातडीचा लोकसमूह असाहि अर्थ श्री. काणे यांनीं दिलेला आहे. जातींची उत्पत्ति, व्यवसाय व देश इत्यादींवरून झाली असें त्यांचें म्हणणें आहे. जाति हा शब्द भगवद्गीता व मनुस्मृति या दोन्ही ग्रंथांत स्पष्टपणानें आलेला दिसतो. श्री. जोशी यांच्या मताप्रमाणें वर्ण हा शब्द संस्कारदर्शक ( cultural ) असून एका पद्धतीनें उत्पन्न होणाऱ्या यूथांना तो लावीत व जाति हा शब्द " सुप्रजा उत्पन्न करण्याचा आद्य घटक " ( primary breeding unit ) अशा अर्थी वापरीत. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मतें " चातुर्वर्ण्य " हा हिंदूसमाजाचा अविभाज्य घटक असून त्रैवर्णिकांची ही संस्था प्रथम उत्तर कुरु व उत्तर मद्र या हिमालयाच्या पलीकडील देशांत सुरू झाली. या संस्थेचें " भव्य व सुंदर " ( इ. राजवाडे पृ. १४१–१४३ ) वर्णन पुरुषसूक्तांत आलें असून ' समाजशास्त्रदृष्ट्या या सूक्ताचें ' महत्त्व अपरंपार आहे. या चातुर्वर्ण्यसंस्थेचा शूद्रांच्या सामाजिक स्थितीवर चांगला परिणाम झाला.

हिंदूंच्या जातिसंस्थेवर पुष्कळ पाश्चिमात्य पंडितांनींहि अभ्यास केलेले आढळतात. चातुर्वर्ण्यसंस्था ही आर्यांची एक महत्त्वपूर्ण योजना होती. वर्ण व जाति हे शब्द भिन्न यूथांना लागणारे आहेत, आणि संघोपसंघांची कल्पना दास आणि शूद्र समाजाच्या दृष्टीनें त्या वेळीं फार हितावह झाली.

"And yet in it ( caste-system ) there are great elements of worth for the life of the community. The unrestricted competition of individual with individual in a spirit of pure selfishness is more European than Indian. ( Howell )

जातिसंस्थेसंबंधीं डॉ. राधाकृष्णन् लिहितात कीं, "सामाजिक जीवनाची मध्यवर्ती कल्पना प्रेमशून्य व निर्दय स्पर्धा ही नसून सलोखा आणि साहचर्य यांवर जातिसंस्थेचा कटाक्ष आहे. समाज म्हणजे व्यक्ती–व्यक्तींतील स्पर्धाक्षेत्र नव्हे."

( राधाकृष्णन् पा. १२१ )

हॅवेल्स साहेबांनीं याच पुस्तकांत चातुर्वर्ण्यसंस्था ( Fourfold order ) हें हिंदुत्वाचें वैशिष्ट्य असल्याचेंहि कबूल केलें आहे, शिवाय व्यक्ती--व्यक्तींतील अनिर्बंध स्पर्धा युरोपांत जास्त दिसून येते, असें ते म्हणतात.

तिसरा अभिप्राय कॉटनसाहेबांचा. हे गृहस्थ हिंदुस्थानांत पुष्कळ वर्षें जबाबदारीच्या जागेवर होते. शिवाय यांचें 'न्यू इंडिया' हें पुस्तक अभ्यासू आणि स्वतंत्र विचाराचें आहे.

"The existing social order demands, therefore, our first attention and to this end I can find nothing more essential than a careful study and correct appreciation of the Hindoo Caste System. That system has its defects undoubtedly, but they are defects more than counterbalanced by the services it renders. The problem of the future is not to destroy caste, but to modify it, to preserve its distinctive conceptions and to gradually place them upon a sociel instead of super-natural basis."

(Coton p. 138.)

जातिसंस्थेचा जितका खोल व निर्विकार बुद्धीनें अभ्यास व्हावयास पाहिजे

तितका आजहि दिसत नाहीं. विशेषतः या वर्णव्यवस्थेचे सामाजिक फायदे-तोटे या दृष्टीनें अभ्यासाची जास्त जरुरी आहे. परंतु एका परकीय चिकित्सक राज्यकर्त्याचें म्हणणें असें आहे कीं, संस्थेनें तोट्यांपेक्षां फायदे जास्त झाले असून भविष्यकालांत जात नष्ट करणें हा प्रश्न नसून जातिसंस्थेंतील दोष दूर करून सध्यांच्या परिस्थितींत ती कशी जास्त कार्यक्षम करतां येईल तें पाहणें आहे.

वर्तमानकालांत जाति-उपजातींची संख्या हजारोंवारी झाली आहे, असें दिसतें. ब्राह्मण आचारहीन असून शूद्रवृत्तीनें उपजीविका करणारा झाला आहे. क्षत्रिय म्हणून वेगळा वर्ण अस्तित्वांतच नाहीं. शूद्र जातींना अस्पृश्य लेखून वेगळें ठेवण्याची शक्यता नाहींशी होत आहे इत्यादि वर्तमानकालीन जातिसंस्थेचें स्वरूप काय आहे, तिचें कार्य, फायदे, तोटे, तिच्यांत फेरफार करणें असल्यास काय प्रकारानें, काय तत्त्वावर, तोटे कमी करण्याकरितां आणि तिचें सामाजिक उपकारक स्वरूप नाहींसे न करतां काय करतां येईल वगैरे मुद्यांचा विचार येथें कर्तव्य नाहीं. येथें एवढेंच आणावयाचें आहे कीं, चातुर्वर्ण्यात्मक ध्येय पण जातिसंस्थेच्या स्वरूपांत आज दिसत असलेली व्यवस्था ही भारतियांची एक विशेष घटना आहे. ती पूर्वाचार्यांनीं सामाजिक समस्या सोडविण्याकरितां बुद्धिपुरस्सर निर्माण केली आणि ती समाजास पुष्कळ उपकारकहि झाली आहे. या व्यवस्थेसंबंधीं कोणी कसलीच कुरकुर मोठ्या प्रमाणावर ब्रिटिश अंमलापर्यंत हिंदुस्थानांत केलेली दिसत नाहीं. ब्रिटिश अमदानींत मात्र जातिसंस्थेवर पहिले हल्ले ख्रिश्चन मिशनरी लोक आणि राज्यकर्ते या दोघांनींहि चालविले.

" The Christain Missionary condemns caste because he finds it *hard to destroy a priesthood* which receives support from the people. The British administrator condemns the institution because he cannot on account of it *override the internal discipline of a subject community.*" (Coton p. 160)

ब्राह्मणवर्गाची येथील समाजावरील आत्यंतिक पकड ख्रिश्चन मिशनरी लोकांच्या धर्मप्रचाराच्या वाटेंत मोठी अडचण उत्पन्न करीत होती, त्यामुळें त्यांनीं जातिसंस्थेवर हल्ला चढवला. ब्रिटिश राज्यकर्त्यांसहि येथील समाजाच्या अंतर्गत व्यवस्थेमुळें त्यांचें स्थान आणि वरचश्मा यांत ब्राह्मणसमाजाचा कांटा सारखा बोचत असल्यानें त्यांनींहि नेमकें याच व्यवस्थेवर बोट ठेवून तिचे सर्व दोष तेवढे

प्रकट करण्याकरितां यथेच्छ खटपटी केल्या. तात्पर्य, आजच्या जातिसंस्थेचाहि योग्य तो अभ्यास या दोषैक दृष्टीमुळें बुद्धिगम्य दृष्टीनें झाला नाहीं. तो होणें जरूर असून हिंदुसमाजाचें हें एक वैशिष्टय आहे कीं, ज्यामुळें हिंदुसमाज हजारों वर्षें स्थिर राहिला, त्यांतील दोष कमी करून सद्यःपरिस्थितींत गुणाधिक्य कसें होईल याचा विचार करणें खरें अगत्याचें आहे.

**अद्वैत सिद्धान्त :** भारतियांचा दुसरा विशेष म्हणजे अध्यात्मविद्या आणि या विद्येतून निर्माण झालेले कांहीं आध्यात्मिक शोध. यांत महत्त्वाचा शोध म्हणजे अद्वैत सिद्धान्त. अद्वैत वेदान्त किंवा अद्वैत सिद्धान्त ही गोष्ट एकदम एकाएकीं अस्तित्वांत आलेली दिसत नाहीं. पुष्कळ विद्वान् तत्त्वज्ञांनीं बुद्धीची मोठी कसरत करून मनाच्या प्रयोगशाळेंत सिद्ध केलेली ही गोष्ट आहे. अद्वैत ही त्यामुळें नुसती बोलाचीच कढी, राहिलेली नसून ही स्वतः अनुभवण्याची चीज आहे. उपनिषदादि वाङ्मयांतूनहि या सिद्धान्ताचीं बीजें असलीं तरी ह्याचा खरा आणि तेजस्वी आविष्कार श्रीमत् शंकराचार्यांनीं केला असें म्हणणें अवास्तव नाहीं. आचार्यांच्या प्रस्थानत्रयीनंतर बाकी सर्व अध्यात्मविषयक वाङ्मय मागें पडलेलें दिसतें. भगवद्गीता ही प्रत्यक्ष ‘ अद्वैतामृतवर्षिणी ’ असल्यानें तीवरील आचार्यांचें भाष्य सर्वथैव तर्कशुद्ध आहे. हा सिद्धान्त पुढें इतका लोकमान्य झाला कीं महाराष्ट्रांतील सर्व संतवाङ्मय आणि भागवत संप्रदाय हीं सर्व या सिद्धान्ताचीं प्राकृत रूपें आहेत असें म्हणणें रास्त होईल. ‘ **जीवो ब्रह्मैव नापरः** ’ हा आचार्यांचा सिद्धान्त ‘ **जें जें देखिजे भूत । तें तें मानिजे भगवंत** ’ या शब्दांत संत तुकोबांनीं प्राकृत जनतेस सांगितला. वैदिक कर्मकांडाचें आणि नुसतें यज्ञयागाचें अवास्तव स्तोम माजवून अहंकाराचा आणि खोटा व्यवहार ठेवण्यांत पारमार्थिक हित नाहीं हें या अद्वैत संप्रदायानें प्रत्यक्ष दाखविलें. ‘ **तेव्हां तूतें जेथ मी स्मरें । तेथ मीपण मी विसरें** । ’ ही ज्ञानेश्वर महाराजांची ओंवी ‘ अहंकार ’ नाहींसा होऊन जिवा-शिवांची अखंड मैत्री होणें ही गोष्ट अद्वैताचा अनुभव येण्यास अगत्याची आहे हें दर्शवीत नाहीं काय ? तात्पर्य,

**‘ हें विश्वचि माझें घर । ऐसी बुद्धि जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । होऊनि ठेला ॥ ’**

ही भव्य विश्वैक्याची घोषणा याच भूमीवर अद्वैत सिद्धान्ताच्या स्थापनेनंतर झालेली दिसेल पाहा.

" त्यांचा जन्मच वैदिक संप्रदाय व अद्वैत मार्ग यांची प्रस्थापना करण्यासाठीं होता. त्यांनीं आपल्या आयुष्यांत दुसरें कांहीं केलेंच नाहीं. आज जवळजवळ १३०० वर्षें होऊन गेलीं, तथापि त्यांनीं स्थापिलेला अद्वैत संप्रदाय अविच्छिन्न चालू आहे. त्यांच्या मागून अद्वैतविरोधी विशिष्टाद्वैतादि मतें रामानुजादिकांनीं प्रचलित केलीं. पण त्यामुळें अद्वैत संप्रदाय लुप्त झाला नाहीं. श्रीशंकराचार्यांच्या प्रस्थानत्रयभाष्याचा मात्र प्राचीन शास्त्रीय वाङ्मयावर असा परिणाम झाला कीं तें लुप्तच झालें. फक्त पद, वाक्य, प्रमाण यांचें प्रतिपादन करणारीं व्याकरण, मीमांसा व न्याय हीं वेदान्तोपकारक शास्त्रें आचार्यांच्या मागें टिकलीं. अलीकडे महाराष्ट्रांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून जो एक भागवतसंप्रदाय सुरू झाला असून संतांच्या अपूर्व व समर्थ वाणीनें सर्व बालगोपालांना तल्लीन करून सोडीत आहे तोहि आचार्यांच्या अद्वैत संप्रदायाला सोडून नाहीं. " ( बापट, भाष्यार्थ, प्रस्तावना )

अद्वैत सिद्धान्ताची ही थोरवी व दूरगामी परिणाम पाहिल्यास ही गोष्ट हिंदुत्वाचें वैशिष्ट्य आहे हें मान्य होण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं. यामुळेंच अमूर्त सच्चिदानंद स्वरूपापासून तों घरोघर निरनिराळ्या मूर्तींपर्यंत अनेक रूपें धारण करणाऱ्या परमेश्वराची कल्पना करतां येते. यामुळेंच ब्राह्मण हा आचारानें वा विद्येनें श्रेष्ठत्वास पोहोंचला तरी शूद्राशीं त्याला माणुसकीचें वर्तन ठेवतां येतें. यामुळेंच ' मोक्ष ' हा पुरुषार्थ सर्व जातींना, सर्व लोकांना वंश, जाति, रंग, रूप, राष्ट्रीयत्व इत्यादींच्या संपूर्ण निरपेक्षत्वानें प्राप्त करून घेण्याची शक्यता उत्पन्न होऊं शकते आणि म्हणूनच वैदिक धर्माचें वा हिंदुत्वाचें हें सनातनत्व या सनातन तत्त्वांत असून तें हिंदूंस वा अहिंदूंस सारखेंच लागू आहे.

**चतुर्विध पुरुषार्थ :** आम्ही ' चतुर्विध पुरुषार्थ ' ही कल्पना भारतियांचें तिसरें वैशिष्ट्य आहे असें मानतों. समष्टीच्या व्यवस्थेकरितां वर्णव्यवस्था जेवढी उपकारक दिसते तितकीच किंबहुना त्यापेक्षांहि जास्त भव्य आणि सुंदर अशी ही समाज आणि व्यक्ति या

दोहोंच्याहि परिपोषाकरित उत्पन्न केलेली हिंदूंची कल्पना आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही ती चतुःसूत्री असून या चार शब्दांत व्यक्तीच्या आशा, आकांक्षा, संवेदना आणि विवंचना यांचा संपूर्ण परामर्श घेऊन, त्यांतील सर्व प्रश्नोपप्रश्न आणि समस्या सोडवून दाखविण्याकरितां जणूं गणिताच्या कांटेकोर पद्धतीनें आमच्या पूर्वाचार्यांनीं हें समीकरणच मांडलेलें दिसतें. चतुर्विध पुरुषार्थांची कल्पना केव्हां उत्पन्न झाली, त्याचा द्रष्टा कोण, ती आचारांत रुजविण्याकरितां स्मृतिकारांनीं काय काय युक्त्या केल्या वगैरे पाहणें झाल्यास वेगळा ग्रंथच होईल. पण प्रस्तुत ग्रंथांत कामपुरुषार्थासंबंधीं विशेष विस्तार पुढें येणार असल्यानें प्रस्तुत स्थळीं चतुर्विध पुरुषार्थांची पार्श्वभूमि जास्त समजण्याकरितां कांहीं मुद्द्यांचें विवरण करणें क्रमप्राप्त आहे. चतुर्विध पुरुषार्थांची कल्पना प्रथम केव्हां उत्पन्न झाली व तिचा एक जनक कोण हें सांगणें दुरापास्त आहे. चतुर्विध पुरुषार्थ हे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार शब्दांनीं दर्शविण्यांत येतात, ही गोष्ट चिरपरिचित आहे. पुरुषार्थ या शब्दानें नेमका काय अर्थ घेत असत, हें सांगणेंहि तितकें सोपें नाहीं. **पुरुषस्य अर्थः** असा समास सोडवून पुरुषार्थाचा अर्थ देण्याची वहिवाट आहे. पुरुष हा शब्द पुरुषसूक्तांत सर्वांच्या परिचयाचा आहे. “पुरिषादः पुरिशयः पूरमतेर्वा।” अशी त्याची निरुक्ति यास्क करतो. म्हणजे पुरुष शब्द सद्, शी किंवा पॄ या तिहींपैकीं वाटेल त्या धातूपासून व्युत्पादावा असें यास्क सुचवितो. पुरुबद्दल पुरि असा फरकहि त्यांत दर्शविलेला असून पुरि म्हणजे संसार असा शंकराचार्यांचा अर्थ आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या म्हणण्याप्रमाणें पुरु या शब्दाचा ‘पुष्कळ, अनेक’ असा अर्थ येथें अभिप्रेत आहे. यासंबंधीं इ. राजवाडे यांचें मत आम्हांस सर्वांत ग्राह्य वाटत असल्यानें त्यांचा परिच्छेदच खालीं उद्धृत करीत आहों.

“पुरु शब्दाचा ‘अनेक’ हा अर्थ घेऊनच निरुक्ति उत्तम होते. सद्, शी किंवा पॄ हे तिन्ही धातू पुरुष शब्दाच्या निरुक्तींत नीट काम देत नाहींत. सद् चा द् कां गळाला, शी चा ष कां झाला आणि पॄ ला रष् कोठून, काय अर्थानें चिकटला, इत्यादि शंका या तिन्ही धातूंसंबंधीं घेतां येतात. वस्तुतः पुरुष हा शब्द वैदिकपूर्वकालीन असून व तो पुरु व अस् या दोन शब्दांपासून झाला आहे. पुरु म्हणजे अनेक, सर्व; आणि अस् म्हणजे असणें. अस् पासून वैदिकपूर्व नाम, ‘अ’ चा

लोप होऊन सः होईल. पुरु+सः = पुरुषः म्हणजे सर्वच असणारा, अनेक असणारा, सर्व व्यापून असणारा. तदुपकारक किंवा तदंगभूत सर्व अवयवांना व्यापून असणारी, जी वस्तु ती पुरुष या शब्दानें सूत्रकारानें उल्लेखिली आहे." (इ. राजवाडे पृ. १४१)

वरील शब्दार्थ आम्हांसहि ग्राह्य वाटतो. आतां, अर्थ हा शब्द अनेक अर्थांनीं वापरण्यांत आहे. "**अर्थोऽयमर्थांतरभाष्य एव**" येथें हेतु वा अभिप्रेत वस्तु असा अर्थ होतो; तर '**कस्यार्थ धर्मों वद पीडयामि**' येथें चतुर्विध पुरुषार्थांतील अर्थ म्हणजे जगांतील संपत्ति (worldly wealth) असा अर्थ होतो. पुरुष या शब्दापुढें अर्थ हा शब्द काय दर्शवितो एवढेंच येथें पाहणें आहे, त्या दृष्टीनें 'अर्थ' या शब्दाचा अर्थ ईप्सित, अभिप्रेत हेतु, ध्येय, कामना वा वस्तु. इंग्रजींत object, aim याप्रमाणें पुरुषार्थाची व्याख्या खालीलप्रमाणें करतां येईल. अनेकांना व्यापून उरणारी अशी जी वस्तु, हेतु वा ध्येय, किंवा सर्वांना सारखीच अभिप्रेत असलेली कामना वा ईप्सित वस्तु तो पुरुषार्थ असा अर्थ लक्षांत घेतल्यास पुरुषार्थांची ही कल्पना सर्वव्यापक आणि मानवी समाजाला मूलभूत अशी आहे हें कोणाच्याहि सहज प्रत्ययास येण्यासारखें आहे. आतां पुरुषार्थ ही कल्पना वेदकालीन असावी असा तर्क करण्यास थोडी जागा आहे. सबंध वेदवाङ्मय या दृष्टीनें एकदां धुंडाळून एतत्संबंधीं सर्व मंत्रांचा संग्रह करून त्यांतून ही कल्पना वेदकालांत होती किंवा काय; असल्यास तिचें स्वरूप काय होतें इत्यादि मुद्द्यांसंबंधीं विस्तृत संशोधन आणि विवेचन करण्यासारखें आहे.

आमचे मित्र पंडित सातवळेकर यांचें म्हणणें असें कीं, "चतुर्विध पुरुषार्थ, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या शब्दांचा एके ठिकाणीं उल्लेख चारहि वेदांमध्यें एकत्र कोठेंहि आलेला नाहीं. तथापि धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे मिळवावयाचे आहेत असे सूचक निर्देश वेदान्तामध्यें इतस्ततः अनेकानेक मिळतात." (खाजगी पत्र पं. सातवळेकर) मग पुरुषार्थ ही कल्पना वेदकालीन असावी असा तर्क करण्यास जागा काय? एक तर पुरुष हा शब्द वेदपूर्वकालीन आहे, हें श्री. राजवाडे यांचें मत. पुरुष हा शब्द वेदवाङ्मयांत चिरपरिचितहि आहेच. दुसरें म्हणजे वेदवाङ्मयांत बऱ्याच ऋचा बहुवचनात्मक सामुदायिक स्वरूपाच्या आहेत. '**तानि धर्माणि प्रथमान्यासन्**' '**धियो यो नः प्रचोदयात्**' या पुष्कळांच्या परिचयाच्या आहेत. येथें 'नः' असें पद आहे. 'माम्' असें नाहीं. धर्म, अर्थ आणि काम हे तीनहि

शब्द वेदामध्यें पुष्कळ ठिकाणीं येत असून हे मिळवावयाचे आहेत असे निर्देश पुष्कळ आहेत. पुरुषार्थ या शब्दाची मागें आलेली व्याख्या सामाजिक वा सर्व मनुष्यमात्रांस लागू अशीच होते, हें लक्षांत आणल्यास आणि सर्वव्याप्त असा बहुवचनात्मक निर्देश एकत्र ठेवल्यास जरी पुरुषार्थाची कल्पना सुस्पष्ट नसली तरी बीजरूपानें वेदांत होती असा तर्क करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. येथें एक गोष्ट नमूद करावीशी वाटते कीं, मोक्ष ही कल्पना वेदामध्यें फार परिणत अवस्थेंत नसावी असें वाटतें. ‘ अमृतत्व ’ हा शब्द मोक्ष या शब्दाकरितां वापरलेला दिसतो. पंडित सातवळेकर यांच्या मतें “ मोक्ष हा सामुदायिक व वैयक्तिक असा कल्पितां येतो आणि सामुदायिक मोक्षाची कल्पना वैदिकच आहे. यामुळें सर्व राष्ट्रच्या राष्ट्र शुद्धाचरणी बनावें अशी त्यांची योजना होती. अर्थात् वैयक्तिक मोक्ष ही कल्पना बौद्धकालानन्तरचीच आहे. ” म्हणूनच ‘ मोक्ष’ ही कल्पना वेदकालांत परिणतावस्थेंत नव्हती, हें आमचें मत ग्राह्य मानण्यास फारसा पुरावा आणण्याची जरुरी दिसत नाहीं. धर्म, अर्थ व काम या तीन ध्येयांना धरून ‘ त्रिवर्ग ’ अशी एक संज्ञा अस्तित्वांत आहे. त्रिवर्ग हा शब्द वेदांत कोठें येतो व इतर वाङ्मयांत प्रथम कोठें दृष्टीस पडतो हें पाहणें महत्त्वाचें आहे. गृहस्थाश्रमाची स्तुति करतांना गौतमधर्मसूत्रांत

**“ गृहस्थाश्रमात्परं नास्ति यदि भार्या वशानुगा ।**
**तथा धर्मार्थकामानां त्रिवर्गफलमश्नुते ”॥** गौ. ध. सू. ४

धर्म, अर्थ व काम या तिहींना धरून येथें त्रिवर्ग हा शब्द स्पष्टपणें वापरलेला आहे. या सर्व चर्चेवरून मोक्ष ही कल्पना या त्रिवर्गानंतर स्पष्ट स्वरूपांत उत्क्रान्त झाली असून या कल्पनेचा चतुर्विध पुरुषार्थांत अंतर्भावहि नंतरच ग्राह्य झालेला दिसतो.

मीमांसेंत पुरुषार्थ हा शब्द येतो. पुरुषार्थ ही कल्पना काय म्हणून उत्पन्न केली, या कल्पनेचें फल काय किंवा ही कल्पना उत्पन्न करण्यांत काय ध्येय साध्य करावयाचें होतें हें अगोदर थोडक्यांत पाहून पुढें ही कल्पना प्रसृत करण्याकरितां केवढे परिश्रम केले आहेत याचें दिग्दर्शन करूं.

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थ–घटकांचा अन्वयार्थ व विचार नीट समजावून घेतल्यास मनुष्याच्या मनाच्या समाधानाचीं हीं सर्व अनिवार्य, अचूक आणि सनातन अंगें आहेत, असें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. या

सर्वांगाच्या समाधानावरच मनाचें शेवटचें समाधान सहाजिकच अवलंबून असणार. पुष्कळ संपत्ति हें समाधानाचें एक साधन होणार नाहीं. अलोट भोगेच्छा ही पण समाधानास कारणीभूत होत नाहीं. मनुष्याच्या सर्व ऐहिक व ऐंद्रियक सुखावर पाणी सोडून, परिव्राजक वृत्तीचा सुरवातीपासून आश्रय करणेंहि मानसिक समाधानाची जोपासना करणार नाहीं. शाश्वत ब्रह्मचर्यव्रतानें राहूनहि हें समाधान प्राप्त होत नाहीं. याविषयीं जास्त चर्चा या प्रत्येक घटकाचा अभिप्रेत अर्थ देतांना आणि ही चतूःसूत्री आयुष्याच्या पुष्कळ समस्या सोडविण्याची गुरुकिल्ली कशी आहे हें सांगतांना करूं. येथें एवढेंच नमूद करणें आहे कीं, पुरुषार्थ या कल्पनेनें आमच्या पूर्वजांना व्यक्तीचें कांहीं निश्चित ध्येय साधावयाचें होतें. हें ध्येय 'मानसिक समाधान' होतें असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. हें समाधान ज्या ज्या मनः-प्रवृत्तींवर अवलंबून आहे त्या सर्वांचा त्यांनीं विचार केला. शिवाय व्यक्तीच्या मनः-प्रवृत्तीचें समाधान साधतांना त्याचें समष्टीशीं कांहीं विशेष नातें आहे, व्यक्ति समष्टीचें कांहीं निश्चित ऋण लागते, या दृष्टीनें त्यांना स्वतःच्या मनःप्रवृत्तींची धांव कोठपर्यन्त न्यावी याचाहि विचार करावा लागला. डॉ. राधाकृष्णन् म्हणतात, "कांहीं मूल वासनांच्या भोंवतीं मानवी जीवन घिरट्या घालीत असतें. ( डॉ. राधा-कृष्णन् पृ. ८३ ) यांत येणाऱ्या ऐहिक व पारमार्थिक भावना या दोहोंचाहि पुरुषार्थ कल्पनेंत योग्य समन्वय नाहीं काय ! तात्पर्य, मनुष्याच्या प्रवृत्तीचा प्रकर्ष समष्टी-करितां योग्य तेथें निवृत्तीची जोड देऊन साधण्याचा आणि तेंहि समष्टीच्या स्वास्थ्याकरितां करण्याचा, पुरुषार्थ हा प्रयत्न होता. ( न्यायकोश पृ. ५०४ )

**यस्मिन्स्वर्गादिसुखविशेषः पश्वादिसुखसाधने च लब्धे प्रीतिः । कृतार्थोऽस्मीति वृत्तिस्तत्साधनं पुरुषार्थः** । ( जै. सू. वृ. ४. १२ ) या एकाच सूत्रांत सर्व अर्थ एकत्र केलेला दिसतो. पशु ही तत्कालीन संपत्ति असल्यानें 'अर्थ' या घटकाला धरून संपत्ति मिळविली म्हणजे पुरे असें नव्हे. स्वर्गादिसुख हें मनुष्याच्या धार्मिक प्रवृत्तींना धरून आलेलें असून त्यानेंहि कार्यभाग होतो असें नाहीं. जणूं कांहीं या व अशा प्रकारच्या निरनिराळ्या ऐहिक व पारमार्थिक मनःप्रवृत्तींचा वेगवेगळा विस्तार व्याख्या करतांना लेखकास अपुरा वाटून शेवटीं या सर्व मनःप्रवृत्तींचें जें अंतिम ध्येय, ज्याकरितां मानवाची सर्व धडपड, त्या मनाच्या समाधानाच्या वृत्तीकरितां '**कृतार्थोऽस्मीति वृत्तिः**' असा शब्द

घालून पुरुषार्थाच्या व्याख्येची सूत्रकारानें परिसमाप्ति केली. इतर सर्व शब्दांनीं त्यास जें संपूर्ण सांगतां आलें नाहीं, तें शेवटीं '**कृतार्थोऽस्मीति वृत्तिः**' या शब्दसमुच्चयानें त्यानें पुरें केलें. मनुष्यास कृतार्थत्वाची भावना उत्पन्न झाली पाहिजे. जगांत आल्यावर ज्या नैसर्गिक मनकामना, त्यांचा योग्य तो भोग घेतला, अशी त्याची कल्पना झाली पाहिजे. म्हणजे त्यास 'कृतार्थः अस्मि' ही मानसिक समाधानाची वृत्ति प्राप्त होते. आणि ही वृत्ति निर्माण करणें हीच व्यक्तीच्या प्रगतीची शेवटची स्थिति, अथवा व्यक्तीच्या ऐहिक उत्क्रांतीची परिसमाप्ति मानलेली दिसते. हें ध्येय साध्य करण्याकरितांच पुरुषार्थ या कल्पनेचा उगम व आचार असून ही कल्पना सर्वत्र कशी सारखी पेरलेली दिसते, हें आतां यापुढें पाहणें आहे.

वैदिक धर्मांतील सर्व नानाविध शास्त्रें या चतुर्विध पुरुषार्थांना धरूनच निर्माण झालीं आहेत. 'धर्म' या घटकाबद्दल धर्मशास्त्राचा प्रकर्ष असून 'अर्थ' या पुरुषार्थासंबंधीं अर्थशास्त्र निर्माण झालें. 'काम' या पुरुषार्थाचा ऊहापोह करण्याकरितां 'कामशास्त्र' निर्माण झालें. आणि 'मोक्ष' साधनाकरितां सर्व अध्यात्मशास्त्राचा विस्तार झाला. यानंतर भारतीय शास्त्रांत व लौकिक वाङ्मयांत पुरुषार्थकल्पना कशी सर्वत्र मूलभूत आहे हें पाहणें आहे.

**स्मृति :** धर्मशास्त्रावरील एकंदर विस्तृत वाङ्मय, सूत्रग्रंथ, स्मृतिग्रंथ व टीका अशा प्रकारचें विपुल आहे. यांसंबंधीं जास्त माहिती म. म. काणे यांचा 'हिंदुधर्मशास्त्राचा इतिहास' यांत पाहावी. प्रस्तुत चर्चेकरितां मनु व याज्ञवल्क्य हे दोनच स्मृतिग्रंथ घेतले आहेत.

धर्मशास्त्र हें सर्वांत श्रेष्ठ शास्त्र मानलें आहे. इतर सर्व शास्त्रांशीं विरोध आल्यास धर्मशास्त्र हेंच आचाराला प्रमाणभूत शास्त्र समजावें. '**अर्थशास्त्रात्तु॥ बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः**' अर्थशास्त्रापेक्षां धर्मशास्त्र हें आचारनिर्णयाला श्रेष्ठतर समजावें, असा दंडक प्रसिद्ध आहे.

वात्स्यायनप्रणीत कामसूत्रांतहि धर्मशास्त्रासंबंधीं असाच निर्णय स्पष्टपणें देण्यांत आला आहे. धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गाच्या आचारामध्यें ज्या वेळीं विरोध प्राप्त होतो तेव्हां काय करावें, असा प्रश्न उत्पन्न झाला असतांना, पुढच्या-

पेक्षां मागील श्रेष्ठ असें समजावें असा निर्णय सूत्रकारांनीं दिला आहे. '**एषां समवाये पूर्वः पूर्वो गरीयान्** ' या सूत्रानें कामापेक्षां अर्थ महत्त्वाचा, आणि तत्पूर्वी धर्म असल्यानें तो सर्वांत महत्त्वाचा पुरुषार्थ असा याचा निष्कर्ष. धर्माला वा धर्मशास्त्राला हा अधिकार कां दिला याचा विचार, ' धर्म ' या कल्पनेची चर्चा पुढें केली आहे त्यावरून समजून येईल.

मनुस्मृति मुख्यतः चार वर्णांचे शाश्वत आचार सांगण्याकरितां आहे. त्यांत चतुर्विध पुरुषार्थांचें एकत्र वर्णन आढळत नाहीं. परंतु आश्रम–आचाराचें मात्र वर्णन येतें. ब्रह्मचारी, गृहस्थ आणि परिव्राजक यांचा आचार कसा असावा याचीं वर्णनें सर्वत्रें आहेत. चतुर्विध पुरुषार्थ ही कल्पना व्यवहारांत आणण्यासाठीं, किंवा दृश्य स्वरूपांत आणण्यासाठीं, आश्रम–आचार अस्तित्वांत आणला गेला. तेव्हां आश्रम–आचाराचें वर्णन स्मृतिकारानें केलें, त्या अर्थी ही पुरुषार्थ–कल्पना त्यांस अभिप्रेत होती. निरनिराळ्या पुरुषार्थघटकांचा स्मृतींमध्यें नामनिर्देश पुष्कळ ठिकाणीं आढळतो.

" **अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते ।**
**अप्यर्थकामौ तस्यास्तां धर्म एव मनीषिणः ॥** " मनु. २

ह्या श्लोकार्धांत धर्म, अर्थ व काम या तिन्ही पुरुषार्थांचा निर्देश आहे. त्रिवर्गाचा असंदिग्ध उल्लेख खालीलप्रमाणें सांपडतो.

**धर्मार्थावुच्यते श्रेयः कामार्थौ धर्म एव च ।**
**अर्थ एवेह वा श्रेयस्त्रिवर्ग इति तु स्थितिः ॥** मनु. २.२२४

धर्मार्थ हे पुरुषार्थ श्रेयस्कर आहेत कीं काम, अर्थ व धर्म हे श्रेयस्कर आहेत, किंवा अर्थ हा एकमेव पुरुषार्थच श्रेयस्कर आहे; अशा निरनिराळ्या कल्पना पुढें आल्या तरी त्रिवर्ग अर्थात् धर्म, अर्थ व काम हे तिन्ही श्रेयस्कर आहेत अशी वस्तुस्थिति आहे, असें स्मृतिकारांनीं मत दिलेलें आहे. मग ' मोक्ष ' ही कल्पना त्यांना अवगत नव्हतीच कीं काय अशी शंका निर्माण होण्याचें कारण नाहीं. ' मोक्ष ' कल्पनेचाहि स्पष्ट निर्देश आलेला आढळतो.

**ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ।** मनु. ६. ३५

तिन्ही ऋणांची योग्य ती फेड करून मन मोक्षाच्या ठिकाणीं स्थिर करावें

असा याचा अर्थ. वरील विवेचनावरून चतुर्विध पुरुषार्थाची कल्पना स्पष्टपणें स्मृतिकारांना अवगत होती.

याज्ञवल्क्य स्मृति हा ग्रंथहि बव्हंशीं मनुस्मृतीसारखाच आहे. यांत वर्णाश्रमधर्मांचा विचार आचाराला धरून वर्णन केला आहे. चतुर्विध पुरुषार्थांची बैठक या ग्रंथकालांत स्थिर झालेली दिसते. परंतु आचारवर्णन हा या ग्रंथाचा मुख्य प्रतिपाद्य विषय असल्यानें, या आचारांच्या मागील तत्त्वप्रणाली वर्णन करण्याचें स्मृतिकारांना कारण उरत नाहीं. त्यामुळें पुरुषार्थांचें वेगळें वर्णन याहि ग्रंथांत विशेष दिसत नाहीं. कांहीं ठिकाणीं प्रसंगानुरूप धर्मार्थकामांचा मात्र स्पष्ट निर्देश केलेला दिसतो.

**धर्मार्थकामान्स्वे काले यथाशक्ति न हापयेत्।** याज्ञ. मिता. गृहस्थ. धर्म, अर्थ व काम हे त्या त्या कालांत टाळूं नयेत. वरील श्लोकावर टीका करतांना विज्ञानेश्वर लिहितात,

**“ धर्मार्थकामान् स्वोचितकाले यथाशक्ति न परित्यजेत् ।**
**यथासंभवं सेवेत इत्यर्थः। पुरुषार्थत्वात्।** याज्ञ. मिता.

त्रिवर्गाचें यथाकाल व यथाशक्ति सेवन करावें; त्यांत हित आहे. कारण ‘ पुरुषार्थत्वात् ’ हा स्पष्ट उल्लेख पुरुषार्थाची कल्पना मूलभूत असून ती सर्वमान्य होती असें दाखवितो. मनुस्मृति ही सर्वांत जुनी आहे असें समजतात व तिचा काल इ. स.पूर्व असावा असें मानलें जातें. याज्ञवल्क्यस्मृति ही नंतरची आहे, अशी समजूत असून हा काल इ. स. १०० ते २०० पर्यंत असावा. ( काणे, पृ. ४१ ) **‘ धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः ’** हें वचन प्रसिद्ध असल्यानें धर्मशास्त्रावरील ग्रंथ म्हणून या दोन प्रमुख स्मृति आपण विचारांत घेतल्या.

**महाभारत :** या ग्रंथासहि मोठें लोकमान्यत्व असून त्यास स्मृतींइतकेंच महत्त्व देण्यांत येतें. ‘ व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं ’ ही उक्ति सर्वांना परिचित आहे. याचा अर्थ जगांतील मानवी व्यवहारांत असा प्रसंग वा घटना नाहीं कीं तत्सदृश वर्णन महाभारतांत सांपडणार नाहीं. यामुळें पुरुषार्थविचार महाभारतांत इतस्ततः पुष्कळ असणें असंभवनीय

नाहीं. महाभारतांतील सर्व विखुरललेलीं एतद्विषयक विधानें एकत्र आणूं गेल्यास तेंच एक पुस्तक होऊं शकेल.

**धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ॥**

या श्लोकांत तिन्ही पुरुषार्थांचा उल्लेख असून धर्म हा अर्थकामांस मूलभूत पुरुषार्थ आहे असें श्रीव्यासांनीं मोठ्या आग्रहानें स्पष्ट म्हटलें आहे.

अनुशासनपर्वाच्या १२२व्या अध्यायांत उमामहेश्वर संवादांत उमेनें त्रिवर्गासंबंधीं एक प्रश्न महेश्वरास विचारला आहे. त्यांत गृहसौख्याची ज्यांना इच्छा आहे, अशा लोकांचें त्रिवर्गासहित चरित्र, व्यवहार आणि वृत्ति यांसंबंधीं वर्णन करण्याची प्रार्थना उमेनें महेश्वरास केली आहे. या प्रश्नास उत्तर देतांना सर्व वर्णांच्या सामान्य वृत्ति काय असतात, त्यांत उच्चनीच कोणत्या, त्या त्या वृत्तींचीं साधनें काय, फल काय इत्यादि विचार सांगून जें धन प्राप्त होईल तें चार भागांत विभागून धर्म, अर्थ, काम आणि आपच्छमनाकरितां चार भाग वापरावे असें सांगितलें आहे. त्रिवर्गाचें सेवन हें आयुष्यवर्धन करणारें असून यामुळें ऐहिक आयुष्य धन्य व यशस्वी होऊन स्वर्गप्राप्ति करून देणारें आहे असा उल्लेख आहे. तात्पर्य, महाभारतांत पुरुषार्थांची कल्पना स्पष्टपणें आढळते. महाभारत हा ग्रंथ सर्वमान्य व आबालवृद्धांच्या परिचयाचा आणि श्रद्धास्थान असल्यामुळें त्यांत हा विषय ठिकठिकाणीं लोकशिक्षणाच्या दृष्टीनें अपरिहार्यच आहे. यानंतर त्यांतीलच जो विशेष प्रसिद्ध भाग म्हणजे ‘ भगवद्गीता ’ यांत हा विषय कसा येतो हें पाहूं.

**भगवद्गीता :** भगवद्गीता हा महाभारतांतर्गत एक महत्त्वाचा आणि लोकमान्य भाग असून गीतेसहि एक ‘ स्मृति ’ मानण्याचा प्रघात आहे. भगवद्गीतेवर अनेक टीका, भाष्यें आणि शिवाय प्रचारकी वाङ्मय प्रसिद्ध झालेलें दिसेल. गीतेचें प्रयोजन काय यासंबंधींहि सर्वांत एकवाक्यता दिसणें दुरापास्त आहे. परंतु त्या चर्चेंत पडण्याचें प्रस्तुत स्थान नव्हे श्रीमत् शंकराचार्यांचें भगवद्गीताभाष्य हें गीतेवरील अत्यंत तर्कशुद्ध भाष्य आहे, असें आम्हांस वाटतें. प्रस्तुत विषयावरील चर्चा आम्हीं प्रत्यक्ष गीताग्रंथ आणि आचार्यांचें भाष्य यांस धरून केलेली आहे.

त्रिवर्ग आणि पुरुषार्थ हे दोन्ही शब्द गीतेंत अथपासून इतिपर्यंत कोठेंहि

येत नाहींत असें दिसतें. अर्जुनाचा मोह नष्ट करण्यासाठीं ज्यांत मुख्यतः तत्त्वज्ञान भरलें आहे त्यांत हे शब्द वा त्यांचें विशेष विवरण नसल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गांचा जरूर तेथें निर्देश केलेला ठिकठिकाणीं आढळतो.

**यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ।**
**प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥** भ. गी. १८. ३४

धर्म, अर्थ व काम हे तिन्ही पुरुषार्थ नित्यकर्तव्यरूप असून प्रसंगानुरूप त्यांचें योग्य फल इच्छिणारी ही धृति राजस होय. धर्म अविरुद्ध जे अर्थ व काम ते सर्व ठिकाणीं ग्राह्य समजले असून तद्विरुद्ध आचार घातक समजले गेले आहेत.

**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥** भ. गी. ७. ११

संपूर्ण कामवासनेचे नानाविध आविष्कार, व्यापार आणि चेष्टा यांचें अवलोकन करून एक त्रिकालाबाधित सिद्धान्त व्यक्ति, समाज आणि राष्ट्र यांच्या कल्याणाच्या दृष्टीनें अर्ध्या श्लोकांत लोकांपुढें मांडलेला आहे. याचें विवेचन आम्हीं प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटीं केलें असून आर्यांचा धर्म–अविरुद्ध काम हाच काम-पुरुषार्थाचा एकमेव पाया असून यावरच मनुष्याचें ऐहिक कामविषयक समाधान अवलंबून ठेवणें इष्ट आहे. हाच 'काम' प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूप आहे. दहाव्या अध्यायांत 'विभूतियोगा' चें विवरण चालू असतांना जें जें अपूर्वसाधारण पण ऊर्जित आणि श्रीमत् असेल तेथें 'माझा' अंश समज असें दहाव्या अध्यायांत प्रतिपादन आहे त्यांतच '**प्रजनश्चास्मि कंदर्पः**' हाहि श्लोकार्ध येतो. यावरून प्रजनाच्या प्रयोजनानें उत्पन्न झालेला काम धर्म-अविरुद्ध असून तो प्रत्यक्ष परमेश्वर-स्वरूप आहे, असा गीतेचा सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त नीट समजल्यास प्रजोत्पादन-विरहित कामविकार त्याज्य कां ठरविला, विवाहाचा हेतु स्पष्ट कां मांडला, स्त्रीस अधर्म्य कामविकारापासून संरक्षण कसें दिलें, पुरुषार्थाचा योग्य अथवा धर्म्य कामविकार जबाबदारी व कर्तव्य यांच्याशीं कां जोडला, प्रासंगिक ब्रह्मचार्याचें प्रतिपादन कां केलें, जबाबदारीच्या व कर्तव्यशील प्रजोत्पादनास धरून स्त्रीपुरुषांचे संबंध, हक्क आणि कर्तव्यें यांची कशी सांगड घातली वगैरे सर्व कोडीं भराभर उल-गडूं लागतात. अधर्म्य काम हा मनुष्याला ऐहिक सुखशांतीला पारखा करून मोक्षाच्या

आड येतो असें स्पष्ट प्रतिपादन सोळाव्या अध्यायांत दैवासुरसंपत्तीचें वर्णन करतांना आलेलें आहे.

यांत शास्त्रविधि सोडून म्हणजे अधर्म्य 'काम' हा सिद्धि प्राप्त करून देत नाहीं, सुखहि देत नाहीं व मोक्षहि देत नाहीं असें निवेदन आहे. यांत 'काम' हा पुरुषार्थ-विरहित कामच होय असा अर्थ करणें योग्य आणि अभिप्रेत आहे. शंकराचार्यांनीं या श्लोकावर टीका करतांना स्पष्टपणें **'न स सिद्धिं पुरुषार्थ-योग्यतां आप्नोति।'** असा अत्यंत योग्य अर्थ केला आहे. उलट

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्॥** भ. गी. १६. २१

हा धर्म-विरुद्ध काम प्रत्यक्ष नरकाचें द्वार असून क्रोध व लोभ हे पण तसेच आहेत, असें न्यायनिष्ठुर प्रतिपादन आहे. या श्लोकावरहि भाष्य करतांना श्रीशंकराचार्यांनीं या तिहींमुळें

**"आत्मा कस्मैचित् पुरुषार्थाय योग्यः न भवति॥"**

म्हणजे आत्मा कोणत्याहि पुरुषार्थास अयोग्य होतो.

तात्पर्य, पुरुषार्थकल्पना ही भगवद्गीतेंत अभिप्रेत असून प्रसंगानुरूप त्याचें विवेचन स्पष्ट व असंदिग्ध आहे हें समजून येईल. गीताभाष्यकारांनाहि ही कल्पना ग्राह्य होती इतकेंच नव्हे तर या मूलभूत कल्पनेविरुद्ध कसलेंच तत्त्वज्ञान असूं शकत नाहीं. कारण कीं, सुरवातीसच उपोद्घातांत श्रीशंकराचार्यांनीं खालील स्पष्ट वाक्य घातलें आहे.

**यतः तदर्थे विज्ञाते समस्तपुरुषार्थसिद्धिः इति एतद्विवरणे यत्नः क्रियते मया।** भ. गी. भाष्य शंकराचार्य

भगवद्गीतेचा योग्य अर्थ समजल्यास सहजच समस्त पुरुषार्थांची सिद्धि होईल एवढ्यासाठीं या ग्रंथाचें विवरण करण्याचा भाष्यांत प्रयत्न केला आहे. यावरून पुरुषार्थकल्पना या कालांत संपूर्णपणें लोकमतांत रुजलेली आणि आचारांत महत्त्व पावलेली अशी होती. आचार्य हे फक्त मोक्ष सांगणारे आहेत, असें म्हणणाऱ्यांना हें सहज उत्तर आहे. त्यांना प्रवृत्ति व निवृत्ति या दोहोंचा उत्तम संगम ज्या पुरुषार्थ कल्पनेनें साधला आहे तिची माहिती होती व ती ग्राह्यहि होती.

**कौटिलीय अर्थशास्त्र :** धर्मशास्त्रानंतर चतुर्विध पुरुषार्थांना धरून 'अर्थ' या घटकासंबंधीं आणि व्यवहारासंबंधीं जे ग्रंथ निर्माण झाले त्यांत कौटिलीय अर्थशास्त्र प्रमुख मानण्यास हरकत नाहीं. चंद्रगुप्त मौर्याला सिंहासनाधिष्ठित करणारा हा राजकारणधुरंधर अमात्य. याचा ग्रंथ इ. स. पूर्वी ३२१ ते २९८ च्या सुमारास लिहिला गेला असावा असा टी. गणपतिशास्त्री यांचा तर्क आहे. हा ग्रंथ मुख्यतः राजधर्म सांगण्याकरितां उत्पन्न झाला असून राज्यामधील सर्व प्रकारच्या प्रजाजनांचें पालन, संरक्षण आणि न्यायदान इत्यादि 'राज्यशासनानुरोधानें' प्राप्त होणाऱ्या सर्व बाबींचा यांत सखोल विचार येऊन गेला आहे. पूर्वाचार्यांनीं केलेल्या सर्व एतच्छास्त्रविषयक ग्रंथांचें अवलोकन करून हा ग्रंथ राज्यलाभ व पालन यांकरितां निर्माण केला गेला असें सुरवातीसच ग्रंथकर्त्यांनें निवेदन केलें आहे. यांत पुरुषार्थविचार कोठें येतो काय तें पाहणें इष्ट आहे. **'विद्यासमुद्देशः'** या पहिल्याच प्रकरणांत

**'चतुर्णां वर्णानां आश्रमाणां च स्वधर्मस्थापना-दौपकारिकः'**

योग्य धर्म प्रस्थापित करण्यांतच चारहि वर्णांचें व आश्रमांचें हित आहे. यानंतर ब्राह्मणादि वर्णांचा स्वधर्म काय हें सांगून ब्रह्मचारी, गृहस्थ, इत्यादि आश्रमांतील कर्तव्यें काय याचाहि स्पष्ट खुलासा केलेला आढळतो. या प्रकरणाच्या शेवटीं

**व्यवस्थितार्थमर्यादः कृतवर्णाश्रमस्थितिः** । कौ. अ.

असें म्हटलेलें आहे.

अर्थासंबंधीं योग्य धोरण उत्पन्न करून वर्णाश्रमांची योग्य स्थिति प्राप्त झाली असतांना लोकसंतोषांत भर पडते. पुढें जे कांहीं कायदे सांगितले आहेत ते या उद्देशाला धरून आहेत. यावरून वर्णाश्रमव्यवस्था ही मूलभूत कल्पना म्हणून मांडलेली असून ही कल्पना स्थिर करण्याकरितां सर्व चळवळी व विद्या यांचा उपयोग करावयाचा आहे असा अभिप्राय दिसतो.

तिसऱ्या प्रकरणांत 'राजर्षिवृत्त' म्हणजे उत्तम राज्यकर्त्याला लागणारे गुण काय असावेत याची चर्चा आहे. त्यांत खालील उतारा येतो.

**धर्मार्थाविरोधेन कामं सेवेत न निस्सुखःस्यात् । समं वा त्रिवर्गं अन्योन्यानुबंधम् । एको हि अत्यासेवितः धर्मार्थकामानां आत्मानं इतरौ च पीडयति** । कौ. अ.

यांत त्रिवर्ग हा शब्द आलाच आहे. धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थहि आले आहेत. त्रिवर्गाचें समान सेवन करावें का धर्मार्थांच्या अविरोधानें कामसेवन करावें असे पक्ष निर्माण झाल्यास त्रिवर्गाचें समानतेनें आचरण करावें, कारण कीं एकाचें अतिमात्र आचरण केल्यानें किंवा एकाच पुरुषार्थाच्या मागें लागत गेल्यास इतरांची हानि होते. असा अर्थ टी. गणपतिशास्त्री यांनीं टीकेंत दिला आहे. यानंतर 'शौचाशौचज्ञानं अमात्यानाम्' या प्रकरणांत

**त्रिवर्गभयसंशुद्धानमात्यान् स्वेषु कर्मसु ।**
**अधिकुर्याद्यथाशौचमित्याचार्या व्यवस्थिताः ।** कौ. अ.

असा श्लोक येतो. त्रिवर्ग म्हणजे धर्म, अर्थ व काम या तिन्ही गोष्टींचें म्हणजे अहितकारक आचरण नसलेल्या व्यक्तींनाच योग्य स्थळीं अमात्य म्हणून नियुक्त करावें असा याचा अर्थ. येथें त्रिवर्ग हा शब्द स्पष्टपणें आलेला आहे.

तात्पर्य, अर्थशास्त्रकारांनीं पुरुषार्थकल्पना पायाभूत मानली होती.

**कामशास्त्र :** अर्थानंतर कामपुरुषार्थाला धरून जें शास्त्र निर्माण झालें तें कामशास्त्र. वात्स्यायनमुनिप्रणीत कामशास्त्र सुप्रसिद्ध आहे. यासंबंधीं विस्तृत विवेचन पुढच्या प्रकरणांत येईल. येथें एवढें नमूद केलें म्हणजे पुरे कीं, धर्मार्थकाम हें लोककल्याणाचें एक प्रमुख साधन आहे आणि ही मूलभूत कल्पना लोकांच्या धारणेस वा सुस्थितीस आवश्यक आहे असा सिद्धान्त धर्मशास्त्रांत धर्मशास्त्रज्ञांनीं व अर्थशास्त्रांत अर्थशास्त्रकारांनीं निःसंदिग्धपणें मांडला. तद्वतच कामशास्त्रकारांनींहि सुरवातीसच त्याचा स्पष्ट निर्देश करून हेंच आम्हांस या शास्त्रानें अभिप्रेत आहे, असें स्पष्ट सांगितलें आहे. दुसऱ्या अध्यायाच्या सुरवातीसच '**शतायुर्वैपुरुषो विभज्य कालं अन्योन्यानुबद्धं परस्परस्य अनुपघातकं त्रिवर्गं सेवेत ।**' (का. सू. १.२.१) असा पहिला नियम सांगितला. मनुष्य साधारणतः शतायु समजला जातो. हा काल त्रिवर्गसिद्धींत घालविला पाहिजे. तसें करतांना त्या कालाचे असे योग्य कालखंड पाडावेत कीं, ज्या योगानें हे कालखंड एकमेकांशीं निगडीत राहून परस्परांना उपकारक ठरतील. हा त्रिवर्गसिद्धान्तहि कामशास्त्रकारांना संपूर्ण अवगत होता, मान्य होता आणि हेंच लोककल्याणाचें एकमेव साधन लोकांना माहीत व्हावें, आणि तद्द्वारा सर्वांना सुखासमाधानांची प्राप्ति व्हावी या एकमेव उद्देशानें त्यांनीं हें शास्त्र निर्माण केलें.

**मोक्षसाधनास त्रिवर्ग ग्राह्य :** धर्म, अर्थ व काम यांनंतरचा जो मोक्ष पुरुषार्थ याला धरून सबंध ‘अध्यात्मविद्या’ नांवाचें ज्ञान प्रसृत आहे. त्याला धरून अगणित ग्रंथसंपत्तीहि आहे. तिचें अवलोकन वा निर्देशहि करणें येथें अशक्य आहे. उपनिषदापासून थेट संतवाङ्मयापर्यंत सर्वत्र तें ओतप्रोत भरलेलें आहे. एतद्विषयक फक्त दोनच मुद्द्यांकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधतों.

प्रथमतः मोक्ष मार्गाचें ज्ञान प्रसृत करणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीनें जीवनास आवश्यक जें त्रिवर्गसाधन तें कोठेंहि त्याज्य आहे, किंवा त्याच्यावर सर्वस्वीं तुळशी-पत्र ठेवल्याशिवाय मोक्षसाधन नाहीं असा उपदेश वा सिद्धान्त मांडला नाहीं. उलट, त्रिवर्गसाधन संपूर्ण झाल्यावर आयुष्याच्या अस्तकालीं निवृत्तिरूप धर्माचा आश्रय करून मोक्षाचें साधन करावें असाच उपदेश आढळेल. अशा प्रकारचे निर्देश संस्कृत-मराठी वाङ्मयांत पुष्कळ आढळतील. महाभारताच्या अनुशासनपर्वांत १३१ व्या अध्यायांत नानाधर्मांचें साफल्य महेश्वरानें पार्वतीस कथन केलें आहे. त्या सर्वांत मोक्षधर्माचें श्रेष्ठत्व प्रतिपादन करून जरामरणांतून किंवा संसारचक्रांतून मोकळें होण्यासाठीं मोक्ष हाच कसा एकमेव मार्ग आहे आणि तो ज्ञाननिष्ठेनेंच कसा प्राप्त होतो याचें मुख्यतः विवरण आहे. चतुर्विध-पुरुषार्थांत मोक्ष हा शेवटचा असल्यानें आणि तो सर्वांत श्रेष्ठ आहे असें मानल्यास त्रिवर्गरहित हा श्रेष्ठतम पुरुषार्थ प्राप्त करून घ्यावा काय असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. तेव्हां, **‘आनृण्यं सर्वतः प्राप्य ततस्मात्संत्यजेद्गृहान्’** असा खुलासा महेश्वराच्या तोंडीं घातला आहे. आनृण्य प्राप्त करून घेतल्यावरच गृहस्थाश्रमाचा त्याग सुचविला असून वानप्रस्थास जाण्याची अनुज्ञा आहे. धर्मार्थकामांचें योग्य सेवन झाल्याशिवाय मोक्षाचा मार्ग मोकळा नाहीं, असा याचा स्पष्ट अर्थ दिसतो. यानंतर मोक्षमार्गांत शिरल्यावर वैराग्य उत्पन्न झाल्याशिवाय वासनाक्षय नाहीं. आणि वासनाक्षय झाल्याशिवाय चित्तशांति नाहीं, असें असल्यानें वासनाक्षय व्हावा आणि वैराग्य किंवा विमर्श ( **विमर्शो नाम वैराग्यं** ) उत्पन्न व्हावा यासाठीं अर्थ-कामांची निंदा केलेली आढळते. निंदा याचा अर्थ एवढाच कीं, संसार हा सुखदुःखान्वित असल्यानें किंवा जगांतील प्रत्येक कर्म गुणदोषान्वित असल्यानें प्रथमावस्थेंत ज्या अर्थकामांचें गुणगान ऐकल्यानें मनुष्य प्रवृत्त होतो त्यांचें दोषाविष्करण द्वितीया-

वस्थेंत मनावर ठसवून त्यास निवृत्तीस लावण्यासाठीं जें अर्थकामांच्या दोषांचें वर्णन त्यास निंदा असा शब्द येथें लावला आहे. याच मूळ तत्त्वज्ञानाचा आविष्कार बहुतेक सर्व संस्कृत-प्राकृत कवींनीं, वेदांत्यांनीं केलेला आहे. हा विषय यापेक्षां जास्त वाढविणें येथें अस्थानीं होईल. म्हणून येथें या विषयास आम्ही विराम देतों. परंतु मोक्ष हा चौथा श्रेष्ठ पुरुषार्थ समजला जात असून त्रिवर्गास तो बाध आणीत नाहीं, येवढें खरें.

**काव्य :** धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांस धरून धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र यांची निर्मिति झाली आणि त्यांत सर्व ठिकाणीं पुरुषार्थ ही कल्पना ग्राह्य धरली आहे, हें आपण पाहिलें. पण जें शास्त्रानें ग्राह्य धरलें तें प्राकृत जनास कसें पचवावें हा पुढचा प्रश्न. सर्वसामान्य माणूस हा शास्त्रविन्मुख असतो. त्यास ही कल्पना कशी शिकवावी हा प्रश्न. त्यास शिक्षण हेंच एकमेव उत्तर आहे. नवीन कल्पना लादण्याचे 'कायदे' किती जरी केले तरी उत्स्फूर्त आचारास मानसिक संस्कृति हीच एक गोष्ट कारणीभूत होत असते हें साधें त्रिकालाबाधित तत्त्वहि हल्लींच्या राज्यकर्त्यांना पुरेंसें आकलन झालें आहे असें दिसत नाहीं. तेव्हां ही गोष्ट शिक्षणसाध्य आहे असें ठरल्यावर 'काव्य' हा जो शिक्षणांतील एक महत्त्वाचा भाग त्यांत ही कल्पना गोवण्यांत आलेली आहे काय हें पाहूं. म. म. पां. वा. काणे यांचा संस्कृत काव्याचा इतिहास ( History of Sanskrit Poetics ) हा ग्रंथ सर्वमान्य आहे. त्यांत पान ३३३ वर काव्यप्रयोजन काय असावें ( Purpose of Poetry ) यासंबंधीं चर्चा आलेली आहे. आनंद हा काव्याचा आत्मा आहे हें सर्वश्रुतच आहे. परंतु चतुर्विध पुरुषार्थांच्या आचारासंबंधीं वैचक्षण्य निर्माण करणें, हा काव्याचा हेतु आहे हें लोकांच्या विशेष परिचयाचें नाहीं. काव्यांत आनंदोत्पत्ति व सौंदर्यप्रसाधन यांशिवाय शिक्षण आणि नीतिविचार ( Instruction ) यावेत किंवा नकोत यांसंबंधीं अलीकडील प्राकृत कवींत मोठी चर्चा आणि मतभेद माजलेले दिसून येतात. परंतु या जुन्या काळीं काव्याचा हा हेतु स्पष्ट होता. लोकांच्या मनाची, विचाराची आणि तद्द्वारा आचाराची पातळी वाढविण्यासाठीं, लोकांस बहुश्रुत करण्यासाठीं, काव्याचा भरपूर उपयोग होत असे. शिवाय हें करतांना त्या काव्याचें सौंदर्य आणि आनंद कधींच लुप्त झालेले नव्हते आणि आजहि नाहींत. परंतु पुरुषार्थ-कल्पना स्पष्टपणें काव्यकारांनीं मांडली

आहे एवढें खरें. एवढेंच नव्हे तर तद्विषयक वैचक्षण्य हा एक स्वतंत्र काव्यहेतु म्हणून त्यांनीं स्पष्ट सांगितलें. भामह लिहितो,

**' धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च ।**
**प्रीतिं करोति कीर्तिं च साधुकाव्यनिबंधनम् ॥**

( Kane, His. San. Poe. ) सत्काव्यनिबंध हा नुसता कीर्ति आणि प्रीति उत्पन्न करतो, एवढेंच नव्हे तर धर्म, अर्थ, काम, मोक्ष आणि कला यांसंबंधीं वैचक्षण्य किंवा विवेचक बुद्धि–चिकित्सक बुद्धीहि निर्माण करतो. किंबहुना, हें शिक्षण हा इतर काव्यहेतूंबरोबरच एक काव्यहेतु आहे, असा स्पष्ट निर्देश येथें येतो. आतां हा हेतु जर काव्यलेखनांत असेल तर तत्कालीन संस्कृत कवींनीं आपल्या काव्यनिबंधनांत काव्यशास्त्रकारांचा हा आदेश अस्तित्वांत आणला काय हें पाहूं. कविकुलगुरु कालिदास हा संस्कृत महाकवि सर्व आबालवृद्धांच्या, आज संस्कृत विद्येच्या ऱ्हास-कालांतहि पूर्ण परिचयाचा आहे. त्याच्या काव्यांत शाकुंतल, विक्रमोर्वशीय आणि मालविकाग्निमित्र हे नाट्यप्रबंध आणि कुमारसंभव व रघुवंश हीं महाकाव्यें सर्वश्रुत आहेत. यांतून कांहीं निवडक संदर्भ खालीं देत आहों. रघुवंशांतील राजांचें वर्णन करतांना कवि लिहितो,

**' शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।**
**वार्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥** रघु.१.८.

या श्लोकांत चतुर्विध पुरुषार्थांना धरून चार आश्रमांचा हे राजे सुयंत्रित आचार करीत असत असा उल्लेख आहे. तेव्हां कालिदासाच्या कालांत चतुर्विध-पुरुषार्थांना धरून आश्रमांचा आचार सर्वमान्य होता आणि तो कदाचित् तत्पूर्वी शेंकडों वर्षें अस्तित्वांत असावा.

**अप्यर्थकामौ तस्यास्तां धर्म एव मनीषिणः ॥** रघु.१.२५.

या श्लोकांत अर्थकामांचें आचरण करतांनासुद्धां धर्म हाच त्या आचाराचा पाया होय असें विद्वान् जाणतात असा उल्लेख येतो.

कुमारसंभव या काव्याच्या दुसऱ्या सर्गांत देव स्वायंभुवाकडे गेलेले आहेत. तेथें स्वायंभुव आत्मस्वरूपाची स्तुति करीत असतांना खालील श्लोक येतो.

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

**त्वामामनंति प्रकृतिं पुरुषार्थप्रवर्तिनीम्।**
**तद्दर्शिनमुदासीनं त्वामेव पुरुषं विदुः।** कुमार.२.१३.

यांत पुरुषार्थ असा स्पष्ट शब्द येतो. हा शब्द पुरुषाच्या ऐहिक पुरुषार्थांना धरूनच वापरला आहे. पुरुषार्थाला प्रेरणा देणारी जी शक्ति ती प्रकृति. तेव्हां, हे परमेश्वरा, तूं प्रत्यक्षच ही प्रकृति आहेस. ही साक्षात् प्रकृति पाहूनहि उदासीन राहाणारा असा तूं, त्या तुलाच पुरुष म्हणून ओळखतात. यांतील परमेश्वरविषयक आध्यात्मिक श्लेष काय आहे याचा विचार येथें कर्तव्य नसून, पुरुषार्थ ही कल्पना मूलभूत आहे, एवढें स्पष्ट झालें म्हणजे पुरे. तिसऱ्या सर्गांत कामदेवाच्या तोंडीं खालील श्लोक येतो.

**कस्यार्थधर्मौ वद पीडयामि**
**सिंधोस्तटावोघ इव प्रवृद्धः॥** कुमार.३.६.

कामदेव म्हणतो, " हे इंद्रा, कोणाचे धर्मार्थ खिळखिळे करूं ? सांग, हे दोन पुरुषार्थ खिळखिळे झाले म्हणजे त्याचा कामपुरुषार्थ कसा ठीक राहील ? यांत अशी सूचना आहे कीं, अर्थ व धर्म हे ठीक राहिले तरच कामहि ठीक राहील. नाहींतर काम-पुरुषार्थहि अव्यवस्थित होऊन मनुष्याचें जीवन उजाड झालेंच पाहिजे. असो.

कालिदासाच्या नाटकांपैकीं लोकमान्य जें शाकुंतल नाटक तें मोठी प्रेमकथा आहे असें नेहमीं शिकविण्यांत येतें. पण याशिवाय शाकुंतल या नाटकांत कालिदासानें एक मोठा सामाजिक प्रश्न विवेचिला आहे. त्याचें कोणी फारसें जोरानें दिग्दर्शन करीत नाहींत. त्या काळीं ‘ गांधर्व विवाह ’ ही प्रचलित पद्धति होती. हल्लीं प्रेमविवाह म्हणतात, त्यालाच आमच्याकडे ‘ गांधर्व ’ ही संज्ञा आहे. या विवाह प्रकारांत धोके कोठें आहेत, त्याचे फायदे काय आहेत, धोके प्राप्त झाले असतांना स्त्रीचें आचरण काय असावें, हा प्रकार करतांना कोणत्या काळज्या अवश्य घ्याव्या इत्यादि या विवाहप्रकारांतील बारीक दोषहि कालिदासानें मोठ्या मार्मिकपणानें नाटकांत रेखाटले आहेत. विवाह हा संततीकरितां असून नुसती वासनाशांति हा विवाहाचा मुख्य विचार असूं नये असें प्रतिपादन कवीनें कित्येक ठिकाणीं केलेलें आढळतें. स्त्रीचा पतिव्रताधर्म, संतातिहीन दांपत्याचें दुःख, प्रेमाचा सात्त्विक परिपाक, गांधर्वविवाहाचे दुष्परिणाम इत्यादि कामपुरुषार्थास धरून कित्येक प्रश्नांचा

ऊहापोह कालिदासाच्या काव्यांत इतस्ततः भरपूर आढळतो. या वर्णनाचा उपयोग योग्य तेथें पुढील ग्रंथांत ते ते विषय प्रतिपादन करतांना आम्ही करूं. सध्यां पुरुषार्थशिक्षण हें जातां जातां कविकुलगुरूनें काव्यांत कसें केलें आहे येवढेंच दाखविण्याचा आमचा हेतु आहे. मागें निर्दिष्ट केल्याप्रमाणें पुरुषार्थचिकित्सा हा काव्याचा जो एक हेतु भामहानें सांगितला, त्याची अंमलबजावणी कशी उत्तम केली आहे आणि उत्तम काव्य हें शिक्षणक्षम कसें होऊं शकतें याचें दिग्दर्शन करण्यासाठींच फक्त येथें कालिदास कवीच्या वाङ्मयाचा किंचित् आस्वाद आम्हीं वाचकांस दिला आहे.

**वैद्यक :** यानंतर लोकांशीं विशेष संबंध येणारें व जेथें लोकशिक्षण होऊं शकतें असें दुसरें महत्त्वाचें शास्त्र म्हणजे वैद्यक. हें शास्त्र आमच्या पूर्वजांनीं मोठ्या परिणतावस्थेस पोहोंचविलें होतें. त्यांत फक्त रोगचिकित्सा हाच भाग होता असें नव्हे तर आरोग्यरक्षण हाहि फार महत्त्वाचा भाग असून केव्हां काय करावें व काय करूं नये याचें आचारविषयक सूक्ष्म मार्गदर्शनहि त्यांच्या तत्कालीन ज्ञानाला धरून केलेलें आहे. अष्टांगहृदय या वैद्यकावरील सर्वमान्य ग्रंथांत असा स्पष्ट इशारा आहे कीं,

**त्रिवर्गशून्यं नारंभ भजेत्तं चाविरोधयन्** । वाग्भट. २०. २. २९

कोणताहि कार्यारंभ त्रिवर्गशून्य म्हणजे धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थांस सोडून असूं नये.

**धर्मार्थकाममोक्षाणां आरोग्यं मूलमुत्तमम्** । चरक. १. १५

आरोग्य हें सर्व पुरुषार्थांचें मूलस्थान आहे. आरोग्यसाधनाशिवाय पुरुषार्थसाधन कसचें ? म्हणून आरोग्यसाधन प्रथम केलें पाहिजे म्हणजे पुरुषार्थसाधन करतां येईल असा ध्वन्यर्थ.

वरील दोन पुरावे वैद्यकशास्त्रांत पुरुषार्थविचार आहे एवढें सिद्ध करण्यास पुरेसे आहेत.

एकंदरींत वरील सर्व चर्चेचा निष्कर्ष असा कीं पुरुषार्थकल्पना ही धर्म, अर्थ, काम व मोक्ष या प्रत्येक पुरुषार्थाला धरून जीं जीं शास्त्रें उदयास आलीं त्या सर्वांस अभिप्रेत व मान्य असून तद्विरुद्ध आचार, नियम वा प्रतिपादन कोणींहि

केलेलें नाहीं. लोकाचारांत लोकशिक्षणानें हें तत्त्व नीट उतरावें यासाठीं महाभारतादि स्मृतिस्वरूप ग्रंथ व भगवद्गीतेसारख्या लोकमान्य ग्रंथांतहि ही कल्पना सोडून कसलाहि उपदेश केलेला नाहीं. शिवाय लोकरंजनास, शिक्षणास आणि लोकाहितास पात्र झालेलें काव्य आणि वैद्यक अशा वाङ्मयांतूहि प्रस्तुत कल्पना किती स्पष्ट, शुद्ध आणि शास्त्र-अविरोधी मांडली आहे; यांचेंहि वर थोडें दिग्दर्शन केलें. यावरून वैदिकांच्या मानवी आयुष्यावरील मूलभूत तत्त्वज्ञानाबद्दलची ही यथायोग्य कल्पना शास्त्रावर घासून, विचारानें पुसून, स्वच्छ करून, सर्वलोकहितार्थ शास्त्रकारांपासून काव्यापर्यंत जणुं कांहीं मोठा कट करून सर्वांनीं एकमुखानें कशी पुरस्कृत केली आहे हें पाहिलें म्हणजे सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञान निर्माण करून तें लोकाचारांत लोकशिक्षणानें आमच्या पूर्वजांनीं कसें आणून ठेवलें आहे याचें आश्चर्य व कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

**धर्मकल्पना :** यानंतर धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचा निश्चित अर्थ काय, त्या सर्वांचा एकमेकांशीं संबंध कसा आहे; आणि या चारांचा समन्वय कसा केलेला आहे यासंबंधीं थोडा विस्तार करणें जरूर आहे. म्हणजे ह्या कल्पनेचें निश्चित स्वरूप लक्षांत येईल. प्रथमतः धर्म हा शब्द अलीकडे ‘ रिलिजन ’ ( Religion ) या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द मानतात ही चूक आहे.

‘ धर्म ’ हा शब्द संस्कृत असून त्याची व्याख्याहि पूर्वजांनीं नीट केलेली आहे. इंग्रजी ‘ रिलिजन ’ हा शब्द त्यांतील सर्व श्लेष दाखविण्यास अपुरा आणि कोता पडतो. पुष्कळ युरोपियन अभ्यासकांचेंहि मत असेंच आहे. धर्म हा शब्द ‘ धृ ’ या धातूपासून निर्माण झाला आहे. वर्णधर्म, स्त्रीधर्म, आश्रमधर्म, राजधर्म इत्यादि आयुष्यांतील निरनिराळ्या अवस्थांना धरून तो वापरण्यांत आणतांना आपण पाहतों. ‘ धृ ’ म्हणजे ‘ धारणा करणें ’ असा याचा अर्थ असून “ **धारणा करतो तो धर्म** ” असा याचा अर्थ होतो. याच्या व्याख्या वेदकालापासून कितीतरी देतां येणें शक्य असलें तरी त्यांत मूलतः फारसा भेद नाहीं. ‘ **धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ।** ’ ही अत्यंत सर्वंकष अशी व्याख्या वेदांतर्गत आहे. याचा अर्थ विश्व हें गतिमान् असून या गतिमान् विश्वाची प्रतिष्ठा करणें, स्थिरीकरण करणें, याचा अर्थ ‘ धर्म ’. यांत ‘ गति ’ किंवा ‘ बदल ’ यांतून स्थिति आणि स्थिरत्व

प्राप्त करून देणारा तो धर्म असा अत्यंत विशाल आणि सर्वसंग्राहक असा अर्थ निष्पन्न होतो. पुढें मानवाचें आयुष्य हें प्रवृत्ति व निवृत्ति या दोहोंचा योग्य मिलाफ असून हा समन्वय नीट साधल्याशिवाय समाधान ही गोष्ट साध्य होणारी नाहीं हें स्पष्ट होत गेलें तसतशी ही सर्वसंग्राहक व्याख्या जास्त स्पष्ट होत गेली आणि

**' यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ।'**

ही व्याख्या पुढें आली. ऐहिक अभ्युदय हा प्रवृत्तीला धरून आणि ' निःश्रेयस्' ही गोष्ट निवृत्तीला धरून सांगितली गेली; आणि प्रवृत्ति-निवृत्तींचा हा समन्वय मनुष्याच्या गतिमान् किंवा बदलणाऱ्या आयुष्यास स्थिर करून समाधान प्राप्त करून घेण्यास एकमेव उपाय आहे असें दिग्दर्शित केलें गेलें. महाभारतकारांनीं ' धर्म ' या शब्दावर निरनिराळ्या अनेक ठिकाणीं संवादात्मक चर्चा केलेली आहे. त्या प्रत्येक चर्चेंत कांहीं उद्‌बोधक भाग आहेत. पण निःसंदिग्ध व पूर्वपरंपरेस अनुसरून त्यांनींहि खालीं दिल्याप्रमाणें व्याख्या दिलेली आहे.

**तस्माद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।**

प्रजांचें धारण करणारा, त्यांना स्थिर स्वरूप प्राप्त करून देणारा, त्यांच्या प्रवृत्ति-निवृत्तिरूप आयुष्याचा समन्वय करणारा तो धर्म असा याचा अर्थ. मग त्यांत लोकांची धारणा होते अशा निरनिराळ्या अवस्था आपोआप उद्‌भवतात. निरनिराळे उद्योग उद्‌भवतात. निरनिराळीं कर्तव्यें पुढें येतात. त्यांत व्यक्तीचें हित आहे. कुटुंबाचा विचार आहे. समाजाची स्थिति आहे. राजाचें राजकारण आहे. ब्राह्मणत्वाचें रक्षण आहे. उच्चनीचतेचे विचार आहेत. समानतेचेहि विचार आहेत. प्रजेच्या हिताचा विचार आहे. क्षत्रियांच्या महत्त्वाकांक्षेचाहि विचार आहे. स्त्री-पुरुषांचे हक्क आहेत आणि कर्तव्येंहि आहेत. तेव्हां अशा सर्व प्रसंगांना आणि अवस्थांना धरून, त्यांत ' धारणा ' उत्पन्न करून, प्रवृत्ति-निवृत्तींचा समन्वय साधून, लोकांचा ऐहिक उत्कर्ष निर्माण करून त्यांना मानसिक समाधानाप्रत पोंचविणारा जो जो उपाय वा आचार; जें जें कर्तव्य वा कर्म, जी जी क्रिया वा बुद्धि या सर्वांस ' धर्म ' या एकाच शब्दांत स्थान प्राप्त झालें. ' धर्म ' या शब्दाचा अर्थ इतका व्यापक असून तो दुसऱ्या कोणत्याहि उचित प्रतिशब्दानें दर्शवितां येणें अशक्य आहे. आतां कल्पना कितीहि व्यापक आणि खोल असली तरी शेवटीं मानवाचें मन हें तिचें स्थान असून तिची प्रचीति किंवा अनुभव हा मानवाच्या क्रियेंत, आचारांत अथवा

वर्तणुकींतच यावयाचा असतो. म्हणूनच क्रिया हीच मानवाचें मन दर्शविणारी एकमेव गोष्ट म्हणून मानली जाते. धर्मदीपिकेंत नेमकी हीच गोष्ट लक्षांत घेऊन 'विहित क्रिया' हा धर्म व 'प्रतिषिद्ध क्रिया' हा अधर्म अशी स्पष्ट कल्पना दिली गेली. वर वर्णन केलेल्या निरनिराळ्या प्रसंगांत वा अवस्थांत मनुष्यास एक मूळ 'धारणा' हा उद्देश लक्षांत घेऊन केलेली ही 'विहित क्रिया' आणि तद्विरुद्ध केलेली 'प्रतिषिद्ध क्रिया' असे दोन मार्ग उत्पन्न होतात. विहित क्रिया धारणसंयुक्त असल्यानें ती धर्म्य व इतर अधर्म्य असा निष्कर्ष निर्माण होतो. हा विहितप्रतिषिद्ध क्रियांचा निष्कर्ष शेवटीं सर्व ठिकाणीं लावावा लागतो. आणि म्हणूनच विहित क्रिया कोणत्या हें स्पष्ट करण्याकरितां निरनिराळीं शास्त्रें निर्माण झालीं. आणि पुराणापासून काव्यापर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं ही विहित क्रिया उदाहरणानें पटविण्याकरितां ग्रंथनिष्पत्ति व वाङ्मयसमृद्धि झाली. या सर्वांत 'विहित क्रिया' स्पष्ट करणें हा एक हेतु निदर्शनास येईल.

**अर्थ :** धर्मानंतर अर्थ-पुरुषार्थ प्रथम येतो. धारणेस प्राधान्यानें ज्या गोष्टींचा विचार व आचार ठरवावा लागतो तो म्हणजे अर्थ.

**'धनमर्थ इति लौकिकजना वदन्ति।'** असा सामान्य अर्थ ज्ञानकोशकार सांगतात. 'अर्थ' या शब्दास निरनिराळे बरेच अर्थ आहेत. मीमांसक 'विधिजन्य-बोध' विषयाला 'अर्थ' संज्ञा देतात. परंतु प्रस्तुत विषयास धरून अर्थ या शब्दाचा धन किंवा द्रव्य असाच अर्थ योग्य आहे. धन, द्रव्य, संपत्ति इत्यादि शब्दांनीं नुसता पैसा असा मात्र बोध घेऊं नये. तेव्हां 'अर्थ' या शब्दानें केवढा बोध निर्माण होतो हें चरकानें 'धनैषणाम्' या शब्दावर भाष्य करतांना दाखवून दिलें आहे. **"कृषिपाशुपाल्यवाणिज्यराजोपसेवादीनि यानि चान्यानि अपि सतां अविगर्हितानि कर्माणि वृत्तिपुष्टिकराणि विद्यात्तानि आरभेत कर्तु, तथा कुर्वन् दीर्घजीवितं जीवति अनवमतः पुरुषः भवति इति।'** (चरक. सू. १०. ५) इत्यादि मनुष्याच्या जीवनार्थ ज्या राजसेवा, वाणिज्य, कृषि, पाशुपाल्य इत्यादि वृत्ति आहेत आणि ज्या सज्जनांकडून निंदित नाहींत अशा वृत्तींतूत अनिंदित मार्गांनीं जो धनलाभ तो सर्व अर्थ या शब्दानें प्रतीत होतो. ह्यासच चरकाचार्य धनैषणा म्हणतात. यावरून अर्थ–पुरुषार्थाचा विचार

करतांना निरनिराळ्या वृत्तींचा विचार व तद्विषयक आचार उत्पन्न होतात. त्या आचारांत अनिंद्य आचार कोणते किंवा विहित क्रियेला धरून धर्म्य आचार कोणते, अथवा समाजहिताला धरून धारणास्वरूप मार्ग कोणते यांचा विचार क्रमप्राप्त होतो. कामशास्त्रकारांनीं अर्थ या शब्दाचें व्यापकत्व यहिपेक्षां चांगलें व थोडक्यांत दिलें आहे.

**' विद्याभूमिहिरण्यपशुधान्यभांडोपस्करमित्रादीनां अर्जनं आर्जितस्य विवर्धनं अर्थः।** ( का. सू. १.२.८ ) या व्याख्येंत भूमि, हिरण्य, पशु, धान्य इत्यादींचा संग्रह झाला यांत विषेश नाहीं. पण विद्या व मित्र या दोन नवीन गोष्टींचा अंतर्भावहि झाला. विद्या ही अर्थ निष्पन्न करणारी गोष्ट आहे व विद्या हें योगक्षेमाचें एक साधन होऊं शकतें. विद्या आणि सन्मित्रलाभ हा पण अर्थार्जनाचा एक चांगला उपाय होऊं शकतो. म्हणून मित्रलाभहि यांत अंतर्भूत केला गेला. यापेक्षां अर्थ शब्दाची व्यापकता जास्त परिणामकारक मांडतां येईल असें दिसत नाहीं. तात्पर्य, सर्व जीवनार्थ व्यवहार व वृत्ति, कीं ज्या योगानें मनुष्यास जीवनयात्रा सुखाची व आनंदित करण्यास मदत होते त्या सर्वांचा संग्रह अर्थ या एका शब्दांत करण्यांत आला. अर्थ या पुरुषार्थानें मानवाचीं ऐहिक यश, कीर्ति, वृत्ति, जीवन-व्यवहार, योगक्षेम आणि धनलाभानें मिळवितां येणारीं सुखें या सर्वांचा परामर्श घेतां येतो.

**अर्थासंबंधीं दोन महत्त्वाचे नियमः**

आतां येथें हें नमूद केलें पाहिजे कीं, हा अर्थ-पुरुषार्थ धर्म्य किंवा विहित क्रियेनेंच प्राप्त होईल तसा करावा असा नियम घालून देण्यांत आला. या अर्थ-निष्पत्तीसंबंधीं विहित क्रिया सांगतांना दोन मुख्य गोष्टी पूर्वाचार्यांनीं स्पष्टपणें मूलभूत नियम म्हणून सांगितल्या आहेत. प्रथमतः वृत्ति ही गोष्ट त्यांनीं विशिष्ट गटांना धरून सांगितली. शिवाय ही वृत्ति शक्य तों परंपरेनें बापापासून मुलास अशी तीच असावी असेंहि प्रतिपादन केलें. वृत्ति याप्रमाणें गटाशीं संबंधित ठेवून ती वंशपरंपरागत त्या गटांत चालू राहावी, अशी व्यवस्था केली. हा मुद्दा जातिसंस्थेच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. येथें त्याचा विशेष विस्तार करणें जरुरीचें नाहीं. वृत्तीबाबत व्यक्तिव्यक्तींची अनिर्बंध स्पर्धा आणि मुलानें कोणती वृत्ति घ्यावी व त्यांत तो कसा प्रगत पावेल

ही बापाची काळजी या गोष्टी मुख्यतः पाश्चिमात्य आहेत हें मागें एकदां दिग्दर्शित केलेंच आहे.

दुसरा महत्त्वाचा अर्थ-पुरुषार्थासंबंधीं नियम असा कीं, हा पुरुषार्थ संपादन करतांना प्रामाणिकपणास बगल द्यावयाची नाहीं. यासंबंधीं जशी गटप्रधान वृत्ति ठेवावयाची ही एक विहितक्रिया तशीच अर्थशौच ही दुसरी अत्यंत महत्त्वाची विहितक्रिया ठरविलेली दिसते.

**सर्वेषामेव शौचानां अर्थशौचं परं स्मृतम् ।**
**योऽर्थे शुचिर्हि स शुचिर्नमृद्वारिशुचिः शुचिः ।** मनु. ५.१०६

सर्व प्रकारच्या पवित्रतेंत अर्थाचें पावित्र्य हें अत्यंत महत्त्वाचें पावित्र्य मानलें गेलें होतें. जो यांत पवित्र तो खरा पवित्र. साधनांनीं-साबण, पावडर, पोशाखा-दिकांनीं--मिळविलेलें पावित्र्य महत्त्वाचें नाहीं असा या श्लोकाचा अभिप्राय हीं दोन तत्त्वें आपल्यांत आलीं तर स्पर्धेचे घातुक परिणाम नाहींसे होऊन शिवाय ' काळा बाजार ', ' नीच व्यापारी वृत्ति ', ' खिसेकापूपणा ', ' लांचलुचपत ' इत्यादि धनलोभाचे प्रकार व समाजहितघातक सर्व कृत्यांना आळा बसून सार्वजनिक संतोषांत भर पडणें शक्य नाहीं काय ? सद्गुणांचे जर व्यक्तिगत व सामाजिक असे दोन भाग केले तर 'प्रामाणिकपणा' वा ' अर्थशौच ' हा मोठा सामाजिक गुण राष्ट्रांत असणें अगत्याचें ठरतें ' दारूबाजी ' इत्यादि व्यक्तिगत दोषांवर राष्ट्राचे पैसे व शक्ति खर्च करण्यापूर्वी राष्ट्रांत जर ' अर्थशौच ' नसेल तर कोणत्याहि राष्ट्रीय योजना यशस्वी होणें कठिण जातें. पाश्चात्य देशांतहि याच राष्ट्रीय सद्गुणावर जास्त भर दिला जातो. हें सर्व माहीत असूनहि आमच्या राजकीय पुढाऱ्यांचें विपरीत धोरण पाहिलें म्हणजे " विनाशकाले विपरीत बुद्धि : " या म्हणीची आठवण होते.

अर्थ-पुरुषार्थाच्या वरील विवेचनांत अर्थ म्हणजे काय, त्याचा धारणारूप धर्माशीं अर्थात् समाजहिताशीं संबंध काय आणि त्यासंबंधीं विहित क्रिया मुख्यतः काय सांगितल्या गेल्या; त्या बुद्धिगम्य आहेत कीं कविकल्पना आहेत, त्यांचे फायदे दृश्य आहेत कीं नाहींत; इत्यादि मूलभूत प्रश्नांची थोडी छाननी या विस्तृत विषयाला धरून योग्य तेवढी केली. आतां काम या त्रिवर्गांतील तिसऱ्या पुरुषार्थाचें दिग्दर्शन करूं.

**काम :** अर्थ व काम हे दोन्ही पुरुषार्थ ऐहिक जीवन आणि समाधान या दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाचे आहेत. यांच्या योग्य सेवनानें जीवनांतील आनंद वाढीस लागतो तर यांच्या अतिमात्र सेवनानें मनुष्य अधोगतीस लागतो. याच्या योग्य व अतिमात्र यांतील मर्यादा काय हें पुढें प्रसंगानें पाहूं. 'काम' हा शब्दहि परत इंग्रजींत जसाच्या तसा भाषांतरित करतां येणार नाहीं. 'सेक्स' या इंग्रजी शब्दानें त्यांतील कांहीं भागाचा निर्देश होतो येवढेंच. सेक्स हा शब्द लिंगवाचक असून काम हा शब्द मनाची भावना व ठेवणहि सूचित करतो. काम हा शब्द सामान्यतः इच्छा, वासना व कामना या अर्थीं वापरण्यांत येतो. इंग्रजींत सामान्यतः Desire, wish, passion या शब्दांनीं काम शब्दाचा अर्थ दर्शविला जातो. उदाहरणार्थ, **"मनसा हि कामान् कामयते।"** वगैरे सर्व ठिकाणीं काम म्हणजे वासना, कामना (desire) या अर्थीं काम शब्दाची योजना आहे. खालील उताऱ्यांत तर काम हाच मनुष्याच्या वासनांचें अधिष्ठान असून तोच सर्व कर्में करून घेतो असा उल्लेख आहे.

काम हा शब्द ऋग्वेदकालीन आहे. नासदीयसूक्त हें ऋग्वेदांतील अतिप्राचीन काळीं रचलेलें सूक्त असून त्यांत हा शब्द येतो. याचा वर्णनकर्ता परमेष्ठी प्रजापति हा ऋषि समजतात. हा द्रष्टा केव्हां होऊन गेला, कोठें होऊन गेला याबद्दल कांहींहि सांगतां येण्यासारखें नाहीं. या नासदीयसूक्तावर श्री. अहिताग्नि राजवाडे यांनीं 'नासदीयसूक्त भाष्य' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या मताप्रमाणें या सूक्ताला 'नासदीयसूक्त' असें न म्हणतां 'कामसूक्त' असें म्हणणें योग्य होईल. नासदीयसूक्त हें नांव फक्त सूक्ताच्या आरंभीच्या '**नासदासीन्नोसदासीन्**' या शब्दावरून प्रचलित झालेलें आहे. पण सूक्तांतील मुख्य विषयाकडे पाहतां तें कामसूक्त आहे यांत संशय नाहीं. या सूक्तांत–

**"कामस्तदग्रे समवर्तताधिमनसो रेतः प्रथमं यदासीत्।**
**सतो बंधुमसति निरविंदन् हृदि प्रतिष्या कवयो मनीषा।"**

(राजवाडे ना. सू. भा.)

"जें मनाचें रेत प्रथमपासूनच त्या ठिकाणीं होतें त्या रेतीचें ठायीं जगताच्या आरंभीं प्रथम काम प्रस्फुट झाला." याप्रमाणें या ऋचेचा अर्थ ते कामशास्त्राला धरून लावतात. बाकी द्वैताद्वैती अर्थ कामशास्त्राप्रमाणें लावला पाहिजे असा श्री. राजवाडे यांचा निष्कर्ष. कामसूत्रांत तरी काम या शब्दाचा अर्थ काय निश्चित लावतात हें पुढील प्रकरणांत येईलच.

# प्रकरण १ लें

## वात्स्यायनीय कामसूत्र

**पूर्वाचार्य–वात्स्यायनाचा काल-वात्स्यायनाची कांहीं माहिती – या शास्त्राचें प्रयोजन–वात्स्यायनाचा ग्रंथ शास्त्रीय–ग्रंथाचें सिंहावलोकन–त्रिवर्गसाधन हाच उद्देश–कामपुरुषार्थ व विषयवासना–काम शब्दाची व्याख्या–विवाहविधि व काव्य यांतील कामासंबंधीं कांहीं संदर्भ.**

**पूर्वाचार्य :** वात्स्यायनीय कामसूत्र हा ग्रंथ जरी कामशास्त्रावरील प्रमुख ग्रंथ समजला जात असला, तरी त्यापूर्वी या विषयावर पुष्कळ ग्रंथसंपत्ति अस्तित्वांत होती. प्रत्यक्ष वात्स्यायनांनींच महादेवानुचर नंदी हा कामशास्त्राचा प्रणेता होय, असें म्हटलें आहे. नंदीचें कामशास्त्र सहस्र अध्ययांचें विस्तृत होतें. धर्मशास्त्राचा प्रणेता मनु, अर्थशास्त्राचा प्रणेता बृहस्पति, त्याप्रमाणें कामशास्त्राचा प्रणेता नंदी. या विस्तृत ग्रंथाचा संक्षेप उद्दालकाचा पुत्र औद्दालकि श्वेतकेतु यानें केलेला दिसतो.

या श्वेतकेतूच्या ग्रंथाचा बाभ्रव्य पांचाल नामक ग्रंथकारानें पुनः संक्षेप करून सात अधिकरणांत सबंध कामशास्त्र आणलें. याशिवाय दत्तकाचार्यांचें ‘ वैशिक ’, चारायणाचार्यांचें ‘ साधारण अधिकरण ’, सुवर्णनाभाचें ‘ सांप्रयोगिक ’, घोटकमुखाचें ‘ कन्यासंप्रयुक्त ’, गोनर्दीयाचें ‘ भार्याधिकारिक ’, गोणिकापुत्राचें ‘ पारदारिक ’, कुचुमाराचें ‘ औपनिषदिक ’ याप्रमाणें निरनिराळ्या आचार्यांचे कामशास्त्राच्या विविध अंगोपांगांवर विस्तृत ग्रंथ होते, परंतु बाभ्रव्याचा ग्रंथविस्तार मोठा व दुःसाध्य असल्यानें, आणि दत्तकाचार्यादींची ग्रंथरचना फक्त कामशास्त्रांतील कांहीं उपांगां-

संबंधींच असल्यानें, या सर्व उपांगांचा सारांश, सूत्ररूपानें एकत्र करून समग्र कामशास्त्र लिहिणें जरूर होतें व हेंच वात्स्यायनानें केलें. हा समग्र ग्रंथाचा सूत्रमय संक्षेप इतका चांगला झाला कीं या ग्रंथानंतर इतर सर्व ग्रंथ आपोआप मागें पडून 'वात्स्यायनीय कामसूत्र' एवढाच ग्रंथ कालाच्या ओघांत अध्ययनांत टिकला व त्याची कीर्ति जगभर झाली.

**वात्स्यायनाचा काल :** उपरिनिर्दिष्ट पूर्वाचार्यांपैकीं कोणाची कांहीं जास्त माहिती प्रत्यक्ष कामसूत्रांत नाहीं. इतर वाङ्मयीन व ऐतिहासिक पुरावे उपलब्ध होऊन जर या वात्स्यायनपूर्व कालखंडावर जास्त प्रकाश टाकतां आला तर प्रस्तुत शास्त्राचा इतिहास व उत्क्रांति यांसंबंधीं जास्त बोध होईल हें खरें. त्या दृष्टीनें जे कांहीं थोडे पुरावे उपलब्ध असलेले दिसतात त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन करणें जरूर आहे.

श्वेतकेतूचा प्रत्यक्ष कामसूत्रांत दोन तीन वेळां नामनिर्देश झालेला दिसतो. प्रथमतः यानें ५०० अध्यायांत कामशास्त्राचा संक्षेप केला असा निर्देश असून त्यांत 'औद्दालकि श्वेतकेतु' असें त्याचें नांव दिलेलें आहे. त्यावरून हा उद्दालकाचा पुत्र होता असें स्पष्टच होतें.

यशोधरानें टीकेंत ( का. सू. १.१.९ ) एक श्लोक **'तथा च उक्तम्।'** म्हणून उद्धृत केलेला आहे. हा श्लोक कोठून घेतला असेल तो असो, पण टीकाकारांच्या कालीं हा श्लोक चांगला माहीत असावा. या श्लोकावरून ब्राह्मण जातींत मद्यपाननिवृत्ति व परस्त्रीगमननिवृत्ति या दोन्ही सुधारणा, या देशांत या औद्दालकि ऋषीपासून अस्तित्वांत आल्या असा त्याचा अर्थ आहे. यावरून औद्दालकि श्वेतकेतु हा भारतांतील पहिला खरा समाजसुधारक धरला जाणें शक्य आहे. लैंगिक नीति-आचारांत परदारागमन हें भारतियांनीं फार मोठें पाप म्हणून मानलें असून व्यभिचारास शिक्षाहि मोठी दिलेली आहे. वात्स्यायनीय कामसूत्रांत पंचमाधिकरण 'पारदारिकम्' या नांवाचें असून त्या सर्व प्रकरणाचा हेतु सूत्रकारांनीं शेवटीं अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगितला आहे.

**'धर्मार्थयोश्च वैलोम्यान्नाचरेत् पारदारिकम्।'** का. सू. ५.६.४७.

( धर्म व अर्थ हे दोन्ही पुरुषार्थ यामुळें लुप्त होण्याची शक्यता असल्यानें परदारागमन करूं नये. ) परंतु 'पारदारिक' हें सर्व प्रकरण प्रत्यक्ष विस्तृत तऱ्हेनें सांगण्याचें प्रयोजन एवढेंच कीं जगांत प्रत्यक्ष काय घडतें व ते कां घडतें याचा विचार जर प्रत्येकास नीट समजला तर स्वतःची स्त्री तरी त्यास या आपत्तींतून वांचावितां यावी.

'**तदेतद्दारगुप्त्यर्थं आरब्धं श्रेयसे नृणाम्।**' का. सू. ५.६.४८. प्रत्येकाला समाजांतील या प्रकारच्या प्रसंगापासून स्वभार्यासंरक्षण करतां यावें, कीं ज्यायोगानें समाजहित साध्य होऊं शकेल. म्हणूनच या प्रकरणांत याचें विस्तृत वर्णन आहे. त्याचें आचरण करावें म्हणून नव्हे असें स्पष्टपणें शास्त्रकारांनीं सांगितलें आहे.

श्वेतकेतूचा या प्रकरणांतहि एकदां उल्लेख आलेला आहे. परंतु जुन्या वाङ्मयांत श्वेतकतूचा उल्लेख प्रथम छांदोग्य व बृहदारण्यक या दोन उपनिषदांत दिसतो. 'छांदोग्य' उपनिषदांत सहाव्या अध्यायांत श्वेतकतूचा थोडा इतिहास आहे. अरुण ऋषींचा पुत्र उद्दालक आरुणि व पौत्र औद्दालिक आरुणेय. '**आरुणि उद्दालकः**' ( छांदोग्य अ. ५.११.२. ) असा स्पष्ट निर्देश छांदोग्यांतच येतो. या औद्दालकि आरुणेयासच श्वेतकेतु असें म्हटलेलें दिसतें.

श्वेतकेतूला त्याच्या वडिलांनीं "ब्रह्मचर्याचें सेवन कर व विद्यावान् हो. आमच्या कुलांत कोणी ब्रह्मबंधु होत नाहींत." असा उपदेश केला तेव्हां श्वेतकेतु बारा वर्षांचा असतांना गुरुगृहीं जाऊन चोवीस वर्षांचा होईपर्यंत त्यानें विद्याग्रहण केलें. बारा वर्षें शिकून विद्वान् झाल्याकारणानें त्यास मोठा ताठा उत्पन्न झाला. आपणांस तो फारच मोठा समजूं लागला. त्याचा स्वभाव अनम्र झाला. तेव्हां त्याच्या पित्यानें त्याला पुस्तकी ज्ञानापलीकडील स्वतःचें अनुभवजन्य ज्ञान देण्यास सुरुवात करून त्यास आत्मज्ञानाचा उपदेश दिला. एकदां कांहीं ब्राह्मण श्वेतकेतूकडे आत्मज्ञानाचा उपदेश घेण्याकरितां आले, परंतु त्यांना सर्व सांगण्याची त्याची इच्छा नसल्यानें श्वेतकेतूनें त्यांस केकय अश्वपतीकडे नेलें. तेव्हां अश्वपतीनें त्यांस प्रथम असें सांगितलें कीं "माझ्या देशांत चोर नाहीं, अदाता नाहीं, मद्यपी नाहीं आणि परस्त्रीगमन करणाराहि नाहीं." ( छांदोग्य. ५.११.४७. )

यावरून मद्यपाननिवृत्ति व परभार्यागमननिवृत्ति या गोष्टींवर श्वेतकेतूच्या कालांत भर दिला गेला होता असें दिसतें. बृहदारण्यकोपनिषदांत ( बृ. ६.२ ) हा

पांचालांच्या परिषदेंत श्वेतकेतु प्रविष्ट झाल्याचें वर्णन आहे. तेथें प्रवाहण जैवलि नांवाच्या पांचाल राजाकडे तो गेला असतांना, राजानें त्यास कांहीं प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरें श्वेतकेतूस देतां आलीं नाहींत. तेव्हां श्वेतकेतु पराभूत होऊन तेथून निघून गेला व एका यःकश्चित् राजन्यानें एवढ्या विद्वान् ब्राह्मणाचा पराभव करावा हा त्यास फार मोठा अपमान वाटला. श्वेतकेतूच्या पित्यासहि त्या प्रश्नांचीं उत्तरें माहीत नव्हतीं म्हणून श्वेतकेतूचा पिता प्रत्यक्ष शिष्यभावानें प्रवाहण जैवलीकडे येऊन तें ज्ञान प्राप्त करून घेता झाला. या वेळीं जैवलि त्यास म्हणतो, " पूर्वी कोणत्याहि ब्राह्मणास ही विद्या अवगत नव्हती हें तूं जाणतोसच. " यावरून ब्राह्मण-क्षत्रियांतहि विद्येची केवढी अहमहमिका होती हें दिसून येतें.

येथें श्वेतकेतूच्या पित्यास गौतम ही संज्ञा आहे. म्हणजे उद्दालक आरुणीस गौतम हें नांवहि असलेलें दिसतें. आतां हा गौतम न्यायसूत्रांचा कर्ता आहे कीं काय न कळे ! असो; याच अध्यायांत चवथ्या ब्राह्मणांत वीर, पंडित, विद्वान् आणि उत्तम गुणी पुत्र व्हावा अशी इच्छा असल्यास काय करावें याचा उपदेश आहे. हें सुप्रजाजननशास्त्राचें बीज मानतां येईल. येथें परत उद्दालक आरुणीचा नामनिर्देश येतो. येथेंच ज्याच्या पत्नीस जाराचा उपद्रव असेल त्यासंबंधीं कर्म येतें. याप्रमाणें श्वेतकेतूचा उपनिषदांत उल्लेख येतो. परंतु महाभारतांत ( म. भा. आदि १२२ ) यापेक्षां जास्त स्पष्ट उल्लेख असा दिसतो कीं, या श्वेतकेतूनेंच प्रथम लैंगिक संबंधांत कांहीं नीतिबंधनें उत्पन्न केलीं आणि विवाहसंस्था जास्त दृढ पायावर उभी केली. यापूर्वी लैंगिक संबंधांत फारशीं नीतिबंधनें नव्हतीं, असा कांहींचा तर्क आहे. परंतु यास फार बळकट पुरावा दिसत नाही.

एकंदरींत प्रवाहण जैवलीपासून उद्दालक जें कांहीं शिकला तें पुढें श्वेतकेतूनें वाढविलेलें दिसतें. एवढें समजण्यास हरकत दिसत नाहीं कीं उद्दालक व औद्दालकि श्वेतकेतु हे ऐतिहासिक पुरुष असून त्यांनीं सुप्रजा, लैंगिक संबंधांतील नीतिमत्ता, विशेषतः परदारागमननिषेध आणि विवाहसंस्था दृढतर करण्याच्या खटपटींत बरीच मेहनत घेतलेली असून श्वेतकेतूनें हा विषय वाढवून त्याचें कांहीं शास्त्र लिहिलेलें होतें.

यानंतर महत्त्वाचा मुद्दा असा कीं ह्या गोष्टी पांचाल देशांत घडल्या. पांचाल देश कामशास्त्राच्या प्रगतीला बऱ्याच अंशानें कारणीभूत झालेला दिसतो. ' कुरु-पांचाल ' असा शब्दप्रयोग पुष्कळ ठिकाणीं येतो. तेव्हां या देशांचें साहचर्य दिसतें.

द्रौपदी ही पांचालीच होती. शिखंडी हा पांचालांतीलच होता. बहुपतिकत्वाची पद्धति पांचालांत होती.

वात्स्यायनानें श्वेतकेतूनंतर ज्या बाभ्रव्याचें नांव पूर्वाचार्यांत दिलें आहे, तो बाभ्रव्य पांचालच होता. त्यानेंच श्वेतकेतूच्या मोठ्या विस्तृत ग्रंथाचा संक्षेप केला आणि वात्स्यायनानें आपला ग्रंथ तयार करतांना या बाभ्रव्य पांचालाच्या ग्रंथाचा पुष्कळच उपयोग केला. श्वेतकेतूचा ग्रंथ वात्स्यायनाच्या कालांतहि अस्तित्वांत नव्हता असें दिसतें. पण बाभ्रव्य पांचालाचा ग्रंथ उपलब्ध होता असा तर्क करण्यास जागा आहे. पांचाल देशांत कामशास्त्राला 'चतुःषष्ठि' (का. सू. २.२.२-३) असेंहि नामाभिधान होतें. स्त्री-पुरुषसहवासप्रकार चौसष्ट सांगण्यांत येतात. ऋग्वेदांतील ऋचा प्रत्येकीं ८ अध्यायांप्रमाणें ८ अष्टकांत विभागल्या गेल्या असल्यानें, ६४ ह्या ऋग्वेदीय आंकड्यांशीं साम्य दाखविण्याकरितां, कामशास्त्रासहि 'चतुःषष्ठि' असें नामाभिधान प्राप्त झालें. तात्पर्य, पांचाल देश वेदविद्या व कामशास्त्र यांच्या प्रगतीस बराच कारणीभूत झालेला दिसतो. परंतु, प्रत्यक्ष वात्स्यायनाच्या कालखंडांत पांचाल देश व समाज फार महत्त्वाचा असावा असें दिसत नाहीं. कारण तेथील लैंगिक व्यवहारांचें, तो इतर प्रांतांतील वर्णनें देतो त्याप्रमाणें वर्णन देत नाहीं. ( Chakaldar p. 41 )

श्वेतकेतु व बाभ्रव्य यांनंतरच्या आचार्यांसंबंधीं कांहीं त्रोटक महिती लागते. पाटलीपुत्र अथवा पाटणा शहरांतील वेश्यांच्या प्रत्यक्ष व्यवहारांचें अवलोकन करून यावर प्रमाणभूत ग्रंथ लिहिणारे दत्तकाचार्य इसवी सनापूर्वीचे असावे व हा ग्रंथ आठव्या शतकांतहि उपयोगांत असावा असा तर्क चालतो. ( Chakaldar. P. 16 ) गोनर्दीयाचा निर्देश कुमारसंभव व रघुवंश या दोन्ही काव्यांवरील मल्लीनाथाच्या टीकेंत येऊन गेलेला आढळतो. घोटकमुख व चारायण यांच्या नांवांचा उल्लेख कौटिलीय अर्थशास्त्रांत येतो. वात्स्यायनांतील व्यक्ति त्याच असल्यास या व्यक्ति इसवी सनापूर्वी चौथ्या शतकाच्या पूर्वीच्या ठरतात.

**वात्स्यायनाची कांहीं माहिती :**

आतां प्रस्तुत शास्त्रकर्ता वात्स्यायन यासंबंधीं काय माहिती आहे ती पाहूं. प्रथमतः वात्स्यायन हें गोत्रनांव असावें असें दिसतें. वात्स्यायनाचें खरें नांव 'मल्लनाग' असें होतें असें सुबंधूच्या निर्देशावरून दिसून येतें.

यशोधराच्या टीकेंतहि '**आचार्यमल्लनागः शास्त्रमिदं प्रणीतवान् ।**' असाच उल्लेख येतो. यावरूनहि वात्स्यायनाचें नांव मल्लनाग होतें हें सिद्ध होतें. यानंतर संस्कृत वाङ्मयांत मुख्यतः वात्स्यायन गोत्रनांव असलेल्या दोन व्यक्ति दिसतात. न्यायसूत्रावरील विख्यात भाष्यकार हा एक 'वात्स्यायन' आणि प्रस्तुत शास्त्राचा लेखक हा दुसरा वात्स्यायन; या दोन व्यक्ति नसून हे दोनहि ग्रंथ एकाच व्यक्तीचे असावेत असा तर्क करण्यास फारशी जागा नाहीं. शिवाय कादंबरीचा लेखक प्रसिद्ध बाणभट्ट ही तिसरी व्यक्ति वात्स्यायनगोत्रांतीलच होती असें दिसतें. न्याय-सूत्राचा भाष्यकार वात्स्यायन याचा कालनिर्णय करतांना निरनिराळ्या अभ्यासकांनीं त्याला इ. सनापूर्वी २०० वर्षांपासून इ. स. ७०० पर्यंत खेंचीत नेलें आहे. ( गौ. न्या. सू. प्रस्तावना p. VIII )

डॉ. विद्याभूषण यांनीं याविषयीं सखोल विवेचन करून असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे कीं न्यायसूत्र इ. सनापूर्वी ६०० वर्षें अस्तित्वांत असावें व वात्स्यायनाचें सूत्रभाष्य इ. स. ४०० मधील असावें. हें खरें असल्यास कामसूत्रकार व न्यायभाष्यकार वात्स्यायन जवळजवळ समकालीन होतात. परंतु या दोन ग्रंथांतील भाषाभिन्नत्वहि या दोन व्यक्ति एक असाव्यात असें म्हणण्यास बाध उत्पन्न करतें. तात्पर्य, या दोन व्यक्ति एक नव्हेत हेंच जास्त खरें. वात्स्याय-नाच्या कालनिर्णयास त्याच्या ग्रंथांतील व इतर संस्कृत वाङ्मयांत बराच पुरावा आढळतो. कालिदास हा प्रख्यात कवि कामशास्त्राचा चांगला जाणता होता, किंबहुना कालिदासाबाबत बोलणें झाल्यास हा कवि तत्कालीन सर्व विद्या, कला आणि लोकाचार जाणत असावा हें सहज दिसतें. कालिदासाच्या शाकुंतल या विख्यात नाटकांतील एक श्लोक '**शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने ।**" इत्यादि पाहिल्यास कामसूत्रांतील कांहीं सूत्रें जणुं एकत्र करून श्लोकबद्ध केल्यासारखीं दिसतात. '**परिजने दाक्षिण्यम् ।**' (का. सू. ४.१.३८,३९) 'नोकराचाकरांशीं दाक्षिण्यानें वाग' हेंच सूत्र श्लोकांत बसवतांना कालिदासानें फक्त '**भव दक्षिणा परिजने**' अशी शब्दांची उलटापालट केलेली दिसते. '**भोगेष्व-नुत्सेकः** हें सूत्र '**भाग्येष्वनुत्सेकिनी**' असें श्लोकांत घालून दिलेलें दिसतें. याचा अर्थ कालिदासापाशीं शब्द-संपत्ति थोडी होती असा नव्हे. शिवाय कालिदासानें आपल्या सर्व काव्यांत कामशास्त्रीय सिद्धान्तांचा भरपूर उपयोग केलेला दिसून येतो. कालिदासाचा काल साधारणतः चंद्रगुप्त विक्रमादित्याचा किंवा पांचव्या

शतकाच्या सुरवातीचा काल समजतात. सुबंधूच्या 'वासवदत्ता' मध्येंहि वात्स्यायनाचा निर्देश आहे. तेव्हां वात्स्यायन यांच्या पूर्वींचा आहे हें उघडच होतें.

वात्स्यायनानें स्वतःच्या ग्रंथांत पुष्कळ वेळां त्याच्या पूर्वींच्या ग्रंथकारांचा उल्लेख केलेला आढळतो. कामसूत्र आणि आपस्तंभ कल्पसूत्र यांत कांहीं ठिकाणीं फार मोठी एकवाक्यता दिसते. ( Chakaldar p. 18 ) कौटिलीय अर्थशास्त्रांतील कांहीं उतारे कामशास्त्रांत दिसतात. कौटिलीय अर्थशास्त्राचा काल साधारण इ. सनापूर्वी ३०० असावा, असें समजण्यांत येतें. पतंजलीच्या महाभाष्याचाहि कामसूत्रांत उल्लेख दिसतो. श्री. चकलदार यांनीं हा सर्व पुरावा एकत्र करून शिवाय त्यांत ऐतिहासिक पुराव्याची भर घातली आहे. कामसूत्रांतच '**ईश्वरकामितं**' ( सत्ताधाऱ्यांची भोगतृष्णा ) या सदराखालीं नाना प्रांतांच्या राजांच्या लैंगिक संबंधांचा अहवाल येतो. त्यांत आंध्रांचा उल्लेख विशेष आहे. शिवाय अवंती, अपरांतक, सौराष्ट्रक इत्यादि आहेतच. या सर्व पुराव्यावरून असा तर्क करणें शक्य दिसतें कीं, वात्स्यायनाचा काल साधारण इ. सनाच्या तिसऱ्या शतकांत असावा. इतर निरनिराळ्या लेखकांनीं हा काल जरी इसवी सनापूर्वी २०० वर्षांपासून इ. स. ५०० पर्यंत असे वेगवेगळे तर्क केले असले तरी सर्व सयुक्तिक कारणें श्री. चकलदार यांचाच तर्क जास्त बरोबर असल्याचें सुचवितात.

येथें ऐतिहासिक पुराव्यांत आयुर्वेदीय ग्रंथाच्या पुराव्याची थोडी भर घातल्यास बरें होईल. आयुर्वेदाचें संस्कृत वाङ्मयांत मोठें विपुल अंग आहे. चरकादि ग्रंथांचें भारतीय सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीनें एकदां परीक्षण होणें अत्यंत अगत्याचें आहे. 'वाजीकरण' हें अष्टांग आयुर्वेदांतील एक प्रधान अंग आहे. कामसूत्रकाराच्या 'औपनिषदिक' नांवाच्या सप्तमाधिकारणांत वाजीकरणावर 'वृष्ययोगाः' या सदराखालीं औषधें इत्यादींचें वर्णन दिलें आहे. 'उपनिषद्' म्हणजे 'रहस्य' आणि या अधिकरणांत गुप्त विद्यांचें एकत्रीकरण असल्यानें त्यास 'औपनिषदिकम्' असें नांव प्राप्त झालें आहे. 'वृष्ययोग' हा प्रयोगहि आयुर्वेदांतीलच असून आयुर्वेदादि विद्यातंत्रांतून हे योग घेतलेले आहेत असा उल्लेखहि आहे. ( का. सू. ७.१.४८ ). वाग्भटांत खालील श्लोक येतो,

**आचरेच्च सकलां रतिचर्यां । कामशास्त्रविहितामनवद्याम् ॥**
**देशकालबलशक्त्यनुरोधात् । वैद्यतंत्रसमयोक्त्यविरुद्धाम् ॥**

( वाग्भट ४०.४१ )

" कामशास्त्राला धरून सर्व रतिचर्येचें सेवन देश, काल व बल यांचा विचार करून करावें. मात्र वैद्यतंत्राशीं त्याचा अविरोध असावा. " हा उल्लेख वात्स्यायनीय कामसूत्रास धरून असावा असें दिसतें. शिवाय पुरुषाच्या वाजीकरणास कोणत्या प्रकारची स्त्री योग्य याचा विचार करतांना **'कांतानुवृत्तिव्रतदीक्षिता या '** (वाग्भट. उ. ४०.३९) असा उल्लेख येतो. कामसूत्रांतील 'वैशिक ' नांवाच्या सहाव्या अधिकरणांत ' कांतानुवृत्तम् ' या नांवाचा सबंध दुसरा अध्याय येतो. ' वैशिक ' हें प्रकरण वेश्यांसंबंधीं विचार करण्याकरितां कामसूत्रांत आलें. त्यांत कांहीं स्त्रिया एकदां एकाबरोबर राहिल्या म्हणजे त्याच्याशीं पतिव्रताधर्मानें, निष्ठेनें, विवाहित स्त्रीसारख्या राहात असत. त्यांना उद्देशून ' कांतानुवृत्त ' हें प्रकरण आहे. यांत ' कांता ' या स्त्रीस जो आचार आहे त्यावरून अशी स्त्री कोणत्याहि पुरुषास खुश केल्याशिवाय राहणारच नाहीं हें खरें. या अध्यायास धरूनच वाग्भटानें ' कांतानुवृत्तिव्रत ' जिनें घेतलेलें आहे अशी स्त्री असा उल्लेख केलेला दिसतो. डॉ. गर्दे यांच्या मतानें वाग्भट हा ' ४ थ्या शतकाहून फारसा अलीकडचा नसावा.' ( गर्दे वाग्भट—प्रस्तावना पृ. ३१ ). ज्या अर्थी कामशास्त्राचा योग्य उल्लेख यांत आहे त्या अर्थी वाग्भटाच्या कालांत कामसूत्र हा सर्वमान्य ग्रंथ असला पाहिजे. तेव्हां वात्स्यायन इ. सनाच्या तिसऱ्या शतकांतील असावा या म्हणण्यास पुरावा होतो. शिवाय आयुर्वेदाचा जो मूळ ग्रंथ ' चरक ' त्यांत ' वाजीकरण ' या भागांत कामशास्त्राचा असा उल्लेख नाहीं. चरकाच्या चिकित्सास्थानांत सबंध दुसऱ्या अध्यायाचे चारहि ' पाद ' वाजीकरणास दिलेले असून त्यांतील पहिल्याच पादांत

**' या वश्या शिक्षिता या च सा स्त्री वृष्यतमा मता ।'** च. चि. २.१.८

( जी स्त्री पुरुषास वश झाली व शिक्षित आहे ती स्त्री पुरुषास बलसंवर्धनास चांगली. ) यावरून चरककालीं स्त्रीशिक्षण होतें हें खरें. पण चक्रपाणिदत्त या चरकाच्या टीकाकारानें शिक्षिता याचा निराळा अर्थ दिला आहे.

**" शिक्षितेति कामशास्त्रोक्तगीतवादित्रलास्यादिचतुःषष्टिकलाशिक्षिता । "** ( च. टी. पृ. ८४० ) ( शिकलेली म्हणजे कामशास्त्रांतील गीत, वाद्य व इतर ' चतुःषष्टि ' कला येणारी ) चक्रपाणिदत्ताच्या वरील टीकेवरून त्याच्या कालींहि ' कामशास्त्र ' उत्तम तऱ्हेनें अस्तित्वांत होतें असें दिसतें. परंतु चरकाच्या कालींहि कामशास्त्राचें शिक्षण अस्तित्वांत होतें हें सिद्ध होतें. कनिष्क

राजाचा चरक हा दरबारी वैद्य होता, असें म्हणतात. म्हणजे त्याचा काल इ. सनाच्या सुरवातीस जातो. चक्रपाणिदत्ताचा काल इ. स. ११ वें शतक समजला जातो. हा बंगाली विद्वान् होता. यावरूनहि चरकाच्या कालांतहि कांहीं 'कामशास्त्र' अस्तित्वांत होतें; पण तें वात्स्यायनाचेंच कीं काय हें सांगणें कठिण आहे. कदाचित् वात्स्यायनपूर्व आचार्यांपैकीं कोणाचे ग्रंथ असावेत असा तर्क जास्त बरोबर ठरेल.

वात्स्यायन स्वतः ब्रह्मचारी वृत्तीचा आणि योगी असावा असें त्याच्या शेवटच्या श्लोकावरून म्हणतां येतें. त्याच्या नांवापलीकडे त्याच्या गांवाची वा इतर माहिती उपलब्ध होत नाहीं. एक गोष्ट खरी कीं त्याचा संबंध पुष्कळसा पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानशीं असावा. अवंति, माळवा, अपरांत, सौराष्ट्र, महाराष्ट्र आणि आंध्र या सर्व देशांचे व्यवहार तो चांगले जाणत असावा. 'नागरकवृत्त' या प्रकरणांत शहरांतील श्रीमंत वर्गाचें वर्णन येतें. पण 'नागर' म्हणजे कोणतेंहि नगर कां विशिष्ट 'नागर' नांवाचें शहर, यासंबंधीं वाद आहे. जयपूर संस्थानांत 'नागर' या जुन्या शहराचे अवशेष आजहि पसरलेले आहेत. तर यशोधराच्या मतें नागर हा शब्द पाटलिपुत्रास धरून आहे. तात्पर्य, वात्स्यायनाचें स्थळ कोठेंतरी पश्चिम वा दक्षिण हिंदुस्थानांत असावें असा तर्क आहे.

येथें एक गोष्ट नमूद केली पाहिजे कीं वात्स्यायनाचा कालखंड हा हिंदुस्थानांतील विद्या व कलांच्या भरभराटीचा काल होता. कामशास्त्रावरून हा काल फक्त रंगेलपणाचा होता व लोक दुसरें कांहींच करीत नव्हते असा समज कोणीं करून घेऊं नये. उत्तम व संपूर्ण मानसिक तृतीचें आयुष्य कसें घालवावें यासंबंधीं सर्व विद्यांचा विकास व उपयोग होत होता. तत्कालीन समाजरचना वर्णाश्रमावरच अधिष्ठित होती. हिंदुधर्मशास्त्राचा पगडा सर्वत्र सारखा दिसून येत होता. काव्य, शास्त्र, कला इत्यादींची जोपासना चालली होती. तत्त्वज्ञानाचा विचारहि चालू होता. व्यापार, धंदे जोरदार स्थितींत होते. अशा स्थितींत मनुष्याच्या सर्व मूलभूत गरजा व त्यांची तृप्ति कशी घडवतां येईल याकरितां जे जे विचार झाले त्यांत 'कामशास्त्र' हा एक महत्त्वाचा भाग येतो.

**या शास्त्राचें प्रयोजन :** यानंतर या शास्त्राचें प्रयोजन काय असा प्रश्न उत्पन्न होतो. वात्स्यायनांनींच त्याचें समर्पक उत्तरहि दिलेलें आहे. धर्म व अर्थ या दोन्ही गोष्टींचें ज्ञानपूर्वक आचरण केलें असतांनाच इष्टफलप्राप्ति होण्याची शक्यता असल्यानें

धर्मार्थांवर शास्त्रें झालीं हें यथायोग्यच झालें. पण ज्या गोष्टी केवळ ईश्वरदत्त अंतःप्रेरणेमुळें पशुपक्ष्यांपासून सर्व प्राणीमात्रांत सहजगत्या घडतांना आढळून येतात, त्याचें शास्त्र कसलें ? या प्रश्नाचें उत्तरहि फार समर्पक दिलें गेलें आहे. '**संप्रयोगपराधीनत्वात्** । '( का. सू. १-२-१८ ). हल्लींच्या कालांत या सूत्राचा अर्थ जास्त व्यापक घेतला पाहिजे. मनुष्य व इतर प्राणी यांत आहार, निद्रा, भय, मैथुन इत्यादींचें सामान्यत्व असलें तरी मनुष्यांतील मनबुद्धींचें विशेषत्व अनेक नवे प्रश्न निर्माण करूं शकतें. या मनबुद्धींचें वळण वा जोपासना अयोग्य तऱ्हेनें होईल तर कामवासनेची तृप्ति व त्या वासनेपासून उत्पन्न होणारी सुप्रजेसंबंधीं सामाजिक जबाबदारी पार पाडणें असेल तर स्त्रीपुरुषांचें योग्य साहचर्यच झालें पाहिजे. कारण, 'संप्रयोग' उत्तम प्रयोगाच्या सिद्धीकरितां स्त्रीपुरुषांचें परस्परावलंबित्व अभिप्रेत आहे. कामपूर्तीकरितां पुरुष स्त्रीवर व स्त्री पुरुषावर संपूर्णतया अवलंबून आहे हें परस्परावलंबित्व लक्षांत न आलें आणि त्यास धरून मनबुद्धींची जोपासना न झाली तर प्रयोग फसणें हा त्याचा सामान्य निकाल आहे. याचाच अर्थ ' विवाह ' व त्यासंबंधीं योग्य दृष्टिकोन नसल्यास कामपूर्ति दूर राहून वैवाहिक अपयश वाढत जातें. त्याचा परिणाम वैयक्तिक आयुष्यावर, सुप्रजेवर व इतर कामाचारांवर होऊन तद्द्वारा समाजहितास धोका उत्पन्न होण्याची शक्यता असल्यानें या शास्त्राची जोपासना व अध्ययन जरुरीचें आहे.

**वात्स्यायनाचा ग्रंथ शास्त्रीय :**

वात्स्यायनाचा ग्रंथ हा एक शास्त्रीय ग्रंथ असून लोकरंजनार्थ लिहिलेलें ललितवाङ्मय नव्हे हें लक्षांत घेणें जरूर आहे. शास्त्रज्ञाची भूमिका या ग्रंथांत सर्वतोपरी दृष्टीस पडते. या विषयासंबंधीं पूर्वाचार्यांच्या तत्कालीन उपलब्ध वाङ्मयाचा वात्स्यायनानें प्रथमतः कसून अभ्यास केला होता. कोणत्याहि शास्त्रज्ञास वा संशोधकास ही प्रथम महत्त्वाची गोष्ट असते. ज्याविषयीं कांहीं शास्त्रीय कार्य करावयाचें त्या विषयासंबंधीं त्या शास्त्रांतील पूर्वाचार्यांनीं उपलब्ध करून ठेवलेली सर्व माहिती घेणें जरूर असते. यानंतर ' कामशास्त्र ' हा विषय सामाजिक स्वरूपाचा असल्यानें त्याविषयीं तत्कालीन लोकाचार व कल्पना काय होत्या यांचें निरीक्षण व अभ्यास करणें क्रमप्राप्त ठरतें. वात्स्यायनानें तत्कालीन समाजाचें, प्रांतोप्रांतीं हिंडून, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष माहिती गोळा करून, मोठें सूक्ष्म निरीक्षण केलेलें त्याच्या ग्रंथावरून आढळून येतें.

90248

**धर्ममर्थं च कामं च प्रत्ययं लोकमेव च।**
**पश्यत्येतस्य तत्त्वज्ञो न च रागात्प्रवर्तते** ॥ का. सू. ७.२.५१

(' या शास्त्राचा तत्त्वज्ञ धर्म, अर्थ, काम, तत्कालीन लोकाचार व प्रत्यक्ष निरीक्षण यांवरून प्रवृत्त होत असतो. काम-विकाराच्या तावडींत सांपडून नव्हे. ') यावरून वात्स्यायनानें तत्त्वशोधक शास्त्रज्ञाची भूमिका घेऊन लोकाचारांचें निरीक्षण केलेलें आहे हें स्पष्ट होतें. रागवर्धन होण्यासारख्या लैंगिक क्रियांचीं वर्णनें करतांना त्यांनीं फार जपून केलेलीं आहेत. जेथें जेथें असा विकार उत्पन्न होण्याचा प्रसंग वर्णनांतहि येतो, तेथें तेथें मोठ्या प्रयत्नानें त्यानें विकारोद्रेक न व्हावा याकरितां प्रयत्न केला आहे. शिवाय व्यापक शास्त्रचर्चा करतांना पुष्कळ गोष्टींचा ऊहापोह येतो याचा अर्थ त्यांचा आचार प्रत्येकानें करावा असा नव्हे, हें त्यानें मुद्दाम स्पष्टपणें लिहून ठेवलें आहे.

याप्रमाणें शास्त्रज्ञ या नात्यानें स्वतःचें मन व बुद्धि निर्विकल्प व निर्विकार ठेवून ( unbiased mind ) पूर्वाचार्यांचे अभ्यास ग्रहण केल्यावर, तत्कालीन समाजरचना, लोकाचार व एतद्विषयक पद्धति यांचा प्रत्यक्ष निरीक्षणानें वात्स्यायनानें अभ्यास केला. लोकाचारांचें वर्णन करतांना त्यांसंबंधीं बरें-वाईट किंवा स्तुतिनिंदात्मक उद्गारहि काढण्याचें ग्रंथकारानें पुष्कळ वेळां टाळलेलें दिसतें. ' स्त्रीपुरुषसंबंध ' अपत्याकरितां किंवा शारीरिक सुखाकरितां असतात. यांत स्तुतिनिंदा कांहीं नाहीं. यापुढें शास्त्रज्ञ या नात्यानें जी माहिती गोळा केली, जे आचार एकत्र केले, जे प्रयोग पाहिले त्यांचें कांहीं शास्त्रशुद्ध वर्गीकरण करतां आल्यास तें करणें शास्त्रज्ञास क्रमप्राप्त असतें. वात्स्यायनानें सर्व लोकाचारांचें अत्यंत योग्य वर्गीकरण केलेलें दिसतें. उदाहरणार्थ ' औपनिषदिकम् ' या अधिकरणांत ' वशीकरणयोग ', ' वाजीकरणयोग ', ' नष्टरागप्रत्यानयनयोग ' आणि ' वर्धनयोग ' इत्यादि वर्गीकरण त्यानें पाहिलेल्या वा ग्रंथांतरांतून वाचलेल्या निरनिराळ्या हजारों प्रयोगांचें योग्य वर्गीकरण आहे, नायिकांचें वर्गीकरण आहे; नायकांचें वर्गीकरण आहे. याप्रमाणें सर्व जमवाजमव किंवा माहिती ( Data ) एकत्र करून, वर्गीकरण केल्यावर कांहीं निश्चित तर्कशुद्ध सिद्धान्त निघतात कीं काय हें पाहण्याचें शास्त्रज्ञाचें शेवटचें पण महत्त्वाचें कार्य असतें. हें कार्यहि वात्स्यायनानें यथाशक्ति पार पाडलें आहे. शिवाय जरूर तेथें कांहीं विशेष हेतु लक्षांत घेऊन शिफारसवजा कांहीं गोष्टी

सांगितल्या आहेत. उदाहरणार्थ, बहुपत्नीकत्व या देशांत पूर्वीपासून लोकमान्य पद्धति म्हणून चालू आहे. ती वाईट किंवा चांगली हा भाग भिन्न. परंतु त्याचीं कारणें काय, पुरुषांना दुसरीकडे जाण्यास कोणकोणत्या गोष्टी प्रवृत्त करतात, यांसंबंधीं वात्स्यायनानें स्वतःच्या निरीक्षणानें काढलेले तर्क अत्यंत योग्य असून आजहि ते खरे ठरतील. तसेंच कांहीं ठिकाणीं वात्स्यायन एखाद्या आचाराची शिफारस करतां-नाहि दिसतो. उदाहरणार्थ, कुलयोषा, पुनर्भू वा वेश्या यांपैकीं कोणत्याहि वर्गातील स्त्री असो, ती जर नायकाच्या हिताशीं समरस असेल तर तिनें एकचारिणीवृत्ताचेंच (का. सू. ४.१.४८) आचरण करावें. यामुळें तिच्यावर त्या पुरुषाचें जास्त प्रेम बसल्याशिवाय राहणार नाहीं. तात्पर्य, शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ या भूमिकेंतून कोणत्याहि विषयाचा अभ्यास व विवेचन करतांना जे यमनियम सांभाळावे लागतात, ते वात्स्यायनानें पूर्णपणें पाळलेले असल्यामुळें, त्याचा कामशास्त्रावरील हा ग्रंथ खरोखर शास्त्रीय ग्रंथ झालेला आहे. तो लौकिक किंवा रंजनात्मक नाहीं.

**ग्रंथाचें सिंहावलोन :** वात्स्यायनीय कामसूत्र हा ग्रंथ निरनिराळ्या भाषांत भाषांतरित झाला आहे. उपलब्ध ग्रंथांपैकीं हा एक काम-शास्त्रावरील लोकमान्य ग्रंथ आहे. या ग्रंथासंबंधीं आज लोकांत नुसताच फार गैरसमज पसरलेला असून कांहीं शिश्नोदरपरायणांनीं या शास्त्रांतील कांहीं रतिसुखाचे भाग इतस्ततः प्रसिद्ध करून त्या ग्रंथास व वात्स्या-यन ऋषीस कुप्रसिद्ध करण्यासहि कमी केलेलें नाहीं.

या ग्रंथांतील विषयाचे साधारणतः तीन विभाग करतां येतील. स्त्री-पुरुष संबंधांचा विचार करणाऱ्या कोणत्याहि शास्त्रास यापेक्षां वेगळें वर्गीकरण करतां येईल असें दिसत नाहीं. 'काम' हा मुख्यतः स्त्री-पुरुष संबंधांनींच निर्माण होणारा पुरुषार्थ असल्यानें त्या मूळ संबंधाचें सर्वंकष विवेचन आणि आचार संकलित करणारा असा हा ग्रंथ किती परिश्रमपूर्वक तयार करावा लागला असेल याची वाचकांनीं कल्पना करावी. उपरिनिर्दिष्ट तीन विभागांतील प्रथम विभागास पुरुषार्थ कल्पनेस धरून कामशास्त्र असें नांव देतां येईल. यांत चतुर्विध पुरुषार्थ ही मूळ सांस्कृतिक कल्पना आणि समाजाची वर्णाश्रमधर्मात्मक धारणा लक्षांत येऊन जें 'धर्म्य' त्याचें निरूपण. दुसरा विभाग म्हणजे कामशास्त्रांतर्गत जें प्रमुख 'रतिसुख' (orgasm) तें निर्माण करण्यास लागणाऱ्या गोष्टी वा तद्विषयक विचार यांस शृंगार-

रसशास्त्र ( Erotics ) हें नांव देतां येईल. 'Eros' ईरॉस या मूळ शब्दाचा अर्थ प्रेम ( Love ) असा असून प्रेमशास्त्र असें इरॉटिक्स ( Erotics ) या शब्दाचें भाषांतर मोठें चूक नव्हे. पण 'शृंगार' या शब्दानें प्रेमरस निर्माण होण्याचे सर्व सूक्ष्म प्रकारहि अभिप्रेत असल्यानें, रतिसुखाची प्रेरणा, उत्क्रान्ति व सातत्य हें सर्व शृंगाररसानें साध्य होत असल्यानें आणि माधुर्य व आनंद हेंच त्या रसाचें खरें पर्यवसान असल्यानें 'शृंगाररसशास्त्र' हेंच संस्कृतनिष्ठ नांव आम्हांस 'इरॉटिक्स्‌ला' ग्राह्य वाटतें. आणि तिसरा भाग म्हणजे एकंदर अधर्म्य आचारांपासून स्त्री-पुरुषसंबंधांत उत्पन्न होणारे निरनिराळे व्यवसाय, आचार आणि विचार यांचें तत्कालीन परिस्थिति लक्षांत घेऊन जसेंच्या तसें वर्णन. यास 'स्थितिवर्णनात्मक ( Descriptive ) असें नांव देतां येईल. यांत निरनिराळे देशाचार, वैशिक, पारदारिक, इत्यादि प्रकरणें येतील.

'कामपुरुषार्थ' या नांवाखालीं प्रथम भागाशीं प्रस्तुत ग्रंथांत प्रथम कर्तव्य आहे. वरील असेच भाग वात्स्यायनानें आपल्या ग्रंथांत केलेले आहेत असें नाहीं. पण सर्व सूत्रग्रंथ पाहिल्यावर वरील वर्गीकरण कसें सिद्ध होतें हें कोणत्याहि विचारी वाचकाच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. वात्स्यायनीय कामसूत्र एकंदर सात अधिकरणांत विभागलें असून प्रत्येक अधिकरणांत कांहीं अध्याय येतात. कामपुरुषार्थ या नांवाखालीं जो विषय काल्पिला आहे तो एकाच ठिकाणीं नाहीं. प्रथमाधिकरणांत मुख्यतः हाच विषय आहे. या शास्त्रांतील पूर्वाचार्य कोण, पुरुषार्थसाधन हेंच कसें आयुष्य सुखी करण्याचें साधन आहे? 'काम' पशुपक्ष्यांतहि सहजप्रवृत्ति असतांना त्याचें शास्त्र कसचें? आयुष्याची कालमर्यादा कांहीं कल्पना करून त्यांत सुखप्राप्तीसाठीं ब्रह्मचर्यापासून वैखानसापर्यंत विचारानें ( Plan ) आराखडा काढून कर्म कसें केलें पाहिजे? स्त्रियांना कोणत्या विद्या अवगत असणें योग्य आहे, नागरक वृत्त, वगैरे प्रश्न येतात. तिसऱ्या अधिकरणांत मुख्यतः 'वरणसंविधान' हें प्रकरण काम-पुरुषार्थाच्या विचारांत महत्त्वाचें आहे. यांत विवाहभेद, विवाहयोग्य कन्येचा विचार, निरनिराळे हीनश्रेष्ठ संबंध येथपासून तों विवाह जमवावे कसे, स्वागतसत्कार कसे असावेत, विश्वास कसा संपादन करावा इत्यादि विवाह सुखी होण्याबाबतचे पुष्कळ मार्मिक विचार येतात. चतुर्थाधिकरणांतहि कामपुरुषार्थाचा विषय येतो. कुटुंब संभाळणें हें स्त्रीचें कसें महत्त्वाचें कार्य आहे; उत्तम स्त्रीच हें कार्य कुशलतेनें कसें करूं शकते; स्त्रीनें घरांत इतर पुरुषसंबंधित नाते-

अनुक्रम २४५४० वि. 17 ५
क्रमांक ...११६६ नों: दि: ८०१५

वाईकांशीं कसें आचरण ठेवावें; स्वतःचे शरीरशृंगार, व्रतें-उपवास, पतीच्या मित्रांशीं वर्तन, माहेरीं जाणें-येणें इत्यादि विवाहांतर्गत व्यवहारांसंबंधीं विवाह सुखी करण्याच्या दृष्टीनें फार बारीक विधिनिषेध सांगितले आहेत. शिवाय ‘सवत’ असण्याचा प्रसंग आल्यास काय वर्तन असावें याचाहि वेगळा विचार केला आहे. सवत, सपत्नी वा ‘सोशल रायव्हल’ हा प्रश्न सनातन आहे. त्याचा कायदा करून ही गोष्ट संपणारी नव्हे. याची कारणमीमांसा पाश्चिमात्यांनीं फारशी केलेली दिसत नाहीं. पण वात्स्यायन ऋषींनीं याची कारणमीमांसाहि केली आहे. अर्थात् एकपत्नीकत्वच ( Monogamy ) त्या वेळीं बव्हंशीं होतें व आतांहि आहे. उच्च संस्कृतीस धरून योग्य आचार म्हणून हीच गोष्ट वात्स्यायनांनींहि धरलेली असून अशा विवाहांत स्त्री-पुरुष आचार कसे असावेत याचा त्यांनीं विचार केलेला आहे. ‘सुखी विवाह’ हें जीवनाचें एकमेव ‘कामशास्त्रीय’ ध्येय ते मानतात. हाच ‘काम-पुरुषार्थ’. यानेंच मनुष्य सुखी व सुपुत्री होतो असें त्याचें दृश्य फल; आणि हें फल प्राप्त करून घेण्याकरितां विचारानें अनेक आचारांचें निरीक्षण व अध्ययन करून तयार केलेलें विधिनिषेधात्मक शास्त्र हेंच खरें पुरुषार्थ कल्पनेस धरून रचलेलें मुख्य ‘कामशास्त्र’.

वात्स्यायनांतील दुसरा विभाग म्हणजे शृंगाररसशास्त्र. ( Erotics ) कामप्रवृत्ति ही जीवमात्राची सहजप्रवृत्ति असून रतिसुख हें सर्वोत्तम स्पर्शसुख आहे, हें सर्वश्रुत आहे. हें रतिसुख जास्त काल कसें टिकवितां येईल, त्याचा उपभोग उत्तम तऱ्हेनें कसा लाभेल, रतिसुखाबरोबर उत्पन्न होणारी जबाबदारी टाळून त्याचा आस्वाद कसा घेतां येईल, वगैरे प्रश्नांसंबंधीं मानवाची बुद्धि आजपर्यंत कांहीं कमी खर्च झालेली नाहीं. परंतु रतिसुखांतील ही स्वार्थी प्रवृत्ति जरी एकीकडे ठेवली तरी विवाह सुखांत सुप्रजेबरोबर रतिसुख हेंसुद्धां एक महत्त्वाचें वैवाहिक स्थिरतेचें साधन आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. म्हणूनच रतिसुखासंबंधीं विचार करणें काम-शास्त्राचें सहजकर्तव्य ठरतें. अर्थात् प्रस्तुत ग्रंथापुरतें आम्ही काम-पुरुषार्थास धरून प्रथम विभागासच बांधलेलों असल्यानें रतिसुखासंबंधीं जास्त चर्चा या पुस्तकांत केलेली नाहीं. कांहीं तात्त्विक चर्चा मात्र सुखी विवाहाची साधनचर्चा पुढें येईल तेव्हां प्रसंगानें येईलच.

तिसरा विभाग म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधात्मक आचारांचें समग्र अवलोकन. ( Descriptive ) हा विषय परिस्थितिभिन्नत्वाप्रमाणें, रुचिभिन्नत्वानें आणि रुढी-भिन्नत्वानें निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या कालांत ‘विवाहबाह्य’ (Extra-

marital ) अनंत प्रकारचे स्त्रीपुरुषसंबंध येतात त्यांस धरून आहे. त्यांतील अत्यंत महत्त्वाचे संबंध म्हणजे ‘ पारदारिक ’ आणि ‘ वैशिक ’. यांचे सामाजिक परिणाम बरेच खोल असतात. यासंबंधीं कायदे कसेहि आणि कितीहि केले तरी त्यांतून समाजाची सुटका नाहीं. निसर्गतः पुरुष हा प्राणी अतिवैषयिक बनला असल्यानें, आणि विवाहास लागणारी परिस्थिति सर्व स्त्री-पुरुषांस सुलभ नसल्यानें, सर्व पुरुषांची संपूर्ण तृप्ति होणें कोणत्याहि सामाजिक स्थितींत नेहमीं अशक्य असतें. शिवाय कामशास्त्रीय विवाहसुख किंवा ध्येयात्मक सुखी विवाह ही बाब सर्वांच्या वांट्यास येत नसल्यामुळें ‘ पारदारिकत्व ’ व ‘ वेश्याव्यवसाय ’ या गोष्टी नाहींशा होण्यासारख्या नाहींत. पुरुषाची ‘ सेंद्रिय गरज ’ (Biological Need) हेंच या विवाह बाह्य संबंधांत एक महत्त्वाचें कारण आहे, असें पुष्कळ पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचेंहि म्हणणें आहे. “The basic underlying cause of prostitution is the biological fact that man calls for sexual intercourse almost as universally and as regularly as he calls for food.” (Scott. p. 37.) त्याबरोबरच कामाचा उपयोग स्त्रीस अर्थागमाकरतां होतो हें लक्षांत आणल्यास पुरुषाची गरज भागवून स्त्रीचा अर्थागमाचा उद्देश यांत सफल होत असल्यानें ‘ वेश्याव्यवसाय ’ अटळ आहे. पुढें याचा थोडा विस्तार प्रसंगानें येईलच; असो.

तात्पर्य, या वर्णनात्मक विभागाचें हें महत्त्व लक्षांत घेऊन ही माहिती त्याहि काळीं कामशास्त्रांतच ऋषींनीं संकलित केली. यांत वैशिक आणि पारदारिक या विशेष प्रकरणांशिवाय निरनिराळ्या देशस्थितींतील आचार ठिकठिकाणीं वात्स्यायनानें वर्णन केले आहेत. हे सर्व आचार समजावून घेणें शहाणपणाचें आहे. वैशिकासंबंधीं भारतीय दृष्टिकोन बराच बुद्धिगम्य असून यासंबंधीं चर्चा पुढें येईलच. तिसऱ्या विभागासहि आपणांस प्रस्तुत पुस्तकांत प्रसंगविशेष सोडून जास्त हात घालावयाचा नाहीं. कारण हा विषय फार विस्तृत व गुंतागुंतीचा असून त्याचा वेगळाच ग्रंथ करावा लागेल. वात्स्यायनऋषींनीं हा भाग घालून सर्वंकष ग्रंथ तयार केला. याचा अर्थ असा नव्हे कीं, जे सर्व आचार यांत वर्णन केले आहेत, त्यांचें लोकांनीं वाटेल तसें आचरण करावें, असा त्यांचा अभिप्राय होता. स्वतः वात्स्यायनांचें मत अधर्म्य आचाराच्या सर्वस्वीं विरुद्ध असून, हें सर्व वर्णन आचरणाकरितां नाहीं, ही गोष्ट त्यांनीं पुष्कळ स्पष्टपणें लिहिलेली आहे.

**त्रिवर्गसाधन हाच उद्देश :** प्रथमाधिकरणांत 'त्रिवर्गप्रतिपत्तिः' या अध्यायांत 'न धर्मांश्चरेत्' असा पूर्वपक्ष करून 'चरेत् धर्मात् इति वात्स्यायन:' असा उत्तरपक्षीय सिद्धान्त मांडलेला आहे. धर्माचें आचरण करून काय करावयाचें आहे. ज्याचें फल पुढील लोकांत व जन्मांत प्राप्त व्हावयाचें त्याच्याकरितां हातीं लागलेल्या सुखाचा त्याग करणें मूर्खत्वाचें लक्षण आहे, हें प्रतिपादन नवें नाहीं. अलीकडे नवमतवाद या नांवाखालीं इतिहासाची पुनरावृत्ति होत आहे एवढेंच. हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागूं नये हा सिद्धान्त मांडतांना वात्स्यायनांनीं **'वरमद्य कपोतः श्वः मयूरात्'** असा दृष्टान्त दिला. शिकाऱ्याला आज पारवा मिळत आहे तर उद्यां मोर मिळेल म्हणून पारवा कसा सोडावा? परंतु याला उत्तरहि ऋषींनीं मोठें मार्मिक दिलें आहे. शेतकरी हातीं असलेलें धान्यबीज पावसाची अनिश्चितता सर्वमान्य असूनसुद्धां पुढें दृष्टि ठेवून प्रत्यक्ष मातींत मिसळतो ही सर्वश्रुत गोष्ट आहे. वर्तमानकलांतील त्याग हा केव्हांतरी भविष्यकालांत उपयोगास येणें शक्य आहे. असा या दृष्टान्तांतील निष्कर्ष. शिवाय हातीं आलेलें भोगावें असें केल्यास समाजधारणा कशी व्हावी ? या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन,

**" वर्णाश्रमाचारस्थितिलक्षणत्वात् च लोकयात्रायाः हस्तगतस्य च बीजस्य भविष्यतः सस्यार्थे त्यागदर्शनात् चरेत् धर्मान् इति वात्स्यायनः "** (का. सू. १.२.२५)

कामशास्त्रकारांनीं ग्रंथाचे शेवटीं तर ही गोष्ट स्पष्ट सांगितलेली आहे.

**रक्षन् धर्मार्थकामानां स्थिति तिं स्वां लोकवार्तिनीम्।**
**अस्य शास्त्रस्य तत्त्वज्ञः भवत्येव जितेंद्रियः॥** का. सू. ७.२.५६

" धर्मार्थकामांचें रक्षण करणारा व या शास्त्राचा तत्त्वज्ञ जितेंद्रियें होतो." यांत कामसूत्रकारांच्या स्वतःच्या भाषेंत पुरुषार्थ-सिद्धि वा त्रिवर्गसाधन हाच कामशास्त्रकारांचा एकमेव हेतु आहे, हें स्पष्ट होत आहे. पण प्रत्येक ठिकाणीं त्रिवर्गसाधन आणि त्रिवर्गरक्षण ही गोष्ट ऋषींनीं वाचकांस सहज समजावी अशी लिहिली आहे. तात्पर्य, कामशास्त्र हें 'काम-पुरुषार्थ' निर्माण करण्याकरितां ज्ञान व कौशल्य प्राप्त करून घेण्याचें एकमेव साधन असून त्याचें फल मनुष्यास 'वैवाहिक सुखप्राप्ति' हें आहे. समाजाच्या या मूलभूत गरजेकडे जुन्या भारतीय तत्त्वज्ञांनीं

किती मार्मिकतेनें लक्ष देऊन मनुष्यमात्राच्या मूलभूत सुखासमाधानांत भर टाकण्यासाठीं केवढे कष्ट केले आहेत. याचा ‘ कामसूत्र ’ हा एक प्रत्यक्ष पुरावा आहे.

**काम-पुरुषार्थ व विषयवासना :** प्रथमतः ‘ काम ’ हा एक तिरस्करणीय विचार असून आयुष्याचें वाटोळें करणारा विषय आहे असा समज कांहीं तत्त्वज्ञानात्मक आणि भक्तिप्रधान वाङ्मायावरून पुष्कळांचा झालेला दिसतो. आजन्म ब्रह्मचर्याचें त्यामुळें अवास्तव स्तोम आमच्या समाजांत कांहीं ठिकाणीं माजलेलें दिसतें. आणि या ‘कामा’ पासून संपूर्ण परावृत्त झाल्याशिवाय परमार्थ नाहीं अशी चुकीची समजूतहि सर्वत्र पसरलेली दिसते. ‘ **विषयाचें सुख द्वाड** ’ ‘ **विषय सर्वथा नावडो** ’ इत्यादि मराठी काव्यांपासून तों ‘ **महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम्।** ’ अशा भगवद्गीतेपर्यंत ग्रंथाचे आधार घेऊन कामविकाराचा सर्वतः तिरस्कार दर्शविला जातो. मागें भगवद्गीतेसंबंधीं तरी आम्हीं काम-पुरुषार्थाचा विचार करतांना ‘ काम ’ ही सहजप्रवृत्ति भगवद्गीता-टीकाकारांनीं त्याज्य मानलेली नसून, उलट ‘ धर्म अविरुद्ध काम’ हा कसा ग्राह्य धरला आहे, याचें विवेचन केलेंच आहे. ‘ विषय ’ हा मराठी भाषेंतील शब्द ‘ **काम-पुरुषार्थ** ’ ह्याचा मराठी प्रतिनिधि नसून **अधर्म्य काम** ’ किंवा ‘ विकारवशतेचा ’ प्रतिनिधि आहे. एवढें लक्षांत ठेवलें म्हणजे पुरे. येथें कामशास्त्रकाराचा या सहजप्रवृत्तिसंबधींचा अभिप्राय जास्त स्पष्ट करून पाश्चिमात्य धार्मिक समजुतींशीं त्याची तुलना करूं.

कामाची विप्रतिपत्ति सांगतांना वात्स्यायन ऋषि सांगतात ‘ **न कामांश्चरेत्** ’ कारण हा सज्जन माणसांचा वैरी आहे, धर्मार्थांचा वैरी आहे. असद् व्यवसाय आणि अपवित्रता यानें निर्माण होते, वाईट माणसांचा संसर्ग येतो. फार मोठे लोक काम-वश झाल्याकारणानें लयास गेले अशी रावण, दांडक्य, देवराज इंद्र इत्यादींचीं उदाहरणें सांगतात. यावर शंकानिवारण करतांना पहिलेंच सूत्र अत्यंत मार्मिक आहे.

“ **शरीरस्थितिहेतुत्वादाहारसधर्माणो हि कामाः। फलभूताश्च धर्मार्थयोः।** ” ( का. सू. १.२.६७ )

काम ही सहजप्रवृत्ति शरीरस्थिति व शरीरधारणा करण्यास जरुरीची असल्यानें आहाराशीं तिचें सादृश्य आहे. शिवाय धर्मार्थांचें अंतिम फल हें मुख्यतः काम पुरुषार्थात्मकच आहे हें विसरून चालणार नाहीं. पुढचें सूत्र खालीं देत आहों.

**बौद्धव्यं नु दोषेष्विव। नहि भिक्षुकाः संतीति स्थाल्यो नाधिश्रीयंते। न हि मृगाः संतीति यवा नोप्यन्त इति वात्स्यायनः।** ( का. सू. १.२.३८)

यांत कामविकाराचे दोष मात्र समजले पाहिजेत. आहारहि जरूर म्हणून जाड्य होईपर्यंत खाणें इष्ट नाहीं. आहाराचेहि अनंत दोष आहेतच. ते सर्व जाणून जसे आहार करणें इष्ट, दोषास्पद म्हणून संपूर्ण त्याज्य नव्हे, तद्वत्च कामाचेंहि आहे. भिकारी येतील म्हणून कोणी स्वयंपाक करावयाचें सोडीत नाहीं. किंवा जनावरें खातील म्हणून कोणी धान्य-शेती करीत नाहीं असेंहि नाहीं. तेव्हां दोषांचें निवारण करून कामाचें योग्य सेवन करणें इष्ट आहे, असा वात्स्यायन ऋषींचा सिद्धान्त.

उपरिनिर्दिष्ट सूत्रावरून कामशास्त्रकारांची ' काम ' या सहजप्रवृत्तिसंबंधीं किती सोज्वळ, तर्कशुद्ध आणि शरीरपोषणास योग्य अशी कल्पना आहे हें सिद्ध होतें. ' **शरीरस्थितिहेतुत्वात्** ' हें विशेषण तर स्पष्ट दाखवितें कीं, शरिराची ' स्थिति ', ' धारणा ' वा आरोग्यरक्षण करणें असल्यास या प्रवृत्तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. यशोधरानें टीका करतांना ही गोष्ट स्पष्टपणें मांडली आहे.

**" अन्यथा रोगोद्रेकादुन्मादादिदोषेण न शरीरस्थितिः।"**

कामसूत्र पृ. ७०

या प्रवृत्तीकडे दुर्लक्ष केल्यास कांहीं रोगांचा उद्रेक होतो. उन्मादादि दोष उत्पन्न होतात. योग्य स्थिति वा आरोग्य राहात नाहीं. याकरितां काम ही प्रवृत्ति दुर्लक्षित करतां कामा नये. आज पाश्चिमात्य शास्त्रज्ञांना ' काम ' हा किती शारीरिक व मानसिक नासधूस करूं शकतो, या सहजप्रवृत्तीच्या दुर्लक्षांत किती रोगांची उत्पत्ति आहे, इत्यादि गोष्टी अवगत झाल्या आहेत. दर वर्षी या सहज प्रवृत्तीच्या अनियमनामुळें झालेल्या दुःखितांची संख्या झपाट्यानें वाढत आहे.

Love inadequacy is essentialy a disorder of modern civilisation, a payment demanded of us by our culture. Only if we can ourselves free from our terror of this restless force within us, can we hope to reduce the appallingly large harvest of sexual disorders that we are now reading ( Walker p. 9 )

वर उद्धृत केलेल्या वाक्यावरून कामविकृति ( Sexual disorders ) फार मोठ्या प्रमाणांत वाढत आहेत. प्रस्तुत कालाच्या संस्कृतींतच याचें कारण आहे

हें शास्त्रज्ञांना मान्य आहे. आतां यावर उपाययोजना काय करावी याबद्दलचीं त्यांचीं मतें आमच्या दृष्टीनें योग्य नाहींत, पण प्रयोगावस्थेंतील समाज प्रयोग करूनच शिकणार. त्यास दुसरा उपाय नसल्यानें पाश्चिमात्यांचीं उपाययोजना बदलत राहील हें निश्चित. येथें एवढेंच नमूद करावयाचें कीं भारतीय संस्कृतीचा कदाचित् जास्त सखोल अभ्यास झाल्यास त्यांना उपाययोजना करतांना कमी हानि होण्याचा संभव आहे. कारण या सर्व कूटप्रश्नांचीं उत्तरें आमच्या पूर्वजांनीं विचारांनीं आणि प्रत्यक्ष अवलोकनानें देण्याचा शास्त्रीय प्रयत्न केलेला आहे.

यानंतर ख्रिस्त धर्माचा ‘ काम ’ या सहज प्रवृत्तीबद्दल विचार पाहिल्यास तो फारच दोषास्पद दिसतो. ‘ काम ’ ही प्रवृत्तीच त्याच्या मतानें ‘ पाप ’ असून ह्या पापापासून मनुष्यानें अत्यंत प्रयत्नानें आणि दक्षतेनें परावृत्त झालें पाहिजे. विवाह हा कामपुरुषार्थ संपादन करण्याचा उत्तम मार्ग असून गृहस्थाश्रम व सुखी विवाह ह्या मानवाच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत. हा भारतीय विचार आणि काम ही पापवासना आहे, ह्या पापी मनास आवरतां येत नसल्यास थोडें पाप करण्याची मुभा असावी अशाकरितां सोय म्हणजे विवाह हा ख्रिस्ती विचार. हा दृष्टिकोन सर्वथैव चुकीचा असून त्याकडे विचारवंतांचें अलीकडे थोडें लक्ष जाऊं लागलें आहे. असें म्हणतात कीं, धर्मसंस्थेंतहि ( Church ) याचा विचार हल्लीं होत असून, इष्ट बदल घडवून आणावा अशीं त्यांचीं मतें बनत चाललीं आहेत. डॉ. वॉकर म्हणतात,

“ It was the Churh that till recently looked upon sexuality as a sin and taught mankind to regard marriage as a concession to man’s frailty. ” ( Walkar p. 9 )

**‘काम’ शब्दाची व्याख्या :**

वात्स्यायनानें काम शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणें केली आहे. **“ श्रोत्रत्वक्चक्षुर्जिव्हाघ्राणानां आत्मसंयुक्तेन मनसाधिष्ठितानाम् स्वेषु विषयेषु अनुकूल्यतः प्रवृत्तिः कामः** (का. सू. १.२.११)

मनाच्या ठिकाणीं अधिष्ठित असलेली जी श्रोत्र, त्वक्, घ्राण, जिव्हा व चक्षु हीं ज्ञानेंद्रियें, त्या ज्ञानेंद्रियांचा आत्म्याशीं संयोग झाल्यानें आपआपल्या विषयाप्रमाणें

अनुकूल वा सुखकारक प्रवृत्तींची निर्मिति म्हणजे काम. यांत मनाचें स्थान निश्चित झालें. मन नाहीं तर कामहि नाहीं. नंतर काम उत्पन्न होण्यासाठीं सर्व ज्ञानेंद्रियांची कशी जरुरी आहे हेंहि सांगितलें. आत्म्याशीं संयोगानें, अधिष्ठान व कर्तृत्व-भोक्तृत्व इच्छेची जरुरी आहे हें कळविलें आणि या सर्वांची जोड मिळाल्यावर अनुकूल वा सुखकारक संवेदना निर्माण झाली पाहिजे म्हणजे कामोत्पत्ति झाली. ही कामाची व्याख्या मोठी सर्वसंग्राहक आणि मार्मिक आहे.

स्पर्श, रूप, रस, गंध यांचा कामवासना उत्पन्न करण्यास किती उपयोग होतो याची ज्यांना कल्पना आहे, त्यांना वरील व्याख्येची मार्मिकता सहज समजून येईल. नयनांतून प्रेम-द्वेषादि विकार कसे प्रतीत होतात यांचा बहुतेक सर्वांना प्रत्यक्ष थोडाफार अनुभव असतोच. ज्या नयनांतून हे विकार दृष्टीस पडतात, त्यांतील कोणती शारीरिक रचना ( Anotomy ) हें दर्शविण्यास समर्थ आहे हें शास्त्रज्ञास आज ज्ञान नाहीं. मनांत उत्पन्न झालेला भाव डोळ्यानें दर्शवितां येतो हें सत्य. तेव्हां चक्षु हें पंचज्ञानेंद्रियांपैकीं कामविकार दर्शविण्याचें महत्त्वाचें इंद्रिय आहे एवढें खरें. या सर्व ज्ञानेंद्रियांचा ‘ काम ’ भावनेशीं वरील व्याख्येंत लावलेला संबंध किती बुद्धिगम्य आहे हें यावरून सहज प्रत्ययास येणारें आहे. पाश्चिमात्य शास्त्रज्ञहि या सर्व ज्ञानेंद्रियांचें अधिष्ठान असलेल्या शरिराच्या भागास ‘ लैंगिक ’ वासना उत्पन्न करण्याचें ‘उपप्रमुख’ वा पूरक भाग ( accesaries ) समजतात. कामवासनेच्या सर्व व्यवहारांत मुख्यतः याच पंचज्ञानेंद्रियांचा उपयोग होतो. शरीर-सौष्ठव, सुवासिक द्रव्यें आणि शारीरिक स्पर्श यांचा कामोद्दीपक ( Sexual stimulation ) म्हणून प्रेमाकर्षणांत फार मोठा उपयोग होत असतो, हा कांहीं नवा शोध नाहीं.

काम या शब्दाची ही वरील व्याख्या मोठी सर्वसंग्राहक आहे खास; पण तेवढ्यानें कामशास्त्राचें कार्य भागत नाहीं. म्हणून ती सर्वसामान्य व्याख्या दिल्यावर शास्त्रकार विशेष व्याख्या देतात.

**स्पर्शविशेषविषयात्त्वस्याभिमानिकसुखानुविद्धा फलवती अर्थप्रतीतिः प्राधान्यात्कामः।** ( का. सू. १.२.१२ )

स्पर्शविशेषामुळें ज्यांत वांछित सुख आणि फलनिष्पत्ति आहे, त्यास ‘ प्रधानकाम ’ ही संज्ञा आहे.

यांत फलरूप अर्थनिष्पत्तीचें प्राधान्यत्व आहे. यांत स्पर्शविशेष हा विषय आहे. स्पर्शविशेष विषयापासून ज्यांत मुद्दाम वांछित वा अभिप्रेत अशी फलरूप अर्थनिष्पत्ति हा शेवट आहे तो 'प्रधानकाम' समजावा. या व्याख्येंत नुसता लैंगिक व्यवहाराचा आनंद दर्शविण्याचा उद्देश नसून त्यांत गर्भधारणेच्या फलाची आनंदस्वरूप अर्थनिर्मिति आहे असें आम्हांस वाटतें. हा अर्थ टीकाकारांच्या मान्यतेचा नसल्यानें सहजच शास्त्रीपंडितांना कदाचित् मानवणार नाहीं. पण खालील मुद्दे ग्रहण केल्यास आम्हांस असें कां वाटावें हें समजून येईल.

(१) गोष्ट अशी कीं ज्या वात्स्यायनांनी पुरुषार्थविचार सुरवातीस मांडलेला असून विवाहासंबंधीं मनु-याज्ञवल्क्य मुनींचे सर्व विचार आणि आचार ग्राह्य म्हणून प्रतिपादन केले आहेत, त्यांस काम-पुरुषार्थाचा खरा आनंद हा फक्त शुक्रपाताचा असतो असें म्हणवणार नाहीं. अर्थात हा आनंद अभिप्रेत नाहीं असें मात्र नाहीं. तसें म्हणण्याचा आमचा उद्देश नाहीं. पण हा आनंद गर्भधारणेच्या फलप्राप्तींत अप्रतिहत राहातो किंवा द्विगुणित होतो आणि हा सर्व आनंद, 'फलवती अर्थप्रतीतिः' या शब्दांनीं दर्शविण्याचा सूत्रकारांचा हेतु असावा असें दिसते.

(२) तसा हेतु नसता तर साधे 'रतिसुख', 'शुक्रपात' इत्यादि शब्द त्यांनाहि वापरतां आले असते. आणि क्लिष्ट संस्कृत लिहावें, दुर्बोध करावें असा सूत्रकारांचा हेतु इतर लिखाणावरून दिसत नाहीं.

(३) परंपरागत अर्थाविरुद्ध कसें जातां येईल ? यशोधर हा जुना टीकाकार परंपरेनें प्रेरित झालेला असल्यानें तो अर्थ अग्राह्य आहे, असें म्हणणें सयुक्तिक नाहीं. कारण, ही परंपरा सूत्रकार वात्स्यायनापासूनची नव्हे. सूत्रकारांच्या मनांत काय होतें हें टीकाकारासहि बरोबर सांगतां येण्यासारखें नाहीं. तेव्हां अर्थ लावतांना एकंदर शास्त्राचा उद्देश व इतर सर्व प्रतिपादन लक्षांत घेतां आम्ही म्हणतों असा अर्थ करण्यास विशेष प्रत्यवाय आहे असें मानणें ठीक होणार नाहीं. अगदीं प्राकृत भाषेंत सांगावयाचें झाल्यास जो लैंगिक व्यवहार ( स्पर्शविशेष या शब्दानें दर्शविला आहे. ) सुखवांछेनें केलेला आहेच पण शिवाय ज्यांत फलप्राप्ति म्हणजे गर्भधारणेची अपेक्षा आहे त्यास 'प्रधानकाम' अशी संज्ञा देण्यांत आली. कामशास्त्रावरील महत्त्वाची टीका म्हणजे यशोधराची टीका 'जयमंगला'. परंतु या प्रधानकामाच्या व्याख्येंत लैंगिक व्यवहाराचा शुक्रपातानंतर उत्पन्न होणारा आनंद

हेंच फल असें यशोधराचें मत इतरहि टीकाकारांनीं दर्शविलें आहे. आम्हांस यासंबंधीं शंका आहे.

(४) फलवती अर्थप्रतीति या शब्दानें प्रधानकामाची ही व्याख्या 'सेक्स' मध्यें येणाऱ्या दोन्ही मुख्य प्रवृत्ति लक्षांत घेऊन केलेली दिसते. त्या दोन प्रवृत्तींस इंग्रजींत 'मेटिंग' ( Mating ) आणि 'पेरेंटल' ( Parental ) म्हणतात. पहिलींत सुखाभिलाष आहे. दुसरींत फलनिष्पत्ति आहे. या दोन एकमेकांपासून उपकरणांच्या सहाय्यानें विभक्त करतां येतात. त्यासच मोठें शास्त्र समजतात. येथें एवढेंच नमूद करावयाचें कीं सुखाभिलाष आणि संततिरूप फल या गोष्टी एकत्रित ठेवणें संपूर्णतः शास्त्रीय आहे, व्यक्तीस समाधानाचें आहे आणि समष्टीस पोषक आहे. तद्विरुद्ध आचार व्यक्तीस सर्व समाधान देऊं शकत नाहींत, चुकीच्या संवयी लागतात, मनःसंयम सर्वच नाहींसा होणें शक्य असतें. लोभ मत्सरादि हलके मानसिक विचार बळावतात, बेजबाबदार वृत्ति निर्माण होते आणि या गोष्टी समष्टीस विघातक ठरतात. वरील सर्व कारणांस्तव आमचा अर्थ जास्त ग्राह्य वाटतो. तात्पर्य 'प्रधानकाम' या शब्दानें दर्शविलेला अर्थ पूर्वपरंपरेंतलि पुरुषार्थ कल्पनेशीं सुसंबद्ध दिसतो. आतां विवाहविधींत व काव्यांत ही कल्पना कशी रंगविली आहे तें पाहूं.

**विवाह-विधि व काव्य यांतील कामासंबंधीं संदर्भ :** या प्रधानकामास धरून विवाहतंत्रांतहि निरनिराळ्या देवतांची प्रार्थना आहे. कारण, हा 'काम' परमेश्वरस्वरूप, व्यक्तीस हितकारक आणि समष्टीस पोषक ठरविला गेला आणि वस्तुतः तसाच तो आहे; तेव्हां हा धर्म्य, विहितक्रियेंत मोडणारा आणि व्यक्ति व समष्टींच्या दृष्टीनें जरुरीचा जो काम तो मला दे, अशी प्रार्थना विवाहविधींत येणें उचित, आणि इष्ट असेंच आहे. '**यज्ञो मे कामः समृध्यताम् ।**', '**भगो मे कामः समृध्यताम् ।**' असे मंत्र वधूवरांच्या तोंडीं 'अक्षतारोपण' नामक विवाहान्तर्गत प्रसंगांत घातलेले दिसतात. याचा अर्थ हे यज्ञा, हे भगा, माझा 'काम' समृद्ध कर, असा आहे. 'कुमारसंभव' या कालिदासाच्या प्रख्यात काव्यांत काम हा इंद्राचा हस्तक म्हणून श्रीशंकराची तपश्चर्या भग्न करून त्याला पुत्रोत्पत्ति करण्याची इच्छा व्हावी याकरितां पाठविला

जात आहे अशी कल्पना. अर्थात् पार्वतीच्या ठिकाणीं शंकर रत होण्याच्या दृष्टीनें पार्वतीच्या प्रेमांत शंकर शेवटीं तिचे दास कसे होतात ही रसाळ प्रेमकथा म्हणून तर सर्वांना प्रिय आहेच पण शिवाय 'प्रधानकामाचा' हा एक ध्येयात्मक नमुना म्हणूनहि काम-पुरुषार्थाच्या दृष्टीनें त्या कथेकडे पाहणें मोठें मनोरंजक ठरेल. त्यांत 'काम' ही कल्पना साकार केली असून त्याच्या स्त्रीस 'रति' अशी संज्ञा आहे. रति हा स्पर्शविशेषामुळें होणारा जो अत्युच्च आनंद त्यास दिलेलें नांव. या दांपत्याचा एक परममित्र आहे. त्याचें नांव माधव. माधव म्हणजे वसंत. वसंत-ऋतु हाच कामवासनेस पूरक व पोषक असल्यानें 'माधवा' स 'कामा' चा परम-मित्र म्हणून साकार स्वरूप दिलें. 'काम' आपलें कार्य पुष्पचापानें करीत असतो. वसंतऋतूची अथवा माधवाची सर्व शोभा ही कामाच्या आगमनाची नांदी आहे. कामाच्या कार्याचें तें प्रत्यक्ष नाटकच आहे. त्यांत अशोकाला पुष्पपल्लवादि फुटतात. भ्रमर चूतांकुरांवर बसलेले दिसतात, वन्य जनावरें मदांध होऊन प्रियाशोधनार्थ स्वयंस्फूर्त हिंडत राहातात. या नैसर्गिक वसंतोत्सवाचें वर्णन किती करावें? पुष्कळ कवींना अनंतकाल हा विषय पुरून उरला आहे. तात्पर्य, कामोत्कर्षानें उत्पन्न होणारा शृंगाररस स्थावरजंगम सृष्टीला सर्वत्र व्यापून राहिला आहे.

**तं देशमारोपितपुष्पचापे रतिद्वितीये मदने प्रपन्ने ।**
**काष्टागतस्नेहरसानुविद्धं द्वंद्वानिभाव क्रियया विवव्रुः॥** कुमार. ३.३५

प्रत्यक्ष मदनाची स्वारी रतीसह त्या प्रदेशांत आपल्या पुष्पचापानें सज्ज होऊन आल्यावर सर्व स्थावरजंगम सृष्टीला शृंगाररस जणूं व्यापून राहिला होता. निरानिराळे प्राणी त्यांच्या स्थायीभावामुळें शृंगारचेष्टा करूं लागले तर सर्व सृष्टि फुलाफळांनीं बहरल्यानें शृंगाररसाचा भाव सृष्टींतहि प्रगट होत होता असा वरील श्लोकाचा अर्थ.

प्रधानकामाचा उत्तम नमुना म्हणून शंकरपार्वती-कथा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'काम' ही प्रेरणा अत्यंत मोठी प्रेरक शक्ति आहे. या सहज-प्रवृत्तीचा जोर जीवनांत फार मोठा असतो, हें सत्य कामदेवाच्या मुखांतून कालि-दासानें मोठ्या मार्मिकपणें वदविलें आहे. कामदेव इंद्रास म्हणतो, " कोण असा प्राणी मुक्तिमार्गाचा अवलंब करूं इच्छितो आहे, सांग ! मी त्याला सुंदरीच्या चतुर कटाक्षांनीं आणि भ्रूक्रीडांनीं चिरबद्ध करून टाकतों ! "

"एकपत्नीव्रतामुळें दुःखित झालेल्या स्त्रीस आपण होऊन तुझ्याकडे खेंचून आणतों पाहा."

"माझ्या शरांनीं मी देवांच्या कोणत्याहि शत्रूला हतवीर्य करून टाकतों कीं तो एखाद्या स्त्रीचे कोपस्फुरित अधर पाहूनहि घाबरून जाईल."

शेवटीं इंद्र म्हणतो, 'हे कामदेवा, तुझी शक्ति मला पूर्ण माहीत आहे.' "**अवैमि ते सारमतः खलु॥**" (कुमार. ३. १३.) यावरून काम ही शक्ति सहज-शक्ति असून ती जीवनांत क्रांतिकारक असते, तिचा प्रभाव फार मोठी उलथापालथ करण्यास पुरेसा असतो. त्या शक्तीला कोणालाहि नामोहरम करण्यास फारसें कठिण नाहीं. तिच्या तडाख्यांतून शूर वीरांपासून तों पातिव्रत्याचे संस्कार चिरबद्ध केलेल्या स्त्रीपर्यंत कोणीहि सहसा सुटणार नाहीं. असा या संवादाचा निष्कर्ष आहे.

यानंतरचा मुद्दा म्हणजे ही शक्ति यौवनावस्थेंत जागृत होते. ही जीवनशक्ति वा सहजप्रवृत्ति प्रकट होण्याचा कांहीं विशेष काल असतो. या कालांत मानसिक व शारीरिक बदल आपोआप घडत असतात. त्याचे शारीरिक व मानसिक परिणाम नेहमीं दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय राहात नाहींत. बाल्यावस्थेनंतर येणारी ही अवस्था. पार्वतीच्या बाल्यावस्थेंतील व नंतरचें वर्णन मोठें मार्मिक आहे. बाल्यावस्थेंत स्त्री व पुरुष यांचे खेळहि भिन्न असतात. चेंडूचा खेळ सर्वच मुलें खेळतात तरी बाहुलीची आवड ही विशेष मुलींच्याच ठिकाणीं दिसते. '**सा कंदुकैः कृत्रिमपुत्रकैश्च**' या श्लोकार्धांत हें दिसून येईल. यानंतर येणारी जी यौवनवस्था, तिचें एकाच श्लोकांत खालीलप्रमाणें कालिदासानें वर्णन केलें आहे.

**असंभृतं मंडनमङ्गयष्टेरनासवाख्यं करणं मदस्य।**
**कामस्य पुष्पव्यतिरिक्तमस्त्रं बाल्यात्परं साथ वयः प्रपेदे।** कुमार. १.३१

यौवनावस्थेंतील सौंदर्य हें अयत्नसिद्ध असतें. तें कृत्रिम उपायांनीं सिद्ध केलेलें नसतें. हेंच नैसर्गिक सौंदर्य 'कामाचें' खरें अस्त्र असतें. हेंच शरीरसौष्ठव मदनाच्या खेळाचें निमित्तकारण असतें. यावरून यौवनावस्थेंत होणारे शरिरांतील बदल, त्यामुळें सहज निसर्गतः फुलणारें स्त्रीशरीर हेंच सर्व त्या अवस्थेंतील मानसिक व शारीरिक कामचेष्टांचें एकमेव निमित्तकारण असून तें अयत्नसिद्ध आहे, सहजसिद्ध आहे, त्यास कृत्रिम सौंदर्यप्रसाधनाची जरुरी नाहीं असा स्पष्ट अर्थ कवीला अभिप्रेत

आहे. एखाद्या चित्रकारानें आपल्या कुंचलीनें जसें चित्र रेखाटावें किंवा सूर्य उगवल्याबरोबर जसें कमळ आपोआप उमलूं लागावें त्याप्रमाणें, ही यौवनाची नैसर्गिक शरीरशोभा चतुरस्त्र असून ती यौवनाबरोबर सहजसिद्ध आहे. शरिराचा प्रत्येक भाग त्यांत वेगळा दिसतो. त्यांत वेगळी शोभा येते असें पुढच्याच श्लोकांत कवीनें वर्णन केलें आहे. कामवासनेच्या सर्व चेष्टा प्रौढावस्थेंत (Adolescence) सुरू होतात, हें शास्त्रीय सत्य आहे.

कामदोहदाच्या शारीरिक परिणामाचें हें वर्णन केल्यावर पुढें प्रसंगानें 'प्रेम' या भावनेचा शारीरिक परिणामहि कालिदासानें फार बहारीनें वर्णन केला आहे. हें वर्णन नुसतें काव्यात्मक नसून त्यांत इंद्रियविज्ञान (Physiology) शास्त्रज्ञालाहि भावनोद्वेगाचे शारीरिक परिणाम कसे असतात हें पाहावयास मिळेल. हें करतांना मानसिक स्थितीकडेहि कवीनें काडीइतकेंहि दुर्लक्ष केलें नाहीं. प्रेम ही भावना आंधळी आहे, असा प्रवाद सर्वत्र आहे. याचा अर्थ इतकाच कीं, दुसऱ्या माणसाच्या दोषांकडे या भावनेमुळें नेमकें दुर्लक्ष होतें वा ते दिसतच नाहींत. '**न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते**' या अर्ध्या वाक्यांत कवीनें हा सर्वसामान्य सिद्धान्त ओतून दिला आहे. शेक्सपीअरनें आपल्या एका नाटकांत सुरवातीसच हा सिद्धान्त ड्यूकच्या तोंडीं घातला आहे, 'That it (love) alone is high fantastical.' (Twelfth Night) असो.

कुमारसंभव या काव्याच्या तोडीचें कालिदासाचें दुसरें प्रेमकाव्य म्हणजे शाकुंतल. स्मृतिकारापासून विवाहाचे एकंदर जे आठ प्रकार कल्पिले आहेत, त्यांतील 'गांधर्व' हा विवाह प्रेमावर आधारलेला आहे. प्रेम ही भावना विवाहाचा पाया असावा असें प्रतिपादन हल्लीं पाश्चिमात्य देशांत जोरांत चालू आहे. या विवाहपद्धतीचे गुणदोष कालिदासानें शाकुंतल नाटकांत रेखाटले आहेत.

शाकुंतल या नाटकांत 'गांधर्व' किंवा प्रेमविवाहाचा प्रश्न कालिदासानें फार मार्मिकपणें विवेचिला आहे. कदाचित् समाजांत असे प्रसंग तत्कालीन रूढ परिस्थितींत अनेक वेळां येतहि असावेत. 'सवर्ण कन्येशीं विवाह करावा' हा नियम जुना आहे. दुष्यंतासहि या नियमाची जाणीव प्रेमाच्या सुरवातीसच झालेली दिसून येते. गांधर्व-विवाहांत अत्यंत मोठा दोष म्हणजे दोघांपैकीं एका व्यक्तीनें जर मागाहून नकार दिला तर पुढें काय? शिवाय प्रेमाची मर्यादा गर्भ-

धारणेपर्यंत गेलेली असेल तर स्त्रीची अत्यंत शोचनीय स्थिति ठरलेली असते. ही शोचनीय स्थिति होऊं नये, म्हणून कालिदासानें एका श्लोकांत शार्ङ्गरवाच्या तोंडीं स्त्रीनें गुप्त मैत्री करतांना किती काळजी घेतली पाहिजे याचा इशारा दिला आहे.

**अतः परीक्ष्य कर्तव्यं विशेषात्संगतं रहः ।**
**अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदम् ॥** शाकुंतल ५.२५.

गुप्त मैत्रींत जर चूक झाली तर फार मोठा मित्र हा फार मोठा शत्रु होण्याचा संभव निर्माण होतो. कुटुंबांतील पतिपत्नीसंबंध, त्यांमधील प्रेम, सुप्रजा, आरोग्य, गरजांस धरून योग्य अर्थार्जन, मुलांचा आईबापांबद्दल आदरभाव इत्यादि अनेक गोष्टी एकत्र होऊन जें सुख निर्माण होतें तें गृहसौख्य. परंतु या सर्वांत प्रथम महत्त्वाचे पति-पत्नीसंबंध आणि प्रेम ही गोष्ट असून यशस्वी विवाहाचा तो पाया आहे. यशस्वी विवाह हाच कामशास्त्रकारांचा हेतु आहे, हें मागें दिग्दर्शन केलेंच आहे. पुरुष प्रवृत्ति स्थिर करून कुटुंब उभें करण्याची शक्यता या यशस्वी विवाहावरच अवलंबून आहे. आणि मनुष्य, स्त्री वा पुरुष या दोघांसहि हें एक अमोल विश्रांतिस्थान असून, मनाच्या समाधानाचा एक न आटणारा झरा आहे; ही गोष्ट कामशास्त्रकारांनीं मांडली आहे. गोनर्दीय ऋषींचें मत म्हणून वात्स्यायन ऋषींनीं ‘ एकचारिणीवृत्त ’ या अध्यायांत खालीलप्रमाणें सूत्र घातलें आहे.

**‘ न ह्यतोऽन्यद्गृहस्थानां चित्रग्राहकमस्ति इति गोनर्दीयः ।**
( का. सू. ४. १. ४. )

यापेक्षां दुसरें कोणतेंहि सुख गृहस्थास जास्त चित्ताकर्षक असत नाहीं; असा स्पष्ट अभिप्राय या सूत्रांत आहे. तेव्हां हें मिळविण्याकरितां कांहीं विचार आणि शास्त्र बनविणें महत्त्वाचें आहे हें निर्विवाद सत्य आहे.

# प्रकरण ३ रे

## यशस्वी विवाह

**वैवाहिक यशाचीं तीन साधनें–यशस्वी विवाहाचें मोजमाप–विवाहपूर्व विचार–भावनोद्रेक हा विवाहाचा पाया अयोग्य –वात्स्यायनीय प्रीतिप्रकार—वैदिक विवाह-संस्कार.**

**वैवाहिक यशाचीं तीन साधनें :**

मनुष्याच्या मूलभूत सुखांत निश्चित भर टाकणारी 'यशस्वी विवाह' हीच गोष्ट असून ती गृहसौख्यास कारणीभूत होत असते. पाश्चिमात्य देशांतहि याची जाणीव उत्पन्न झालेली आहे हें प्रो. बोमन यांच्या खालील उद्धरणावरून दिसून येईल.

" If successful marriage is a goal worth striving for, it may be set up as a definite objective. " (Bowman p. 34.)

" यशस्वी विवाह ही जर विलोभनीय गोष्ट असेल तर ती निश्चयानें मिळविण्यासाठीं तें ध्येय म्हणून पुढें ठेवावें. " यशस्वी विवाह व तदंतर्गत गृहसौख्य हें विवाहाचें ध्येय असावें यासंबंधीं दुमत होण्याचा फारसा संभव नाहीं.

वैवाहिक यश मुख्यतः ज्या गोष्टींवर अवलंबून आहे त्यांचें एका सूत्रांत कामशास्त्रकारांनीं दिग्दर्शन केलें आहे.

सवर्णायामनन्यपूर्वायां शास्त्रतोऽधिगतायां धर्मोऽर्थः।
पुत्राः संबंधः पक्षवृद्धिः अनुपस्कृता रतिश्च । का. सू. ३.१.१

( सवर्ण कुमारिकेशीं शास्त्रशुद्ध रीतीनें विवाहबद्ध झाल्यास धर्म, अर्थ, पुत्र, संबंध, पक्षवृद्धि व उत्तम रति यांची प्राप्ति होते. )

वरील सूत्रांत वैवाहिक यशाकरितां लागणाऱ्या सर्व गोष्टी सूत्रमय पद्धतीनें प्रथम एकत्र आणलेल्या दिसतात. त्यांत धर्म व अर्थ हे सामान्य शब्द सोडल्यास ' पुत्राः ' हें पद विवाहाच्या ' सुप्रजा ' या ध्येयास धरून आहे. ' अनुपस्कृता रतिः ' हें पद वैवाहिक जीवनांतील रतिसुखाला उद्देशून आहे. स्त्री ही पुरुषगृहीं येत असल्यानें पुरुषाशीं तिच्या व्यक्तिमत्त्वाची जुळवणूक व्हावी व त्यामुळें सासर-माहेरचे संबंध सलोख्याचे राहून सासरच्या गृहाची ' पक्षवृद्धि ' व्हावी या गोष्टीस धरून ' संबंधः पक्षवृद्धिः ' हीं पदें आणलेलीं आहेत. अर्थात् विवाहपूर्व विचारांत कन्येचें सवर्णत्व व शास्त्रशुद्ध विवाह या गोष्टी अभिप्रेत असून अशा प्रकारें विवाह झाल्यासच वैवाहिक यशास किंवा गृहसौख्यास जरूर त्या उपरिनिर्दिष्ट गोष्टी प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो असें शास्त्रकारांचें मत आहे. आजहि ( १ ) सुप्रजा, ( २ ) रतिसुख व ( ३ ) व्यक्तिमत्त्वाची जुळणी, याच गोष्टी वैवाहिक यशास कारणीभूत मानल्या जातात. याच मुख्य तीन बाबींवर यशस्वी विवाहाची इमारत अवलंबून असते. डॉ. वॉकर म्हणतात, " For a completely successful marriage, harmony on three different planes is necessary : the intellectual, the emoional and the sexual. "

( K. Walkar, p. 82 )

याचा अर्थ असा कीं विवाह जर संपूर्ण यशस्वी म्हणावयाचा असेल, तर दोन व्यक्तींचें बौद्धिक, भावनात्मक व लैंगिक असें तिन्ही प्रकारचें एकत्व सिद्ध झालें पाहिजे. डॉ. हॅव्हलॉक एलिस म्हणतात——

" To the truly successful marriage there go not only an erotic harmony but a union of many–sided and ever developing non-erotic affection, a community of tastes and feelings, of interests, a life in common, a probability of shared parenthood and often an economic union. "

( Ellis, quoted by K. Walker, p. 82 )

ध्येयात्मक यशस्वी विवाहास नुसतें शृंगारिक ( भावनात्मक वा लैंगिक ) एकत्वच पुरत नाहीं. परंतु त्याशिवाय दोघांच्या आवडी निवडी, संतति, कल, वासना, भावना, ( Interests & feelings ) आर्थिक एकत्व इत्यादि पुष्कळ गोष्टींत एकत्व साधावें लागतें. हॅलॉक एलिस हे या आभ्यासांत जन्मभर कष्ट केलेले निस्वार्थी ऋषीच होत. त्यांचें हें स्पष्ट मत पाहिलें म्हणजे भारतियांचा दृष्टिकोन

फारसा वेगळा होता असें म्हणणें कठिण होईल. तेव्हां भारतियांचा यशस्वी विवाहाचा विचार व पाश्चिमात्यांचा विचार, यांत फारसा फरक दिसत नाहीं. पण यापुढें मात्र सर्व गुंतागुंत आणि वैचारिक गल्लत सुरू होते. यशस्वी विवाहास कारणीभूत असणाऱ्या उपरिनिर्दिष्ट तीनही मुद्यांचा विस्तृत विचार पुढील प्रकरणांतून आला आहे. येथें फक्त वैवाहिक यशास धरून विवाहपूर्व विचार लक्षांत घ्यावयाचा असून शिवाय विवाहसंस्कारासंबंधीं शास्त्रकारांचा दृष्टिकोन समजून घ्यावयाचा आहे.

**यशस्वी विवाहाचें मोजमाप :** येथें 'यशस्वी विवाह' समजावयास कांहीं मोजमाप आहे काय ? विवाहास 'यशस्वी' ही संज्ञा केव्हां द्यावयाची यासंबंधीं थोडें विवेचन करणें जरूर आहे. विवाहाचें यश व अपयश मोजण्यास कांहीं सर्वमान्य फूटपट्टी आस्तित्वांत नाहीं, हें प्रथम समजून घेतलें पाहिजे.

असें एकच एक वस्तुनिष्ठ प्रमाण ( objective criterion ) नाहीं, कीं जें लावलें असतां विवाहाचें यश ताबडतोब गुणाकार-भागाकार करून मोजून टाकतां येईल. विवाहाचें यशापयश त्या त्या जोडप्यासच खरें माहीत असतें. दुसऱ्याला त्याची वरवर सुद्धां कल्पनाहि येणें कठिण. एक गोष्ट मात्र खरी कीं, यशस्वी विवाह ही एक सावकाश, धीरानें आणि कष्टानें प्रगत होत होत उत्पन्न होणारी गोष्ट असून, ती विवाहित स्त्री-पुरुषांस स्वतःच्या अनुभवास येणारी गोष्ट आहे. हा अनुभव अपयशापासून यशापर्यंत निरनिराळ्या दर्जाचा असून त्याचा पृथक्करणात्मक विचार करतांना प्रत्येक समाजांतील विवाहविषयक कल्पनांचा विचार करावा लागतो. फार संपूर्ण यश व संपूर्ण अपयश अशा दोन्ही बाजू जरी सोडल्या, तरी सर्व मंडळींचे विवाह चालचलाऊ यशस्वी होतात. आणि म्हणूनच टिकून राहातात. अर्थात्, त्यांत संतति आपोआप होतच असते. दुसरें कांहीं करतां येत नाहीं; संधि नाहीं, म्हणून व्यक्तिमत्त्वहि जमवून घ्यावें लागतें आणि शेवटीं यशापयशाच्या मोजमापांत तो आपोआप यशाच्या कांहीं कमींतकमी दर्जात येऊन बसतो. विवाहाचें यशापयश मोजण्यास जरी कांहीं सर्वमान्य शास्त्रीय गमक वा प्रमाण नसलें तरी त्या त्या समाजांत सांस्कृतिक मूल्यें काय असतात हें पाहाणें इष्ट असतें. त्या मूल्यांप्रमाणें व्यक्तिगत आशाआकांक्षांवर परिणाम होत असतात व त्यामुळें कुटुंबांतील व्यक्ति-

मत्त्वाच्या घडणीस व जुळणीस मदत होत असते. याकरितां पुढील यशस्वी विवाहा-वरील भारतीय दृष्टिकोनाची चर्चा खालील तीन मुद्यांस धरून होईल.

( १ ) भारतीय दृष्टिकोनांतून यशस्वी विवाहाचा काय ध्येयवाद प्रस्थापित केला गेला होता ? त्यासंबंधीं काय आचार ग्राह्य धरले होते ?

( २ ) परिस्थितीशीं जुळतें घेण्यासाठीं काय योजना आंखल्या होत्या ? या योजनांत ध्येयास धरून काय संस्कार उत्पन्न करण्याचा त्यांचा प्रयत्न होता ?

( ३ ) ज्या कौटुंबिक घटना त्यांनीं मान्य केल्या होत्या त्यांच्या मागें, शास्त्रीय ज्ञानाचा त्यांनीं फायदा घेतला होता असें म्हणण्यास कांहीं जागा आहे काय ?

ध्येय हें आचारनिश्चितीस धरून प्रत्यक्ष परिस्थितीस थोडीबहुत घडण देण्यास नेहमींच मदत करीत असतें. म्हणून कोणत्याहि समाजांत कोणत्याहि आचाराच्या क्षेत्रांत योग्यायोग्यतेचा विचार हा कांहींतरी ध्येयास धरून असतो. त्यामुळें सर्व-सामान्य पातळी ( average ) थोडीबहुत तरी कांहीं अंशीं वरवर येत असते; आणि विवाहांतील यशापयश, हें ध्येयास धरून शेवटीं व्यक्ति पाहात असल्यानें, ज्यांस इंग्रजींत ' नॉर्म ' म्हणतात, त्यावर या ध्येयाचा कांहीं परिणाम होतच असतो. विवाहांतील ' सामान्यत्वासंबंधीं ' (Norm) विवेचन करतांना डॉ. बोमन लिहितात.

" Successful marriage is a dynamic growing relationship which the personalities of both partners continue to develop. ( P. 328 ) No criterion of success is sufficient alone. Several must be used in conjunction before any judgement upon a particular marriage be passed. (P. 329) There are really three norms of success. (1) The ideal set up by the society. (2) the type of marriage that society allows to get by And (3) the norm set up by the individual as to what he wants from marriage and expects it to be. (Bowman. p.330). तेव्हां त्या त्या समाजांत जीं ध्येयें म्हणून उत्पन्न होतात तीं काय आहेत; प्रत्यक्षांत काय चालू शकतें; याची माहिती आणि व्यक्तिगत अपेक्षा यांवर जरी वैवाहिक यश अवलंबून असलें तरी भारतियांच्या दृष्टीनें मागें निर्देश केलेल्या सुप्रजा इत्यादि तीन गोष्टी यशस्वी विवाहास धरून मूलभूत असल्यानें त्यांची प्राप्ति

वैवाहिक सौख्य व यश निश्चित करण्यास कारणीभूत होते. भारतियांच्या मतें याच गोष्टी वैवाहिक सुखास कारणीभूत होत असतात. या प्राप्त करून घेण्यासाठीं संपूर्ण विवाहपूर्व व विवाहांतर्गत आचार स्त्रीपुरुषांच्या, हितसंबंधांचें, अपेक्षांचें, शारीरिक व मानसिक भिन्नत्वाचें, कौटुंबिक व सामाजिक गरजांचें, निरीक्षण करून भारतियांनीं कित्येक शतकांपूर्वी निश्चित करून, त्याचें शास्त्र बनविलें आहे. हे आचार कांहीं प्रमाणांत आजहि अस्तित्वांत आहेत. भारतीय शास्त्रज्ञांनीं वैवाहिक यशापयशाचा संपूर्ण विचार करून, त्यासंबंधीं ध्येय कांय असावें, ध्येयप्राप्तीसाठीं ध्येयाचार काय असावा, सामाजिक व व्यक्तिगत विविधता लक्षांत घेऊन, निरनिराळे कोणते प्रकार समाजांत चालू ठेवल्यास चालतील, वगैरे सविस्तर विचार केला आहे.

**विवाहपूर्व विचार :** यशस्वी विवाह होण्यास पुष्कळ गोष्टींची आवश्यकता आहे "**सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः**" या न्यायानें अर्थहीनत्व सर्वच ठिकाणीं जाचक ठरतें. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, जविनमान (Standard of living) फार खर्चाचें किंवा अमेरिकन असल्याशिवाय सुखोत्पत्ति नाहीं. पण ज्या समाजश्रेणींत आपण असूं, त्याप्रमाणें मूलभूत गरजांना धरून अर्थार्जन असणें आवश्यक आहे. म्हणूनच पूर्वाचार्यांनीं क्रम सांगतांना चतुर्विध-पुरुषार्थांत अर्थानंतर कामाची योजना केलेली आहे. कोणत्याहि दोन पुरुषार्थांत संघर्ष निर्माण झाल्यास, वात्स्यायन स्पष्टपणें सांगतात कीं, 'पूर्वः पूर्वो गरीयान्' पुढच्यापेक्षां मागचा श्रेष्ठ. हल्लींच्या जीवनमानाच्या कल्पना कांहीं अंशीं दोषपूर्ण असून जीवनमान म्हणजे खर्चिक राहणी असा अर्थ होत असून खर्चिक राहणी म्हणजे सुखोत्पत्ति असा सर्वत्र भास निर्माण होऊं पाहात आहे. तसें असतें तर श्रीमंतास दुःखबाधा सहसा दिसली नसती. मुद्दा एवढाच कीं, मनुष्याच्या मूलभूत गरजा व त्यांचें समाधान ( Solid satisfactions of life ) या गोष्टी फक्त खर्चिक राहणीवर अवलंबून नाहींत. भारतीय धर्मशास्त्रकारांनीं कन्याग्रहणाकरितां पाहावयाच्या गोष्टींचें यथायोग्य दिग्दर्शन केलें आहे. कामशास्त्रकारांनींहि 'वरणसंविधान' असा वेगळा अध्याय लिहून धर्मशास्त्रकारांचेंच मत तत्त्वतः प्रतिपादन केलें आहे. सवर्ण कन्येशीं विवाह करावा हा नियम दोघांनींहि सारखाच सांगितला आहे. यानंतर कन्येची प्रकृति निरोगी व निकोप असावी असा नियम येतो. टीकाकार यशोधरानें "**स्वभावतः न रोगवच्छरीरं यस्याः**"

असे शब्द वापरले आहेत. यावरून कन्येंत कोणताहि आनुवंशिक व परिस्थितिजन्य मूलभूत दोष असूं नये असा अर्थ.

स्मृतिकारांनीं याबाबत स्पष्टपणें खालील नियम दिला आहे :

**हीनाक्रियं निष्पुरुषं निश्छन्दोरोमशार्शसम् ।**
**क्षय्यामयाव्यपस्मारिश्वित्रिकुष्ठिकुलानि च ॥** मनु. ३.७

ज्या कुलांत क्रियाहीनत्व आहे, पुरुषसंतति नाहीं, क्षय, अपस्मार, अग्निमांद्य, कुष्ठ इत्यादि रोग आहेत अशीं कुलें वर्ज्य करावींत; असे स्पष्ट नियम घालून दिले आहेत.

यावरून निकोप प्रकृति ही गोष्ट आमच्याकडे 'वरणसंविधानांत' किती महत्त्वाची समजली गेली, हें सहज सिद्ध होतें. आतां याशिवाय स्पृहणीय कुलाचार, शीलसंपन्न मातापितरादि माणसें, सुस्वभावता, वय आणि स्वरूप यांहि गोष्टींचा विचार करावा असें वत्स्यायनीय मत आहे. या सर्व गोष्टी मनूनेंहि सांगितल्याच आहेत. विवाहांत आजहि सामाजिक पातळी पाहिली जाते. यांत कुल व आचारांचा सहजच समावेश होतो. स्वरूप हा आजहि कन्येच्या विवाहांतील हुकमी एक्का आहे व तो तसाच राहणार. स्त्री व पुरुष यांचें विवाहयोग्य वय किती असावें यासंबंधीं निरनिराळीं मतें दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें वधूवरांच्या वयांत अंतर किती असावें यासंबंधींहि मतभिन्नता दृष्टीस पडते. तेव्हां यासंबंधीं कांहीं विचार येथें देणें जरूर आहे. पुरुषाच्या बाबतींत शक्यतेप्रमाणें व अधिकाराप्रमाणें विद्यार्जन करून अर्थार्जनक्षमता त्याच्या अंगीं आल्याशिवाय विवाह नाहीं. ब्रह्मचर्याश्रमांत ही सर्व कर्तृत्वशक्ति पुरुषानें वाढवावयाची असते. हल्लींच्या कालांतहि हें सर्व घडून येण्यास साधारण २४ पर्यंत वय सहजच प्राप्त होतें व हेंच वय पुरुषास विवाहास योग्य समजावें. स्त्रीसंबंधीं '**प्रदानं प्रागृतोः**' ऋतुप्राप्तीपूर्वी विवाह हा एक आग्रह. स्मृतिकारांच्या मतें (मनु. ९.९३-९४) स्त्रीचें वय ८ ते १२ व पुरुषाचें २४ ते ३० असावें असें दिसतें. कामशास्त्रकारांच्या म्हणण्याप्रमाणें पुरुष हा विद्यार्जन करून अर्थार्जनास प्रथम योग्य झालाच पाहिजे व पुरुषापेक्षां स्त्री ३ वर्षें लहान असावी. म्हणजे सहजच पुरुषाचें वय २४ पर्यंत येतें व स्त्रीचें २०—२१ पर्यंत येतें. देशाचार व अनुकूलता या गोष्टी लक्षांत घेऊन ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष वा दैव यांपैकीं कोणताहि विवाह करावा. असें कामशास्त्रकार (का. सू. ३-१-१९) म्हणतात. यावरून हे चारहि प्रकार कामशास्त्रकारांच्या वेळीं अस्तित्वांत होते असें दिसतें. त्याचप्रमाणें

कामशास्त्रकारांच्या वेळीं स्त्रीचें वय २० पर्यंत घेण्यासहि हरकत नव्हती असें दिसतें. परंतु ‘ कन्यासंप्रयुक्तकम् ’ या अधिकरणांत बाला, कन्या व प्रौढा असे तिन्ही शब्द येत असून यांना वश करून घेण्याकरितां, विश्वास उत्पन्न करण्याचे प्रकार वेगवेगळे सांगितले आहेत. यावरून देशाचार, लोकाचार व परिस्थितिभिन्नत्वानें स्त्रीचें विवाहयोग्य वय बालापासून प्रौढापर्यंत अस्तित्वांत होतें, असें दिसतें. तात्पर्य, वयासंबंधीं एकवाक्यता फारशी नव्हती. कन्यादानानें बालविवाह हा बहुसंख्य समाजांत कालांतरानें रूढीनें स्थिर झाला होता असें दिसतें.

आरोग्य व इतर गोष्टी लक्षांत घेऊन स्त्रीचें साधारण वय १६ ते १८ पर्यंत असणें इष्ट ठरेल. प्रजोत्पादनाच्या उद्देशानें पाहूं गेल्यास स्त्री-पुरुषांतील वयांमधील अंतर ७ ते १५ वर्षांपर्यंत धरण्यास हरकत नाहीं. स्त्रीची प्रजोत्पादनक्षमता २० पासून ४५ पर्यंत झपाट्यानें कमी कमी होत जाते. पुरुषाची प्रजोत्पादनक्षमता ६० वर्षांपर्यंतहि असूं शकते. यामुळें पुरुषावर प्रजोत्पादनार्थ उंच वयांत विवाह करण्याचा प्रसंग आल्यास स्त्रीचें वय बरेंच कमी असणें जरूर आहे. फक्त विवाहप्रसंगीं पुरुषाचें वय २४ असल्यास ७ वर्षांचें अंतर पुरेसें होईल. लहान वयांत विवाह केला तरी कांहीं अंतराची आवश्यकता आहेच. यामुळें प्रजोत्पादनास जास्त काळ लाभतो. ज्यांच्या वांट्यास प्रजाहीनत्वासारखी ( Infertility ) परिस्थिति येते, त्यांना याचा फायदा कळण्यासारखा आहे. तात्पर्य, स्त्रीचें वय पुरुषापेक्षां लहान असणें प्रजोत्पादनक्षमतेच्या दृष्टीनें योग्य असून, त्यांतील कमी-जास्त अंतर पुरुषाच्या विवाहाच्या वयावर ठरवावें लागेल. प्रजोत्पादन हा विवाहाचा उद्देशच नसल्यास मात्र सर्वच विचार वेगळा आहे. भारतियांचा ‘ सुप्रजा ’ या वैवाहिक उद्देशावरच भर असल्यानें त्यांनीं पुरुषांपेक्षां स्त्री लहान व त्यांत कांहीं निश्चित अंतर मान्य केलें. वरील चर्चेवरून स्मृतिकारांनीं दिलेलें स्त्री-पुरुषांतील अंतर बुद्धिगम्य ठरतें. मात्र व्यक्तिमत्त्वाच्या अडचणीचें निराकरण करण्याकरितां फक्त लहान वयांतच स्त्रीचें व्यक्तिमत्त्व पुरुषकुलांत वाढत जाणें जास्त फायदेशीर ठरतें.

हल्लीं विवाहाचें वय उच्चवर्णीयांत आपोआपच वाढत चाललें आहे. शिक्षण, महत्त्वाकांक्षा, बौद्धिक वाढ, विवाहासंबंधीं कमी झालेली आस्था, स्वतःच्या व जीवनमानाच्या अवास्तव कल्पना आणि शेवटीं अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे आर्थिक अडचणी, या सर्व गोष्टींमुळें विवाहाचें वय उच्चवर्णीयांत सारखें वाढतच

चाललें आहे. प्रौढ कुमारिका हाच एक मोठा प्रश्न उत्पन्न होत असून ‘ सरकारी नोकऱ्या ’ व ‘ आर्थिक स्वातंत्र्य ’ यांनीं तो सुटणारा नाहीं. पुरुषास नोकरी व स्त्रीस विवाह, याऐवजीं स्त्रीस नोकरी व पुरुषास बेकारी असें समीकरण होत चाललें असून यामुळें स्त्री व पुरुष दोघांनाहि विवाह दुरावत चालला आहे. व्यक्तिगत व सामाजिक स्थैर्य या दृष्टीनें ही परिस्थिति काम-पुरुषार्थास अत्यंत विघातक आहे. येथें मुद्दाम एवढेंच नमूद करावयाचें कीं, सुबुद्ध मंडळींनीं आर्थिक अडचणी नसल्यास हें विवाहाचें वय फारसें वाढविण्याच्या भानगडींत पडूं नये व सुप्रजेच्या दृष्टीनेंच विवाहपूर्व सर्व विचार करावा. स्त्रीशिक्षणांतहि विवाह हें स्त्रीचें एक महत्त्वाचें कार्यक्षेत्र असून पदवी, कला, नाट्य यांच्यासारख्या गोष्टींकरितां विवाहाचा त्याग करूं नये, हा दृष्टिकोन चांगला.

अमेरिकेंत सध्यां विवाहाचें वय साधारणपणें स्त्रींत २०–२१ व पुरुषांत २४ पर्यंत सांपडतें. व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक इत्यादि वाढीचा विचार करून साधारणतः विवाहाचें वय विशीच्या आंत-बाहेर असणेंच योग्य आहे, असा डॉ. बोमन यांनींहि निष्कर्ष काढला आहे. यावरून पाश्चिमात्य विचारवंतहि विवाहाचें वय फार वाढवीत जावें अशा विचाराचे नाहींत, हें दिसून येईल.

वरील मुख्य विचाराशिवाय इतरहि गोष्टींचा विचार सांगितला गेला आहे. उदाहरणार्थ, स्मृतिकारांनीं ज्या कुलांत कन्या जास्त किंवा कन्येस भाऊ नाहीं ( निष्पुरुष ) असें कुल वर्ज्य करावें असें सांगितलें आहे. जुन्या काळीं संततीमध्यें कन्येपेक्षां पुत्रास वरचें स्थान असल्याकारणानें किंबहुना पुत्रसंतति ही फार जरुरीची समजली गेली असल्यानें ही गोष्ट दर्शविली गेली असणें शक्य आहे. याशिवाय शास्त्रीय दृष्टीनें या गोष्टीचें सत्यत्व पडताळून पाहाणें महत्त्वाचें ठरेल. मोठ्या आंकडेवारीनें अभ्यास करण्यापूर्वी, साधारण चौकस बुद्धीनें पाहिल्यास कन्येच्या कुटुंबांत मुलींची संख्या फार असल्यास त्या कन्येस जास्त मुली होण्याचा संभव दिसतो हें खरें.

स्त्री व पुरुष यांत फरक काय वगैरे तत्त्वज्ञानांत येथें आपणांस पडावयाचें नाहीं. अशक्य असलें म्हणजे असेल त्यांत संतोष मानावा हें ठीकच. “ आपणांमध्यें जे श्रेष्ठ पुरुष होऊन गेले ते त्या घराण्यांत मुलांची संख्या मुलींच्या संख्येपेक्षां जास्त होती अशाच घराण्यांत निपजलेले दिसतात. ” असें हॅव्हलॉक एलिस यांचें मत श्री. गो. म. जोशी यांनीं उद्धृत केलें आहे.

मागें उद्धृत केलेल्या श्लोकांत 'हीनक्रिय' असें एक पद येतें. ज्या कुलांत हीनक्रिया आहे त्यांत कार्यक्षमता, शिस्त व इतर गुण कमी असण्याचा संभव दर्शविला जातो. म्हणून हीं कुलें वर्ज्य सांगितलीं असावीं. नक्षत्र, नदी, वृक्ष इत्यादींचीं नांवें असलेली कन्या वर्ज्य करावी असें स्मृतिकार व कामशास्त्रकार या दोघांनींहि सांगितलेलें दिसतें. परंतु याचा गर्भितार्थ आम्हांस समजत नाहीं. त्या काळीं या नांवांनीं काय पाप केलें होतें हें कळण्यास आज मार्ग नाहीं. याशिवाय कठोर भाषण करणारी स्त्री वर्ज्य समजावी. 'न वाचाटां' अशी स्मृतिकारांनीं एक मोठी मार्मिक सूचना दिली आहे. अशी स्त्री वैवाहिक यशाच्या दृष्टीनें अयोग्य ठरण्याचा संभव जास्त असतो. याशिवाय कामशास्त्रकारांनीं पळून गेलेली, विवाहपूर्वदूषित झालेली, अनम्र आणि पतिहितास विघातक अशी कन्या वर्ज्य करावी असें सांगितलें आहे. वरील चर्चेपैकीं स्वरूप, आरोग्य, कुलांची इष्टानिष्टता इत्यादि पाहाणें सहज शक्य असतें. पण स्वभाव, कठोरता इत्यादि गोष्टी कशा पाहाव्या असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. म्हणून शेवटीं कांहीं व्यावहारिक निकष लावणें क्रमप्राप्त होतें. वरील चर्चेस धरून कन्येची शक्य तेवढी माहिती करून घेतल्यावर चार कन्या प्रत्यक्ष पाहून शेवटीं एकच कन्या पसंत करणें, त्या काळीं वा आजहि प्रत्येकास भाग पडतेंच. कोणत्याहि व्यक्तीसंबंधीं सर्व गोष्टी—विशेषतः स्वभावासारख्या—माहीत होणें कठिण असतें. म्हणून शास्त्रकार व्यावहारिक सूचना देतात कीं,

**या गृहीत्वा कृतिनं आत्मानं मन्येत न च समानैः निंद्येत तस्यां प्रवृत्तिः ।** (का. सू. ३.१.३).

जी पसंत केली असतां स्वतःस कृतार्थता झाली असें वाटतें, आणि समान मंडळींकडून जीमध्यें दोष काढण्याची शक्यता राहात नाहीं, अशा कन्येस होकार द्यावा असा याचा अर्थ. योग्य विचारावर आधारलेला मनाचा कल, शेवटीं कौल देण्यास समर्थ असतो असा याचा गर्भितार्थ आहे.

**सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः ।**

शाकुंतल १.१९

संदेहकाळीं अंतःकरणप्रवृत्ती शेवटीं प्रमाण मानाव्या असा निष्कर्ष. पण त्यास अट एकच. त्या प्रवृत्ती सद्बुद्धींतूनच उत्पन्न झाल्या असल्या पाहिजेत.

क्रमांक ........११६६....... नों: दि: ........


म्हणून 'सतां' हें विशेषण लावलें. विचाराची दिशा योग्य असल्यास सहजच योग्य आचार घडणें शक्य असतें.

वरील सर्व चर्चा कन्येचें वर्णन व निश्चय करणारी झाली. पण यावरून वरासबंधीं कांहीं उल्लेखच नाहीं, असा स्त्रियांनीं ग्रह करून घेऊं नये.

**' नरः कलासु कुशलः ', ' कलानां ग्रहणादेव सौभाग्यमुपजायते '**
का. सू. १.३.२१.

**" गृहीतविद्यः प्रतिग्रहजयक्रयनिर्वेशाधिगतैरर्थैरन्वयागतैरुभयैर्वा गार्हस्थ्यमधिगम्य नागरकवृत्तं वर्तेत । "** का. सू. १.४.१.

कामशास्त्रकारांनीं गृहस्थाश्रम स्वीकारण्यापूर्वीं वरानें कसें असावें याचा वरील वचनांत निर्देश केला आहे. वर ब्राह्मण असल्यास सुविद्य असावा, क्षत्रिय असल्यास आपल्या वृत्तीमध्यें निष्णात असावा आणि शूद्र असल्यास आपल्या कर्मांत वाकबगार असावा. याप्रमाणें ज्यानें, आपल्या अधिकाराप्रमाणें अर्थपुरुषार्थ साध्य केला आहे, असा वर असावा.

याशिवाय " **अविलुप्तब्रह्मचर्यो** " असा नियम आहेच. वराचें ब्रह्मचर्य लुप्त झालेलें नसावें. " तात्पर्य, वर हा अर्थार्जनास योग्य व ब्रह्मचारी असावा असा कटाक्ष वरसंशोधनाच्या कामीं दिसतो. ' कन्या ' दाखविण्यासंबंधीं तत्कालीन रीत काय होती याचा निर्देश वात्स्यायनानें एका स्वतंत्र सूत्रांत केला आहे.

" **कन्यां चैषामलंकृतां अन्यापदेशेन दर्शयेयुः ।** " का. सू. ३.१.१६
( दुसऱ्या कांहींतरी कार्याचा बहाणा करून अलंकृत अशी कन्या सहज दाखवावी. )

हल्लींचा कन्या पाहाण्याचा तमाशा त्या काळीं नव्हता असें दिसतें. उलट विवाहनिश्चयापूर्वीं कन्येचें हल्लींच्या प्रकारांत जें निष्कारण प्रदर्शन होतें तें होण्याचा प्रसंग टाळावा असेंच निदान वात्स्यायनाचें तरी मत दिसतें. दुसऱ्या कांहींतरी कार्यनिमित्तानें जी दृष्टादृष्ट होते त्यांत स्त्रीचा स्वाभिमान कायम राहून मनावर अनिष्ट परिणाम होण्याचें कारण राहात नाहीं. वात्स्यायनीय काळांत सध्यांपेक्षांहि स्त्रीच्या मनाची व मानाची हल्लींपेक्षां जास्त काळजी घेतली जात होती असें म्हणणें अतिशयोक्त ठरेल काय ? खेळ, मैत्री व विवाह या गोष्टी समपातळींतील लोकांशींच करणें इष्ट ठरतें, असाहि इशारा वात्स्यायनानें शेवटीं दिला आहे.

समाजांत विवाहप्रसंगीं पत्रिका, ज्योतिष, शकुन वगैरे पाहण्याची प्रथा आजहि सर्वत्र आढळते. यासंबंधीं येथें वात्स्यायनाचें मत काय आहे तें पहाणें जरूर आहे. दैव, निमित्त, शकुन वगैरे पाहावेत असा कामशास्त्रकारांचा अभिप्राय आहे. दैव या शब्दानें भविष्य वा ग्रहनक्षत्रादियोग असा अर्थ अभिप्रेत आहे. परंतु पुढील सूत्रांत " **न यद्दच्छया केवलं** " असा निर्देश असून केवळ इच्छेस आलें तें केलें असें मात्र होऊं देऊं नये. सर्व आप्तेष्टांची संमति घ्यावी असा याचा गर्भितार्थ आहे. यावरून विवाहपूर्व विचारांत सर्व बुद्धिगम्य विचार, ग्रहनक्षत्रयोग व आप्तेष्टांची संमति एवढ्या गोष्टी जमल्यास बरें असें शास्त्रकारांना सांगावयाचें आहे. ग्रहनक्षत्रयोगासंबंधीं आम्ही एवढेंच सूचवून ठेवतों कीं, हें शास्त्र अत्यंत सूक्ष्म अवलोकनाचें असून पोटार्थी लोकांच्या हातीं गेल्यानें कोणत्याहि शास्त्राची हानि व कुप्रतिष्ठा होते तीच ज्योतिषशास्त्राचीहि दशा झाल्याचें पुष्कळांच्या परिचयाचें असलें तरी त्यावरून ' तें शास्त्रच नव्हे ' असें मात्र नव्हे.

डॉ. बोमन यांनीं आपल्या पुस्तकांत हा विवाहपूर्व विचार सविस्तर दिला असून त्यांत आरोग्य, आनुवंशिक रोगांना धरून कुलांची इष्टानिष्टता, दोन्ही व्यक्तींच्या कुलाचारांतील फरक, आईबाप व घरांतील इतर नातेवाईक यांची वर्तणूक, स्त्रीचा जीवनासंबंधीं दृष्टिकोन इत्यादि विषय आले आहेत. त्यावरूनहि वात्स्यायनऋषींनीं शेंकडों वर्षांपूर्वी सांगितलेलीं गमकेंच आजहि सांगण्याची पाळी कशी येते हें सहज दृष्टीस पडेल. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या समपातळींत विवाह करण्याचा सल्ला वात्स्यायनानें दिलेला आजहि फारसा बदलण्याचें कारण नाहीं. डॉ. बोमन यांनीं व्यक्तीव्यक्तींतील आर्थिक, धार्मिक व वांशिक ( racial ) फरक पुढें वैवाहिक जीवनांत कशा अडचणी उत्पन्न करतात व त्यामुळें वैवाहिक सौख्य बिघडण्याचा कसा संभव असतो याचें प्रतिपादन केलें आहे. खुद्द अमेरिकेंत आजहि नीग्रो व गोरे यांचा विवाह कित्येक संस्थांतून कायदेशीर होऊं शकत नाहीं इतका पूर्वग्रह-दूषित भाग या गोष्टींमध्यें आहे. गरीब घराण्यांतील वर व श्रीमंत घरण्यांतील वधू यांचे संबंध कित्येक धुसफुशींना कसे कारणीभूत होतात याचा आजहि अनुभव वेगळा नाहीं. कॅथॉलिक, प्राटेस्टंट या भिन्नपंथियांचे विवाह आज प्रत्यक्ष अमेरिकेंत-सुद्धां दुरापास्त होऊन बसलेले असून, ते घडूं नयेत असेच या दोन्ही धर्मसंस्थांचे प्रयत्न आहेत. निदान अशा विवाहांना समाज व धर्मसंस्था उत्तेजन तर निश्चित

देत नाहींत. असा विवाह घडण्याचा प्रसंग आलाच तर विवाहापूर्वी एका करारपत्रावर सही करण्याचा प्रसंग येतो. अशा विवाहांत भिक्षुक कॅथॉलिक असावा कीं प्राटेस्टंट असावा यावरहि खडाजंगी उडते आणि यांतून पुष्कळ कौटुंबिक तंटे निर्माण होतात. त्याचप्रमाणें ज्यू व खिश्चन या भिन्नधर्मियांचाहि विवाह होणें कठिण असून त्यांचेहि प्रश्न प्रॉटेस्टंट–कॅथॉलिक पंथियांसारखे अवघड आहेत. वयाच्या अंतरासंबंधीं त्यांच्याकडेहि आज स्पष्ट अशी विचारसरणी दिसत नाहीं. साधारण ३–४ वर्षें इतकें अंतर नेहमीं असतें. पुरुषापेक्षां स्त्री मोठी असल्याचीं उदाहरणेंहि पुष्कळ आहेत. फार अंतरांचे विवाहहि आहेत. एकंदरींत या मुद्यांसंबंधीं जास्त स्पष्ट विचार नसून आपल्याकडील विचारच जास्त स्पष्ट व बुद्धिगम्य दिसतात.

विवाहापूर्वी वैद्यकीय तपासणी स्त्री-पुरुषांस असावी असा एक प्रचार हल्लीं पाश्चिमात्यांत अस्तित्वांत आहे. विवाहपूर्व अशा प्रकारच्या तपासणींत सामान्य आरोग्यासंबंधीं व अनुवंशिकतेच्या दृष्टीनें निश्चित जास्त माहिती करून घेणें शक्य होईल. पुरुषाचें पौरुषहि तपासणें शक्य होईल. स्त्रीची शरीरसंबंधीं (Anatomical) कांहीं माहिती घेतां येईल. परंतु येथें एक सत्य निश्चित ध्यानांत घेतलें पाहिजे कीं स्त्रीची प्रजोत्पादनक्षमता ( Fertility ) ही सध्यां मनुष्याच्या शास्त्रबुद्धीच्या आकलनापलीकडे ठेवलेली एक गोष्ट आहे. कोणत्याहि वैद्यकीय तपासणीनें त्याच्यावर संपूर्ण प्रकाश पाडणें शक्य नाहीं. निसर्गानें राखून ठेवलेला हा खास हक्क आहे. तेव्हां कोणत्याहि विवाहबद्ध झालेल्या दोन व्यक्तींना संतति होऊं शकेल का याचा अंदाज फक्त संभवात्मक पद्धतीनें ( Probability ) देणें शक्य असून त्यासंबंधीं निश्चित मत देणें आज शक्यतेच्या पलीकडचें आहे. सर्व शास्त्रांची मदत घेतल्यावरहि फक्त कालांतरानें काय घडतें एवढें असहायतेनें पहाण्यापलीकडे उपाय नाहीं. अर्थात् प्रजोत्पादनक्षमतेची बहुसंख्य स्त्री-पुरुषांना निसर्गदत्त देणगी परमेश्वरानें दिलेली असल्यानें, हा प्रश्न कांहीं अल्पसंख्य भाग्यहीन स्त्री-पुरुषांचा आहे. भारतियांनीं हा प्रश्न कसा विवेचिला आहे हें पुढें प्रसंगानें येणारच आहे.

दोन व्यक्तींच्या दृष्टिकोनांतील, विचारांतील व आचारांतील फरक हा नेहमींच कलहास कारणीभूत होत असतो. व्यक्तिमत्त्वाचे प्रश्न पुढें जास्त विस्तृतपणें विचारांत घेतलेले असून भारतियांचा दृष्टिकोनहि दिलेला आहे. यासंबंधीं

विवाहपूर्व स्थितींत कुलाचार, घरांतील शिस्त वा वागणूक, आईवडिलांचे विचार व आचार अशासारख्या गोष्टींवरूनच कांहीं कळणें शक्य आहे. सद्यःपरिस्थितींत एकंदर व्यक्तिमत्वावर जे अनंत व रोज नवे संस्कार घडविण्याचा अस्ताव्यस्त उद्योग चालू आहे, त्यांत विवाहपूर्व विचार योग्य व्यक्तींची निवड करण्याच्या दृष्टीनें दुरापास्त होत आहे. शिक्षण, वागणूक, आचार, जीवनांतील मूल्यें, आर्थिक अडचणी, नव्या नव्या महत्त्वाकांक्षा आणि वासना आणि रोज नव्या पुढाऱ्यांच्या शिकवणी व घोषणा यांमुळें व्यक्तिमत्त्वावर जे बहुविध संस्कार होत आहेत, त्यांमुळें दोन व्यक्तींत एकवाक्यता होण्याची शक्यता आणखी कमी होत आहे. प्रेमविवाह ह्या अडचणी सोडविण्यास उत्तर होऊं शकत नाहीं. सहवासोत्तर विवाह ही त्यांतलीच एक पायरी आहे. परंतु या दोहोंचाहि प्रचार पाश्चिमात्य व आपल्या देशांत सध्यां चालू असल्यानें याबद्दल थोडें विवरण करणें येथें जरूर वाटतें.

**भावनोद्रेक ( Infatuation ) हा विवाहाचा पाया अयोग्य :**

स्मृतिकारांनीं विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष, दैव, गांधर्व, आसूर, पैशाच आणि राक्षस. मानवी आचारांत जें जें होणें शक्य तें सर्व जमेस धरून हे प्रकार केलेले दिसतात. पुरुषास यापेक्षां वेगळ्या तऱ्हेनें स्त्रीप्राप्ति होतांना दिसत नाहीं. हे आठहि प्रकार कामशास्त्रकारांनींहि दिले आहेत. परस्परांच्या संमतीनें कन्यादानापासून तों बलात्कारानें कन्येचें हरण करण्यापर्यंत सर्व गोष्टींचा या प्रकारांत समावेश होतो. पहिले चार प्रकार धर्म्य कामास धरून ग्राह्य समजतात. किंवा ब्राह्मापासून उपरिनिर्दिष्ट क्रमानें राक्षसापर्यंतचे प्रकार उत्तरोत्तर नीच समजले जातात. निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या ठिकाणीं परिस्थितीप्रमाणें हे प्रकार होतच असतात. आजहि हे सर्व प्रकार समाजांत होतातच. परंतु उच्च वर्णियांत 'ब्राह्म' विवाह रूढ आहे हें खरें. पाश्चिमात्य समाजांत गांधर्व विवाह जास्त रूढ होत आहे. प्रेम हाच विवाहाचा पाया असावा अशी विचारसरणी बहुतेक पाश्चिमात्य देशांत मान्यतेस पावली आहे. आमच्याकडेहि ही विचारसरणी एका काळीं प्रचलित होती आणि त्याचे गुणदोष भारतियांना स्पष्ट माहीत होते.

**सुखत्वादबहुक्लेशादपिचावरणादिह ।**
**अनुरागात्मकत्वाच्च गांधर्वः प्रवरो मतः ॥** का. सू. ३.५.३०

फार कष्ट न होतां, प्रेम व सुखप्राप्ति होऊन, आणि विवाहाची खटपट न करतां अनुरूप जोडी जमण्याकरितां गांधर्व-विवाह हा वरील श्रेणीमध्यें मध्यम प्रतीचा ठरविला असला तरी तो श्रेष्ठ आहे असें वात्स्यायनमत या श्लोकांत ग्रथित केलें आहे. अनुराग हाच जर विवाहसुखाचा परिपाक असेल तर तो अगोदरच असतो, म्हणून हा प्रकार श्रेष्ठ म्हणून सांगितलें. हें कामशास्त्राला योग्यच आहे. पण त्या प्रकाराचे दुष्परिणाम त्यांच्या नजरेआड कसे झाले हें सांगणें कठिण आहे. अर्थात् त्यांनीं हें कबूल केलें आहे कीं,

**‘ पूर्वः पूर्वः प्रधानः स्याद्विवाहो धर्मतः स्थितेः ।**
**पूर्वाभावे ततः कार्यो यो यो उत्तरोत्तरः ॥ ’** का. सू. ३.५.३८

धर्मस्थितिकरितां या प्रकारांतील एकापेक्षां एक पूर्व प्रकारच योग्य आहे. परंतु जेव्हां उत्तमोत्तम प्रकार कमनशिबानें वांट्यास येत नसेल तेव्हां उत्तरोत्तर प्रकार उचित आहेत. ब्राह्म वांट्यास न आला तर प्राजापत्य करावा. पहिले चारहि प्रकार वांट्यास न आले तर गांधर्वहि करावा, असा याचा अर्थ आहे. रुक्मिणीचा विवाह हा राक्षस-विवाह असूनहि सुखप्राप्ति झालीच कीं नाहीं ? या ठिकाणीं एक लक्षांत घ्यावें कीं रुक्मिणीचा विवाह तत्त्वतः गांधर्व होता व प्रसंग विशेषामुळें तो ‘ राक्षस ’ ठरला. तेव्हां काम-पुरुषार्थ सिद्ध करण्यासाठीं स्त्रीची आवश्यकता अटळ असल्यानें जेव्हां पूर्व प्रकार जमत नाहीं, तेव्हां उत्तरोत्तर प्रकार योग्य; किंबहुना मनुष्यस्वभावास धरून व परिस्थितीच्या अनुकूलतेप्रमाणें आपोआप तसें घडणें स्वाभाविकच आहे. मनुष्यस्वभाव सहजासहजीं अवघड, दुर्घट वा अतिरेकी कल्पनांकडे वळत नाहीं, परंतु ज्या वेळीं सरळ मार्ग बंद होतात, तेव्हां त्याची बुद्धि निरनिराळ्या प्रसंगानुरूप भिन्न आचारास प्रवृत्त होते. गांधर्व-विवाहांतील दोष कालिदासानें आपल्या शाकुंतल नाटकांत रेखाटलेले आहेत, हें आपण मागें पाहिलेंच आहे.

आतां पाश्चिमात्य देशांत पाहूं गेल्यास ‘ प्रेम ’ या भावनेस ‘ Romantic love ’ म्हणतात. त्यांच्याकडेहि जुन्या काळीं प्रेमविवाह ही गोष्ट माहीत नव्हती असें नाहीं. तरी साधारण मागच्या शतकापासूनच ही एकच गोष्ट विवाहाचा पाया होऊं पाहात आहे. शेले, स्कॉट वगैरे कवि-कादंबरीकारांनीं या भावनेचीं

हृदयंगम चित्रें रेखाटून प्रेमास आजचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. तत्पूर्वी, कुलाचा सामाजिक दर्जा ही गोष्ट मुख्यतः पाहणें पाश्चिमात्यांसहि मान्य होतें. परंतु वाङ्मयाचा ठसा हळूंहळूं सर्वसामान्य माणसांच्या मनावर उठत गेला आणि आज विवाहाची सर्व इमारत ' प्रेम ' या एकाच भावनेवर उभारण्याची रीत पाश्चिमात्यांत पडलेली दिसते. आतां या पद्धतींतील दोष त्यांच्याकडेहि विचारवंत मंडळीच्या ध्यानीं येत असून ' घर उभारणें ' किंवा ' संसार चालविणें ' ही गोष्ट नुसत्या काव्यसृष्टींतील भावनोद्रेकांवर अवलंबून नसतें, त्यांना इतर पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टींची जरुरी आहे आणि त्या गोष्टींकडे या तात्पुरत्या सहजसिद्ध भावनोद्रेकांमुळें दुर्लक्ष होतें ही जाणीव होऊं लागली आहे.

" It is only recently that this kind of love has been regarded as the right basis for marriage. Romance endows the love-object with many qualities that it does not possess. Let us be thankful to the poets for having rescued love from the abyss, but let us contrive that we have some material more substantial than passion and poetry when we start to build our homes. " ( K. Walker p. 103 )

ज्या वयांत स्त्री-पुरुष प्रेमभावानेनें ग्रस्त होतात, तें वय मुख्यतः शारीरिक आकर्षणाचें असतें. नैसर्गिक स्त्री-पुरुषाकर्षण प्रेमभाव जागृत करतें. तेंच खरें प्रेम अशी भावना निर्माण होते. तीच भावना मनाची संपूर्ण पकड घेते. त्यामुळें इतर गुणदोषांकडे संपूर्ण दुर्लक्ष होतें. अर्थात् शारीरिक आकर्षणाशिवाय प्रेमभाव असावा असा याचा कोणीं अर्थ करूं नये. निसर्गसिद्ध आकर्षण हा सर्व स्त्री-पुरुषसंबंधांचा पाया असल्यानें, तें नाहींसें करणें हा कांहीं सुदृढतेचा पुरावा नव्हे. पण त्यांतून जो भावनोद्रेक उत्पन्न होतो, तेवढ्यावरच विवाहासारख्या आयुष्याच्या प्रश्नासंबंधीं निर्णय घेणें इष्ट नव्हे.

" It is as unwise to attempt to rule out physical attraction as it is to permit such attraction to be the entire basis of your relationship. " ( Bowman p. 40 )

आतां प्रेम हा एकमेव विवाहाचा पाया होऊं देणें इष्ट नाहीं एवढें समजल्यावर सहजच स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक आकर्षणांतून उत्पन्न होणारा भावनोद्रेक

( Infatuation ) व खरें प्रेम यांत हंसाचा ' दुग्धजलभेदन्याय ' कसा वापरावयाचा याचा विचार करणें भाग पडतें. पण येथें मुलामुलींचा ज्या वयांत भावनोद्रेक होतो, त्या वयांत त्यांना तें कळावें ही अपेक्षा आम्हांस तरी कठिण वाटते. या दोन्ही स्थितींत फरक काय यासंबंधीं तरुणतरुणींना उपयोगी पडावी अशी बरीच चर्चा बोमनसाहेबांनीं त्यांच्या ग्रंथांत केली आहे. परंतु शेवटीं त्यांची त्यांनाच शंका आली कीं, हें सर्व कळण्याची व वेळेवर उमगण्याची अपेक्षा आपण ज्यांपासून करतों, त्यांना हें शक्य आहे काय ? तेव्हां तेच लिहितात,

" The reader may wonder whether there can be any true love ! " ( Bowman p. 49 )

हें सर्व वाचून खरें प्रेम म्हणून कांहीं आहे कीं नाहीं, अशी शेवटीं वाचकांस शंका येईल. एक गोष्ट खरी कीं हा फरक समजण्याची शक्यता भावनोद्रेकाच्या अवस्थेंत व वयांत फार कठिण आहे.

' मिडिलटाऊन ' ( Middle–town ) या नांवानें एक समाजशास्त्रीय अभ्यास लिंड ( Lynd ) नांवाच्या लेखकानें प्रसिद्ध केला आहे. त्यांत ' विवाह आणि वेश्याव्यवसाय ' या सदराखालीं जेवढी माहिती देतां येणें शक्य आहे तेवढी त्यानें दिली आहे. त्यांत विवाहास प्रेम हा एकच वैचारिक पाया असावा असा जो प्रचार चालू आहे व जो सध्यां अमेरिकेंत प्रत्यक्ष दृष्टीस पडतो त्याची कबुली आहे.

" Romantic love is in demand as the basis for marriage. "

प्रेम ही पृथक्करणापलीकडील गोष्ट असून त्यांत एक प्रकारची शारीरिक व मानसिक रोमांचकारक ( thrill ) परिस्थिति निर्माण होते. एवढें मोठें प्रेमासंबंधींचें ज्ञान अमेरिकन तरुण-तरुणींना असतें असेंहि त्यानें नमूद केलें आहे. मग आपल्याकडे जशी भावगीतांची व प्रेमकथांची रेलचेल मराठी वाङ्मयांत दिसते तशी इंग्रजींत काय थोडीं गाणीं आहेत काय ? हीं गाणीं तरुण-तरुणींच्या तोंडीं नेहमींच ऐकावयास मिळतात. त्यांतील एक गंमतीदार गाणें खालीं उद्धृत करतों.

" It had to be you. It had to be you.
I wandered around, and finally found,

The somebody who, could make me true,
Could make me blue, and ever glad,
Just to be sad; it had to be you.
Wonderful you ! It had to be you.

ज्यास इंग्रजी गाण्याची लकेर साधत असेल त्यानें वरील गाणें गुणगुणल्यास त्यास आजहि रोमांच ( thrill ) उभे राहातील. पण आम्हांस येथें येवढेंच नमूद करावयाचें कीं, प्रेमाबद्दल एवढें भयंकर ज्ञान ज्या देशांत सर्वसामान्य माणसांत पसरलें आहे आणि हें प्रेमच फक्त विवाहाचा पाया होऊं शकतें अशी समजूत जेथें दृढमूल झालेली आहे, तेथें रसेल आणि किन्से यांनीं वर्णन केलेल्याच गोष्टी घडूं नयेत तर दुसरें काय घडावें बरें ?

' सहवासोत्तर विवाह ' हा पाश्चिमात्यांत विवाहाचा विवाद्य प्रश्न राहिला नसून वस्तुस्थिति आहे. यामुळेंच एकमेकांचे दृष्टिकोन, आवडी-निवडी, कल इत्यादि पटतात कीं नाहीं हें पाहातां येऊन ' व्यक्तिमत्व ' जुळतें होण्यासारख्या योग्य व्यक्तीशीं गांठ पडणें सुलभ जातें; अशी याबाबत समजूत समाजांत प्रसृत आहे. एकमेकांच्या व्यक्तिमत्वाशीं समजुतीनें जमतें घेण्यास या विवाहपूर्व साहचर्याचा फार उपयोग होईल असें सकृद्दर्शनीं वाटतें आणि तशीच समजूत रूढ आहे. यामुळें तरुणतरुणी एकमेकांना निरनिराळ्या स्थळीं व काळीं एकत्रित आलीं असतांना एकमेकांस आवडावयास लागतात. ही आवड पुढें विवाहांत रूपांतरित होते कीं काय हें पाहण्याकरितां एकमेकांस संकेतस्थळकालांत भेटीगांठीं देतात-घेतात. ही रूढी आज अमेरिका इत्यादि देशांत समाजांत सर्वत्र प्रसृत आहे. या रूढीस ' डेटिंग ' ( Dating ) असें म्हणण्याचा प्रघात आहे. वयांत आल्यावर या प्रथेप्रमाणें तरुण–तरुणी एकमेकांच्या गांठीभेटी घेतात. असें करणें तिकडे इकडच्यासारखें विपरीत वा चमत्कारिक असें कांहीं समजत नाहींत. उलट हें न घडलें तरच ' असें कां ? ' असेंहि घरीं मोठ्या माणसांना वाटूं लागतें. कोणत्याहि देशांत पूर्वी अशी प्रथा सामान्यत्वानें किंवा सर्व समाजांत अस्तित्वांत नव्हती. ह्या चेष्टा करतांना काय होतें तें पाहा. खरेंखोटें समजण्याचें उष्णतामापक यंत्रासारखें कांहीं उपकरणात्मक साधन अस्तित्वांत नाहीं. भावनेचा उद्रेक किती करावा, कोठें थांबावें, जास्ती उद्रेकानें तोटे-फायदे काय, त्यांचा पुढील आयुष्यावर व स्त्रीमनावर परिणाम काय, इत्यादींची माहिती नाहीं. खऱ्या

प्रेमाचे निकष कांहीं नाहींत. अनुभवानें खरेंखोटें ठरेल असें म्हटलें तर अनुभव येण्याची अशा प्रथेंत कांहीं सोयच नसल्यानें दोघांपैकीं कोणाहि व्यक्तीनें पाहिजे ती भाषा किंवा अवास्तव आणाशपथा घेण्यास कांहींच हरकत नाहीं. शिवाय याचा कसलाहि पुरावा पुढें उपलब्ध होणें अशक्य असल्यानें हें सर्व सहजचेष्टा म्हणूनहि करण्यास हरकत नाहीं. या गांठीभेटींत ज्या चेष्टा चालावयाच्या त्या शारीरिक स्पर्शापासून अगदीं रतिप्रसंगापर्यंत कितीहि कमीजास्त प्रमाणांत चालल्या तरी त्यांस समाजाची हरकत नाहीं. किंबहुना प्रकृतिभिन्नत्वाप्रमाणें त्या चालावयाच्याच हेंहि मान्य. त्यावर व्यक्तीनें कोठें नियमन करावें याचा ताळ नाहीं. आतां हें करतां करतां जर का चुकून गर्भधारणा झाली तर त्यावर मात्र सामाजिक बहिष्कार, कायदेशीर इलाज, इत्यादि जय्यत तयारी. आतां या भावनोद्रेकांतून ‘ व्यक्तिमत्वाचा ’ अभ्यास आणि माहिती एकमेकांस कितपत होणार ? आम्हांस अशींहि उदाहरणें माहीत आहेत कीं, अशा तऱ्हेनें विवाह-निश्चिति झाल्यावर दुसऱ्या व्यक्तीचें संपूर्ण नांवहि माहीत नसतें. यासंबंधीं डॉ. बोमन लिहितातः —

“ Never before in history have so many young persons dated so much through such a long period in their lives with so few recognisable guide posts such ill-defined social patterns, such a wide variety of standards, and so few socially imposed controls. This may be one of the basic causes of the present day divorce rate. ” ( Bowman p. 159 )

डॉ. बोमन यांचें म्हणणें असें कीं, इतिहासांत कधींहि अस्तित्वांत नव्हती एवढ्या मोठ्या प्रमाणांत ही प्रथा हल्लीं अमेरिकेंत अस्तित्वांत आहे. शिवाय या गोष्टीसंबंधीं कांहीं योग्य वागणूक लागणारीं गमकें, सामाजिक प्रमाणपद्धति, योग्य मार्ग दाखविणारीं साधनें इत्यादि कांहींच अस्तित्वांत नाहीं. त्यामुळें “ व्यक्ति तितक्या प्रकृति ” ही म्हण प्रत्यक्षांत दिसत असून ही विवाहविषयक गोष्ट कदाचित् घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणास एक मुख्य कारण असूं शकेल. तात्पर्य, प्रेम व भावनोद्रेक यांतील फरक सहज कळण्यासारखे नसल्यानें आणि भावनोद्रेकानें उत्पन्न होणाऱ्या प्रेमांधत्वांत कोणत्याहि व्यक्तीचे गुणदोषपरीक्षण होणें विशेष शक्य नसल्यानें, प्रेम व तज्जन्य सहवास हा संपूर्णतया एकच एक विवाहाचा पाया

ठरविणें मोठें बुद्धिगम्य नाहीं. याचा अर्थ प्रेम नसतेंच व सहवासाचा कांहीं फायदा होणारच नाहीं असा नव्हे. तारुण्यसहज चित्ताकर्षण नसावेंच असाहि याचा अर्थ नव्हे. फक्त या सर्वांची योजना कशी करावयाची, कोठें करावयाची, हें दुसऱ्या मोठ्या व अनुभवी माणसांनीं ठरविल्यास बरें.

**वात्स्यायनीय प्रीतिप्रकार :** वात्स्यायनानें प्रेमाचा विचार केलेला आहे. शिवाय ही भावना उत्पन्न होण्याचे निरनिराळे प्रसंग लक्षांत घेऊन त्यानें प्रीतिप्रकार म्हणून त्यांचें वर्गीकरणहि केलेलें आहे. तेव्हां हे काय काय प्रकार कल्पिले आहेत आणि त्यांतील भेदाभेद यांचा विचार येथें करणें आहे. तंत्रज्ञांनीं चार प्रीतिप्रकार सांगितले आहेत, ते असे :—

( १ ) प्रथम प्रकारास ‘ संप्रत्ययात्मिका ’ किंवा ‘ विश्वासजन्य ’ प्रीति म्हणतात. याची व्याख्या येणेंप्रमाणें :—

**‘ नान्योऽयमिति यत्र स्यादन्यस्मिन्प्रीतिकारणे । ’** का. सू. २.१.४३

याचा अर्थ : एखाद्या अपूर्व वा असामान्य व्यक्तीबद्दल ‘ याच्यासारखा दुसरा नाहीं ’ असा भाव उत्पन्न झाल्यामुळें उत्पन्न होणारी जी विश्वासात्मक प्रीति ती ‘ संप्रत्ययात्मिका ’ प्रीति होय. यांत त्या व्यक्तीबद्दल कांहीं पूर्वानुभव सहजच अभिप्रेत आहे.

( २ ) दुसरा प्रकार म्हणजे ‘ अभिमानिकी ’ प्रीति होय.

**संकल्पाज्जायते प्रीतिर्या सा स्यादभिमानिकी ।** का. सू. २.१.४१

या भावनेंत संकल्पच फक्त असतो. पूर्वपरिचय फारसा नसेलहि. पण त्या व्यक्तीचें दर्शन वा मनन एवढेंहि प्रेमाकर्षणास पुरेंसें होतें. कदाचित् एखाद्या व्यक्तीच्या गुणांवर सहज जडलेलें हें प्रेम होय. उदाहरणच देणें झाल्यास, चारुदत्तावर जडलेल्या वसंतसेनेच्या प्रेमाचा हा नमुना सांगतां येईल. उदारता व दातृत्व या गुणांवरील ती ‘ अभिमानिकी ’ प्रीति. त्यांत दारिद्र्य हा भाग घात करूं शकला नाहीं. प्रत्यक्ष कसलाच संबंध नाटकांतहि एखाद्या वेळेपेक्षां फार नाहीं. पण या काल्पनिक रम्य कल्पनेनें कवीनें शृंगाररसाची या नाट्यकृतींत बहार उडवून दिलेली दिसेल. शांत शृंगाराचा तो एक साक्षात् नमुना आहे.

( ३ ) तिसरा प्रकार ' अभ्यासजन्य ' प्रेमाचा. यांत तेंच तेंच कर्म सतत केल्यानें उत्पन्न होणारें प्रेम येतें. याचें उदाहरण म्हणजे मृगयेचें देतात. मृगया किंवा शिकार हा मोठा दुर्घट खेळ असला तरी अभ्यासानें शिकारी हिंस्र श्वापदांच्या या भयानक खेळांतहि मोठ्या प्रेमानें रममाण होऊं शकतो. शृंगाररसास धरून शब्दादि स्वरूपांनीं जी प्रीति निर्माण होते ती अभ्यासजन्यच म्हणतां येईल. गीत, वाद्य, नृत्य, चारुवाक्त्व किंवा गोड बोलण्याची शैली, रसवंती वगैरेमुळें जी प्रीति निर्माण करतां येते ती या प्रकारांत बसते. यांत ' मनाचें तादात्म्य ' किंवा मनबुद्धींचें संपूर्ण अधिष्ठान असतेंच असें नाहीं आणि त्यामुळें या प्रीतीची परिणति चटदिशीं विषयविकारांत होऊं शकते. तोच चौथा प्रकार.

( ४ ) यास ' विषयी ' प्रीति म्हणतात. यास इंग्रजींत Lust किंवा Infatuation व मराठींत भावनोद्रेक म्हणतां येईल. यासंबंधीं जरूर तो ऊहापोह मागें येऊन गेलाच आहे. या प्रीतिप्रकारांतील पहिल्या दोन प्रकारांचा शृंगाररसांचा परिपोष करण्यास उपयोग करतात. त्यांत दुसऱ्या व्यक्तीच्या गुणांवर प्रेम होत असून प्रत्यक्ष शारीरिक संबंध फारसा येण्याची जरुरी नसते. शिवाय गुणांवरील आत्यंतिक प्रेमामुळें दोष असले तरी पुढें ते प्रेमाचा सहसा घात करीत नाहींत. परंतु चौथा प्रकार विवाहाच्या दृष्टीनें त्याज्य असून तिसरा प्रकारहि सुखाचा समजत नाहींत. ' विश्वासजन्य ' आणि ' संप्रत्ययात्मिका ' हे प्रकार विशेषतः शृंगाररसाची उत्पत्ति करण्यास योग्य आहेत. आल्हाद व माधुर्य हे शृंगाररसाचे परिणाम म्हणून मम्मट देतो. श्रीकृष्णाची रासक्रीडा हें शृंगाररसाचें मोठें उदाहरण म्हणून देतात. श्रीकृष्णचरित्रांत सर्व नवरसांचा आविष्कार वेळप्रसंगानें झालेला दृष्टीस पडतो. त्यांत रासक्रीडा आणि राधाकृष्णपरिचय हीं शृंगाररसाचीं उदाहरणें म्हणून कविजन देतात. या उदाहरणांवरून एक दिसून येईल कीं शृंगाररसाची उत्पत्ति करण्यास ' अभिमानिकी ' आणि 'संप्रत्ययात्मिका' या दोन प्रीतिप्रकारांचा खरा उपयोग होतो. पुष्कळ वेळां हे दोन प्रकार संपूर्ण भिन्नत्वानें आढळत नाहींत. ते एकमेकांत मिसळलेले दिसतात. ध्येयात्मक प्रीतींत हे दोन प्रकार मुख्यत्वेंकरून लागतात. ते नसतील तर ती वैषयिकी प्रीति होईल. या प्रीतिप्रकारांत सहसा नायकनायिकेचा विशेष असा शरीरसंबंध दाखविण्यांत येत नाहीं. नायकाबद्दल नायिकेस फक्त फार मोठा आदर असतो. नायकासंबंधीं नायिकेची कल्पना फार रम्य व उच्च असते. " हाच खरा पुरुषोत्तम " अशा भावनेनें नायिका त्याकडे

आकर्षिली गेलेली असते. आणि त्याच्या गुणचिंतनांत, त्याच्या दर्शनांत, सान्निध्यांत किंबहुना त्यासंबंधीं कोणत्याहि मनोरम्य कल्पनेंत ती अत्यंत सुख मानीत असते. तिला त्या कल्पनेंतच मोठा आनंद होत असतो. या मनाच्या संतोषकारक भूमिकेंतूनच हा रस उत्पन्न होतो आणि म्हणूनच त्यांतून मनाचा उल्हास प्रेक्षकांतहि येत असतो. संस्कृत वाङ्मयांत पुष्कळ ठिकाणीं शृंगाररसाचा परिपोष आढळतो. मृच्छकटिक नाटकांतील वसंतसेनेचें उदाहरण अप्रतिम आहे. या बहुतेक ठिकाणीं ही ‘ अभिमानिकी ’ आणि ‘ संप्रत्ययात्मिका ’ प्रीति कवीनें बहारीनें वर्णन केलेली असते.

याउलट वैषयिकी प्रीति ही नेहमींच उच्छृंखल असते. यांत बुडबुडा फार मोठा पण तो फार वेळ टिकत नाहीं. शिवाय यांतून संतोष किंवा मनसोल्हास उत्पन्न होण्याऐवजीं उलट मनाची तळमळ होते. भकासपणा वाढतो. सुखाभिलाष उत्पन्न होतो. वैषयिकी प्रीतीची पूर्ति झाली नाहीं तर फार मोठा क्रोध उत्पन्न होतो. त्यांत वांटेकरी आल्यास फार उत्कट मत्सर निर्माण होतो. त्यांत विरह झाल्यास मनाची फार तळमळ होते. त्यांत कोणी बिब्बा घातल्यास त्यांतून खूनमारामाऱ्यांचे प्रकार बाहेर येतात. हे सर्व त्या वैषयिकी प्रीतीचे गुण आहेत. या वैषयिकी प्रीतीचें चित्रण पाश्चिमात्य नाट्यांत व वाङ्मयांत भरपूर आढळतें व ते गुण नेमका तसाच परिणाम प्रेक्षकांवर करतात. एखाद्या रोजच्या वर्तमानपत्रांत इंग्रजी सिनेमांच्या जाहिराती व नांवे पाहिल्यासहि याचा प्रत्यय येईल. इंग्रजी भाषेंत ज्यास ‘ रोमॅन्टिक लव्ह ’ ( Romantic love ) म्हणतात, तो प्रकार मात्र वैषयिकी प्रीतीपासून जरा भिन्न आहे. त्यांत नायकासंबंधीं नितांत आदरभाव असून त्यांत शारीरिक सुखाभिलाष बहुशः नसतो. नाईट्स लव्ह ( Knight's love ) हा एक दुसरा प्रकार ‘ रोमँटिक ’ पेक्षां जरा खालचा असला तरी वैषयिकी प्रीतीच्या जरा वरचा आहे. यामुळें एक गोष्ट तरी घडली कीं, ख्रिश्चन धर्माचा जो स्त्रीविषयींचा अनादर आणि कोता दृष्टिकोन तो बदलून स्त्रीसंबंधीं आदरभाव आणि सौजन्य वाढण्यास मदत झाली. तात्पर्य, वैषयिकी प्रीति ही फक्त भावनोद्रेकास कारणीभूत होत असल्यानें ही एकमेवाद्वितीय गोष्ट विवाहाचा पाया म्हणून ग्राह्य धरणें इष्ट नाहीं. भारतियांनीं तिचें चित्रण काव्यांत फारसें कोठें केलेलें दिसत नाहीं. शृंगाररसाच्या परिपोषास भारतियांनीं हा प्रकार

अग्राह्य ठरवून प्रथम दोन प्रकारांचा उपयोग करून आल्हाद व माधुर्य हे दोन शृंगाररसाचे गुण उत्पन्न केलेले दिसतात.

**वैदिक विवाह संस्कार :** विवाह हा आमच्या धर्मशास्त्रांत एक संस्कार असून या संस्काराला कांहीं उद्देश आहे, हें विसरून चालणार नाहीं. संस्कार हा शब्द ' कृ ' या धातूस ' सं ' विकरण लागून झाला असून ' चांगलें करणें ', ' सुधारणें ', ' आहे त्यापेक्षां गुणवर्धन करणें ' असा अर्थ सुचवितो. संस्कार या शब्दाचा कोशार्थ " उत्तमोत्तम करणें " ( making perfect or refining ) असा आहे. ' **स्वभावसुंदरा वस्तु न संस्कारमपेक्षते ।** ' स्वभावतः सुंदर वस्तूस संस्काराची अपेक्षा नसते. अर्थात् हे संस्कार शरीर, मन व बुद्धि या सर्वांस धरून असतात आणि त्यांत गुणवर्धन अभिप्रेत असतें. ' **वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते ।** " या श्लोकार्धांत जी वाणी संस्कारयुक्त आहे, ती पुरुषास अलंकारासारखी शोभून दिसते, असें म्हटलें आहे. तोंड आहे म्हणून बोलणें वेगळें व मशागत करून माधुर्य, प्रसाद व आकर्षण ज्यांत उत्पन्न होतें ती वाणी वेगळी. जन्मतः सर्व मनुष्यप्राणी सारखाच दुर्बल असतो. सजीव प्राण्यास असलेल्या सर्व प्रवृत्ति व ढोबळ सुखदुःखें त्यास असतात. फक्त आनुवंशिकतेनें उत्पन्न झालेल्या मूलभूत शक्ति ( Hereditary potentialities ) मात्र व्यक्तिव्यक्तींतून भिन्न असतात. या मृत्पिंडाचें पुढें जें कांहीं भांडें बनवावयाचें तें बनविण्यास संस्कृतीची ( culture ) आवश्यकता असते. आणि प्रत्येक संस्कृतींत कांहीं विशेष संस्कार असतात. या ध्येयास धरून जे आचार व विधिनिषेध उत्पन्न केले ते सर्व भारतियांचे संस्कार होत. आमच्या संस्कृतींत अशा प्रकारचे पुष्कळ संस्कार आहेत. अर्थात्, हे संस्कार निर्माण करतांना नेमके कोणते गुण अंगीं यावेत, कोणतीं मूल्यें उच्च असावींत, हें सर्व लक्षांत घेऊन तयार केले आहेत. ढोबळपणें गर्भाधान, जातकर्म, उपनयन, विवाह इत्यादि सोळा संस्कार कल्पिले आहेत.

**कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ।** मनु. २.२६

संस्कार मानवास येथें व परलोकीं पावन करणारा आहे. या श्लोकार्धांत स्मृतिकारांनीं संस्कार जरूर असून ते मनुष्यास पावन करतात म्हणजे मनुष्यास खरें मनुष्यत्व प्राप्त करून देतात असा तात्पर्यार्थ.

विवाह हा संस्कार आमच्या संस्कृतींत अप्रतिहतपणें हजारों वर्षें साधारणतः याच स्वरूपांत चालू असून, तो सर्वांना सारखा लागू आहे.

" The wedding ceremony of modern Hindu is essentially the same as it was long before the Christian era. "

( Macdonell p. 7 )

प्रो. मॅक्डोनेल यांच्या मतें इसवी सनापूर्वीपासून विवाहसंस्कार भारतांत मूलतः होता तसाच अस्तित्वांत आहे.

विवाह हा संस्कार आहे हें म्हटल्यावर या संस्कारानें कांहीं गुणवर्धन साधावयाचें आहे, हें सहज स्पष्ट होईल. तेव्हां या संस्कारानें नेमकें साध्य काय या दृष्टीनें विवाहसंस्काराचें कांहीं प्रासंगिक परीक्षण येथें करणें जरूर आहे. धर्मशास्त्रांत सूत्रकारांचा अधिकार मोठा व आपआपल्या शाखेपुरता निर्णायक आहे. अश्वलायनांच्या मतें ' विवाहहोम ' व ' गृहप्रवेशनीय होम ' हे विधि केले म्हणजे विवाहसंस्कार पूर्ण होतो. विवाहहोमांत पाणिग्रहण, अग्निप्रदक्षिणा, अश्मारोहण, सप्तपदी आणि ध्रुवादिदर्शन हे विधि येतात. गृहप्रवेशनीयांत गृहप्रवेश, वधूला उपदेश आणि देवतांची प्रार्थना या गोष्टी येतात. वाङ्निश्चय किंवा वाग्दान हा विधि सूत्रप्रणीत नाहीं. हा पुढें विवाहविधीस जोडण्यांत आला. यांत वधूवरपाक्षियांनीं कन्या देण्यासंबंधीं व ग्रहण करण्यासंबंधीं आपआपला निश्चय बोलून दाखवावयाचा आहे. कन्यादान हा विधि, ब्राह्म, दैव, आर्ष व प्राजापत्य या प्रकारांत शक्य असतो. गांधर्वांत त्यास स्थान नाहीं. कारण कन्या स्वतःच आपलें दान करीत असते. मधुपर्क हा विधि म्हणजे वराचा योग्य सत्कार आहे. वराचा योग्य सत्कार करून त्यास खुश करण्याकरितां हा विधि असून परस्परांचा परस्परविषयक आदरभाव व प्रेम वाढविण्यास हा संस्कार योग्यच आहे. पुण्याहवाचन, मातृकापूजन नांदीश्राद्ध, सीमांतपूजन, कन्यानिरीक्षण, सूत्रवेष्टन, अक्षतारोपण, ऐरणीदान आणि लक्ष्मीपूजन हे सर्व विधि आचारप्राप्त आहेत. तात्पर्य, विवाहहोम व गृहप्रवेशनीय होम हीं विवाहसंस्काराचीं मुख्य अंगें आहेत. आतां सूत्रोक्त विवाहविधींतील कांहीं ऋचांचा अर्थ पाहिल्यास या संस्काराचा उद्देश सहज स्पष्ट होण्यासारखा आहे.

लाजाहोम — " हा अग्नि ह्या वधूचा पितृकुलाशीं असलेला संबंध व प्रेम सोडवून हिला माझ्या कुलाशीं एकरूप व अनुरक्त करो. "

अश्मारोहण — " हे वधू तूं या शिळेवर चढ व ही जशी घट्ट व स्थिर आहे तशी तूं मनानें हो. तुझ्याशीं द्वेष, मत्सर करणाऱ्यांचे आक्षेप सोसून सद्वर्तनानें त्यांस वश करून घे. "

सप्तपदी — " हे वधू, तू माझ्याबरोबर चाललीस म्हणून आपलें सख्य झालें. मला तूं अन्न देणारी हो. दोन पावलें चाललीस तेव्हां माझें बलवर्धन कर. तीन पावले चाललीस तेव्हां संपत्ति वाढीव. चार पावलें चाललीस म्हणून सुख-संवर्धन कर. पांच पावलें चाललीस तेव्हां संतति वाढीव. सहा पावलें चाललीस म्हणून सहाहि ऋतूंत सुख दे, आणि सात पावलें चाललीस तेव्हां निरंतर माझ्याशीं अनुकूल वाग म्हणजे आपणांस सुपुत्र होऊन ते चिरायु होतील. "

ध्रुवादिदर्शन — " माझा पति चिरायु व्हावा आणि मला सुपुत्र व्हावे अशी मी इच्छा करतें. "

वरील ऋचांच्या अर्थावरून विवाहविधीचा उद्देश व कार्य काय हें सहज वाचकांच्या ध्यानांत येईल. विवाह या संस्कारानें, वधू ही एका कुलांतून संपूर्णतया संबंध तोडून — हा संबंध नाममात्रहि राहात नाहीं — स्थिर व घट्ट मनानें नूतन कुलांत पदार्पण करते. नूतन कुलांत जे द्वेषमत्सरादि आघात येतील ते सद्वर्तनानें जिंकते. याप्रमाणें अहिंसेचें तत्त्वज्ञान प्रत्यक्ष आचारांत आमच्या स्त्रियांनीं अनेक शतकें आणलेलें आहे. पतीशीं संपूर्ण एकता प्राप्त करून घेण्यासाठीं नवीन कुलाचें बल, संतति यांचें वर्धन करते, आणि यामुळें ' सुखी-विवाह ' करून नवीन कुलाचें सुखसंवर्धन करते. असा ह्या सर्व संस्कारांचा अभिप्राय आहे.

कामशास्त्रकारांनींहि वरणसंविधानाच्या अध्यायांत वरील सर्व उद्देश एकत्र एकाच सूत्रांत सहज बसविलेले दिसतात. हें सूत्र प्रस्तुतु प्रकरणाच्या आरंभींच उद्धृत केलें आहे.

संतति व संपत्ति यांची वाढ करून नवीन कुलाची वृद्धि वा भरभराट साधून विश्वास आणि प्रेम संपादन केलें म्हणजे ' सुखी-विवाह ' होतो, असा एकंदर याचा ध्वन्यर्थ आहे. प्राचीन सूत्रकारांपासून कामशास्त्रकारांपर्यंत विवाहाचें उद्दिष्ट व साधनसंस्कार सर्व एक आहेत हें ध्यानीं येण्यास मदत होईल.

वाङ्निश्चय आणि मधुपर्क या विधींपासून सप्तपदीपर्यंत सर्व विधि कालि-

दासानें एकाच श्लोकांत ध्वनित केले आहेत. दोन व्यक्तींची शाश्वत एकता व्हावी हा हेतु कालिदासानें एका श्लोकांत फार मार्मिकतेनें आणला आहे.

**प्रयुक्तसत्कारविशेषमात्मना न मां परं संप्रतिपत्तुमर्हसि ।**
**यतः सतां सन्नतगात्रि संगतं मनीषिभिः साप्तपदीनमुच्यते ।**

कुमार ५.३९

विशेष सत्कारांनीं ज्याची सुरवात झाली तेथें आतां परकेपणा कसा वाटावा ? म्हणून सज्जनांची संगति सात पावलें बरोबर चालल्यानें दृढ होते असा याचा अर्थ. ‘ साप्तपदीन ’ हा शब्द सप्तपदीवरून आला असें सहज कोणाच्याहि ध्यानांत येईल. यांत, पार्वतीला या दृढ मैत्रीची अपरोक्ष सूचना दिली गेली. अर्थात् त्याबरोबरच शंकरपार्वतींची ही दृढ मैत्री आणि परस्परविश्वास कुमार-संभवाच्या मुख्य हेतूनें रंगविलेला आहे; आणि त्याच्याकरितां ही सर्व प्रेमाची पार्श्वभूमि आहे हें विसरून चालणार नाहीं. विवाह-संस्कारांत जे समारंभ व धर्मकृत्यें येतात त्यांतून खालील उद्दिष्टें साध्य व्हावीं असा उद्देश दिसतो. ( १ ) स्त्री ही सुप्रजेचें व वंशवृद्धीचें साधन आहे, साध्य नव्हे. ( २ ) विवाहानंतर स्त्रीस सासरचा पक्ष घेणें जरूर असून सासरची अभिवृद्धि व्हावी, एतदर्थ तिची सर्व वर्तणूक असावी. ( ३ ) विश्वास व प्रेम हीं स्त्रीनें नवीन कुलांत कष्टानें संपादन करावयाचीं असून त्याकरितां सुरवातीस कांहीं सोशीकपणा व त्याग यांची जरुरी आहे. या तीन गोष्टी विवाह-संस्कारांत मनावर बिंबविण्याचा शास्त्रकारांचा प्रयत्न दिसतो. आणि यांत या प्रस्तुत प्रकरणाच्या सुरवातीस कामशास्त्रकारांनीं ज्या तीन गोष्टी वैवाहिक यशास मूलभूत धरल्या आहेत त्यांचा समावेश होतो असें दिसून येईल.

---

# प्रकरण ४ थें

## सुप्रजा

**सुप्रजाजननशास्त्र–भारतियांचा सुप्रजे-संबंधीं विचार–सुप्रजा हा विवाहाचा मुख्य उद्देश–हा उद्देश स्पष्ट कां केला?–पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचीं मतें– सुप्रजेच्या दृष्टीनें विवाहपूर्व विचार–पुरुषप्रधानसंतति कशाकरितां?–'संततिहीनत्व' हा कौटुंबिक जीवनमरणाचा प्रश्न–संस्कृत वाङ्मयांतील अनपत्यत्वाचीं वर्णनें–प्रजाहीनत्वाचे परिणामाविषयीं पाश्चिमात्य मतें–प्रजाहीनत्व–भारतियांस संततिहीनत्वांत द्विभार्यात्व मान्य–प्रजाहीनत्वांत स्त्रीमनाचा विचार–प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नत्व** (Differentia Fertility).

विवाहाचा सुप्रजा हा एक हेतु आहे, असा भारतियांचा आग्रह आहे; ही गोष्ट आधुनिक कालांतहि आतां मान्यतेस पावली आहे. कायद्याचा आणि वाङ्मयाचा विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कांहींहि असो, पण जीवशास्त्रीय दृष्टि मुख्यतः 'विवाह हा जननशास्त्रांतील एक प्रयोग' अशीच आहे व असणार. भारतियांचा विवाहावरील सुप्रजा हा एकमेव महत्त्वाचा दृष्टिकोन कसा आहे, तो अस्तित्वांत आणण्यासाठीं त्यांनीं काय खटपटी केल्या, त्याकरितां सामाजिक मूल्यें व संस्कार कसे उत्पन्न केले आणि अल्पसंख्य प्रजाहीन लोकांकरितां त्यांची व्यवस्था काय होती वगैरे विषय या प्रकरणांत आणला आहे. वैवाहिक यश पुष्कळ अंशीं सुप्रजाजननावर अवलंबून आहे. भारतियांनीं या मुद्याकडे सूक्ष्म लक्ष दिलें आहे.

**सुप्रजाजननशास्त्र :** सुप्रजाजननशास्त्राची वाढ पाश्चिमात्य देशांत अलिकडचीच आहे. जीवमात्रांत कांहीं गुणधर्म आनुवंशानें संक्रांत होतात व तसें होण्यासंबंधीं कांहीं निसर्गसिद्ध नियम आहेत. आनुवंशशास्त्राचे जनक मेंडेल व गाल्टन हे १९ व्या शतकांतीलच शास्त्रज्ञ असून मेंडेलनें आनुवंशशास्त्राची प्रयोगाच्या पायावर उभारणी केली, तर गाल्टननें मनुष्यप्राण्यांत यासंबंधीं काय करतां येईल यासंबंधीं विचार केला आहे. वनस्पति व मानवेतर प्राण्यांत आज आनुवंशशास्त्राचा पुष्कळच उपयोग होत आहे.

मनुष्याला फायदेशीर असे निरनिराळे गुणधर्म वनस्पतींत किंवा प्राण्यांत एका पिढींतून दुसऱ्या पिढींत संक्रांत करणें जननशास्त्रामुळें शक्य झालें आहे. उत्तम अंडीं घालणारी कोंबडी, पुष्कळ दूध देणारी गाय, रोगांस नैसर्गिक प्रतिबंध करणारा बटाटा, ह्या गोष्टी मानवानें शक्यतेच्या कोटींत आणल्या. परंतु मानवाचें प्रजोत्पादन हें अनियंत्रित असल्यानें असे नियम जरी तंतोतंत मानवांत लागूं करण्याचे प्रयोग करणें शक्य नसलें तरी मानवांतहि पिंडप्रधान किंवा बीजगत प्रगति होऊं शकते व त्यामुळें योग्य गुणधर्मांची समाजांत जोपासना होऊन अनिष्ट गुणधर्मांची वाढ कमी होईल ही शक्यता गाल्टननें ओळखली. यांतच सुप्रजाजननशास्त्राचें बीज आहे. ज्यास कांहीं विशिष्ट आनुवंशिक, मानसिक व शारीरिक रोगांनीं पछाडलें आहे अशा लोकांना आज अमेरिकेंतील कांहीं संस्थानांत विवाहबंदी आहे. क्रेटिनिझम नांवाची विकृति इटलींतील एओस्टा नामक भागांत विशेष असे. या मंडळींना प्रजोत्पादनापासून सन १८९० पासून अलिप्त राखण्यांत आलें. आतां ही विकृति पुष्कळच नाहींशी झालेली दिसते. तात्पर्य, सुप्रजाजननशास्त्राचा अभ्यास व कांहीं प्रमाणांत उपयोग मानवांतहि अलीकडे पाश्चिमात्य देशांत होऊं लागला आहे.

**भारतियांचा सुप्रजेसंबंधीं विचार** उत्तम संतति व्हावी याकरितां भारतियांनीं विचारपूर्वक कांहीं आचार फार पूर्वींपासून अमलांत आणलेले दिसून येतात. **अथ य इच्छेत्पुत्रो मे पंडितो विजिगीथः समितिंगमः शुश्रूषितां वाचं भाषिता जायेत-इ.** ( बृ. ६.४.१८ ). अशी ज्याची इच्छा असेल कीं आपला पुत्र महापंडित, विजयी, सभाधीट, चारुवाक् इत्यादि गुणांनीं युक्त व्हावा, त्याच्या-

करितां आणि उत्तम कन्या प्राप्त व्हावी याकरितांहि येथें उपाय निवेदन केलेला आहे.

स्मृतिकारांनींहि ( मनु. ६.४० ) ब्राह्मादि धर्म्य विवाहांतून विशेष गुणवान् प्रजा निर्माण होते तशी इतर प्रकारच्या विवाहांतून होत नाहीं असें म्हटलें आहे. ‘ **वीरं मे देहि पितरः** ’ ‘ मला वीरपुत्राची प्राप्ति व्हावी, ’ असा मंत्र श्राद्धकर्मांतहि पितरांना उद्देशून येतो. भारतीय वैद्यकास आनुवंश मान्य आहे.

**‘ये चापि केचित्कुलजा विकाराः भवंति तांस्तान्प्रवदंत्यसाध्यान्।’**

( माधवनिदान ) कुलामध्यें संक्रांत होणारे रोग बरेच असाध्य कोटींत पडतात.

**सुप्रजा हा विवाहाचा मुख्य उद्देश :** विवाहविधीच्या बहुतेक भागांत प्रजोत्पत्ति या उद्देशाचा विचार व उच्चार वारंवार आहे. वाङ्निश्चयाच्या शेवटीं ‘ **वाचा दत्ता मया कन्या पुत्रार्थं स्वीकृता त्वया।** ’ असें वधूपित्यानें म्हणावयाचें आहे.

कन्यादान प्रसंगीं, ‘ **अमुकनाम्नीमिमांकन्यां वरार्थिनीं श्रीरूपिणीं प्रजोत्पादनार्थं तुभ्यमहं संप्रददे।** ’ अशी अट आहे. ही कन्या प्रजोत्पादनार्थ तुम्हांस मी देत आहें असा याचा अर्थ आहे. ‘ **धर्मप्रजासिध्यर्थं कन्यां प्रतिगृह्णामि।** ’ असें वरानें म्हणावयाचें आहे. विवाहांतर्गत प्रजा ही धर्मप्रजा. अशी धर्मप्रजा होण्यासाठीं मी त्या कन्येचें ग्रहण करतों असा अर्थ. यानंतर पुनः ‘ **मम वंशकुले जाता पालिता वत्सराष्टकं। तुभ्यं विप्र मया दत्ता पुत्रपौत्रप्रवर्धिनीं** ’। असा मंत्र येतो. ‘ आजपर्यंत माझ्या कुलांत पालन केलेली ही कन्या, हे विप्रा, तुला मी देतों. ही ‘ पुत्रपौत्रवर्धिनी ’ होवो. ” विवाहहोमांत जो मंत्र येतो, त्याचा फक्त अर्थ खालीं देत आहों.

मंत्रार्थ :— “ हे स्त्रिये, मी सामवेदस्वरूप आहें व तूं ऋग्वेदस्वरूप आहेस. तसाच मी आकाशरूप आहें व तूं पृथ्वीरूप आहेस. उभयतां आपण अग्नि व ब्राह्मण यांच्यासमक्ष विवाह करूं. आपण उभयता प्रजा उत्पन्न करूं. एकमेकांवर प्रीति करूं. स्वरूप व स्वभाव इत्यादि गुणांनीं एकमेकांस प्रिय होऊं आणि शंभर वर्षें जगूं.” ( गोरे पृ. ७१-७२ )

या एका मंत्रांत भारतियांचीं विवाहविषयक ध्येयें एकत्रित येतात. सुखी

व यशस्वी विवाह होण्यास साधनभूत असलेल्या सर्व गोष्टींचा एकत्रित उल्लेख येतो. आणि भारतियांचा विवाहविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

गृहप्रवेशनीय होमांतहि या गोष्टीचा पुनरुच्चार आहे. ' हे वधू तूं वीरसू ( वीरपुत्र प्रसवणारी ) हो. '

**' इमां त्वमिन्द्रमीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु ।**
**दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि स्वाहा ।**

" हे इंद्रा, तूं या वधूस सुपुत्रा व सुभगा कर, " अशा प्रार्थना आहेत.

यानंतर ' एरेणीदान ' हा विधि वैदिक नसून आचारप्राप्त आहे. या विधींत वेळूचीं लहान सोळा सुपें व एक वेळूचीच डाली ह्या गोष्टी वरमातेस दान द्यावयाच्या असतात. या दानप्रसंगींहि याच उद्देशाचे या विधींतील अंतिम उच्चार आहेत.

**' वंशो वंशकरः श्रेष्ठो वंशो वंशसमुद्भवः ।**
**अनेन वंशदानेन तुष्टिं ऋद्धिं करोतु मे ॥**
**वंशपात्राणि सर्वाणि मया संपादितानि वै ।**
**उमाकान्ताय दत्तानि मम गोत्राभिवृद्धये** ॥ गोरे पृ. ८१

' वंश ' म्हणजे वेळू. हा वंशकर म्हणजे वंश उत्पन्न करणारा असून या दानानें माझी गोत्रवृद्धि होऊं दे, असा याचा तात्पर्यार्थ आहे. सहज घडणाऱ्या गोष्टीचा इतका वारंवार उच्चार करून उद्देश स्पष्ट करण्यांत कांहीं विशेष फलनिष्पत्ति असावी.

**हा उद्देश स्पष्ट कां केला !**

प्रथमतः ' काम ' या पुरुषार्थ-साधनांत संततिहेतुक रतिसुखास महत्त्व आहे. संतति टाळून रतिसुखावर भर देणें भारतियांस काम-पुरुषार्थ-साधनाच्या दृष्टीनें मान्य नाहीं. म्हणूनच **' धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि '** असा शपथविधि वराकडून होतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट, विवाह हें साधन आणि सुप्रजा हें साध्य आहे. हा साध्यसाधनभाव समजणें अत्यंत महत्त्वाचें आहे. हें न कळल्यामुळें पाश्चिमात्य संस्कृतीनें बरेच घोटाळे माजविले आहेत. सुखी विवाहांत ' सुप्रजेचें ' स्थान फार महत्त्वाचें व मोठें आहे, ही गोष्ट भारतियांनीं स्पष्ट मांडल्यामुळें त्यांचे सर्व आचार त्यांनीं या कल्पनेस धरून केलेले दिसतील. उद्दिष्ट

स्पष्ट ठरल्याशिवाय बुद्धिगम्य आचार सांगणें अशक्य आहे. 'सुप्रजा' हें विवाहाचें ध्येय म्हटल्याबरोबर, वधूवरांत कोणकोणते गुण पाहावेत यासंबंधीं नियम त्यांनीं बांधले. यानंतर 'संतति' हें ध्येय स्पष्ट सांगण्यांत त्यांनीं आणखी एक मुद्दा साधला आहे. तो असाः विवाहामुळें ज्या दोन व्यक्ति एकत्र येतात; त्यांचें व्यक्तिमत्त्व ( Personality ) जर एकमेकांत विलीन होऊं शकलें नाहीं तर मोठी अडचणीची परिस्थिति निर्माण होते. या दोन व्यक्तींपैकीं दोघांचेंहि 'व्यक्तिमत्त्व' फार महत्त्वाचें असेल तर त्यांचें विलीनीकरण ( Personality identification ) फारच कठिण होतें, हेंहि सहज लक्षांत येईल. आज विवाह झाला व उद्यां त्या दोन व्यक्ति एकरूप पावून 'रामसीता' झाल्या हें म्हणणें हास्यास्पद आहे. एकरूपता वा 'व्यक्तित्वाचें विलीनीकरण' ही गोष्ट एकमेकांनीं एकमेकांकरितां झीज सोसून त्याग करण्यावर कालांतरानें उत्पन्न होणारी आहे. 'संतति' हा दोघांनाहि एक अत्यंत महत्त्वाचा त्यागाचा विषय आहे. तो या दोन व्यक्तींच्या स्वार्थापलीकडील असल्यानें, तो दोघांच्याहि मायेचा विषय बनतो. दोघांच्याहि आनंदाचा वा दुःखाचा हा योगायोग असल्यानें, तत्प्रीत्यर्थ दोघांच्याहि स्वार्थाचा त्याग घडणें अपरिहार्य होतें. यांतच दोघांच्या व्यक्तिमत्त्वाची अडचण कमी होऊन कांहीं एकत्वभाव निर्माण करणारी ही अमोघ शक्ति आहे. यामुळें विवाहास वस्तुनिष्ठता ( Objectivity ) येते. अशा समाजांत कांहीं मूल्यें ( System of values) निर्माण होतात. तीं फार महत्त्वाचीं असतात व विवाहाचा सर्व दृष्टिकोन येथें वेगळा दिसतो.

मनुस्मृतिकारांनीं चतुर्विध पुरुषार्थास धरून आश्रमधर्म सांगितले आहेत, त्यांत 'पुरुष' शब्दाची व्याख्या 'कुटुंब' अशीच केली आहे. आमच्याकडे कुटुंब याचा अर्थ निव्वळ पत्नी असा नसून 'पत्नी आणि प्रजा यांसमवेत स्वतः पुरुष' असा आहे.

**एतावानेव पुरुषो यज्जायात्मा प्रजेति ह ।**
**विप्राः प्राहुस्तथा चैतद्यो भर्ता सा स्मृताङ्गना ॥** मनु. ९.४५.

विद्वान् ब्राह्मण, जो पति तीच भार्या असें समजतात. यांत 'जायापति' या द्वंद्वाचें निर्द्वंद्व अभिप्रेत असावें आणि जाया, स्वतः व प्रजा मिळून जें कुटुंब होतें त्यास 'पुरुष' ही संज्ञा आहे. यावरून संतति ही विवाहांतील अविभाज्य घटक

आहे. अर्थात् संततीशिवाय विवाहास परिपूर्णत्व नाहीं. यांत पत्नीस 'जाया' हा अन्वर्थक शब्द वापरतात.

"**जायात्वं यदस्यां जायते पुनः।**" मनु. ९.८.

स्त्रीस निरनिराळ्या अवस्थेस धरून बाला, कन्या, भार्या, जाया व गृहिणी हे शब्द लावतात. गृहिणी ही तिची परिणत स्थिति समजली जाते. त्या स्थितीप्रत पोहोंचण्यास तिला विशिष्ट शिस्तींतून जावें लागतें आणि त्या स्थितीप्रत पोहोंचण्यानेंच तिचें खरें आत्मिक समाधान आहे.

**पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचीं मतें :** डॉ. मिस् हेलेन डुश ( Helene Deutch ) म्हणतात, "Whatever course a given woman's life has taken—she believes..... that she has fulfilled herself only if she has been rich in those experiences that constitute essense of motherhood. The book has attempted to break down the psychologic aspect of motherhood into its numerous components and to show what rich experience and happiness woman can find in her 'Biologic Destiny'. Modern education unfortunately neglects this truth."

( Helene Deutch. Vol II pp. 429-30)

जीवनाचा कोणताहि मार्ग स्त्री आक्रमो, कोणत्याहि सामाजिक, राजकीय व आर्थिक घडामोडींत तिचें आयुष्य व्यतीत होवो तिचा खरा अंतर्गत आनंद ( fulfillment ) व मानसिक शुद्ध समाधान मातृत्वांतील अनुभूतींतच सामावलेलें असतें. दुर्दैवानें हल्लींच्या शिक्षण पद्धतींत याकडे दुर्लक्ष केलें गेलें आहे. स्त्रीचें सुख जसें मातृत्वांत आहे तसेंच पुरुषाचें पितृत्वांत आहे. '**आत्मा वै पुत्रनामासि।**' या उपनिषद्वाक्याचा हाच ध्वन्यर्थ आहे. हें जुनें ब्राह्मणी तत्त्वज्ञान वस्तुस्थितिनिदर्शक आहे असेंच हेलन डूशचेंहि म्हणणें आहे.

"To renounce the child means far less to the man than it means to a woman, although in him likewise, deeper psychic motives raise the will to fatherhood. The Brahmanic

अनुक्रम वि: ...... ............
[redacted]मांक ...................... नों: दि: ...............

myth of the father's rebirth in his son is ( an idea ) deeply, rooted in man's psychic life."

(Helene Deutch. Vol II pp. 155–56.)

विचारप्रवर्तक अभ्यासक बर्ट्रांड रसेल विवाहांतर्गत बुद्धिगम्य नीतिसंबंधीं लिहितात, "Children are the purpose of marriage and to hold people to child-less marriage is a cruel cheat."

( Russell, p. 185. )

'प्रजोत्पादन हेंच विवाहाचें उद्दिष्ट असून प्रजोत्पादनाशिवाय स्त्री-पुरुषांस विवाहबद्ध ठेवणें ही दुष्ट फसवणूक आहे.'

भारतियांनीं नुसतें प्रजोत्पादनच नव्हे, तर सुप्रजा हा विवाहाचा हेतु ठरवून पुढील सर्व आचार बांधले. 'गर्भाधान' हा भारतियांचा एक महत्त्वाचा संस्कार आहे. 'मधुचंद्र' ( Honeymoon ) या शब्दानें या विधींतील भारतियांचा दृष्टिकोन स्पष्ट होत नाहीं.

**सुप्रजेच्या दृष्टीनें विवाहपूर्व विचार :** सुप्रजेच्या दृष्टीनें कोणतीं कुलें वर्ज्य करावीं याचा विचार मनूपासून वात्स्यायनापर्यंत सारखाच दिसतो. त्यांत क्षय, अपस्मार, कुष्ठ व आर्श या व्याधि असलेलीं कुलें वर्ज्य समजलीं आहेत. शत्रूप्रमाणें शरिराचा नाश करणारे रोग ते अर्श अशी याची निरुक्ति असून वाग्भटानें अष्ट महारोगांत मेह, भगंदर, उदर, कुष्ठ, ग्रहणी, अर्शस् ( मूळव्याध ) इत्यादि आठ रोगांना महारोग अशी संज्ञा दिली आहे.

याशिवाय सपिंडत्व व सगोत्रत्व हीं विवाहांत वर्ज्य सांगितलीं आहेत. गोत्र शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. सपिंड कोणास म्हणावें, यासंबंधींहि संपूर्ण मतैक्य कठिण आहे. एक गोष्ट खरी कीं गोत्रनामें आहेत याच स्वरूपांत, आज शेंकडों वर्षें चालत आलेलीं असून, विवाहांत त्यांचा विचार उच्च वर्णियांत केला जातो. भाऊ-बहीण व बाप-लेक हे विवाह अत्यंत सगोत्री होतील. सगोत्र व सपिंड या शब्दांनीं अनुक्रमें समान पिंड व समान गोत्र असा अर्थ होतो. साधारण मत असें दिसतें कीं, "मातेच्या बाजूनें पांच पिढ्यांनंतर व पित्याच्या बाजूनें सात पिढ्यांनंतर सापिंड्यदोष नष्ट मानावा." (गो. म. जोशी पृ. २१०)

जवळच्या नात्यांत विवाह होणें ( Consanguinity ) ही गोष्ट प्रजेच्या दृष्टीनें घातुक ठरण्याचाच संभव जास्त आहे हें सत्य आनुवंश शास्त्रज्ञांतहि आतां मान्यतेस पावलेलें आहे. आजहि भारतियांत सगोत्र विवाह होत नाहींत व सपिंड्यहि बऱ्याच प्रमाणांत पाळलें जातें.

यानंतर सवर्ण विवाह करावेत, वर्णाच्या बाहेर जाऊं नये असा एक महत्त्वाच दंडक येतो. सगोत्र व सपिंड नको; सवर्णत्व मात्र हवें असें म्हटल्यानंतर फार जवळचें क्षेत्र वर्ज्य केलें व फार दूरचें क्षेत्रहि वर्ज्य ठरविलें हें दिसून येईल. असवर्ण विवाह किंवा मिश्र विवाह यांस संकर अशी संज्ञा देतात. "**संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च।**" अशा अत्यंत कडक शब्दांत संकर हा टाळलाच पाहिजे अशी भारतियांची कल्पना आहे. संकरानें कुलाचा नाश होतो अशी त्याचा कारणमीमांसा आहे. सवर्ण शब्दानें जात घ्यावी किंवा पोटजात घ्यावी हा पुन्हां मोठ्या वादाचा प्रश्न येतो. जाती व उपजाती कशा होत गेल्या, सध्यां त्यांची स्थिति काय आहे आणि त्यांच्या एकत्रीकरणांतून काय परिणाम होतील हें सांगणें शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाचें असलें तरी अत्यंत अवघड व वादग्रस्त आहे. या चर्चेत येथें जावयाचें नाहीं. सध्यां सामान्यतः विवाह होतांना सवर्णत्व म्हणचे पोटजातच पाहिली जाते हें सत्य आहे आणि सगोत्रत्व वर्ज्य करून सवर्णातच पुष्कळसे विवाह होतांना दिसतात. ही प्रथा भारतियांत अनेक शतकें चालू असून यामुळें आनुवंशशास्त्रानें दाखवितां येईल असें कोणतेंहि नुकसान झालें असें सांगतां येणें कठिण आहे. जननशास्त्राचा विचार करतांना राजकीय कारणें दाखविणें हें मूलतः अशास्त्रीय असल्यानें त्या फंदांत पडणें येथें इष्ट नाहीं. संकरासंबंधीं कांहीं अभ्यास अलीकडे झालेला दिसतो. त्यांचे निष्कर्ष कित्येक वेळां परस्परविरोधीहि आलेले दिसतात. स्कॉच व इंग्लिश यांचे मिश्र विवाह फारसे सुपरिणामी होतांना दिसत नाहींत. तर इंग्लिश व फ्रेंच यांचा संकर सुपरिणामी झालेला दिसतो. संकराच्या परिणामांची शास्त्रशुद्ध माहिती आज जेवढी विस्तृत असावी तशी नाहीं. तेव्हां ज्या विषयासंबंधीं विशेष माहिती आज अस्तित्वांत नाहीं त्यासंबंधीं कांहींतरी घाईघाईनें करून टाकणें, कांहीं प्रसंगीं धोक्याचेंच असतें. आम्ही येथें एवढेंच सुचवून ठेवतों कीं, आमच्या देशांत जननशास्त्रांत शोभतील अशा नियमांनीं बद्ध होऊन निरनिराळ्या मानवी संघांचें शेंकडों वर्षें प्रजोत्पादन चालू असल्यामुळें जननशास्त्राच्या अभ्यासाला ही परिस्थिति मोठी उपकारक असतांना आमच्या-

[stamp]

कडे याबद्दल गणितागत पद्धतीचे ( Statistical method ) फारच थोडे अभ्यास आज उपलब्ध आहेत. रक्तांतील गुणधर्मासंबंधीं डॉ. खानोलकर यांचे व डोळ्यांतील फरकासंबंधीं प्रस्तुत लेखकाचे असे कांहीं गणितागत अभ्यास उपलब्ध आहेत. अशा प्रकारची निरनिराळ्या गुणधर्मांवर भरपूर व विस्तृत माहिती पुढें आल्याशिवाय या देशांतील संघोपसंघांत मिश्र विवाह व्हावेत किंवा होऊं नयेत याचें शास्त्रीय दिग्दर्शन करतां येणें कठिण आहे.

**पुरुषप्रधान संतति कशाकरितां :** वरील विवेचनावरून आणखी एक असा मुद्दा निष्पन्न होतो कीं, भारतियांनीं पुरुषसंतति व्हावी, जगावी व वाढावी याकरितां विशेष काळजी वाहिलेली दिसते. स्त्रीसंतति त्यांस नको असा अर्थ होत नाहीं. 'अष्टपुत्रा' असा आशीर्वाद जरी असला तरी सर्व पुत्रच होतील व ते जगतील असें सहसा घडलच नाहीं. तेव्हां संततीमध्यें पुरुषप्रधानत्व असावें असा भारतियांचा अभिप्राय दिसतो. पितृसत्ताक कुटुंबसंस्थेंत पुरुषप्राधान्य असणें सहाजिकच आहे. तें पूर्वीं होतें व आजहि आहे. पण पुरुषप्राधान्याची इच्छा करण्यास आणखी कांहीं कारणें दिसतात.

पुरुष ही समृद्ध कुटुंबाची व विजिगीषु राष्ट्राची खरी व मोठी कर्तृत्वशक्ति असते. पुरुषसंततिप्रधान घराण्यांत श्रेष्ठ पुरुष जास्त जन्मास येतात असें एक निरीक्षण गाल्टन, एलिस इत्यादि आधुनिक शास्त्रज्ञांनींहि केलेलें दिसतें. जगज्जेते, शास्त्रज्ञ, कर्तृत्ववान्, क्रांतिवीर, पुढारी, विद्वान् व बुद्धिमान् अशा श्रेष्ठ कर्तृत्वशक्तीचे पुरुष साधारणतः पुरुषप्रधान संतति असलेल्या कुटुंबांतून जन्मलेले दिसतात.

याशिवाय स्त्री-पुरुषसंततींत कांहीं निसर्गनिर्मित मूलभूत फरक आहेत. गर्भपतनद्वारा स्त्रीपिंडांपेक्षां पुरुषपिंडांचा ऱ्हास जास्त असतो. पुरुषसंततीची वाढ होणें स्त्रीसंततीपेक्षां जास्त कठिण असतें. स्त्री-पुरुषप्रकृतीचा विचार करतां त्यांस जीं सामान्य इंद्रियें आहेत, त्यांसंबंधीं रोगांचा विचार करतां असें दिसून येतें कीं इंद्रिय-विकृतिप्रधान ( Organic ) रोग स्त्रियांपेक्षां पुरुषांनाच होण्याचा जास्त संभव असतो. स्त्रियांमध्यें ते फार कमी प्रमाणांत आढळतात. त्यांत पचन, श्वसन, हृदय, रक्तवाहिन्या व मूत्रपिंड यांच्या विकृति स्त्रियांपेक्षां पुरुषांस फार. याउलट स्त्रियांमध्यें नुसतें कार्यप्रधान विकृतीचें ( Functional ) प्रमाण जास्त

आढळतें. यांत हिस्टीरियासारखे रोग येतात. आयुष्याच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत बहुतेक सर्व कालांत पुरुषांची मृत्युसंख्या स्त्रियांपेक्षां जास्त असते आणि ही स्थिति गर्भावस्थेमध्येंहि सत्य असल्यानें, फार श्रम, कष्ट इत्यादि परिस्थितिजन्य कारणें देऊन भागत नाहीं. सबंध प्राणीमात्रामध्येंहि ही गोष्ट अशीच दृष्टोत्पत्तीस येत असल्यानें शेवटीं पुरुषपिंड प्राप्त होण्यास ही मोठी किंमत द्यावी लागते असा निसर्गाचा नियमच दिसतो. स्त्रियांचा नाजुकपणा जन्मसिद्ध असला तरी स्त्री-पुरुषांच्या प्रकृतींचा ( Constitution ) विचार करतां हें एक आश्चर्यकारक सत्य आहे.

स्त्री व पुरुष यांमध्यें जन्मापासून सर्व भिन्नता निसर्गनिर्मित आहे. त्यांची शारीरिक व मानसिक घडण भिन्न आहे, त्यांची कर्तृत्वशक्ति भिन्न तऱ्हेची आहे, त्यांची प्रजोत्पादनशक्ति भिन्न आहे. स्त्रीपुरुषांतील या भिन्नतेचा संपूर्ण अभ्यास पुष्कळ शास्त्रज्ञांनीं केलेला आहे. येथें एवढेंच लक्षांत आणावयाचें कीं विजिगीषु राष्ट्राला लागणारी कर्तृत्वशक्ति ही मुख्यतः पुरुषप्रकृतींतून उत्पन्न होत असते आणि पुरुषप्रधानसंतति कुटुंबांत ठेवणें ही गोष्ट निसर्गांत सोपी नाहीं. यामुळें या मुद्याकडे भारतियांचें जास्त लक्ष गेलेलें असावें.

प्रजोत्पादन ही विवाहांत एक जरुरीची गोष्ट आहे हें सहज ध्यानांत येणें कठिण पडतें कारण '**अतिपरिचयात् अवज्ञा**' अशी स्थिति पुष्कळ ठिकाणीं निसर्गानेंच केली आहे. परंतु याचें महत्त्व लक्षांत येण्यास संततिहीन कुटुंबें व त्यांतील स्त्री-पुरुष यांचें निरीक्षण करणें जरूर आहे.

**'संततिहीनत्व' हा कौटुंबिक जीवन-मरणाचा प्रश्न**

कौटुंबिक दृष्टीनें 'संततिहीनत्व' ( Infertility ) हा एक फार मोठा जीवनमरणाचा प्रश्न समाजांत मागें जसा होता तसाच आजहि आहे. फक्त त्याचें सामाजिक महत्त्व शिकलेल्या समाजांतून आतां जवळ-जवळ लयासच जात आहे. 'हिंदुस्थानची लोकसंख्या फार वाढलेली आहे.' तेव्हां वंशनाश झाला तर राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यास मदतच झाली, इतक्या मूर्खपणाचे व अशास्त्रीय तर्क लोकप्रचारांत दिसतात. आतां ज्या कुटुंबांना—अर्थात् अशीं कुटुंबें कोणत्याहि समाजांत बहुसंख्य असतच नाहींत—संततिहीनत्वाचें दुःख सहन करावयाचें असतें, त्यांची परिस्थिति जशी पूर्वी

शोचनीय होती-तशीच, किंबहुना जास्तच शोचनीय आहे. संततिहीनत्वाचीं कौटुंबिक दुःखें पुष्कळच असतात. तसें नसतें तर या परिस्थितींत सांपडलेले स्त्री-पुरुष यांवरील उपाययोजनेकरितां वैद्य, ज्योतिषी, जादूटोणा, जंतरमंतर, तीर्थयात्रा इत्यादींच्या आहारीं कधींच गेले नसते. अशा परिस्थितींत अशा कुटुंबांची जुन्या काळांत जी धांवपळ होत असे तीच आजहि आहे. मागें दर्शविल्याप्रमाणें अशा परिस्थितींत अत्यंत असमाधानी 'स्त्री' ही गृहसौख्य नांवाची गोष्ट निर्माण करण्यास असमर्थ होऊन शिवाय तिच्या मनाचें असमाधान, मत्सर, द्वेष, जीवनांतील सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष, इत्यादि नानाविध प्रकारांनीं आविष्कार पावत असते. समाजांत 'वंशवृद्धी'चें महत्त्व जरी कमी झालेलें असलें तरी वंध्यत्वावर अजून या शिकलेल्या लोकांतहि टीका व तिरस्कार कांहीं थोडा आहे असें नाहीं. पुरुषाची स्थिति घरांत कष्टाची होते. शिवाय मागें दिग्दर्शित केल्याप्रमाणें पुरुषाची 'पितृत्वाची इच्छा' ही मातृत्वाच्या इच्छेप्रमाणेंच प्रबल असते. ती असफल झाल्यास पुरुषाला अशा परिस्थितींत मनाचा समतोलपणा ठेवणें कठिण जातें. पुष्कळ वेळां अशा पुरुषांचा पराक्रमहेतूच नाहींसा झाल्यासारखें होऊन त्यांच्या महत्त्वाकांक्षा लयास जातांना दिसतात. जगांतील पराक्रमाची, अर्थोत्पत्तीची आणि नवीन मिळकत करण्याची इच्छा या संततिहीनत्वानें हळूंहळूं लयास जाते. आणि वात्स्यायनसूत्रकारांनीं वर्णन केल्याप्रमाणें अपुत्रकाचें जीवन वाळलेल्या गवताप्रमाणें होतें. मग यांतून ज्यांना कांहीं ध्येयवाद असतो, ज्यांना बौद्धिक आनंद असतो अशी मंडळी वेगळी. पण अशी मंडळी नेहमींच फार थोडी असते. शिवाय समाजांतील लोकांनाहि अशा कुटुंबांविषयीं मागें जी कळकळ वाटत असे ती नाहींशी झाली असल्यानें उलट कित्येक वेळां अशा कुटुंबाच्या परिस्थितीचा फक्त भरपूर फायदा लुटण्याची स्वार्थी वृत्तीहि बोकाळत आहे. 'समाज' अशा लोकांना ओलावा उत्पन्न करण्यास उपयोगी पडण्याऐवजीं, कित्येक प्रसंगीं दुःखांत भर घालण्याचें कार्यच करीत असतो. अशा स्थितींत राहिलेला काळ संपविणें या पलीकडे सामान्य जनांस कांहींच करण्याची शक्ति व उमेद न राहिल्यानें या उपेक्षित कुटुंबांचा नाश त्यांना उघड्या डोळ्यांनीं पाहात राहावें लागतें, असें हें चित्र आहे. असो.

**संस्कृत वाङ्मयांतील अनपत्यत्वाचीं वर्णनें :**

संस्कृत वाङ्मयांतहि अनपत्यत्वाचीं मोठीं मार्मिक वर्णनें पुष्कळ ठिकाणीं येतात. कालिदासकृत शाकुंतल नाटकांत धनमित्र नामक एक समुद्रव्यापारी अनपत्य असून नौकाव्यसनांत सांपडल्यामुळें मृत्युमुखीं पडला. तत्कालीन कायद्याप्रमाणें राजकीय तिजोरींत त्याचा धनसंचय यावयाचा. अशा प्रसंगीं दुष्यंताला स्वस्थितीची आठवण होऊन तो म्हणतो, **'कष्टं खलु अनपत्यता'** 'अनपत्यता ही केवढी कष्टप्रद स्थिति आहे! असें जाहीर करा कीं, 'आमच्या प्रजेंत ज्यांच्या ज्यांच्यावर स्वतःचे अत्यंत प्रेमळ बांधव नाहींसे होण्याचा प्रसंग येईल तेथें तेथें दुष्यंत त्याची जागा भरून काढील.' केवढी ही प्रजारंजनवृत्ति! **'राजा प्रजारंजनलब्धवर्णः'** ही वृत्ति या घोषणेनें सार्थ केली येवढेंच नव्हे तर दुःखनिवारण किती तऱ्हेनें सरकार करीत होतें याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. याच्या पुढेंच मोठा दीर्घ निःश्वास सोडून दुष्यंत म्हणतो, 'अरेरे! म्हणजे मनुष्य अनपत्य मरण पावला तर त्याची संपत्ति कोणीतरी तिऱ्हाईत खाऊन टाकणार! माझ्या पुरुवंशाची गत शेवटीं हीच काय?' याच्या पुढें "माझे पूर्वज माझ्या हातून पाणी घेतांना यापुढें आम्हांस कोण पाणी देणार? या कल्पनेनें, ते स्वतःचे दुःखाश्रु पुसून मग राहिलेलें पाणी ग्रहण करीत असतील." यानंतर सप्तम अंकांत सिंहाशीं खेळणाऱ्या त्या बालकास पाहून दुष्यंताची पितृत्वेच्छा आपोआप जागृत होते. "माझ्या अनपत्यत्वामुळें तर माझें मन एवढें हळवें बनलें नसेल ना?" असा अपत्यहीन मनाचा हळवेपणा कवीनें स्पष्ट केला आहे. परंतु यापुढें अपत्यप्रेमाचा आनंद तर कवीनें फारच बहारीनें खालील शब्दांत वर्णन केला आहे.

**आलक्ष्यदंतमुकुलाननिमित्तहासैरव्यक्तवर्णरमणीयवचः प्रवृत्तीन्।**
**अंकाश्रयप्रणयिनस्तनयान्वहंतो धन्यास्तदंगरजसा मलिनीभवंति॥**

शाकुंतल ७.१७

अनिमित्त स्मितहास्य करतांना सहज दिसणारे ते कळ्यांसारखे दांत, बोबड्या वाणीनें बोलण्याचा प्रयत्न करण्याची प्रवृत्ति, मांडीशीं सहजगत्या बिलगण्याची धडपड, हें सर्व पाहिलें म्हणजे धन्य ते लोक कीं, ज्यांचीं अंगें या बाललीलांनीं मळलीं जातात. यावरून अनपत्यत्वांत अंतःप्रवृत्तीचें असमाधान व

त्यापासून होणारें सतत दुःख, त्या असमाधानांतून उत्पन्न होणारा मनाचा हळवेपणा, 'आपला पराक्रम काय कामाचा, शेवटीं कोणाची तरीच धन होणार' ह्या विचारानें निर्माण होणारी विषण्णता आणि स्वतःच्या मातापित्यांशिवाय दुसरा कोणीच या दुःखांत सहभागी होण्यास समर्थ नसतो, ही सर्व वस्तुस्थिति वरील वर्णनांत कवीनें मार्मिकपणानें एकत्र आणली आहे. वैद्य वाग्भटानें असेंच एका श्लोकांत अनपत्यत्वाचें वर्णन केलें आहे.

**अच्छायः पूतिकुसुमः फलेन रहितो द्रुमः ।**
**यथैकश्चैकशाखश्च निरपत्यस्तथा नरः ॥** वाग्भट. उ. ४०.९

ज्याप्रमाणें, एका शाखेचा, छायारहित, फलहीन वृक्ष असतो, तद्वतच या अनपत्य पुरुषाची समाजांत स्थिति होते. लोक त्याचीं लांकडें तोडून जाळण्यास वापरणारच कोणत्याहि प्रकारच्या संततीपासून जर मातापित्यांस कांहीं दर्शनस्पर्शनादि सुखप्राप्ति होते तर यश, धर्म, मन, संपत्ति व कुल यांची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या सुप्रजेमुळें केवढी आनंदप्राप्ति होत असेल बरें !

**अपि लालाविलमुखं हृदयाह्लादकारकम् ॥**
**अपत्यं तुल्यता केन दर्शनस्पर्शनादिषु ।**
**किं पुनर्यद्यशोधर्ममानश्रीकुलवर्धनम् ॥** वाग्भट. उ. ४०.१०-११

वरील उदाहरणांवरून वैद्यक व वाङ्मय या दोनहि शाखांत शास्त्र व लोकाचार यांना धरून संतति ही विवाहासंबंधीं अत्यंत महत्त्वाची व सुखदायी गोष्ट आहे याची जाणीव स्पष्ट होती; येवढेंच नव्हे तर संततिहीनत्वांत पुरुषाची दशा काय होते याचें योग्य वर्णनहि करून ठेवलेलें आढळतें.

**प्रजाहीनत्वाच्या परिणामांविषयीं पाश्चिमात्य मतें :**

संततिहीनत्वाचे स्त्री-पुरुषांवरील एकंदर परिणाम किती खोल व अनिष्ट असतात त्याचें वरील चर्चेमुळें थोडें दिग्दर्शन होईल. डॉ. व्हॅन डी वेल्डी या गृहस्थांचें आपल्या 'फर्टिलिटी अँड स्टॅरिलिटि' ( Fertility and Sterility ) या ग्रंथांत प्रतिपादन केलेलें मत त्यांच्याच शब्दांत खालीं देत आहें.

" Sterility is a circumstance of fundamental importance

in the mental and bodily life of woman and can be equally crucial for the happiness of marriage, and its reverse. In its effects on married life, involuntary sterility can destroy affection and happiness." (Van D. Velde. p. 167)

संतति हा वैवाहिक सुखाचा एक महत्त्वाचा खांब आहे. अनपत्यत्वांत स्त्रीची शारीरिक व मानसिक हानि फार होते. वैवाहिक जीवनाचें अरण्य करण्यास ही गोष्ट समर्थ आहे असें ते सांगतात. याबाबत ज्यूंची आयझॅकची कथा मार्मिक आहे. पुष्कळ प्रकारची चिकित्सा करूनहि अब्राहामची पत्नी सराई ( Sarai ) हिला संतान प्राप्त झालें नाहीं. शेवटा दासीच्या ठिकाणीं पुत्र झाला तोच हा आयझॅक ( Isaac ). यामुळें प्रथम पत्नीचा मत्सर इतका वाढला कीं अब्राहाम फार दुःखी झाला. हा पुत्र मात्र फार महत्त्वाचा ठरला. या एका गोष्टींत प्रजाहीनत्वाचे प्रश्न साकल्यानें येतात. प्रजाहीनत्वांत विवाहांतर्गत आनंद राहूं न शकल्यानें विवाह अयशस्वी होतो. चिकित्सेचा उपयोग पुष्कळ वेळां होत नाहीं आणि दुसऱ्या संबंधापासून उत्पन्न होणाऱ्या प्रजेचे प्रश्न व महत्त्व हीं सर्व आजहि ४००० वर्षांपासून तशींच आहेत.

मानसिक दृष्ट्या स्त्री व पुरुष दोघांनाहि यांत मोठ्या भावनोद्रेकास तोंड द्यावें लागतें कीं ज्यामुळें ' सुख ' ही गोष्ट अशा विवाहांतून फारच दुर्मिळ होऊन बसते. स्त्रीमध्यें मातृत्वाची इच्छा फार बलवत्तर असते. मातृत्वाची इच्छा अपूर्ण राहिल्यानें तिच्या मनावर आणि शरिरावर दुष्परिणाम होतात. इत्यादि स्त्रीविषयक विचारांबाबत विचारवंतांचें एकमतच आहे. पुरुषांत ही पितृत्वेच्छा कितपत जोरदार असते, पुरुषावर या अपूर्णत्वाचे कांहीं परिणाम होतात किंवा नाहीं याबद्दल फारसा विचार आणि तत्संबंधीं महत्त्व यांची पाश्चिमात्य शास्त्रीय वाङ्मयांत बरीच वाण दिसते. पुरुषांत पितृत्वेच्छाहि बलवत्तर असते असें डॉ. हॅलेन डूशप्रमाणेंच डॉ. व्हॅन डी वेल्डी यांचें मत असून पुरुषासहि ही इच्छा कां असते याचीं कारणें पुढीलप्रमाणें ते देतात.

( १ ) '**आत्मा वै पुत्रनामासि ।**' हें उपनिषद्वाक्य सर्वश्रुतच आहे. संततीमध्यें पुरुष स्वतःचें अमरत्व पाहात असतो.

( २ ) स्वतःच्या पौरुषाचा संतति हा प्रत्यक्ष पुरावा म्हणून संततीमुळें त्यास ' वडील ' म्हणवून घेणें फार प्रिय असतें.

( ३ ) स्त्रीमध्यें त्याची संततीसंबंधीं मोठी अपेक्षा असते.

( ४ ) स्वतःचा धंदा व अर्थार्जन करण्याकरितां आणि त्यांत उत्कर्ष मिळविण्याकरितां संतति ही मोठी प्रेरक शक्ति असते.

( ५ ) 'घरास घरपणा संततीनेंच प्राप्त होतो.' ही कल्पना स्त्रीइतकीच पुरुषासहि असते.

( ६ ) संततीमुळें म्हातारपणीं आपणांस कांहीं आधार मिळेल ही एक बलत्तवर आशा स्त्रीपुरुषांत सारखीच महत्त्वाची असते. येणेंप्रमाणें विवेचन करून ते निष्कर्ष काढतात कीं,

" Children are the natural and psychologically necessary accompanimens of normal marriage between average human beings. For the individual, emotional and psyshic welfare of both parties this form of life's fuifillment is important in the long run. ( Van De Velde p. 84. )

सुखशांतिप्रीत्यर्थ किंवा पुरुषार्थप्राप्तिसाठीं, स्त्री व पुरुष या दोघांनाहि विवाहांतर्गत संतति ही एक महत्त्वाची आणि भावनात्मक व मानसिक आरोग्यासाठीं जरुरीची गोष्ट आहे.

**प्रजाहीनत्व :** संततिहीनत्वाबद्दल विचार करतांना 'संततिहीन' विवाह केव्हां म्हणावयाचा याचा विचार प्रथम उत्पन्न होतो. विवाह झाल्यावर १ वर्षापासून १५ ते २० वर्षांपर्यंतहि संतति झालेली पाहण्यांत येते. हल्लींच्या शास्त्रांत संततिहीनत्वासंबंधीं कार्यकारणपरंपरा शोधण्याची पुष्कळ खटपट चालू आहे. सर्व खटपटी करूनहि 'कार्यकारणपरंपरा' ज्यांत कांहींहि कळूं शकत नाहीं, अशी विवाहित जोडप्यांची संख्या शेवटीं कांहीं थोडी नाहीं. कारणपरंपरा शोधून व त्यांच्या चिकित्सेंतून योग्य ती फलप्राप्ति झाली तर कोणीहि ग्राह्यच धरील. परंतु ज्या ठिकाणीं कारणपरंपरेचें ज्ञान होत नाहीं, आणि झालें तरी ज्या गोष्टी चिकित्सेच्या पलीकडच्या असतात, अशा वेळीं काय करावें ही खरी अडचणीची परिस्थिति आहे. आणि अशा अडचणींतील विवाहित जोडप्यांची संख्या वाटते इतकी क्षुल्लक नाहीं. विवाहापासून १५ वर्षांपर्यंत एकाहि जिवंत मुलाचा जन्म झाला नाहीं तर तो मूलतः प्रजाहीन विवाह

समजतात. १९५१ च्या ग्रेट ब्रिटनच्या आंकडेवारीप्रमाणें अशांची संख्या शेंकडा बारा निघाली. इंग्लंडमधील स्त्रियांचें २० ते २४ हें विवाहाचें साधारण वय आहे. ज्याप्रमाणें हें वय वाढत जातें तसतशी संततिहीन स्त्रियांची संख्याहि वाढत जाते. यांतील बहुतेक सर्व संततिहीनत्व अनैच्छिक स्वरूपाचें आहे. ( H. Campbell. B. M. J. Feb. 22, 1958. p. 429 )

डॉ. जेफ्कोट ( Dr. Jeffcoate ) हे लिव्हरपूल विश्वविद्यालयांत स्त्री-रोगचिकित्सेचे प्रमुख प्राध्यापक आहेत. त्यांनीं संततिहीनत्व ( Infertility ) या विषयावर मोठी उद्‌बोधक आंकडेवारी प्रसिद्ध केली आहे. संततिहीनत्वाचे तोटे बहुविध आहेत. साधारण आठ टक्के विवाह इंग्लंडमध्यें अनैच्छिकपणें प्रजाहीन ( Involuntarily sterile ) आहेत. आणि अकरा टक्के विवाहांत संतति फार प्रयत्नांनींच होते. त्यांतहि फार तर एक दोन यापेक्षां अधिक संतति असत नाहीं. याप्रमाणें साधारणतः २० टक्के विवाहांत संतति हा प्रश्न निर्माण होतो असा याचा अर्थ. हा आंकडा लहान आहे असें कोणी सुज्ञ म्हणेल असें वाटत नाहीं. शास्त्रीय बुद्धीस कळतात ते सर्व प्रयत्न करूनहि ८ ते १२ टक्के विवाहित जोडप्यांत कांहींहि होत नाहीं आणि २० टक्के जोडप्यांस एखादें मूल होतें. ही फलश्रुति पाहिली म्हणजे खरा शास्त्रज्ञ घमेंड मारणार नाहीं हें खास. पण यावर डॉ. जेफ्कोट यांनीं अभ्यासानें खालील मतें नोंदविलीं आहेत.

" No matter what treatment is applied or what advice is given, conception will follow in certain number of cases, this is inevitable by the laws of chance which governs conception. It is all too easy to claim a coincidence as a dramatic cure, and this is the reason why so many treatments have their advocates. Scepticism in these matters is not popular and it is justified by the findings in carefully documented cases. Of those women, who consult a gynaecologist on account of sterility of two or more years duration, approximately 50% have at least pregnancy within the next 15 years and in not less than half of these the occurrence is unrelated to treatment. Moreover, the occurrence of pregnancy after treatment does not necessarily mean that the fertility is raised. " ( B. M. J. )

दोन वा अधिक वर्षें मूल होत नाहीं म्हणून जीं कुटुंबें वैद्यकीय सल्ला घेण्यास आलीं त्यांतील ५० टक्के लोकांना पुढील पंधरा वर्षांत एखादी गर्भधारणा झाली. पण त्या गर्भधारणेचा व चिकित्सेचा कांहींहि संबंध नव्हता.

कावळा बसायला व फांदी मोडायला बरेच वेळां गांठ पडते, तसला प्रकार यांत होता, म्हणून निरनिराळ्या चिकित्सा फार महत्त्वास चढतात. पण गर्भधारणा हा प्रसंग चिकित्सेंतून उत्पन्न होण्याची शक्यता फारच थोडी असते. यावरून ‘ त्यांत काय आहे ’, ‘ डॉक्टरांना विचारा ’ असा नुसता सल्ला या २० टक्के विवाहांबाबत देऊन कार्यभाग होत नाहीं. ज्यांत प्रजोत्पादनक्षमता भरपूर आहे अशा विवाहांतहि गर्भधारणा होण्यास सुमारें ६ ते ७ महिने लागतात असें दिसून येतें. साधारण ५ पैकीं ४ किंवा शेंकडा ८० स्त्रियांना एका वर्षांत गर्भ-धारणा व्हावी असें मत आहे. अर्थात् त्यांत कोणी आधुनिक संततिप्रतिबंधक साधनें वापरीत नाहींत असें आपण धरून चालूं. साधारण दोन वर्षें थांबण्याची पद्धत आहे. परंतु दोन वर्षांपलीकडे वाट पाहूं नये. ताबडतोब उपाययोजनेस लागावें, असें बऱ्याच शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. विशेषतः विवाहांतील स्त्रीचें वय ३० च्या वर व पुरुषाचें ४० च्या वर असेल तर एका वर्षापेक्षां जास्त वेळ थांबणें धोक्या-चेंच आहे. वरील विवेचनावरून विवाहानंतर १ ते २ वर्षांत नैसर्गिक रीत्या प्रजोत्पादन व्हावें असा शास्त्रीय अभिप्राय दिसतो.

प्रजोत्पादनक्षमतेचा अभाव ( Infertility ) ही संज्ञा तुलनात्मक आहे. एखाद्या स्त्रीस विवाहानंतर गर्भधारणा सहा महिन्यांत होईल तर दुसरीस पंधरा वर्षांनीं होईल. एखादीस एखादें मूल होऊन कार्य संपेल तर दुसरीस दर वर्षी मूल होईल. तेव्हां हा सर्व विषय ‘ Chance ’ म्हणजे नशिबाचा फासा दिसतो. वाल्झंगचें एक वाक्य खालीं देत आहें.

“ The divinity which presides over maternity is chance.”

मातृत्व हें खरें परमेश्वरी सूत्र आहे. त्यास आपण पाहिजे तर निसर्ग म्हणूं, नशीब म्हणूं, वा ‘ चान्स ’ म्हणूं. बहुसंख्य लोकांच्या वांट्यास हा चान्स निसर्गांत सहज येतो. म्हणून यांतील नशिबाचा भाग दृष्टिआड होतो. मातृत्व ही नेमकी नशिबानें वा ‘ चान्स ’ नें घडणारी गोष्ट आहे हें म्हटल्यावर ज्या वीस टक्के स्त्रियांना हा चान्स लाभत नाहीं, वा शक्यता फारच थोडी असते, त्यांचा प्रश्न

कसा सोडवावयाचा हा मुद्दा आहे. कारण शास्त्रीय चिकित्सेंतूनहि त्यांना फलनिष्पत्ति होतेच असें बिलकुल नाहीं हें वर दिग्दर्शित केलेंच आहे.

प्रजोत्पादनाच्या अक्षमत्वास कांहीं कारण असतेंच. पण पुष्कळ कारणांचा उभयता स्त्री-पुरुषांत समन्वय झाल्यास संतति होणें अशक्यच असतें. एकंदर विचार करतां दोघांपैकीं कोणास दोष किती देतां येतो हें ठरविणें जरी कठिण असलें तरी 'मुख्य दोष' पुरुषांपेक्षां बव्हंशीं स्त्रींत असतो.

"The main fault is found in the female more often than in the male."

साधारण चाळीस टक्के पुरुषांत प्रजोत्पादनक्षमता कमी प्रतीची आढळते. ह्या प्रती लावतां येतात आणि पुरुषाच्या कमी प्रतीच्या प्रजोत्पादनक्षमतेंतूनहि गर्भधारणा होऊं शकते हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. वीस वर्षांखालील स्त्रीमध्यें प्रजोत्पादनक्षमता (Fertility) चांगली असते व ३५ वर्षांनंतर ती फारच थोडी असते हें सत्य आहे. ज्यांचा विवाह वयाच्या विसाव्या वर्षापूर्वी झालेला आहे त्यांतील दहा वर्षांनंतर फक्त सहा टक्के स्त्रिया प्रजाहीन ठरल्या. (Campbell B. M. J.)

जें वय भारतियांनीं विवाहास योग्य ठरविलें त्यांत स्त्री व पुरुष यांची 'प्रजोत्पादनक्षमता' (Fertility) जास्तींत जास्त असते असें तें वय आहे. शिवाय विवाहपूर्व सर्व विचार सुप्रजा या एकाच दृष्टींतून आहे आणि एके ठिकाणीं तर पौरुषासंबंधीं पुरुषाची विवाहापूर्वी नीट चौकशी करावी असाहि सल्ला धर्मशास्त्रांनीं दिलेला सांपडतो.

**एतैरेव गुणैर्युक्तः सवर्णः श्रोत्रियो वरः ।**
**यत्नात्परीक्षितः पुँस्त्वे युवा धीमान् जनप्रियः ॥** का. सू. ३.१.५

"पुरुष जरी गुणयुक्त, श्रोत्रिय, सवर्ण असला तरी त्याची पौरुषासंबंधीं यत्नानें चौकशी करावी." विवाहपूर्व स्थितींत कोणतेहि स्त्री-पुरुष प्रजोत्पादनक्षम होतील किंवा नाहीं हें ठरविणें कठिण आहे. त्यांतल्या त्यांत पुरुषाचें परीक्षण करणें जास्त शक्य आहे, परंतु स्त्रियांबाबत असें परीक्षण विशेष शक्य असत नाहीं.

वैद्यक शास्त्राप्रमाणें संपूर्ण १६ वर्षे वयाची स्त्री संपूर्ण वीस वर्षे वयाच्या पुरुषाशीं संगत झाली असतां वीर पुत्राची प्राप्ति होते. स्त्री-पुरुषसमागमाला यापेक्षां कमी वय नसावें असें वैद्यकाचें मत दिसतें.

विवाहाचें वय यापेक्षां कमी मानलें असलें तरी त्याचा अर्थ तें समागमाचें वय असावें असें नव्हे. ऋतुकालाची मर्यादा बारा रात्री सांगितली असून त्यांत प्रथम तीन व अकरावी वर्ज्य असल्याचें सांगितलें आहे. स्त्रीपुरुषसमागम अपत्योत्पत्तिकरतांच असावा असा वाग्भटाचा सल्ला आहे. परस्परांचा संतोष व आनंद कायम राखून मनांत सत्पुत्राची वासना ठेवून संभोगास सिद्ध व्हावें. गर्भधारणा न होण्याचीं कारणें बरींच कष्टसाध्य आहेत. जुन्या वैद्यकाप्रमाणें कांहीं व्याधि उपायसाध्य असून कांहीं असाध्य आणि कांहीं कष्टसाध्य आहेत. त्यांत पुष्कळशा शुक्रार्तवांच्या व्याधि कष्टसाध्य वा असाध्य वर्गांतच मोडणाऱ्या आहेत. आयुर्वेदाच्या अष्टांगामध्यें ' वाजीकरण ' नांवाचा मोठा भाग आहे. पुरुषास बलवान् करून त्यानें स्त्रीसुखाचा पुष्कळ वर्षें लाभ घेतां यावा असा जरी त्याचा सर्वसामान्य अर्थ असला, तरी पुरुष जेव्हां हतबल असतो, त्या वेळीं अपत्यार्थ वाजीकरणविधीचाच उपयोग होत असला पाहिजे. उत्तम ब्रह्मचर्य जरी चांगलें तरी विषयी पुरुषांचा शरीरक्षय कमी व्हावा आणि हीनबल लोकांना पुत्रोत्पत्तीचा लाभ व्हावा हीं वाजीकरणाचीं तितकींच महत्त्वाचीं उद्दिष्टें आहेत. '**शरीरक्षयरक्षार्थं**' व '**अपत्यसंतानकर**' असे वाजीकरणाचे स्पष्ट उद्देश आहेत. वाजीकरणाच्या प्रकरणांत महत्त्वाचा भाग पुरुषाचें हीनबलत्व किंवा प्रसंगोपात्त षंढत्व याचा विचार येणें अपरिहार्यच आहे. पुरुषाच्या अशा परिस्थितींत पुष्कळ वेळां मनाचा भाग ( Psychic ) फार मोठा असतो हें सत्य भारतीय वैद्यकास चांगलें परिचयाचें होतें. चित्ताची सुप्रसन्नता किंवा मनाचा उल्हास ज्यानें वाढेल तें सर्व बल्य किंवा वृष्य आहे असें समजावें, असें वाग्भटानें नमूद केलें आहे. आजहि पुरुषाचें हें प्रसंगोपात्त षंढत्व फार वेळां मानसिकच असतें, असेंच शास्त्रज्ञांचें मत आहे. अशा परिस्थितींत मानसोपचारपद्धति हल्लीं पुष्कळच उपयोगांत आणल्या जातात.

बीजाकरणाचा विषय वाग्भटापूर्वी चरकानेंहि मोठा विस्तृत दिला आहे. पुत्रकामी माणसानें या प्रयोगांचा अभ्यास करावयाचा आहे.

विसाव्या वर्षापूर्वी व सत्तराव्या वर्षानंतर पुरुषानें स्त्रीगमन वर्ज्य करावें आणि पुत्रकामी माणसानें जितेंद्रियत्व प्राप्त होण्यासाठीं वाजीकरण विधि तारुण्यांत करावा. जरा, व्याधि, चिंता, भय, शोक, क्रोध इत्यादि आधि, आणि स्त्रीचें अति-

सेवन यांनीं पुरुषबल क्षीण होतें आणि ह्या गोष्टी कटाक्षानें टाळल्या पाहिजेत. मनाचें फार मोठें महत्त्व चरकानेंहि स्पष्ट केलें आहे.

**' हर्षणं मनसश्चैव सर्वं तद्वृष्यमुच्यते । '** च. चि. २.३६

स्त्री जर भीतीनें, क्रोधानें, मत्सरानें वा व्याधीनें ग्रस्त असेल तर ती पुरुषास आनंदप्राप्ति न झाल्यामुळें क्षीणसत्त्व करून टाकते. आणि अशा स्त्रीस गर्भधारणा होणेंहि कठिण जातें. तेव्हां स्त्री-पुरुषांचा निर्मळ व निर्भेळ आनंद आणि संपूर्ण आरोग्य असल्यास मगच वाजीकरणाच्या औषधांचा फायदा चांगला दृष्टीस पडतो व हे प्रयोग पुत्रकार्याप्रीत्यर्थ स्त्री-पुरुषांनीं समजून करावयाचे आहेत असा वाजीकरणाचा खरा उद्देश असून त्याचा वैद्यकशास्त्रांत खरा उपयोगहि आहे. मनाचें हें महत्त्व मनूनेंहि स्पष्ट केलें आहे.

**यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ।**
**अप्रमोदात्पुन : पुंसः प्रजनं न प्रवर्तते ॥** मनु ३.६१

स्त्री पुरुषास आवडली नाहीं, तिनें पुरुषास उत्साह व आनंद दिला नाहीं, उलट अनुत्साह व दुःख दिलें तर प्रजोत्पत्ति होणें दुर्घट होतें. तात्पर्य, मनुस्मृतिकालापासून वाग्भटापर्यंत सर्वांनीं पुरुषाच्या क्षीणबलत्वाचा संबंध मानसिक विकृतीशीं लावला असून स्त्री व पुरुष यांचा आनंद एकमेकांवर अवलंबून असल्यानें तो त्यांनीं कसा उत्पन्न करावा यासंबंधीं सर्व आचार उत्पन्न केला. पुरुषांतील क्षीणबलत्वाचा विचार मानसिक स्वरूपाचा जास्त आहे, स्त्रीच्या वंध्यत्वांतहि मानसिक दोषांचा विचार आहे. शुक्रार्तवदोषांत बरेच कष्टसाध्य व असाध्य रोगहि आहेत. यावरून कांहीं निश्चित शास्त्रीय ज्ञान भारतीय वैद्यकांत होतें आणि आजहि त्या गोष्टी सत्य स्वरूपाच्या आहेत.

वात्स्यायनानेंहि वाजीकरण व त्यास धरून वर्धनयोग इत्यादि अनेक स्त्री-पुरुषांसंबंधीं प्रयोग दिले आहेत. परंतु यासंबंधीं आयुर्वेदास धरून व युक्तायुक्त विचार करून शिष्टसंमत प्रयोगांचेच तेवढे प्रयोग करावेत असा सल्ला दिला आहे. भारतियांनीं संपूर्ण विवाहपूर्व विचार सुप्रजेला अनुकूल असा केलेला होता. विवाहानंतरहि सुप्रजेकरितां आचार कसा असावा यासंबंधीं कांहीं विचार निश्चित केलेला होता. आणि स्त्रींतील वंध्यत्व व पुरुषाची क्षीणबल त्यांचीं कांहीं चिकित्साहि

शास्त्रशुद्ध होती. या सर्व विचार व आचारांमुळें भारतियांत प्रजाहीनत्वाचा प्रसंग हल्लींपेक्षां फार थोड्या कुटुंबांवर येत असावा असा तर्क करणें शक्य आहे.

शेवटीं गर्भधारणा हा एक नशिबाचा खेळ व ईश्वरी योगायोग ( Chance ) आहे याची त्यांस संपूर्ण जाणीव होती. शिवाय विवाहापूर्वी स्त्रीस मूल होईल किंवा नाहीं हें निश्चित सांगणें अशक्य असून फक्त कांहीं संभवच सांगतां येतात याची त्यांना माहिती होती. विवाहांतील साध्यसाधनभाव त्यांना मान्य असून त्यामुळें प्रजोत्पादनाशिवाय विवाह अयशस्वी ठरण्याची शक्यता फार मोठी आहे याची त्यांना जाणीव होती. स्त्रींतील वंध्यत्वदोष व पुरुषांतील षंढत्व दुःसाध्य असू शकतात याची त्यांना माहिती होती. तेव्हां त्यांनीं विवाहांतील प्रजाहीनत्वांत शेवटीं कांहीं मूलभूत उपाय सांगितले आहेत. पुरुषांत दोष नसेल तर अशा कुटुंबांत द्विभार्यात्वाची परवानगी आहे.

**भारतियांस संततिहीनत्वांत द्विभार्यात्व मान्य:**

एकपत्नीकत्व ( Monogamy ) हा ब्राह्मणादि वर्णांचा उच्च आचार सांगितला असल्यानें द्विभार्यात्व फक्त कांहीं परिस्थितींतच ग्राह्य धरलें आहे. त्यांत ६ ते ८ वर्षांपर्यंत थांबल्यावर उत्पन्न झालेलें ' संततिहीनत्व ' ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अशाहि परिस्थितींत प्रथमपत्नीस घटस्फोट द्यावा असें मात्र सांगितलेलें नाहीं. तिनें आपल्या विवाहकुलांतच राहावें, अशी कल्पना असून तिच्या संरक्षण–पोषणाची जबाबदारी पतीवरच सर्वस्वीं टाकली आहे.

स्मृतिकारांनीं ' **वंध्याष्टमेऽधिवेद्याब्दे।** ' (मनु ९.८१) वंध्यत्वदोषांत आठ वर्षें वाट पाहून दुसरा विवाह करण्यास हरकत नाहीं अशी सुटका दिली आहे. वात्स्यायनांनीं सपत्नीकत्वाची त्याच अधिकरणांत जी कारणमीमांसा केली आहे, तींत '**प्रजानुत्पत्तेः**' असें एक प्रमुख कारण दिलेलें आहे. ' **भार्याधिकारकम्** ' नामक अधिकरणांत खालील सूत्र येतें.

' **प्रजानुत्पत्तौ च स्वयमेव सापत्नके चोदयेत्।** ' का. सू. ४.२.२

प्रजोत्पादन न झाल्यास स्वतः स्त्रीनेंच पतीला दुसरा विवाह करण्यास प्रोत्साहन द्यावें. अर्थशास्त्रकार कौटिल्य यांनीं ' विवाहधर्म ' आणि ' स्त्रीधनकल्प '

...८

इत्यादींसंबंधीं नियम सांगतांना विवाहांतर्गत प्रजोत्पत्तीच्या अभावीं आठ वर्षे वाट पाहून द्वितीय विवाहास परवानगी द्यावी असें प्रतिपादन केलें आहे. भारतियांनीं प्रथम सर्वतोपरी काळजी घेतल्यावर '**सर्वनाशे समुत्पन्ने**' या न्यायानें हा द्वितीय विवाहाचा पर्याय प्रजाहीनत्वांत सुचविला आहे. आतां याउलट जर प्रजाहीनत्वाची परिस्थिति पुरुषाच्या क्लीबत्वामुळें असेल तर स्त्रीसहि स्मृतिकारांनीं दीर किंवा इतर सपिंडांतील पुरुषापासून प्रजोत्पत्ति करून घ्यावी, असा पर्याय सुचविला आहे. हे दोन्ही पर्याय ऐच्छिक होते आणि कार्याकार्यविचाराची मोकळीक ज्याची त्याला देण्यांत आली होती.

**प्रजाहीनत्वांत स्त्रीमनाचा विचार :**

सर्व समाजांत प्रजाहीनत्व ( Sterility ) ही स्त्रीच्या बाबतींत मोठी दुर्दैवी व दोषास्पद गोष्ट समजण्यांत येते. सर्व ऐतिहासिक कालांतहि ती तशीच होती. वंध्यात्व ही गोष्ट स्त्रीस फार कटु अनुभवाची होती व आहे आणि स्त्रीचें मन आज आहे तसेंच राहाणार असल्यानें पुढेंहि राहाणार. ज्यू व मुसलमान या दोन्ही समाजांत स्त्रीस या कारणावरून घटस्फोट देतां येतो. रानटी आफ्रिकन व अमेरिकन-इंडियन लोकांतहि वंध्यात्व ही गोष्ट स्त्रीत्यागास व छळास कारणीभूत असलेली दिसते. मातृत्वाची इच्छा ( Maternal instinct ) ही स्त्रीची स्वाभाविक प्रवृत्ति असून त्या वृत्तीचें समाधान तिला स्वतःला गर्भधारणा व संतति होण्यांत आहे. 'मातृत्व' ही प्रवृत्ति मानवांत व मानवतेवर प्राण्यांत सर्वत्र जरी दिसून येते तरी ती मानवी स्त्रींत फार बलवत्तर आणि दूरपरिणामी आहे असें दिसतें. मानवी बालक जन्मतः इतर प्राण्यांप्रमाणें परावलंबी तर असतेंच पण शिवाय त्यास स्वावलंबी होण्यास फार काळ लोटावा लागतो. या गोष्टीला धरूनच कीं काय परमेश्वरानें ही मातृत्वाची इच्छा व प्रवृत्ति मानवांत फार बलवत्तर व दूरपरिणामी केलेली दिसते. संततिहीनत्वांत ही मुख्य स्त्रीप्रवृत्ति असमाधानी राहिल्यानें निरनिराळ्या गोष्टी दृष्टोत्पत्तीस येतात. अशा परिस्थितींत स्त्रीमनांत निरनिराळ्या तऱ्हेनें प्रतिक्रिया उत्पन्न होणें शक्य असतें. मिस् हेलेन डुश या मानसशास्त्रीय लेखिकेनें अशा स्त्रियांच्या तीनचार जाती कल्पिल्या आहेत. प्रथमतः अशी स्त्री स्वतःच्या बऱ्याच निराशाजनक मनस्थितींत असते. ही तिची मानसिक निराशा वाढत्या वयाबरोबर वाढतच जाते. अशा वेळीं जो स्वतःबद्दल 'न्यूनगंड' ( inferiority complex ) फार खोल असतो, त्याच्या बरोबर विरुद्ध

वर्तन बाहेर पडूं लागतें. स्वतःच्या बुद्धीच्या वा कर्तृत्वाच्या बाहेर असलेलीं सर्व कामें अंगावर घेऊन पार पाडण्याची ही स्त्री धडपड करते. ' मला वाटेल तें करतां येईल ', ' मी काय करूं शकणार नाहीं ? ' अशी विचारसरणी एकदां मेंदूत प्रसृत झाली म्हणजे मग निरनिराळ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडींत ही स्त्री स्पर्धा करूं पाहते. दुसऱ्या प्रकारांत ' मत्सर ' हा भाग अत्यंत महत्त्वाचा असतो. ' मुलांची जरुरीच काय ? ', ' लोकसंख्या फार झपाट्यानें वाढत आहे. ', ' मुलें कशाला ? ' अशी यांची विचारसरणी होऊन मुलें झालेल्या स्त्रियांचा त्यांना फार द्वेष वाटतो. याचाच जास्त आविष्कार म्हणजे मग त्यांना दुसऱ्याचें कोणतेंच वैशिष्टय पाहवत नाहीं. मग ती दुसऱ्याची कीर्ति असो, दुसऱ्याचें यश असो, अधिकार असो वा बुद्धि असो.

तिसऱ्या प्रकारांत स्त्री स्वतःच्या मातृत्वाची वाण दुसऱ्या कोणत्याहि मुलांत वा ध्येयांत भरून काढते. तिचें पतीवर खरें प्रेम असेल तर ती सर्व परिस्थितीकडे पाहतांना ' आपणांस संतति नाहीं. ', ' या विवाहांतून साफल्य निर्माण झालें नाहीं. ' अशा प्रकारची विचारसरणी तिच्या मनांत प्रादुर्भूत होते. अशा प्रकारची विचारसरणी व आपल्या वैवाहिक निराशेंतहि दुसऱ्या ठिकाणीं मातृत्वाचें समाधान अनुभवणारी स्त्री ही जास्त प्रभावी मातृत्वप्रवृत्तीची द्योतक असते असें डुश या लेखिकेचें मत आहे.

हे प्रकार म्हणजेच अशा स्त्रियांचें संपूर्ण वर्गीकरण नसून यापलीकडेहि कांहीं प्रकार पाहणें वा कल्पिणें शक्य आहे. परंतु हे प्रकार प्रमुख आहेत. शिवाय हे प्रकार एकापासून एक संपूर्ण भिन्नत्वानें आढळतील असेंहि नाहीं. सर्व ठिकाणीं मिश्रण हें असणारच. पण त्यांत वर्गवारी करतांना स्त्रीचें वैशिष्टय लक्षांत घेणें जरूर आहे. अर्थात् संततिहीनत्वाच्या परिस्थितींत नैसर्गिक रीत्या वरील बहुविध प्रकार नजरेस येतात. पाश्चिमात्य विचारसरणींत विवाहांत प्रजोत्पादनाची जरुरी आढळून येते. सुप्रजा हा विवाहांतील हेतु असावा असें मत सुप्रजाजननशास्त्रज्ञांत तर प्रसृत आहेच. विवाहपूर्व विचार कांहीं बाबतींत प्रसृत होत आहे. विवाह करतांनाहि धर्म, वर्ग, चाली, रीती, शिक्षण, वय इत्यादींचा विचार असतोच. पण भारतियांत जो निश्चित विचार व त्यास धरून आचारपद्धति अस्तित्वांत आहे त्याप्रमाणें पाश्चिमात्यांत विशेष दिसत नाहीं. प्रजाहीनत्वाची स्थिति प्राप्त झाल्यास कुटुंबाची स्थिति व स्त्रीपुरुषांची धांवपळ सर्व

ठिकाणीं सारखीच. आधुनिक शास्त्रप्रगतीमुळें अशा परिस्थितींत कांहीं विशेष निश्चित उपाययोजना होऊं शकते असें नाहीं. तेव्हां शेवटीं यदृच्छया घडायचें तें घडतें. रसेल इत्यादि कांहीं लेखक विवाहांत कांहीं बुद्धिगम्य नीति असावी अशा मताचे आहेत. प्रजोत्पादनाशिवाय विवाहास कांहींहि अर्थ नाहीं ही गोष्ट त्यांना मान्य असून अशा परिस्थितींत घटस्फोट द्यावा असें त्यांचें मत आहे. घटस्फोटाचा कायदा अस्तित्वांत येऊन पुष्कळ वर्षें झालीं तरी त्यांत अशा प्रकारची तरतूद आजहि नाहीं. येथें घटस्फोटावर भारतियांचा दृष्टिकोन मांडणें जरुरीचें आहे. ज्या प्रसंगांत हल्लीं साधारणपणें घटस्फोट घेतला जातो, असे प्रसंग मागेंहि येत होतेच. अशा वेळीं पुरुषानें दुसरा विवाह केला तरी प्रथम पत्नीस घटस्फोट द्यावा असा सल्ला स्मृतिकारांनीं दिलेला नाहीं. उलट तिची सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी पतीवरच टाकण्यांत आलेली आहे. ती रागानें निघून जाईल, तर तिला विरोध करावा किंवा तिला माहेरीं पोहोंचवावी व माहेरच्या मंडळींनीं तिची सर्व व्यवस्था पाहावी. स्त्री पतित असली तरी प्रायश्चित्त म्हणून जो विधि सांगितला आहे त्या विधीनंतर तिला शेजारींच घर देऊन अन्नवस्त्राची व्यवस्था करावी असा निर्देश प्रायश्चित्तप्रकरणीं मनूनें केला आहे. उच्च वर्णियांत भारतियांना घटस्फोट विशेष ग्राह्य नसून प्रसंगोपात्त दारपरिग्रह मान्य आहे. स्त्रीस ज्या कालांत आर्थिक स्वातंत्र्य नव्हतें आणि स्त्री ही पुरुषाकडून रक्षणार्ह मानीत असत त्या काळीं ही विचारसरणी होती हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

प्रजाहीनत्वांत जेव्हां पुरुषास द्वितीय विवाहास संमति देण्यांत आली त्या वेळीं स्त्रीवर अन्याय व्हावा अशी कोणतीहि कल्पना नव्हती. उलट शीलसंपन्न पतिव्रता स्त्रीवर असा प्रसंग आल्यास तिची परवानगी पुरुषानें मागावी असा पुरुषावर निर्बंध होता. यांत स्त्रीवर अन्याय अभिप्रेत नव्हताच येवढें खरें. प्रजाहीन-त्वांत वंशनाश कीं दारपरिग्रह अशी समस्या मांडून मोठ्या कार्याकरितां स्त्रीचा कांहीं त्याग त्यांत अभिप्रेत होता व पुरुषानें संपूर्णतया त्याचा मोबदला कृतज्ञता-बुद्धीनें द्यावा अशी योजना होती. कामशास्त्रकारांनीं अशा परिस्थितींत ज्येष्ठ व कनिष्ठ भार्यांनीं कसें वागावें याचें विस्तृत वर्णन केलें असून त्यांत कनिष्ठेकरितां

**" दुर्भगां अनपत्यां च ज्येष्ठां अनुकंपेत नायकेन च अनुकंपयेत्। "**

का. सू. ४.२.२९.

दुर्भाग्यामुळें ज्येष्ठ पत्नीस वंध्यत्व प्राप्त झालें असेल, तर तिच्यावर अनुकंपा ठेवावी व पतीसहि तसेंच वागण्यास लावावें. यांत ज्येष्ठ पत्नीचा त्याग इत्यादि तर

नव्हेच पण तिची सुस्थिति राहावी याकरितां दोघांनींहि धडपड करावयाची आहे. हल्लीं हें घडणें कठिण आहे. परंतु, भारतांत संस्कारानें जर सर्वांत मोठें आश्चर्य निर्माण केलें असेल तर तें हेंच होय. उपरिनिर्दिष्ट आचार भारतियांत सर्व वर्णांत प्रत्यक्षांत होता व आजहि क्वचित् खालच्या वर्णांत आहे. याशिवाय दत्तकाचा आचारहि होताच. परंतु तो शेवटचा उपाय समजत असत. वरील सर्व विचार प्रत्यक्षांत आणण्याकरितां भारतियांनीं काय मूल्यें ( Values ) निर्माण केलीं हें पाहावें लागणारच आहे.

**प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नत्व :**

यानंतर सुप्रजेसंबंधीं विचार करतांना प्रजोत्पादनक्षमतेंतील निरनिराळ्या सामाजिक वर्गांतील भिन्नत्व ( Differential fertility ) लक्षांत घेणें जरूर आहे. एकाच समाजांतील निरनिराळ्या वर्गांत ( Class ) प्रजोत्पादनक्षमता वेगवेगळी असूं शकते, हें सत्य प्रथम सर फ्रॅन्सिस गाल्टन या शास्त्रज्ञानें १८८२ सालीं निदर्शनास आणलें. निरनिराळ्या प्राण्यांत निसर्गस्थितींत व पाळलेल्या परिस्थितींत प्रजोत्पादनक्षमतेंत फरक दिसून येतो, हें डार्विनलाहि माहीत होतें. मधमाशीचें उदाहरण फारच गंमतीचें आहे. कोणत्याहि मादीस राणीमादी बनविणें किंवा मजूर मधमाशीहि बनविणें हें फक्त अन्न व राहणींत फरक करून करतां येतें असें दिसून आलें आहे. मानवी समाजांतहि निरनिराळ्या आर्थिक, सामाजिक व बौद्धिक पातळीवर असलेल्या वर्गांतून निरनिराळी प्रजोत्पादनक्षमता दिसते. तशी स्थिति असावी असा तर्क करण्यास पुष्कळ पुरावा सध्यां गोळा झालेला आहे.

लोकसंख्यांचे प्रश्न व त्यांवरील सरकारी उपाययोजनांसंबंधीं जें सरकारी धोरण ठरत असावें त्यांत या गोष्टीची फारशी दखल घेतली जाते किंवा नाहीं याची शंका आहे. याची दखल न घेतल्यास या सर्व धोरणानें राष्ट्रांतील कर्तृत्ववान प्रजेचा ऱ्हास ओढवण्याची शक्यता भरपूर असल्यानें अशा प्रकारचा अभ्यास होऊन जरूर ती धोरणविषयक सुधारणा त्वरित अंमलांत येणें जरुरीचें आहे. प्रो. पिअरसन यांनीं बुद्धिमान् व शारीरिक विकृतींच्या कुटुंबांचा अभ्यास करून असें सूचित केलें आहे कीं, कर्तृत्ववान् कुटुंबांची प्रजोत्पादनशक्ति क्षीण होत आहे. ‘ बुद्धि ’ या एका गुणास धरून सध्यां बराच अभ्यास इंग्लंड व इतर देशांत होत आहे आणि या

सर्वांचा निष्कर्ष बुद्धिमान् लोकांत प्रजोत्पादनक्षमत्व कमी होत आहे असाच आहे. प्रजोत्पादनक्षमतेंतील या भिन्नत्वास (Differential fertility) धरून हल्लीं परदेशांत पुष्कळच अभ्यास होत आहे. आर्थिक दृष्टीनें विचार करतां असें दिसून येतें कीं जीं कुटुंबें आर्थिक महत्त्वाकांक्षेच्या मागें लागून वरच्या सामाजिक पातळींत जाऊं पाहतात त्यांचीं कुटुंबें लहान होत गेलीं व खालच्या आर्थिक पातळीवर असलेल्या महत्त्वाकांक्षारहित कुटुंबांतील संख्या वाढत गेली. संततिनियमनाच्या साधनांमुळें असें घडत असेल अशी शंका नको. कारण, ही प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नता या साधनांचा सर्वत्र फैलाव होण्यापूर्वींपासून अस्तित्वांत आहे असें या अभ्यासकांचें म्हणणें आहे. वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं बौद्धिक व आर्थिक महत्त्वाकांक्षा या मोठ्या कुटुंबास विघातक ठरण्याची शक्यता उत्पन्न करतात. अशा दोन्ही प्रकारच्या वर्गांत प्रजोत्पादनक्षमता हीन दर्जाची होत जाऊन हे वर्ग निसर्गात उतरणीवर लागून शेवटीं नाहींसे होण्याची भीति यांना फार असते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

वाढत्या लोकसंख्येबाबत राष्ट्रीय धोरण ठरवितांना ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे हें मागें दिग्दर्शित केलेंच आहे. परंतु संततिनियमनाच्या साधनांनीं लोकसंख्या कमीजास्त करणें ही फार सोपी गोष्ट आहे असा भलताच भ्रम निर्माण केला गेल्यास लोकसंख्येचे प्रश्न सुटण्याऐवजीं नवीन प्रश्न निर्माण होण्याची शक्यता जास्त आहे. याचा अर्थ संततिनियमनाचीं साधनें कोणींहि वापरूं नयेत असा नव्हे. परंतु, याचा सर्वसामान्य दुकानापासून सरकारी केंद्रापर्यंत चाललेला अस्ताव्यस्त प्रचार व आचार यांमागें जो भ्रम आहे तो तसाच राहिल्यास आणि सरकारी धोरणांत तरतमभाव वापरण्याची तरतूद न केल्यास धोका आहे येवढेंच.

विवाहित जोडप्यानें तर पहिलें मूल होईपर्यंत या साधनांचा विचारहि करतां कामा नये.

जातिसंस्था ही भारतियांची विशेष समाजरचना आहे. या प्रकारच्या समाजरचनेंत बौद्धिक कार्य एका वर्गामागें लावून दिलेलें आहे. ब्राह्मण वर्गाचें कार्य मुख्यतः शास्त्रपठण वा अध्ययन हेंच सांगितलें आहे. हें कार्य त्यांनीं मोठ्या स्वार्थत्यागानें पार पाडावयाचें आहे. स्वाध्यायविरोध ज्यांत होईल असे सर्व उद्योग त्यानें वर्ज्य करावयाचे आहेत. विद्येस प्रतिबंध होईल असा धंदा त्यानें करूं नये.

अतिभोगाचा त्यानें त्याग करावा आणि अनायासें जेवढें द्रव्य मिळेल त्यांतच समाधान मानून ' शास्त्रविद्या ' हेंच ध्येय जीवनांत ठेवावें असा कडक आचार-निर्बंध त्या वर्गावर घातला होता. श्ववृत्ति ( नोकरी ) पत्करून उपजीविका करण्याचें ब्राह्मणानें टाळावें. दारिद्र्य पत्करावें पण शास्त्रसाधना हें ध्येय सोडूं नये. हा आचार सर्व समाजाला लावणें कधींच शक्य नाहीं. तेव्हां हा उच्च आचार ब्राह्मण वर्णाला लावला. अतिबुद्धि व आर्थिक स्पर्धेत वर जाण्याची धडपड या दोन्ही गोष्टी प्रजोत्पादनक्षमतेच्या दृष्टीनें विघातक ठरतात. तेव्हां ज्यांना बुद्धीचीं कामें करावयाचीं त्यांनीं आर्थिक स्पर्धेत भाग घ्यावयाचा नाहीं. सत्ता व श्रीमंती या दोहोंपासून त्यांनीं अलिप्त राहावयाचें, असें ठरविल्यामुळें ब्राह्मण वर्गाची प्रजोत्पादन-क्षमता कांहीं टिकवतां आली. अर्थात् क्षत्रिय, वैश्य या वर्णावर अशा ब्राह्मणाच्या पोषणाची जबाबदारी टाकली. किंबहुना बुद्धिजीवी वर्गाची परंपरा सातत्यानें राहावी, त्यांचा कुलनाश होऊं नये याकरितां भारतियांनीं योजलेली ही एक युक्ति दिसते. ही युक्ति पाहिली म्हणजे त्यांना प्रजोत्पादनक्षमता ही अतिबुद्धि व आर्थिक स्पर्धा यांनीं कमी होत जाते याचें ज्ञान नसावें असें म्हणवत नाहीं. शिवाय ' सुप्रजेच्या दृष्टीनें ' बुद्धिमान् प्रजेचें सातत्य टिकवणें समाज व राष्ट्र या दोघांनाहि फार जरुरीचें असतें हें सत्यहि त्यांच्या पूर्ण परिचयाचें असलें पाहिजे. ब्राह्मण वर्गानें आज तीन हजार वर्षें सातत्यानें या देशांतील ज्ञान मुखोद्गत करून इतक्या संकटांना तोंड देऊन टिकवून धरलें ही कामगिरी कांहीं थोडी नाहीं.

---

# प्रकरण ९ वे

## रतिशास्त्र

वैवाहिक सुखाचें दुसरें साधन : उत्तम रति — रतिसुखाचें प्रथम कारण : आरोग्य — प्रजोत्पादक इंद्रियशक्तीचा सहजव्यापार — शृङ्गारात्मक भावनात्मकता रतिसुखास पोषक — प्रौढावस्थेंतील नैसर्गिक समस्या — त्यांकडे पाहण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन — इंद्रियविज्ञानांतील मूलभूत प्रक्रिया व तिचें कार्य — भारतीय दृष्टिकोन 'ब्रह्मचर्य' — डॉ. किन्से यांचा अभ्यास — मनावरील दडपण — कामवासनेसंबंधीं योग्य दडपणांचे उपयोग — दडपणांचे दुष्परिणाम — पाश्चिमात्य आचार घातुक — पुनश्च डॉ. किन्से — कामवासनेवरील मानसिक दडपणांचीं कारणें व उपाय — भावनोद्रेकाचे शारीरिक परिणाम — संस्कृत वाङ्मयांत शृङ्गार प्रमुख — प्रतिक्रियेसंबंधीं विचार — रतारंभावसानिक — आनंदमय समाप्तिमध्येंहि स्त्री पुरुष-भिन्नता — कामवासनेचें मूलतः वैविध्य.

अनुक्रम २४५५० वि: निं ५ ५
क्रमांक ...११६६..... नों: दि: २१।२।५९

**वैवाहिक सुखाचें दुसरें साधन : उत्तम रति :**

आतांपर्यंत सुखी विवाहाच्या एका साधनाची चर्चा केली. दुसरें पहिल्याइतकेंच महत्त्वाचें साधन म्हणजे ' अनुपस्कृता रतिः '. पूर्वी विवाहप्रकरणांतील वात्स्यायन ऋषींचें दिलेलें सूत्र वाचकांस स्मरत असेल. त्यांत **'पुत्राः पक्षवृद्धिः अनुपस्कृता रतिश्च।'** हे तीन शब्द अनुक्रमें सुप्रजा, सासरीं आल्यावर व्यक्तिमत्त्वाची जुळणी आणि उत्तम रति या सुखी विवाहाच्या प्रमुख तीन साधनांस धरून आहेत असें दाखविलें होतें. ' अनुपस्कृता ' या शब्दावर टीका करतांना टीकाकार लिहितात, " **अकृत्रिमा, विश्वासातिशय-योगात्** " याचा अर्थ असा कीं, ' अतिशय प्रेमाच्या परिपोषानें उत्पन्न झालेल्या विश्वासानें, मनांत कांहीं किन्तु, शंका, भीति इत्यादि नसतांना सहज अकृत्रिम तऱ्हेनें उत्पन्न झालेली जी ' रति ' तीच खऱ्या वैवाहिक आनंदास कारणीभूत होणारी असते. रतिसुख हें सुखी विवाहाचें एक प्रमुख साधन आहे ही गोष्ट आत पाश्चिमात्य पंडितांच्याहि संपूर्ण परिचयाची झालेली आहे. डॉ. किन्से लिहितातः—

" Sexual factors are among those that may constitute to the happiness or unhappiness, the maintenance or the dissolution of homes and marriages. Where mutually satisfactory sexual relationships are regularly available, the spouses in a marriage may find the humdrum routine of home less irritating, and may accept them in their stride. "

( Kinsey. p. 13 ).

वैवाहिक सुखदुःखांशीं रतिसुखाचा फार मोठा व घनिष्ठ संबंध असून त्यावर कित्येक वेळां विवाहाचें स्थैर्य अवलंबून असतें असें डॉ. किन्से यांचें मत पडतें. स्त्री-पुरुषांस ज्या वेळीं ही अनुपस्कृता रति प्राप्त होते त्या वेळीं संसारांतील नित्यनैमित्तिक कर्में, दुःखें व कंटाळवाणीं कामें, स्त्रीपुरुष मोठ्या आनंदानें पत्करतांना दिसतात. किंबहुना, परमेश्वरानें संसारांतील या अनंत दुःखांशीं झगडण्याची आणि तींच तींच कंटाळवाणीं कामें करण्याची स्त्रीपुरुषांस प्रवृत्ति राहावी याकरितां हें मधाचें बोट लावलेलें दिसतें. येवढ्यावर बिचारा खुश राहतो. वाटेल ती हमाली करतो, बाहेरील मानापमानांना आणि कष्टांना तोंड देतांना सहनशक्ति दाखवितो. स्वभावानें मोठा वरचढ असला तरी स्त्रीचा दास होतो आणि कालांतरानें सुख-

दुःखांच्या फेऱ्यांत विराम पावतो. केवढी ही रतिसुखाची अजस्र शक्ति ! ही शक्ति अणुशक्तीचीच बहीण मानावयास हरकत नाहीं. तिला जितकें चांगलें वापरावें, जितका तिचा उपयोग शांति व समाधान उत्पन्न करण्यास करावा तितका मनाचा संतोष वृद्धिंगत होईल आणि सुप्रजाजननानें समाजांत कौटुंबिक व सामाजिक सुखवृद्धि होईल. कामशक्तीची तुलना आम्ही अणुशक्तीशीं करतों ही गोष्ट फारशी गैरवाजवी मानण्याचें कारण नाहीं. प्राणिमात्राच्या कामवासनेची शक्ति केवढी बलवत्तर असते हें ज्यांस माहीत असेल, मनुष्याच्या जीवनाचा केवढा भाग या एका वासनेनें व्याप्त झालेला आहे हें ज्यास अवलोकन करतां येईल, कामवासनेपासून उत्पन्न होणारे प्रेमद्वेषमत्सरादि विकार माणसास कोणत्या टोकास नेऊं शकतात याचा जे थोडाहि विचार करतील, इतिहासांत या भावनांमुळें झालेलीं द्वंद्वें, युद्धें व क्रांत्या ज्यांच्या कांहीं परिचयाच्या असतील, त्यांना आमची तुलना फारशी गैरवाजवी आहे असें वाटणार नाहीं. ज्याप्रमाणें स्फोट करून प्राणिमात्राच्या नाशास अणुशक्ति कारणीभूत झालेली दिसते, तद्‌वतच कामशक्तीहि स्फोटक बनविल्यास त्यानें प्राणिमात्रांचें आणि त्यांच्या सुखाचें हवन झालेलें दिसेल. उलट हीच शक्ति शांति-समृद्धीच्या कार्यास खर्च केल्यास ती मनुष्याच्या मूलभूत संतोषांत भर टाकणारी ठरून समाजास हितकारक ठरेल.

उत्तम आरोग्य हें रतिसुखाचें मुख्य कारण आहे.

**रतिसुखाचें प्रथम कारण : आरोग्य :** कोणत्याहि पुरुषार्थाला याची प्रथम जरुरी आहे हें ओळखणें महत्त्वाचें आहे. उलट ‘ अनारोग्य ’ हें सर्वघातक आहे. यानें स्वतःचे पुरुषार्थ तर लुप्त होतातच पण आपल्या आजूबाजूच्या मंडळींचे पुरुषार्थहि यानें नाहींसे होतात. अनारोग्याच्या स्थितींत साधारणतः कामवासना जागृत होणेंच कठिण. उलट कामवासनेची कांहीं वयापर्यंत जागृतावस्था हें एक संपूर्ण आरोग्याचें गमक मानण्यासहि हरकत नाहीं. आतां प्रथमतः ही कामवासना जरी कर्मेंद्रियांवर अधिष्ठित आहे तरी नुसत्या कर्मेंद्रियांचा विचार यांत अपुरा पडतो. हीं कर्मेंद्रियें मनसाधिष्ठित आहेत. अर्थात् येथें फक्त ‘ अनुपस्कृता रती ’च्या दृष्टीनेंच या सर्व प्रक्रियेचा विचार होईल.

**प्रजोत्पादक इंद्रियशक्तीचा सहजव्यापार :** रतिकर्मामध्यें ज्या इंद्रियांचा विशेष संबंध असतो त्या स्त्री-पुरुषेंद्रियांचा शारीर व इंद्रियविज्ञान या दृष्टीनें विचार त्या त्या शास्त्रांच्या सामान्य ग्रंथांतूनहि आलेला असतो. पण या कर्मेंद्रियांच्या व्यापारांत जी सहज आणि नैसर्गिक योजना परमेश्वरानें निर्माण केली आहे; तिच्यासंबंधीं येथें विचार करणें जरूर आहे.

साधारणपणें व्यक्ति वयांत येऊं लागल्यापासून कामवासनेचा हा सहजव्यापार सुरू होतो. वयांत येणें ही क्रिया आयुष्यांत एका बिंदूनें दर्शवितां येण्यासारखी नाहीं. ही क्रिया कांहीं वर्षें चालू असते व ती पूर्ण झाली म्हणजे व्यक्ति वयांत आली असें आपण मानतों. स्त्रीचें रजोदर्शन हें जरी वयांत आल्याचें एकमेव लक्षण सामान्यत: समजलें जातें, तरी या वयांत येण्याच्या क्रियेंतील तो एक मोठा टप्पा असून ही क्रिया स्त्रीमध्यें तत्पूर्वीच चालू झालेली असते असें दिसून येईल. मनाची ठेवण व तिच्यांतील सूक्ष्म बदल ह्या गोष्टींनीं ही क्रिया सुरू झालेली दिसते असें म्हणण्यास हरकत नाहीं. मानसिक दृष्ट्या वयांत येण्याची क्रिया सुरू झाली हें कसें ओळखावें, यासंबंधीं विचार करून कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें स्त्रीतील 'लाजण्याची ( Bashfulness ) सहजक्रिया' हें लक्षण मानसिक बदल चालू झाला हें समजण्यास पुरेंसें समजावें. पुरुषांतील बदल सुरू झाला हें समजण्यास जीं लक्षणें आहेत, त्यांत ओठ, कांख व उपस्थेंद्रियांवरील लव आणि आवाजांतील फरक हीं विशेष लक्षणें असून या वयांत व्यक्तीची उंची जास्त प्रमाणांत वाढत जाते. ही पूर्ण झाल्यावर कांहीं वर्षांनीं पुरुष प्रजोत्पादनक्षमतेच्या स्थितीपर्यंत येतो. यांतील बरींच लक्षणें स्त्री-पुरुषांत समानच आहेत. तात्पर्य, वयांत येण्याची क्रिया नुसती शारीरिक नसून मानसिक असते आणि या क्रियेची सुरुवात व पूर्णावस्था यांमध्यें कांहीं वर्षांचें अंतर असतें किंवा आयुष्यांतील बाल्यावस्थेनंतर प्रौढावस्था येण्याची क्रिया स्त्री-पुरुषांत कांहीं वर्षें चालू असते, येवढें ध्यानांत ठेवावें. हे सर्व शारीरिक बदल होतांना शरिरांतील अंत:स्रावांचे कांहीं पिंड ( Endocrine Glands ) मुख्यत: 'पिट्यूटरी', 'प्रजोत्पादनाच्या ग्रंथी' आणि 'सुप्रारिनल' यांतहि फार महत्त्वाचे बदल चालू होतात.

**शृङ्गारात्मक भावनात्मकता रतिसुखास पोषक :** शृंगाररसात्मक भावनात्मकता यास इंग्रजींत ' इरॉटिक्स् ' (Erotics); ' फेमिनिन ॲफेक्टिव्हिटी ' (Feminine affectivity) वगैरे शब्द साधारणतः उपयोगांत आणतात. या व अशा प्रकारच्या भिन्न नांवांनीं दाखविली जाते ती भावना मात्र एकच आहे. स्त्रीपिंडांत ही गोष्ट मूलभूत परमेश्वरनिर्मित असून हिचा परिपोष सहज प्रौढत्वाबरोबर होत असतो. अंतर्गत भावनेचे दृश्य परिणाम स्त्रीच्या शरीरमनांवर सहज दृष्टीस पडणारे आहेत. स्त्रीची सहजसिद्ध लज्जा (Bashfulness) हा त्यांतीलच एक महत्त्वाचा परिणाम आहे. तारुण्यांत आलेली सलज्ज स्त्री कोणत्याहि पुरुषास मोहक वाटते. ही लज्जा सुरवातीस सहज उत्पन्न होणारी निसर्गसिद्ध बाब असून ती स्त्रीच्या इच्छेपलीकडे असते. ही गोष्ट वाढत्या वयाबरोबर कमी होत जाते. पण याशिवाय या निसर्गसिद्ध मोहकपणावर विरजण घालण्यास इतरहि महत्त्वाचीं कारणें असूं शकतात. त्या कारणांत पुरुषी व्यायाम, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यानें व्यक्तिमत्त्वाचें उत्पन्न झालेलें पुरुषीकरण, इत्यादि गोष्टी सांगतां येतील. भारतीय पद्धतींत स्त्री व पुरुष यांचे व्यायामहि भिन्न प्रकारचे असून पाश्चिमात्यांच्या पद्धतीत मात्र स्त्री-पुरुषांचे व्यायाम कांहीं कांहीं बाबतींत साधारणतः एकच व एकाच प्रकारचे होत असल्याचें दिसतें. लाजाळूपणा ही गोष्ट शरीरमनांच्या स्नायू व मज्जासंस्थेच्या व्यापाराचा परिणाम आहे. या दोनहि संस्थांवर पुरुषी व्यायामानें दृढीकरणात्मक (Rigidity) परिणाम होण्याची शक्यता असल्यानें स्त्रीस पुरुषी व्यायाम स्त्री-सौंदर्याच्या दृष्टीनें घातक ठरण्याचा संभव येथें आम्हीं वाचकांच्या निदर्शनास आणतों. हा परिणाम सर्वत्र सारखा पाहावयास मिळणार नाहीं. व्यक्तीव्यक्तींतील मानसिक व शारीरिक भिन्नत्वानें, भावनात्मकताहि भिन्नत्वानें दृष्टीस पडत असल्यामुळें, व्यायामाचा परिणाम सर्वांवर सारखा होणार नसला तरी ज्यास मूलतः भावनात्मकता कमी त्यावर दृढीकरणाचा हा संस्कार जास्त जोरदार होण्याचा संभव जास्त. भावनात्मकतेंत स्त्रीसुलभ लज्जा व तीस धरूनच स्त्रीच्या बोलण्यांत, चालण्यांत व वागणुकींत दृष्टीस पडणारे इतर आविष्कार येतात. त्यांतच विनय (Modesty) हा एक महत्त्वाचा गुण आहे. बोलण्यांत व वागणुकींत सर्वत्र दृष्टीस पडणारा हा गुण असतो. याचें उत्तम उदाहरण बालगंधर्वांच्या प्रसिद्ध नाटकांतून पाहावयास सांपडतें. ही लज्जा व तीबरोबरच बोलण्याची व वर्तणुकींतील नम्रता पुरुषास किती

मोहक होते याचें प्रत्यक्ष चित्र या नाटकांतून प्रेक्षकांस पाहावयास सांपडतें. यामध्यें सहज उत्पन्न होणारा आणखी एक वर्तणुकीचा प्रकार आहे तो म्हणजे अशा स्त्रीचा विनम्र भाव ( Submission ). हा विनम्र भाव स्त्रीच्या वागणुकींत असल्यास पुरुषास मोह पाडण्यास उपयोगाचा ठरतो. नाट्यामध्यें शृङ्गाररसाचा परिपोष करण्याकरितां स्त्रीच्या या सर्व शृङ्गारगुणांचा तिच्या वर्तणुकींत एकत्र मिलाफ मुद्दाम केलेला असतो. अशा प्रकारचें नाट्य आजहि प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतें. आभासमय क्रोध हा एक याच वागणुकींतील भाग आहे. हा क्रोध मूलतःच लटका आणि केवळ प्रसंगानें येणारा व परिहार पावणारा असतो. या सर्व वर्तणुकींत स्त्रीचें खरें कौशल्य असतें. स्त्रियांना पुरुषास प्रसन्न करण्याची किंवा ताब्यांत ठेवण्याची जी कांहीं कला ( Feminine art ) असते असें आपण ऐकतों, त्या कलेचा पाया ही शृङ्गारात्मक भावनात्मकता ( Erotic affectivity ) हीच असून स्त्रीची खरी शक्ति हिच्यांतच प्रतीत होत असते. या शक्तीला जर त्या मुकल्या, तर त्यांना पुरुषप्रकृतीवर ताबा मिळविण्याचें एक महत्त्वाचें साधन त्या गमावतात. या गुणाचा योग्य उपयोग करण्यांतच स्त्रीचें खरें चातुर्य आहे. डॉ. हॅव्हलॉक एलिस यासंबंधीं लिहितांना म्हणतात,

" A large portion of the tact of woman has the same basis. Affectability of women ensures to them certain solid advantages. " ( Ellis. p. 425. )

स्त्रीत्वाचें हें एक मोठें गमक आहे. याबाबत स्त्रीपुरुषसमानता केल्यास फार विद्रूप होईल. अशी बरोबरी करण्यांत कोणतेंहि स्वारस्य नाहीं, हें स्त्रीनें ओळखलें पाहिजे. हें स्त्रीचें शस्त्र सध्यांच्या शिक्षणानें व स्त्री-पुरुषांच्या समान हक्कानें बोथट होत आहे. यांतच पुरुषी व्यायामाची भर पडल्यास स्त्रीची स्नायुमज्जासंस्था(Neuro-muscular mechanism ) कठिण होत जाते. गर्भधारणेस पूरक अशा वरील प्रकारच्या साधनांनीं परमेश्वरानें स्त्रीशरीर व मन सुसज्ज करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्यांच्या शिक्षणानें स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वावर जे परिणाम होत आहेत त्यांत ही सर्व भावना व तीबरोबर येणारें चातुर्य लुप्त होण्याच्या मार्गास लागून शेवटीं स्त्रीचें यामुळें नुकसान होण्याच्या संभव आहे.

शृङ्गाररसात्मक भावनात्मकता ही गोष्ट रतिसुखाशीं निगडित आहे. रतिसुख

ही स्त्रीपुरुषांनीं उत्पन्न करण्याची बाब असल्यानें, या सुखोत्पत्तीस स्त्रीनें व पुरुषानें भिन्नभिन्न भूमिका स्वीकारून, तींतून एकत्व निर्माण करावयाचें आहे. त्यामुळें यांत दोन व्यक्तींची पूरकभावानें असमानता असण्याची जरुरी आहे. 'रति' ही बाब भूतकालांत जशी होती तशीच असल्यानें, पूर्व व पश्चिम देशांतहि स्त्री व पुरुष यांचा हा एकमेव आनंद समान असल्यानें, याबाबत हल्लींच्या स्त्रीनें शिक्षणानें वा मूर्ख कल्पनांनीं हुरळून न जातां हें स्त्रीत्वाचें एक वैशिष्टय ओळखून ही शक्ति नीट जतन करणें योग्य; नाहींतर विवाहांतर्गत सुखाचा लाभ दोघांसहि कमी झाल्यानें अयशस्वी विवाहांचें प्रमाण वाढण्यास मदत होईल. याचा अर्थ असा नव्हे कीं, शिक्षणच त्याज्य आहे. परंतु, सध्यांच्या पद्धतीचे दुष्परिणाम ओळखून आपलें स्वत्व कसें रक्षण करावें याकडे स्त्रीनें दुर्लक्ष न करणें बरें. डॉ. किन्से म्हणतात:—

"The failure of the female to reach orgasm in her marital coitus may be a considerable source of marital discord."

(Kinse. p. 266)

स्त्रीची भावनात्मकता ही रतिसुखाकडे जाण्याची पूर्वतयारी असून ही एक स्त्रीची परमेश्वरनिर्मित मोठी शक्ति आहे. या शक्तीचा उपयोग विवाहांतर्गत सुख-प्राप्तीकडे करून घेणें तिच्याच हातीं असून तीस पूरक आचार नेहमीं सुखास कारणीभूत होईल. फक्त या शक्तीचा उपयोग स्त्रीनें तरतमभाव ओळखून करण्यास शिकावयाचें असतें. नाहींतर यांतूनच सामाजिक नीतीची पातळी खालीं येण्याचा संभव असतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हा तरतमभाव विसरल्यामुळें समाजांतील नीतिमत्तेचें नुकसान होतें. या भावनेस सर्व ठिकाणीं 'अश्लील' म्हणून नाहींसें करावें असें म्हणणारा एक वर्ग आहे. त्यांना या रसांतील सर्वच 'अश्लील' आणि त्याज्य वाटतें. त्यांनीं डॉ. हॅव्हलॉक एलिस यांचें खालील वाक्य ध्यानीं आणावें.

"These worthy persons, who are anxious to cut off the devil's tail, might find, if they succeeded, that they had also shorn the angel of her wings."

(Ellis. p. 425)

नीतिमत्तेच्या नांवाखलीं शृङ्गाररसच नाहींसा केल्यास जीवनांतील महत्त्वाचा आनंद नाहींसा केल्याचें आढळून येईल. तात्पर्य, या रसाच्या आस्वादांत तरतमभाव व प्रसंग पाहणें जरुरीचें आहे.

**प्रौढावस्थेंतील नैसर्गिक समस्या :** आतां प्रौढावस्था आली म्हणजे सहजच व्यक्ति कामचेष्टा करूं लागते. म्हणूनच त्यांस सहजक्रिया ( Instinct ) असें समजतात आणि ही सहजक्रिया प्रौढावस्थेंतील सहजसिद्ध गोष्ट असूनहि त्याच कालांत विवाह होतो असें नसल्यामुळें हा मधला काळ स्त्रीपुरुषांच्या आयुष्यांत मोठ्या नानाविध चेष्टांनीं भरलेला दिसतो. डॉ. किन्से म्हणतात:—

" The problems are products of the fact that the human female and male become biologically adults some years before our social customs and statute law recognise them as such. "

( Kinsey. p. 13 )

या एका गोष्टींतून प्रौढावस्थेंतील सर्व प्रश्न व कामवासनेच्या समस्या उगम पावतात. एका बाजूस शारीरिक व मानसिक बदल या चेष्टांना प्रोत्साहन देणारा ठरतो, तर त्याचें समाधान करण्याचें सर्व समाजानें योग्य ठरविलेलें आणि कायदेशीर शिक्कामोर्तब केलेलें एकमेव साधन जो विवाह तो त्या कालांत व्यक्तीच्या आटोक्याबाहेर असतो. प्रौढात्वाचे प्रश्न ( Problems of adolescence ) अनंत असतात. स्त्रीमध्यें नैसर्गिक रीत्या नटण्यामुरडण्याची हौस, लज्जा, त्यामुळें उत्पन्न होणारें सहजसिद्ध आकर्षण, पुरुषांत स्त्रीसमागमाची जिज्ञासा, या जिज्ञासेमुळें उत्पन्न होणाऱ्या अनंत शारीरिक चेष्टा या सर्वांचा समावेश या क्षेत्रांत होतो. कॉलेज-विद्यार्थ्यांत या चेष्टांचें प्रमाण भरपूर आढळतें. कोणी स्त्रीसंबंधीं कोट्या करतील, कोणी त्यांच्या सहवासांत स्वर्गसुखाचा अनुभव घेतील, कोणी प्रेमाचीं सुखस्वप्नें रंगवितील, कोणी स्त्रीदाक्षिण्याची मोठी आवड दाखवितील, कोणी शृंगाररसमय नाट्य, नृत्य, कला इत्यादींमध्यें रममाण होतील, कोणी प्रेमविषयक संवादांत रंगून जातील तर कोणी स्त्रियांची जास्त उद्धटपणानें थट्टामस्करी करतील. त्यांच्या स्पर्शाकरितां धडपडतील, त्यांच्याशीं मुद्दाम संवादाचा प्रसंग आणतील, पत्रें लिहितील, चिठ्या पाठवितील. अश्लील गोष्टींत भागहि घेतील, एकांतांत चित्रदर्शनानें व वाङ्मयसुखानें आनंद पावतील, स्त्रीवर केव्हां केव्हां हातहि टाकतील इत्यादि अनंत प्रकार या समस्येचेच निदर्शक होत. प्रौढावस्थेच्या या अनंत चेष्टा, त्यांचे प्रकार व निवारण; इत्यादि विषय येथें घेणें नाहीं. फक्त ही प्रौढावस्थेची समस्या अत्यंत नैसर्गिक असते आणि म्हणून इकडे पाहण्याचा दृष्टिकोन शास्त्रीय हवा.

**त्यांकडे पाहण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन :** आतां शास्त्रीय दृष्टिकोन म्हणजे काय याचा थोडा विचार करूं. सध्यां या वस्तुस्थितीकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन अस्तित्वांत दिसतात. एकांत सर्व वडीलमंडळी आणि समाज यांकडे पाहतांना अत्यंत असहिष्णु असतात. यास 'असहिष्णु दृष्टिकोन' असें म्हणतां येईल. ही मंडळी यांतील कांहींहि सहन करण्यास असमर्थ असतात. उलट अशा कोणत्याहि गोष्टीस फार जबर शिक्षा देण्यास हवी, दिसेल तेथें या गोष्टी ठेंचून टाकल्या पाहिजेत, त्यांची कींव बिलकुल करतां कामा नये, म्हणजे हें सर्व दुरुस्त होईल. मुलें सन्मार्गानें चालतील आणि अशा गोष्टी होणार नाहींत अशी यांत समजूत असते. दुसरा दृष्टिकोन संपूर्ण सहिष्णु आहे. ही मंडळी असल्या गोष्टी नैसर्गिक अतएव होणारच असें धरून चालून यांत कांहीं लक्ष घालूं नये, जें होईल तें होईल, त्यास इलाज नाहीं असें म्हणणारी आहे. या दोनहि प्रकारच्या मंडळीस शास्त्रीय म्हणतां येणार नाहीं. शास्त्रीय दृष्टिकोनांत ही समस्या संपूर्ण समजावून घेऊन शिवाय त्यांतून व्यक्ति व समष्टीस पोषक असा मार्ग सुचवितां आला पाहिजे. ज्या दृष्टिकोनांत या समस्येचें संपूर्ण ज्ञान लक्षांत घेतलेलें नाहीं आणि ती सोडविण्यास कांहीं व्यवहार्य व समाजहितरक्षणास धरून योजना नाहीं तो दृष्टिकोन जरी एखाद्या शास्त्रज्ञानें सांगितला तरी तो शास्त्रीय म्हणणें अवास्तव ठरेल. डॉ. किन्से यांच्या मतें ही समस्या आमच्या समाजानें जास्त भीषण करून ठेवली आहे. लैंगिक व्यवहार हे फक्त विवाहांतर्गतच असावेत असा अट्टहास समाजानें उगाच धरल्यामुळें आणि कायदेशीर वयांत आल्याशिवाय हे व्यापार करूं देणें समाजानें बेकायदेशीर ठरविल्यामुळें, ही समस्या उगीच जास्त भयप्रद झाली आहे; असें डॉ. किन्से यांचें म्हणणें.

"The problems are the products of the fact that our culture has increasingly insisted that sexual functions should be confined to persons who are legally recognised as adults and particularly to married adults." ( Kinsey. p. 13. )

आतां यांत काय शास्त्रीय म्हणावयाचें हें वाचकांनींच ठरवावें. ही समस्या सध्यांच्या असहिष्णु वृत्तीमुळें जास्त भयप्रद होत असल्यानें हें सर्व सहन करावें. यासंबंधीं कायद्यानें व समाजानें जास्त सहिष्णुता दाखविली पाहिजे, त्यांस पाहिजे तशा व विवाहपूर्व वयांत या गोष्टी करण्यास सर्व तऱ्हेची कायदेशीर परवानगी

असली कीं ही समस्या संपली. किती थोडक्यांत आणि सुटसुटीत उत्तर ! यासंबंधीं जास्त ऊहापोह याच प्रकरणांत पुढें येणार आहे. येथें येवढेंच नमूद करावयाचें कीं, नुसता सहिष्णु दृष्टिकोन हा पाश्चिमात्य स्वरूपाचा असून त्यासच शास्त्रीय असें शिक्कामोर्तब करण्यांत येत असतें.

**इंद्रियविज्ञानांतील मूलभूत प्रक्रिया :** प्रजोत्पादक इंद्रियशक्तीचा सहजव्यापार (Sexual-impulse) समजण्यापूर्वी शारीरिक व्यापारांत कर्मेंद्रियांची जी मूलभूत प्रक्रिया ( Reflex action ) घडते तीसंबंधीं थोडी माहिती करून घेणें आवश्यक आहे. या प्रक्रियेंत मुख्यतः दोन भाग येतात. एकास उद्दीपन ( Stimulation ) म्हणतां येईल व दुसऱ्यास प्रतिक्रिया (Response) असें नांव देतां येईल. कामवासनेसंबंधींहि हे दोन भाग स्त्री-पुरुषांत दृष्टीस पडतीलच. पण त्यांची पद्धति व परिणाम मात्र भिन्नलिंगी प्राण्यांत भिन्नत्वानें दृष्टीस पडतात. सबंध इंद्रियविज्ञानांत ही प्रक्रिया मूलभूत आहे. मग ती एखाद्या स्नायूची हालचाल असो किंवा एखाद्या ग्रंथाची क्रिया असो, या मूलभूत प्रक्रियेवर परिस्थितिजन्य संस्कार घडत जातात किंवा तसे घडवितांहि येतात आणि या संस्कारान्वित प्रतिक्रियेवरच ( Conditioned reflex ) मनुष्य प्राण्याची एकंदर वर्तणूक बांधलेली असते. शिक्षण आणि संस्कार यांचें मानवी वर्तणुकींतील महत्त्व याच प्रक्रियेवर अवलंबून आहे.

एके काळीं अशी समजूत होती कीं, कामशक्तीचा ( Sexual impulse ) सहजव्यापार ही एक संपूर्ण इंद्रियांची मूलभूत प्रक्रियाच (Reflex action) आहे. परंतु हल्लीं यासंबंधीं जास्त शास्त्रीय गोष्टी प्रकाशांत येऊं लागल्यानें असें प्रत्ययास आलें कीं, यांत आणखी बरीच गुंतागुंतीची स्थिति आहे. प्रथमतः कामशक्तीवर मनुष्यास बुद्धीचा ( Conscious ) अंकुश कांहीं प्रमाणांत चालवितां येतो आणि म्हणून ही नुसती मूलभूत प्रक्रिया ( Reflex mechanism ) राहूं शकत नाहीं.

कामवासनेच्या संपूर्ण इंद्रियविज्ञानावर आजहि पूर्ण प्रकाश पडलेला नाहीं. पुष्कळ ठिकाणीं प्रयोगावस्था सांपडेल आणि पुष्कळ ठिकाणीं बसविलेल्या कल्पना ( Theories ) सांपडतील.

मोल ( Moll ) या शास्त्रज्ञाची यासंबंधींची कल्पना ( Theory ) हल्लीं बरीच मान्य झाली आहे. त्यानें या प्रक्रियेचे ( Sexual impulse ) दोन भाग कल्पिले असून एका भागास मानसिक वासनात्मक व दुसऱ्या भागास कर्मेंद्रियास धरून अशीं तो नांवें देतो. सर्व इंद्रियकार्य प्रथमतः 'कामा'च्या वासने (Desire) वर अवलंबून आहे. कामसूत्रकारांनीं कामाच्या व्याख्येंत ही गोष्ट " मनसाधिष्ठित " आहे हें नमूद केलेलें मागें आलें आहेच. प्रथम कर्मेंद्रियांस धरून शरिराच्या रचनेंत कांहीं अंतःस्राव ( Internal secretions ) करणाऱ्या ग्रंथी आहेत. त्यांचे स्राव योग्य वेळीं व योग्य प्रमाणांत घडून प्राण्यास प्रौढावस्था ( Adolescence ) प्राप्त झाली पाहिजे. यांत 'पिट्यूटरी' (Pituitary) नामक मेंदूजवळील ग्रंथी अत्यंत महत्त्वाची ठरेल. ही नसेल तर कामवासनाच होणार नाहीं. स्त्री व पुरुष ग्रंथी (Ovaries and Testicles) या दुसऱ्या महत्त्वाच्या ग्रंथी होत. यांचीहि या सर्व गोष्टींस जरुरी असते. कारण, याच ग्रंथी स्त्री व पुरुषपिंड निर्माण करणाऱ्या असतात. तेव्हां या सर्व ग्रंथींची शरिरांत योग्य क्रिया असणें ही कामवासनेस प्रथम महत्त्वाची गोष्ट आहे. या ग्रंथींमुळेंच मनुष्यास काम ही आद्य चेतना ( Primary Sex Instinct ) उत्पन्न होते. पुढचे सर्व व्यापार हिच्यावर अवलंबून असतात. सर्व कामव्यापार सुरळीत चालण्यास या ग्रंथींचें आरोग्य किंवा एकंदर शारीरिक सुस्थिति ही मुख्य आवश्यक गोष्ट आहे. मागें आपण पाहिलेंच कीं, प्रौढावस्था प्राप्त झाली म्हणजे कामव्यापारास सहज चेतना मिळते. परंतु या सहजप्रवृत्तीस धरून त्याची पूर्ति म्हणजे विवाह असल्यामुळें आणि हें विवाहाचें वय वाढत चालल्यानें एक नैसर्गिक प्रौढावस्थेंतलि समस्या उत्पन्न होऊन त्या समस्येंतून पुष्कळ निरनिराळे प्रसंग निर्माण होतात. या निसर्गसिद्ध उद्दीपनाबरोबर हल्लींच्या संस्कृतींत ( Culture ) कृत्रिम उद्दीपनाचेहि प्रकार पुष्कळच आढळून येतात. किंवा असें म्हणतां येईल कीं, या अंतर्गत उद्दीपनाबरोबरच बाह्य उद्दीपनाचेहि ( Stimulus ) प्रकार पुष्कळच अस्तित्वांत आहेत. या बाह्य उद्दीपनाचे बहुविध प्रकार स्पर्श, रूप, रस, गंध, दृष्टि इत्यादि सर्व ज्ञानेंद्रियांना गोचर असतात. किंबहुना या पंचज्ञानेंद्रियांतूनच हें बाह्य उद्दीपन सारखें चालू राहतें. याप्रमाणें बाह्य व अंतर्गत कारणांवर उद्दीपन अवलंबून असून हल्लींच्या कालांत तर हे बाह्य प्रकार जास्त वाढीस लागलेले दिसतात. उद्दीपनाचीं बाह्य कारणें पुष्कळ असून, त्यांचें कांहीं पद्धतशीर निरीक्षण डॉ. किन्से यांच्या रिपोर्टात सांपडतें. तात्पर्य,

कर्मेंद्रियांच्या उद्दीपनाशीं ( Sexual excitement ) दोन गोष्टींचा संबंध आहे. ( १ ) अंतःस्राव ग्रंथी व ( २ ) बाह्य उद्दीपनाचीं कारणें. यांत इंद्रियार्थ स्पर्शविशेष ( Erogemic zones ) येतात. या उद्दीपनाच्या अवस्थेनंतर येणारी नैसर्गिक अवस्था म्हणजे ' वेग ' ( Tumescence ). रतिसुखाचा विचार करतांना रतिव्यवहाराबाबत वात्स्यायन अवस्थांचे भेद करतात. त्यांत,

**रसो रतिः प्रीतिर्भावो रागो वेगः समाप्तिः इति रतिपर्यायाः ।**

का. सू. २.१.३२

असे पर्याय देतात. यांत ' रस ' हा शब्द अंतःस्राव करणाऱ्या ग्रंथीमुळें निसर्गसिद्ध उद्दीपनास लावतां येईल. रतिः, प्रीतिः, भावः व रागः हे शब्द चित्तरंजन, चित्तपरिस्पंदन आणि चित्ताचा आनंद यांना धरून या भावनेशीं मनुष्याचें जें तादात्म्य यावें लागतें किंवा येतें त्याला धरून वापरले असावेत. मोल ( Moll ) हा पाश्चिमात्य शास्त्रज्ञहि या तादात्म्यभावास " एकाग्रता " ( Impulse of concentration ) असें नांव देतांना दिसतो. या एकाग्रतेचा उपयोग ' वेग ' ( Tumescence ) उत्पन्न होण्यास व टिकण्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. ' वेग ' या अवस्थेंत एकंदर शरिरावर परिणाम झालेला असतो. पण विशेषतः याचा परिणाम पुरुषाच्या उपस्थेंद्रियावर चटदिशीं दिसून येणारा असतो. हें इंद्रिय ज्या स्नायूंचें वा मांसाचें बनलें आहे त्यांत ताठरपणा येण्याची किंवा प्रसरण पावण्याची शक्ति असते. हा ' ताठरपणा ' येतांना किंवा ' प्रसरण ' होतांना, त्या इंद्रियास रक्ताचा जास्त पुरवठा झालेला असतो व चित्ताची एकाग्रता एका प्रेम-विषयावर झालेली असते हें लक्षांत आणलें म्हणजे ' वेग ' या अवस्थेंत सर्व शरिरावर परिणाम झालेला असतो हें सहज ध्यानांत येईल.

यानंतरच्या अवस्थेस ' समाप्ति ' ( Detumescence ) असें नांव देतां येईल. या अवस्थेंत ' वेगा 'चें प्रशमन झालेलें असतें. यांत पुरुषेंद्रिय पुरुष-पिंडाचें ( Sperms ) उत्सर्जन करून परत आकुंचन पावलेलें असतें. सुरू झालेली लढाई संपुष्टांत येण्यासारखी ही स्थिति आहे. लढाई सुरू झाली म्हणजे सर्वत्र ' चळवळ ' ( Activity ) किंवा ' एकच धांदल ' झालेली दिसते. सर्व देशाचें लक्ष एकत्रित होऊन ' व्हिक्टरी ' या एकाच कल्पनेशीं तादात्म्य झालेलें असतें. ही युद्धाची धमाल संपली कीं, सर्वत्र सामसूम होतें. थकले भागलेले लोक पुनः

स्वस्थ चित्तानें श्वास घेतात. सर्व ठिकाणीं धुमश्चक्रींत झालेली वाताहात आणि त्यानंतर आलेली शिथिलता ( Relaxation ) नज़रेस पडूं लागते. यालाच 'समाप्ति' ( Detumescence ) हें नांव दिलेलें आहे. या परिस्थितींत पुरुषाचें उत्सर्जन झाल्यावर सर्व शरिरांत शिथिलता, आणि आलस्य येतें. सर्व शरीरभर उडालेली 'धमाल' शांत होते. आणि सर्व शरीरव्यापार पूर्वस्थितीवर येऊं लागतो. या सर्व अवस्था स्त्री व पुरुष या दोघांनाहि परिचयाच्या किंवा अनुभवाच्या आहेत. फक्त फरक येवढाच कीं, पुरुषांत ही अवस्था शुक्रधातूच्या ( Semen ) उत्सर्जनानें सहज प्रत्ययास येणारी आहे. तशी स्त्रींत नाहीं. स्त्रीशरिरांत ती अनुभवाची गोष्ट आहे. या शारीरिक प्रक्रिया स्त्री, पुरुष या दोघांनाहि अनुभवण्याच्या आहेत. याप्रमाणें कमवासनेची शारीरिक प्रक्रिया सामान्यतः दोन अवस्थांत वर्णन करतां येईल. प्रथमावस्थेस उद्दीपन ( Stimulation ) म्हणतात व दुसरीस प्रतिक्रिया ( Response ) म्हणतात. यांत मनाचें अधिष्ठान व आरोग्य या गोष्टी मूलभूतच आहेत.

पहिल्या अवस्थेस दोन प्रकारची कारणपरंपरा आहे. एक अंतर्गत ग्रंथीस धरून तर दुसरी बाह्य जगास धरून मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांस गोचर होणारी आहे. प्रतिक्रियेंतहि दोन भाग असून एकास 'वेग' ( Tumescence ) व दुसऱ्यास 'समाप्ति' ( Detumescence ) म्हणतात. या सर्व प्रक्रियेचा शेवट 'आनंद' हा असतो. हा आनंद ( Orgasm ) ही एक फक्त अनुभवाची गोष्ट असून वर्णनाची नाहीं. येथें वाचा समाप्त होते किंवा हा आनंद वाचातीत असतो. स्वतःचें त्यांत विस्मरण असतें. त्यांत स्त्री-पुरुष हें द्वंद्व नाहींसें होऊन ते द्वंद्वातीत होतात. परमेश्वरानें स्त्री व पुरुष हे जणुं स्वतःचेच दोन घटक करून जीवसृष्टीला आव्हान दिलें कीं, "आतां एकत्र या व पुन्हां माझा अनुभव घ्या." तेव्हां या द्वंद्वानें परत निर्द्वंद्व होऊन तोच साक्षात् परमेश्वरस्वरूप आनंदाचा जणुं उपभोग घेतला. त्यासच इंग्रजींत 'ऑर्गॅझम्' म्हणतात. सर्व काम-व्यापाराचा हा 'आनंदरूप' शेवट. या आनंदाची तुलना ज्ञानेश्वरमहाराजांनीं आत्मानंदाशीं केली. फक्त आत्मानंदास सातत्य आहे, तें यांत नाहीं. पण सामान्य माणसांना आत्मानंदाचा अनुभव कसा असतो हें सांगण्यास, ज्ञानेश्वरांनाहि याच आनंदाचा दाखला घेणें भाग पडलें. दुसरा कोणताहि पृथ्वीवरील 'आनंद' येवढा द्वंद्वातीत नाहीं, येवढा निर्भेळ नाहीं, येवढा 'मीपणा' विसरण्यास लावणारा नाहीं. म्हणूनच या आनंदाची

उपमा देतांना ज्ञानेश्वरमहाराजांनीं मोठी मार्मिकता प्रकट केलेली दिसते. वरील सर्व वर्णन खालीलप्रमाणें एकत्र दाखवितां येण्यासारखें आहे.

**कामवासना**




वरील नकाशा कामवासनेचा सर्व पसारा थोडक्यांत निदर्शनास आणून देण्यास पुरेसा आहे. मागील सर्व चर्चा या नकाशानें वाचकापुढें साकल्यानें एकत्रित होईल. पूर्वी कामसूत्रकारांची 'काम' या शब्दाची संपूर्ण व्याख्या दिलेली वाचकांस स्मरत असेल. त्यांत कामवासना ही मनसाधिष्ठित असून श्रोत्र, त्वक्, जिव्हा व घ्राण या सर्व ज्ञानेंद्रियांमार्फत ती दृष्टीस पडणारी आहे. वगैरे व्याख्या किती

शास्त्रशुद्ध आहेत हें येथें सहज समजून येईल. यानंतर कामवासनेचा या आनंदमय शेवटास पोहोंचेपर्यंत जी अवस्था वर दिली आहे तींत सध्यां काय काय परिस्थिति उत्पन्न झाली आहे, तिच्यांतील अडचणी व त्यांचें परिमार्जन या दृष्टीनें थोडा विचार करूं.

**भारतीय दृष्टिकोन ' ब्रह्मचर्य ' :**

उद्दीपनाचे ( Stimulation ) जे दोन विभाग आकृतींत दर्शविले आहेत, त्यांतील प्रथम भाग जो अंतर्गत उद्दीपनाचा आहे, हा भाग संपूर्ण नैसर्गिक असून आरोग्यशील निरोगी शरिरांत त्याचा प्रादुर्भाव अंतर्गत शारीरिक घटनेमुळेंच सहजसिद्ध असून, कांहीं वयांत तो प्राण्याच्या वर्तणुकींत दृग्गोचर होऊं लागतो. ही निर्माण झालेली निसर्गसिद्ध शक्ति ( Force ) कांहीं काल चांगली ताब्यांत ठेवून, योग्य स्थलकालीं तिचा उपयोग करावा असा भारतियांचा दृष्टिकोन; त्यामुळें आमच्याकडे ब्रह्मचर्याचें मोठें स्तोमहि माजलेलें दिसेल. पण त्यांतील महत्त्वाचा भाग येवढाच कीं, ही निसर्गसिद्ध शक्ति माणसानें शक्यतों जतन करावी; तिचें नीट पोषण करावें. तिचा योग्य स्थलकालीं सदुपयोग करतां यावा या दृष्टीनें तिची सर्वतोपरी निगा राखावी. कामशक्तीवर बुद्धीचा अंकुश ( Conscious control ). कांहीं प्रमाणांत चालवितां येतो. तेव्हां स्थलकालपरत्वेंहि ब्रह्मचर्य अशक्य आहे असा पक्ष मांडण्याचें कारण नाहीं. मागें वर्णन केलेली प्रौढावस्थेंतील नैसर्गिक समस्या लक्षांत घेऊन हें ' उद्दीपन ' काबूंत ठेवावें. या शक्तीच्या समाधानाचा प्रसंग जवळ आला नाहीं तोंपर्यंत तिला जास्त उद्दीपित करूं नये, असा भारतीय विचार.

**सन्नियम्येन्द्रियग्रामं तपोवृध्यर्थमात्मनः ।**
**वर्जयेन्मधु मांसं च गंधं माल्यं रसान् स्त्रियः ।**
**कामं क्रोधं च लोभं च नर्तनम् गीतवादनम् ।**
**स्त्रीणां च प्रेक्षणालम्भमुपघातं परस्य च ।** मनु. २.७४.७५.७८.७९

दुसऱ्या अध्यायांत ब्रह्मचर्याश्रमांत विद्यार्थ्यानें ही समस्या जास्त भीषण होऊं देतां कामा नये, याकरितां काय काय नियम पाळावे याचें वर्णन येतें. त्यांत स्त्रियांकडे कामवासनेनें पाहणें, त्यांना आलिंगन देणें, नर्तन, गीत, वाद्य, सुगंध, मांसादि भक्षण, क्रोध इत्यादि गोष्टी वर्ज्य कराव्या, असें स्पष्ट

लिहिलेलें आहे. मनाचें लक्ष काम-वासनेकडे आकर्षित करणाऱ्या या सर्व गोष्टी ब्रह्मचर्याश्रमांत पुरुषानें वर्ज्य कराव्या हें सांगण्यांत, ही नैसर्गिक समस्या कमी करण्याचा प्रयत्न दिसतो. शिवाय जी शक्ति पुढें ' आनंद ' आणि ' सुप्रजा ' यांची जननी होणार आहे तिचा अपव्यय टाळून ज्या काळीं त्या शक्तीचें समाधान होण्याचा प्रसंग येईल, त्या काळापर्यंत ती टिकवून तिचें पोषण करणें योग्य हा दृष्टिकोन येथें आहे. आतां ही गोष्ट अवघड आहे. असें करणें शक्य नाहीं. कोणतीहि गोष्ट पटली आणि तीसंबंधीं अभ्यास केला म्हणजे कांहीं संपूर्ण फलप्राप्ति होईलच असें नाहीं. जेवढी होईल तेवढी पुरे. पण ती करण्याचा योग्य प्रयत्न करणें व्यक्तीच्या आणि समाजाच्या हिताचें आहे. हा विचारच नाहींसा झाल्यास अनाचाराची सीमाच राहणार नाहीं. प्रौढावस्थेची समस्या भीषण होऊं नये म्हणून हें शिक्षण अवश्य आहे.

**डॉ. किन्से यांचा अभ्यास :**

डॉ. किन्से यांनीं कामोद्दीपनासंबंधीं ( Psychological stimulation ) एकंदर तेहेतीस मानसिक कारणें काढलीं आहेत. त्या प्रत्येकाचा पुरुष व स्त्री या व्यक्तींवर होणाऱ्या परिणामांचें त्यांनीं निरीक्षण केलें आहे. त्यामध्यें चित्रपट पाहणें, प्रणयकथांचें सतत वाचन, मनन, नग्न चित्रांचें प्रदर्शन, स्त्रीचें आकर्षक दर्शन अशा प्रकारच्या सर्व उद्दीपनांचे निष्कर्ष आहेत. पुरुष हा स्त्रीपेक्षां जास्त सुलभ व तावडतोब उद्दीपित होऊं शकतो.

यावाबत क्षुल्लक कारणेंहि पुरुषास पुरेशीं होतात. ' हंसली कीं फसली ! ' अशी एक म्हण मराठींत प्रसिद्ध आहेहि. ही तिच्यांतील तत्त्वबोध येवढाच कीं, पुरुष हा कामोद्दीपनास सहजसुलभ आहे. स्त्रीबाबत हें सहज आणि सोपें नाहीं. डॉ. किन्से यांनीं मुलाखत घेतलेल्या ५३०० पुरुषांपैकीं नग्न स्त्रीचें चित्र पाहून ज्यांचें उद्दीपन झालें अशा पुरुषांची संख्या ५० टक्के असून, रस्त्यानें फिरतांना आकर्षक वेशभूषा करून जाणारी स्त्री पाहून ३५ टक्के पुरुषांचें कामोद्दीपन होत असल्याचें त्यांचें प्रतिपादन आहे. एकंदर ज्या तेहेतीस कारणांचें यासंबंधीं त्यांनीं निरीक्षण केलें त्यांतील तीस कारणांच्या योगानें स्त्रीपेक्षां पुरुष जास्त लौकर प्रदीप्त होतो. तर उलट फक्त तीन कारणांमुळें स्त्री पुरुषापेक्षां जास्त प्रदीप्त होते. स्त्रीस प्रदीप्त करणारीं हीं तीन कारणें म्हणजे ( १ ) चित्रपट ( २ ) प्रणय-कथा व ( ३ ) चुंबनाच्या वेळीं

होणारे दंतव्रण. स्त्री ही पुरुषापेक्षां निसर्गतःच कामोद्दीपनास कठिण आहे याचा आणखी एक पुरावा असा कीं, पुरुष वयांत येतांक्षणींच आपल्या कामचेष्टा करण्यास सुरवात करतो तर स्त्री वयांत आल्यावर २-४ वर्षांपर्यंत कामव्यापारांत सहसा सांपडत नाहीं. वरील अभ्यासावरून कामोद्दीपन होण्यास जीं कारणें मनूनें दिलेलीं दिसतात त्यांतील बरींच कारणें शास्त्रीय आहेत असें दिसतें. पुरुष हा स्त्रीपेक्षां उद्दीपनास जास्त सुलभ आहे हेंहि पाश्चिमात्य शास्त्रज्ञांस मान्य आहे. आतां हीं सर्व कारणें विवाहकालापर्यंत पुरुषानें शक्यतों टाळावीं आणि ब्रह्मचर्यानें राहण्याचा प्रयत्न करावा, यांमुळें या प्रौढ वयांत सहजसिद्ध जें कामोद्दीपन तें या बाह्य कारणांनीं जास्त होऊं नये ही खबरदारी घ्यावी व तज्जन्य दुर्घटना टाळण्याचा प्रयत्न करावा. ही शक्ति त्यामुळें सुप्त स्थितींत पोसली जाऊन योग्य कालीं व स्थलीं तिचा उपयोग करणें जास्त शक्य होईल, वगैरे विचार जास्त बुद्धिगम्य नाहीं काय ? याउलट, अंतर्गत निसर्गसिद्ध उद्दीपनाबरोबरच कामोद्दीपनाचीं बाह्य कारणें घडतील तेवढीं घडोत, उलट त्या कारणांत भर पडावी असेंच शिक्षण, विचार आणि वागणूक मिळते. " ब्रह्मचर्य पाळून काय करावयाचें आहे ? कामोद्दीपन झाल्यास त्याचें घडेल त्या सूक्तासूक्त मार्गांनीं समाधान करून घ्यावें ! पुढचा विचार यांत येतो कोठें ? त्याकरितां पाहिजे तर नीतिबंधनें सैल करावींत, कायदे बदलावेत, याबाबत समाजानें आपला दृष्टिकोन जास्त सहिष्णु म्हणजे **यथेच्छसि तथा कुरु।** असा ठेवावा. " वगैरे विचार कसे दिसतात हें वाचकांनींच ठरवावें.

**मनावरील दडपण :** येथें मानसशास्त्रांतील 'मनावरील दडपण' ( Psychological inhibition ) या विषयाची कांहीं चर्चा योग्य स्थलीं केल्यासारखें होईल. कारण या गोष्टीचें डॉ. किन्से यांनीं फारच फाजील स्तोम माजविलें असून, त्यामुळें अत्यंत तर्कविरुद्ध सिद्धांतहि ठोकून दिलेले दिसतात. प्रथम या शब्दाचा अर्थ तरी काय हें पाहूं ' Inhibiton is the blocking of one activity by another ( K. Young p. 103. ) ' मनाचा एक व्यापार चालू असतां मध्यें कांहीं कारणानें तो व्यापार थांबणें किंवा दडपला जाणें यास ' मानसिक दडपण ' ( Inhibition ) असें नांव आहे. ' याचीं अनंत उदाहरणें देतां येतील. मनुष्य क्रोधायमान झाला कीं त्याची विवेकबुद्धि काम करीनाशी होते. क्रोधानें होणारा

हा बुद्धिनाश सर्वांच्या परिचयाचा आहे. रस्त्यानें चाललें असतां साप दिसला तर मनुष्य तेथेंच थबकतो. यांत भीतीनें चालण्याचा व्यापार बंद पडला. भीतीनें मनोव्यापारावर येणाऱ्या या दडपणाचा मनुष्याच्या शिक्षणांत आणि त्याच्या प्रगतींत फार उपयोग होतो. चोरी केली कीं शिक्षा होते या भीतीनें चोरी करण्याकडे प्रवृत्ति झाल्यास ती दडपली जाते. विस्तवाशीं हात नेल्यास तो भाजतो म्हणून लहान मुलें विस्तवाशीं भाजण्याचा संबंध आपोआप जोडतात, आणि ‘ हाऽऽय ’ अशा शब्दानें त्याचें वर्णन करतात. शिक्षक रागावतील या भीतीनें मुलें कमी खोड्या करतात हा नेहमींचा अनुभव आहे. तात्पर्य, भीतीनें मनाचा व्यापार दडपून टाकतां येतो, या गोष्टीचा फायदा शिक्षणांत उचलणें फायद्याचें ठरतें. तसेंच मनाचा अयोग्य व्यापार भीतीनें दडपून टाकून मनाला योग्य व्यापाराकडे वळविणें हा शैक्षणिक हेतु साध्य करतांनाहि या मानसशास्त्रीय दडपणाचा ( Inhibition ) उपयोग केला जातो. आतां कामव्यापारांतहि नेमकी हीच तऱ्हा आहे. स्त्री व पुरुष एकांतांत एकत्र येऊन त्यांनीं कांहीं कामचेष्टा सुरू करावी आणि पट्दिशीं दारावर थाप बसावी म्हणजे एकदम गडबड उडते. यांत मनाचा चालू व्यापार एकदम थांबतो व दुसरीकडे मन ओढलें जातें. पण कामव्यापारांतहि ज्यास आपण धर्मविरुद्ध असें नांव देतों किंवा जो कामव्यापार सामाजिक दृष्टीनें न होणें चांगलें असें आपण समजतों, त्या कामचेष्टा थांबविण्यास या मानसिक दडपणाचाच उपयोग होतो. कामेच्छा मनुष्यानें कोठें व किती तृप्त करावी यासंबंधीं मनाचें सर्व शिक्षण या दडपणाखालींच ( Inhibition ) होत असतें. कोणीहि, केव्हांहि आणि कोठेंहि कामेच्छा तृप्त करण्यास प्रत्यवाय नाहीं. अशी परिस्थिति असलेल्या मानवी समाजाची कल्पना केली तर मानव व इतर प्राणि यांत फरक राहात नाहीं. तेव्हां कामेच्छा तृप्त करण्याचे योग्य व अयोग्य मार्ग मनुष्य या दडपणाखालींच शिकतो आणि धर्मविरुद्ध काम सामाजिक दृष्टीनें व कुटुंबहितार्थ दडपून टाकण्याची संवय लावून घेणें हें शेवटीं व्यक्तीच्या आणि समाजाच्या हिताचेंच ठरतें. तात्पर्य, ‘ मानसिक दडपण ’ ( Psychological inhibition ) हें मन सुसंस्कृत करण्याचें एक साधन असून, त्याचा योग्य उपयोग मनुष्यानें करून घेतल्यास व्यक्तीला व समाजाला सुस्थिति उत्पन्न होऊं शकते.

**कामवासनेसंबंधीं योग्य दडपणांचे उपयोग :**

आतां कामवासनेसंबंधीं दडपणाचे उपयोग काय आहेत तें पाहूं. धर्मविरुद्ध कामेच्छा दडपून टाकून ती धर्म्य मार्गास लावणें हें शैक्षणिक कार्य घडवून आणणें हा एक 'दडपणानें' (Inhibition) उत्पन्न होणारा मोठा उपयोग आहे हें आपण पाहिलेंच आहे. यास 'ब्रह्मचर्य' हें नांव आमच्याकडे आहे. यांत गुरुगृहीं राहावयाचें असल्यानें गुरुपत्नीशीं, नातें कसें असावें, यासंबंधीं नियम बांधले. त्यांत सहजच परस्त्रीशीं संबंध कसे असावेत, यासंबंधीं मनास शिक्षण मिळालें. 'परदारागमन' हें आमच्याकडे मोठें पाप समजलें गेलें आहे. ही वृत्ति ब्रह्मचर्यापासून पुरुषांत गुरुपत्नीशीं वर्तन कसें असावें यावरून उत्पन्न करण्यांत येत असे. ब्रह्मचर्याश्रमांत कामोद्दीपक प्रसंग व वस्तु टाळाव्या असा दुसरा नियम आहे.

**दडपणांचे दुष्परिणाम :**

'उद्दीपन' (Stimulation) जितकें कमी तितकें दडपणामुळें (Inhihiticn) उत्पन्न होणारे दुष्परिणामहि कमी. कामोद्दीपनाचीं बाह्य साधनें कमी असल्यास 'ब्रह्मचर्य' पाळणें जास्त सोयीचें होतें किंवा कमी त्रासाचें होतें. आतां एका बाजूस सकाळपासून व्यवहारांत उद्दीपनास कारणें सारखीं उत्पन्न होतात व दुसरीकडे त्याचें समाधान म्हणजे विवाह फारच दूर पळत आहे. अशा स्थितींत सहजच दडपणामुळें उत्पन्न होणारे दुष्परिणामहि वाढत आहेत, हें सत्य आहे. बाह्य साधनांच्या अभावीं किंवा तीं कमींतकमी असतांना ब्रह्मचर्याचें पालन केल्यास, त्यांत कांहीं दुरुपयोग नसतो. पण एका बाजूस सतत सर्व साधनसामुग्रीमुळें उत्पन्न होणारें कामोद्दीपन व दुसरीकडे त्याचें समाधान नाकारण्यामुळें उत्पन होणारें मनावरील दडपण मात्र पुष्कळ प्रकारचे दुष्परिणाम उत्पन्न करूं शकतें. प्रो. मॅकडुगल इत्यादि मानसशास्त्रज्ञांचेंहि असेंच मत आहे. प्रेमकथा, प्रेमसंवाद, नाटकें, सिनेमा, कादंबऱ्या, लघुकथा काव्य इत्यादि ललित साहित्य, कॉलेजमध्यें शिकविण्यांत येणारें नृत्य, नाट्यप्रयोग इत्यादि सर्व साधनांनीं प्रौढ वयांत कामोद्दीपन सारखें सुरू ठेवावयाचें; पाश्चिमात्य देशांत तरुण-तरुणींना प्रेम करण्यास संधि देऊन, त्यांचे त्यांनीं विवाह जमवावे नाहींतर मोडावे, या स्वातंत्र्यामुळें तरुण-तरुणींच्या प्रेमचेष्टा; आलिंगन, चुंबन इत्यादिकांपासून तों प्रत्यक्ष लैंगिक समाधानापर्यंत पोहोंचतात आणि त्यांतून फक्त शेवटचा आनंद-उत्पन्न होऊं

द्यावयाचा नाहीं, प्रजोत्पत्ति होऊं द्यावयाची नाहीं, अशा अडचणींमुळें दडपणाचें प्रमाण आपोआपच वाढत जातें. हें दडपण खरें दोषास्पद आहे. यामुळें सहजच मनुष्याच्या सर्व मानसिक, बौद्धिक व शरीरिक कर्तृत्वावर ताण पडून त्याचे सर्व व्यापार जसे समतोलपणानें व्हावेत तसे होत नाहींत व त्यामुळें निरनिराळे शारीरिक व मानसिक रोग जडण्याची भीति असते. तेव्हां बाह्य कामोद्दीपनाचे प्रकार शक्यतों कमी करून कांहीं काळ ब्रह्मचर्यव्रत पाळण्यांत जें 'दडपण' ( Inhibition ) येतें, त्यानें मनुष्याचें फारसें नुकसान होण्याची भीति नाहीं. उलट, त्यामुळें अधर्म्य कामविकारास कांहीं वळण लावणें शक्य आहे. याउलट प्रौढ वयांत कांहीं प्रमाणांत कामोद्दीपन सहजच होत असतां, बाह्य कारणें स्वेच्छेनें सारखीं उत्पन्न करून, या कामोद्दीपनांत सतत भर घालणें आणि त्याच्या समाधानाचा मार्ग म्हणजे जो 'विवाह' तो दूर लोटणें, यांत बुद्धिगम्य तर कांहीं नाहींच पण यामुळें सर्व 'दडपणा' ( Inhibition ) चा भार असह्य होऊन त्याचा परिस्फोट मानसिक व शारीरिक विकृति उत्पन्न करण्याकडे होत असतो.

**पाश्चिमात्य आचार घातुक :** पाश्चिमात्यांची खरी कुचंबणा आणखी वेगळीच आहे. स्त्रीचें प्रथम व्यक्तिस्वातंत्र्य, त्यानंतर तिचें आर्थिक स्वातंत्र्य, त्यानंतर सामाजिक स्वातंत्र्य, हीं सर्व स्त्रीचीं स्वातंत्र्यें जाहीर केल्यावर स्त्रीनें लैंगिक स्वातंत्र्याची मागणी केल्यास नवल नाहीं. या सर्व पायऱ्या चढल्यावर मागें परत जाण्यांत मोठी मानहानि होऊन आपल्या संस्कृतीचा अहंकार दुखावेल व सुधारणेचा सारा बुडबुडा फुटेल, म्हणून चूक कबूल करणें शक्य नाहीं इतकेंच नव्हे; तर तिकडे कानाडोळा करणें भाग आहे. आणि अभ्यासक, समाजहितैषी विद्वान् या दडपणाचे ( Inhibition ) दुष्परिणाम निरनिराळीं निरीक्षणें प्रसिद्ध करून दाखवीत आहेत. तेव्हां ही समस्या सोडविण्यास आणखी एक विपरीत युक्ति त्यांनीं काढली. तिचें नांव " विवाहपूर्व लैंगिक संबंधास परवानगी. " यांत त्यांचा युक्तिवाद असा कीं, विवाहपूर्व लैंगिक संबंध ठेवण्यास हरकत काय म्हणून असावी ? दडपणाचे अनिष्ट परिणाम टाळायचे तर हाच एकमेव उपाय आहे.

**पुनश्च डॉ. किन्से :** डॉ. किन्से यांनीं अशा प्रकारचे निष्कर्ष ठोकून दिल्यानें शास्त्रीय भ्रम निर्माण केला आहे. रतिसुखाचा आनंद हा सुखी विवाहांतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.

येथपर्यंत डॉ. किन्से व आमचें मत एकच. त्यांनीं उत्पन्न केलेली दुर्लभ माहिती व तीमागील कष्ट यांबद्दल त्यांचें कौतुकच करावयास हवें; पण येथें खरें शास्त्र संपलें. यापुढील त्यांचें सर्व अनुमान शास्त्राला लाज आणणारें आहे. विवाहपूर्व कामव्यापार आणि विवाहांतर्गत रतिसुख यांचा त्यांनीं संबंध लावून दाखविला आहे. डॉ. किन्से यांनीं विवाहित स्त्रियांच्या ज्या मुलाखती घेतल्या, त्यांवरून रतिसुख हें एक यशस्वी विवाहाचें महत्त्वाचें अधिष्ठान आहे, याबद्दल त्यांची खात्री पटली. हें सुख ज्या स्त्रियांना लाभलें नाहीं, त्यांच्यांत बऱ्याच कुरबुरी व कलह त्यांच्या नजरेस आले. त्यामुळें कित्येक वेळां घटस्फोटापर्यंत गेलेलीं प्रकरणें त्यांनीं पाहिलींहि. आणि यावरून स्थायी व यशस्वी विवाहाचा हा एक पाया आहे, याबद्दल त्यांची खात्री पटली. येथपर्यंत संशोधन ठीक झालें. पण पुढें ते लिहितात, 'मुलाखत घेतलेल्या स्त्रियांपैकीं चव्वेचाळीस टक्के स्त्रियांना रतिसुखाचा आनंद विवाहानंतर प्रथम वर्षांत मिळाला नाहीं. झालें, प्रथम वर्षांत रतिसुखाचा आनंद नाहीं म्हणजे सबंध वैवाहिक जीवनांतहि तो यांना मिळाला नाहीं असें म्हणावयाचें आहे का? त्याचा खुलासा स्पष्ट नाहीं. असो. यावर ते संशोधन सुरू करतात आणि त्यांना असें दिसून येतें कीं, 'विवाहपूर्व' रतिसुखाचा ज्यांस अनुभव होता त्यांस विवाहांतर्गत रतिसुख मिळणें सोपें जातें. मग यावरून ते सिद्ध करतात कीं, विवाहपूर्व रतिसुखाचा आस्वाद घेणें जरूर आहे. याची मोकळीक दिली तर विवाहाचे सर्व प्रश्न चुटकीसरसे सुटतील. विवाहपूर्व नुसत्या कामचेष्टांनीं उत्पन्न होणारे दडपणाचे परिणाम नाहीसे होतील; विवाहांतर्गत सौख्य, समाधान वृद्धिंगत होईल, इत्यादि. पण या साहेबांना एक शंका येऊनहि त्यांनीं ती नजरेआड केलेली दिसते. कारण, त्यांना फार मोठे सुधारक म्हणून झटपट प्रसिद्ध व्हावयाची घाई असण्याची शक्यता आहे. ती शंका अशी कीं, कामविकारासंबंधीं जगांतील सर्व व्यक्ति सारख्याच नाहींत. जसें त्यांच्या उंचींत, बुद्धींत, आवडीनिवडींत, वजनांत किंबहुना सर्व मानसिक व शारीरिक बाबींत कांहीं फरक दिसतात, तद्वतच त्यांच्या काम-विकारांतहि विविधता आहे. कांहीं प्रमाणांत ही विविधता निसर्गसिद्ध गोष्ट असून त्यामुळें एका व्यक्तीस जें सोपें तें दुसरीस अवघड असूं शकतें. सर्वांत कामेच्छा सारखी नसल्यानें सर्वांची कामपूर्तीहि सारखेपणानें होऊं शकत नाहीं. जे स्त्री-पुरुष कामविकाराच्या दृष्टीनें लवकर उद्दीपित ( Greater excitability ) होतात, त्यांच्यांत कामपूर्तीहि लवकर होऊं शकेल. विवाहपूर्व प्रेमांत सांपडणारी मंडळी नेमकी हीच असते. याच मंडळींत प्रेमविवाह

घडतात. यांच्यांत रतिसुख लवकर येण्याचें कारण यांच्या शरीर-मनांच्या घटनेंत असतें. तें बाह्य नाहीं. तें विवाहपूर्व कीं विवाहांतर्गत या कालावर अवलंबून नसून, त्यांच्या शरीर-मनांच्या घटनेशीं ( Constitution ) त्याचा संबंध असल्यानें, अशा स्त्रीपुरुषांस केव्हांहि रतिसुख जास्त सुलभ होतें. पण हें कारण लक्षांत येऊनहि प्रस्तुत साहेबांनीं त्यास चट्दिशीं वाटाण्याच्या अक्षता लावून, एकदम कांहींतरी क्रांतिकारक सांगावयाचें म्हणून, त्यांनीं हा भरमसाठ सिद्धांत ठोकला. यांत त्यांना वाटलें, सर्व विवाहाबाबतच्या समस्या एकदम एका तडाख्यांत सुटल्या व आपल्या बुद्धीचा फारच मोठा विजय झाला. लैंगिक व्यापार ( Sexual behaviour ) म्हणजे रतिसुख ( Orgasm ). विवाह म्हणजे लैंगिक व्यापारास लागणारा परवाना. रतिसुख हा एकच विवाहांतर्गत सुखाचा पाया, म्हणून ही परवान्याची पद्धत रद्द केली कीं कार्य संपलें. सर्वांस खुला व्यापार. त्यांत कसलीहि चोरी नाहीं. अशी नीति प्रस्थापित केली कीं, मानसिक दडपणाचे प्रश्न आटोपले. मग जगांत दुसऱ्याचें द्रव्य अपहार करणें ही चोरीच नव्हे म्हटलें कीं सर्व गुन्हे संपुष्टांत आणल्याप्रमाणेंच नव्हे काय ! यांत मनुष्याच्या मनाचा विचार नाहीं. विवाहांतर्गत सुखाच्या सर्व बाजूंचा विचार नाहीं. सुप्रजा व कुटुंबसंस्थेचें भविष्य यानें कसें दिसेल त्याचा पत्ता नाहीं. रतिसुख, प्रजोत्पादन आणि अपत्यप्रेम हीं सर्व एकमेकांशीं संलग्न आहेत, त्यांचा साकल्यानें विवाहांत विचार करावयास हवा याची दखल नाहीं. आणि पुनः हें सर्व शास्त्र आणि बुद्धिगम्य.

**कामवासनेवरील मानसिक दडपणांचीं कारणें व उपाय :**

यानंतर कामवासनेवर कोणकोणत्या मानसिक कारणांनीं दडपण येऊं शकतें, व त्यांचें निराकारण करण्याच्या भारतीय पद्धतीचा विचार करणें आहे. कामवासनेवरील मानसिक दडपण चार प्रकारच्या मानसिक विकारांनीं येऊं शकतें. प्रथमतः भीति हें एक कामवासना दडपून टाकण्याचें मोठें शस्त्र आहे. याच भावनेचा फायदा घेऊन सामाजिक नीति निर्माण झाली. ‘ आपणांस कोणी पाहील काय ? ’ ही शिक्षित धिटाईच्या लोकांना वाटणारी काळजी याच्याच पोटीं असून “ यानें पाप लागतें. ” ह्या भावनेनें अशिक्षित धर्मभोळ्या लोकांची होणारी वागणूकहि याचे एका पायावर उभी आहे. भारतियांनीं परदारागमन हें पाप मानलें, तसा संस्कार पिढ्यानुपिढ्या करून ठेवला आणि विवाहांतर्गत कामवासनेची पूर्ति करणेंच

तेवढें धर्म्य म्हणून सांगितलें. इतकेंच नव्हे तर त्यांतील अतिरेक अक्षम्य ठरविला आहे. विवाहपूर्व संबंध टाळतां यावेत याकरितां ब्रह्मचर्याची स्तुति केली व ब्रह्मचर्य फायदेशीर आहे, धार्मिक आहे, पवित्र आहे, पुण्यमय आहे असा संस्कार निर्माण केला. यामुळें मनुष्यास धर्मविरुद्ध कामव्यापार टाळण्यास मदत झाली जगांतील सर्व धर्मसंस्थापकांनीं हीच भूमिका थोड्याफार प्रमाणानें घेतलेली दिसते. खिस्तानें परदारागमन कांहीं योग्य मानलें नाहीं किंवा पैगंबरानें विवाहबाह्य संबंधांस धर्म्य म्हटलेलें दिसत नाहीं. यावरून कामवासनेस वळण व शिस्तबद्ध करण्याचा प्रयत्न सर्व काळीं सर्व स्थळीं या धर्ममार्तंडांकडून झालेला आहे हें सहज दिसून येईल. याचा नेमका पुरावा डॉ. किन्से यांच्या रिपोर्टांत आलेला सांपडतो. अमेरिकेंतील विवाहपूर्व कामव्यापारावर जर कोणती महत्त्वाची शक्ति दडपण आणीत असेल तर ती ' धर्मसमजूत ' होय, असें त्यांच्या निदर्शनास आलें. हे सर्व व्यापार ज्यांच्यांत धर्मभीति रूढ आहे, त्यांच्यांत कमी प्रमाणांत आढळून आले असें त्यांचेच आंकडे दाखवितात. यापुढें जाऊन त्यांनींच असेंहि नमूद केलें आहे कीं या दडपणामुळें विवाहांतर्गत रतिसुखावर कांहींहि परिणाम झालेला दिसला नाहीं. आतां हें सर्व जर खरें तर ब्रह्मचर्याच्या पालनानें मनावर अयोग्य दडपण येत नाहीं आणि विवाहांतर्गत सुखावर त्याचा अनिष्ट परिणाम होत नाहीं हें सहजच सिद्ध झालें. मग डॉ. किन्से यांना धर्मभावनेचा हा सदुपयोग करून घेण्याचा व लोकांना जास्त श्रद्धावान् बनविण्याचा मार्ग कां सुचला नाहीं ? पण मग ते झटपट सुधारक झाले नसते आणि ही अडचण दुर्निवार्य असल्यानें, त्यांनीं या गोष्टीचा फक्त निर्देश करून ती सोडून दिली. शिवाय विसाव्या शतकांत धर्मश्रद्धेचा सदुपयोग होतो, असें म्हणणें शास्त्रज्ञांस कसें शोभून दिसेल ? तेव्हां कदाचित् या भीतीमुळें डॉ. किन्से यांच्या मनावर मात्र ' दडपण ' येऊनच कीं काय त्यांनीं याबाबत जास्त सूक्ष्म विचार करण्याचा आग्रह धरलेला दिसत नाहीं. असो.

यानंतर दुसरी महत्त्वाची, कामवासनेवर दडपण आणणारी भावना म्हणजे क्रोध ( Anger ). क्रोध ही भावना ज्याप्रमाणें बुद्धिनाशास कारणीभूत होते त्याचप्रमाणें ती कामनाशासहि होते. ज्या मनुष्यावर आपण रागावतों त्यावरच आपण प्रेम करूं शकत नाहीं आणि कामवासना हो मनसाधिष्ठित असल्यानें मन जर क्रोधाविष्ट असेल तर त्यांत त्या व्यक्तीबद्दल तिटकारा येणें शक्य आहे.

तिसरी महत्त्वाची भावना मत्सर ( Jealousy ). मत्सर ही कामवासनेस

अत्यंत हानिकारक भावना आहे. पुरुष कायदेशीर रीत्या एकाच बाईचा पति असला तरी तो प्रसंगानुरूप अनेक स्त्रियांकडून उद्दीपित ( Poly-erotic ) होऊं शकतो. सपत्नी वा 'सोशल रायव्हल' ( Social rival ) ही गोष्ट मागेंहि अटळ होती व आजहि तशीच आहे. मग ज्या दुर्भागी स्त्रियांच्या वांटणीस ही समस्या येते त्यांनीं काय करावें ? एका बाजूस त्यांचें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व व दुसऱ्या बाजूस त्यांच्या आड येणारी 'नवरा गमावण्याची भीति' यांमध्यें झगडा उत्पन्न होऊन त्या व्यक्तीबद्दल मत्सर ही भावना निर्माण होते. सवतीमत्सर ही फार जुनी व प्रसिद्ध गोष्ट आहे. रामायणांतील कथेवरून या भावनेचा नंगा नाच काय असतो याची कल्पना येईल. प्रस्तुत स्थलीं रतिसुखाचाच विचार कर्तव्य असल्यानें सवती-मत्सराचा विशेष विचार करणें प्राप्त आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं पुरुषांत ही भावना नसते. स्त्री परपुरुषगमन करीत असल्यास याचा प्रादुर्भाव पुरुषांतहि होतोच. फार काय पण हल्लींच्या कालांत व्यक्तीव्यक्तींतील स्पर्धा पराकोटीस पोहों-चल्यामुळें धंद्यांतील कमीजास्त मत्सर थोडाफार सर्वांच्या परिचयाचा असेल. येथें येवढेंच नमूद करावयाचें कीं, ही भावना कामवासनेस उत्तेजक नसून त्यावर अत्यंत अनिष्ट परिणाम करणारी आहे. आपली कामवासना या भावनेच्या तडाख्यांत सांपडूं नये याकरितां कांहीं खटपट करणें जरूर आहे. याविषयीं विस्तृत विचार 'ध्येयें व प्रत्यक्ष आचार' यांत पुढें येईलच.

रतिसुखाच्या आड येणाऱ्या दडपणांच्या दृष्टीनें भीति, क्रोध व मत्सर या तीन मुद्यांनंतर चवथा मुद्दा 'अपमान' ( Insult ). पण हा सर्वत्र लागू नाहीं. त्यांत व्यक्तिगत विविधता किंवा कमीजास्तपणा ( Variation ) फार. स्त्रीनें किंवा स्त्रीच्या नातेवाईकांकडून पुरुषाचा स्वाभिमान दुखावला जाऊं नये, त्याचा धिक्कार होऊं नये, उलट त्याचा मानसन्मान व्हावा म्हणजे त्याचा परिणाम इष्ट होतो. स्त्रीनें उपरिनिर्दिष्ट तीनहि विकारांस बळी पडून जर पुरुषाचा धिक्कार केला वा अपमान केला तर त्याचा परिणामहि तोच होतो. पूर्वी स्त्रीचे नातेवाईकहि "आपली मुलगी येथें नांदावयाची आहे." अशा भूमिकेंतून सहसा असे प्रसंग घडूं नयेत म्हणून काळजी घेत असत. विवाह-विधींतील 'मधुपर्क' हा विधि असा पुरुषसत्काराचाच आहे. त्यापासून हाच बोध उत्पन्न होतो. त्यानंतरहि माहेरीं किती जावें, सासरच्या माणसांचा अपमान होऊं नये म्हणून माहेरच्या माणसांशीं कसें राहावें, इत्यादि फार सूक्ष्म विवेचन वात्स्यायनांनीं केलेलें आढळतें. त्यांत ते लिहितात,

**ज्ञातिकुलस्यानभिगमनमन्यत्र व्यसनोत्सवाभ्याम् ।** का. सू. ४.१.४५.

आई, बाप व तत्संबंधीं माणसांकडे व्यसन किंवा उत्सव अशा प्रसंगांशिवाय जाऊं नये. गेल्यास परवानगी घ्यावी व येण्यास शक्यतों उशीर लावूं नये. या सर्व गोष्टी हल्लीं मूर्खासारख्या वाटल्या तरी त्यांत पतिपत्नींतील गृहकलहाचीं अनंत बीजें असतात. वात्स्यायन ऋषींनीं कामसूत्र म्हणजे खेळ केला नसून मोठा मार्मिक ग्रंथ लिहिला आहे. उपरिनिर्दिष्ट भावनांचा पुरुषावर व त्यामुळें विवाहांतर्गत रतिसुखावर मोठा परिणाम होत असतो. पुरुषाचें प्रासंगिक षंढत्व पुष्कळ वेळां या मानसिक कारणांतून उत्पन्न झालेलें असतें. डॉ. व्हॅन डी वेल्डी स्पष्टपणें लिहितात,

" Other possible causes of failure in erectile capacity amounting to impotency are incessant quarrels between the partners, anxieties and worries, avertion or indifference to intercourse on the wife's part, her lack of proper personal hygiene or loss of physical attractions. Another factor is jealousy...........In fact, all the psychological causes of sex hostility in marriage may be the basis of disturbed or destroyed potency in the husband, scorn and mockery from the wife greatly aggravate such symptoms, both in their degree and duration. Thus, it becomes possible that a situatiou arises of husband, who is wholly impotant with his legal wife, but of perfectly normal or even remarkable virility as the lover of another woman. "

( Van. De. Velde. p. 290. )

वरील उद्धारणावरून स्पष्ट दिसून येईल कीं, स्त्रीशीं सतत कलह, मत्सर, क्रोध इत्यादि मनसोल्हास नाहींसे करणारे विकार विवाहांत जडल्यास त्या सर्वांची पुरुषाच्या षंढत्वांत परिणति होते आणि अशा प्रकारचे पुरुष कित्येक वेळां दुसऱ्या-विवाहबाह्य-संबंधांत मोठे कार्यक्षम ठरतात. पण स्वतःच्या घरांत मात्र ते क्लीब ठरतात. या सर्व गोष्टी मनुस्मृतिकारांनीं एका श्लोकार्धातच एकत्रित केलेल्या दिसतात.

**यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ।**
**अप्रमोदात्पुनः पुंसः प्रजनं न प्रवर्तते ।** मनु. ३.६१.

याचा अर्थ असा कीं पुरुषास स्त्री नावडती झाली, किंवा स्त्रीनें पुरुषाचें मन प्रसन्न ठेवलें नाहीं; तर या मनसोल्हासाच्या अभावीं त्याचा परिणाम पौरुषावर होऊन प्रजोत्पादनावरहि झाल्याशिवाय राहात नाहीं. हें लक्षांत घेऊनच कालिदासानें स्त्रीस ध्येयाचार म्हणून,

**शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने।**

**भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः।** शाकुंतल १.१८

सपत्नीशीं सखीजनासारखें वाग, मोठ्या माणसांची सेवा कर आणि एखाद्या वेळीं पति रागावला, तरीसुद्धां तूं त्याच्यावर उलट रागावूं नकोस किंवा त्यामुळें बाचाबाचींत न पडतां, स्वतः पडतें खाऊन प्रसंग निभावून ने. या कण्वमुनींच्या तोंडीं घातलेल्या शकुंतलेला केलेल्या उपदेशाचें मर्म रतिशास्त्रीय आहे हें लक्षांत ठेवावें. डॉ. वॉकर या प्रश्नावर लिहितांना प्रथमतः षंढत्वासंबंधीं कबूल करतात कीं, अशा प्रकारचे शेंकडा ९० पुरुष मुख्यतः कामवासनेवर कांहींतरी मानसिक व्यथेचा परिणाम झाल्यामुळें या परिस्थितींत दुःखी झालेले दिसतात. स्त्रियांनीं स्वातंत्र्य, समता आणि व्यक्तिमत्त्वाच्या कसल्याहि गप्पा झोकल्या, तरी या कामवासनेच्या खेळांत त्यांना जो भाग घ्यावयाचा असतो, त्यांत त्यांनीं पुरुषास वरचढ होऊं देणें भागच असतें. स्त्री ही निसर्गतः विनम्र ( Submissive ) आहे. ती विनम्रता सध्यांच्या आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यानें कमी होत आहे. पुरुषाचा वरचढपणा ( Dominance ) हीहि निसर्गसिद्ध गोष्ट आहे आणि पुरुषाचा वरचढपणा व स्त्रीची नम्रता हें प्राणीशास्त्रीय सत्य आहे. ( Dominance–Subordination Pattern ) हें जरी सर्व खरें असलें तरी नम्र स्त्री शेवटीं पुरुषाला आपला दास बनविते. डॉ. वॉकर म्हणतात, " कामवासनेमध्यें हा पुरुषाचा वरचढपणा सुरवातीस अटळ असल्यानें याविरुद्ध वर्तन घडल्यास म्हणजे स्त्री वरचढ होऊन तिनें पुरुषास नम्रता धरण्यास भाग पाडल्यास त्या पुरुषाच्या पौरुषावर त्याचा परिणाम होणें शक्य असतें. "

" Even although women have gained in their independence, the nature of sexual love remains the same. In the act of physical union, it is the male that must play the dominant part and if the husband has sunk into the second place in

the home, as is often the case in the 20th century marriage, he is only too likely to occupy the second place also in the sphere of love. The domineering wife not infrequently possesses an impotent husband. It is his unconscious protest against his position." ( K. Walker. p.93. )

आमच्या स्त्रीवाचकांच्या ध्यानीं वरील चर्चेचें मर्म यावयास हवें. कामवासनेच्या पूर्तीच्या दृष्टीनें स्त्रीचा विनम्र स्वभाव अत्यंत योग्य असून या नम्रतेनें ती शेवटीं पुरुषास जिंकण्याचा फार संभव असतो. मग तो पुरुष कसाहि असो. विसाव्या शतकांतील स्त्री-स्वातंत्र्याच्या व समानतेच्या कल्पनांमुळें याबाबत स्त्रीचेंच नुकसान झालेलें असून, हें नुकसान सहज भरून येण्यासारखें नाहीं. पुरुषासहि येथें कांहीं बाबी ध्यानांत घ्याव्या लागतील. ज्या संस्कृतीच्या कचाट्यांतून आपली सुटका नाहीं; तेथें नवीन प्रकारच्या स्त्रीशीं आपणांस जमतें घेणें आहे. जुन्या काळीं पुरुषाच्या विवाहांतर्गत सर्व अपेक्षा स्त्रीपासून असत. तेथें स्त्री संपूर्ण विनम्र व पुरुषावलंबित असे. तो काळ गेला. स्त्रीचें शिक्षण आतां काढून घेतां येत नाहीं. तिचें आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यहि नाकारतां येण्यापलीकडचें आहे. अशा स्थितींत विवाहांतील हा दृष्टिकोन स्त्रीनें स्वतःच समजावून घेऊन स्वतःचें वर्तन शक्यतों ठेवावें व पुरुषानेंहि नवीन मनूंतील स्त्रीलाहि पुरुषापासूनच्या कांहीं अपेक्षा असतात हें लक्षांत घेऊन कांहीं तडजोडीची भूमिका घ्यावी, म्हणजे विवाहांतर्गत सुखाची गुरुकिल्ली त्यांची त्यांनाच सहज सांपडण्यासारखी आहे. ती त्यांनीं आतां प्रयत्नानें, अभ्यासानें व मोठ्या युक्तीनें हस्तगत करणें आवश्यक आहे.

रतिसुख हें विवाहांतर्गत सुखाचें एक मोठें साधन आहे. त्यांत स्त्रीचा भाग मोठा आहे एवढें मान्य केल्यावर, त्यास धरून जो ध्येयाचार भारतीयांनीं सांगितला, त्यांत पुरुषाचें प्रमोदत्व हें मुख्य मानलें असून निसर्गसिद्ध स्त्रीपुरुषस्वभावहि लक्षांत घेतलेले दिसतात. सपत्नी हा स्त्रीस सर्वांत दुःखकारक प्रसंग मानला तर या सर्व आचाराचें फल **'निःसपत्नं च भर्तारं'** 'सपत्नीशिवाय पति' हेंच दृश्य फल वात्स्यायनऋषींनीं सांगितलें आहे.

**F. भावनोद्रेकांचे शारीरिक परिणाम :** येथें असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, या सर्व मानसिक भावनांचा परिणाम शारीरिक क्रियांवर होतो कीं काय ? यास कांहीं आधुनिक शास्त्रांत प्रायोगिक पुरावा सांपडतो काय आणि याबाबत मानसशास्त्रीय व

इंद्रियविज्ञानशास्त्रीय निष्कर्ष काय आहेत ? हा सर्व विषय पुनः नाविन्यपूर्ण व गुंतागुंतीचा आहे. त्यांतील त्रोटक माहिती थोडक्यांत येथें देऊन पुढें जाऊं.

शरिरांतील ज्या अंतःस्राव ( Internal secretions ) ग्रंथींमुळें प्रौढत्व प्राप्त होतें व निसर्गतः कामोद्दीपन होत असतें त्या अंतःस्रावग्रंथींची फार मोठी विकृति उत्पन्न झाली तर तिचा शरिरावर दृश्य परिणाम होतो. आतां भीति, क्रोध वगैरे ज्या कमीजास्त प्रमाणांत प्रत्येक व्यक्तींत भावना दिसतात, त्यांच्यामुळें शरिरावर कांहीं परिणाम होतात. तसेंच या अंतःस्रावांचा आणि भावनोद्रेकांचा कांहीं संबंध दिसतो. येवढेंच नव्हे तर प्रयोगानें पाहतांहि येतो. हा विषय अलीकडेच वाढत असून प्रयोगावस्थेंत आहे तरीहि भावनोद्रेक व शारीरिक परिणाम यांचा संबंध दाखविणारा बराच पुरावा आहे. आतां हा परिणाम अंतःस्रावावर अवलंबून असेल, मज्जासंस्थेवर अवलंबून असेल किंवा सर्व एकमेकांवर अवलंबून असतील. डॉ. कॅनन यांनीं असें पाहिलें कीं, क्रोध व भीति उत्पन्न झाली तर आंतड्यांची क्रिया थांबूं लागते.

" By using X-Ray, Cannon noticed that the ordinary peristalsis stopped when the animal was in a state of rage or fear. These observations opened up the whole field of bodily response to strong emotions. Cannon's work points out that digestive disorders, heart disturbances, circulatory difficulties and glandular disfunction can result from strong affective states. " ( Cannon quoted by Madigan p. 159. )

वरील उद्धरणावरून या भावनोद्रेकांचा शारीरिक परिणामावरील अभ्यास हें एक नवीन संशोधनाचें क्षेत्र आहे. मनुष्याचीं पचनेंद्रियें, हृदय, रक्ताभिसरण आणि अंतःस्रावी ग्रंथी यांवर त्या उद्रेकांचा परिणाम होतो, असें त्यांतील उपलब्ध पुराव्यावरून सिद्ध झालें आहे. मानवी लैंगिक व्यापार हा मनसाधिष्ठित आहे, मनाचा त्यावर फार मोठा परिणाम आहे, मनसोल्हास ठेवणें हें त्यांत अत्यंत महत्त्वाचें आहे. उपरिनिर्दिष्ट भावनोद्रेक, मग ते भीति, क्रोध वा मत्सर कशामुळेंहि असोत ते स्वतःच्या व आपल्या सान्निध्यांतील दुसऱ्या व्यक्तीच्या मनाचाहि उल्हास नाहींसा करतात. त्यामुळें अंतःस्रावावर व अंतःस्रावामुळें शरिराच्या लैंगिक व्यापारावर परिणाम होणें अत्यंत सहजसुलभ आणि नैसर्गिक आहे. हे उद्रेक होऊं नयेत

म्हणून भारतियांनीं मनुष्यमात्रास किती त्याग शिकविला आहे आणि किती संस्कार उत्पन्न केले आहेत ह्याचें दिग्दर्शन मागें आम्हीं यथामति केलेलेंच आहे. मनसोल्हास हें उत्तम रतीचें एक महत्त्वाचें साधन आहे आणि उत्तम रति किंवा 'अनुपस्कृता रतिः' हा यशस्वी विवाहाचा एक महत्त्वाचा कामशास्त्रीय पाया आहे.

**संस्कृत वाङ्मयांत शृंङ्गार प्रमुख :** काव्यांत एकंदर नऊ रस आहेत असें मानतात. भक्ति हाहि पुढें एक दहावा रस गणला गेला आहे. या नऊ रसांत शृङ्गार हा रस सर्वांच्या परिचयाचा असून त्या रसांत रममाण होत नाहीं असा मनुष्य विरळा. या शृङ्गाररसाचे आल्हाद व माधुर्य हे दोन मुख्य गुण मम्मट या काव्यशास्त्रकारानें सांगितले आहेत. मनसोल्हास किंवा आल्हाद उत्पन्न करणें ही रतिसुखास अत्यंत आवश्यक अशी बाब आहे. आल्हाद उत्पन्न करणें हेंच शृंगाररसाचें मुख्य गमक. मनसोल्हास उत्पन्न करण्याकरितां स्पर्श, रस, रूप, गंधादि पंचज्ञानेंद्रियात्मक जे जे प्रकार, त्या सर्वांचा भारतियांनीं मोठा मार्मिक अभ्यास करून त्या प्रत्येकाचें शास्त्र बनवलें. याचें एक उदाहरण म्हणून 'गंधशास्त्रा' चें देतां येईल. उत्तम सुगंध मनाच्या उल्हासास आणि आनंदास कारणीभूत होतो. या भागास धरून सबंध 'गंधशास्त्र' निर्माण झालेलें दिसतें. गंधशास्त्रावर वेगळे ग्रंथहि लिहिले गेले आहेत. याबद्दल संशोधनात्मक कांहीं निबंध प्रो. गोडे यांनीं प्रसिद्ध केलेले दिसतात. यांत आणखी एक महत्त्वाची कल्पना अशी कीं, या गंधशास्त्राचाहि उद्देश देतांनां ग्रंथकारानें 'चतुर्विध पुरुषार्थ' हाच दिला असून यावरून मागें सुरवातीस दर्शविल्याप्रमाणें सर्व भारतियांनीं 'चतुर्विध पुरुषार्थ' हा आयुष्याचा एकच ध्येयात्मक आचार काव्यशास्त्रामध्यें रेखाटून दिला. शृङ्गाररसामुळें माणसाचें मन प्रफुल्लित राहून लैंगिक व्यापारांवर त्याचे अनिष्ट परिणाम होत नाहींत. हा शृङ्गाररस निर्माण करण्यास स्त्रीपुरुष-प्रीति निव्वळ वैषयिकी असून भागत नाहीं. मागें उल्लेखिलेल्या प्रीति-प्रकारांतील 'अभिमानिकी' व 'संप्रत्ययात्मिका' हे दोन प्रकार शृङ्गाररसास खरे पूरक असून, नुसत्या वैषयिकी प्रीतीनें या रसाचा भंग होतो. ही गोष्ट लक्षांत घेऊन शृंगाररसाचा बराच आविष्कार कवींनीं संस्कृत वाङ्मयांत केला असून त्यांत मनाचा आनंद व शांत रस निर्माण केला आहे. त्याचा उपयोग रतिसुखाकडे होतो हें आपण मागें पाहिलें आहेच.

**प्रतिक्रियेसंबंधीं विचार :** येथपर्यंत मन हें कामवासनेचें अधिष्ठान आहे. मनसोल्हास रतिसुखाचें महत्त्वाचें कारण आहे. भारतियांनीं हें सर्व आचारांत कटाक्षानें पाळलें आहे. हा उद्दीपनाच्या दृष्टीनें विचार झाला. नंतर प्रतिक्रिया (Response). पूर्वी दर्शविल्याप्रमाणें प्रतिक्रियेंत दोन मुख्य भाग येतात. पहिला वेग (Tumescence) आणि दुसरा समाप्ति (Detumescence). या दोन्ही भागांत जननेंद्रिय हेंच महत्त्वाचें इंद्रिय भाग घेतांना दिसलें, तरी सर्व शरिरावर व सर्व शरीरसंस्थांवर त्याचा परिणाम दिसून येत असतो.

प्रथमतः रुधिराभिसरण या संस्थेवर या प्रतिक्रियेचा मुख्य परिणाम असतो. चेहऱ्यावर लाल छटा दिसते. नाडी जलद चालू होते. हृदयाची क्रिया जलद चालते. रक्ताचा दाब वाढूं लागतो. अशा प्रकारें सर्व रुधिराभिसरण जोरानें चालू होतें. शरिराच्या तपमानावरहि (Temperature) त्यामुळें परिणाम होतो. श्वासोच्छ्वासामध्येंहि या काळांत कांहीं फेरफार दिसून येतात. त्वक्, चक्षु, श्रोत्र, जिव्हा, घ्राणादि ज्ञानेंद्रियें या वेळीं नेहमींसारखीं कार्यक्षम राहात नाहींत. त्यांची कार्यक्षमता कमी होते. एकंदर स्नायुसंस्था या कालांत मोठी ताठरपणांत येते. मज्जासंस्था मोठ्या ओझ्याखालीं दडपल्यासारखी होते. शरिरावरील हें सर्व ओझें ‘ समाप्ति ’ या भागांत नाहींसें झाल्यासारखें होतें आणि शरीर पुन्हां पूर्वस्थितीवर येऊं लागतें. या सर्व क्रियाप्रक्रियांचा शेवट रतिसुख किंवा ‘ आनंद ’ हा असतो. सुरवातीपासून या क्रियाप्रतिक्रिया जितक्या शुद्ध स्वरूपाच्या, निर्भय परिस्थितींत, एकमेकांच्या संपूर्ण साहचर्यानें आणि पूर्वविश्वाससंपादनानें घडतील, तितका हा आनंद जास्त निर्भेळ व समाधानकारक होऊं शकतो.

**रतारंभावसानिक :** रतारंभ व अवसानिक म्हणजे आरंभ व शेवट. या दोनहि गोष्टी मोठ्या मार्मिकतेनें करण्यांत या आनंदाची उत्पत्ति व टिकाऊपणा असतो. त्यांतील आरंभ मोठ्या कौशल्यानें करावा असें वात्स्यायनांनीं मुद्दाम सांगितलें आहे. कामवासना प्रथमतः स्त्री व पुरुषांत भिन्न प्रकारची असते. पुरुष हा सहज उद्दीपित होतो. याचें कारण असें कीं तो कामवासनेंत स्त्रीपेक्षां फार पुढें आहे. परमेश्वरानेंच स्त्रीपेक्षां पुरुषास जास्त मार्क देऊन ठेवले आहेत. याचा एक परिणाम असा होतो कीं, स्त्रीवर ब्रह्मचर्याचा

प्रसंग अनिच्छेनें आल्यास त्याचा तिला पुरुषाइतका त्रास होत नाहीं. शिवाय तिला ही वासना ( urge ) दुसऱ्या बाजूस वळविणें झाल्यास पुरुषापेक्षां जास्त सोपें असतें. मग ती बाजू समाजहिताची असो वा दुसऱ्या स्त्रीचें मूल सांभाळण्याची हौस असो.

यामुळें आरंभ कसा करावा हें कळणें जरूर आहे. याबाबत धसमुसळेपणा, घाई आणि अनिश्चित वातावरण कामाचें नाहीं. सुरवातीस विश्वास व आतुरता उत्पन्न करणें अत्यंत अगत्याचें असतें. हें करण्यांत पूर्वनिर्दिष्ट सर्व ज्ञानेंद्रियांची योग्य मदत मोठ्या कौशल्यानें घेतली पाहिजे. यांत उत्तम संभाषण येईल, चांगल्या कथांचा त्यांत उपयोग असेल, पूर्वपरिचित व आनंदानुभवाच्या गोष्टी असतील, हृदयभेदी नव्हे तर हृदयस्पर्शी मार्मिक विनोद असेल, गूढ संभाषण असेल, कांहीं वेळां कांहीं जरूर व पचेल एवढी अश्लीलताहि असेल. या सर्व गोष्टींनीं अनुराग व प्रीति उत्पन्न करतां येते. याबाबत लज्जा हें स्त्रीस मोठें भूषण आहे. पुरुषास आपल्याकडे खेचण्यास तें मोठें अमोघ अस्त्रच आहे म्हटलें तरी चालेल. स्त्रीची सलज्ज मुद्रा व दृष्टि ही जशी पुरुषास आकर्षक, तशी पुरुषाची कौशल्याची, विश्वासाची व मार्दवाची वर्तणूक या कालांत स्त्रीस आकर्षक असते. सलज्ज व मृदुभाषिणी स्त्री व मार्मिक विनोद आणि चारुवाक् पुरुष हे या आरंभांतील मोठे निश्चित प्रगतीचे मार्ग होत. वात्स्यायन लिहितात,

“ **पूर्वप्रकरणसंबद्धैः परिहासानुरागैः वचोभिः अनुवृत्तिः** ॥ का. सू. २.१०.३

याप्रमाणें अनुराग उत्पन्न झाल्यावर रूप, रस, गंधादि ज्ञानेंद्रियांचा उपयोग येतो. यांत सुंदर फुलांचा उपयोग येईल, आकर्षक वेशभूषा येतील, उत्तम सुगंधांचा उपयोग असेल, तांबूलादि द्रव्यांचें सेवन असेल, वगैरे. यानंतर स्पर्शविशेष येतात. स्त्रीमध्यें शरिराचे कांहीं भाग रागोत्पादक आहेत. यांत चुंबनालिंगनादि प्रकार येतात. याचें जास्त वर्णन या ग्रंथांत कर्तव्य नाहीं. या सर्व गोष्टींचा स्त्रीस उत्तेजित करण्यास उपयोग होतो. कारण, स्त्रीचें उत्तेजनच पुरुषापेक्षां कठिण असतें हें मागें दर्शविलेंच आहे. या सर्व खालील गोष्टी एकाच श्लोकांत गोवलेल्या दिसतील.

**परस्परप्रीतिकरैः आत्मभावानुवर्तनैः ।**
**क्षणात्क्रोधपरावृत्तैः क्षणात्प्रीतिविलोकितैः॥** का. सू. २.१०.११

स्त्रीचें उद्दीपन यथास्थित झाल्याशिवाय शेवटचा आनंद तिला होणें कठिण

असतें. शिवाय तिचें साहचर्य पुरुषास अगत्याचें असल्यानें स्त्रीचें यथोचित उद्दीपन करणें हिताचें ठरतें.

**आनंदमय समाप्तिमध्येंहि स्त्रीपुरुषभिन्नता :** स्त्री व पुरुष यांच्या शेवटच्या आनंदमय (Orgasm) समाप्तींत फरक आहे. यास वात्स्यायनांनीं वापरलेला 'रतावसानिक' सुख (Orgasm) असें मार्मिक नामाभिधान केलें आहे. अर्थात् वात्स्यायनांनीं हा शब्द बरोबर समाप्तिकालाचा आनंद (Orgasm) अशा अर्थानेंच वापरलेला आहे, असें आम्हांस अभिप्रेत नाहीं. आतां याबाबत स्त्रीपुरुषभेद काय आहे तें पाहूं. पुरुषाबाबत हा आनंद समाप्तीच्या वेळीं वीर्योत्सर्जनाच्या वेळींच येतो. तो निश्चित असतो, झटपट असतो. पण स्त्रीबाबत तसें नाहीं. स्त्रीस तो येण्यास विलंब लागतो. त्याचा संबंध बरोबर जननेंद्रियाच्या कोणत्या कार्याशीं आहे हें अजून गुपितच आहे. तो स्त्रीमध्यें दर लैंगिक व्यवहाराच्या वेळीं उत्पन्न होईलच असें नाहीं. त्याचा गर्भधारणेशीं साक्षात् किंवा अपरिहार्य संबंध आहे किंवा नाहीं हें एक गूढच आहे. सबंध वैवाहिक जीवनांत हा अनुभव कांहीं स्त्रियांना एकदोन वेळांच येऊं शकतो, तर कांहींना पुष्कळ वेळां येतो. यावरून हा अनुभव विवाहाच्या प्रथम वर्षांत कांहीं स्त्रियांना येत नाहीं. एवढ्या तुटपुंज्या गोष्टीवर डॉ. किन्से साहेबांनीं रचलेलें व पूर्वीं आम्हीं खंडन केलेलें केवळ अतिरंजित भारूड आहे हें सहज कोणासहि दिसून येण्यासारखें आहे. या भिन्नत्वामुळें रतिसुखाचा आनंद उत्पन्न करण्यास पुरुषास कांहीं युक्ति वा कौशल्य वापरणें जरूर आहे. कित्येक वेळां "आमच्या स्त्रींत कांहीं भावनाच नाहीं." असें म्हणणारे लोक आढळतात. त्याचा अर्थ स्त्री जरी भावनेबाबत मागासलेली आहे असें धरलें तरी पुरुष जर कुशलता दाखवील व तिला उद्दीपित करील तर तिच्यांतून योग्य तो आनंद उत्पन्न करूं शकेल.

**कामवासनेचें मूलतः वैविध्य :** येथें कामवासनेसंबंधीं एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. निसर्गनिर्मित, मूलभूत विविधता मनुष्यप्राण्यांत फार भिन्नता उत्पन्न करूं शकते हें लक्षांत न घेतां सर्वांना सारखेपणानें पाहणें व एकाबाबत जें अमृत तें दुसऱ्याचें विष असूं शकतें हें न उमजणें, यामुळें पुष्कळच

गोंधळ उत्पन्न होऊं शकतात. मानवेतर प्राण्यांत कामवासना वर्षांतील कांहीं विशिष्ट कालावधींतच निर्माण होते व त्यांतच त्या वासनेची समाप्ति होते. याच कालांत मानवेतर प्राण्यांत प्रजोत्पादनहि घडत असतें. मानवेतर प्राण्यांत प्रजोत्पादन व कामवासना यांचा काल साधारणतः एकच असतो. वासना हें साधन व प्रजोत्पादन हें तिचें साध्य या साधनसाध्याची जोडी मानवेतर प्राण्यांत पुष्कळ अबाधित असते. परंतु मनुष्यांत तसें नाहीं. मनुष्याची कामवासना जाज्वल्य असून तिचा प्रजोत्पादनाशीं साध्यसाधनभाव जरी अबाधित असला, तरी दोघांचें नेहमीं साहचर्यच असतें असें नाहीं. मनुष्याची कामवासना ही प्राण्यांप्रमाणें वर्षांतील कांहीं विशिष्ट कालांत उत्पन्न होणारी नव्हे. ती कालानुरूप कमीजास्त होईल. हॅव्‌लॉक एलिस साहेबांनीं असा थोडा पुरावा आणला आहे कीं, पुरुषाच्या अनिच्छेनेंहि वसंत ऋतूंत कामवासनेस जोर चढतो. स्त्रीमध्यें तसेंच होतें कीं काय न कळे. संस्कृत वाङ्मयांतहि वसंत व रति यांचा संबंध गृहीत धरलेला दिसतो. एक गोष्ट सत्य, कीं मनुष्यप्राण्याची कामवासना प्रखर असून ती निरनिराळ्या व्यक्तींत फार विविधतेनें आढळते. हें वैविध्य एवढें आहे कीं, एखाद्या व्यक्तीस ही वासना त्याच्या आयुष्यभर तो कसल्याहि परिस्थितींत असला तरी गरगर फिरवूं शकेल, तर दुसऱ्यास या वासनेची पूर्ति झाली न झाली सारखेंच राहील. एखाद्याचें सबंध आयुष्य ही वासना निश्चित वा अनिश्चित, सुखकर वा दुःखकारक करूं शकेल, तर दुसऱ्याचें आयुष्य यामुळें फारसें वरखालीं होणार नाहीं. येथें हें पण नमूद करणें प्राप्त आहे कीं या कामशक्तीचा संबंध सर्वस्वीं मनुष्याच्या शारीरिक शक्तीशीं नाहीं. शारीरिक आरोग्य हें या वासनेस मूळ कारण आहे पण आरोग्य व शारीरिक पैलवानी या गोष्टी एकच नव्हेत. पैलवानांना ही कामशक्ति फार मोठी असते असें म्हणणें रास्त होणार नाहीं. ही शक्ति मनुष्याची मानसिक घडण ( Psychological make-up ) आणि त्याच्या शरिरांतील अंतःस्रावाची स्थिति ( Endocrine pattern ) यांवर अवलंबून असावी असा तर्क आहे. 'ही घडण प्रत्येक व्यक्तींत ज्या भिन्नत्वानें आढळते त्याच भिन्नत्वानें कामवासनाहि आढळते. पुरुषाची कामवासना स्त्रीपेक्षां बलवत्तर असते आणि प्रत्येक व्यक्तींत ती पुनः विविधतेनें आढळते, हें लक्षांत घेतलें तर मनुष्य प्रत्येक व्यक्तीच्या एतत्संबंधीं वर्तणुकीचा विचार करतांना थोडा सहिष्णुतेचा दृष्टिकोन दाखवील. वेश्याव्यवसायासारखे मानवतेवरील शाप हे अशा गोष्टींतून उत्पन्न झालेले दिसतील.

श्रीमंत लोकांची ऐष-आरामी वृत्ति यांतूनच उद्भवलेली दिसेल. पुरुष व स्त्री यांचे सर्व सामाजिक संबध हे कांहीं ठिकाणीं लैंगिक व्यवहारांत परिणत होतात, याचाहि पाया याच गोष्टींत असलेला दिसेल. वयांत आलेलीं मुलें कांहीं वेळां एखाद्या कामचेष्टेंत सांपडून अविचार करतात, याचें मूळ कारणहि यांत सांपडेल. तात्पर्य, सर्व धर्मविरुद्ध कामाचा पाया याच एका नैसर्गिक सत्यावर आधारलेला आहे. या सर्व गोष्टी कायदे करून चुटकीसरशा नाहींशा होणाऱ्या नव्हेत. तिकडे दुर्लक्ष केलें म्हणजे संपलें, ही पण चूकच आहे. अनिष्ट गोष्ट वाटली तर डोळेझांक करावी यानेंहि हा प्रश्न सुटणार नाहीं. आंधळेपणानें पाश्चिमात्यांचें अनुकरण येथें केलें म्हणजे सर्व सुधारेल असेंहि समजून बसणें चुकीचें होईल. तर धर्म्य काम व धर्मविरुद्ध काम यांच्या योग्य मर्यादा ओळखून धर्म्य कामाची सर्वांची भूक जितकी चांगल्या मार्गानें भागेल, यशस्वी विवाह जेवढे जास्त होतील, नैसर्गिक विविधता लक्षांत घेऊन त्याकरितां जेवढी पद्धतशीर सोय करतां येईल, संस्कार जितके जास्त योग्य व बळकट राहतील आणि एकंदर मनुष्यसमाजाच्या कामपुरुषार्थाच्या मूलभूत समाधानांत जेवढी इष्ट भर पडेल तितका धर्मविरुद्ध काम कमी होईल. ही शक्ति जेव्हां योग्य मार्गानें खर्च होईल तेव्हां अयोग्य मार्ग आपोआप कमी होतील. अर्थात्, सर्व धर्मविरुद्ध काम जगांतून कधीं नाहींसा होईल असली खुळचट कल्पना आमच्या मनास कधींहि शिवली नाहीं. पण कामपुरुषार्थाचा लाभ जास्तींत जास्त सर्वत्रांना व्हावा, हा एकच मार्ग धर्मविरुद्ध काम काबूंत ठेवण्यास समर्थ आहे आणि या मूलभूत दृष्टीनें वरील प्रश्नांचा विचार करावयास हवा.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४६५० वि: Misc
क्रमांक ... नों: दि: ...

# प्रकरण ६ वें

## पक्षवृद्धि

### ( व्यक्तिमत्त्वाचें एकीकरण )

**व्यक्तिमत्त्वाची घडण — समाजांतील आद्य घटक कुटुंब — संस्कारपरंपरा — भारतियांचे निश्चित ध्येयाचार — मूल्यविचार — मनुस्मृतिप्रणीत स्त्री-आचार — कामसूत्रकारांची मतप्रणालि — भारतियांचा मूल्यविचार.**

वैवाहिक यशाचें तिसरें साधन 'संबंधः' 'पक्षवृद्धिः' या शब्दप्रयोगांनीं कामसूत्रकारांनीं वर्णन केलेलें दिसतें. स्त्रीस पितृगृहापासून दूर जाऊन पतिकुलाशीं संपूर्ण समरस व्हावयाचें असतें. याकरितां वरपक्ष व वधूपक्ष यांची परस्परांशीं वागणूक कशी असावी, वधूची वागणूक नवीन घरीं कशी पाहिजे; पति, त्याचा मातापितरादि परिवार आणि मित्रमंडळी यांच्यासंबंधीं नववधूनें काय दृष्टिकोन ठेवावा, इत्यादि सूक्ष्म विचार वात्स्यायनानें दिला असून, काव्य व परंपरा यांतहि भारतियांचें हें शास्त्र शेंकडों वर्षें गुंफलें गेलें आहे. सर्व आचाराचा परिणाम शेवटीं वरपक्षाचें स्थैर्य, श्रेय, मान, कुल व ऐश्वर्य यांची वृद्धि होण्यांत घडत असल्यानें वात्स्यायनांनीं 'पक्षवृद्धिः' या एकाच शब्दांत हा सर्व अर्थ एकत्र आणलेला दिसतो. या शब्दावरील टीकेंत **'स्वपक्षस्य वृद्धिः, पक्षांतरलाभात्'** असेंच स्पष्टीकरण दिलेलें असून पक्षांतर झाल्यानें आपल्या नवीन पक्षाची वृद्धि असाच त्याचा अर्थ आहे.

अर्थात् स्त्रीच्या दृष्टीनें हा सर्व बदल जास्त महत्त्वाचा ठरतो. पुरुष आपल्याच घरीं असतो. त्याच्या पक्षाला येऊन मिळणारी नवी व्यक्ति, नवीन परिस्थितीशीं कितपत एकरूप होते हें महत्त्वाचें आहे. म्हणून या सर्व बदलांत व्यक्तिमत्त्वाचे

नानाविध प्रश्न येतात. या व्यक्तिमत्त्वाच्या नानाविध प्रश्नांचा विचार भारतियांनीं काय केला होता, व्यक्तिमत्त्वासंबंधींच्या हल्लींच्या ज्ञानानें त्यावर कांहीं प्रकाश पडतो कीं काय इत्यादि विचार या प्रकरणांत आहे.

विवाहबद्ध झालेल्या दोन व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाची योग्य जुळणी झाली तर वैवाहिक यशांत निश्चित भर पडते. दोन व्यक्तींच्या दैनंदिन मतभेदांत संसाराचा गाडा हांकणें कठिण तर होतेंच, पण वैवाहिक यश व गृहसौख्य यांस त्यानें बाध आल्याशिवाय राहात नाहीं. तेव्हां पुढील विषय विवेचिण्यापूर्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे काय, व्यक्तिमत्त्वाची घडण मुख्यतः कशावर अवलंबून आहे, कुटुंब ही समाजांतील आद्य संस्था कशी, या गोष्टींचा प्रथम थोडा विचार करावा लागेल.

**व्यक्तिमत्त्वाची घडण :** व्यक्तिमत्त्वासंबंधीं सुटसुटीत व साधी व्याख्या करणें कठिण आहे. परंतु अशी व्याख्या करतां आली नाहीं तरी या शब्दानें दुसऱ्या व्यक्तीबद्दलचें साकल्यानें ज्ञान आपणांस होतें हें खरें. कोणत्याहि व्यक्तीचा सर्व गुणदोषसमुच्चय या एका शब्दानें दर्शविला जातो. त्याच्या संवयी, वासना, इच्छा, महत्त्वाकांक्षा, कर्तृत्व, स्वतःबद्दल व जगाबद्दल कल्पना, सत्यासत्य किंवा बरेंवाईट यांसंबंधीं विचार, त्याचे हेतु व ध्येयें, त्याचीं मूल्यें व दोष हे सर्व भाव व्यक्तिमत्त्व या एका शब्दानें प्रतीत होत असून, त्याची प्रचीति त्या त्या व्यक्तीच्या आचारांत आणि वर्तणुकींत प्रत्यक्ष येत असते. यावरून व्यक्तिमत्त्वास दोन बाजू आहेत. एका बाजूस व्यक्तीचे अंतर्गत हेतु, ( Motivations ), ध्येयें ( Goals ) व मूल्यें ( Values ) यांना धरून असलेला भाग आणि दुसरा बाह्य भाग म्हणजे त्या व्यक्तीच्या वर्तणुकींत व आचारांत (Bebaviour affecting others) प्रत्ययास येणारा. हे दोन भाग नीट समजण्यास व्यक्तिमत्त्वाची घडण होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत होतात हें प्रथम पाहावें लागेल.

व्यक्तिमत्त्वाच्या घडणीस मुख्यतः तीन प्रकारची सामग्री उपयोगांत येत असते. ( १ ) आनुवंश ( Heredity ), ( २ ) परिस्थितिजन्य भाग ( Environment), ( ३ ) व्यक्तीचे स्वतःचे विशिष्ट अनुभव ( Unique experiences ).

कोणाचेंहि व्यक्तिमत्त्व या तीन प्रकारचा कच्चा माल घेऊन तयार होत असतें. आनुवंशिक गुण एका पिढींतून दुसऱ्या पिढींत संक्रांत होत असतात हें

खरें असलें तरी त्यांचा प्रत्यक्ष विकास घडण्यास परिस्थितीची जोड लागते. गर्भावस्थेंतहि मातेची शारीरिक परिस्थिति गर्भावर परिणाम करीतच असते. तेव्हां गर्भावस्थेपासूनच मनुष्यप्राणी हा आनुवंश व इतर कांहीं परिस्थिति यांच्या परस्पर झगड्यांतून तयार होत असतो. जन्मानंतर व्यक्तिमत्त्वाची उत्क्रांति अशीच बाह्य परिस्थिति व आनुवंश यांच्या परस्परसंघर्षातून उत्पन्न होत असते. व्यक्तीचें आरोग्य कसें आहे हें सर्वच ठिकाणीं मूळ कारण असूं शकतें. कांहीं शारीरिक व्यंगें सुरुवातीसच असल्यास त्यांचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम होणें अपरिहार्यच असतें. परंतु हें सर्व व्यवस्थित आहे असें धरून चालल्यास, बाह्य परिस्थितीमध्यें व्यक्ती-व्यक्तींतील संबंध ( Interpersonal relations ) हे व्यक्तिमत्त्वाच्या घडणीस अत्यंत महत्त्वाचे समजले जातात.

" Personality development is the product primarily of interpersonal processes. " ( R. L. Sutherland p. 200 )

व्यक्तीव्यक्तींतील संबंध मानवाच्या जन्मापासून सुरू होतात. प्रथमतः तो कुटुंब या संघांत उत्पन्न होत असल्यानें आई-मूल हा प्रथम, मातापिता-मूल हा दुसरा, भाऊबहीण हा तिसरा, सवंगडी हा चवथा, अशा तऱ्हेनें मनुष्याच्या वाढीबरोबर हे संबंध संख्येनें जसे वाढतात, तद्वतच ते गुंतागुंतीचेहि होत असतात. शाळेंत विद्यार्जन करतांना गुरुशिष्यसंबंध, नंतर चरितार्थसाधनांतील नोकर–मालकसंबंध, महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीतील ईर्ष्या-असूयात्मक संबंध, अशा तऱ्हेनें ही गुंतागुंत वाढत जाते. पण सर्वांच्या बुडाशीं दोन वा अधिक व्यक्तींचे संघ असतात. कुटुंब हा त्यांतील पायाभूत ( Primary group ) संघ. याशिवाय इतर सर्व दुय्यम ( Secondary group ) संघ मिळून ' समाजशास्त्र ' हें संघाचें शास्त्र बनतें. त्यांत क्रमशः कुटुंब, समाज, जात, राष्ट्र व अखेर जगहि येतें. संघ हा समाजशास्त्राचा मूळ पाया. त्याचा अभ्यास हीच या शास्त्राची मूळ प्रवृत्ति आणि हेंच त्या शास्त्राचें एक ध्येय. प्रो. सदरलंड म्हणतात,—

" Social groups belong to the Sociologists just as rocks belong to the geologists and stars to astronomers. "

ज्योतिषशास्त्राचा ग्रहताऱ्यांवर जितका हक्क आहे; दगड-खडकांवर भूगर्भशास्त्राचा जितका हक्क आहे; तितकाच ' संघ ' या घटनेवर समाजशास्त्राचा आहे. स्वतः व्यक्तीच्या कल्पना, वासना, ध्येयें, मूल्यें व संवयी यांवर मुख्यतः या दुसऱ्या

व्यक्तीशीं आलेल्या संबंधांचाच परिणाम होत असल्यानें व्यक्तिमत्त्वाचा हा अंतर्गत भाग पुष्कळसा याच गोष्टींवर अवलंबून असतो. कुटुंब या संबंधापासून मग शाळा, धंदा आणि इतर कलाविलासादि व्यवहारापर्यंत व्यक्तिमत्त्वाची वाढ होत राहणार. कुटुंब, शाळा, धंदा व इतर व्यवसाय या कोणत्याहि ठिकाणीं व्यक्तीचे परस्परसंबंध हें एकच महत्त्वाचें तत्त्व व्यक्तिमत्त्वाच्या घडणींत कार्य करीत असतें. या सर्व संबंधांत शेवटीं व्यक्तीचे स्वतःचे असे विशेष अनुभव गोळा होत असतात. याप्रमाणें आनुवंश, बाह्य परिस्थितिजन्य संबंध व विशेष अनुभव यांतून व्यक्तीचे एकंदर दृष्टिकोन, कल्पना, वासना, मूल्यें, महत्त्वाकांक्षा आणि हेतु तयार होऊन प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व तयार होत असतें.

वरील विवेचनावरून कुटुंब ही संस्थाच व्यक्तिमत्त्वाच्या घडणीस सर्वांत प्रमुख व महत्त्वाची ठरते. कारण येथेंच या सर्व उत्क्रांतीचें मूळ असून वयाचीं पहिलीं वर्षेंच मूर्ति घडण्यास महत्त्वाचीं ठरतात. आईबापांचा यांत फार मोठा वांटा असतो. त्यांच्यांतील द्वेष, प्रेम, मत्सर, भांडणें, मतभेद, हेवेदावे, वागण्याची रीत कल्पना या सर्व गोष्टी या लहान वयांत कळत नकळत मुलांत संक्रांत होत असतात. यामुळें कुटुंब कसें राखावें, त्यांत रीत कशी असावी, आईबापांचें नातें कसें असावें या सर्व गोष्टींचा सूक्ष्म विचार येथें सहजच प्राप्त होतो.

**समाजांतील आद्य घटक कुटुंब :** कुटुंब हें समाजाचा एक आद्य घटक आहे. ही संस्था गुणवान् व कर्तृत्ववान् व्यक्ति निर्माण होण्याकरितां अत्यंत महत्त्वाचें साधन आहे. हें महत्त्व कालाच्या ओघांत टिकाव धरून राहिलेलें असून, कोणत्याहि नव्या सामाजिक बदलानें तें कमी झालेलें नाहीं. कुटुंब हा कमींत कमी दोन व्यक्तींचा संघ असून इतर कोणत्याहि संघास जीं संघटनेचीं मूलतत्त्वें लागू पडतील तीं येथेंहि लावणें अपरिहार्य ठरतें.

एकापेक्षां अधिक व्यक्ति एकत्र येतात तेव्हां त्या संघास कांहीं संघटनेचीं मूलतत्त्वें लावावीं लागतात. संघटना ( Organisation ) हें एक मोठें विचार करण्यासारखें शास्त्र आहे. व्यक्ति ही एकटी सहसा कधींच कोणत्याहि सामाजिक घटनेंत राहूं शकत नाहीं, म्हणून संघटनेचीं हीं मूलतत्त्वें समजणें महत्त्वाचें ठरतें. संघ ही मानवाची आणि इतर कित्येक प्राण्यांचीहि सहजप्रवृत्ति आहे. जे प्राणी संघ

करून राहतात, त्यांमध्यें या संघटना कांहीं विशिष्ट तत्त्वांवरच चालू राहतात. मुंगी, मधमाशी वगैरे अनेक संघटनाक्षम प्राणी असून, या प्राण्यांच्या संघटनेवरचीं निरीक्षणें प्रसिद्ध झालेलीं आहेत. मनुष्य हा असाच संघशील प्राणी आहे. मानव समाजांतील अत्यंत महत्त्वाची पण अत्यंत लहान प्रमाणांत अशी संघटना म्हणजे ' कुटुंब ' होय. हींत कमींतकमी दोन भिन्न लिंगांच्या व्यक्ति एकत्र येतात व राहतात. त्या दोन वा दहा असोत; संघटनेचीं तत्त्वें वापरल्याशिवाय त्यांचा संघ कार्यक्षम होणारच नाहीं. मनुष्यानें मोठी बुद्धि खर्च करून व कित्येक शतकें अनुभव घेऊन त्यांत सुधारणा करीत करीत आज जी सर्वांत मोठी व सर्वोत्तम संघटना निर्माण केली ती म्हणजे ' सेना '. पण परमेश्वरानें याहिपेक्षां मोठी व सर्वोत्तम संघटना निर्माण करून मनुष्यास तिच्यांतील तत्त्वांचा अभ्यास करण्याचें व ती समजावून घेऊन वागण्याचें जणूं आव्हान दिलें आहे. ती संघटना म्हणजे मानवी शरीर. या सर्व संघटनांत मूलतत्त्वें सारखींच. लहान कुटुंब, मोठें कुटुंब, संस्था, समाज, राष्ट्र, सेना अशी कोणतीहि संघटना असो वा मानवी शरीर असो, हीं मूलभूत तत्त्वें डावलून कांहीं भ्रामक तत्त्वांवर, व्यक्तिगत स्वार्थावर, भावनावशतेवर किंवा राजकीय तत्त्वज्ञानाच्या भांडवलावर भलतीं तत्त्वें संघटनेंत घुसडलीं गेलीं, तर त्या व्यक्तींचें आणि त्या कार्याचें नुकसान ठरलेलें. शेवटीं अशी संघटना निष्क्रिय होऊन लयास जाणें हेंच त्या संघटनेचें नशीब, असा निसर्गाचा सिद्धांत दिसतो. ही तत्त्वप्रणाली मुख्यत: तीन भागांत वर्णन करतां येईल.

(१) प्रथमत: प्रत्येक संघटनेला कांहीं निश्चित ध्येय वा हेतु असावा लागतो. या मूळ तत्त्वाला धरूनच प्रत्येक संस्थेला आपलें हेतुकथन ( Object ) प्रथम करावें लागतें असा नियम आहे किंवा ही कायदेशीर गरज मानवी कर्तृत्वाचीं नसून प्रत्येक संघटनेंत कांहीं हेतु वा ध्येय अभिप्रेत असतें हें पाहूनच मानवानें हा नियम बांधला. सेनेचें ध्येय आणि हेतु निश्चित असतात.

शरिरांतीहि निरनिराळ्या घटकावयवांचें एकीकरण, एका शरिराची कार्यक्षमता आणि संरक्षण या मूलभूत ध्येयास धरून झालेलें असतें. हें ध्येय वा हेतु जर सुस्पष्ट नसतील, तर त्या संघटनेंत दोष उत्पन्न होतो. कुटुंबाच्या दृष्टीनें असें ध्येय वा हेतु असणें शक्य असतें कीं नाहीं याचा संपूर्ण विचार करून, ध्येय निश्चिति असल्याशिवाय संघटना कायम टिकविणें व्यर्थ आहे हें लक्षांत आणून, भारतियांनीं कुटुंबाचें निश्चित ध्येय ' सुप्रजा ' हें स्पष्टपणानें, नि:शंकवृत्तीनें, कोणतीहि धरसोडवृत्ति न

ठेवतां, कोणाचीहि भीडमुर्वत न बाळगतां सांगून टाकलें. पाश्चिमात्यांना विवाहास ध्येय असावें, त्यांतल्यात्यांत हें ध्येय ठीक दिसतें, वगैरे विचार अलीकडेच सुचूं लागले आहेत. संघप्रवृत्तीची कारणमीमांसा करतांना डॉ. पार्क म्हणतात,

"We may apply the term 'Social' to any group of individuals, which is capable of consistant action......consciously or unconsciously directed to a common end."

( R. E. Park. p. 42 )

जाणतेपणानें किंवा नेणतेपणानें व्यक्तींचें कार्य एका हेतूनें प्रेरित झालें म्हणजे तो संघ तयार होतो.

( २ ) यानंतर दुसरा भाग म्हणजे संघटनेंत जे घटक असतात, त्यांत ध्येयास धरून आणि घटकांच्या प्रकृतीस धरून कांहीं कार्यविभागणी ( Division of Labour ) करावी लागते. ही कार्यविभागणी मुख्यतः घटकांच्या गुणधर्मांवर असावी, हें तत्त्व सर्वत्र चांगल्या संघटनांतून अत्यंत कटाक्षानें पाळलें जातें. हें न पाळलें तर पुनः संघटनेंत दोष उत्पन्न होऊन, त्याचा परिणाम संघटनेच्या कार्यक्षमतेवर व शेवटीं नाशांत ठरलेला असतो. शरिरांत जे निरनिराळे घटक असतात, त्यांची योजना त्यांच्या गुणकर्मांवर आहे. मेंदू आणि मज्जासंस्था यांचा कारभार व कार्य, त्यांतील पेशींचे गुण व कार्य ( Structure and function ) यांवर अवलंबून आहे, तर स्नायुसंस्थेचा कारभार तिच्यांतील घटक पेशींच्या गुणधर्मांवर अवलंबून आहे; स्नायुसंस्थेंतील पेशी मज्जासंस्थेंतील पेशींचा व्यवहार करूं म्हणंतील, तर परमेश्वरानें तें अशक्य करून ठेवलें आहे. सेनेमध्येंहि हेंच तत्त्व उपयोगांत येतें. सेनेंत शिरतांनाच व्यक्ति सेनेच्या कोणत्या शाखेंत जाण्यास योग्य ठरेल, याची चांचणी घेतात. त्या शाखेचें त्या व्यक्तीस शिक्षण मिळतें व नंतर त्या शाखेंतच मरेपर्यंत त्या व्यक्तीस राहावें लागतें. तेथें व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं, मतस्वातंत्र्य नाहीं, लोकशाही नाहीं, कांहीं नाहीं. यामुळेंच त्या संघटना कार्यक्षम ठरल्या आहेत. तात्पर्य, संघटनेंतील घटकास त्याच्या गुणधर्माप्रमाणें कार्यक्षेत्र द्यावयास हवें. त्या व्यक्तीनेंहि त्या कार्यक्षेत्रांतच निपुणता प्राप्त करून घेऊन, त्या क्षेत्रांतील उच्चांक गांठण्याचा प्रयत्नहि केला पाहिजे. दुसऱ्या व्यक्तीच्या क्षेत्रांत मला कार्य करतां येत नाहीं, याबद्दल कमीपणा मानावयाचें कारण नाहीं. कुटुंब या संघटनेंत स्त्री व पुरुष हे मुख्य घटक असल्यानें त्यांचें गुणधर्मांप्रमाचें भिन्न कार्यक्षेत्र

असावें, असा भारतियांचा आग्रह. यांत स्त्री कमी, पुरुष जास्त असा भेदाभेद नसून या दोन घटकांची ही संघटना स्थिर होऊन, कार्यक्षम होऊन, निश्चित ध्येय-प्राप्तीप्रत जावी, या शुद्ध उद्देशानें हें तत्त्व भारतियांनीं कुटुंबसंस्थेस लावलें. यांत त्यांची दूरदृष्टि व मार्मिकपणा दिसतो कीं, त्यांची असहिष्णु बुद्धि दिसते हा विचार वाचकांनींच करावा. प्रो. सदरलंड इत्यादि समाजशास्त्रावरील ग्रंथकार संघाचे गुण वर्णन करतांना स्पष्ट लिहितात कीं, "संघाचें एकीकरण दृढतर करण्याकरितां, त्यास स्थिर भाव आणण्याकरितां ज्या कांहीं गोष्टींची जरुरी आहे त्यांत श्रमविभागाचें तत्त्व अंमलांत आणलें जातें."

"Some plan of dividing responsibility among various functionaries." (R. L. Sutherland. p. 238)

वरील उद्धरणावरून संघटनेचें हें मूलतत्त्व संघाच्या स्थितिभावास कसें जरुरीचें आहे, हें सहज लक्षांत येईल.

(३) यानंतर तिसरा महत्त्वाचा भाग म्हणजे या संघांतील निरनिराळ्या घटकांत कांहीं निश्चित सहकार्य ( Co-operation ) असण्याची जरुरी आहे. हें सहकार्य अर्थातच मुख्य ध्येयास धरून असायला हवें, हें सहजच आहे. घटकावयवांत हें साहचर्य नसल्यास संघ बेताल होईल, संघटनेंत दोष उत्पन्न होतील आणि घटकांची स्पर्धा उत्पन्न होऊन संघ नाश पावेल. स्पर्धा ( Competition ) हें तत्त्व संघांतील घटकावयवांत थोडें असतें. सहकार्य ( Co-operation ) हेंच मुख्य असतें. कुटुंब या संघास हें तत्त्व सर्वांशीं लागू आहे. त्यांत स्पर्धा हा भाव बिनजरुरीचा आणि दोषास्पदच होतो. उलट सहकार्य हें कुटुंबास निश्चित प्रगतिपथावर आणून ठेवतें. मॉर्टन डुश यांनीं स्पर्धा ( Competition ) आणि साहचर्य ( Co-operation ) यांचे परिणाम काय असतात, यासंबंधीं कांहीं प्रयोग विद्यार्थ्यांवर करून असें दाखविलें आहे कीं, साहचर्य हीच गोष्ट स्पर्धेपेक्षां ध्येयसिद्धीस फार उपकारक ठरते.

"It seems evident that greater group or organisational productivity will result when the members are co-operative rather than competitive in their interrelationships. The inter-communication of ideas, the co-ordination of effects friendliness and pride in one's group, which are basic to group

harmony and effectiveness appear to be disrupted when members are themselves competing for mutually exclusive goals. Further, there is some indication that comptitiveness produces greater personal insecurity than does co-operation."

( Morton Deutsch, pp. 199-231, 1949. )

वरील उद्धरणाचा अर्थ असा कीं साहचर्यानें मित्रभाव, स्वसंघासंबंधीं स्वाभिमान, मूळ ध्येयास धरून प्रयत्नांचें एकीकरण, इत्यादि संघास बळकटी आणणारे गुण तर वाढीस लागतातच पण स्पर्धेनें उलट घटकावयवांस स्वतःसंबंधीं मोठी काळजी उत्पन्न होते. आतां समाजांतील संघासंघांत कांहीं स्पर्धा नसावीच किंवा नसतेच असा याचा अर्थ नव्हे. स्पर्धा पण मर्यादेपलीकडे जाऊं नये. संघांतर्गत स्पर्धेचा कुटुंबांत फारच थोडा उपयोग असतो. उलट, साहचर्य हें नेहमीं गुणसंवर्धनास उपयोगी तत्त्व असून, संघास स्थिर भाव व ध्येयप्राप्ति करून देण्यास जास्त समर्थ आहे हें निश्चित. कुटुंबांतील स्त्रीपुरुषांत विशेषतः साहचर्य हेंच तत्त्व अत्यंत उपयोगाचें आहे. येथें स्पर्धेला जवळजवळ वाव नाहींच म्हटलें तरी चालेल. सहकारवृत्तीशिवाय कुटुंबास स्थिरता नाहीं तर ध्येयसिद्धि कोठून येणार? संघटनेचीं उपरिनिर्दिष्ट मूलतत्त्वें कुटुंबसंस्थेस लागू करण्याचा विचार करतांना स्त्रीपुरुषांमधील सर्व प्रकारची भिन्नता लक्षांत आणावी लागेल. प्रजोत्पादन हा मूळ निसर्गाचा हेतु लक्षांत घेतां, स्त्रीपुरुषांतील सर्व भिन्नता या मूळ मुद्याला धरूनच आहे. शारीरिक व मानसिक दृष्ट्या स्त्री व पुरुष हे कोणत्याहि प्रकारें स्पर्धा करणारे ( competitive ) घटक नसून ते संपूर्णपणें एकमेकांस पूरक ( complementary ) आहेत. पुरुष जास्त चलस्वरूप ( active ) आहे तर स्त्री जास्त स्थिरस्वरूप ( passive ) आहे. पुरुष जास्त वस्तुनिष्ठ ( objective ) आहे तर स्त्री जास्त आत्मनिष्ठ ( subjective ) आहे. प्रजोत्पादनाची जास्त मोठी जबाबदारी स्त्रीशरीरमनांवर निसर्गानें टाकली असल्यानें, स्त्रीचें सर्व शरीर व मन पुरुषापेक्षां भिन्न आहे. पुरुष हा वरचढ ( Dominant ) आहे. तर स्त्री सहजनम्र ( Submissive ) आहे. एकंदर प्राणीमात्रांतहि हें सर्वसाधारण असेंच दिसतें. स्त्री सहसा कोठें वरपगडा ( Dominant ) करणारी आढळत नाहीं. ती पुष्कळ वेळां सहजनम्र ( Submissive ) असते. पुरुषाची वर्तणूक एक घाव नि दोन तुकडे, जें मनांत येईल तें बाहेर दर्शविणारी आणि जें करावयाचें असेल त्यावर सरळ लक्ष

केंद्रित करून तें करण्याची उत्कंठा दर्शविणारी अशी असते. तर उलट, स्त्री एखाद्या वेळीं मोठी नम्र होईल, कांहीं वेळां अश्रू ढाळील, कांहीं वेळीं आर्जवेंसुद्धां करील. उद्देश साध्य करण्यास सरळ मार्गाचा अवलंब न करतां, दाखवील एक तर मनांत तिसरेंच अशी असते. तिच्या प्रकृतींत नम्रपणानें वरचढ हाण्याची शक्ति तर पुरुषांत सरळ दोन हात करून वरचढ होण्याची वृत्ति असते. प्राणीसृष्टींत पुष्कळ ठिकाणीं स्त्रीची ही सहजनम्रता ( Submission ) आणि पुरुषाचा वरचढपणा ( Dominance ) दृष्टीस पडतो. फक्त एकाच वेळीं या सहजप्रवृत्ति थोड्या भिन्नत्वानें दिसतात. ती वेळ म्हणजे स्त्रीपुरुषकामविकार. या वेळीं सुरवातीस जरी पुरुष वरचढ होतो तरी शेवटीं या भावनेंत तो स्त्रीचा दास होतो. हा सर्व प्रकार बराच गुंतागुंतीचा असला तरी सर्वसामान्य वर्णन वरप्रमाणें आहे. तात्पर्य, सर्व प्राणीसृष्टींत हा भाव ( Dominance-subordination pattern ) दृष्टीस पडतो. मोठमोठ्या चढाईच्या किंवा बचावाच्या मारामाऱ्यांतहि सहसा पुरुषच प्रामुख्यानें भाग घेतात आणि नेतृत्व करतात. यंग किंबाल यांच्या समाजशास्त्रीय मानसशास्त्राच्या ग्रंथांत मानवाच्या वर्तणुकीस प्राणीशास्त्रीय आधार सांगतांना ते लिहितात,

" Everywhere among the primates we find some forms of domination and subordination. There are, however, considerable variations in the different species. On the whole, males tended to dominate the females except when the latter were in heat. " ( K. Young pp. 25-56 )

आपला पुरुष नम्र असेल तर स्त्रीस त्याचें मोठें वैषम्य वाटतें आणि स्वतः त्याच्याशीं नम्र असण्यांत गुलामगिरी आहे, अशी तिची समजूत नसते. ' नम्र होऊन जिंक ' ( submit to conquer ) अशा साधारण धर्तीची ती परिस्थिति असते. विशेषतः ज्या स्त्रिया कामविकारानें उद्दीपित होतात, त्यांच्यांत तर ही ' नम्रता '— पाहिजे तर त्यास ढोंगीपणा म्हणा—मोठी शोभूनच दिसते. तीपासून त्यांना एक प्रकारचा आनंद होतो, असें म्हणतात. डॉ. बोमन म्हणतात,

" A woman derives pleasure from yielding to the man she loves, a pleasure as remote from masculine experience and understanding as the physical aspect of the man's experience is remote from woman's comprehension. " (Bowman p. 389.)

पुरुषाला कळण्याची ही गोष्ट नव्हे. यांत काय तथ्यांश असेल तो नेमका स्त्रीमनालाच माहीत. डॉ. हेलेन डुश यांनीं आपल्या मानसशास्त्रीय ग्रंथांत, वयांत आल्यावर ( adolescent ) स्त्रीमन कसें असतें, याचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. मानसशास्त्रीय पृथक्करणात्मक पद्धतीनें त्यांनीं मोठाच अभ्यास केलेला असल्यानें त्यांचें मत मोठें अभ्यासानें प्राप्त झालेलें आहे. त्या लिहितात,

" The tendency displayed by many women to renounce their own judgement and adopt by indentification the opinions of their love-obiects, is very typical. Women are also frequently enthusiastic partisans of ideas that apparently have been given them by others. Even talented women are often uncertain of the value of their own ideas, until they receive them from someone else, whom they respect. This remarkable condition of projection and identification is doubtless connected with woman's generally passive attitude. The tendency to identification sometimes assumes very valuable forms. Thus many women put their qualities at the disposal of the object of their indentification and content themselves with thinking. " ' What a magnificent man, I am in love with. ' ( Helene Deutsch Vol. 1 p. 64. )

स्त्री ही निसर्गतः स्थिरस्वरूप आहे. स्वतंत्रतेनें ती चांगलीशी जोरदार ठरत नाहीं. बुद्धिमान् स्त्रीसहि स्वतःच्या कल्पना आत्मविश्वासानें मांडतां येण्यास दुसऱ्याची मदत घ्यावी लागते. ज्या व्यक्तीवर त्यांचें प्रेम असतें, त्याच्या मनाशीं आणि कल्पनांशीं आपोआप समरस होण्याचा कल स्त्रियांत पुष्कळ वेळां दिसून येतो. हा दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाशीं समरस होण्याचा स्त्रीचा स्वाभाविक कल पुष्कळ वेळां फार उपयोगाचा ठरतो. त्यांचे उत्कृष्ट गुण त्यांच्या प्रियकाराच्या उपयोगाचे ठरतात आणि त्यांत त्यांना दुःख होत नाहीं. उलट स्त्रीमनास त्यांत समाधानच मिळतें.

स्त्री व पुरुष या कुटुंबसंस्थेंतील आद्य घटकांचें शारीरिक व मानसिक गुण-धर्म भिन्न पण परस्परपूरक ( Complementary ) स्वरूपाचे आहेत. कुटुंब-संस्थेच्या सुप्रजा या ध्येयास अनुसरून त्यांच्या कार्यक्षेत्रांचा व साहचर्याचा विचार होणें जरूर आहे. भारतियांनीं उपरिनिर्दिष्ट संघटनेचीं तीनहि तत्त्वें कुटुंब ही संघटना

प्रभावी व कार्यक्षम व्हावी या हेतूनें अंमलांत आणली होती असें दिसतें. सुप्रजेचें निश्चित ध्येय, स्त्रीपुरुषांचीं भिन्न पण पूरक कार्यक्षेत्रें, आणि मूळ ध्येयास धरून साहचर्य या गोष्टी भारतियांनीं शेंकडों वर्षें कुटुंबसंस्थेंत परंपरेनें दृढमूल केल्या होत्या. शिवाय हें करतांना त्यांनीं स्त्री-पुरुषांचीं भिन्न कार्यक्षेत्रें व त्यांचें साहचर्य या गोष्टींचा विचार, मूलभूत स्त्रीपुरुषांतील गुणधर्मांचें सखोल व सूक्ष्म अवलोकन करून केलेला दिसतो. भारतियांनीं जे ध्येयाचार निश्चित केलेले दिसतात, त्यांतच वरील विधानास पुष्टि मिळते.

**संस्कारपरंपरा :** व्यक्तिमत्त्वाच्या वाढीस जरूर अशी मूलभूत कुटुंबसंस्था ही संघटना भरीव पायावर उभी करण्यास, स्त्रीपुरुषांवर भारतियांना कांहीं संस्कार उत्पन्न करावे लागले. हे संस्कार अधिकाधिक दृढ होण्यावरच व्यक्तीची वर्तणूक ठरणार असते. येथें संस्कारांच्या योगें व्यक्तीचीं मूल्यें व हेतु निश्चित करण्यासाठीं व वर्तणुकीस एका विशिष्ट प्रकारानें वळण लावण्यासाठीं संस्कारांचा उपयोग भारतियांनीं केलेला दिसतो हें स्पष्ट करणें आहे.

जें 'व्यक्तिमत्व' ( Personality ) व्यक्तीच्या आचार वा वर्तणुकींत दृग्गोचर होणार आहे, ती वर्तणूक एका विशिष्ट प्रकारची करावयाची झाल्यास अथवा वर्तणुकीचें कांहीं कमींत कमी 'प्रमाण' ( Standard ) उत्पन्न करण्याकरितां संस्कार ( Conditioning ) ही एक युक्ति आहे, हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. हें न केल्यास 'भावनेवर' हेलकावे खाणारें आणि अपूर्ण ज्ञानावर उभारलेलें जें हल्लीं 'लोकमत' या नांवानें प्रसिद्ध आहे, त्या लोकमतावर आचाराचा कौल द्यावा लागेल. तें लोकमत बदललें कीं, आचारहि बदलतील. तशींच आचाराचीं प्रमाणेंहि ( Standards ) बदलत जातील आणि समाजांत कांहींच स्थिर न राहातां चालू घडीस लोकमत तेंच योग्य असें समीकरण करावें लागून 'लोकमत म्हणून बुद्धिगम्य' ( Rational ) असा चुकीचा सिद्धांत सांगण्याचा प्रसंग येईल. येथें 'आचार' बदलतात कीं नाहीं, बदलणें योग्य आहे कीं नाहीं, असा मुद्दा नाहीं; किंवा ते तसे बदलतच नाहींत व बदलू नयेतच असें म्हणण्याचा आमचा अभिप्राय नाहीं. फक्त हितकारक आचार हे स्थिर स्वरूपाचेहि असूं शकतात. ते बुद्धिगम्य विचारावर अवलंबून असतात. आणि बदलत्या देश-

कालपरिस्थितींत त्यांत जरी बदल झाले तरी ते मूलभूत स्वरूपाचे नसतात, येवढेंच अभिप्रेत आहे. ‘ सोशल सायकॉलॉजी, ’ ‘ सामाजिक मानसशास्त्र ’ हल्लीं विशेष अस्तित्वांत येत आहे. या विषयांत मानवी वर्तणुकीची प्राणिशास्त्रीय उत्क्रांति कशी आहे हें तपासून शिवाय मानवांत निरनिराळे वर्तणुकीचे प्रकार कसे आस्तित्वांत येतात यासंबंधी किंवा मानवी वर्तणुकीचा जीवशास्त्रीय व मानसशास्त्रीय विचार एकत्रित करण्याची या नव्या शास्त्राची महत्त्वाकांक्षा आहे. यांत ‘ लोकमत ’ ही चीज कशी असते याचा संपूर्ण अभ्यास येतो. कांहीं बुद्धि व कांहीं भावना यांचें ‘ लोकमत ’ हें मिश्रण असतें असें या शास्त्राचें मत. “ Public opinion is derived both rationally and irrationally.” ( K. Young. p. 431 )

वर्तमानपत्रें, पुढाऱ्यांचीं भाषणें, नभोवाणीकेंद्रें या सर्वांतील प्रचारकी वृत्ति स्वार्थी ध्येयवाद, शास्त्रीय माहितीचा अभाव, शास्त्रीय अभ्यासकांचा आणि निरपेक्ष वृत्तीनें अभ्यास करून विचार मांडणाऱ्यांना सद्यःपरिस्थितींत मतप्रचारांत मिळणारी कमींत कमी संधि, या सर्व गोष्टींमुळें लोकमत बुद्धिगम्य राहूं शकत नाहीं.

बाह्य संबंधांतून व्यक्तिमत्त्वाची घडण होत असते. व्यक्तीच्या आचारांत ती आपणांस दृष्टीस पडत असते. जगाच्या ह्या बाह्य संबंधांत व्यक्तीचे कांहीं शिक्षण ( Learning ) आपोआप घडत असते आणि व्यक्तीचे आचार स्थिर स्वरूप करण्यास त्याचा उपयोग होतो. शिक्षणानें व्यक्तिमत्त्वाच्या वाढीस कांहीं निश्चित दिशा लावतां येणें शक्य असतें. शिक्षणाचे ( Learning ) कांहीं प्रकार जरी वर्णन करतां आले तरी सर्व ठिकाणीं व्यक्तीच्या जुन्या अनुभवांशीं नवीन परिस्थितीची सांगड हें एकच मुख्य तत्त्व आहे. डॉ. बोमन लिहितात—

“ When confronted with a new situation, an individual reacts effectively or ineffectively dependiug upon how and to what degree the new is related to the old and bound up with experience. ” ( Bowman. p. 303. )

जुन्या अनुभवाशीं नवीनाचा जितका जास्त संबंध तितकी त्या व्यक्तीची नवीन प्रसंगांतील वर्तणूक जास्त बरोबर आणि बिनधोक होते. मुलगी सासरीं कशी वागले याचा तिच्या माहेरीं ‘ सून ’ म्हणून आलेली एखादी तिसरी व्यक्ति कशी वागत होती, अशा अनुभवांशीं संबंध असणें शक्य आहे. घरांत जें वळण पाहिलें जातें त्याचा परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. या प्रकारासच आपण

' परंपरा अशी संज्ञा देतों. परंपरेंत मुख्यत: जुन्या अनुभवांचा फायदा उचललेला असतो. ही परंपरा जितकी शास्त्रशुद्ध ठेवतां येईल, तितकी पुढील वर्तणूक आपोआपच योग्य घडत जाईल. संस्था, कुटुंब, राष्ट्र किंवा अशी कोणतीहि संघटना असो, परंपरेची शास्त्रशुद्धता योग्य वर्तणूक नवीन पिढींत उत्पन्न करण्यास व टिकवून धरण्यास अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

संस्कार हा परंपरेचा पाया आहे. प्रत्येक संस्कार कांहीं विशिष्ट वर्तणुकीचा सूचक असतो. जे जे आचार ' संस्कारात्मक ' पद्धतीनें घडतात, त्यांत कांहीं सूचना ( Suggestion ) असते. ह्या चसूनेचा उपयोग प्रेरक शक्तीसारखा ( Stimulus ) होतो. या प्रेरणेमुळें एक प्रकारची वर्तणूक घडण्यास मदत होते. पॅव्हलॉव्ह ( Pavlov ) या शास्त्रज्ञाचे यासंबंधींचे पशूवरील प्रयोग आतां सर्व मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या तोंडीं असतात. मानवाच्या वर्तणुकीस कांहीं विशेष घडण आणि दिशा द्यावयाची असल्यास या मूलभूत शास्त्रीय कल्पनेचा पुष्कळ उपयोग करून घेतां येतो. मनुष्याची सर्व गुंतागुंतीची वर्तणूक, त्याच्या संवयी, त्याच्या आवडीनिवडी या संस्कारजन्य ( Conditioned Reflex ) आहेत.' असें आतां पॅव्हलॉव्ह इत्यादि मानसशास्त्रज्ञांचें म्हणणें असून यास मानसशास्त्रांत वर्तनवाद ( Behaviourism ) अशी संज्ञा आहे. ज्यास आम्ही संस्कारजन्य म्हणतों त्यास मानसशास्त्राच्या पुस्तकांत साक्षेप-प्रतिक्षेप असें मराठी नामाभिधान देतात. परंतु संस्कारजन्य वागणुकींत हेंच तत्त्व आहे असें आम्हांस वाटतें. आमच्याकडे संस्काराची संपूर्ण कल्पना या मूलभूत मानसशास्त्रीय सिद्धांतावर आधारलेली दिसते. आमच्या संपूर्ण संस्कारांचा या दिशेनें कोणीं अभ्यास केल्यास त्याचा समाजसुधारकांस फार उपयोग होईल असें आम्हांस वाटतें. येथें येवढेंच निदर्शनास आणावयाचें आहे कीं, या पद्धतीस ( संस्कारात्मक ) असें नांव योग्य ठरेल. संस्कारांनीं मानवी आचारास घडण देण्याचा सर्वांत मोठा प्रयत्न भारतीय संस्कृतींत झालेला दिसून येईल.

गर्भधारणेपासून तों विवाह–श्राद्धादिकर्मांपर्यंत व्यक्तिगत आणि अर्थ-कामासंबंधीं गटप्रधान मूल्यें उत्पन्न करून सामाजिक संस्कार उत्पन्न करून मानवी वर्तणुकीस त्यांनीं केवढी घडण दिलेली आहे आणि परंपरेनें ती शतकानुशतकें टिकविली हें पाहिलें म्हणजे पूर्वजांच्या मार्मिकपणाचें कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. सर्व भारतीय आचारांची उभारणी संस्कारांवर केलेली दिसते. देवळांत घंटा

वाजवून देवापुढें मस्तक नम्र करण्यापासून तों मृताच्या बाराव्या दिवशीं पिंडास कावळा शिवण्यापर्यंत सर्व ठिकाणीं संस्कारांचा पगडा दिसतो. यामुळें दोन गोष्टी प्रामुख्यानें साध्य होतात. एक तर संस्कारानें जो आचार आपण योग्य ठरवूं, तो निर्माण होण्यास कांहीं मदत होते. विवाह संस्काराचा प्रमुख हेतु, विवाहविधींत सारख सूचित केला गेल्याकारणानें योग्य विचार व आचारांकडे कल होणें शक्य असतें. आतां हल्लीं सर्व गोष्टींची करमणूक करून सर्वांचा उपयोग फक्त मजा करण्याकडे होत आहे, हा दोष संस्कार उत्पन्न करणाऱ्याचा नव्हे.

**भारतियांचे निश्चित ध्येयाचार :** आचार निश्चित झाले असल्यास वरील सर्व विवेचन उपयोगी पडणार आहे. वर्तणूक कशी असावी किंवा ध्येयाचार कसे हवेत यांसंबंधीं जर कांहीं निश्चित कल्पना नसेल, तर पुढचा विचार उत्पन्न होत नाहीं. परंतु भारतियांचा ध्येयाचार निश्चित होता. आयुष्यांतलि कोणत्याहि समस्येला कांहीं निश्चित उत्तर त्यांच्याजवळ होतें. प्रवृत्ति-निवृत्ति या द्वंद्वावर आधारलेलें मानसिक समाधान व व्यष्टि-समष्टि या द्वंद्वाची हिताहितदृष्टि पुढें ठेवून, शेवटीं शांतता कशी उत्पन्न करतां येईल या ध्येयास धरून त्यांनीं चतुर्विधपुरुषार्थ ही चतुःसूत्री निर्माण केलेली आहे, हें पहिल्या प्रकरणांत स्पष्ट केलेलेंच आहे. याप्रमाणें ध्येय निश्चित झाल्यावर त्यास धरून यशस्वी विवाहाचा ध्येयाचारहि त्यांनीं निश्चित करून दिलेला आहे. विवाहांतर्गत पुरुषार्थास धरून आचार निश्चित झाल्यामुळें तसा आचार घडावा म्हणून ' संस्कार ' उत्पन्न करतां आले. असा विशिष्ट स्वरूपाचा आचार पिढ्यान्‌पिढ्या टिकून राहावा याकरितां परंपरा ( Tradition ) निर्माण केली. भारतियांच्या निश्चित ध्येय-कल्पनांमुळें निश्चित आचार, व निश्चित संस्कार-पद्धति निर्माण करण्यांत त्यांना यश आलें. हें परंपरेनें शेकडों वर्षें टिकवून त्यांनीं मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वास व वर्तणुकीस कांहीं निश्चित वळण दिलें असून, त्यांतील संस्कार आज विसाव्या शतकांतहि आम्हांस सर्वस्वी पुसून टाकतां आले नाहींत. यांत परंपरेची शक्ति केवढी असते हें वाचकांच्या सहज ध्यानीं येईल.

मनुष्याची एकंदर वर्तणूक बुद्धिपेक्षां भावनांनीं जास्त प्रेरित झालेली असते कोणताहि आचार मनुष्य मोठ्या बुद्धीच्या निकषावर घासूनच बरोबर करतो असें समजणें चूक आहे. शिवाय तेवढी बुद्धीहि सर्वत्रांत असत नाहीं. डॉ. बोमन लिहितात,

" Most human beings live more by their emotions, than by their intellectual processes. People tend to feel more than they tend to think. Consequently, logic and reason are frequently ineffective in influencing behaviour. Only the rare person changes his behaviour by logic rather than by experience and conditioning." ( Bowman. b. 307. )

तर्क आणि बुद्धिगम्य विचार यांवर फारच थोड्या लोकांचा आचार अवलंबून असतो. माणसाची वर्तणूक त्याच्या बुद्धिपेक्षां त्याच्या भावनांवरच जास्त अवलंबून असते. त्यामुळें बुद्धिगम्य विचाराचा त्याचें वर्तणुकीवर फारसा परिणाम घडत नाहीं आणि त्याची वर्तणूक ही जास्त ' पूर्वानुभव ' ( Experience ) व संस्कार ( Conditioning ) यांवरच अवलंबून राहाते. मनुष्याच्या या भावनांना संस्कारानेंच कांहीं शिक्षण देणें शक्य आहे. परंतु हल्लीं शिक्षणपद्धति म्हणजे कांहीं तुटपुंज्या शास्त्रकल्पना व कांहीं भावनोद्दीपक कलात्मक वाङ्मय असा होत असून त्यांत मनुष्याच्या भावनांना वळण लावण्यागडे दुर्लक्ष आहे एवढें येथें नमूद करणें जरूर आहे.

**मूल्यविचार :** व्यक्तीचीं ' मूल्यें ' ( values ) त्याची आचार-निश्चिति करण्यास मदत करतात. व्यक्तीच्या वासना ( Desire ) आणि दृष्टिकोन ( Attitudes ) यांवर ज्यांचा परिणाम होतो ' तीं व्यक्तीचीं ' मूल्यें ' ( values ) म्हणून ओळखतात. कोणत्याहि मनुष्यास जीवनांस समस्यांना तोंड देण्याचा प्रसंग येणें अपरिहार्य असतें. कार्याकार्यविचार गहन तर खराच पण तो पुष्कळांना निरनिराळ्या प्रसंगानें करणें क्रमप्राप्त होतें. दोन गोष्टींपैकीं कोणती जास्त महत्त्वाची, दोहोंपैकीं कोणती गोष्ट करण्यासाठीं दुसरीचा त्याग इष्ट आहे, असे प्रश्न निर्माण झाले असतां, आचार ठरविणें व्यक्तीस कठिण असतें. अशा प्रसंगांत संस्कारानें जें मूल्यमापन इष्ट ठरविलें जातें तें ती व्यक्ति सहजच ग्रहण करते. प्रामाणिकपणा आणि त्याबरोबर येणारें दारिद्र्य किंवा अप्रामाणिकपणा, काळाबाजार व तदनुषंगिक श्रीमंती अशी समस्या हल्लींच्या काळांत पुष्कळ लहानमोठ्या मंडळीस भेडसावीत आहेत. तत्त्वप्रतिपालन का सेवानिवृत्ति, अशी समस्या प्रामाणिक नोकरांना येऊन पडते. अशा प्रकारच्या समस्या जेव्हां व्यक्तीच्या आयुष्यांत निर्माण होतात, तेव्हां त्याच्या संस्कारान्वित

मनाचा कल व दृष्टिकोन हाच त्याचें उत्तर देतो आणि व्यक्तीचें कार्य व अकार्य ठरतें. तात्पर्य, संस्कारानें व्यक्तीचीं मूल्यें बनत जातास. हीं ' मूल्यें ' ध्येयास धरून उत्पन्न होतात. ध्येयनिश्चिति नसल्यास स्थिरमूल्यें उत्पन्न होणेंहि कठिण जातें. ध्येयास धरून मूल्यविचार असून संस्कार व परंपरा यागोष्टीहि निश्चित ध्येयासच धरून आहेत. यापुढें भारतियांनीं उपरिनिर्दिष्ट सर्व विचार यशस्वी विवाहासंबंधीं कसा वापरलेला दिसतो येवढें दिग्दर्शन करणें आहे.

भारतियांनीं विवाहांतर्गत व्यक्तिमत्त्वाच्या अडचणी उत्पन्न होऊं नयेत याकरितां ज्या महत्त्वाच्या गोष्टी केल्या त्या अशा :— ( १ ) निश्चित वैवाहिक ध्येयें. ( २ ) तीं आचारांत यावींत याकरितां निश्चित संस्कारपरंपरा. ( ३ ) परंपरेनें तसा आचार घडावा याकरितां शास्त्र आणि ( ४ ) लोकशिक्षण व्हावें याकरितां सर्व काव्यसंभार. विवाहांतर्गत सुखशांति निर्माण व्हावी, याकरितां त्यांनीं विचारानें, अनुभवानें, तर्कानें आणि कदाचित् कोणीं सांगावें, त्यांनीं प्रयोगहि केलेले असतील, या सर्वांच्या योगानें स्पष्ट योजना आंखली होती. त्यांत कोठें बदसूर नव्हता. शंकास्थानास निश्चित उत्तरें होतीं. साधनसाध्यांची स्पष्ट कल्पना होती. आयुष्यांतील निरनिराळ्या मूल्यांचें योग्य मूल्यमापन होतें, अवास्तवता नव्हती आणि सर्वसामान्य, बहुजन समाजाच्या मूलभूत सुखासमाधानांत भर पडावी याकरितां तो सर्व खटाटोप होता.

भारतियांचीं वैवाहिक ध्येयें काय होतीं आणि त्याकरितां त्यांनीं कोणते संस्कार व मूल्यें ग्रहण केलेलीं दिसतात याचा आतां विचार करणें आहे. लोकशिक्षण व्हावें याकरितां उत्पन्न केलेल्या काव्यसंभाराचें दिग्दर्शन पुढच्या प्रकरणांत येईल.

कुटुंबाच्या स्थैर्यावरच पुढच्या सुदृढ व सुसंस्कृत पिढीची इमारत उभी राहावयाची असते. त्या त्या समाजांतील सांस्कृतिक मूल्यें कुटुंब या आद्य संस्थेंतूनच पुढच्या पिढींत संक्रांत होत असतात. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या वाढींतहि कुटुंब याच आद्य घटकांतील व्यक्तींशीं संबंध येत असून याच परस्परसंबंधांतून मूलतः व्यक्तिमत्त्वाची वाढ होत जाणार. प्रो. मेरिल लिहितात,

" The primary group ( Family ) is the most important single type of relationship in the development of human being.

It ( Primary group ) acts as an agency through which, the candidate for human nature receives the standards and values of his Society. " ( F. E. Merrill. p. 23 )

कुटुंबाचें स्थैर्य हें उपरिनिर्दिष्ट कारणांमुळें फार महत्त्वाचें ठरल्यानें आणि तें एकपत्नीकत्वार अवलंबून असल्यानें भारतियांनीं ध्येय म्हणून एकपत्नीकत्वाचा ( Monogamy ) पुरस्कारच केलेला आहे. परंतु ध्येयात्मक एकपत्नीकत्व ( Ideal Monogamy ) हें सुप्रजा, रति व व्यक्तिमत्त्वाचें एकत्व या तीन खांबांवर अधिष्ठित असल्यानें आणि त्यांतील सुप्रजा हे स्त्रीपुरुषसंबंधांतून उत्पन्न होणारें सर्वांत महत्त्वाचे साध्य कुटुंबसंस्थेस व समाजास सारखेंच पोषक असल्यानें ' सुप्रजा ' हें विवाहांतर्गत साध्य भारतियांनीं निश्चित ध्येय म्हणून मान्य केलें.

भारतियांचें हें ध्येयात्मक एकपत्नीकत्व म्हणजे हल्लींचें कायदेशीर एकपत्नीकत्व नव्हे. एकपत्नीकत्व आज शेंकडों वर्षें बहुसंख्य समाजांत कायद्याशिवाय टिकून राहिलेली गोष्ट आहे. बालसंगोपन व संवर्धन हें कार्य मूलतः स्त्रीपुरुषसाहचर्यावर अवलंबून असल्यानें, कुटुंबसंस्था कालाच्या ओघांत बिकट परिस्थितीशीं झगडून टिकून राहिलेली आहे. ज्या ज्या ठिकाणीं जगांत ही घटना नाहींशी करून त्या ठिकाणीं नवी कांहीं पद्धत अंमलांत आणण्याचे प्रयत्न झाले, ते सर्व बव्हंशीं निरर्थक ठरले आहेत. अलीकडे अमेरिकेंतील ब्रुक फार्म कॉलनी, न्यू हार्मनी कॉलनी, वगैरे प्रयत्न फार काळ टिकूं शकले नाहींत. रशियांतील कुटुंबसंस्थेची हकालपट्टी करण्याचे प्रयत्नहि फोल झालेले दिसतात. डॉ. किन्से म्हणतात कीं, जगांतील सर्व मानवसंघांत कुटुंब हा समाजसंघटनेंतील आद्य घटक समजला गेला आहे.

Throughout the most human groups, everywhere in the world, the home has been recognised as the basic unit of the social organisation. ( Kinsey. p. 346. )

' पुरुष ' या शब्दांतच कुटुंब हा अर्थ अभिप्रेत असल्याचें मनूनें म्हटलें असून या आद्य घटकांत पत्नी, पति व प्रजा इतक्या व्यक्तींचा समावेश केलेला आहे. कुटुंब ही संस्था उभी करण्याकरितां स्त्रीपुरुषांचें आमरण साहचर्यच योग्य होय असाच ध्येयवाद भारतियांनीं मांडलेला दिसतो.

**अन्योन्यस्याव्यभिचारो भवेदामरणांतकः।** मनु. ९.१०१.

मरणापर्यंत एकमेकांशीं अव्यभिचारी वृत्तीनें राहण्याचा स्पष्ट आदेश मनूनें वैवाहिक ध्येय म्हणून दिलेला आहे.

ज्या कुटुंबांत पति व पत्नी एकमेकांस संतुष्ट करीत असतात, अशाच कुटुंबांत पुष्टि, तुष्टि व कल्याण नांदूं लागतात, असें स्मृतिकारांनीं स्त्रीपुरुष-साहचर्याचें फल दिलेलें दिसतें.

**संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च** । मनु. ३.६०.

कुटुंब ही संस्था आहे. संस्थेचें स्थैर्य उत्पन्न होण्यास जीं मूलभूत तत्त्वें आम्हीं पूर्वी दिग्दर्शित केलीं आहेत, तीं सर्व भारतियांनीं वापरलेलीं दिसतात. कुटुंबस्थैर्यास प्रथमतः स्त्रीपुरुषांच्या साहचर्याची जरूरी आहे. तें तत्त्व वरील श्लोकांत ग्रथित केलेलें दिसेल. परस्परांविषयीं आदर, पूज्यभाव व प्रिय करण्याची वृत्ति वाढीस लागली तर हें साहचर्य फलप्रद होऊन ध्येयात्मक एकपत्नीकत्व निर्माण होईल, अशी त्यांची विचारसरणी. साहचर्याबरोबरच कुटुंबसंस्थेस ध्येय पाहिजे असतें. तें नसेल तर साहचर्याचें कारणच नाहींसें होईल. याकरितां विवाहांतर्गत ' सुप्रजा ' किंवा ' धर्मप्रजा ' हें निश्चित वैवाहिक ध्येय भारतियांनीं ठरवून, विवाह हें साधन ठरविलें. हा साध्यसाधनभाव स्पष्टपणानें संस्कारांत सर्वत्र मांडला असल्यानें या वैवाहिक ध्येयास धरून साहचर्याचा प्रकार आपोआप निश्चित करतां आला. स्त्रीपुरुषांचें परस्परपूरकत्व व त्यामागील त्यांच्या शरीरमनाची ठेवण लक्षांत घेऊन त्यांचीं कार्यक्षेत्रें व दृष्टिकोन काय असावेत हें ठरवून दिलें. येथें स्त्रीसंबंधीं मनूचे विचार, त्यानें ठरविलेलें स्त्रीचें कार्यक्षेत्र व स्त्रीसंबंधीं दृष्टिकोन, यांची वाचकांस कल्पना देणें जरूर आहे. शिवाय हा दृष्टिकोन स्त्रीच्या शरीर-मनाची ठेवण लक्षांत घेऊन निर्माण केला आहे किंवा काय हें समजावून घेण्यासहि त्याची मदत होईल.

**मनुस्मृतिप्रणीत स्त्री–आचार :**

स्त्री व तिचें आचार यांबद्दल स्मृतीमध्यें ठिक-ठिकाणीं उल्लेख येतो. स्त्रीसंबंधीं फार अनुदार उद्गार काढणारा, स्त्रीस स्वातंत्र्य नाकारणारा आणि स्त्रीस समानतेचे हक्क नाकारणारा हा नीच हिंदुधर्म-शास्त्रकार आहे, अशी पुष्कळ अंशीं कल्पना शिक्षित स्त्री-जातींत आणि कांहीं स्त्री–हितेच्छु मंडळींत आढळून येते. स्त्रीसंबंधीं अनुदार आणि उदार, बरें आणि

वाईट, अशीं दोनहि प्रकारचीं पुष्कळच वचनें मनुस्मृतींतून काढून दाखवितां येतील. परंतु अशा तऱ्हेनें मनूचें मनोगत आकलन न होतां फक्त वितंडवाद होईल आणि मनूची खरी कळकळ काय आहे हें निदर्शनास येणार नाहीं. म्हणून तें मनोगत समजून घेण्याचा यथाशक्ति प्रयत्न करण्याचा आमचा मानस आहे.

स्त्री ही एक संरक्षणीय बाब असून तिचें संरक्षण करणें हें पुरुषाचें प्रथम-कर्तव्य आहे, असा मनूचा स्त्रीसंबंधीं प्रथम दृष्टिकोन आहे. '**स्त्रियं रक्षेत्प्रयत्नतः।**' ( मनु. ८.९. ) मोठ्या प्रयत्नानें स्त्रीचें संरक्षण करावें, असें मनूचें स्पष्ट प्रतिपादन आहे. हें संरक्षण कशाकरितां असा प्रश्न निर्माण झाल्यास '**प्रजाविशुद्ध्यर्थं**' प्रजाशुद्धिसाठीं असा जबाब दिला आहे. स्त्रीपासून प्रजननाचें मुख्य कार्य निसर्गांत होत असल्यानें, तिचें जायात्व यावरच अवलंबून असल्यानें, संतति हा विवाहाचा पाया समजला गेला असल्यानें, परपुरुषापासून संतति निर्माण करून घेण्याचा सर्व-सामान्य कल कोणत्याच समाजांत नसल्यामुळें, ' काम ' हा इंद्रियविकार असून तो प्रत्येकाच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रश्न म्हणून त्या काळीं समजत नसल्यामुळें, आणि संतति व सुखप्राप्ति यांची उपकरणात्मक ताटातूट तत्काळीं माहीत नसल्या-मुळें, स्त्री ही प्रजाशुद्धिकरितां फार कटाक्षानें संरक्षणीय म्हणून मानली गेली असा कयास करण्यास फारशी हरकत नाहीं. आजहि बाकी कितीहि बदल झालेले दिसत असले, तरी स्त्री संरक्षणीय आहे, असाच दृष्टिकोन कोणीहि अमान्य करणार नाहीं.

यानंतर सहजच स्त्रीस वागवावें कसें किंवा तिला काय आचार सांगावा, असा प्रश्न उत्पन्न होतो. याहिबाबत मनूचें म्हणणें वरील मूळ मुद्द्यास विसंगत दिसत नाहीं. स्त्री ज्या कुलांत जन्मास येते तेथें बाप वा बंधु आणि ज्या कुलांत स्त्री विवाहित होऊन जाते तेथें पति यांनीं तिच्या संरक्षणाची जबाबदारी उचलावयाची असते. सर्व वर्णांना ब्रह्मक्षत्रियवैश्यशूद्रांना आणि दुर्बलांनाहि ' भार्यारक्षण ' ही गोष्ट धर्म म्हणून सांगितली गेली. आतां संरक्षण करावयाची स्त्री ही कांहीं निर्जीव वस्तु नव्हे, ती व्यक्ति आहे. तिला कांहीं व्यक्तिमत्व आहे. तिला इच्छा, आकांक्षा, वासना इत्यादि सर्व इतर मानवजातीप्रमाणेंच आहेत; हें समजून मनूनें स्पष्ट सांगितलें कीं, ' स्त्रीरक्षण ' नुसते प्रतिबंध, दंड, बलात्कार इत्यादि साधनांनीं करणें अशक्य असतें. नुसता धाकदपटशा, अरेरावी, गळचेपी आणि अज्ञान इत्या-दींनीं ' स्त्रीरक्षण ' खरेंखुरें होणार नाहीं. तर तिच्या आकांक्षा, इच्छा आणि

भावना यांचा योग्य परामर्श घ्यावा. एतदर्थ तिला कांहीं विशेष कार्यक्षेत्रें द्या. सुप्रजा हा तिचा प्रथम हेतु लक्षांत घेऊन तिचें कार्यक्षेत्र संतति, अर्थव्यय, धर्मविधि, पाकसिद्धि, गृहकृत्य, हें ठरविण्यांत आलें.

**प्रजनार्थं महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः ।**
**स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन ।**
**उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् ।** मनु. ९.२६.२७.

स्त्री ही खरी गृहलक्ष्मी व गृहदीप्ति आहे. अपत्योत्पादन व आपत्यसंवर्धन हें तिचें खरें कार्य आहे. त्यामुळें ती पूजार्ह आहे. स्त्रीचें कार्य काय तर ‘ चूल आणि मूल ’ अशी हेटाळणी करण्यासारखें काय आहे ? मग पुरुषास मुलें होत नाहींत म्हणून वेडावण्यासहि काय हरकत आहे ? असो, या प्रजोत्पादनक्षमतेला धरूनच रति, शुश्रूषा, गृहकृत्य आणि धर्मकार्य या चार शब्दांत स्त्रीचें कार्यक्षेत्र मनूनें विशद केलेलें आढळतें. हें कार्यक्षेत्र स्त्रीनें सांभाळण्यांतच पृथ्वी हा स्वर्ग आहे, गृहसौख्य नांवाची बाब आहे, असें निक्षून सांगून घरांत कोंडून, मारहाण करून, शिवीगाळ करून आणि दडपशाही करून स्त्रीचें रक्षण होणार नाहीं, हा इशारा मनु पुनः पुन्हां देत आहे.

**आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः ।** मनु. ९.१२.

स्वतःला त्या समजुतीनें आणि ज्ञानानें नीट ओळखतील किंवा आपलें-आपण बरेंवाईट ओळखून वागतील तर त्या आपणच आपलें रक्षण करतील. अंतःस्फूर्त सुरक्षित राहतील. स्त्रीचें शरीर व मन मुख्यतः मातृत्व व तज्जन्य सहज प्रेमभाव, हळुवारपणा, नम्रता इत्यादि भावनांनीं नटलेलें आहे, हें स्वतः त्यांचें त्यांना समजून, त्यांनी आपल्या आयुष्याची दिशा ठरविली, तर स्वाभाविकच त्या समाधान पावतील. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वास सुरवातीपासूनच पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाशीं समरस होण्यासाठीं संधि, संस्कार आणि तदनुरूप आचार करून ठेवलेले दिसतात.

**यादृग्गुणेन भर्त्रा स्त्री संयुज्येत यथाविधि ।**
**तादृग्गुणा सा भवति समुद्रेणेव निम्नगा ।** मनु. ९.२२.

समुद्रास मिळणारी नदी ज्याप्रमाणें समुद्रमय होते, त्याचप्रमाणें ज्या गुणाचा पुरुष असेल त्याच गुणाची स्त्री आपोआप होते. उत्तम गुणांचा पुरुष असल्यास

स्त्री उत्तम होते व अधम असल्यास तीहि पतित होते. या श्लोकावरून स्त्रीचें व्यक्तिमत्त्व पुरुषाशीं एकरूप व्हावें अशी स्मृतिकारांची कल्पना दिसते. धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गास धरून जो एकभाव, कीं ज्यांत दोघांच्याहि व्यक्तिमत्त्वाचें सर्वांशानें एकत्रीकरण सिद्ध झालेलें आहे; जें प्रयत्नानें व कालानें निर्माण होणारें आहे, कायद्यानें नव्हे, तें खरें, निर्भेळ, अंतःस्फूर्त आणि चिरस्थायी एकपत्नीकत्व ( Ideal Monogamy ). व्यक्तिमत्वाच्या एकत्रीकरणास स्त्रीपुरुषांनीं प्रथमतः एकमेकांबद्दल आदर ठेवला पाहिजे. स्त्री अर्थार्जनाकरितां पुरुषावर अवलंबून ठेवली होती तरी तिला गुलाम न करतां अत्यंत आदरानें तिच्याशीं सर्व पुरुषांनीं वर्तन ठेवावें, असाच मनूचा सल्ला आहे.

**परपत्नी तु या स्त्री स्यादसंबंधा च योनितः ।**
**तं ब्रूयाद्भवतीत्येवं सुभगे भगिनीति च ॥** मनु. २.१२९.

परपत्नी जी असेल तिला ‘ भवती ’, ‘ भगिनी ’, ‘ सुभगे ’ अशा शब्दांनीं संबोधावें. त्यानंतर ज्या स्त्रिया मावशी, मामी, सासू व आत्या या नात्यांत असतील, त्यांना गुरुपत्नीप्रमाणें अभिवादन करावें. ज्येष्ठ भ्रात्याच्या स्त्रीस नेहमीं नमस्कार करावा. माता सर्वांत श्रेष्ठ मानावी. ‘ **माता ताभ्यो गरीयसी** ’ ( मनु. २.३३ ) गुरुपत्नी तरुण असली, तरीहि तिला शिष्यानें यथाविधि वंदन करावें. रस्त्यानें जातांना खालील मंडळीस आपण एकीकडे होऊन मार्ग द्यावा.

‘ **चक्रिणो दशमीस्थस्य रोगिणो भारिणः स्त्रियाः ।**
**स्नातकस्य च राज्ञश्च पंथा देयो वरस्य च ॥** मनु. २.१३८.

या मंडळींत वाहनांनीं जाणारे लोक, राजे, वृद्ध, रोगी आणि गर्भवती स्त्री ही मंडळी येतात. यावरून ज्यास इंग्रजींत नागरिक धर्म ( Civic sense ) म्हणतात, तो भारतियांत फार पुरातन कालापासून होता हें लक्षांत येईल. गर्भिणी स्त्री व वृद्ध यांस रस्त्यानें जातांना प्रथम वाट करून द्यावी. नूतन विवाहित कन्या, कुमारिका, रोगी व गर्भिणी स्त्रिया यांचें प्रथमतः सर्वांच्या आधीं भोजन करावें, असा नियम गृहस्थांकरितां दिला आहे. भार्येच्या ज्या कोणी सख्या घरीं असतील त्यांचेंहि भार्येसहित भोजन व्हावें.

**सुवासिनी कुमारीश्च रोगिणो गर्भिणी स्त्रियः ।**
**अतिथिभ्योऽग्र एवैतान्भोजयेत् अविचारयन् ॥** मनु. ३.११४.

' कोणताहि विचार न करतां अतिथीच्या अगोदर नूतन विवाहित, रोगिणी व गर्भिणी स्त्रियांस प्रथम जेवावयास बसवावें. ' या साध्या नियमांत स्त्रीसंबंधीं पुरुषाची वागणूक कनवाळूपणाची असली पाहिजे असें सहज दिसून येईल. विवाहोत्तर नवीन कुलांतील निरनिराळ्या नात्याच्या पुरुषांनीं स्त्रीचा सत्कारच करावा.

**पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।**
**पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥** मनु. ३.५५.

आपलें नेहमीं कल्याण व्हावें अशी इच्छा असेल तर नूतन कुळांतील दीर, पिता व भ्राता अशा स्थानीं असलेल्या पुरुषांनीं स्त्रीचा सर्वतोपरी सत्कार करावा. आणि वस्त्रालंकारांनीं त्यांस भूषित करून आनंदांत ठेवावें. यावरून पुरुषांची स्त्रीसंबंधीं काय वागणूक असावी याचा स्पष्ट तर्क कोणासहि करतां येण्यासारखा आहे. ज्या घरांत हें होत नाहीं, अर्थात् जेथें स्त्री, मग ती भगिनी असो, कन्या असो, स्नुषा असो, पत्नी असो, ती दुःख भोगीत असेल, तिला पीडा होत असेल, तर तीं कुलें निर्धन होतात व त्या पुरुषांनाहि कांहींतरी पीडा निर्माण होतात, असें स्मृतिकार वर्णन करतात.

**तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।**
**भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥** मनु. ३.५९

यास्तव नेहमीं भूषणें आणि आच्छादनें वगैरेंनीं स्त्रीचा सत्कार करून तिला संतुष्ट ठेवणें हें प्रत्येक कल्याणेच्छु पुरुषाचें मोठें कर्तव्य आहे. परस्परांविषयीं आदर, पूज्यभाव, सत्कार आणि प्रिय कल्याणाची वृत्ति यांतूनच स्त्रीपुरुषांचें व्यक्तिमत्त्व एकमेकांस चिरकाल जोडलें जाईल, तें अविभाज्य होईल, ही भारतियांची कल्पना असून यांतूनच ' गृहसौख्य ' वा कल्याण उत्पन्न होण्याची शक्यता आहे असा स्पष्ट सिद्धांत त्यांनीं सांगून ठेवला. ज्यास कल्याणप्राप्तीची इच्छा असेल त्यांनीं हाच मार्ग स्वीकारला पाहिजे. हें न केल्यास कायमची गृहपीडा राहून त्यांतून ' गृहसौख्या 'स बिघाड उत्पन्न होणार, हेंहि स्मृतिकारांनीं तितकेंच निश्चित मत दिलेलें दिसतें.

**कामसूत्रकारांची मतप्रणाली :**

कामसूत्रकारांची स्त्रीविषयक मतप्रणाली मनूसारखीच आहे. स्त्रीचें मोठ्या प्रयत्नानें रक्षण केलें पाहिजे असेंच वात्स्यायनाचें मत आहे. ' स्त्रीयं रक्षेत् प्रयत्नतः ' असाच कामशास्त्रकारांचा दृष्टिकोन असून पारदारिकत्व

इत्यादि सर्व वर्णन केल्यावर 'दाररक्षितकम्' या शीर्षकाखालीं त्यांनीं स्वतःच्या स्त्रीचें कसें रक्षण करावें यासंबंधीं विशेष सूचना दिल्या आहेत.

स्त्रीचें कार्यक्षेत्र काय असावें यासंबंधींहि मनु व वात्स्यायन यांच्यांत एकवाक्यता दिसते. रति, शुश्रूषा, गृहकृत्य व धर्मकार्य हीं मनूनें सांगितलेलीं कार्यक्षेत्रें, कामसूत्रकारांनीं प्रत्यक्ष आचारांचें दिग्दर्शन करून स्पष्ट केलीं आहेत.

यासंबंधीं विशेष सूचना देण्याकरितां 'भार्याधिकारिकम्' नामक चतुर्थ अधिकरणांत विचार आहे. त्यांत प्रथमाध्यायांत 'एकचारिणीवृत्त' म्हणजे ज्या विवाहांत एकपत्नीकत्व आहे त्या विवाहांतील स्त्रीवृत्त वर्णन केलें आहे. सुरवातीसच टीकाकार लिहितात कीं 'सपत्नीकत्व समाजांत आहे, तरी प्राधान्यत्वानें एकपत्नीकत्वच प्रचलित असल्यानें एकचारिणीवृत्त प्रथम दिलेलें आहे.'

**भार्यैकचारिणी गूढविश्रम्भा देववत् पतिमानुकूल्येन वर्तेत ।**

(का. सू. ४.१.१.)

याचा अर्थ असा कीं एकचारिणीभार्येनें अत्यंत विश्वासानें पतीस देवाप्रमाणें मानून त्याला अनुकूल राहून सर्व व्यवहार करावा. यांत गूढ विश्वास आणि पतीचे मतानुसार व्यवहार हा मुख्यतः सांगितला आहे. या दोन्ही गोष्टी पत्नीचें व्यक्तिमत्व पुरुषाच्या व्यक्तिमत्वाशीं निगडित करण्याकरितां सांगितलेल्या दिसतात.

**तन्मतेन कुटुंबचिंतां आत्मनि संनिवेशयेत् ।** का. सू. १८.१.२.

स्त्रीनें सर्व व्यवहार पुरुषाच्या मतानें करावा. या एकाच सूत्रांत गृहव्यवस्था खर्चवेंच, धर्मकार्यें, शुश्रूषा इत्यादि जें मनूनें सागितलें तें सर्व आलें. कुटुंबचिंता या एका शब्दांत स्त्रीच्या कार्यक्षेत्राचें सुंदर वर्णन आलें. थोडक्यांत मोठे अर्थ कसे आणावयाचे हेंच सूत्रकारांचें कौशल्य. पुढील सूत्र गुरुजन, भृत्यवर्ग, नायकभगिनी व त्यांचे यजमान यांसंबंधींचें आहे. त्यांत या प्रत्येक पतीच्या नात्यांतील लोकांशीं यथार्थ वर्तणूक असावी असें आहे. यामध्यें महत्त्वाचा प्रश्न जो आजतागायत उत्पन्न होतो तो म्हणजे सासूसासऱ्यासंबंधीं. याबाबत वात्स्यायनांनीं भारतीय दृष्टिकोन खालीलप्रमाणें दिला आहे.

**"श्वश्रूश्वशुरपरिचर्या तत्पारतंत्र्यं अनुत्तरवादिता परिमिताप्रचंडालापकरणं अनुच्चैःहासः तत्प्रियाप्रियेषु स्वप्रियाप्रियेषु इव वृत्तिः।"**

(का. सू. ४.१.३७.)

सासू व सासरा यांच्या आज्ञेंत राहून, उलट उत्तर न देतां राहावें. त्यांच्यापुढें परिमित भाषण करावें. फार मोठ्यानें हास्यसुद्धां करूं नये. त्यांच्या प्रियजनांच्या ठिकाणीं आपल्या स्वतःच्या प्रियजनांप्रमाणें वृत्ति असावी. थोडक्यांत म्हणजे सासूसासरे या गुरुजनांचें मन धरून त्यांचा अनादर न होईल अशी काळजी नवीन वधूनें घेणें जरूर आहे. यांत मोठी सहिष्णुता असते. पण विवाहांतील धर्मार्थकामांचा संपूर्ण एकत्वाचा ध्येयवाद, विवाहाचें तत्कालीन वय, तत्कालीन एकत्र कुटुंबपद्धति या सर्वांचा विचार करतां वरील आचार अत्यंत योग्य आहे हें कबूल करावें लागेल. आजहि या आचारांतील जें मर्म कीं वृद्धांचा अनादर न होतां सहिष्णुतावृत्तीनें वर्तणूक करावी हें बदलण्याचें कांहींहि कारण दिसत नाहीं. यापुढचें सूत्र '**भोगेष्वनुत्सेकः ।**' ( ३४.१.४. ) पुष्कळ प्रकारचे भोग प्राप्त झाले तरी त्यांसंबंधीं गर्व वा अभिमान बाळगूं नये. स्वतःच्या पतीस मोठी नोकरी असली, आईबाप अर्थहीन असले, तरी अभिमान बाळगूं नये. स्वतःच्या भाग्योदयानें दुसऱ्यास कमी लेखून त्यांचा अपमान करूं नये. यांत कृतज्ञताबुद्धि असावी हें बरें असें म्हणण्याचा मतितार्थ. भाग्यप्राप्तीमध्यें अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणचे मनुष्य फुगून जाऊन ' अकृतज्ञ ' होतो, दुसऱ्यास तुच्छतेनें वागवितो किंवा त्यांचा अपमानहि करतो. हा दोष स्त्रीच्या हातून विवाहानंतर घडूं नये. नणदा, त्यांचे यजमान आणि दीर हा त्यांनंतर महत्त्वाचा वर्ग. त्यांशीं यथार्थ वर्तणूक असावी, शेवटीं भृत्यवर्ग येतो. यासंबंधीं '**परिजने दाक्षिण्यम् ।**' या सूत्रानें नोकरवर्गाच्या ठिकाणीं स्त्रीनें दाक्षिण्यानें म्हणजे आदर न सोडतां वर्तणूक ठेवावी असा वात्स्यायनांचा सल्ला आहे.

यानंतर बाहेरून पति आपली दिनचर्या संपवून घरीं येईल तेव्हां आवाज ऐकूनच घरांत त्याचें मूक स्वागत करून त्या मूक स्वागतांत असा भाव असावा कीं, जणूं स्त्री अशी पृच्छा करीत आहे कीं, ' **किं कृत्यं ?** ' मीं काय करूं ? ' समजा पतीचा कांहीं उधळेपणा दृष्टीस आला, तरी त्यास चार लोकांच्या देखत नव्हे तर हळूंच एकांतांत असतांना सूचना द्यावी. आपल्या माहेरीं, मित्रमैत्रिणींकडे वा बाहेर जाणें झाल्यास त्याची अनुज्ञा घेऊन जावें. ज्याप्रमाणें काय करावें, त्याप्रमाणें काय करूं नये, हें सांगतांना '**दुर्व्याहृतं ।**' क्रोधाविष्ट होऊन वा अन्य कारणानें दुर्वाच्य, दुर्निरीक्षित, वाईट किंवा ज्यांत प्रेम नाहीं

अशी नजर, पति घरीं आला तरी त्याच्याकडे पाठ करूनच बोलणें, अशा प्रकारच्या गोष्टी वर्ज्य समजाव्या. नववरांचें वधूसंबंधीं आकर्षण आणि अपेक्षा ज्या ज्या पुरुषांना माहीत आहेत त्यांना या सूत्रकाराचें मर्म सहज ध्यानीं येईल.

पुरुषानेंहि स्त्रींत प्रथम विश्वास उत्पन्न केला पाहिजे. वरणसंविधानामध्यें कन्या कशी असावी याचा विचार केल्यावर हा नवीन 'संबंध' दृढतर करण्याकरितां जसा स्त्रीस प्रेम व आदराचा आचार पुरुषासंबंधीं सांगितला, तसाच पुरुषासहि '**संबंधः ।**' या एकाच शब्दांत सांगितलेला दिसतो. श्वशुरादि कन्यापक्षाकडील पुरुषांशीं आदरानें वागावें. जेणेंकरून परस्परसंबंध जास्त सुखाचे होतील, एकमेकांबद्दल आदर दुणावेल, अशीच वर्तणूक असणें वैवाहिक यशाच्या दृष्टीनें हितावह आहे, असा कामसूत्रकारांचा थोडक्यांत अभिप्राय आहे. '**परस्परसुखास्वादाः ।**' (का. सू. ३.१.२३) या एकाच विशेषणांत त्यांनीं संबंध चांगले कसे ठेवावेत व वाढवावेत हें दिग्दर्शित केलें आहे. स्वस्त्रीचा विश्वास कसा संपादन करावा, याचा वेगळा विचार 'कन्याविस्रंभण' या प्रकरणांत येतो. स्त्रीस रतिप्रवृत्त करण्यास कसें वागावें, अशाकरितां हा भाग लिहिला गेला असला, तरी यांत पुरुषानें नववधूसंबंधीं दृष्टिकोन (Attitude) कसा ठेवावा याचा सहजच बोध होतो. कुसुमाप्रमाणें सुकुमार असणाऱ्या नववधूशीं हळुवार वृत्तीच धारण केली पाहिजे. दंडाचा कधींहि उपयोग करूं नये, तर नेहमीं सामाचाच उपयोग करावा. एकदां जर अविश्वास उत्पन्न झाला, तर स्त्रीमनांत पुरुषद्वेषाचा प्रादुर्भाव होतो व सुखाचा नाश होण्याचा संभव उद्भवतो. तेव्हां स्त्रीचा मानसन्मान वाढून आपल्यावर तिची जास्त प्रीति जडेल अशीच वर्तणूक पुरुषानें करणें जरूर आहे.

**आत्मनः प्रीतिजननं योषितां मानवर्धनम् ।** का. सू. ३.२.३३

या एकाच श्लोकांत पुरुषानें नववधूसंबंधीं काय दृष्टिकोन ठेवावा, हें वात्स्यायनांनीं दिग्दर्शित केलें आहे. जुन्या काळीं स्त्रीशिक्षण नव्हतेंच असें म्हणणें रास्त होणार नाहीं. भारतीय स्त्रीचें शिक्षण तिचें उपनिर्दिष्ट कार्यक्षेत्र लक्षांत घेऊन होत असलें पाहिजे. कामसूत्रकारांनीं 'विद्यासमुद्देश' नामक प्रकरणांत स्त्रीचें योग्य शिक्षण विवाहापूर्वीं पितृगृहींच झालें पाहिजें, असें म्हटलें आहे. विवाहोत्तर मात्र पतीच्या अनुमतीनें व्हावें, असा सल्ला आहे. स्त्रीस शास्त्रग्रहण

कठिण आहे असा कोणीं निषेध सांगितला तर त्यांसहि वात्स्यायनांनीं उत्तर दिलें आहे. शास्त्रांतून उत्पन्न झालेलें प्रायोगिक ज्ञान किंवा तात्पर्यार्थ स्त्री ग्रहण करूं शकते. शिवाय कोणतेंहि शास्त्रग्रहण व अभ्यास करणारे लोक जगांत थोडेच असणार, परंतु त्याचा उपयोग जाणण्याची शक्ति सर्वत्रांत असते. उदाहरणार्थ अणुशास्त्रज्ञ थोडेच; पण अणूच्या सामर्थ्याचे उपयोग सर्वत्रांना सांगतां येण्यासारखे असून ते कळण्यासारखेहि असतात. तात्पर्य, शास्त्राचा उपयोग हा सर्वत्रांस असल्यानें शास्त्राभ्यासजडत्व त्यांत आड येऊं शकत नाहीं. हें उत्तर मोठें मार्मिक व निरुत्तर करणारें नाहीं काय ? स्त्रीच्या शिक्षणांत कामशास्त्र व तदंगभूत चौसष्ट कला होत्या, असें या वर्णनावरून दिसतें. या कलांमध्यें गीत, वाद्य, नृत्य, वेषभूषा, शिवण, पाकशास्त्र, गंधशास्त्र, काव्य, गद्य इत्यादि वाङ्मय; सोनें, चांदी मोती इत्यादींची परीक्षा, वनस्पतिसंबंधीं माहिती, निरनिराळ्या भाषा, यंत्रकलेची माहिती, बालसंगोपनादि शास्त्रें, छंदःशास्त्रें वगैरे विद्या स्त्रीस गृहकृत्यांत चातुर्य प्राप्त करून देत होत्या. रति, शुश्रूषा, गृहकृत्य व धर्मकार्य या कार्यक्षेत्रांस धरूनच स्त्रीचा सर्व शिक्षणक्रम आंखला होता. एकचारिणीवृत्तांत स्त्री घरांत तेल गाळणें, उसाचा गूळ करणें आणि घरगुती औषधोपचार, सूतकताई व कपडे शिवण्यापासून पाकसिद्धि इत्यादि सर्व कार्य करीत असावी, असें दिसतें.

कामसूत्रकारांनीं जें शिक्षण व आचार लावून दिले, ते शेवटीं तिच्या ठरविलेल्या कार्यक्षेत्रांत ती उत्तम ठरावी याकरितां होते. अशी स्त्री कोणत्याहि पुरुषास गृहसौख्याची गोडी व आनंद उत्पन्न करूं शकेल आणि त्यामुळें शेवटीं पुरुषाचा पराक्रम द्विगुणित होऊन, तो स्थिरस्वरूप झाला म्हणजे ध्येयात्मक एकपत्नीकत्व (Ideal monogamy ) सिद्ध होईल, हाच कामसूत्रकारांचा उद्देश दृष्टीस पडतो. याप्रमाणें आचार घडल्यास त्या विवाहांतून यशप्राप्ति होते, लौकिक वाढतो व कुलसंवर्धन होतें, असा कामसूत्रकारांचा अभिप्राय आहे.

**पुत्रीयः यशस्यः लौकिकस्य भवति ।** का. सू. १-५-१

विवाहपूर्व सर्व विचार सुप्रजा या ध्येयास धरून आहे. हें पूर्वीं दिग्दर्शित केलेंच आहे. याशिवाय व्यक्तिमत्त्वाची जुळणी नीट होण्यासहि त्या सर्व विचाराची मदत होते, येवढें येथें लक्षांत घ्यावयाचें आहे.

विवाहकालीं सर्वसामान्य स्त्रीपुरुषांचीं वयें फार मोठीं नसणें हें व्यक्तिमत्त्वाच्या

अडचणी उत्पन्न न करण्यास फार चांगलें असतें. आणि कोंवळ्या वयाच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर योग्य तो परिणाम होण्यास उपयोगच होतो. व्यक्तिमत्त्व हें परस्परसंबंधानें वाढतें हें लक्षांत घेतां ज्या व्यक्तीशीं मातापितरांनंतर अत्यंत जवळचा आणि सनातन संबंध यावा व टिकावा ही इच्छा, त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशीं जुळतें होण्यास दोन व्यक्तींची गांठ फार उंच वयांत पडणें घातुक ठरेल.

व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीनें संबंधित पुरुषाबद्दल आदर वाटण्यास तो जरा स्त्री-पेक्षां वयानें मोठा असणें इष्ट असतें. सारख्या वयांतील स्त्रीपुरुष एकेमकांकडे शारीरिक भावनेनें आकर्षित झाले तरी त्यांत विवाहानंतर आदर उत्पन्न होतोच असें नाहीं. ‘ आदर ’ ही भावना स्त्रीस आपलें व्यक्तिमत्त्व पुरुषाशीं एकत्रित करण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें असतें, असें थोड्या विचारानें सहज दिसून येण्यासारखें आहे. ही भावना उत्पन्न होण्यास परस्परांत अगदीं सारखेपणा असण्यापेक्षां पुरुष हा जास्त वाढ झालेला ( Mature ) असणें जास्त इष्ट ठरेल.

पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें ‘ सुप्रजा ’ हा विवाहाचा स्पष्ट हेतु दाखवून दिल्यामुळें विवाहास साध्य आलें आणि त्यामुळें विवाह हें त्याचें साधन बनलें. गटांतील मंडळींना जेव्हां जेव्हां निश्चित साध्य असतें, तेव्हां तेव्हां त्यांचें साहचर्य चांगलें होतें, त्यांच्यांतील भेदभाव, स्वभाववैचित्र्य आणि इतर न जुळणाऱ्या गोष्टी अशा गटांतर्गत व्यक्ति साध्यांच्या दृष्टीनें बाजूस ठेवूं शकतात आणि मिळतें घेण्याचा शक्यतों प्रयत्न करतात, ही गोष्ट अनुभवाची व शास्त्रीय आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन भारतियांनीं विवाह हें साध्य न बनवितां स्पष्टपणें साधन बनविलें.

**भारतियांचा मूल्यविचार :**

ध्येयात्मक एकपत्नीकत्व व सुप्रजा हें विवाहांतर्गत ध्येय निश्चित केल्यामुळें भारतियांना मूल्यविचार करतांना कोणत्या गोष्टी जास्त महत्त्वाच्या हें ठरविणें प्राप्त झालें. हीं मूल्यें मनुष्याच्या वासनांना मुरड घालण्यास उपयोगाचीं ठरतात. निरनिराळ्या समस्यांत वागतांना कोणता मार्ग श्रेष्ठ व हितकर हें ठरविणें मनुष्याच्या मूल्यविचारावरच अवलंबून असतें. भारतियांनीं एकपत्नीकत्वाच्या ध्येयाला बळकटी यावी याच विचारानें हीं मूल्यें उत्पन्न केलेलीं दिसतात. हीं मूल्यें तीन भागांत मांडतां येतील.

## ( १ ) व्यभिचार अधर्म्य ठरविला.

स्त्रीपुरुषांना व्यभिचार हा भारतियांनीं सर्वांत अधर्म्य व निंद्य आचार ठरविला. विवाहित स्त्रीचें परपुरुषगमन व कोणत्याहि पुरुषाचें दुसऱ्या विवाहित परस्त्रीशीं गमन हा व्यभिचार, असा याचा अर्थ अभिप्रेत दिसतो. औद्दालकी श्वेतकेतु हा या सुधारणेचा प्रथम ऋषि असावा असें प्रतिपादन दुसऱ्या प्रकरणांत येऊन गेलेंच आहे. अर्थ व काम या दोन पुरुषार्थांना धरूनच कार्याकार्यविचार सांगतां येतो. कारण याच दोन हेतूंना धरून जगांतील बहुसंख्य मानवांची वर्तणूक असते. चोरी, व्यभिचार व खून हेच सर्वांत मोठे गुन्हे असून ते या दोन पुरुषार्थांना धरूनच आहेत. याच दोन गोष्टींवर शेवटीं सामाजिक स्थैर्य व कौटुंबिक सौख्य अवलंबून आहे असें दिसून येईल. स्त्री व पुरुष दोघांनींहि अन्योन्य अव्यभिचारी वृत्ति ठेवावी, हा सिद्धांत मनूनें स्पष्ट सांगितला. कामसूत्रकारांनीं ‘ पारदारिक ’ हें स्वतंत्र अधिकरणच लिहिलें आहे. उज्ज्वल पुरुष पाहून स्त्रींत, व सुंदर स्त्री पाहून पुरुषांत कामविकार सहजच जागृत होणें शक्य असतें. पुरुषविरहामुळें व्याकुळ होऊन, वंध्यत्वांत आपत्याच्या अपेक्षेनें, पुरुषाच्या बृद्धावस्थेंत पत्नी तरुण असल्यास, मात्सर्यदोषामुळें दुःख पावलेली, अशा निरनिराळ्या स्थितींत स्त्री स्वपुरुषापासून परावृत्त होऊन परपुरुषाशीं व्यभिचारास प्रवृत्त होणें शक्य असतें. शिवाय, कांहीं कारणांनीं पतीचा द्वेष करणाऱ्या, अतिकामविकारी अशाहि स्त्रिया असूं शकतात. पुरुषांत मदनविकार सहजच फार बलिष्ठ असतो. त्यांतल्यात्यांत जो जास्त विकारवश ( Hypersexual ), क्रीडा इत्यादि कर्मांत श्रेष्ठ, चारुवाक् व संभाषणकुशल, साहसी, विद्या-रूप-गुण इत्यादींनीं युक्त आणि यशस्वी पुरुष असेल, तर तो स्त्रीसंबंधीं सहजसिद्धहि असूं शकतो. व्यभिचाराचीं हीं कामशास्त्रीय कारणें सर्व समाजांत नेहमीं अस्तित्वांत असणें अपरिहार्य असतें. श्रीमंतांना शोक म्हणूनहि व्यभिचाराचें व्यसन असूं शकतें. ‘ ईश्वरकामितम् ’ या प्रकरणांत वात्स्यायनानें निरनिराळ्या प्रांतांतील राजांचे यासंबंधींचे प्रत्यक्ष आचार वर्णन केलेले दिसतात. परंतु लोकहिताची इच्छा असणाऱ्या राजानें हे सर्व व्यवहार कटाक्षानें टाळावे असाच सल्ला वात्स्यायनानें शेवटीं दिलेला आहे. सबंध पारदारिक प्रकरण सांगून झाल्यावर या प्रकरणाचा स्पष्ट हेतु वात्स्यायनानें दिलेला आहे. स्वस्त्रीचा दुसऱ्या पुरुषाकडून छळ होऊं नये अशी काळजी घेतां यावी, हा एक उद्देश असून धर्म व अर्थ हे दोन्ही पुरुषार्थ व्यभिचारानें

ल्यास जातात, हें तत्त्व लक्षांत घेऊन, पारदारिकत्व वर्ज्य करावें, असा स्पष्ट उपदेश वात्स्यायनऋषींनीं शेवटीं दिलेला आहे.

वरील विवेचनावरून व्यभिचार हें पातक ठरवून व्यभिचारास प्रवृत्त करणारा कामविकार भारतियांनीं अधर्म्य ठरविला. समाजस्थैर्य, कौटुंबिक सौख्य व एकपत्नीकत्व हीं मूल्यें स्थिर करण्याकरितां भारतियांनीं व्यभिचारास बंदी घातली व आजहि हा आचार मोठ्या प्रमाणांत आमच्या देशांत समाजांतील सर्व थरांत शिष्टाचार म्हणून समजला गेला आहे. सर्व देशी भाषांतून कवि व संतांनीं या मूल्यांचा अनुवाद अत्यंत निश्चयानें व जोरानें केलेला दिसून येईल.

## ( २ ) पातिव्रत्याचा विशेष संस्कार :

पूर्वी संस्काराचें थोडें वर्णन येऊन गेलेंच आहे. गुरूसंबंधीं अत्यंत आदर उपनयनसंस्कारांत अभिप्रेत आहे. स्त्रीची तिच्या पतीशीं पातिव्रत्याच्या वागणुकीची उत्तम शिष्यांच्या गुरूसंबंधीं वागणुकीशीं तुलना करतां येईल. शिष्याची गुरुभक्ति व स्त्रीची पतिभक्ति या सारख्याच आहेत. पुरुषास विद्येकरितां गुरुभक्ति सांगितली व स्त्रीस कुटुंबसौख्याकरितां पतिभक्तीचा उपदेश दिला. दोनहि संस्कारांत भक्ति व आदर यांची दुसऱ्या व्यक्तीबद्दल जोपासना अभिप्रेत असून, त्या व्यक्तीपासून निश्चित लाभ करून घ्यावयाचा आहे.

पतिसंबंधीं स्त्रीची बुद्धि काय असावी, याबद्दल भारतियांचा पातिव्रत्य हा विशेष दृष्टिकोन आहे. यांत पतीबद्दल फक्त ‘ लैंगिक व्यवहाराचा पुरुष, समाजाची एक ढाल, कायदेशीर करारानें बांधून घेतलेला एक गुलाम किंवा थोडें पाप करण्याकरितां जोडीदार ’ असा कोणताहि दृष्टिकोन येत नसून, पति हा स्त्रीच्या सर्व भाग्याचा धनी, तिचीं शरीर व मन यासंबंधीं संपूर्ण सुखदुःखें ज्याच्या हातीं आमरण दिलीं जातात तो आयुष्याचा धनी, असा दृष्टिकोन असून त्यास देवासमान मानावें, त्याच्या गुणावगुणांची चर्चा करू नये, त्याच्या गुणावगुणांत एकत्रित व्हावें आणि तो कसाहि भलाबुरा असो, त्याच्याशीं भक्तीनें समरस व्हावें, हा पातिव्रत्याचा अर्थ. स्त्रीच्या दृष्टीनें ही भूमिका योग्य वा अयोग्य असा सध्यां प्रश्न नसून स्त्रीची पतिभक्ति काय दर्जाची होती, हें समजून घेण्याकरितां आम्ही हा आर्यसंस्कृतीचा विशेष दृष्टिकोन येथें विशद करीत आहोंत. याचा असाहि अर्थ

लावूं नये कीं त्यागी, सत्त्वशील आणि पतिभक्त बायका पाश्चिमात्यांत नव्हत्या किंवा आज नाहींत.

**अनृतावृतुकाले च मंत्रसंस्कारकृत्पतिः ।**
**सुखस्य नित्यं दातेन परलोके च योषितः ॥** मनु. ५.१५३

मनुस्मृतिकारांनीं स्त्रीधर्म सांगतांना तिनें स्वतंत्र राहूं नये असा प्रथम सल्ला देऊन पुढें साध्वी स्त्रीनें पतीस देव मानून रहावें असें सांगितलें आहे. कारण तोच ऋतुकालीं व इतर वेळीं स्त्रीस सुख देऊं शकतो. याच्यापुढें स्मृतिकार लिहितात,

**नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।**
**पतिं शुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ॥** मनु ५.१५५

स्त्रियांस दुसरा यज्ञ नाहीं आणि व्रतें नाहींत. पतिसेवा हेंच तिचें व्रत आणि हाच यज्ञ. याप्रमाणें जी व्रतस्थ रहाते, तेंच पातिव्रत्य अथवा पतिव्रताव्रत. "**यो धर्म एकपत्नीनां कांक्षन्ती तमनुत्तमम् ।**" (मनु. ५.१५८.) येथें एकपत्नी हें विशेषण स्त्रीस उद्देशून आहे, हें लक्षांत आणावें. '**एकः पतिः यस्याः सा**' एक पति आहे जिचा ती एकपत्नी, असा हा समास असून याचा मराठींत अर्थ विपरीत आहे. मुद्दाम वाचकांच्या निदर्शनास आणलें एवढेंच. एकपत्नीव्रताचें हें व्रत आर्य स्त्रीमध्यें फार जुन्या काळापासून प्रचलित आहे. पतिव्रता स्त्री ही भारतीय समाजांत फार आदरास आणि मान्यतेस पावलेली आहे. सीता, सावित्री इत्यादि पंचकन्या या भारतीय संस्कृतींत आदर्शभूत मानल्या गेल्या आहेत. तात्पर्य, पातिव्रताव्रत हा भारतियांचा एक विवाहविषयक विशेष दृष्टिकोन असून हा ध्येयवाद प्रत्यक्षांत आणण्यासाठीं भारतियांनीं स्त्रीमनावर हा संस्कार राहावा आणि वाढावा, याकरितां मोठे परिश्रम केलेले दिसतात. हे परिश्रम कोणते तें आतां पाहणें आहे. या परिश्रमांत दोन प्रकार येतात. प्रथमतः स्त्रीमनावरील संस्कार आणि नंतर पुरुषांस शिकवण. यांतील स्त्रीमनावरील संस्कारांचा विचार करतांना स्त्रीस भारतियांनीं जे वर्षाकांठीं विवाहानंतर निरनिराळे आचार लावून दिलेले आहेत त्यांचा विचार येतो. येथें या समग्र आचारांचें विस्तृत वर्णन देतां येणार नाहीं. फक्त स्त्रीस तिच्या पतीस धरून जे संस्कार येतात तेवढ्यांसंबंधींच संक्षेपानें वर्णन करूं.

**वटसावित्री** : ज्येष्ठ पौर्णिमेस येते. सावित्रीचा आदर्श स्त्रीनें ठेवावा यासाठीं हें व्रत आहे. बंगालमध्यें या दिवशीं स्त्रिया आपल्या पतीची पूजा करतात.

**मंगलागौरी :** हें व्रत विवाहानंतर ५ वर्षें कर्तव्य असतें. याचा उद्देश सौभाग्यवृद्धि असा आहे. हा उत्सव श्रावणमासांत येतो.

**हरितालिका :** हें व्रत भाद्रपद महिन्यांत येतें. हें कौटुंबिक व्रत असून पार्वतीस जसा इष्ट पतिलाभ झाला तसा व्हावा या हेतूनें करावयाचें असतें. त्यामुळें हें व्रत कुमारिकाहि करतात.

**गौरीउत्सव :** भाद्रपद शुक्ल पक्षांत अनुराधा नक्षत्रावर गौरीचें आवाहन आहे. पूर्वी कोलासुर नामक दैत्यानें स्त्रियांस फार त्रास दिला. त्यांनीं एकत्र येऊन देवाजवळ या त्रासांतून मुक्त होण्याचा वर मागितला आणि महालक्ष्मीनें त्याचा वध करून स्त्रियांस मुक्त केलें. या कथेस धरून हा उत्सव आहे.

**तुलसीविवाह :** कार्तिक शुद्ध द्वादशीस हा उत्सव येतो. वृंदा नामक स्त्रीच्या पातिव्रत्यामुळें जालंधरास सामर्थ्य प्राप्त झालें, असें यासंबंधींच्या कथेंत येतें. पतिपरायण सहधर्मचारिणी असली, म्हणजे पुरुषाच्या कार्यास फार बहर येतो, असा याचा लौकिकार्थ. यासंबंधींची कथा मोठी गमतीची आहे. स्त्रीच्या पातिव्रत्यामुळें पुरुषास एवढी शक्ति प्राप्त होते, कीं देवसुद्धां त्याला घाबरतात. न जाणों हा आपली जागा घेईल. स्त्रीच्या पातिव्रत्यामुळें पुरुषास फार मोठी शक्ति प्राप्त झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आमच्या पुराणांत आढळतात. वरील सर्व व्रतें स्त्रीचें सौभाग्य, पातिव्रत्य आणि पतिनिष्ठा यांस धरून असून त्यांसंबंधींच्या कथा त्या दिवशीं स्त्रिया भक्तिभावानें ऐकतात, त्यादेखील त्यांच्या मनावर पातिव्रत्याचा परिणाम घडावा अशाच आहेत.

पातिव्रत्याच्या संस्काराचा अतिरेक होऊन सतीची चाल आलेली दिसते. पतिनिधनानंतर त्याच्याच चितेवर आत्मबलिदान करणाऱ्या अनेक स्त्रिया श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत व ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत समाजांतील सर्व थरांत या देशांत झालेल्या दिसतील. वय, वित्त व विलोभनें यांचा त्यांच्या मनावर यत्किंचितहि परिणाम अशा वेळीं झालेला दिसत नाहीं. यावरून संस्काराचा परिणाम केवढा बलवत्तर होऊं शकतो, हें सहज वाचकांच्या ध्यानीं येईल. निरनिराळ्या युरोपीय, व्यापारी व राजकारणी पुरुषांच्या ग्रंथांतून आणि शिवाय मिशनरी लोकांनीं आपल्या वृत्तांतून सतीचीं वर्णनें दिलेलीं आहेत. परंतु पुष्कळ ठिकाणीं या चालींत स्वेच्छेनें प्रेरित होऊन सती जाणाऱ्यांची संख्या बरीच होती असें दिसतें. स्मृतिकारांनीं

पतिनिधनानंतर जो आचार साध्वी स्त्रीस म्हणून सांगितला आहे त्यांत तिनें ब्रह्मचारी वृत्तीनें यमनियमांनीं स्वतःचें मन ताब्यांत ठेवून जगावें असा उपदेश आहे. ( मनु. ५.१६०. ) सहगमन किंवा सतीचा उल्लेख मनुस्मृतींत दिसत नाहीं. परंतु पातिव्रत्याच्या संस्काराचा पुढें रूढींत अतिरेक झालेला दिसतो आणि सहगमनाचें परलोकीं अपार पुण्य आहे, अशी श्रद्धा फार दृढतम झाल्यामुळें सहगमनासारखें अत्यंत धाष्ट्र्याचें कृत्यहि सती जाणाऱ्या स्त्रिया अत्यंत आनंदानें करीत. त्यांच्या चेहऱ्यावर खेदाचा वा भीतीचा थोडासुद्धां भाव दृष्टीस पडत नसे, असेंच पुष्कळ लेखकांचें मत आहे. मोठमोठ्या राजघराण्यांतहि स्त्रिया आनंदानें सती जात असत. विजयानगर साम्राज्याच्या पूर्वीपासून हीं वर्णनें वाचावयास मिळतात. इ. स. ५१०-५११ चा एक शिलालेख अजून वाचावयास मिळतो. त्यांत गोपराज नांवाचा एक वीर राजा द्वंद्वयुद्धांत मारला गेल्यावर त्याच्या साध्वी स्त्रीनें सहगमन केलें. बार्बोसा, ( Barbosa ), फ्रायर जार्डनस् ( Friar Jordans ), डॉ. चीव्हर ( Chever ) रेव्हरंड विल्यम बटलर व डॉ. सालेटोर इत्यादि अनेक नामवंत प्रवासी व इतिहासकार यांनीं या चालीचीं भरपूर वर्णनें दिलेलीं दिसतात. पंजाबचा सिंह, महाराजा रणजितसिंह याच्या अकराहि राण्या समारंभानें स्वेच्छेनें सती गेल्याची नोंद आहे. ही चाल रूढीनें केव्हां सुरू झाली व फैलावली हें समजणें कठिण आहे व कदाचित् कांहीं प्रमाणांत भिक्षुकांच्या द्रव्यलोभांतहि या चालीचा फैलाव झाला असणें शक्य आहे. पण ही चाल पुष्कळ शतकें अस्तित्वांत होती. विशेषतः श्रीमंत व राजघराण्यांत विशेष होती आणि शिवाय स्त्री स्वेच्छेनें, केवळ श्रद्धेनें सहगमनास सिद्ध होत असे. तिला पुत्रादि किंवा वित्तादि विलोभनें मागें खेचण्यास असमर्थ होतीं या गोष्टी सत्य आहेत. केवढा हा संस्काराचा परिणाम ! ब्रिटिश शिस्तीमध्यें जळत्या बोटीवर ताठ उभा राहणारा खलाशी किंवा आज्ञापालनाकरितां चुकीची आज्ञाहि पाळून समोरासमोर मरण पत्करणारे सहाशें ब्रिटिश स्वार यांच्या शिस्तीच्या संस्काराइतकाच कौतुकास्पद पातिव्रत्याचा स्त्रीमनावरील संस्कार नव्हता काय !

### ( ३ ) वंशसातत्य ठेवणें हें कर्तव्य ठरविलें.

सुप्रजा हा विवाहाचा नुसता हेतु म्हणून सांगितल्यानें कार्यभाग होत नाहीं. प्रजोत्पादन हें एक महत्त्वाचें ‘ मूल्य ’ म्हणून भारतीय संस्कृतींत संस्कारित केलें गेलें. यास धरून भारतियांनीं तीन ऋणांची कल्पना पुढें आणली.

**ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत्** । मनु. ६.३५.

ऋषिऋण हें विद्यार्जनानें फिटतें. यज्ञानें देवऋणांतून मनुष्य मुक्त होतो व सुप्रजेनें पितरांच्या ऋणांतून त्याची सुटका होते. ह्या तीन ऋणांतून मुक्त झाल्याशिवाय मोक्षाचा मार्ग मोकळा होत नाहीं आणि त्याशिवाय मोक्षास न जातां तो अधोगतीसच जातो. ही भारतियांची कल्पना पुरुषांच्या उच्च आचारास फार फायदेशीर झालेली दिसते.

वंशसातत्य ही गोष्ट वाटते इतकी साधी नाहीं. गर्भधारणा ही जरी नित्यपरिचयाची सामान्य गोष्ट अतिपरिचयामुळें महत्त्वाची वाटत नसली, तरी एका पुरुषाच्या सातत्यानें दहा पिढ्या सरळ सांगणें कठिण आहे. निसर्गांत गर्भधारणा जितकी सहज पाहावयास मिळते, तितकेंच वंशसातत्य पाहणें दुर्मिळ आहे. श्रेष्ठ व कर्तृत्ववान् कुलांचें सातत्य हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें महत्त्वाचें असून, श्रेष्ठकनिष्ठ प्रतीच्या निरनिराळ्या सामाजिक थरांत प्रजोत्पादनक्षमता भिन्न ( Differential fertility ) असते असें पूर्वीं आम्हीं दिग्दर्शित केलेंच आहे. तेव्हां कर्तृत्ववान् घराण्यांतून सातत्य कसें ठेवतां येईल, याची विशेष काळजी भारतियांनीं घेतलेली दिसते. वंशसातत्य हें ऋण समजून त्याकरितां योग्य तो संस्कार उत्पन्न केल्यामुळें कर्तृत्ववान् वंशांचें सातत्य बराच काल टिकण्यास मदत झाली असावी हें खरें.

वरील एकंदर विवेचनावरून भारतियांनीं स्त्रीपुरुषांचें परस्परपूरकत्व लक्षांत घेऊन कुटुंब ही राष्ट्रास सुप्रजेचा पुरवठा करणारी आद्यसंस्था म्हणून एकंदर रचना केलेली दिसते. कुटुंबांतील स्त्रीपुरुष हे घटक हक्काकरितां एकमेकांशीं भांडणारे किंवा प्रत्येक बाबींत स्पर्धा करणारे घटक न ठरतां एकमेकांस पूरक ठरले.

एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तींत स्वतःस संपूर्ण मिसळून घ्यावयाचें असें म्हटल्यास ज्या गोष्टींची जरुरी लागते त्या गोष्टी स्त्रीपुरुषांत असाव्या याकडे भारतियांनीं लक्ष पुरविलें. त्यांत मुख्यतः स्त्रीस पुरुषाच्या कुलांत नांदावयास जाऊन तेथें समरस होतां यावें यासाठीं स्त्रीचें वय, तिची पतिसंबंधीं कल्पना, तिचा वडील मंडळींशीं ठेवावयाचा आचार इत्यादि सर्व बाबी, कीं ज्या तिच्या आयुष्यांत

वैवाहिक जीवनांत नित्यशः येणार, त्यांसंबंधीं रेखीव विधिनिषेध सांगून त्यांत ध्येयात्मक आचार कोणते हें प्रतिपादन केलें. या सर्व गोष्टी सुलभतेनें घडाव्या याकरितां स्त्रीपुरुषांस धरून संस्कारपरंपरा निर्माण करून त्यांमुळें मनास एक प्रकारचें निश्चित वळण देण्याचा पद्धतशीर प्रयत्न करंण्यांत आला.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि. ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# प्रकरण ७ वें

## भारतीय ध्येयाचारांचें लोकशिक्षण आणि प्रत्यक्ष आचार

**ध्येयें आचारांत आणण्याची भारतीय पद्धति — ध्येयाचारांचा सामान्य समाजावर परिणाम — ध्येयाचारांची दुःस्थिति होण्याची कारणमीमांसा — विविधता अपरिहार्य — विवाहनिश्चयाचा कांहीं वेळीं स्त्रीस अधिकार — विवाहाचे आठ प्रकार — स्त्रीकरितां आपद्धर्म — सपत्नीकत्वाची कारणमीमांसा — बहुभार्यात्वाची भारतीय चाल — वेश्याव्यवसाय — भारतीय दृष्टिकोन.**

**ध्येयें आचारांत आणण्याची भारतीय पद्धति :** मागील प्रकरणीं भारतियांचीं वैवाहिक ध्येयें सांगितलीं. तीं प्रचारांत आणण्यास आमच्या पूर्वजांनीं किती पद्धतशीर खटाटोप केला होता, याचें दिग्दर्शन करून या देशांतील आचारावर प्रत्यक्ष झालेल्या परिणामांचा विचार करूं. कोणतेंहि ध्येय विचारी लोकांत मान्यतेस पावल्यावर सामान्य लोकांना तत्संबंधांत आचारास प्रवृत्त करण्याकरितां भारतियांची कांहीं विशेष पद्धति दिसते. त्या पद्धतीप्रमाणें प्रथमतः ती कल्पना धर्मकल्पनेंत विलीन होते. ‘ धर्म ’ शब्दाचें विस्तृत विवरण सुरवातीच्या प्रकरणीं दिलें आहे. त्यावरून व्यष्टिसमष्टींचें इहपरलोकीं शाश्वत कल्याण व समाधान या मुद्द्यांस धरून मानवाच्या सर्व व्यवहारविचारांवर धर्मकल्पनेची कशी छाया पसरलेली

असते, हें सहज समजून येईल. त्यांत राज्यशासनापासून विवाहापर्यंत सर्वत्र धर्मानें कांहीं विशेष आदेश दिले आहेत. हे आदेश म्हणजे कर्माकर्मासंबंधीं कांहीं निश्चित विधिनिषेध होत. ते विधिनिषेध सांगतांना कांहीं निश्चित तत्त्वप्रणाली मान्य केली गेली होती. भारतियांचीं विवाहांतर्गत ध्येयें कांहीं वस्तुनिष्ठ तत्त्वप्रणालीस धरून होतीं. ही तत्त्वप्रणाली देशकालनिरपेक्ष आहे. त्यामुळें ती सनातन-स्वरूप बनली आहे. धर्म या विस्तृत कल्पनेंत कोणतेंहि ध्येय बसविलें कीं मानवी मनावर त्याचा ज़ास्त दृढ संस्कार होण्यास मदत होते. कायदा हा वेगळा नसून विधिनिषेधात्मक धर्मशास्त्रासच कायद्याचें स्वरूप असतें. पौर्वात्य मनावर धर्मसंस्कार बलवत्तर असल्यानें धर्मशास्त्रीय विधिनिषेधांच्या आचाराकडे लोकांची सहजप्रवृत्ति असते. परंतु धर्मशास्त्रांत ध्येयाचारांचा नुसता समावेश केल्यानें भागत नाहीं. शास्त्र-विचार सर्वांकरितां केव्हांच नव्हता व आजहि नाहीं. तेव्हां शास्त्र लोकाचारांत येण्याकरितां भारतियांनीं आणखी कांहीं बुद्धिगम्य गोष्टी केलेल्या दिसतात. लोक-शिक्षणांत अनुकरणाचें ( Imitation ) महत्त्व लक्षांत घेऊन, ज्यांचें अनुकरण करावें असा एक श्रेष्ट वर्गच निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अनुकरणाचें महत्त्व मानसशास्त्रज्ञांसहि मंजूर आहे.

"Imitation is a significant factor in fad and fashion, custom and tradition, crowd-behaviour and social institutions."

( D. Katz p. 299. )

पद्धत, परंपरा आणि सामाजिक संघटना कोणतीहि असो, तींत अनुकरणास फार महत्त्व आहे.

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते॥** भ. गी. ३.२१.

श्रेष्ठांचा आचार व पद्धति इतर लोक आपोआपच उचलण्याचा थोडाफार प्रयत्न करतात. या मूळ तत्त्वास धरून भारतियांनीं 'ब्राह्मण' हा वर्गच उच्च आचाराचा असावा असें ठरविलें आणि त्या वर्गास श्रेष्ठ असे सर्व आचार लावून दिले. '**आचाराद्उच्यते विप्रः**' आचारांमुळें ब्राह्मण म्हटला जातो. आचार व श्रेष्ठत्व यांची अशी सांगड घालून ब्राह्मण या संघाची त्यांनीं उत्पत्ति केली. श्रेष्ठ आचारा-शिवाय ब्राह्मणत्व नाहीं. उच्च आचार व ब्राह्मणत्व या गोष्टी मनूस अविभाज्य

होत्या. नियमांच्या पालनामुळें, संस्कारांमुळें व प्रकृतिश्रेष्ठत्वामुळें सर्व वर्णांचा ब्राह्मण गुरु झाला. श्रीशंकराचार्यांनीं याचाच अनुवाद खालील वाक्यांत केलेला दिसतो.

**ब्राह्मणत्वस्य च रक्षणेन रक्षितः स्याद्वैदिको धर्मः ।**

( भगवद्‌गीताभाष्य प्रस्तावना )

ब्राह्मणत्वाच्या रक्षणानें सर्व वैदिक धर्मांचें म्हणजे तदधीन असलेल्या वर्णाश्रमांचें परिपालन होईल असा सिद्धांत. 'ब्राह्मणत्व' म्हणजे 'ब्राह्मणांचे' असा संकुचित अर्थ नसून उच्च आचारांचे असा अर्थ योग्य. कारण उच्च आचार हेंच ब्राह्मणत्वाचें खरें गमक मनूपासून सर्वांनीं मानलें आहे. मूलतः वर्णभेद कसा झाला वगैरे गोष्टी आज बुद्धीच्या पलीकडील आहेत. पण प्रत्येक समाजांत कांहीं गट किंवा वर्गव्यवस्था ही असतेच. फक्त येथील व्यवस्थेइतकी पद्धतशीर ती कोठेंच आढळणार नाहीं. तात्पर्य, उच्च आचार प्रस्थापित करण्याकरितां या देशांत ब्राह्मण या बुद्धिजीवी वर्गाची योजना शास्त्रज्ञांनीं केलेली दिसते. यामुळें ब्राह्मण वर्गावर फार जबाबदारी येऊन पडते. त्या योजनेप्रमाणें ध्येयात्मक आचारांचें प्रत्यक्ष दर्शन बहुजनसमाजाला व्हावें व त्या उदाहरणानें श्रेष्ठ काय असूं शकतें याची त्यांना प्रत्यक्ष कल्पना यावी असा उद्देश. ध्येयात्मक आचार म्हटल्यावर सहजच ब्राह्मणांवर फार कडक बंधनें घालण्यांत आलीं. मद्यमांसनिवृत्ति; एकपत्नीकत्व, संपूर्ण अर्थशौच, निस्पृहत्व, सत्ता, पैसा व सत्कार यांपासून अलिप्तता; परद्रव्यापहार व परदारागमन वर्ज्य; चतुर्विधपुरुषार्थाला धरून आश्रमधारणा आणि अध्ययन व अध्यापन ही वृत्ति असा आचार ब्राह्मणांसाठीं सांगितला. रागद्वेषांच्या आहारीं ब्राह्मणानें न जातां वृत्ति शांत व समाधानी ठेवावी असा दंडक होता. अर्थस्पर्धा, सत्तास्पर्धा त्यास वर्ज्य होती. अशा प्रकारच्या उच्च आचारास धरून, त्यास श्रेष्ठत्व व तदनुषंगिक मान हा समाजांत मिळावा हें ठीकच होतें. प्रकृतीनें व संस्कारानें श्रेष्ठ आचाराचा ब्राह्मण तयार करून भारतियांनीं शास्त्राचाराचें प्रात्यक्षिक दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. यामुळें बहुजनसमाजाचें प्रत्यक्ष शिक्षण होण्यास व त्यांना सदाचारप्रवृत्त करण्यास उपयोग झाला.

यानंतर सर्व मूल्यविचार ( Values ) या उच्च आचाराला पोषक असा केला. उदाहरणार्थ, विद्या हें ब्राह्मणकर्म म्हटल्यावर विद्येला सर्वांत श्रेष्ठ ठरविलें. वित्त, बंधु, वय, कर्म व विद्या यांत विद्येस प्रथम व वित्तास शेवटचें स्थान दिलें.

श्रेष्ठ मान्यस्थानास धरून सहजच मनुष्याची प्रवृत्ति होत जाते. एवढ्यावरच न थांबतां, श्रेष्ठ आचार व मूल्यें यांना धरून पुष्कळ काव्यसंभार निर्माण केला. काव्यकथा ही मनुष्याच्या मनाची सहज पकड घेणारी गोष्ट असल्यानें काव्याचा उपयोग लोकशिक्षणाकडे भारतियांनीं भरपूर केलेला दिसतो. पूर्वीं कालिदासाच्या वाङ्मयाचा थोडा विशेष या दृष्टीनें वर्णन केलेला आहेच. वैवाहिक ध्येयें व ध्येयाचार लोकवाङ्मयांत कसे ग्रथित केलेले आहेत, हें रामायण या भारतियांच्या महाकाव्या-सारख्या ग्रंथावरून दिसून येईल. रामसीता हें प्रेम, हा परस्परांविषयीं आदर आणि संपूर्ण त्याग, यांतील एकमेकांविषयींची आस्था आणि विश्वास, यांतील भोगापेक्षां त्यागाची अहमहमिका आणि शेवटीं यांतून उत्पन्न होणारी 'बापसे बेटा सवाई' अशी सुप्रजा, हा भारतियांचा यशस्वी विवाहाचा ध्येयवाद आहे.

श्रीवाल्मीकींनीं रामायण लिहिल्यानंतर आजपर्यंत किती तरी भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं. संस्कृतप्राकृत काव्यांत या कथेची केवढी मोठी छाप आजहि सर्वत्र दिसून येते. शतकानुशतकें हें काव्य अवीट राहिलें आहे. या कथेचा प्रचार व प्रसार हरिदासांपासून डफवाल्यांपर्यंत मोठ्या आत्मीयतेनें होत आहे. हें सर्व पाहिलें म्हणजे उंच ध्येय मानवाच्या आचारांत हळूहळू उतरवून त्यास आचारास प्रवृत्त करण्याचा फार मोठा खटाटोप भारतियांनीं केला, हें सहज दिसून येईल. रामसीतेचा ध्येयवाद थोडा वाल्मिकींच्या भाषेंतच खालीं उध्दृत करतों.

**गुणाद्रूपगुणाच्चापि प्रीतिर्भूयोऽभ्यवर्धत** । रा. अयो. २७.७७.

गुण व रूप या दोहोंमुळें त्यांची प्रीति वाढत गेली. सव्विसाव्या सर्गांत राम वनवासास जाण्यास निघाले असतांना सीतेस प्रथम त्यांनीं घरींच राहण्याचा पोक्त सल्ला दिला. आणि कसें राहावयाचें तेंहि सांगितलें. त्यांत '**स्थिरा भव यशस्विनि** ।' तूं स्थिरचित्त राहा. वृद्ध मातापित्यांना मानसन्मानानें वागवीत जा. '**त्वत्तः संमानमर्हति** ।' इतर सावत्र मातांनाहि तूं नीट सन्मानानें वागव. कारण '**स्नेहप्रणयसंयोगैः समा हि मम मातरः** ।' माझ्याप्रमाणेंच त्या तुझें कोडकौतुक करतील.

या सर्व उपदेशावरून स्त्रीचा सासूसासरा वगैरे वृद्धजनांशीं आणि त्यांचा नववधूशीं कसा संबंध असावा हें निश्चित शब्दांत कवीनें वर्णन करून ठेवलें आहे. मानसन्मानानें आणि आदरानें वृद्धांना वागविणारी सून आणि पुत्राप्रमाणें कोडकौतुक

करणारी सासू आज जरी दुर्मिळ असली तरी हा ध्येयवादी आचार आमच्या समाजांत अस्तित्वांत नव्हता असें नाहीं. अजूनहि कांहीं प्रमाणांत कांहीं ठिकाणीं तो पाहण्यास तरी खात्रीनें मिळेल. यानंतर सीतेनें या रामाच्या उपदेशास जें प्रत्युत्तर दिलें तेंहि मोठें मार्मिक आहे.

'**प्रणयादेव संक्रुद्धा।**" लटकेंच रागावून सीता म्हणते, 'काय हें बोलणं!' '**किमिदं भाषसे राम**' अशी सुरवात करून सीतेच्या तोंडीं एक महत्त्वाचें तत्त्व कवीनें गोवलें आहे.

**आर्यपुत्र पिता, माता, भ्राता, पुत्रस्तथा स्नुषा।**
**स्वानि पुण्यानि भुंजानाः स्वं स्वं भाग्यमुपासते॥ ३॥**
**भर्तुर्भाग्यं तु भार्यैका प्राप्नोति पुरुषर्षभ॥ ४॥** रा. अयो. २७

पिता, माता, भ्राता, स्नुषा इत्यादि स्त्रीचे सर्व बांधव हे आपापल्या पुण्य-पापाचे धनी होतात. प्रत्येकाचें भाग्य स्वतंत्र असून, ते स्वतःच्या भाग्यानुसार वागतात. पण भार्येचें भाग्य हें पतीच्या भाग्यानुसारच चालत असल्यामुळें मी येथें राहणें इष्ट नाहीं. '**नारीणां पतिरेको गतिः।**' स्त्रियांना पति ही एकच गति आहे. सर्व अवस्थांत त्यांना पतिछाया ही सर्वांत महत्त्वाची असते. त्याच्याबरोबर कोठेंहि राहून त्याच्या सुखदुःखांत सहभागी होणें हाच स्त्रीचा धर्म. रामचंद्रांनीं, 'तूं येथेंच धर्माचरण करून राहा. अरण्यांत फार भयंकर स्थिति असते.' 'दुःखमेव सदा वनम्।' 'वनवास हा सर्व दुःखमयच असतो.' इत्यादि वचनांनीं सीतेचें मन वनवासापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. परंतु त्यामुळें सीता परावृत्त होण्याऐवजीं अत्यंत दुःखी मात्र झाली. कांहीं काळ तिला काय बोलावें तें कळेना. पण मग ती पुन्हां हळूंहळूं बोलूं लागली. 'हे राम, मला ह्या जीविताच्या त्याग करावा लागेल. कोठेंहि राहण्यापेक्षां वनवासच मला आवडेल. भर्ता हेंच माझें दैवत असून त्याच्याच मागें मी जाणार. मी भक्त आहें, पतिव्रता आहें. मी तुझ्या सुखदुःखांत संपूर्ण एकत्व पावलेली आहें. आणि मी सुखदुःख समान समजणारी आहें. तेव्हां मला आपल्याबरोबर नेणें तुझें कर्तव्य आहे.' तेव्हां शेवटीं नाइलाजास्तव '**अनुगच्छस्व मां भीरु सहधर्मचरी भव।**' असें म्हणून सीतेस नेणें रामचंद्रास भाग पडलें.

वरील संवाद जरा विस्तारानें देण्यांत हेतु एवढाच कीं, स्त्रीसंबंधीं जुना

ध्येयाचार काय होता हें भारतियांच्या परम पवित्र आणि सर्वोत्कृष्ट कथानकांत कसें विशद केलें आहे हें दाखविणें. श्रीरामचंद्र एकपत्नीव्रत होते हें सर्वश्रुतच आहे. दशरथ हा अनपत्यत्वामुळें केवढा दुःखी होता, त्यानें पुत्रेच्छेनें केवढा यज्ञ केला हें दाखवून **'संतानार्थं कुलस्य च'** (रा. बालकांड २१-५) या श्लोकानें कुला-करितां संतान हें महत्त्वाचें ध्येय कवीनें प्रतिपादन करून ठेवलें आहे. प्रस्तुत स्थलीं यापेक्षां या काव्याचा जास्त परामर्श घेणें कठिण आहे. स्त्रीपुरुषांच्या वैवाहिक आचारासंबंधीं ध्येयें सर्व रामायणांत विखुरलेलीं दिसतील. दशरथाचें बहुपत्नीकत्व असलें तरी सर्वांस समानतेनें वागविण्याची वृत्ति, मत्सरानें उत्पन्न होणारा सर्वनाश वगैरेसंबंधीं रामायण प्रत्यक्ष प्रमाण आहे. मत्सरभाव हा सर्वथा अत्यंत हीनभाव म्हणून भारतियांनीं सर्वथा त्याज्य आणि दंड्य मानला आहे. त्यानें जो नाश उद्भ-वतो, त्याचें शोकरसप्रधान काव्यमय चित्र हें रामायणासारखें क्वचितच आढळेल. एवंच, रामायणावरून आर्यांचीं विवाहासंबंधीं ध्येयें काय होतीं, हें स्पष्ट होतें. संतति हा विवाहांतील उद्देश, स्त्रीपुरुषप्रेमांतून आणि परस्परत्यागाच्या भावनेंतून उत्पन्न होणारें अंतःप्रेरित आणि म्हणून चिरस्थायी एकपत्नीकत्व, (Ideal monogamy) स्त्रीची संपूर्ण पुरुषभक्ति, पुरुषाचा पराक्रम हेंच पौरुष, कांहीं प्रसंगा-नुरूप बहुपत्नीकत्व हा प्रसृत आचार व त्या परिस्थितींत परस्पर मत्सर ही स्त्रियांची सर्वस्वी ताज्य भावना, स्त्रियांस समान वागविण्याचें पुरुषाचें कर्तव्य इत्यादि विवाहांतर्गत सर्व आचारांचें चित्रण, वाल्मीकींनीं अत्यंत उत्कटतेनें दिलेलें दिसेल.

याप्रमाणें निश्चित केलेलीं ध्येयें लोकाचारांत शक्यतों यावींत याकरितां भारतियांची कांहीं निश्चित योजना दिसते. ती अशी,

(१) धर्मकल्पनेंत ध्येय प्रविष्ट करून संस्कार उत्पन्न करणें.

(२) ध्येयाचारास धरून उच्चवर्णियांत आचार प्रसृत करणें.

(३) उच्च आचारास धरून मूल्यविचार सुचविणें.

(४) त्याचें चित्र काव्यांत आणून लोकशिक्षण देणें.

याप्रमाणें भारतियांनीं सर्व वैवाहिक मूल्यें, संस्कार, प्रत्यक्ष उदाहरण व शिक्षण अशा बुद्धिगम्य योजनांनीं या देशांत लोकाचारांत आणण्याचा प्रयत्न केला.

एक गोष्ट मात्र खरी कीं, संपूर्ण ध्येयाचार सर्व ब्राह्मण समाजांत कधीं होता कीं नाहीं, हें सांगतां येणार नाहीं. नव्हताच म्हणणें जास्त सयुक्तिक आहे. परंतु श्रेष्ठ आचाराच्या ब्रह्मक्षत्रादि उच्च वर्णांत पुष्कळ व्यक्ति होऊन गेलेल्या दिसतात व अजूनहि कांहीं सांपडतील. त्यांनीं आपापल्या तेजानें सर्व समाजास मोठें चांगलें वळण लावण्याचा प्रयत्नहि केलेला आढळेल.

**ध्येयाचारांचा सामान्य समाजावर परिणाम :** यानंतर उपरिनिर्दिष्ट सर्व खटाटोपाचा दृश्य परिणाम सर्वसामान्य समाजावर दिसत होता व आहे, असा तर्क करण्यास पुष्कळ जागा आहे.

ब्रिटिशपूर्व कालांतील भारतीय समाजाचें या विषयींचें दर्शन फक्त अनुमानानेंच करतां येईल. सर्वसामान्य स्त्री व कुटुंब यांसंबंधीं कांहीं स्पष्ट निर्देश जुन्या वाङ्मयांत भरपूर आहेत. त्यांतिल कांहीं ठळक पुरावे खालीं सादर करीत आहों.

परदेशी प्रवासी, राजकारणी, व्यापारी व राज्यकर्ते यांनीं हीं वर्णनें केलेलीं आहेत. प्रवाशांचा यासंबंधांत दृष्टिकोन अभ्यासकाचा असे म्हणून विशाल व जास्त निर्दोष असतो. पीटर डेला व्हले हा रोमन गृहस्थ हिंदुस्थान, अरबस्थान वगैरे देशांतून १६२३ फेब्रुआरी ते १६२६ जुलैपर्यंत केवळ अभ्यासाकरितां प्रवास करीत होता. त्यानें हीं वर्णनें आपल्या कोणा मित्रास पाठवलेल्या पत्रांच्या रूपांत लिहून ठेवलीं आहेत. त्यांचें इंग्रजी भाषांतरहि प्रसिद्ध झालें असून, श्री. दा. वि. गोखले यांनीं त्यांचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला आहे.

" हिंदु स्त्रिया बुरखे न घेतां तोंडें उघडीं ठेवून हिंडतात. त्यांच्याकडे कोणी पाहिलें तरी त्याचें त्यांना कांहीं वाटत नाहीं. तथापि या हिंदु स्त्रिया फार मर्यादशील असतात. त्यांना कुटुंबामध्यें मोठा मान दिला जाई. हे लोक फार नीतिमान आहेत. दारू व व्यभिचार या दोनहि गोष्टी ते फार निंद्य समजतात. एकच लग्न करतात व एक बायको मेल्यावर दुसरी करतात. राजे लोक तीनचार बायका करतात. परंतु ही बहुपत्नीकत्वाची चाल सर्वत्र नाहीं व ती गोष्ट गौण समजली जाते. " कांहीं ब्राह्मण मांसनिवृत्त असून " ब्राह्मण कोणत्याहि इतर जातींतील लोकांकडे जेवत नाहींत पण इतर सर्व लोक ब्राह्मणांकडे जेवतात इतकेंच नव्हे तर ब्राह्मणांकडे जेवावयास मिळणें हा आपला सन्मान समजतात. "

( त्रिशतसांवत्सरिक शिवस्मारक ग्रंथावली शके १८५१ अनुक्रम २ खंड ३ )

यावरून सामान्यतः स्त्री वाईट स्थितींत नव्हती. उलट कुटुंबांत तिला पुष्कळ मोठेपणा असे हेंहि कळेल. डॉ. सालेटोर लिहितात,

" Since the days of Manu, Hindu Law has assigned to woman a dependent but by no means dishonourable position in society. " " There is reason to believe that in the earliest periods of Indion History, the eonception of home or family life was highly elevated, embracing as it did relationship in blood as well as in service. We have a pleasant glimpse of such a state of life in the edicts of Ashok. "

( Saletore Vol. II p. 150 )

स्त्रीस स्मृतिकारांनीं परावलंबी ठेवलें होतें तरी त्या परावलंबनाचा अर्थ गुलामगिरी किंवा लज्जास्पद जिणें असा कधींहि नव्हता. हिंदुस्थानच्या इतिहास-कालांत गृहसौख्य व कुटुंब या कल्पना फार पूर्णावस्थेस पोहोंचल्या होत्या असें म्हणण्यास सबळ पुरावा आहे असें डॉ. सालेटोर म्हणतात. प्रसिद्ध विजयानगर साम्राज्यांत तर सुखी कुटुंबें पाहण्यासारखीं होतीं. मातापितरें व मुलें यांचा प्रेमभाव फार अवर्णनीय असे, असें वर्णन आहे. कांहीं कर्तृत्ववान् स्त्रिया मोठमोठ्या राज्य-शासनाच्या कार्यांतहि दिसत असत. कांहीं उत्तम कवयित्रीहि होत्या. विजयानगर साम्राज्यांत राणी सद्राम्बा व रमाभद्राम्बा या स्त्रिया प्रसिद्ध कवयित्री होत्या. तात्पर्य, पूर्वी स्त्री ही पुरुषाच्या गुलामगिरींत खितपत पडलेली, उपेक्षित आणि त्याज्य दासी असा सर्व कालीं सर्वत्र अर्थ होता व कायदेशीर हक्कप्राप्ति होऊन सामाजिक स्वातंत्र्य उपभोगीत आहे म्हणून आतांच फक्त ती सुखी आहे, असा आभास उत्पन्न केला जातो, तो मूलतः चुकीचा व भ्रामक आहे.

यावरून या देशांत त्या कालांतहि बव्हंशीं एकपत्नीकत्वाचा कायदा नव्हता तरी स्वेच्छेनें चाल अस्तित्वांत होती. उच्च वर्णियांत व्यभिचार व दारूचें व्यसनहि नव्हतें आणि कौटुंबिक सौख्य चांगल्या दर्जाचें असून त्यांत स्त्रीस बहुमानाचें स्थान व मानसिक समाधान होतें. व्यभिचारत्यागाप्रमाणेंच वंशसातत्याचें मूल्यहि भारतियांत चांगलें रुजलें होतें. स्त्री किती त्यागी वृत्तीची होऊं शकते याचें प्रत्यक्ष प्रमाण फक्त भारतीय समाजांतच पाहावयास मिळतें. अशा वेळीं पुरुष आरोग्य दृष्टीनें दोषी

नसेल तर स्त्री स्वतः वंशवृद्धिसाठीं पुरुषास दुसरा विवाह करण्यास प्रवृत्त करी, अशीं उच्च वर्णियांपासून कनिष्ठ वर्णियांपर्यंत उदाहरणें पुष्कळ होऊन गेलीं व आजहि आहेत.

भारतियांचा हा आचार निव्वळ पुस्तकी असेल! अशीं कुटुंबें कुठून असणार! असा संस्कार स्त्रीवर करूं गेलें तरी होणार नाहीं, असें वाटणें संभवनीय आहे.

'सामाजिक मूल्यें' ( Social values ) संस्कारजन्य असतात. यामुळें असे कल्पनारम्य वाटणारे सामाजिक आचारहि प्रत्यक्षांत कमी अधिक ध्येयनिष्ठेनें उतरतात. नातू वा पणतू पाहणें, म्हणजे म्हातारीं माणसें त्यांत 'वंशयात्रा' संपूर्ण करणें, असें अजूनहि म्हणतात. या सफलसंपूर्ण वंशयात्रेचा मानसिक परिणाम त्यांच्यावर आयुष्यांतील मोठें समाधान मिळविण्यासाठीं होतो हें पण पाहण्यासारखें आहे. पन्नास वर्षांपूर्वीं संततिहीनत्वावरील सामाजिक दृष्टिकोन आजच्यापेक्षां फार वेगळा होता हें येथें नमूद करणें जरूर आहे. एखाद्या कुटुंबांत 'वृद्धि' झालीच नाहीं, कीं स्त्री व पुरुष दोघेंहि 'व्रतवैकल्यें' करीत. आजूबाजूचीं माणसें जी जी गोष्ट अशा परिस्थितीवर तोडगा म्हणून सांगतील ती ती भक्तिभावानें करतांना दिसत असत. अर्थात् यांत तत्कालीन वैद्यकीय औषधादि उपचाराचेकित्साहि होतच असेल. परंतु इतकें करूनहि वृद्धि होत नाहीं असें ठरल्यास दुसरा विवाह करावा, असा आग्रह आप्त, इष्टमित्र मोठ्या प्रेमानें करीत. "तुमचें घराणें नष्ट होऊं नये" अशा मनोवृत्तींतून ही सूचना येत असे. गृहिणीसुद्धां कित्येक वेळीं आपल्या पतीनें दुसरा विवाह जरूर करावा म्हणून उत्तेजन देत असल्याचीं पुष्कळ उदाहरणें आम्हांस परिचयाचीं आहेत. अशा उदाहरणांत सर्व जातींची व वर्णांची मंडळी दिसतात. ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्व जातींत व सर्व ठिकाणीं या विषयावरील सामाजिक दृष्टिकोन वरीलप्रमाणें संस्कारित झालेला होता. १९०० सालापूर्वींच्या एका ब्राह्मण कुटुंबांतील प्रत्यक्ष उदाहरण त्या कुटुंबांतील हयात मंडळींच्या प्रेमळ परवानगीनें येथें देत आहों.

महाराष्ट्रांतीलच एका सुविद्य व संपन्न घराण्यांतील मुलींपैकीं एकीचा विवाह वयाच्या १२ व्या वर्षीं पुण्यांतील एका सुविद्य मुलाशीं झाला. हे गृहस्थ पुढें वकिलीची परीक्षा पास होऊन सरकारी नोकरींत चांगल्या हुद्यांवर चढले. स्वतःच्या

काटकसरी वागणुकीनें त्यांनीं जवळ बराच द्रव्यसंचयहि केला. परंतु या मुलीस विवाहानंतर संतति म्हणून झालीच नाहीं. तेव्हां वीस वर्षे लोटल्यावर आणि सर्व उपाय थकल्यावर पत्नीनें पतीस दुसऱ्या विवाहासंबंधीं सुचविलें. एवढ्या वर्षांच्या साहचर्यानें व इतर गुणांनीं आपल्या प्रेमळ पत्नीशीं निगडित झाल्यानें या विवाहास पति विशेष उत्सुक नव्हता. तेव्हां पतिपत्नींतील हा वाद स्त्रीच्या वडिलांच्या कानीं गेला आणि त्यांनींहि स्वतःच्या मुलीलाहि तोच उपदेश दिला. एवढेंच नव्हे तर आपल्या जावयांनाहि तीच शिफारस केली. त्यांच्या पत्रव्यवहारांतील एका पत्रांतील मजकूर आगदीं जसाच्या तसा खालीं उद्धृत करीत आहों.

"ता. १४ डिसेंबर १८९८.

चिरंजीव सौभाग्यवती वज्रचुडेमंडित ××

+ + इजला प्रेमपुरस्सर अनेक आशीर्वाद. तूं सवत करण्याच्या खटपटींत आहेस तें मला कळलें. ह्या बाबतींत माझा अभिप्राय काय आहे तो मी तुजला एकवार कळविलाच आहें. माझी ह्या कामीं हरकत काडीमात्र नाहीं. सवत करून तूं जी इच्छा करीत आहेस ती सफल झाली तर माझ्याइतका आनंद कोणासहि होणार नाहीं. एवढाच विचार केला पाहिजे कीं सवत केल्यानें खाचितपणें तुमच्या वासना पूर्ण होतीलच व हा विचार फारच महत्त्वाचा आहे व तो ज्याचा त्यानेंच केला पाहिजे. ह्या बाबतींत मी आजच सहस्रायु चिरंजीव ×××× ह्यांस पत्र लिहिलें आहे. त्यांनीं मजला साफ लिहिलें आहे कीं, तुझे विचार त्यांस पसंत नाहींत. तथापि तुझें म्हणणें विचार करण्यासारखें आहे व त्याचा अवश्य चांगला विचार करावा अशी मीं त्यांस शिफारस केली आहे. हे आशीर्वाद.

तुझा ममताळू बाप,

×××"

वरील एका कुटुंबाची संततिहीनत्वांतील विचारसरणी साधारणतः अशा परिस्थितींतील सर्व तत्कालीन कुटुंबांना थोड्या कमीअधिक फरकानें लागू करतां येईल, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत पुरुषाची पत्नीविषयीं आस्था, पत्नीची घराण्यासंबंधीं कळकळ व समाजाच्या अशा परिस्थितींत 'घर उभें राहावें' हा दृष्टिकोन या सर्व विचारांचा अंतर्भाव होतो.

ज्या स्त्रीचें वर उदाहरण दिलें आहे, ती स्त्री कोणा पुरुषाच्या गुलामगिरींत

खितपत पडलेली महिला नव्हती. उलट ती एक फार कर्तृत्ववान् व तत्कालीन सामाजिक चळवळींत भाग घेणारी आणि बऱ्याच श्रीमान् घराण्यांतील स्त्री होती. परंतु भारतीय मूल्यविचारांचा संस्कार एवढा दृढमूल होता कीं स्त्रीमत्सराचा सहज-स्वभावहि अशा वेळीं ती विसरली. मत्सर ही भावना स्त्रींत असो वा पुरुषांत असो, ती सर्वथैव त्याज्य आहे, असाच भारतीय संस्कार आहे. कारण या भावनेंतून कोणाचेंहि कांहींच कल्याण साधण्याची शक्यता नसते. '**कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने**' 'सपत्नीशीं सखीसारखें वर्तन कर.' हा कालिदासानें काव्यांत ग्रथित केलेला उपदेश कामशास्त्रीय असून त्याचा स्त्रीमनावर कसा बलवत्तर संस्कार होता हें पाहण्यासारखें आहे.

तात्पर्य, आज हजारों वर्षांनीं जुन्या भारतीय संस्कृतीचें पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या प्रत्यक्ष आचारांत दर्शन घडतें हें विशेष. आजहि विद्याभिमुख, निःस्वार्थी व निस्पृह ब्राह्मण पाहण्यांत येतात. आजहि विवाहप्रकारांत कन्यादानप्रमुख ब्राह्मपद्धति सर्वमान्य उच्च आचार म्हणून अस्तित्वांत आहे. आजहि व्यभिचाराचा आचार सर्वत्र त्याज्य म्हणून मानला गेला आहे. आजहि सवतीमत्सर न करतां एकत्र राहणाऱ्या कांहीं बायका दिसतात. आजहि 'वंश' हाच विवाहाचा हेतु आहे हें विद्वन्मान्य असून, बहुजन समाजाच्या आचारांतील तत्त्व आहे. आजहि पातिव्रत्य हा धर्म समजणाऱ्या स्त्रिया आमच्या देशांत आहेत. आजहि स्त्री ही संरक्षणीय गोष्ट असून प्रत्येक क्षेत्रांत पुरुषाशीं स्पर्धा म्हणजे समत्व नव्हे, असें समजणाऱ्या स्त्रिया आहेत. 'स्त्रीस विवाह हाच महत्त्वाचा संस्कार अतएव तो टाळूं नये.' असें मानलें जातें. कुटुंब आणि घर हें स्त्रीचें महत्त्वाचें कार्यक्षेत्र असून त्यांत कमीपणा नाहीं हें समजणाऱ्या स्त्रिया आजहि आहेत. बापाचा धंदा मुलानें करावा, त्यांत कमीपणा नाहीं अशी जातिनिष्ठ उद्योगपद्धति आजहि थोडी अस्तित्वांत आहे. अद्वैत सिद्धांताचा घोष आजहि ऐकूं येत असून, भागवत धर्माची पताका देशांत दिसत आहे. एकंदरींत हजारों वर्षांनीं आज हिंदु समाज मोठ्या स्थित्यंतरांतून गेला व आज जात आहे, तरी तत्त्वतः कांहीं मूलभूत गोष्टी परंपरागत संस्कारांतून आजहि पाहण्यास सांपडतात हें आमचें खरें भाग्य आहे. वरील विवेचनावरून ध्येयें व ध्येयाचार मनुष्याच्या मूल्यविचारावर व आचारांवर कसा निश्चित परिणाम करतात हें दिसून येईल.

डॉ. बोमन लिहितात,

"Ideas become then, not day dreams, but an integral part of the reality in which man lives. They form some of the most significant roots of choices of action. They play a role in the defining and establishing of objectives, both distant and immediate. They enable a person to set up goals unattainable in themselves, but of such nature, that, in a sense, they may be attained, through the very process of striving for them. Out of that striving for the unattainable, that devotion to things considered to be permanent, may spring a sense of security inexplicable in terms of temporary success alone." (Bowman, p. 361)

ध्येयें हीं नुसतीं सुखस्वप्नें न राहतां, मनुष्याच्या जीवनाशीं तीं एकरूप झालेलीं असतात. कार्याकार्यविचारांत त्यांचा मोठा वांटा असतो. ध्येयसिद्धीच्या खटपटींतच मनुष्य सहजच वरच्या पातळींत जात असतो.

**ध्येयाचारांची दुःस्थिति होण्याची कारणमीमांसा :**

ध्येयाचार सर्वस्वीं सर्व समाजांत कोणत्याहि कालांत संपूर्ण अस्तित्वांत नसतो. तरीहि असा एक प्रश्न निर्माण होतो कीं, इतकीं शुद्ध ध्येयें, त्यास धरून शास्त्रीय आचार, इतका प्रत्येक गोष्टीचा सूक्ष्म विचार, वगैरे सर्व गोष्टी जर या देशांत अस्तित्वांत होत्या, तर त्यांची दुःस्थिति होण्याचें कारणच काय ! अशा हीन स्थितीची कारणपरंपरा साधारणतः दोन प्रकारची असते. एक अंतर्गत व दुसरी बाह्य. यांतील अंतर्गत कारणपरंपरेचा कांहीं विचार या प्रकरणीं करून बाह्य कारणांचा विचार पुढच्या प्रकरणांत करूं. अंतर्गत कारणांपैकीं प्रथमतः कालाच्या ओघांत ज्या अनंत गोष्टी बऱ्यावाईट होत असतात; त्यांचा परिणाम समाजांतील चाली व परंपरा यांवर घडत असतो. शिवाय '**सर्वारंभा हि दोषेण**' या प्रसिद्ध न्यायास धरून समाजाची घडण कितीहि तर्कशुद्ध असली, किंबहुना कोणतीहि घटना कितीहि बुद्धिगम्य पद्धतीनें केलीं तरी त्यांत गुणावगुण हे असणारच. जर का कालांतरानें किंवा स्वार्थी बुद्धीनें प्रेरित होऊन त्या घटनेंतील अवगुणांचा फायदा उठवावयाचें ठरविलें गेलें, तर दुःस्थिति ही निश्चितपणानें येणारच. तेव्हां अंतर्गत कारणांत पुन्हां दोन मुख्य भाग पाडतां येतील.

(१) कालाच्या ओघांत परिस्थितींत झालेल्या बदलामुळें झालेले परंपरेवरील परिणाम व (२) मनुष्यस्वभावांतील स्वार्थी किंवा हीन वृत्ति वर येऊन घटनेंतील अवगुणांचा फायदा घेण्याची लालसा. यांशिवाय कांहीं वेळां गुणांचा अतिरेक होऊनहि अवगुणांची पैदास होऊं शकते.

प्रथम प्रकारची कारणपरंपरा ही कालाच्या ओघांत घडणें अनिवार्य असतें. उदाहरणार्थ, मागें वर्णन केलेला समग्र विवाहविधि आज संपूर्णतया अस्तित्वांत नाहीं. त्यांतील महत्त्वाचा भाग शिल्लक राहिला आहे. ही गोष्ट केवळ कालाच्या ओघांत घडली. पण दुसऱ्या प्रकारच्या कारणानें जास्त महत्त्वाचे बदल अस्तित्वांत येतात. यांसंबंधींचें उदाहरण हुंड्याचें घेतां येईल. मनुस्मृतीनें विवाहाशीं द्रव्याचा संबंध अत्यंत त्याज्य ठरविला. पण मनुष्याच्या स्वार्थी वृत्तीमुळें आणि कांहीं वेळां निरुपायानें म्हणा, हुंडा ही चाल अस्तित्वांत येऊन बोकाळत चालली. ही इतकी बोकाळली कीं, या स्वार्थापुढें मुलीचें कुल, शील, आरोग्य इत्यादि सर्व महत्त्वाच्या गोष्टी फिक्या पडूं लागल्या. दुसरा कसलाहि विचार न करतां ही संधि साधून वधूपक्षाला संपूर्ण लुबाडणें या एकाच विचारानें विवाह जमविण्याची पद्धत पडूं लागली. या चालीविरुद्ध बराच गवगवा अनेक वेळां निरनिराळ्या कालीं झालेला आहे. आम्ही पण येथें एक गोष्ट नमूद करून ठेवतों. विजयनगर साम्राज्याच्या सामाजिक दृष्टिकोनांतून डॉ. सालेटोर ( Saletore ) नांवाच्या अभ्यासकानें मोठा इतिहास दोन खंडांत प्रसिद्ध केला आहे. त्यांत शके १३४७ ( इ. स. १४२४-२५. ) या वर्षींतील एक शिलालेख दिला आहे. सर्व गोत्रांचे व सूत्रांचे विद्वान् ब्राह्मण एकत्र जमून हा धर्म त्यांनीं मान्य केला कीं, कन्यादानांत द्रव्यापहार होतां कामा नये. जो ब्राह्मण द्रव्य घेईल वा देईल, ते दोघेहि दोषी म्हणून राजाकडून दंड्य समजले जावेत, असा हा ठराव त्या विद्वत्सभेंत मान्य झाला. यावरून एक तर तत्कालीन विद्वान् ब्रह्मवृंद या घातुक रूढीबद्दल सुधारणा झाली पाहिजे या मताचा होता हें स्पष्ट दिसतें. दुसरें म्हणजे अशा प्रकारच्या सामाजिक सुधारणेस राज्यशासनाचा आधार किंवा देशांतील कायद्याची मदत घ्यावी अशी विचारसरणी यांत दिसते. तो ठराव आम्ही खालीं उद्धृत करीत आहों.

" On the date specified..., the illustrious Virapratap— Devaraya — Maharaya was pleased to rule the earth, the great men of all branches of sacred studies of the kingdom

of Padaividu drew up in the presence of God Gopinath a document ( which contains ) an agreement fixing the sacred law. According to this, if the Brahmins of this kingdom....... of all Gotras, Sutras and Shakhas conclude a marriage from this day forward, they shall do it by Kanyadana. Those who do not adopt Kanyadana, i. e. both those who give a girl away after receiving gold and those who conclude a marriage after having given the gold, shall be liable to punishment by the king and shall be excluded from the community of Brahmins "

( Salatore. Vol. II p. 189 )

या ठरावाप्रमाणें राजाला या गुन्ह्यास शासन करण्याचा अधिकार दिलेला आहेच. शिवाय समाजबहिष्काराची मोठी शिक्षाहि यांत अभिप्रेत आहे. यावरून सुबुद्ध समाज त्या वेळींहि किती जागरूक होता हें दिसतें.

" **शास्त्राद्रूढिर्बलीयसी** " हा सिद्धांत सर्वमान्य आहेच. आतां स्त्री संरक्षणीय आहे व तिनें पुरुषावर आर्थिक दृष्टया अवलंबून राहावें असें ठरल्यावर पुरुषानें तिला हीन दशेस पोहोंचविण्यास प्रारंभ केला. पुरुषावरचीं स्त्रीसंबंधींचीं बंधनें व वागणूक तो विसरला व कांहीं वेळां स्वार्थानें त्यानें हीनतेची मर्यादाहि गांठली. पातिव्रत्य हा संस्कार अत्यंत उपयुक्त होता. पण हा सद्‌गुण पराकोटीला गेला व त्यांत स्त्रीस सहगमन, केशवपन इत्यादि गोष्टी आल्या. याहि गोष्टी स्त्री जोंपर्यंत आपण होऊन करीत होती, किंवा जोंपर्यंत या गोष्टी स्त्रीच्या इच्छेवर अवलंबून होत्या, तोंपर्यंत ठीक होतें. पण पेशवाईत स्त्रीचें सार्वजनिक वपनहि होत असे असें म्हणतात. स्त्रीस सती जाण्यास भागहि पाडणें कठिण नसे. याप्रमाणें गुणांची परिसीमा गांठली गेली व हे आत्यंतिक गुण म्हणजे पुनः दोषच निर्माण झाले. हे सर्व दोष ब्रिटिश आमदानीच्या सुरुवातीस आमच्या समाजांत पराकाष्ठेस पोहोंचले असावेत असें दिसतें. सासवांनीं केलेला सुनांचा छळ, हुंड्यामुळें विवाहाची नासधूस, पुरुषानें विनाकारण टाकलेल्या स्त्रियांचीं चरित्रें, पतिनिधनानंतरचे स्त्रियांचे हाल व अवहेलना, सक्तीचें केशवपन, बालविवाहाची पराकोटी म्हणजे पाळण्यांत ठरविलेलीं लग्नें, स्त्रीची कांहीं वेळां कळसास पोहोंचलेली गुलामगिरी, जरठानें कोवळ्या मुलीशीं केलेले विवाह इत्यादि स्त्रीसंबंधीं व विवाहविषयक सर्व दोषांचा सर्व परामर्श, सुधारकांच्या मराठी वाङ्मयांत घेण्यांत आलेला दिसतो.

वरील प्रकारच्या अंतर्गत कारणांमुळें उत्पन्न झालेल्या दुःस्थितींत अंतःप्रेरणेनें लोक सुधारणा करतात व या सुधारणा जास्त सुपरिणामीहि ठरतात. बाह्य कारणांमुळें जे बदल घडून येतात ते मुख्यतः ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या आमदानींतील होते.

**विविधता अपरिहार्य :** यानंतर प्रत्यक्ष आचारावर परिणाम होण्याचें महत्वाचें कारण निसर्गसिद्ध विविधता हें होय. सर्व माणसें कांहीं बाबतींत समान असतात, तर कांहीं बाबतींत असमान असतात.

निसर्गतःच 'वैचित्र्य' ही गोष्ट अस्तिवांत आहे. नदी, सरोवर, प्राणी, वनस्पति, फुलें, पर्वत, सागर, धातु इत्यादि निसर्गनिर्मित सर्व गोष्टींत 'विविधता' हेंच तत्त्व संपूर्णतः आढळून येईल. म्हणजे निसर्गांतहि 'समता' नाहींच काय ? तर तसें नव्हे. नदीचें पात्र एकसारखें नसलें, पर्वतांची उंची भिन्नभिन्न असली, वनस्पतींच्या अनेकानेक जाति अस्तित्वांत दिसल्या आणि प्राण्यांचे विचित्र आकार निदर्शनास आले तरी सर्व प्राण्यांच्या जीवनक्रमांत साधारण सामान्यत्व दिसून येईल. सर्व नद्यांतून पाण्याची मूळ घटना सारखीच दिसेल. फक्त त्यांत मिसळलेले पदार्थ भिन्न राहतील. याप्रमाणें निसर्गांत 'विविधतेंत समता' आहे. आणि ही विविधता कशांत आहे, समता कशांत आहे, विविधता व समता यांची सांगड कशी घालावयाची, त्यांच्या मर्यादा काय हें उमजण्यांत बुद्धियोग आहे.

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**

**स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्न कर्मकृत् ॥** भ. गी. ४.१८

कर्मांत अकर्म पाहावयाचें आणि अकर्मांत कर्म पाहावयाचें म्हणजे काय ? विविधतेंत एकत्व पाहावयाचें आणि एकत्वांत अनेकत्व पाहावयाचें असेंच तें आहे. विविधतेची विषमता आणि एकत्वाची समता यांत सांगड घालणें यासारखेंच तें आहे. हाच खरा बुद्धिमान् मनुष्य होय. हाच महापंडित होय. हें सत्य भारतियांनीं मोठ्या मार्मिकपणें भारतीय आचारांत ग्रथित करून टाकलें आहे. उदाहरणार्थ परमेश्वरविषयक कल्पना घ्या. पूर्वीं आर्यधर्माची त्रिविध तत्त्वप्रणाली सांगतांना 'अद्वैत' हा सिद्धांत भारतियांचा विशेष दृष्टिकोन आहे असें प्रतिपादन केलेलें आहे. म्हसोबा, रोकडोबा, म्हाळसा, भुतेंखेतें आणि नाग, वराह, गाय इत्यादि प्राण्यांपासून 'अद्वैतानंदाचा परामर्श या एकाच संस्कृतींत घेतां येतो. संध्येंतील

शेवटचा श्लोक पुष्कळांच्या नित्यपरिचयाचा आहे. ‘**सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति**’ ‘सर्व देवांना केलेला नमस्कार शेवटीं एकाच देवाला पोहोंचतो.’ हीच कल्पना महिम्नस्तोत्रांतहि मोठ्या मार्मिकतेनें गोंवली आहे. ‘**नृणामेकोगम्यः त्वमसि पयसामर्णव इव।**’ कोणत्याहि स्वरूपाची आराधना केली तरी शेवटीं एकच तत्त्व गम्य असतें. अनंताचीं अनंत रूपें शेवटीं एकमेवाद्वितीयांतच विलीन पावतात. हा विविधतेंतील एकत्वभावनेचा विलास भारतीय बुद्धींतच प्रकाश पावला. गुणकर्मांच्या विविधतेनें नटलेलीं मानवी रूपें आत्मौपम्य बुद्धीनें समान आहेत हें मानूनहि त्यांची विविधता लक्षांत घेऊन, त्यांचा समाजपुरुष निर्माण करण्याची एकमेव युक्ति भारतियांचीच. याच भारतीय द्रष्ट्यांनीं विवाहांतील वैचित्र्य पाहिलें नसेल कीं काय ? तें त्यांनीं पाहिलें, एवढेंच नव्हे; तर त्या सर्वांचा परामर्श घेऊन प्रत्येकाला आहे तेथें स्थिर करून ‘वरच्या वर्गांत जाण्यास’ मदत व्हावी अशी मोठी बुद्धिगम्य योजना समाजस्थैर्याप्रीत्यर्थ आंखली व ती रूढ व्हावी, चालू राहावी एवढ्याकरितां पुन्हां ‘संस्कारपरंपरा’ निर्माण करून दिली असें विचारांतीं प्रत्ययास येईल.

विविधता ही प्रत्येक आचारविचारांत उत्पन्न होण्याची शक्यता मुख्यतः दोन प्रकारच्या कारणांनीं उत्पन्न होते. (१) परिस्थिति (२) प्रकृति. या दोन्ही गोष्टी पुष्कळ वेळां पुरुषपराक्रमाच्या पलीकडे असल्यामुळें ‘ध्येयात्मक आचार’ करण्याचें मनांत असलें, बुद्धीस पटलें तरी तें घडणें कठिण नव्हे दुरापास्त होऊन बसतें. याचा पुरावा पाहण्यास फार लांब जाण्याचें कारण नाहीं. विवाहाचें वय अगदीं ‘अष्टवर्षा’ असावें असें आग्रहानें प्रतिपादन करणारे कित्येक लोक आर्थिक कारण नसतांनाहि स्वतःच्या कन्येचा विवाह कांहीं या वयांत करूं शकले नाहींत. मग आर्थिक हलाखींत सांपडलेला बाप काय करील ? प्रेम हा विवाहाचा पाया नसावा असें सारखें प्रतिपादन करणारे लोकहि, फार काय पण प्रेमविवाहाचीं कटु फळें चाखीत असतांहि, प्रेमविवाहाशिवाय विवाहाचा पर्यायच त्यांच्या वांट्यास परमेश्वर देत नाहीं. हा काय कर्मविपाक आहे पाहा ! या झाल्या परिस्थितिजन्य गोष्टी. पण प्रकृतिजन्य गोष्टी काय थोड्या असतात ? एक “लैंगिक भावना” हा विषय घेतला, तरी ‘व्यक्ति तितक्या प्रकृति’ या भावनेंतील तरतम-भावामुळें वर्तणुकीचे सर्व भिन्नभिन्न प्रकार दृष्टीस पडतील. एखादा पुरुष शांततेनें सर्व आयुष्य ब्रह्मचर्यानेंहि घालवूं शकेल, तर दुसऱ्यास पत्नी माहेरीं जाणेंहि खपणार

नाहीं. एखादा मनुष्य सर्व कार्यांत उत्साहाचे सारखे पूर येत असलेला दिसेल, तर दुसरा खुशाल झोंपा घेत वा शिश्नोदरपरायणत्वांत गर्क झालेला दिसेल. एखाद्याचा कल गणिताकडे विशेष असेल, तर दुसऱ्याचा भाषेकडे असेल. एखादी स्त्री बालपणापासून संपूर्ण वैधव्य ब्रह्मचर्यानें कंठील, तर दुसरीस तिची प्रकृति स्वस्थ बसूंच देणार नाहीं. तात्पर्य, प्रकृतिभिन्नत्वानें व परिस्थितिभिन्नत्वानें आचारभिन्नत्व उत्पन्न होऊं शकतें, हें दिसून येईल. मग ‘ ध्येयाचार ’ कशाला ? जें विविध तेंच परमेश्वरस्वरूप मानून ‘ जें घडेल तें घडेल ! ’ असें कां समजूं नये ? या प्रश्नाला महत्त्वाचें उत्तर एवढेंच कीं, ‘ ध्येयाचार ’ हा कांहींसा ध्येयांस अनुसरून असतो. ध्येय हें बुद्धिवादानें, शास्त्रानें, विचारानें आणि अनुभवानें कोणत्याहि बाबतींत जास्तींत जास्त निर्दोष किंवा जें साध्य झाल्यानें व्यक्तीचें व कुटुंब, समाज, राष्ट्र इत्यादि गटांचें जास्तींत जास्त सुख उत्पन्न होण्याची शक्यता आहे, तें ध्येय म्हणून संस्कृतींत मान्यतेस पावतें व त्याला धरून ध्येयाचार सांगितला जातो. गणितांतील एक उदाहरण कसें सोडवावें हें पद्धतशीर दाखवून दिलें कीं, इतर उदाहरणें सोडवितांना एखादें चुकलें तरी बरोबर पद्धतीकडे नजर ठेवल्यास बरोबर येण्याचा संभव जास्त हाच त्याचा फायदा. तात्पर्य, ध्येयाचारांत व्यक्तीचें अंतिम समाधान व समाजस्थैर्य आपोआप उत्पन्न व्हावें हा हेतु. ध्येयाचार कायदेशीर केला व इतर सर्व वैविध्य बेकायदेशीर केलें म्हणजे समाजस्थैर्य उत्पन्न होतें असा भ्रम फक्त पाश्चिमात्यांत आहे. आमचे राज्यकर्तेहि एकीकडे भारतीय संस्कृतीसंबंधीं गप्पा मारतात आणि दुसरीकडे वरील भ्रामक समाजस्थैर्य आणण्याची ‘ मर्कट कृति ’ करीत आहेत. हा दैवदुर्विलास नव्हे तर काय ! आतां येथें विवाहासंबंधीं प्रश्नांत या विविधतेची व्यवस्था भारतियांनीं कशी केली आहे पाहा.

**विवाहनिश्चयाचा कांहीं वेळीं स्त्रीस अधिकार :** ब्राह्म विवाहांत विवाहनिश्चितीचा अधिकार मातापितरांस दिला. मुलीचें लग्न करून देणें, हें आईबापांचें कर्तव्य ठरविलें. पण समाजांत आईबाप अनेक कारणांनीं हें कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरले, तर मुलीनें काय जन्मभर तसेंच राहावें ? तिनें विवाहाचें काय करावें ? असा प्रश्न निर्माण झाल्यास मनाप्रमाणें विवाह ठरविण्याचा कन्येस संपूर्ण अधिकार मनुस्मृतिकारांनीं दिला.

**त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती।**
**उर्ध्वं तु कालादेतस्माद्विंदेत सदृशं पतिम्॥** मनु. ९.९०.

कारण एवढेंच कीं, मनूला जास्त महत्त्वाचे व कमी महत्त्वाचे प्रश्न कळत होते. इतर प्रश्नांपेक्षां योग्य वयांत स्त्रीची कामपूर्ति हा प्रश्न महत्त्वाचा मानला जात होता. त्यामुळें येथें स्त्रीस योग्य अधिकार दिल्यानें तिच्या आयुष्यांतील कुप्रसंग टळतील ही अपेक्षा. आजहि जे पालक मुलीचा विवाह करूं शकत नाहींत, ते असा अधिकार तिला आनंदानें देऊं शकतील काय! मुलीच कांहीं वेळां तो बळकावतात, निसर्ग व परिस्थिति त्यांना तो ग्रहण करण्यास भाग पाडते ही गोष्ट भिन्न.

**विवाहाचे आठ प्रकार :**

मागें एकदां विवाहाचे आठ प्रकार दिलेले आहेत. ते म्हणजे ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच. या आठ प्रकारांपैकीं कन्येच्या पालकांनीं प्रथम योग्य वरनिश्चय करून त्यास सालंकृत कन्यादान करण्याचा जो प्रकार त्यास 'ब्राह्म' अशी संज्ञा दिली. ही पद्धति सर्वांत उत्तम असें ठरविलें. परंतु समाजांत नेहमीं योग्य तें घडतेंच असें नाहीं. परिस्थिति व प्रकृति यांप्रमाणें विविधता उत्पन्न होणें हें अपरिहार्य आहे. याउलट ज्या विवाहांत कन्या देण्याकरितां बाप द्रव्य घेतो त्यास 'आसुर' म्हटलें. कन्या मातापित्यांस नकळत स्वतः प्रेमपाशांत सांपडून जो विवाह करते त्यास 'गांधर्व' म्हटलें. आजकाल पाश्चात्यांत हीच पद्धति अस्तित्वांत आहे. कन्येची अनुमति नसतांनाहि तिच्या आप्तांशीं मारामारी करून तिला पळवून नेणारेहि भेटतातच. त्यास 'राक्षस' ही संज्ञा दिली. आणि स्वतः कन्या आपलें शील सांभाळण्यास असमर्थ अशा वेड्या वा मूर्च्छितावस्थेंत असतांना तिला पळवून नेतात, त्यास पैशाच हें नामाभिधान दिलें. आतां यांपैकीं पैशाच व आसुर या दोनहि पद्धतींचा अवलंब कधींहि करूं नये, असा धर्म सांगितला. आमच्या मतें या दोहोंतहि कन्येच्या संपूर्ण मनाविरुद्ध विवाह घडणें शक्य असतें. कन्येचें मन अनुकूल असणें, ही वैवाहिक सुखाची गुरुकिल्ली असल्यानें — मग कन्याग्रहणाची पद्धति कोणतीहि असो – हे दोन प्रकार त्याज्य ठरविले गेले असावे.

तात्पर्य, ब्राह्मपासून राक्षस व पैशाच विवाहापर्यंत सर्व विवाह क्रमानें कमी

कमी प्रतीचे ठरतात. जन्मांत मनासारखें करतां आलें, तर 'ब्राह्म' पद्धतीनें विवाह कर. न करतां आलें तर परिस्थितीप्रमाणें इतर प्रकारचा कर. पण जें करशील तें स्थिरस्वरूप कर. या स्थिरस्वरूपांतूनच स्त्रीचें कमींतकमी नुकसान होतें. पुरुषावर प्रत्येक कर्माची जबाबदारी पडते आणि तो प्रश्न तेथें मिटतो. स्त्रीत्यागानें जे अनेकविध सामाजिक प्रश्न निर्माण होतात, ते होत नाहींत. प्रत्यक्ष श्रीकृष्ण-रुक्मिणींचा विवाह राक्षस-विवाह ठरवला जातो. स्वयंवराचीं उदाहरणेंहि आमच्याकडे पूर्वीं कांहीं थोडीं नव्हतीं. पण या सर्व 'विविधतेच्या' बुडाशीं स्त्रीपुरुषांचें कामविषयक नातें ज्या प्रकारानें निर्माण होईल, त्यास स्थिर विवाहाचें स्वरूप देणें, हा शास्त्रकारांचा मूळ हेतु. त्यामुळें 'ब्राह्म' कायदेशीर व 'गांधर्व' बेकायदेशीर असें समीकरण न करतां ब्राह्मापेक्षां गांधर्व कनिष्ठ प्रतीचा एवढाच पर्याय ठेवला व दोनहि प्रकार कायदेशीरच ठरविले. यामुळें समाजस्थैर्य निर्माण होण्यास मदत होते.

आतां कन्याग्रहणार्थ वर सांगितलेल्या प्रकारांपलीकडे आणखी कांहीं प्रकार अस्तित्वांत असण्याची शक्यता दिसत नाहीं. तेव्हां समाजांत जें कांहीं घडूं शकेल त्या सगळ्याचा विचार करून हे प्रकार कल्पिले. नंतर त्यांपैकीं उत्तम प्रकार जो ठरविला तो आचार ब्राह्मणांस सांगितला. क्षत्रिय हा युद्ध, परदेशगमन यांमुळें स्वगृहापासून दूर असण्याची शक्यता जास्त असल्यानें व त्याची प्रकृतीहि युद्धाचा धंदा करीत असल्यामुळें फार सात्त्विक असणें शक्य नसल्यानें, त्याचेबाबत गांधर्व व राक्षस या दोन्ही विवाहपद्धति ग्राह्य धरल्या. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यानें ब्राह्मविवाह करूं नये. पण प्रकृतिवैचित्र्यानुरूप त्यानें दुसऱ्या एखाद्या पद्धतीचा अवलंब केल्यास चालेल एवढेंच. फक्त आसुर व पैशाच हे दोन प्रकार सोडून बाकी सर्व प्रकार धर्म्यच ठरविले. त्या काळीं धर्म व कायदा वेगळे नसत. जें धर्म्य तें सहजच कायदेशीर. तेव्हां प्रथम साही प्रकार धर्म्य अतएव कायदेशीर ठरविले गेले. कोणता प्रकार कोणीं करावा, हें प्रकृति व परिस्थिति यांच्या वैचित्र्यावर घडणारें असल्यानें अमक्यानें असेंच केलें म्हणजे कायदेशीर व इतर सर्व बेकायदेशीर असें ठरविलें नाहीं. ध्येयात्मक आचार म्हणून ब्राह्म विवाहाचा आचार सांगितला. पण सर्व समाजानें एकदम या ध्येयाप्रतच पोहोंचावें; या आचाराशिवाय इतर सर्व अधर्म्य असें म्हटलें नाहीं. आमच्या मतें यांत नैसर्गिक विविधतेचें (Natural variation) तत्त्व भारतियांनीं संपूर्णतया लक्षांत घेतलेलें दिसतें. या योजनेंत त्यांनीं

एकंदर समाजाचा विचार जास्त बुद्धिगम्य पद्धतीनें करून, कोणत्याहि परिस्थितींत स्त्रीचें संरक्षण व्हावें, तिचा दुरुपयोग करून तिला रस्त्यावर सोडून देतां येऊं नये, पुरुषावर स्त्रीसंभोगाची जबाबदारी पडावी आणि एकंदर समाजस्थैर्यास धक्का लागूं नये, अशी खबरदारी दिसते. ही खबरदारी घेणारे जुने भारतीय ऋषि आज मूर्ख ठरले आणि स्त्रीचे अप्रबुद्ध, स्वार्थी कैवारी व पुजारी तिला खुश करण्याकरितां वाटेल ते कायदे करीत असून, त्यांत एका बाजूस पुरुषाची बेजबाबदार वृत्ति पोशीत आहेत व दुसऱ्या बाजूस स्त्रीस सुखी विवाह व संरक्षण यांपासून दूर नेत आहेत.

यानंतर कामशास्त्रकार यासंबंधीं काय म्हणतात तें पाहूं. वरील सर्व प्रकार कामशास्त्रकारांनींहि सांगितले असून असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे कीं या आठ प्रकारांपैकीं धर्मरक्षणाच्या दृष्टीनें म्हणजे समाजधारणा योग्य व्हावी या उद्देशानें या प्रकारांपैकीं अगोदरचे चार म्हणजे ब्राह्म, दैव, आर्ष व प्राजापत्य हे जास्त धर्म्य आहेत. शक्यतों त्यांचें आचरण करावें. परंतु या प्रकारांतील एखादाहि जर आपल्या वांट्यास आला नाहीं तर काय करावें ? असा प्रश्न उत्पन्न झाल्यास "**कार्यः उत्तरोत्तरः।**" (का. सू ३.५.२८.) तर उत्तरोत्तर प्रकारांचा अवलंब आपोआपच घडतो. गांधर्व ही पद्धति 'अनुरागात्मक' असल्यानें जास्त योग्य असें कामशास्त्रकारांचें मत. गांधर्व विवाह रतिप्रमुख असून रतिसुखास तो जास्त योग्य असें मनूचेंहि मत आहे. कालिदासानें नाटकांत वर्णन केलेले गांधर्वपद्धतीचे दुष्परिणाम पूर्वी पाहिले आहेत. पण 'रतिसुख' हाच कामशास्त्राचा महत्त्वाचा विषय असल्यानें, कामशास्त्रकारांनीं त्यास प्राधान्य देण्याची शक्यता आहे.

**स्त्रीकरितां आपद्धर्म :**

यាप्रमाणें विवाहविषयक विविधतेचा विचार केल्यावर विवाहांतर्गत निरनिराळे प्रश्न पुढें येतात. त्यांत 'संतति' हा एक महत्त्वाचा प्रश्न भारतियांनीं बुद्धिगम्य पद्धतीनें विचारांत घेतलेला दिसतो. पुरुष सुदृढ असल्यास त्यास विशिष्ट परिस्थितींत द्विभार्यात्वाचा पर्याय सांगितला. तसेंच संततिहीनत्वांत जेव्हां पुरुषच केवळ जबाबदार असतो तेव्हां नियोगानें पुत्रोत्पत्ति करावी असा स्त्रीसाठीं पर्याय स्मृतिकारांनी दिला आहे. यावरून असा पर्याय एका काळीं आस्तित्वांत असला पाहिजे. या प्रकारांत स्त्रीचा दीर वा कोणाहि सपिंड पुरुषाकरवीं फक्त एकच पुत्र निर्माण करून घेण्याचा पर्याय स्त्रीस सांगितला. हा पर्याय पुढें लुप्त झालेला दिसतो.

कारणें सांगणें कठिण आहे. पण संसारांतील विविध अंगांचा परामर्ष योग्य प्रकारें स्मृतिकारांनीं घेतलेला दिसतो हें खरें. बीजक्षेत्रप्राधान्यविचार तर कांहीं प्रमाणांत आजहि पटण्यासारखा दिसतो. प्रजननामध्यें केव्हां बीजप्राधान्य असतें, तर केव्हां क्षेत्रप्राधान्य असतें. आजहि कृतिम तऱ्हेनें म्हणजे परपुरुषाच्या बीजानें स्त्रीमध्यें प्रजोत्पत्ति करण्याचा विचार संततिहीनत्वांत येतो. ( Artificial Insemination ) आणि अशा प्रसंगीं क्षेत्रप्राधान्य धरून त्या संततीस पित्याची संतति समजली जाते. कन्येचे दोष न सांगतां कन्यादान केलें, म्हणजे वरपक्षास फसविलें, तर तें दान परत करण्यास हरकत ठेवलेली नाहीं. पुरुषानें देशांतरास जातांना स्त्रीच्या अन्नवस्त्रादि जरुरींबाबत योग्य ती तजवीज करणें, त्याचें कर्तव्य ठरविलें आहे. अन्नवस्त्र इत्यादि नित्य जरुरीच्या गोष्टीहि न मिळल्यास शील सांभाळण्यास कसें सांगावें ? पुष्कळशी गुन्हेगारी मानवाच्या या नित्य गरजा न पुरविल्यामुळें, मूलभूत गरजांच्या अभावामुळें, अथवा ‘ दारिद्र्य ही बहुसंख्याक गुन्हेगारीची जननी आहे ’ हें तत्त्व स्मृतिकारांनीं लक्षांत घेऊन स्त्रीपासून पातिव्रत्य अपेक्षित असेल तर तिची संरक्षणादि सर्व जबाबदारी व तिच्या मनोवृत्तींचें समाधान ठेवण्याची जागरूकता हीं पुरुषास आवश्यक कर्तव्यें म्हणून प्रतिपादन केलेलीं दिसतात.

स्त्रीनें पतीशीं अविरोध ठेवावा हा ध्येयाचार सांगितला पण तसें न घडल्यास काय करावें ? पतीचा द्वेष करणारी स्त्री पुढें संसार उभा करण्यास सहसा योग्य ठरत नाहीं. उलट अशा स्थितींत पुरुष एकदां दूर गेला कीं, त्या पुरुषाचें त्या स्त्री बाबतचें लैंगिक आकर्षणहि नाहींसें होतें. आणि हें मानसिक क्लैब्य एकदां उत्पन्न झालें म्हणजे सर्व संसाराचा नाश होतो. याकरितां ही स्त्री एक वर्षपर्यंत ताळ्यावर न आल्यास तिचा त्याग करावा असें सांगितलें. यांत स्त्रीनें पुरुषाशीं आपलें व्यक्तिमत्त्व जमवावें हा भारतियांचा पर्याय होता. याउलट स्त्रीस पातिव्रत्य व पुरुषभक्ति सांगितली असली तरी पुरुष क्लीब असेल, पतित असेल, कुष्ठादि रोगांनीं पीडित असेल तर अशा पतीची स्त्रीनें भक्ति करावी म्हटलें तरी कसें जमावें ? अशा वेळीं स्त्रीत्याग करूं नये, तिचें संरक्षण व्हावें याकरितां तिचें स्त्रीधनहि तिच्याजवळच ठेवावें, असा सल्ला दिलेला दिसतो. तात्पर्य, स्त्रीसंरक्षण ही मुख्य कल्पना डोळ्यांपुढें ठेवून विवाहांतर्गत विविध अडचणींत काय वर्तणूक असावी याचाहि विचार केलेला आहे.

संततिहीनत्वांत स्त्रीत्याग का स्त्रीपरिग्रह असा भारतीय प्रश्न नसून वंशनाश

का स्त्रीपरिग्रह असा प्रश्न उत्पन्न करून त्यास वंशनाश टाळण्यासाठीं स्त्रीपरिग्रह हा भारतीय पर्याय आहे. येथें स्त्रीपरिग्रहासंबंधीं दुसऱ्या एका मुद्द्याचें अवलोकन करणें आहे. स्त्रीत्याग भारतियांस सहसा मान्य नसणारी गोष्ट आहे. स्त्री ही रक्षणीय आहे, पुरुषावर तिची जबाबदारी आहे, असें एकदां तत्त्व ग्राह्य धरल्यावर पिता, पुत्र वा पति या पुरुषांवरच ही जबाबदारी टाकणें अपरिहार्य ठरतें. आतां पुरुषास सतत विरोध करणारी स्त्री, व्यसनांस सांपडलेली स्त्री, असाध्य व्याधीनें पीडलेली स्त्री, कोणत्याहि कारणानें एकंदरींत घरांत कांहींच न जमणारी अशा व वंध्या स्त्रीच्याबाबत दुसऱ्या विवाहाचा अधिकार पुरुषास दिला. परंतु यांतहि स्त्रीत्याग, घटस्फोट इत्यादि सांगितलेलें नाहीं. तिच्या अन्नवस्त्राची व संरक्षणाची जबाबदारी पुरुषावरच टाकलेली आहे. कोणत्याहि कारणानें स्त्रीच घरांतून पसार होऊं लागली, तर तिला विरोध करावा व माहेरच्या मंडळीवर ती जबाबदारी टाकावी असा सल्ला आहे. घटस्फोटाची कल्पना पाश्चिमात्यांची आहे. पुरुष स्त्रीस सोडून गेला, तर काय करावें ? त्यावर पुरुषानें असें दूरगमन करतांना स्त्रीच्या अन्नवस्त्राची योग्य सोय लावणें त्याचें कर्तव्य ठरविलें. पण त्यानें तें केलें नाहीं तर ? तर प्रथमतः स्त्रीनें सूत काढणें, कशिदा, शिवणकाम इत्यादि घरगुती कामांनीं पोट भरावें. पण कांहीं कालमर्यादा संपल्यावर तो पुरुष जेथें असेल तेथें जावें. एकंदरींत स्त्रीच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी भारतियांनीं पुरुषावर टाकल्यामुळें स्त्रीचे प्रश्न कमी गुंतागुंतीचे पण एका दृष्टीनें कठिण झालेले दिसतात. त्याचप्रमाणें ध्येयें व ध्येयाचार स्पष्ट केल्यावर व्यवहारांत जे विविध प्रसंग घडतात त्या प्रसंगांत काय योजना करावी, हें तर्कशुद्ध दृष्ट्या जी तत्त्वप्रणाली योग्य म्हणून ग्रहण केली तीस धरून ठरवून दिलें आहे.

**सपत्नीकत्वाची कारणमीमांसा :** सपत्नी किंवा 'सोशल रायव्हल' ही गोष्ट कांहीं विशिष्ट परिस्थितींत समाजांत नित्य घडणारी सनातन गोष्ट आहे. सपत्नीकत्वाची कारणमीमांसा वात्स्यायन-ऋषींनीं मोठ्या मार्मिकतेनें एकाच सूत्रांत खालीलप्रमाणें केली आहे.

"**जाड्यदौःशील्यदौर्भाग्येभ्यः प्रजानुत्पत्तेराभीक्ष्ण्येन दारिकोत्पत्तेर्नायकचापलाद्वा सपत्न्यधिवेदनम् ।**" का. सू. ४.२.१.

स्त्रीमध्यें जाड्य, दुःशीलता, दुर्भाग्य, वंशनाश, अतिप्रजा आणि नायक म्हणजे पुरुष जेव्हां फार चपल असतो म्हणजे स्थिर राहूं शकत नाहीं किंवा शौकीन असतो तेव्हां सपत्नीकत्वाचें दुःख स्त्रीस संभवनीय असतें. सपत्नीकत्वाचीं कारणें स्त्री व पुरुष या दोघांनाहि धरून असतात व त्यांतील प्रमुख कोणतीं तीं सर्व एका सूत्रांत आणलीं आहेत. वरील कारणांहून जास्त तर्कशुद्ध कारणमीमांसा याबाबत करणें कठिण आहे. निसर्गाच्या विविधतेंत स्त्री प्रजाहीन असते तशी ती अतिप्रजाहि असूं शकते. शीलवान् स्त्रीप्रमाणें दुःशील स्त्रीहि असूं शकते आणि पुरुष अत्यंत थंड प्रवृत्तिपासून अत्यंत भावनाप्रधान किंवा अतिचपल वृत्तीचा असूं शकतो. अशा सर्व प्रसंगांत पुरुष प्रथम स्त्रीपासून सहजच परावृत्त होऊन दुसऱ्या स्त्रीच्या कचाट्यांत सांपडणें शक्य असतें. यांत सपत्नीकत्वाचें मूळ आहे. यांत धर्म्याधर्म्याचा विचार नसून जें विविध प्रसंगांमुळें जगांत घडतें त्याचें फक्त यथाशक्ति वर्णन आहे. गुणदोष-विवेचन नाहीं किंवा कार्याकार्यविचारहि नाहीं. यालाच शास्त्रचर्चा म्हणतात. हे सर्व प्रसंग जगांत येऊं शकतात. ते जसेच्या तसे वर्णन केले आहेत. या निरनिराळ्या प्रसंगांना धरून उपाययोजनाहि वात्स्यायनानें सुचविली आहे. परंतु नायकचपलतेमध्यें स्त्रीस कांहींहि करतां येणें शक्य नसतें. स्त्रीच्या ठिकाणीं असे पुरुष सहजसिद्ध असतात आणि ही त्यांची प्रकृति असते. दुसऱ्यानें त्यांत सुधारणा करण्यासारखें नसतें. किंबहुना, जगांत दुसऱ्यास सुधारण्याइतका मूर्खपणाचा उद्योग क्वचितच आहे. ज्ञानाची जिज्ञासा व प्रयत्न झाल्यास सुधारणा फक्त ज्याची तो करूं शकतो. असे प्रसंग समाजांत क्वचितच येत असले तरी त्यांचा निर्देश करणें शास्त्रज्ञांचें कर्तव्य आहे. इतकें शास्त्रशुद्ध सपत्नीकत्वाचें विवेचन पाश्चिमात्य लेखनांतहि फारसें सांपडणें कठिण आहे. आतां अशा प्रसंगांत स्त्रीनें कसें वागावें एवढेंच सांगणें शिल्लक राहतें. रतिशास्त्राच्या दृष्टीनें अशा अटळ प्रसंगांत स्त्री सांपडल्यास तिनें कसें वागावें असा खरा प्रश्न असून त्याचा रतिसुखाच्या दृष्टीनें विचार करणें जरूर आहे. वात्स्यायन लिहितात,

"**आगतां चैनां भगिनीवदीक्षेत**" का. सू. ४. २. ४.

"**कनिष्ठा तु मातृवत्सपत्नीं पश्येत्।**" का. सू. ४.२.१६.

वरील दोन सूत्रांत त्यांनीं कनिष्ठा व ज्येष्ठा या दोन्हीं स्त्रियांचा ध्येयाचार सांगितला. एकदां सपत्नी अटळ आहे हें ठरलें कीं तिला भगिनीप्रमाणें मानावें

व घरांत घ्यावें. त्याचप्रमाणें कनिष्ठ पत्नीनेंहि ज्येष्ठ पत्नीस मातेप्रमाणें मान देऊन तिच्याशीं वर्तन करीत असावें. शास्त्रकारांनीं सांगितलेला हा उपदेश कवींनींहि जसाच्या तसा काव्यांत घालून ध्येयाचार तोच सांगितला. कालिदासानें कण्व मुनींच्या तोंडीं सपत्नीसंबंधीं शकुंतलेला जो उपदेश केला त्यांत वेगळें काय आहे? **"कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने।"** सपत्नीशीं प्रियसखीप्रमाणें वर्तन कर. एवढ्याच श्लोकार्धात त्यांनीं शास्त्रकारांचा उपदेश जसाच्या तसा दिला. आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं हे सर्व इतके मूर्ख कसे कीं यांना स्त्रीचें मन कळतच नव्हतें. स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्रीचें व्यक्तिमत्त्व यांची यांना कांहीं कदरच नव्हती काय? तेव्हां तितके ते मूर्ख नव्हते, एवढें थोडया विचारांतीं वाचकांसहि समजेल. मत्सरभाव ही सहजभावना अशा वेळीं जाग्रत होते. आपल्या ताब्यांतील कांहींतरी दुसरा ओढून नेत आहे (Fear of dispossession) हीच गोष्ट या मत्सर-भावाच्या मुळांत असून नवऱ्याचें प्रेम दुभंगतें, आपल्या सुखांत वांटेकरी येतो, आपल्या व्यक्तिमत्त्वास धक्का लागतो, आपला स्वार्थ दुखावतो, या व अशा विचारांनींच मत्सरजागृति होऊन त्याचा अतिरेक कांहींहि दुराचरण करण्याच्या प्रवृत्तींत होतो. ही वस्तुस्थिति आहे. जी वस्तु अप्राप्य होत चालल्यानें मत्सर उत्पन्न होतो ती वस्तु मत्सरानें परत मिळते काय! कामवासना ही मनसाधिष्ठित बाब असल्यानें मनाचा उल्हास हा कामवासना प्रज्वालित करण्याचा प्रथम उपाय. त्यांतील मन जर या मत्सराच्या आगीच्या डोंबांत मारून टाकलें तर कामवासना कोठून येणार! तात्पर्य, ही स्त्री त्या पुरुषापासून या भावनेनें जास्त जास्त दुरावत जाते. तेव्हां त्याच पुरुषाशिवाय गति नाहीं अशी जर स्त्रीची परिस्थिति असेल, तर तिनें हा भाग लक्षांत घेऊन मत्सर आवरून उलट प्रेमाचें पांघरूण घेऊन पुरुषाशीं अनिच्छेनें कां होईना, पण समरस होणें रतिसुखाच्या दृष्टीनें केवढें जरुरीचें आहे हें आतां वाचकांच्या सहज लक्षांत येईल. भारतीय वर्तणुकीनें तिला नवऱ्यासहि शेवटीं ताब्यांत आणणें शक्य होतें, दुसऱ्या स्त्रीचेंहि त्यांत नुकसान होत नाहीं व शिवाय दुसरी स्त्रीहि ज्येष्ठ स्त्रीच्या ताब्यांत येण्याचा संभव वाढतो. याउलट, स्त्री मत्सरग्रस्त झाल्यास; नवरा तिच्यापासून जास्तच दुरावतो, दुसरी स्त्री तिला आणखी एक शत्रु उत्पन्न होते, गृहसौख्य तर नष्ट होतेंच आणि सर्व बाजूंनीं त्या कुलाचा नाश होण्याचा प्रसंग मात्र ओढवण्याचा संभव निर्माण होतो. सपत्नीकत्व अनिवार्य आहे असें ठरल्यास व त्याच पुरुषाशिवाय

दुसरा मार्ग भारतीय विचारसरणींत स्त्रीस नसल्यामुळें, मत्सरभाव आवरून, खोटें असलें तरी प्रेमानेंच सवतीशीं वागावें हा भारतियांचा उपदेश कामशास्त्रीय आहे. भारतीय विचारसरणींत स्त्रीस त्याग अभिप्रेत आहे. यांत सहिष्णुता फार लागते. दुःख सोसावें लागतें हें खरें. परंतु विवाहाच्या यशाची मोठी किंमत कांहीं थोड्या स्त्रियांना देण्याचा प्रसंग अटळ आहे. प्रेमानें शत्रूलाहि जिंकण्याचा मार्ग 'सत्याग्रह' व 'अहिंसा' या स्वरूपांत ज्या देशांत प्रत्यक्षांत येतो, तेथें जो शत्रु निश्चित नव्हे अशा व्यक्तीस प्रेमानें जिंकण्याचा प्रयत्न हा त्यागाचा असला, तरी अशक्य नाहीं, हें सहज कळून येईल. अर्थात् स्त्रीस दुसरा मार्ग नाहीं असें येथें गृहीत आहे.

**बहुभार्यात्वाची भारतीय चाल :** 'बहुपत्नीकत्व' पुष्कळ वेळां केवळ 'शोक' आणि 'ऐंद्रीयिक सुखप्राप्तीच्या' पोटीं उत्पन्न होतें. यांत दुसरा फारसा विचार नसतो, तर ऐषआराम (Luxury) एवढाच भाग विशेष असतो. यासच वात्स्यायन नायक-चापल्य म्हणतात. ऐषआराम सर्वत्र त्याज्य आहे असा संन्याशी दृष्टिकोन सर्वांना लागू असावा असें कोणी म्हणेल तर तें चुकीचें ठरेल. प्रत्येक समाजांत प्रत्येक काळीं समाजास मान्य अशा गोष्टी असतातच. लैंगिक भावनापूर्तीची (Sex need) गरज पुरुषास जेवढी असते तेवढी मोठी गरज साधारणतः स्त्रीस भासत नाहीं. किंबहुना पुरुषाच्या या अधिक गरजेंतूनच सबंध 'वेशाव्यवसाय' ही स्वतंत्र संस्थाच फक्त ही गरज पुरवून उदरंभरण करणारी निर्माण झाली. आजहि आहे आणि पुढेंहि राहील. ही गोष्ट शास्त्रज्ञांस फारशी विवाद्य नाहीं. आतां या चैनींत राहण्यास लागतो त्यापेक्षां पुष्कळ मोठा बंगला, जीवनास लागतो त्यापेक्षां पुष्कळ पैसा, येथपासून तों तंबाखू, दारू, भांग, गांजा आणि मानमरातब, अधिकार, हुकूमशाही गाजवण्याची हौस येथपर्यंत सर्व येऊं शकतें. मग यांत परमेश्वरनिर्मित अधिक लैंगिक गरज नसावी; ती फक्त एकाच स्त्रीवर भागविली पाहिजे; असा कायदेशीर अट्टहास भारतियांनीं कधींहि धरला नाहीं. या वृत्तीस धरून बहुपत्नीकत्वाची चाल विशेषतः श्रीमंत व राजेरजवाडे यांत अबाधितपणें आज कित्येक शतकें आमच्याकडे अस्तित्वांत होती व आहे. पण पुरुषाची जास्त लैंगिक गरज आणि ऐषआरामी वृत्ति एवढाच विचार यांत होता असें म्हणणें योग्य होणार नाहीं. ऐषआरामाचा (Luxury) हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे कीं, तो जबाबदारीनें व स्वखर्चानें माणसास करावा लागल्यास तो आपोआप कांहीं

व्यक्तिगत मर्यादेपलीकडे जाऊंच शकत नाहीं. फक्त त्या व्यक्तीस तो भोग भोगावयास स्वतःला तोशीस लागली पाहिजे म्हणजे झालें. 'ऐषआराम' या वृत्तीची ही उत्तम मर्यादा आहे, या वृत्तीचा हा उत्तम उतारा आहे किंवा या वृत्तीस काबूंत ठेवण्यास हा उत्तम उपाय आहे. हें लक्षांत घेतल्यास मोठी लैंगिक इच्छा तृप्त करण्यास आणि भोगेच्छा भागविण्यास पुरुषावर विवाहाची अर्थात् स्त्री व तिची संतति यांची जबाबदारी पाडल्यास त्याचा काटा ढिला झाल्याशिवाय राहाणार नाहीं आणि ही वृत्ति आपोआप मर्यादित होईल; ही युक्ति या चालीमागें होती असें दिसतें. शिवाय अशा पुरुषांना वेश्याव्यवसायापासून सहजच परावृत्त करण्याकडेहि या चालीचा उपयोग होत होता तो वेगळाच. तात्पर्य, ही चाल असणें म्हणजे सर्व पुरुष सारख्या बायकाच करीत होते असें मानणें मूर्खपणाचें आहे. कायद्यानें ही चाल बंद झाली म्हणजे आतां पुरुष कांहीं करणार नाहींत, हेंहि तितकेंच मूर्खपणाचें आहे. दारूबंदी, बायकाबंदी इत्यादि कायद्यांची, व्यवहारांत कायद्यानें ध्येयवाद उतरवूं पाहणाऱ्या मूर्ख कायद्यांतच गणना होते. या कायद्यानें ' काळा बाजार ' हा नवीन प्रश्न मात्र उत्पन्न होऊन ' वेश्याव्यवसाय ' आणि 'पारदारिकत्व' वाढण्याची भीति व संभव मात्र फार उत्पन्न होतो.

**वेश्याव्यवसाय :** वेश्याव्यवसाय ही अनिवार्य गोष्ट आहे. ही सृष्टींतील घटना म्हणजे नैसर्गिक विविधतेंतील एक प्रकार असें मानलें पाहिजे. वात्स्यायनांनीं सबंध अधिकरण ' वैशिक ' म्हणजे वेश्याव्यवसायासंबंधीं लिहिलें आहे व स्त्रीनायिकांचे वात्स्यायनानें भार्या, परनारी, पूनर्भू व वेश्या असे चार वर्ग कल्पिले आहेत. प्रत्यक्ष व्यवहारांत नायिकांचे हेच वर्ग पडूं शकतात. शास्त्रांत जें प्रत्यक्ष घडतें त्याचें वर्णन येणें जरूर असल्यानें या सर्व वर्गांचा विचार करणें वात्स्यायनास क्रमप्राप्तच आहे. वेश्या ही सामाजिक समस्या अटळ असून त्यांचा प्रश्न भारतियांनीं अत्यंत बुद्धिगम्य पद्धतीनें विचारांत घेतला होता. कोणत्याहि समाजांत व कोणत्याहि कालांत वेश्याव्यवसायास लागणारी कारणपरंपरा असणें अत्यंत स्वाभाविक असल्यानें, ध्येयाचारांचा संस्कार केवढाहि केला तरी ही गोष्ट संपूर्ण नष्ट होणार नाहीं, म्हणून त्याचा योग्य तो विचार करून वेश्यांची शैक्षणिक सुधारणा करण्याचा प्रयत्न भारतियांनींच केलेला दिसतो.

वेश्याव्यवसायामागील कारणपरंपरा एकाच सूत्रांत वात्स्यायनांनीं दिली.

**रतिर्वृत्तिश्च सर्गात्** ( का. सू. ६.१.१ ) असें सूत्र असून त्यावर भाष्य करतांना टीकाकार लिहितात,

**" सर्गादिति सृष्टिः । एषैवहि सृष्टिः यत् कामः अर्थागमः । "**

नैसर्गिक प्रवृत्ति व अर्थागम हीं दोन कारणें एकत्र होऊन वेश्या ही समस्या उत्पन्न होते. हॅव्हलॉक एलिस यांचेंहि मत अर्थ हेंच कारण वेश्याव्यवसाय उत्पन्न करतें असें आहे. अर्थात् त्याबरोबर इतरहि कारणें त्यांनीं दिलीं आहेत. त्यांत विवाहाची स्त्रीपुरुषांस अशक्यता हें एक कारण असूं शकतें. आणखी कांहीं हल्लींच्या अभ्यासकांच्या मतें पुरुषाची कामवासनेची गरज (Biological need) फार मोठी असल्यानें वेश्याव्यवसाय अपरिहार्य ठरतो. संत एकनाथांनीं मनुष्य प्राण्याचा कामविकार केवढा जाज्वल्य असतो याचें भागवतांत उत्तम वर्णन दिलें आहे.

**मेष श्वान आणि खर । हे ऋतुकाळींच विषयतत्पर ।**
**त्याहूनि विशेषेंसि नर । कामीं दुर्धर सर्वदा ॥**

मनुष्येतर प्राणी हे फक्त ऋतुकालांतच कामवासनेच्या आहारीं जातात. पण मनुष्याची कामवासना मात्र दुर्धर असून तो केव्हांहि हिच्या आहारीं जाईल. परंतु ही कारणपरंपरा जरा बाजूस ठेवली, तरी एक सत्य त्रिकालाबाधित आहे कीं वेश्या ही समाजांतील एका दृष्टीनें अपरिहार्य अडचण किंवा दुसऱ्या दृष्टीनें समाजोपयोगी गोष्ट आहे. यांना धर्म काय सांगणार असा प्रश्न सहजच वाचकांच्या मनांत येईल.

कुंभदारी, परिचारिका, कुलटा, स्वैरिणी, नटी, शिल्पकारिका, रूपाजीवा, प्रकाशविनष्टा व गणिका असे वेश्यांचे निरनिराळे वर्गहि वात्स्यायनानें दाखविले आहेत. यांतील गणिका हा मोठा श्रेष्ठ वर्ग असून त्यांनीं विद्या व कला यांची पुष्कळ जोपासना या देशांत केलेली आहे. पुराणांत इंदुमती, विलासिनी, सुगंधा या उत्तम वेश्या म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्यांतहि हा अधमोत्तम व्यवहार काय आहे ह्याचें पुढें दिग्दर्शन करूं.

**भारतीय दृष्टिकोन :** पाश्चिमात्य समाजांतहि 'वेश्या' ही समस्या आहेच. ग्रीस वगैरे देशांत वेश्येला मोठें उच्च स्थानहि होतें. सॉक्रेटिस स्वतः थिओडोरा ( Theodora ) नामक

एका सुंदर वेश्येकडे सहज भेटण्यास जाऊन तिच्याशीं योग्य अशा चार गप्पा निर्भयतेनें करून प्रेमानें तिचा निरोप घेऊन परत आल्याचें मोठें उत्तम वर्णन झीनोफोन ( Xenophon ) मध्यें आढळतें. रोमन साम्राज्यांत वेश्याव्यवसाय खालच्या दर्जास गेला. मध्ययुगांत तर वेश्या म्हणजे एक पाप असा दृष्टिकोन निर्माण होऊन, ख्रिश्चॅनिटीच्या राज्यांत सर्वत्र वेश्या म्हणजे अपवित्र ठरून तिची सर्वतोपरी छळणूक करण्यांत आली. तरीहि वेश्याव्यवसाय नष्ट झाला नाहीं. पण शेवटीं या समस्येचें काय करावयाचें ? अर्थागम जोंपर्यंत कामवासनेंतून होतो, तोंपर्यंत हा व्यवहार थांबणें शक्य नाहीं. मग त्याचे नमुने कांहींहि असोत, सध्यांच्या औद्योगिक युगांत ( Industrial age ) तर ही समस्या जास्तच भीषण आर्थिक स्वरूप धारण करतांना दिसते. आर्थिक स्पर्धेत तर कोणताहि सूक्तासूक्त विचार राहातच नाहीं, आणि यामुळें या व्यवसायांतहि उत्तम गुणांचा संपूर्ण लोप झालेला असून या वर्गाची फारच अवनति आज प्रत्यक्ष दिसत आहे. विवाहाचें यश दिवसेंदिवस सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेर जात आहे. अविवाहित लोकांची संख्या वाढत आहे. विवाहाची शक्यता पुष्कळांना नाहींशी होत आहे. विवाहाचें वय वाढत आहे. उद्दीपनाचीं साधनें वाढत आहेत. धर्मश्रद्धा नाहींशी होत आहे. ऐहिक सुख हेंच खरें सुख असें मानून चार्वाकप्रवृत्ति फैलावत आहे. मग आतां वेश्याव्यवसाय फार झपाट्यानें वाढल्यास नवल काय ! कायद्यानें कांहीं देशांत वेश्याव्यवसाय बंद केला, तर मग परिस्थिति काय घडेल याचें वर्णन लिंड ( Lynd ) नामक एका समाजशास्त्रीय ग्रंथकारानें आपल्या अभ्यासांत केलें आहे. त्याचें मत असें कीं, वेश्याव्यवसाय आतां भूमिगत ( Underground ) झाल्यानें त्याचें प्रमाण काढतां येणार नाहीं. त्यानें अभ्यास केलेल्या गांवांत १८९० सालांत साधारण २५ घरें वेश्यांचीं असतील. त्या गांवांत आतां हा कायदा असल्यानें काय घडलें पाहा.

" The automobile has become a house of prostitution on wheels. " ( Lynd. p. 40 )

चार चाकांची प्रत्येक गाडी ही वेश्येचें घर बनली आहे. तात्पर्य, या कायदेबाजीनें आपल्या देशांत जें दारूचें घडलें तेंच वेश्याव्यवसायाचें घडलें तर त्यांत नवल नाहीं. पण कांहीं देशांत हा प्रश्न वेगळ्या तऱ्हेनें हाताळतात. त्यांत

वेश्याव्यवसायास परवाना लागतो आणि त्या व्यवसायांतून जे उपदंशादिविकार तेवढे समाजांत फैलावूं नयेत, याकरितां जरूर ती सर्व काळजी घेण्यांत येते. आमच्या मतें सध्यां हीच सुधारणा इष्ट व शक्य आहे. परंतु भारतियांनीं याच्याहि पुढें जाऊन वेश्येला शैक्षणिक वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे. तिलाहि कांहीं धर्म सांगितले आहेत. त्यांत तिनें कोणते पुरुष टाळावेत, नायक कसा पसंत करावा, पसंत केल्यावर त्यांच्याशीं कसें वागावें व त्याच्या सुखदु:खांशीं कसें समरस व्हावें, प्रजोत्पत्ति झाल्यास तिची कशी व्यवस्था लावावी इत्यादि सूक्ष्म विचार येतात. क्षयी, रोगी, स्तेन, निर्दय, कसलाहि मानापमान नसणारे, दुराचारी, कपटी असे पुरुष वेश्येनेंहि टाळावेत असा इशारा कामसूत्रकारांनीं दिला आहे. त्यांत '**प्रियकलत्रः**' असा आणखी एक प्रकारचा पुरुषहि येतो. या शब्दाचा अर्थ असा कीं, जो स्वतःच्या स्त्रीशीं प्रेमानें एकत्व पावलेला आहे किंवा ज्यास आपली स्त्री प्रिय आहे तो. यांत यशस्वी विवाहांत वेश्येनें येऊं नये असा नियम धर्मानें दिला आहे हें स्पष्ट दिसत नाहीं काय ? यावरून अधर्म्य कामानें धर्म्य कामांत ढवळाढवळ करूं नये असा नियम वेश्येस शिकविण्यांत आला. ही गोष्ट कौतुकास्पद नाहीं असें कोणता सुज्ञ म्हणूं शकेल ? '**कांतानुवृत्त**' या प्रकरणांत वेश्येनें नायकाची निवड केल्यावर भार्येसमान एकचारिणीवृत्त कसें ठेवावें हें कामशास्त्रकारांनीं सांगितलें आहे. यांत संबंधित पुरुषाच्या सुखदु:खाशीं तादात्म्यता निर्माण करावी असा सर्व आचार आला आहे. आतां बहुपातिकत्व ही वेश्येस नेहमींचीच अनिवार्य गोष्ट आहे. तरीहि त्यांत वेश्येंतहि उच्च प्रेमाची भावना निर्माण करण्याचा भारतीय प्रयत्न आहे. शूद्रक कवीचें 'मृच्छकटिक' नाटक हें या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. त्यांतील नायिका वसंतसेना ही चारुदत्तावर गुणलुब्ध असते. तिला त्याच्याकडून अर्थाची अपेक्षा नसते. त्याच्या संसाराची माती करावी, त्याच्या द्रव्याचा अपहार करावा, किंवा त्याला व्यसनी बनवून त्याचें आयुष्य बरबाद करावें, असा किंचितहि हेतु वसंतसेनेंत दाखविलेला नाहीं. हा गुणवान् पुरुष आहे. अतएव त्याच्याबद्दल मला आदर व प्रेम आहे, असा भाव आहे. यावरून भारतियांनीं वेश्यावृत्तींतहि आपले शैक्षणिक उपाय व संस्कार नेऊन ठेवले होते हें दिसत नाहीं काय ? या प्रकारच्या वेश्या साधारणतः मोठ्या कलानिपुणहि असाव्यात असें दिसतें. गायन, वाद्य; नृत्य व रति या सर्व कला एकत्रित आल्यास शृंगार व आनंद उत्पन्न होण्यास केवढी बहार येत असेल !

**गाने वाद्ये च नृत्ये च भाषणे दर्शने रतौ।**
**अद्वितीयाऽऽहिता धात्रा गणिका भुवनत्रये॥**

याप्रमाणें भुवनत्रयांत गणिका ही गायन, वाद्य, नृत्य, संभाषण आणि रति या सर्व विद्यांत अद्वितीय असते असें कवीचें म्हणणें. गणिका या भारतीय स्त्रीचा युरोपियन अभ्यासकांनींहि पुष्कळ अभ्यास केलेला असून, त्या वर्गांतील स्त्रीनें समाजोपयोगी पुष्कळ कार्य केलेलें असून तिला समाजांत चांगलें स्थान असे, असें मत बनविलें आहे. दंडी कवीचें दशकुमारचरित या ग्रंथांत काममंजरी नामक गणिकेच्या तोंडीं गणिकावृत्ताचें फार मार्मिक वर्णन कवीनें घातलें आहे. शरीरबलवर्णसंवर्धन करील असा मिताहार, नृत्य, गीत, वाद्य, नाट्य, इत्यादि अनेक कलांचें शिक्षण, संभाषण, चर्चा व खेळ यांत चातुर्य, उत्सव प्रसंगांतून सौंदर्यप्रसाधनांनीं भूषित पोषाखांत प्रदर्शन, वय, अर्थ, दाक्षिण्य, शील इत्यादि गुणांनीं युक्त असलेल्या स्वतंत्र पुरुषाशीं गांधर्वविधीनें समागम इत्यादि गणिकावृत्ति सर्व कामसूत्रांतील वैशिक प्रकरणाबरहुकूम वर्णन केलेली आढळते.

या प्रकारांत गुणलुब्धता हा आणखी एक गुण घातला तर 'तेचि पुरुष दैवाचे' हें मराठी मृच्छकटिकांतील गाणें किती मार्मिक आहे हें सहज ध्यानीं येईल. येथें एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, गणिका हा अर्थहीनांचा शोक नाहीं. हा स्वतंत्र व श्रीमंत मंडळीचा शोक आहे. यांतून या श्रीमंतांचा पैसा खर्च होत असे. नाहींतर गणिकेनें या कला उत्पन्न करण्याकरितां कोठून खर्च करावा ? तेव्हां श्रीमंतांचा पैसा कलेच्या सत्कारणीं लावण्याचें कार्य गणिका सहज करूं शकत असे. शिवाय या श्रीमंतांची संपत्ति तिनें कशी खर्च करावी याबद्दलहि कांहीं आदेश दिलेले आहेत. देवमंदिर, विहीर, बाग इत्यादि बांधण्यांत, ब्राह्मणांना दान, पूजा इत्यादि धर्मविधींत गणिकेनें लागतील तेवढे श्रीमंतांचे पैसे त्यांस खर्च करण्यास भाग पाडावें असा सल्ला कामसूत्रकारांनीं दिलेला आहे.

महानंदेचें उदाहरण तर धार्मिक म्हणून शिवलीलामृतांत प्रसिद्ध असून या महानंदेनें तीन दिवसांकरितां केलेल्या पतीबरोबर फार मोठ्या पातिव्रत्याचा ध्येयाचार जो सहगमन, तेंहि स्वेच्छेनें केलें. हें सर्व कुलीन स्त्रियांच्या परिचयाचें आहे. आतां ज्याप्रमाणें यशस्वी विवाहाचा ध्येयाचार 'रामसीता', त्याप्रमाणें वेश्येचा ध्येयाचार 'महानंदा'. पण प्रत्यक्ष परिस्थिति पुष्कळ भिन्नत्वानें आढळणारच.

वेश्या ही मुख्यतः आर्थिक समस्या आहे असें मानल्यास व ' **अर्थैषणा** ' ही वेश्येंत फार महत्त्वाची आहे असें मानल्यास, वेश्येचा ' पुरुषार्थ ' अर्थ हा प्रथम व नंतर धर्म व काम असेच राहणार. त्यास धरून वेश्येचे त्रिवर्ग ' धर्मार्थकाम ' असे नसून अर्थधर्मकाम ' असे अर्थप्रधान आहेत. असेंच वात्स्यायनांनीं सांगितलें आहे.

' **अर्थो धर्मः कामः इत्यर्थत्रिवर्गः** । ' का. सू. ६. ६. ५.

या मुख्य पुरुषार्थास धरून या जातींत जी फसवणूक व दांभिक प्रेमाची कला उत्पन्न झाली त्याचेंहि यथायोग्य वर्णन सर्वत्र आढळतें.

**एता हसंति च रुदंति च वित्तहेतोः ।**
**विश्वासयंति पुरुषं न च विश्वसंति ॥**

वित्ताकरितां यांचें हास्य व रडणें आहे. या पुरुषाचा विश्वास संपादन करतील पण त्याच्यावर कधींहि विश्वास ठेवणार नाहींत, हें जाणून स्मशानसुमना-प्रमाणें कुलवान् माणसानें वेश्या वर्ज्य करावी असा कवीचा आदेश आहे. मृच्छकटि-कांतहि हा भाग कवीनें बहारीनें वर्णन केला आहे. यांचें शरीर ' **पण्यभूतं शरीरं** ' हें दुकानच आहे. त्यांत प्रेमाचा संबंध काय ! ' **साप्रियं चाप्रियं च** ' तो प्रिय असो वा अप्रिय असो ' **वहसि हि धनहार्यं**,' जो पैसा देतो तो तिला खरेदी करूं शकतो, असें विटाच्या तोंडीं आहे. तेव्हां एखाद्या रस्त्यावरील विहिरीप्रमाणें, नदीवरील नावेप्रमाणें किंवा लतेवरील फुलांप्रमाणें वेश्या असते, असें वर्णन आहे. त्या विहि-रीचें पाणी विद्वानांपासून मूर्खांपर्यंत कोणीहि प्राशन करतो. लतेच्या फुलाचा आस्वाद कावळ्यापासून मयूरापर्यंत कोणीहि घेतो आणि नावेंत बसून ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत कोणीहि नदी ओलांडतो.

' **त्वं वापीव लतेव नौरिव सदा वेश्यासि सर्वं भज** । '

तात्पर्य, वेश्येच्या धंद्यास हा शाप आहे. त्यास इलाज नाहीं. परंतु त्यांतहिं ध्येय काय असावें हें भारतियांनीं निर्विवादपणें मांडलें आहे. एका बाजूस कुलीन पुरुषास ' वेश्या वर्ज्य कर ' असें शिक्षण व दुसऱ्या बाजूस वेश्येस ' तूं महानंदा हो ' हें शिक्षण देण्यांत ' यशस्वी विवाह ' हेंच ध्येय भारतियांनीं परत पुढें रेटण्याचा प्रयत्न केला आहे, असें स्पष्टपणें दिसत नाहीं काय ? एकंदरींत वेश्याव्यवसायाबाबत भारतियांचा दृष्टिकोन बुद्धिगम्य असून, तो तीन नियमांत मांडतां येईल.

( १ ) प्रथमतः वेश्या ही मुख्यतः नैसर्गिक गरज व अर्थापत्ति यांतून निर्माण झाली असून सृष्टिनियमास धरून आहे, म्हणून ती अटळ आहे.

( २ ) वेश्याव्यवसायामुळें रोग फैलावूं नये, याकरितां काळजी घेणें अत्यंत जरूर आहे. क्षयी, कुष्ठी, संसर्गजन्य रोग असणारा असा पुरुष वेश्येनें वर्ज्य करावा असा नियम दिलेला आहे. ( का. सू. ६.१.१६ ) यांत उपदंशादि विकार येतात किंवा नाहीं हें सांगणें कठिण आहे. '**कृविशकुल्**' किंवा '**पुरुषपक्षिका**' हा प्रसिद्ध रोग होता असें दिसतें. याचें यशोधरानें दिलेलें वर्णन फारसें स्पष्ट दिसत नाहीं. पण यांत व्रण होतो, किडे पडतात इत्यादि गोष्टी उपदंशासारख्या दिसतात. तत्कालीन ज्ञानाला धरून रोग फैलावूं नयेत याची कांहीं काळजी वेश्येनें घेणें योग्य आहे असें शिक्षण दिलें जात होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

( ३ ) 'यशस्वी विवाह' हें व्यक्ति व समाज यांचें अंतिम ध्येय असल्यानें त्यास धरून एका बाजूस वेश्याव्यवसायांतहि कांहीं शिक्षण देऊन त्यांना उच्च आचार लावण्याचा प्रयत्न करावा व दुसरीकडे कुलवान् पुरुष वेश्यागमनी होऊं नयेत म्हणून काळजी घ्यावी असा हा भारतियांचा 'वेश्याव्यवसायांतहि' शैक्षणिक कार्यक्रम आहे.

# प्रकरण ८ वें

## पाश्चिमात्य संस्कृति-संघर्ष
## व
## सद्यःस्थिति

युरोपीय संस्कृतीचा त्रोटक वृत्तांत — कुटुंबसंस्थेचें कार्य व त्यांतील बदल — बदल म्हणजे प्रगति नव्हे — कौटुंबिक बदलांचा विशेष विचार— कुटुंब विघटनेचीं कारणें— कुटुंबविघटनेचे दृश्य परिणाम — पाश्चिमात्यांचा कुटुंबसुधारणेचा विचार — पाश्चिमात्यांचा विवाहविषयक कायदा — भारतीय व पाश्चिमात्य व्यवहारांतील फरक — ब्रिटिश अमदानींतील सामाजिक स्थित्यंतर — विष्णुशास्त्र्यांचा पहिला हल्ला — कामवासना व सद्यःपरिस्थिति पाश्चिमात्याचें वैवाहिक अपयश.

प्राचीन भारतीय इतिहासांत या देशांत भिन्न भिन्न संस्कृति अनेक वेळां एकत्र आल्या. मुसलमानांपर्यंत ज्या अनेक संस्कृति या देशांत आल्या, त्यांची पुष्कळ छापहि एतद्देशीय संस्कृतीवर पडलेली दिसेल. परंतु युरोपियन संस्कृतीच्या आगमनानें या देशांत कांहीं आमूलाग्र फरक झालेले दिसत असून, त्यांतून परत मागें फिरतां येईल, अशी शक्यताहि यापुढें दिसेनाशी झाली आहे. तेव्हां या पाश्चिमात्य संस्कृतीचें येथें थोडें दिग्दर्शन करून, त्यांतील कामविषयक परिस्थितीचा विशेष

विचार प्रस्तुत प्रकरणीं कर्तव्य आहे. शिवाय या पाश्चिमात्य संघर्षास धरून आपली सद्यःस्थितीहि आजमावण्याचा प्रयत्न करणें क्रमप्राप्त आहे.

**युरोपीय संस्कृतीचा त्रोटक वृत्तांत :** युरोपीय संस्कृतीचा पूर्वेतिहास फार मोठा नाहीं. एकंदर मानवी इतिहासाचे साधारण दोन भाग कल्पितां येतील. ज्या भागासंबंधीं लेखी प्रमाण सांपडणें शक्य आहे तो एक व ज्या भागासंबंधीं फक्त काहीं अनुमानच शक्य आहे, तो दुसरा. मानवी संस्कृतीचीं पाळेंमुळें भूतकालांत एवढीं खोल गेलीं आहेत कीं, तीं अदृश्यच आहेत, असें म्हणणें रास्त होईल. ह्याची विवंचना फलद्रूप होण्याचा फारसा संभव नाहीं. पुराणवस्तुसंशोधन ( Archeology ) मानववंशशास्त्र ( Ethnology, Anthropology ) इत्यादि प्रकारच्या अभ्यासांनीं जरी इतिहासाच्या या दुसऱ्या भागावर कांहीं प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केलेला असला तरी त्याचा उपयोग ज्ञानाचें एक नवें दालन उघडण्यापलीकडे फारसा नाहीं. प्रथम भागाची कांहीं जास्त माहिती असून तिचा उपयोग निरनिराळ्या संस्कृतींचा एकमेकींशीं संबंध जोडण्यास होण्यासारखा आहे. हा कालखंड दुसऱ्या कालखंडाच्या मानानें फार मोठा नाहीं. फ्रान्समधील या कालखंडासंबंधीं लेखी पुरावा फक्त खिस्तपूर्व ६० वर्षें एवढाच असून, इंग्लंडचा खिस्त शक ४० पासूनच आहे. युरोपियन संस्कृतीचा उदय युरोप व मध्यआशिया येथें ज्या संस्कृति निर्माण झाल्या त्यांतून झालेला दिसतो. जसजसा पौर्वात्य व दाक्षिणात्य लोकांशीं युरोपचा संबंध आला, तसतशी त्यांच्यांत सांस्कृतिक सुधारणा होऊं लागली. कागदाचा उपयोग प्रथमतः चीन या देशांत खि. श. १०५ मध्यें झाला. त्यानंतर त्याची माहिती समरकंद; इजिप्त, इटली वगैरे देशांतून झाल्यावर १३०९ मध्यें कागदाचा उपयोग इंग्लंड देशांत होऊं लागला. युरोपमध्यें प्रचलित असलेली बियर, मेसापोटेमिया व इजिप्त या देशांत प्रथम तयार झाली. चहाचा शोध चीनमध्यें लागला. खिस्ती धर्माचा उदय पॅलेस्टाईनमध्यें होऊन तो युरोपमध्यें पसरला. बायबलचें इंग्रजी भाषांतर हिब्रू व ग्रीक भाषांतून झालें. अँग्लोसॅक्सन भाषेवर लॅटिन भाषेची मोठी छाप दिसते. सारांश, पूर्व व दक्षिण दिशांकडून युरोपमध्यें निरनिराळे सांस्कृतिक संस्कार आले. अमेरिकेची गोष्ट जरा वेगळी आहे. युरोपियन संस्कृतीचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी झापोटेक ( Zapotec ) माया ( Maya ) इत्यादि तद्देशीय लोकांच्या संस्कृति अस्तित्वांत होत्या. त्यांत माया संस्कृति साधारण

ख्रिस्त शक ४०० च्या सुमारास गणित, ज्योतिष, शिल्प इत्यादि शास्त्रांतहि प्रगत झालेली दिसते.

कोलंबसानंतर अमेरिकेंत गेलेल्या युरोपीय संस्कृतीनें तद्देशीय संस्कृति जवळजवळ नाहींशी केली. एकंदरींत पाश्चिमात्य व पौर्वात्य संस्कृतींत बरीच देवाणघेवाण भूतकालांत झालेली आहे. कुटुंब या दृष्टीनें विचार करतां मुख्यतः दोन प्रकार कल्पिले जातात. एकास पतिपत्नीप्रधान ( Conjugate or nuclear ) असें नांव देण्यांत येतें व दुसऱ्यास आप्तेष्टप्रधान ( Consanguine ) असें नांव देतात. दुसऱ्या प्रकारच्या कुटुंबास साधारणतः एकत्र-कुटुंबपद्धति म्हणून आपल्याकडे ओळखतात. विभक्त कुटुंबपद्धतींत पतिपत्नीप्रधानत्वच असतें. शिवाय मातृसत्ताक किंवा पितृसत्ताक पद्धतीप्रमाणें कुटुंब वेगळें दिसेल. परंतु कोणत्याहि ऐतिहासिक संस्कृतींत कांहीं विवाहपद्धति व कुटुंबपद्धति अतित्वांत होती असें दिसेल. मुरडॉक् ( Murdock ) नांवाच्या अभ्यासकानें २५० समाजांचा असा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. 'विवाहांत जवळचे नातेवाईक टाळणें,' हा एकच आचार घेतला, तरी या निरनिराळ्या समाजांतून हा आचार निरनिराळ्या प्रमाणांत अस्तित्वांत असल्याचें दिसतें. कांहींत फक्त सख्खे भाऊबहीण एवढाच वर्ज्य आचार आहे, तर कांहींत मातापितरांचीं नातींहि लक्षांत घेतलेलीं दिसतील. कांहींत यापेक्षांहि विस्तृत क्षेत्र विवाहास वर्ज्य समजलें गेलेलें दिसेल. याशिवाय बहुपत्नीकत्व, बहुपतिकत्व अशा चाली ज्या समाजांत अस्तित्वांत असतील, तेथें परत कुटुंब वेगळें दिसेल. कांहीं समाजांत स्त्रीचें विवाहकालीन कौमार्यहि महत्त्वाचें धरलें जात नाहीं. वधूविक्रीच्याहि अनेक चाली कांहीं ठिकाणीं प्रचलित दिसतात. विवाह वडील मंडळींनीं जमवावे असा कांहीं समाजांत दंडक दिसेल, तर कांहीं वेळां तो अधिकार तरुणतरुणींना दिलेला दिसेल. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व भूतकालीन समाजांच्या चालीरीति समजावून घेतल्यास कोणतीहि चाल नवी आहे असें म्हणण्याचें कारण उरणार नाहीं. तशी चाल भूतकाळांत कोठेंतरी होती हें सहज दाखवून देतां येणें शक्य आहे.

**कुटुंबसंस्थेचें कार्य व त्यांतील बदल :** कालाच्या ओघांत पाश्चिमात्य राष्ट्रांतहि जें टिकून राहिलें तें पाहिलें तर पितृसत्ताक, एकपत्नीक, पतिपत्नी-प्रजाप्रधान ( Nuclear ) असलेलें कुटुंबच दिसून येईल. कुटुंबाच्या मूलभूत गरजा आजहि ते चारच प्रकारच्या मानतात. मुरडॉक म्हणतात,

"In the nuclear family, we thus see assembled four functions fundamental to human social life, the sexual, the economic, the reproductive and the educaticnal. Without provision for the first and the third, society would become extinct, for the second, life would cease, for the fourth, culture would come to an end." (Murdock p. 10.)

कुटुंबाचें मूलभूत कार्य चार प्रकारचें आहे असं ते म्हणतात. त्यांत प्रथम अर्थ हें कार्य, ज्याशिवाय जगणें कठिण. त्यानंतर प्रजोत्पादन, रतिसुख व गृहशिक्षण या तीन महत्त्वाच्या गोष्टी येतात. प्रजोत्पादनाशिवाय समजाचें अस्तित्वच नाहींसें होतें. गृहशिक्षणाशिवाय संस्कृति, संस्कार आणि परंपरा या शब्दांस अर्थ राहात नाहीं. भारतियांनीं हें सर्व अर्थ व काम या दोन पुरुषार्थांत बसवून दिलेलें आहे. या मूलभूत कार्यावर कुटुंबसंस्थेची इमारत आधारलेली असल्यानें सर्व जगांत कुटुंब-ही संस्था कसल्याहि प्रतिकूल परिस्थितींत टिकाव धरून राहिली आहे. कुटुंब संस्थेचें स्वरूप निसर्गात कालांतरानें उत्पन्न झालेलें असून त्यांत स्त्रीपुरुषांना त्यांच्या स्वभावांस धरून कांहीं कार्यविभागणी सहजच उत्पन्न झाली आहे. अमेरिकेंतहि जुन्या काळीं कुटुंबाचें चित्र वरील तत्त्वास धरूनच होतें. एकादें कृषिप्रधान कुटुंब घेसल्यास त्यांत दहा दहा माणसें असावयाचीं. पुरुषांनीं शेतांतील कष्ट करावयाचे, बायकांनीं घर, गुरेंढोरें व मुलें यांची चिंता वाहावयाची. शिवाय फावल्यास शेतावरहि मदतीस जावयाचें. पहाटें चारपासून रात्रीं आठपर्यंत सर्वत्रांना कांहीं काम हें असावयाचेंच. त्यांचें स्वतःचें प्रशस्त घर असावयाचें. कधीं सणावारीं कांहीं करमणुकीचे खेळ व उत्सव असावयाचे. राजकारणाशीं फारसा कधीं संबंध नसायचा. फार झालें, तर एखादेवेळीं एखाद्या सभेस जायचें. मुलामुलींच्या आयुष्यास जरुरीचें शिक्षण बहुतांशीं घरांतच होत असे. शिस्त पाळण्याकडे विशेष लक्ष असे आणि याप्रमाणें परंपरेनें कित्येक पिढ्या तें घर व कुटुंब सातत्यानें चालत असे. आपल्याकडील कृषिप्रधान कुटुंबाचें चित्र यापेक्षां फार वेगळें दिसेल काय ?

या जुन्या जमान्यांत मागच्या शतकापासून झपाट्यानें बदल होत गेला. हा बदल कां होत आहे याची कारणपरंपरा मोठी आहे. त्यांत नवीन यांत्रिक सुधारणा, शहरी जीवन, युद्धें इत्यादि गोष्टी असल्या तरी त्या त्या संस्कृतींतील बदलणारा आयुष्यावरील दृष्टिकोन हेंहि प्रामुख्यानें एक कारण धरावें लागेल.

संस्कृतीच्या घडणीवर भौगोलिक ( Geographical ) आणि प्राणीशास्त्रीय ( Biological ) परिस्थितीचा परिणाम घडून येणें अपरिहार्य असलें, तरी मूलभूत बदलांचीं कारणें मुख्यतः त्या संस्कृतीमध्येंच असावीं लागतात. भौगोलिक परिस्थितीप्रमाणें धंदे बदलतील, अन्नाच्या व राहणीच्या संवयी बदलतील परंतु कुटुंबांत मुलें किती असावीं, स्त्रीपुरुषांचे संबंध कसे असावेत यांसंबंधींचे बदल त्या संस्कृतींतील व्यक्तींच्या आयुष्यावरील दृष्टिकोनांतूनच उत्पन्न होणें जास्त शक्य असतें.

" Most important influences making social change arise within culture itself. " ( R. L. Sutherland. p. 495 )

अर्थात्, या अंतर्गत दृष्टिकोनावर त्या संस्कृतींतील आर्थिक स्थिति, यांत्रिक सुधारणा, दुसऱ्या संस्कृतींचे संघर्ष इत्यादि गोष्टींचा परिणाम होतच असतो. या बदलासच प्रगति असें नांव देण्याचा प्रघात पडला आहे. कदाचित् डार्विनचें उत्क्रांतीचें प्राणीशास्त्रीय तत्त्व स्पेन्सरप्रभृति मंडळींनीं सामाजिक बदलास लावण्याचा जो व्यर्थ खटाटोप केला त्यामुळें " बदल म्हणजे प्रगति " असा आभास उत्पन्न झालेला असेल. एवढें खरें कीं बदल म्हणजे नेहमीं प्रगति असते असें नव्हे. आतां कुटुंबसंस्थेस धरून काय बदल पाश्चिमात्य संस्कृतींत अस्तित्वांत येत आहेत, यांसंबंधीं कांहीं वर्णन विषयास धरून करणें क्रमप्राप्त आहे. प्रो. किंबाल यंग यांनीं जुन्या व नव्या कुटुंबव्यवस्थेचा एक निदर्शक तक्ताच दिला आहे. तो येथें उद्धृत करतों.

| **१९ व्या शतकांतील कुटुंब** | **२० व्या शतकांतील कुटुंब** |
|---|---|
| १. पितृप्रमुख व पित्याचा संपूर्ण अधिकार ( Patriarchial and authoritarion ). | व्यक्तिनिष्ठ व जास्त लोकशाही-प्रधान. प्रत्येक व्यक्तिगणिक मत व अधिकार ( Democratic and Individualistic ). |
| २. कुटुंब स्थिर व घटस्फोट कमी ( Stable, little divorce ). | स्थैर्य कमी व घटस्फोट पुष्कळ ( Much less stable, divorce frequent ). |
| ३. एकत्र कुटुंब व विपुल संतति. सर्व एकत्र राहण्याचा प्रयत्न (Large and | कुटुंब लहान, संतति थोडी, एकत्र राहणें नको ( Few or no |

| | |
|---|---|
| combined family, many children ). | children, small size ). |
| ४. फारसें स्थलांतर नाहीं. | स्थलांतर फार. |
| ५. स्त्री घरांत चूल व मूल या उद्योगांत होती. | स्त्रीचे उद्योग घराबाहेर व पुरुषां-इतके झाले. |
| ६. स्त्रीस फार कडक लैंगिक नीति पाळावी लागत होती. याबाबत स्त्री व पुरुष यांत पुरुषास जास्त मुभा होती. | स्त्रीपुरुषांस सारखी मुभा देण्यांत आली आणि दोघांना एकच मूल्य लावावें असें ठरत आहे. |
| ७. कुटुंबांत एकत्व दिसे. | कुटुंबांत कोणतेंहि एकत्व शिल्लक नाहींसें होत आहे. |
| ८. शिक्षण, पोषण, संवर्धन, संस्कार इत्यादि नवीन पिढीचें बरेंच कार्य कुटुंबांत गृहशिक्षण म्हणून होत असे. | फक्त प्रजोत्पादन व पोषण एवढीं दोनच कार्यें कुटुंबांत होतात. |

वरील आठ मुद्दे स्पष्टपणानें युरोपीय समाजांत एका शतकांत 'कुटुंब' हें किती बदलांतून गेलें हें सहज दाखवितात.

**बदल म्हणजे प्रगति नव्हे :** हे सर्व बदल घडण्यांत विवाह यशस्वी करण्याची कांहीं एखादी बुद्धिगम्य कल्पना किंवा योजना होती असें नव्हे. समाजांत यांत्रिक युगाबरोबर, शास्त्रीय ज्ञानाबरोबर आणि बदलत्या अर्थव्यवस्थेबरोबर माणसाच्या जीवनमानांत, महत्त्वाकांक्षांत आणि राहणीच्या कल्पनांत जे फरक पडत गेले त्यांबरोबर कुटुंबसंस्थेंतहि फेरफार होत गेले. हे फेरफार कोणत्याहि ध्येयाला धरून झालेले नाहींत. जर कांहीं ध्येय असेलच तर शास्त्रांचा ऐहिक ऐषआरामाकडे व संपत्त्युत्पादनाकडे जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल, प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाला जास्तींत जास्त वाव कसा देतां येईल, एवढेंच आहे. पण हें ध्येय 'यशस्वी विवाह' हें नव्हतें एवढें निश्चित. यशस्वी विवाहास लागणाऱ्या गोष्टींचा यांत विचार नव्हता. किंबहुना विवाहासंबंधीं फारसा शास्त्रीय विचारच एक शतकापूर्वी नव्हता. जो आचार सहज चांगला चालत होता त्यांस शास्त्रापेक्षां परंपरेचें ज्ञान व पांघरूण होतें. परंपरा नेहमीं वाईटच असते असें नव्हे. त्या परंपरेंत टिकून राहिलेलीं जुनीं

मूल्यें होतीं. तीं वंशपरंपरा स्थिर झालीं होतीं. त्याप्रमाणें आचार चालू होते. तेव्हां हे सर्व बदल म्हणजे यशस्वी विवाहाच्या ध्येयास धरून झालेले योजनाबद्ध फेरफार नसून, परिस्थितीप्रमाणें, ऐहिक सुखोपभोगावर लक्ष ठेवून शास्त्रास राबवतांना व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टिकोनांतून निर्माण झालेले बदल होत. त्यास 'प्रगति' हें आभासमय नांव होतें. निदान यशस्वी विवाहास धरून तरी हे बदल म्हणजे प्रगति होती असें म्हणतां येणार नाहीं.

**कौटुंबिक बदलांचा विशेष विचार :** आतां या बदलांपैकीं कांहींचा थोडा विस्तार करणें जरूर आहे. प्रथमतः जुन्या कुटुंबांत पितृसत्ताक पद्धति होती. पुरुषाला सर्व कौटुंबिक प्रश्नांवर शेवटचा व संपूर्ण अधिकार असे. आतां देशांतील लोकशाही कुटुंबांतहि डोकावूं लागली. व्यक्तीबरोबर मत आलें. कांहीं प्रमाणांत पुरुषाचा सर्वाधिकार कमी झाला हें जरी ठीक असलें तरी अप्रबुद्ध लोकशाहीच्या अतिमात्र विस्तारानें, "मतामतांचा गलबला। कोणी न विचारी कोणाला ॥" ही परिस्थिति कुटुंबांतहि निर्माण झाल्यास नवल नाहीं. यामुळें शिस्तीचा अभाव उत्पन्न होऊन सर्व कौटुंबिक संबंधांवर परिणाम होतो. शहरी जीवन, आर्थिक अडचणी व व्यक्तिमत्त्वाची अवास्तव वाढ, यांमुळें दुसऱ्याशीं जुळतें घेण्याचें प्रमाण कमी होत आहे. कुटुंबाचें जुनें स्थिर स्वरूप नष्ट होऊन शहरांत तर तात्पुरतें विश्रांतिस्थान म्हणजे घर एवढाच अर्थ झालेला दिसतो. कुटुंबांत कमी प्रजोत्पादन होत असल्यानें कुटुंबाचा आकारहि लहान होत आहे. संततिनियमनाच्या साधनांची विपुलता उत्पन्न झाल्यामुळें, आर्थिक राहणीचें मान वाढत जात असल्यामुळें, 'थोडीं व चांगलीं' मुलें असा दृष्टिकोन उत्पन्न होत असल्यामुळें, आणि स्त्रीची पुरुषाशीं प्रत्येक क्षेत्रांत स्पर्धा सुरू झाल्यामुळें, कुटुंबांत मुलांचें प्रमाण कमी होऊं लागलें. आर्थिक अडचणी व महत्त्वाकांक्षा यांमुळें पुष्कळ स्त्रियांना घराबाहेर कामास जावें लागतें. कुटुंबाच्या आर्थिक स्थितीशीं मुलांचें प्रमाण पाहूं गेल्यास मात्र श्रीमंतांस कमी मुलें व गरिबांस जास्त मुलें असेंच चित्र दिसतें. हजारो रुपयांची मिळकत असलेल्या कुटुंबांत शेंकडा तीन मुलें दिसतात तर जेमतेम पोषणापुरत्या उत्पन्नाच्या कुटुंबांत शेंकडा २५ मुलें दिसतात. आर्थिक कारणांकरितां संततिनियमनाचा पुरस्कार करतांना ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. एकंदरींत जननसंख्येचें प्रमाण

पाश्चिमात्य संस्कृतींत कमी होत असून हा एक मोठा काळजीचा मुद्दा उत्पन्न झालेला दिसतो. पूर्वी एकदां सुप्रजेसंबंधीं विचार करतांना प्रजोत्पादनक्षमतेंतील विषमता ( Differential Fertility ) वाचकांच्या नजरेस आणलीच आहे. याशिवाय पाश्चिमात्य देशांतून सर्वसाधारण कुटुंबांतहि जननसंख्येचें प्रमाण कमी होत चाललेलें दिसतें. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत ( U. S. A. ) हें प्रमाण ( Specific fertility ) सन १८०० सालांत ५५ होतें, तर १९३० सालीं तें हजारीं २० वर येऊन पोहोचलें. साधारण १८७५ सालापासून इंग्लंड व वेल्स देशांतून हें प्रमाण घसरूं लागलें. ही गोष्ट बहुतेक पाश्चिमात्य देशांत अशीच दिसून येईल. या घसरगुंडीची कारणपरंपरा पुष्कळ सांगतां आली तरी एक गोष्ट खरी कीं कोणत्याहि एका वर्षांत विवाहित स्त्रियांना पूर्वींपेक्षां कमी मुलें होण्याचा संभव वाढत चालला आहे. यांत अनैच्छिक ( Involuntary ) किती व संततिनियमनाच्या ( Birth-control ) साधनांमुळें किती हें समजणें कठिण आहे.

स्त्रीची प्रजोत्पादनक्षमताच कमी झाली असा कांहींचा दावा आहे तर फक्त संततिनियमनाच्या साधनांमुळेंच संतति कमी आहे असें दुसरा पक्ष म्हणतो. ज्या ज्या देशांत हा संततिनियमनाच्या साधनांचा फैलाव जोरांत झाला, त्यांत फक्त आर्थिक कारणांमुळें तो झाला असें म्हणण्यास फारसा पुरावा उपलब्ध नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. या सर्व देशांतून लहान कुटुंबांचीं एक ‘ फॅशनच ’ अस्तित्वांत आली. जीवनांतील ऐषआरामाच्या ( Luxury ) गोष्टी वाढत गेल्या. समाजांत वर येण्याची महत्त्वाकांक्षा प्रत्येक डोक्यांत उत्पन्न झाली आणि या सर्व गोष्टीं साध्य करतांना तर मुलांची जोपासना हें ओझें वाटूं लागलें. या दृष्टीकोनांतील फरकामुळेंच मुख्यतः लहान कुटुंब अस्तित्वांत आलें असून त्यास आर्थिक कारणें नाहींत असें तज्ज्ञ विचारी मंडळींचें स्पष्ट मत झालें आहे. खालीं प्रो. कार् सॉंडर्स या प्रसिद्ध लोकसंख्येचा विचार करणाऱ्या तज्ज्ञाचें मत उद्धृत करतों.

“ The motive has been in the main to obtain freedom from burdens, which it is desired to escape, whatever the economic situation of the country or the family may be. ”

( Carr Saunders. p. 115 )

एकदां जबाबदारी टाळून स्वतःच्या महत्त्वाकांक्षा व ऐषआराम पुरा करण्याची संवय जडल्यावर तिचा परिणाम स्त्रीच्या प्रजोत्पादनक्षमतेवर झाल्यास

नवल काय ? सतत घसरणाऱ्या या जननसंख्येच्या प्रमाणानें कांहीं देशांत एवढी काळजी उत्पन्न झाली कीं प्रजोत्पादनास कोणत्याहि अडचणी येऊं नयेत आणि स्त्रीपुरुषांची प्रवृत्ति मुलांकडे जास्त व्हावी याकरितां कित्येक देशांतून दुसऱ्या महायुद्धापूर्वी आर्थिक मदतहि दिली गेली; परंतु व्यर्थ. या सर्व गोष्टींचा हें प्रमाण वाढविण्यास फारसा उपयोग झाला नाहीं. जर्मनी, फ्रान्स, बेल्जियम, इटली इत्यादि देशांतील या प्रयोगांचा हा निष्कर्ष आहे. हें प्रमाण घसरूं लागलें तेव्हां सुरवातीस ' लोकसंख्येची वाढ फार झाली ' असा दावा मांडणाऱ्या लोकांनीं पाठ थोपटून घेतली. पुढें हें अस्त्र जेव्हां आटोक्याबाहेर गेलें व घसरगुंडी थांबेना तेव्हां वंशनाशाच्या ( Race suicide ) घोषणा ऐकूं येऊं लागल्या व वाढ होण्याचीं साधनें हुडकण्याचा प्रसंग आला. परंतु क्षय करण्यापेक्षां वृद्धि करणें कठिण आहे हें तत्त्व आतां प्रत्ययास येऊं लागलें आहे. असो.

संततिनियमनाचीं साधनें व प्रचार लोकोपयोगी नाहींत किंवा त्यांचा उपयोग सर्वथैव त्याज्य आहे असा आमचा दावा नाहीं. मनःसंयम सांगणें सोपें पण अचारास कठिण आहे. परंतु जे शोध व हत्यारें आपण मानवाच्या हिताचीं व उपयोगी म्हणून त्यांचा देशकालपरिस्थितिनिरपेक्षत्वानें अप्रतिहत व सुलभ प्रचार करतों, तीं शेवटीं मानवाच्या नाशासच कारणीभूत होऊं शकतात, एवढें येथें वाचकांच्या नजरेस आणणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. याबाबत सरकारी प्रचाराचें धोरण काळजीपूर्वक आंखलें गेलें आहे असें वाटत नाहीं आणि जरूर ती काळजी व पथ्य या औषधांत न पाळल्यास जें दुसऱ्या देशांत झालें, तेंच येथें पन्नास वर्षांनीं होणार हें निश्चित. शिवाय प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नता ( Differential fertility ) लक्षांत घेतां कर्तृत्ववान् व बुद्धिवान् कुटुंबांतील प्रजांचें दुर्भिक्ष जास्तच भीषण स्वरूप धारण करूं शकेल. प्रो. सूदरलंड म्हणतात,

" But, like the invention of gunpowder, it ( Birth control ) has its possibilities both for increased human welfare and for an ultimate destruction of the human species. "

( R. L. Sutherland p. 481 )

संततिनियमनाचा सद्यःस्थितींत आमच्या देशांत फार मोठ्या प्रमाणावर प्रचार चालू असल्यानें हें कटु सत्य नजरेस आणणें, कांहीं लोकांची थोडी नाराजी पत्करूनहि आम्ही आपलें कर्तव्य समजतों.

यानंतर स्त्रीपुरुषांच्या लैंगिक संबंधांबाबत पाश्चिमात्य दृष्टिकोनांत हल्लीं जो फरक पडला आहे त्याचा विचार करणें जरूर आहे. मागच्या शतकांत लैंगिक विषयावर जवळजवळ अबोलाच होता. या शतकांत त्याच्या बरोबर विरुद्ध परिस्थिति आहे. काय बोलावें यास बंधन नाहीं. शास्त्र या नांवाखालींहि पुष्कळ वेडेंवाकडें लैंगिक वाङ्मय प्रचारांत आहे. विवाहपूर्व व विवाहांतर्गत अशा दोन भागांत यासंबंधीं विचार करूं गेल्यास काय दिसतें पाहा.

प्रो. किन्से प्राणीशास्त्राचे प्राध्यापक. त्यांनीं शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करून मानवाचा एतद्विषयक अभ्यास करण्याचा केलेला हा प्रयत्न खरोखरच फार कौतुकास्पद आहे. अशा प्रकारच्या अभ्यासास केवढे परिश्रम पडतात हें फक्त अभ्यासकच जाणूं शकतो. त्यांनीं गोळा केलेली माहिती ( Data ) विचारप्रक्षोभक असून या विषयावरील प्रत्येक अभ्यासकानें हा ग्रंथ नजरेखालीं घालावा अशीच आमची शिफारस आहे. या ग्रंथानें अमेरिकेंतहि फार खळबळ उडवून दिली व त्यानंतर या ग्रंथावर पुष्कळ टीका–प्रतिटीका प्रसिद्ध झाल्या.

डॉ. किन्से व त्यांचे सतरा सहकारी यांनीं सतत १५ वर्षे परिश्रम करून ५३०० पुरुष आणि ५९४० स्त्रिया एवढ्यांची लैंगिक आचारांसंबंधीं माहिती गोळा केली. यांत व्यक्तिगत ( individual ) व दोन व्यक्तींचे अशा दोन्ही प्रमुख गटांची कामविकारांची मोजदाद आहे. व्यक्तिगत कामविकारांत मुख्यतः मुष्टिमैथुन ( Masturbation ) आणि सुखस्वप्नें ( Dreams ) येतात. तर दोन व्यक्तींच्या मुख्य प्रकारांत सजातीय ( Homosexual ) व विजातीय ( Heterosexual ) असे दोन भाग येतात. या दुसऱ्या विजातीय प्रकारांत परत विवाहपूर्व ( Premarital ) व विवाहांतर्गत आणि विवाहबाह्य ( Extra-marital ) असे प्रकार उद्‌भवतात. हे सर्व प्रकार या स्त्रीपुरुषांत किती प्रमाणांत आढळले याची मोजदाद या रिपोर्टांत आहे. येथें एवढेंच नमूद करावयाचें कीं विवाहबाह्य संबंध सन १९०० पूर्वीं ज्या प्रमाणांत असत त्यापेक्षां हल्लींच्या पिढ्यांतून फार झपाट्यानें वाढत चालले आहेत. उदाहरणार्थ, विवाहपूर्व स्त्रीपुरुषसंबंधांत मुख्यतः संयोगपूर्व ( Precoital ) सर्व व्यवहार, ज्यास इंग्रजींत ‘ पेटिंग ’ अशी संज्ञा देतात, त्यांचें प्रमाण पाहूं. डॉ. किन्से म्हणतात कीं, साधारण चाळीस टक्के स्त्रियांना हा अनुभव वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत आलेला होता आणि विवाहाच्या पूर्वीं साधारण

नव्वद टक्के स्त्रियांनीं याचा अनुभव घेतलेला आढळला. सन १९०८ नंतर बदललेली सर्व सामाजिक व आर्थिक घडण आणि शिवाय शिथिल धर्मश्रद्धा यांच्या बुडाशीं असण्याचा संभव आहे. ढिलीं सामाजिक बंधनें, स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य, व्यक्तिमत्त्वाची वाढ, विवाहाचें वाढतें वय आणि कमी होत चाललेली धर्मश्रद्धा, या सर्व बाबींचा विचार केल्यास ही प्रवृत्ति वाढीस लागली आहे यांत नवल काय ? कामवासना ही सहजप्रवृत्ति आहे आणि ती आपला प्रभाव योग्य त्या वयांत पाडल्याशिवाय राहणार नाहीं. '**प्रवृत्तिरेषा भूतानां**' हा सिद्धांत पुरातन कालापासून मद्य-मांसभक्षण आणि मैथुनादि प्रकारांत असतो, हें प्रसिद्ध आहे. हे सर्व वाढीस लागलेले प्रकार कायद्यानें बंद करतां येण्यासारखे नाहींत. यासंबंधींचे कायदे फक्त पोलिसांचे खिसे भरण्यास उपयोगी पडतात; वगैरे विचार मांडून डॉ. किन्से असें सूचित करतात कीं, या सर्व प्रकारांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोनच बदलला म्हणजे झालें. स्त्रीस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिकस्वातंत्र्य यांतूनच आतां 'लैंगिक वर्तणुकीचें स्वातंत्र्य' ( Sexual freedom ) ही बात्र निर्माण होत आहे. आम्ही असें ऐकतों कीं, यासंबंधीं कायद्यांत जरूर तो बदलहि करण्याची शक्यता अमेरिकेंत उत्पन्न झाली आहे. डॉ. किन्से लिहितात,

"Premarital petting is widespread among nearly all females and males of the younger generation in the country today, and not infrequent among many older unmarried persons." ( Kinsey F. p. 229 )

विवाहपूर्व प्रेमाविष्कार किंवा कामविकारजन्य व्यापार अमेरिकेंतील तरुण-तरुणींत फार मोठ्या प्रमाणांत आढळतात. अविवाहित प्रौढांतहि ते पुष्कळ आहेत अशी कबुली डॉ. किन्से यांनीं दिली आहे. शिवाय ते असेंहि लिहितात कीं, १९०० सालापूर्वीच्या लोकांत हे प्रकार त्या मानानें कमी असत आणि १९०० नंतर दिवसेंदिवस हे प्रकार अमेरिकेंत फार झपाट्यानें वाढत चाललेले दिसतात.

विवाहपूर्व स्त्री-पुरुष-व्यवहारासंबंधीं इतर बहुतेक लेखकांचें मत डॉ. किन्से यांच्यासारखेंच आहे. ज्यास इंग्रजींत पेटिंग ( Petting ) इत्यादि शब्दांनीं ओळखतात, असे सर्व व्यवहार भरपूर प्रमाणांत आहेत. विवाहपूर्व चुंबनालिंगनांच्या प्रकारांबाबत साधारण ९० टक्के मुलींनीं असे व्यवहार दोन किंवा अधिक पुरुषांबरोबर

अनुक्रम क्रमांक ... वि: ... नों: दि: ...

केल्याचें किन्से यांच्या निदर्शनास आलें. मुष्टिमैथुनादि प्रकार ( Masturbation ) मुलांत विवाहपूर्व कामतृप्तीकरितां मोठ्या प्रमाणांत प्रचलित असलेले दिसतात. आतां या कामोद्दीपनांत गर्भधारणेपर्यंत मजल जाणें कठिण असतें असें नाहीं. परंतु ते बेकायदेशीरहि होत असल्यानें असे प्रसंग टाळण्याकरितां गर्भपात इत्यादि प्रकारांचा आश्रय करणें क्रमप्राप्त होतें.

यानंतर विवाहबाह्य संबंधांचा थोडा आढावा घेऊं. व्याभिचाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन आमच्याकडे आहे एवढा असहिष्णुतेचा पाश्चिमात्यांत दिसत नाहीं.

" Another probable effect of the new attitude towards sex experience is to increase somewhat both premarital sex intercourse and adultery. ( R. L. Sutherland p. 449 )

लैंगिक व्यवहारांतील दृष्टिकोनांत बदल झाल्यामुळें विवाहपूर्व संबंधांप्रमाणेंच विवाहबाह्य ( Adultery ) संबंधहि वाढलेले दिसतात. पाश्चिमात्य देशांतून एक-पत्नीकत्वाचा कायदा प्रचलित आहे हें सर्वत्रांच्या परिचयाचें आहे. परंतु जेम्स हिंटन नांवाच्या एका लंडनमधील सर्जननें या पाश्चिमात्य कायदेशीर एकपत्नीकत्वा-वर प्रथम प्रकाश पाडला. आपला अभ्यास प्रसिद्ध करण्यापूर्वीच हे गृहस्थ दिवंगत झाले. यांनीं आपल्या आयुष्यांत पाश्चिमात्यांतील या दांभिक चालीचा बराच अभ्यास केला. शिवाय पौर्वात्य समाजांतील एतद्विषयक द्वि व बहुपत्नीकत्वाचा तुलनात्मक अभ्यासहि केला आणि कांहीं निष्कर्ष अत्यंत सडेतोडपणानें जगास स्पष्टपणानें सांगून टाकले. त्यांचीं सर्व टिपणें अभ्यासपूर्वक डॉ. हॅव्हलॉक एलिस यांनीं एकत्र केलीं व त्यांचा भरपूर उपयोग स्वतःच्या लिखाणांत करून घेतला.

" He considered that no real monogamy existed and that in Western society, as he knows it. There are fewer men, who are genuinely monogamist than are to be found in Eastern polygamic societies. We arrived at it too soon, for it is a mistake to convert an ideal, however good, prematurely into a universal legal form. The result has been that, it has called out more licence than a polygamy would have led to."

( Ellis Vol. I p. 241 )

वरील उद्धरणांत हिंटन साहेबांचें स्पष्ट मत दिलें आहे. त्यावरून पाश्चि-मात्य समाजांतील कायदेशीर एकपत्नीकत्व दांभिक स्वरूपाचें आहे, त्यांच्यांत खरे

एकपत्नीकत्वाचे पुरुष फार थोडे आढळतात असें दिसून येईल. जेथें एकपत्नीकत्वाबरोबरच बहुपत्नीकत्वाची चाल आहे अशा पौर्वात्य समाजांतच अशीं खरीं एकपत्नीकत्वाचीं माणसें जास्त दिसतात. शेवटीं या कायद्यानें स्वैराचाराला आळा बसण्याऐवजीं पाश्चिमात्य समाजांत स्वैराचाराला जास्त प्रोत्साहन मिळालें असून, बहुपत्नीकत्वानें हा स्वैराचार कमी होण्यास खरी मदत होण्याची शक्यता आहे, असा त्यांचा अभिप्राय आहे.

वरील हिंटन साहेबांच्या निष्कर्षांत बरेंच तथ्य असल्याचें थोड्या विचारांतीं दिसून येईल. हें वर्णन पाश्चिमात्य समाजांतील सध्यांच्या कायदेशीर एकपत्नीकत्वाची काय दशा आहे हें दर्शविणारें झालें. याचा अर्थ एकपत्नीकत्व त्याज्य आहे किंवा तें व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक दृष्ट्या योग्य ध्येय नाहीं, असा हिंटन साहेबांचा वा आमचा अभिप्राय नाहीं हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

वरील विवेचनावरून पाश्चिमात्यांत परंपरागत थोडीहि नीति अस्तित्वांत नाहीं असा नव्हे. परंतु उपरिनिर्दिष्ट बदल झपाट्यानें होत असून यापुढें परंपरा कांहीं शिल्लक राहीलच असें म्हणवत नाहीं.

येथें स्त्रीच्या व्यक्तिमत्वांत मागच्या शतकापासून आजतागायत झालेला फरकहि लक्षांत घ्यावयास हवा. डार्विनची पत्नी ही आपला पति मोठा शास्त्रज्ञ आहे, त्याची सेवा करणें, मुलांची जोपासना करणें व घर आनंदी ठेवणें, हेंच आपलें कर्तव्य समजून याकडे सतत लक्ष पुरविणारी होती. तिला बाहेरच्या महत्त्वाकांक्षा नव्हत्या. परंतु मागच्या एका शतकांत स्त्रींत मोठा बदल झाला. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीचा मनोरंजक इतिहास पाहणें येथें शक्य नाहीं. परंतु स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीचे हक्क व स्त्रीच्या महत्त्वाकांक्षा पुरुषाप्रमाणेंच हव्यात, असा हव्यास उत्पन्न होऊन पुरुषाशीं प्रत्येक बाबतींत स्पर्धा म्हणजे स्त्रीपुरुषसमानता असा स्त्रीचळवळीचा सारांश दिसतो. यामुळें बुद्धिमान् व कर्तृत्ववान् स्त्रिया कुटुंबसंस्थेस निरुपयोगी ठरूं लागल्या. कारण त्यांना कुटुंबाबाहेर पुष्कळ हक्क, मान व पैसा मिळूं लागला. स्त्रिया कांहीं वेळां आर्थिक अडचणींमुळें तर कांहीं वेळां महत्त्वाकांक्षेची पूर्ति म्हणून नोकरींत शिरल्या. स्त्रीस नोकरी व पुरुषास बेकारी हें समीकरणच कांहीं वेळां झालेलें दिसतें. त्यामुळें एका बाजूनें सुशिक्षितांची बेकारी व दुसऱ्या बाजूनें कुटुंबनाश या दोन्ही गोष्टी घडत चालल्या आहेत. शिकलेल्या स्त्रिया विवाहांतर्गत यशास योग्य ठरत नाहींत. हल्लींच्या स्त्रीच्या पुरुषी शिक्षणामुळें त्या साक्षर होण्यापलीकडे कांहीं फायदे

झाले असतील असें वाटत नाहीं. उलट कुटुंबपोषण, यशस्वी विवाह आणि वंशवृद्धि यांच्या दृष्टीनें या शिक्षणांतून फारसे फायदे उपलब्ध झालेले नाहींत हें निश्चित.

" College girls do not make good wives if they do not overcome training for competition rather than co-operation. "
( Bowman p. 230 )

शिक्षित स्त्रिया चांगल्या गृहिणी होण्यास त्यांच्या सध्याच्या शिक्षणामुळें नालायक ठरतास असा प्रो. बोमन यांनीं अभिप्राय व्यक्त केला आहे. पुरुषाशीं सतत स्पर्धा, व्यक्तिमत्त्व व महत्त्वाकांक्षांची वाढ, यांमुळें ही नवी स्त्री गृहिणीपदास योग्य असा दृष्टिकोन दाखवीत नाहीं. वरील सर्व कारणांमुळें आज पाश्चिमात्य समाजांत कुटुंबविघटनाचे निरनिराळे प्रश्न उपस्थित झालेले आहेत. वरील वर्णनावरून पाश्चिमात्य देशांत यशस्वी विवाहच नाहींत व सुखी कुटुंबेंच नाहींत असा भलता ग्रह मात्र करून घेऊं नये. अमेरिकेंतील एकंदर नोकऱ्यांपैकीं तिसरा हिस्सा स्त्रियांनीं व्यापला आहे. कॉलेजमधील विद्यार्थ्यांत एकतृतीयांश मुली आहेत. नोकऱ्यांत शेंकडा ८५ स्त्रिया कारकून आहेत. बाकीच्यांत शिक्षिकांची संख्या मोठी आहे व कांहीं वैद्यकीय, सेक्रेटरी, ग्रंथपाल, विक्रेत्या वगैरे जागांवर आहेत. एखाद्या वेळीं कांहीं विशेष नोकऱ्या आणि मानहि त्यांनीं पटकावले आहेत. त्यांत अँबॅसडरच्या जागेपासून शहराचा मेयर, न्यायधीश, वगैरे जागा येतात. साधारण वयाच्या वीस वर्षांपूर्वीच पुष्कळ स्त्रिया नोकरी करतात. पहिल्या कांहीं वर्षांतच विवाह झाल्यामुळें पुष्कळ स्त्रिया नोकऱ्या सोडूनहि जातात. सर्वसाधारण स्त्रीच्या विवाहाचें वयहि अमेरिकेंत सध्यां २०–२१ च्या दरम्यान दिसतें. एकंदरींत स्त्रीशिक्षणाचा विशेष उपयोग नोकरी व घराबाहेरील व्यवसायांकरितां जास्त होत आहे एवढें वरील माहितीवरून दिसून येईल.

**कुटुंब–विघटनाचीं कारणें :**

यानंतर कुटुंबविघटनाचे कांहीं प्रश्न विचारांत घ्यावयास हवेत. कुटुंबविघटनाच्या कारणपरंपरेंत दोन प्रकार कल्पितां येतात. ( १ ) कुटुंबांतर्गत, ( २ ) कुटुंबबाह्य.

कुटुंबांतर्गत कारणांमध्यें दोन विवाहित व्यक्तींच्या व्यक्तिमत्वापासून प्रजाहीनत्वापर्यंत सर्व प्रश्न येतात. त्याचें थोडें दिग्दर्शन पूर्वी

प्रसंगानें केलेलेंच आहे. कुटुंबबाह्य कारणपरंपरेंत कुटुंबाची अर्थोत्पादनाची शक्ति लोकसंख्यांचें शहरीकरण, ( Urbanisation ) त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या जागेपासून सर्व अडचणी आणि अत्यंत महत्त्वाचें कारण म्हणजे युद्ध, या गोष्टींचा समावेश होतो. दर पिढीस एक जागतिक युद्ध याप्रमाणें मानवी समाजांत संहाराची भर पडत आहे. या युद्धांमागें निमित्तमात्र कांहींहि कारणें असलीं तरी शक्तिमान् राष्ट्रांचा, त्यांतील नेत्यांचा व त्यांच्या पाठीराख्यांचा स्वार्थ, लोभ व सत्तेची स्पर्धा या गोष्टीच जास्त कारणीभूत असलेल्या दिसतात. युद्ध हें लैंगिक नीतीस अत्यंत घातुक आहे याची जाणीव सर्वत्र झालेली आहे. परंतु युद्ध जेवढें अटळ तेवढेच त्याचे हे सर्व परिणामहि अटळ असल्यानें, एक अपरिहार्य गोष्ट यापलीकडे फारसा विचार कोणी करतांना दिसत नाहीं. अलीकडील युद्धें हीं एका देशापुरतीं वा खंडापुरतींहि मर्यादित नसून जगास त्रासदायक होणारीं असतात. शिवाय या युद्धांतून फक्त युद्धमान् गटांनाच हाल सोसावे लागतात असें नसून प्रत्यक्ष युद्धांत भाग न घेणाऱ्या सर्वसामान्य समाजासहि हाल सोसण्याची पाळी येते. या युद्धांमुळें समाजाचे फार मोठे गट स्थानत्याग करतांना दिसतात आणि या पळणाऱ्या मानवसमाजाचे सर्वच प्रकारांनी हाल होत असल्यानें, त्यांना मूलभूत जीवनाचा प्रश्नच भेडसावीत असल्यानें, त्यांची बाकीच्या गप्पा ऐकण्याची वा बंधनें पाळण्याची मनःस्थिति असण्याची यत्किंचितहि शक्यता राहात नाहीं. अशा प्रकारच्या या सर्वसंहारक युद्धाचा मानवसमाजांत जोरांत फैलाव होत असल्यानें सामाजिक विघटनहि फार जोरांत फैलावतें. येथें कामपुरुषार्थाचा विचार संपूर्ण लुप्त होतो आणि विकारजन्य परिस्थितींत काय घडेल तें घडेल, जसें घडेल तसें घडेल, कोठें घडेल याचाहि कांहीं नियम नाहीं, अशा केवळ पशुतुल्य परिस्थितीस मनुष्यप्राणी सहजच पोहोंचलेला दिसून येतो. युद्धामुळें आणखीहि नवे नवे प्रश्न उत्पन्न होतात. युद्धजन्य परिस्थितींत तेवढा मनुष्य पशुतुल्य आचारास पोहोंचतो आणि युद्ध संपलें कीं परत तो पूर्वाचारास येतो हें कांहीं प्रमाणांतच खरें आहे. युद्धानंतर '**पुनश्च हरिः ॐ**' सुरूं होऊन जे निरनिराळे आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, आरोग्यविषयक आणि राजकीय प्रश्न उत्पन्न होतात, त्यांत लोकसंख्येचा एक प्रश्न प्रामुख्यानें येतो. युद्धामध्यें जायबंदी किंवा मृत यांत विशेषतः समाजांतील पुरुषवर्ग असल्यानें स्त्री व पुरुष हें समाजांतील प्रमाण फारच वेडेंवांकडें होतें. विशेषतः विवाहवयांतील स्त्रीवर्ग संख्येनें मोठा होतो व पुरुषवर्गाची संख्या

बरीच रोडावते. निरनिराळ्या देशांतील स्त्रीसंख्या युद्धोत्तर काळांत फार वाढलेली दिसून येते आणि विवाहास एका स्त्रीस एक पुरुष हें प्रमाण लोकसंख्येंतच बसत नसल्यानें सर्व स्त्रियांना विवाहांतर्गत कामतृप्ति करून घेणें दुरापास्त होतें. यामुळें विवाहबाह्य संबंधांचें प्रमाण आपोआपच वाढून मग निरनिराळीं ढोंगें अस्तित्वांत येऊं लागतात. जर्मनी या देशांत सध्यां हा प्रश्न फारच भेडसावणारा आहे असें दिसतें. विशेषतः स्त्रीवर्गाची याबाबतची हलाखी सर्वत्र दिसून येते. सर्व जगभर भोगवृत्ति थैमान घालीत असतांना बहुसंख्य स्त्रियांना सक्तीचें ब्रह्मचर्य सांगणें सोपें आहे पण अशानें ढोंगी वृत्तीशिवाय कांहींहि साधणार नाहीं. विवाह त्यांच्या आटोक्याबाहेर नेऊन त्यांना नीतीच्या थापा मारावयाच्या, अशा तऱ्हेनें हा प्रश्न वाटेस लावूं म्हटलें तर तें कसें साधावें ? डॉ. वॉकर लिहितात,

" Marriage is no answer to their question, for it is not always the fault of a potentially good mother that the advantage of a permenent union with a legal husband has been denied to her. In countries where women outnumber men, it is not possible for all of them to find husbands. "

(K. Walker. P. 71.)

परमेश्वरानें स्त्रीपुरुष लोकसंख्या साधारण समसमान असाव्यात अशी बुद्धि जननसंख्येंत ठेवलेली दिसते. परंतु पुढें हें प्रमाण निरनिराळ्या कारणांनीं तसेंच राहूं शकत नाहीं. प्रजोत्पत्तीचें महत्त्वाचें कार्य स्त्रीजातीकडे विषेशत्वानें दिलें असल्यानें स्त्रीस त्यासंबंधीं कांहीं विशेष अवघड परिस्थितींतून जातांना काय भय असतें तेवढेंच. उलट पुरुषांना अनेक रोग उपद्रव देऊं शकतात आणि त्यांत मरणाचें भयहि त्यांना जास्त असें असतांना युद्धें निर्माण करून पुरुषांनीं स्वतःची मोठीच हानि करून घेतलेली आहे. अशा नैसर्गिक व मनुष्यनिर्मित साधनांमुळें पुरुषांची संख्या व स्त्रीसंख्या यांत जर मेळ बसला नाहीं, तर वर वर्णन केल्याप्रमाणें हा एक नवीनच प्रश्न उत्पन्न होतो. हा युद्धजन्य सामाजिक प्रश्न भारतियांस नवीन नाहीं. भारतीय युद्धाच्या सुरवातीस अर्जुनाची शंका म्हणून व्यासांनीं हा प्रश्न उत्पन्न केलेला आहे. युद्धांत फार मोठी पुरुषहत्या होत असल्यानें कुलक्षय फार मोठ्या प्रमाणांत होतो. या कुलक्षयामुळें " **प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः** " (भ. गी. १.४१.) कुलस्त्री भ्रष्टाचारास प्रवृत्त होण्याचा संभव वाढतो. यामुळें वर्णसंकर होतो. वर्णसंकरकारक दोषांमुळें शाश्वत

कुलधर्म व जातिधर्म नाहींसे होणें अपरिहार्य होते. या अर्जुनाच्या शंकेंत युद्धोत्तर सामाजिक परिस्थिति केवढी विस्कळीत होते याचा गोषवारा सूत्रमय भाषेंत व्यासांनीं अर्जुनाच्या तोंडीं घातलेला दिसतो. अर्जुनाचे लोभमोहादि विकार नाहींसे करण्यास पुढचे सबंध तत्त्वज्ञान जरी समर्थ असलें तरी या मूलभूत युद्धविषयक शंकेला विशेष समाधानकारक उत्तर दिसत नाहीं. केवळ ही परिस्थिति अटळ म्हणून ती घेणें प्राप्त आहे, असाच सर्वांचा अर्थ दिसतो. मुख्य मुद्दा एवढाच कीं, युद्धोत्तर परिस्थिति ही कामपुरुषार्थसाधनास अत्यंत घातुक असून, त्यांमुळें जे निरनिराळे सामाजिक व आर्थिक विस्कळितपणाचे प्रश्न उत्पन्न होतात त्यामुळें मनुष्याच्या जीवनांत फार ढवळाढवळ होऊन त्यास धर्माचरण करणें दुरापास्तच होऊन बसतें व अनिच्छेनें वा स्वेच्छेनें तो अधर्माचरणास आपोआपच प्रवृत्त होतो. आर्थिक व कुटुंबविघटन या दोन्ही भीषण प्रश्नांना युद्धोत्तर काळांत तोंड देणें प्राप्त होतें.

**कुटुंब–विघटनाचे दृश्य परिणाम :** यानंतर कुटुंबविघटनाचे दृश्य परिणाम कसे दिसूं लागतात हें पाहणें आहे. हे परिणाम साधारण चार भागांत दर्शवितां येतील. येथें युद्धाच्या फक्त कुटुंब विघटनेशीं संबंधित परिणामांचा विचार कर्तव्य आहे.

खालील चार प्रकारांनीं कुटुंबविघटन दृश्य स्वरूपांत येतें.

( १ ) घटस्फोटांची वाढ, ( २ ) निरनिराळ्या कारणांनीं विवाह आटोक्याबाहेर गेल्यामुळें उत्पन्न होणारे स्त्रीपुरुषांचे प्रश्न, ( ३ ) विवाहबाह्य स्त्री-पुरुषसंबंध आणि ( ४ ) वेश्याव्यवसाय.

( १ ) **घटस्फोट** :— घटस्फोटाचा कायदा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारचा आहे. परंतु घटस्फोटांची संख्या पाश्चिमात्य देशांत वाढत्या प्रमाणांत आहे याबद्दल दुमत नाहीं. अमेरिकेंत १८९० सालीं दर हजार विवाहांमागें फक्त ५७ घटस्फोट होते तर १९४६ सालीं ही संख्या दर हजारीं चारशें एवढी वाढली होती. यामागें एक कारण असें सांगतात कीं, पूर्वी विवाह अयशस्वी होत असत, तरी स्त्रीपुरुष घटस्फोट चांगला मानीत नसल्यामुळें, विशेषतः स्त्रीस दुसरा मार्ग नसल्यानें तिला वैवाहिक बंधनांतच राहणें भाग असे. परंतु घटस्फोटाचा कायदा अस्तित्वांत येऊन आज थोडा काल लोटला नाहीं. तेव्हां बाकीचीं कांहींहि कारणें असलीं तरी हा आंकडा विघटित कुटुंबसंस्थेचा द्योतक आहे

असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रजाहीनत्वाचा परिणामहि घटस्फोटावर दिसून येतो असें दिसतें. जेथें मुलें नाहींत असे विवाह घटस्फोटांच्या संख्येंत जास्त दिसतात.

सर्व देशांत घटस्फोट सर्व ठिकाणीं सारख्या प्रमाणांत नाहींत. कांहीं शहरांत घटस्फोट हा एक मोठा धंदाच झालेला आहे. साधारणतः विवाहानंतर पहिल्या दहा वर्षांत जास्त घटस्फोट होतांना दिसतात. कांहीं लोकांच्या मतें इतर सर्व व्यावहारिक बाबींप्रमाणेंच विवाह यशस्वी होणें शक्य नाहीं. कांहीं विवाह चांगले ठरणार, कांहीं सामान्य ठरणार व कांहीं वाईटहि ठरणार, त्यास इलाज नाहीं. कोणतीहि प्राणीशास्त्रीय गोष्ट वैविध्यानें ( Normal curve of biological variant ) दिसणारच तसा विवाहहि दिसणार. घटस्फोटांची संख्यावाढ ही अयशस्वी विवाहांचें प्रमाण वाढलें आहे असें म्हणण्यास प्रमाणभूत होऊं शकत नाहीं; तरी घटस्फोट व वैवाहिक यश यांचा परस्परसंबंध नाहीं असें म्हणणें कठिण आहे. घटस्फोटाची कारणपरंपरा अनेकविध असून मुख्यतः विवाहांतर्गत कारणें जास्त. त्यांतहि व्यक्तिमत्त्वाचीं, आर्थिक व रतिशास्त्रीय कारणें विशेष दिसतात. ही कारणें नष्ट होण्यासाठीं कांहीं उपाययोजना हवी. ती मुख्यतः तरुण मुलामुलींना वैवाहिक आयुष्यासंबंधीं योग्य शिकवण देऊन त्यांस वैवाहिक जीवनार्थ योग्य बनवणें अशा स्वरूपाची असली पाहिजे. यावरून कांहीं मूलभूत मुद्दयांवर विचारी लोकांचें ऐकमत्य दिसतें एवढें दिसून येईल.

( २ ) यानंतर निरनिराळ्या कारणांनीं विवाह आटोक्याबाहेर गेल्यामुळें उत्पन्न होणारे प्रश्न येतात. यांत महत्त्वाकांक्षा व आर्थिक अडचणी प्रामुख्यानें येतात. महत्त्वाकांक्षा व तीस धरून व्यक्तिमत्त्वाची अस्ताव्यस्त वाढ झाल्यास विवाहाचें वय निघून जातें आणि पुढें विवाह होणें दुरापास्त होतें. त्याचप्रमाणें आर्थिक अडचणींमुळेंहि विवाह लांबणीवर पडून शेवटीं परिस्थिति आटोक्याबाहेर जाते. आतां यामुळें उत्पन्न होणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे प्रौढ कुमारिकांचा. कित्येक वेळां यांतूनच कुमारी माता या नांवाचा एक वेगळा वर्ग निर्माण होतो.

असा वर्ग लहान नाहीं. याबद्दलची बरोबर माहिती मिळणें कठिण असलें तरी बेकायदेशीर संतति आणि बेकायदेशीर गर्भपातांचा वाढता उद्योग लक्षांत घेतां ही स्थिति दुर्लक्ष करण्यासारखी नाहीं. बेकायदेशीर संततीकरितां पुन्हां सामाजिक

कार्यक्रमांची आवश्यकता उत्पन्न होते. त्यांपैकीं शिशुसंगोपन केंद्रें (Orphanages) अस्तित्वांत येणें हा एक होय, या मुलांना त्यांच्या आईबापांनीं परत नेलें तर ठीक, नाहींतर त्यांचा उपयोग संततिहीन कुटुंबांत दत्तकाकरितां करण्याचा प्रयत्न केला जातो. दत्तकाचा भाग दिसतो तेवढा सोपा नाहीं. त्यांत मुलाचा आनुवंश इत्यादि माहिती करून घेऊन मग तें मूल त्या कुटुंबांत योग्य ठरेल कीं नाहीं हें पाहावें लागतें. त्यामुळें सर्व मुलांची अशी सोय होऊं शकतेच असें नाहीं.

याशिवाय कुमारी मातांचा प्रश्न स्त्रीच्या दृष्टीनेंहि मोठा सुखाचा ठरत नाहीं हें वेगळेंच.

**कुमारी मातांचा प्रश्न :—** कुमारी मातांची ही समस्या मोठ्या प्रमाणांत पाश्चिमात्य संस्कृतींत उत्पन्न होणारी आहे. आमच्याकडे आतां ती नव्यानें अस्तित्वांत येत आहे. पण पूर्वीं ती विशेष प्रमाणांत आढळत नव्हती. या समस्येला पुष्कळ कारणपरंपरा आहे. त्यांतील उपरिनिर्दिष्ट कारणें व युद्धजन्य स्त्री-पुरुष लोक-संख्येच्या प्रमाणांत फरक हीं कारणें महत्त्वाचीं आहेत.

या सर्व स्त्रियांना हल्लींच्या एकपत्नीकत्वाच्या कायद्यामुळें आणि सामाजिक असहिष्णुतेमुळें मुद्दाम अविवाहित व तदनुषंगानें वंध्यात्त्वाचें जीवन कंठावें लागत आहे. ज्या कोणी असल्या परिस्थितींत धीटपणा दाखवतात त्यांना ‘ कुमारी माता ’ या नवीन पदवीस प्राप्त व्हावें लागतें. यांपैकीं बऱ्याच स्त्रियांना विवाहित आयुष्य दिल्यास त्यांचें जीवन जास्त सुखाचें होणार आहे. शिवाय सध्यांच्या परिस्थितींत एका बाजूस जननसंख्येचें प्रमाण घसरत असतांना ह्या स्त्रियांना मुद्दाम अविवाहित ठेवणें किंवा त्यांच्यावर ‘ माता ’ झाल्यास कायदेशीर वा सामाजिक बहिष्कार घालणें ही गोष्ट कोणत्या बुद्धीला पटवितां येणार आहे ?

एकंदर परिस्थितीच्या कचाट्यांत व कुचंबणेंत सांपडलेल्या स्त्रिया शेवटीं जो जमेल तो मार्ग पत्करतात. आतां ही गोष्ट अटळ झाली म्हणजे त्याचा कांहीं बुद्धिगम्य पद्धतीनें विचार करावयासच हवा. तेव्हां विशेषतः शिक्षित व स्वतंत्र स्त्रिया ही समस्या अशी मांडतात कीं, “ मातृत्वाचा हक्क प्रत्येक स्त्रीस आहे. त्याकरितां पुरुषाची गुलामगिरीच म्हणजे विवाह पत्करला पाहिजे ही सक्ति काय म्हणून ? तेव्हां ही गुलामगिरी न पत्करतां मातृपद प्राप्त करून घेण्यांत स्त्रीस्वातंत्र्याचा खरा विजय आहे ! ” कुटुंब म्हणजे स्त्री, पुरुष व मुलें ही भावना येथें नष्ट होते.

कुटुंबांत योग्य संस्कार होण्यास स्त्रीप्रमाणें पुरुषाचीहि तितकीच जरुरी आहे. स्त्रीस मातृत्व प्राप्त करून देणें एवढेंच पुरुषाचें कुटुंबकर्तृव्य नाहीं. यापेक्षां पिता म्हणून त्याची कांहीं जास्त जबाबदारी आहे. ती पार पाडण्यांत स्त्रीस व मुलांस जास्त गृहसौख्य प्राप्त होतें इत्यादि सर्व विचार पार लुप्त होतात आणि ज्या मूळ प्रश्नामुळें ही आपत्ति स्त्रीजातीवर कोसळली ती मूळ कारणपरंपरा नजरेआड होते. अशा वेळीं सहजच कांहीं विचारी माणसें विचारूं लागतात कीं, या परिस्थितींत बहुभार्यात्वास सरळ परवानगी देण्यास काय हरकत असावी ? पण तसें करण्यांत अहंकार दुखावतो म्हणून जें कांहीं कुमारीमातृत्व घडेल किंवा विवाहबाह्य संतति होईल तीस ' कायदेशीर म्हणूं पाहिजे तर ' असा फाटलेल्या गोधडीला आणखी एक तुकडा चिकटवला जातो. कुटुंबविघटनाच्या परिणामांपैकीं तिसरा व चौथा भाग म्हणजे विवाहबाह्य संबंध किंवा व्यभिचार व वेश्याव्यवसाय यांसंबंधीं पूर्वीं थोडें दिग्दर्शन येऊन गेलेंच आहे.

कुटुंबविघटनाचे पाश्चिमात्य प्रश्न विचारांत घेतांना एकांतिक सुधारणांचा कसा शेवट होतो हें पाहाण्यासाठीं येथें रशियाचें उदाहरण देतां येईल. अर्थवादाचा प्रणेता देश म्हणजे रशिया. फार लोकसंख्या वाढली असा गवगवा झाल्यामुळें नुसतें संततिनियमनच काय पण १९२७ सालीं या अर्थशास्त्रज्ञ विद्वान् मंडळींनीं ज्या सामाजिक सुधारणा केल्या त्यांत गर्भपात ( Abortion ) हें केव्हांहि करण्यास कांहींच हरकत असूं नये असें ठरविलें व त्याकरितां राष्ट्रानें मोफत व्यवस्था केली. एका मास्को शहरांत १९३५ सालीं फक्त ७०,००० जननसंख्या होती व १५५००० गर्भपात होते. लेनिनग्राड या इतिहासप्रसिद्ध शहरांत स्त्रीरोगाचिकित्सक डॉक्टर मंडळींनीं या गोष्टीचा अभ्यास करून, पुष्कळ वर्षांच्या निरीक्षणानें जे निष्कर्ष काढले ते म्हणजे, गर्भपात केलेल्या स्त्रियांत शेंकडा ३५ स्त्रिया संपूर्ण निष्प्रज ( Sterile ) ठरल्या. शेंकडा २० स्त्रियांत प्रकृतींत कायम तक्रारी राहिल्या. चाळीस टक्के स्त्रियांत पुढें गर्भधारणेंत कांहीं विकृति उत्पन्न झालेली दिसून आली. कीव्ह येथें यानंतर झालेल्या परिषदेंत शेवटीं असा ठराव करण्यांत आला कीं, राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेपेक्षां सुप्रजा ही जनतेचीं व राष्ट्राची खरी संपत्ति आहे.

" The national and biological wealth of the people is of greater importance than the national economy. "

( Report Med. Evil of Abortion. p. 150 )

यू. एस्. एस्. आर. ची पहिली पंचवार्षिक योजना १९२८ पासून सुरू झाली होती. त्या वेळीं या योजना करणाऱ्यांच्या कल्पना अशा होत्या कीं, लोकसंख्यांचे प्रश्न हे अगदीं सोप्या समीकरणांसारखे असतात. जननसंख्येंत दर हजारीं २३ ची वाढ धरून त्यांनीं ती योजना कागदावर मांडली. दुसऱ्या योजनेच्या वेळीं हेंच प्रमाण दर हजारीं फक्त १७ जास्त ठरविण्यांत आलें. गर्भपात कायदेशीर ठरविला. संततिप्रतिबंधक उपाय जोरांत सुरू केले. हें सर्व झाल्यावर असें दिसून आलें कीं या योजनेंत जें कमींत कमी जननसंख्येचें प्रमाण धरलें होतें तेंहि पडेना. शेवटीं हे आंकडे प्रसिद्ध करणेंच त्यांनीं सोडून दिलें. म्हणजे कांहींहि घोषणा करण्यास मोकळीक असावी. पण शेवटीं त्यांना शहाणपणा सुचला. त्यांनीं हा मोफत गर्भपाताचा प्रयोग सोडून दिला. गर्भपात हा पुन्हां बेकायदेशीर ठरविला. त्याचा परिणाम बरा झाला असें म्हणतात. पण अप्रगल्भ बुद्धिवादामुळें समाजावर लहरीप्रमाणें प्रयोग करीत राहिल्याचे केवढे परिणाम होतात तें नेहमीं ध्यानीं घेणें जरूर आहे. परंतु निदान मूर्खपणा पदरीं आल्यावर परत फिरणें ही गोष्ट तरी या पुढाऱ्यांनीं ठीक केली एवढें म्हटलेंच पाहिजे.

एकंदरींत कायदेशीर एकपत्नीकत्व, परंतु एकापुढें एक याप्रमाणें बहुपत्नीकत्व (Successive polygamy), लहान कुटुंबें, घटस्फोटांची सोय, विवाहबाह्य व विवाहपूर्व लैंगिक व्यवहाराकडे पाहण्याचा सहिष्णुतेचा दृष्टिकोन, प्रजोत्पादनापेक्षां व्यक्तिमत्त्वावर भर, युद्ध व आर्थिक अडचणींमुळें उत्पन्न होणारें शैथिल्य व पुष्कळशा स्त्रीपुरुषांच्या आटोक्याबाहेर जाणारा यशस्वी विवाह, यांतूनच निर्माण होणाऱ्या कुमारी माता, भूमिगत वेश्याव्यवसाय इत्यादि समस्या आणि शेवटीं प्रजोत्पादनक्षमतेवर या सर्वांचा होणारा परिणाम असें हें पाश्चिमात्य समाजांतील विवाह आणि कुटुंबविषयक चित्र दिसतें. याचा अर्थ असा नव्हे कीं, पाश्चिमात्य देशांत यशस्वी विवाह नाहींत किंवा सर्व लोक मोठे दुःखांत व नरकांत दिवस काढीत आहेत. अन्य दृष्टींनीं व कायद्यांनीं पाश्चिमात्यांची आरोग्यविषयक सुधारणा या शतकांत पुष्कळच झालेली आहे. देवी, घटसर्प, विषमज्वरासारखे रोग आणि सांसर्गिक रोग यांचें प्रमाण पुष्कळच कमी झालें आहे. शास्त्राच्या प्रगतीमुळें (Technological invention) जीवनविषयक सुखसोयींतहि भर पडली आहे. कोळशाऐवजीं घरांत गॅस आला. खेड्यांतील जीवन नष्ट होऊन शहरी चैनी वाढत गेल्या. उद्योगधंद्यांची वाढ होऊन राहणीचें मान सुधारत गेलें.

परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं कुटुंबाची प्रगति हीं कुटुंबसौख्य व यशस्वी विवाहाच्या निश्चित दिशेनें होत गेली. वरील चित्र पाहिलें म्हणजे प्रगति नसून परागतीच्च झाली असें म्हटलें पाहिजे.

या गोष्टींचा विचार करून डॉ. वॉकर लिहितात,

" As a result of the examination of our culture we may find that what we have accepted as progress may in fact be retrogression and that we are scurrying along a road that is leading us to destruction. This may well be so, for there are many reasons for believing that we are living in an age of fictitious values, an age of material prosperity and spiritual decay. "
( K. Walker p. 70 )

वरील उद्धरणाचा स्पष्ट अर्थ असा कीं, सध्यां आपण राहात असलेल्या संस्कृतीचा विचार केल्यास आपण ज्यास प्रगति अशी गोड संज्ञा देत आहों ती खरी परागति दिसते. खोटीं ढोंगीपणाचीं मूल्यें समाजांत सर्वत्र पसरत आहेत. हें आधि-भौतिक प्रगतीचें युग असलें तरी त्यांत आत्मिक नाश सर्वत्र होत असलेला दिसून येईल. परंतु हे शहाण्यांचे सर्व विचार पुस्तकापलीकडे जाऊन आचारांत कसे यावेत ?

**पाश्चिमात्यांचा कुटुंबसुधारणेचा विचार :**

कुटुंब जास्त स्थिर करण्याकरितां निरनिराळ्या मंड-ळींनीं कांहीं योजना पुढें आणल्या. या सर्व योजनांपैकीं कांहीं विचारप्रवाहांचा परामर्श घेणें इष्ट आहे. रसेल हे विद्वान् व विचारी ग्रंथकार आहेत. त्यांना असें वाटूं लागलें कीं सध्यांची ही विवाहविषयक परिस्थिति निश्चित समाधानकारक नाहीं. मुलामुलींच्या कामविकारजन्य संवयी व त्यांबरोबर दारू-सारख्या इतर संवयी यांचा परिणाम त्यांच्यावर व राष्ट्रावर फारसा चांगला होत नाहीं. विवाहविषयक विचारांत कांहीं निश्चित बुद्धिगम्य कल्पना असावयास हवी. ' प्रजोत्पादन ' हें विवाहाचें निश्चित ध्येय असणें जरूर आहे. त्याशिवाय विवाहाचा समाजाशीं किंवा विवाहविषयक कायद्यांशीं कांहीं संबंधच पोंचत नाहीं.

" In a rational ethic, marriage would not count as such in the absence of children, for it is through children alone that sexual relations become of importance to society and worthy to be taken cognisance of by a legal institution."

( Russell. p. 124 )

सद्य:कालीन विवाहविषयक सर्व अस्थिरता लक्षांत घेतां ट्रायल मॅरेज किंवा प्रायोगिक विवाह झाल्यास बरें. तरुण मुला-मुलींच्या सध्यांच्या अनिर्बंध स्थितीस थोडा पायबंद बसावा अशा शुद्ध हेतूनें न्यायमूर्ति लिंडसे यांनीं सहवासोत्तर विवाह (Companionate marriage) ही कल्पना पुढें आणली आणि तीच प्रायोगिक विवाहाची कल्पना रसेल साहेबांनीं उचलून धरली. " It is an attempt to introduce some stability into the sexual relations of the young." अशी स्पष्ट कबुली या कल्पनेमागें आहे. अशा विवाहांत संतति झाली तर ती कायदेशीर समजावी व विवाहहि कायदेशीर समजावा अशी त्यांची कल्पना. परंतु ९० टक्के लोकांत संतति सहज निसर्गसिद्ध गोष्ट असून प्रथम संतति केव्हां होईल हें निश्चित सांगतां येत नसल्यानें प्रयोगाचा काल निश्चित ठरवितां येणें कठिण. हा काल मोठा ठरविल्यास फार तर दोन तीन प्रयोग करतां येतील. पण रोज नवा प्रयोग कसा व्हावयाचा ? शिवाय ज्या देशांत भावनोद्रेक हा विवाहाचा पाया होऊं पाहात आहे तेथें न जुळण्याच्या अनंत बाबी व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असल्यानें त्यांचा विचार न करतां कांहींच साध्य होणार नाहीं.

अमेरिकेंत कुटुंब-विघटनावर उपाय म्हणून कांहीं शैक्षणिक कार्यक्रम चालू झाले आहेत आणि ही चळवळ स्वागतार्ह आहे. १९३८ सालीं सर्व राष्ट्रांमध्यें या दिशेनें कार्य व्हावें म्हणून 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन फॅमिली रिलेशन्स' या नांवाची संस्था अस्तित्वांत आली. यांत सामाजिक कार्यकर्ते, धर्मप्रचारक, विवाह-विषयक विषयांचे अभ्यासक, शिक्षक, कायदेपंडित व डॉक्टर्स असे भिन्न व्यवसायी परंतु विवाहविषयाशीं निगडित असलेली मंडळी एकत्र आली. पहिला विवाहविषयक अभ्यासक्रम नॉर्थ कॅरोलिना या विद्यापीठांत ग्रव्हज नामक समाजशास्त्रज्ञानें सुरू करण्यांत यश मिळविलें. त्यानंतर हे अभ्यासक्रम १९४९ पर्यंत ६३२ विद्या-पीठादि शिणक्षसंस्थांकडून उचलले गेले. हायस्कूलमधून. ( होम एकॉनॉमिक्स ) 'गृहांतील अर्थशास्त्र' अशा विषयावर कांहीं अभ्यास आंखले गेले. 'मेंटल

हायजिन ' 'मानसिक आरोग्य ' या विषयाखालीं सुरवातीपासून मानसिक भावनांना वळण लावण्याचा कांहीं प्रयत्न होत असून त्यांतच कांहीं कामविषयक अभ्यासहि येतात. चर्चमध्येंहि ही चळवळ नेण्यांत आली आहे. १८४१ सालीं 'अमेरिकन ॲसोसएशन ऑफ मॅरेज कॉन्सोलिंग ' नांवाची संस्था अस्तित्वांत येऊन तिच्यातर्फे कुटुंबविघटनाच्या निरनिराळ्या प्रश्नांत कुटुंबांना सल्ला देण्याचें कार्य चालू झालें आहे. याचाहि उपयोग बराच होऊं लागला असून व्यक्तिमत्त्वाचे अवघड प्रश्नहि या संस्थेंतील मंडळी हातीं घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या सर्व शैक्षणिक चळवळींमुळें एक निश्चित फायदा होत आहे कीं, विवाह व कुटुंबसंस्था यांचा सांगोपांग अभ्यास होत असून योग्य शास्त्रीय विचार आपोआप निर्माण होत आहेत. स्त्रीपुरुषांची अनिर्बंध स्पर्धा म्हणजे समता नव्हे. विवाहास कांहीं ध्येय हवें. विवाह हें साध्य नसून प्रजोत्पादनाचें महत्त्वाचें सामाजिक कार्य घडवून आणण्याचें तें एक साधन आहे. मानवाची प्रजोत्पादनक्षमता फक्त संतति-नियमनाच्या साधनांनीं कमीजास्त होत नाहीं तर तीवर इतर पुष्कळ गोष्टींचे परिणाम होत असतात. अनुवंशाचा विचार पाहिजे, इत्यादि बऱ्याच सुविचारी शास्त्रीय कल्पना पुढें येत असून त्यांचा प्रचारहि या शैक्षणिक कार्यक्रमांत होऊं लागला आहे.

या सर्व विचारांत अत्यंत महत्त्वाचे मूलग्राही विचारहि कांहीं अभ्यासकांच्या डोक्यांत सध्यां येत असून त्यांत मुख्यतः समाज व राष्ट्रें यांचे ऐतिहासिक कालांत जे उदयास्त झाले, त्यांची कारणपरंपरा शोधण्याकडे प्रवृत्ति होत आहे.

समाजांचे उदय व अस्त हे केवळ शास्त्रीय प्रगति, सेनासमुद्र, सत्ता, संपत्ति, धाडस, पराक्रम इत्यादि बाह्य कारणांवर अवलंबून नसून समाजांतील अंतर्गत व्यवस्था आणि समाजशरिराची अंतर्गत संततिविषयक सुस्थिति ही त्यास कारणीभूत असते. याची जाणीव उत्पन्न झाली असून त्यावर कांहीं अभ्यासहि चालू आहेत. फार जुन्या काळीं रोमन साम्राज्य आलें आणि गेलें. त्याप्रमाणें इजिप्त, सुमेरियन, ग्रीक इत्यादि संस्कृतींचे उदयास्त इतिहासजमा झाले. पण आज जर्मनी आणि इंग्लंड हे दोन बलाढ्य देश, ज्यांनीं जगावर साम्राज्य केलें, शास्त्रांची मोठी जोपासना केली, धाडस व पराक्रम यांची कमाल करून दिली, तेहि आज कालाच्या उदरांत गडप होण्याच्या स्थितीस येऊन पोहोंचले. हें आज पाश्चिमात्य विचारवत आणि शास्त्रज्ञ प्रत्यक्ष

पाहात आहेत. याबाबत 'संततीचा' ऱ्हास त्यांच्या डोळ्यांसमोर असून त्याकरितां काय करावें या विचारानें त्यांना धाक पडला आहे. यासंबंधीं सर्व विचारवंतांचे विचार खालील एका लहान उद्धरणांत आलेले आढळतील. डॉ. लेहमन (Harvey C. Lehman) या ओहिओ विश्वविद्यालयांतील एका अभ्यासकानें निरनिराळ्या देशांतील अकरा प्रकारच्या शास्त्रांतील प्रगतीचें मोजमाप केलें आहे. या मोजमापांत असें आढळून आलें कीं, जर्मनी हें राष्ट्र या सर्व शास्त्रांत प्रथम श्रेणींत आहे. पण तरीहि जर्मनीचा नाश आपल्या डोळ्यांदेखत होत आहे. हा विचार लेखकाच्या डोळ्यांपुढें येऊन त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, याबाबत समाजशास्त्राचा अभ्यास जास्त खोल व्हावयास हवा. हीं कारणें न कळल्यास व त्यांवर योग्य उपाययोजना वेळींच न केल्यास, ज्या मार्गानें इतर प्रगत राष्ट्रें व समाज अस्तास गेले त्याच मार्गानें आज जड शास्त्रांच्या प्रगतीच्या टोंकावर असलेली अमेरिकाहि जाणार हें निश्चित.

"At the present moment, the United States is probably leading the world in a number of ways. Can the United States expect to retain its present position of pre-eminence for all time to come ? Civilisations have risen and fallen repeatedly in the history of the world. The facts of history lead the thoughtful persons to ask, for how long can the United States expect to retain its presentday leadership. This Problem is not solely or primarily a military problem. Neither it is a problem of how to keep ahead of the rest of the world in the physical sciences and technology. Such leadership has been held in times past by nations that later have fallen...... it is a problem worthy of the best effort that this nation can bring to bear upon it. (Am. J. Soc. Vol. 4 p. 488)

वरील सर्व चर्चेवरून एक गोष्ट सिद्ध होईल कीं पाश्चिमात्य समाजांत जीं जडशास्त्रांची अप्रतिहत प्रगति दिसत आहे तीवरून त्यांच्यांत कुटुंब व विवाह यांसंबंधींहि सर्व झालेले व सध्यां घडत असलेले बदल यशस्वी विवाह या ध्येयास धरून होत आले आहेत, किंवा हे कुटुंबविषयक बदल प्रगतीचे द्योतक आहेत असें समजणें अत्यंत चुकीचें होईल. त्यांचा समाज या विषयांत अजून प्रायोगिक

अवस्थेंत आहे. ही प्रायोगिक अवस्था संपून ते निर्भेळ स्थिर स्वरूप निर्णयास व आचारास केव्हां येऊन पोहोंचतील हें सांगणें कठिण. अजूनहि विचारांची दिशा कांहींशी बरोबर मार्गानें असली तरी त्यांनीं उराशीं बाळगलेल्या कांहीं कल्पना सोडणें एवढें सोपें नाहीं. त्यांनाच काय सर्वांनाच हें कठिण असतें. कायदेशीर एकपत्नीकत्वावर, वेश्याव्यवसायावर आणि व्यक्तिमत्त्वावर त्यांचे दृष्टिकोन आजहि चुकीचेच दिसतात. स्त्री-पुरुषसमानतेची कल्पना एवढी दृढमूल झालेली आहे कीं, शास्त्रीय दृष्ट्या केवढीहि असमानता दिसली तरी कायदा, नीति इत्यादि विचारांत ते समानतेचेच निष्कर्ष काढतांना दिसतात. याचें थोडें दिग्दर्शन पाश्चिमात्यांच्या कायद्याचा विचार करतांना होईल.

**पाश्चिमात्यांचा विवाहविषयक कायदा :**

सर्वसाधारण समाजांत जशी चालरीत व मूल्यविचार ( Mores and Values ) उत्पन्न होतात, त्यांतूनच सामाजिक कायदा निर्माण होत असतो. समाजाच्या चालीरीति व मूल्यें यांची कायद्याशीं जेवढी चांगली सांगड बसेल तितका कायदा जास्त आचरणांत येतो. याउलट परिस्थिति असल्यास समाजांत स्थिरस्वरूप झालेल्या चालीरीती ( Mores ) जास्त यशस्वी होण्याचा संभव असतो व कायदा निकामी होतो. तेव्हां कायदे करतांना सामाजिक चालीरीती व मूल्यें विचारांत घेणें कायदे स्थिर स्वरूपाचे होण्याच्या दृष्टीस अगत्याचें आहे.

कायद्यानें मनुष्याच्या वर्तणुकीवर शेवटीं परिणाम व्हावा ही अपेक्षा असते. मानवी वर्तणूक ( Behaviour pattern ) कशी व्हावी हें ठरवून ती अस्तित्वांत आणण्याकरितां कायद्याची कांस धरली जाते. हा विचार करतांनाहि तरतमभाव बाळगावा लागतो. एखाद्या व्यक्तीचें ध्येय सर्व समाजावर लादण्याचा अट्टहास झाल्यास त्याचा उपयोग होत नाहीं.

व्यक्तिगत व सामाजिक असे सद्गुण-दुर्गुणांचे भाग पाडून सामाजिक दुर्गुण प्रथम कायद्यांत बसवावे लागतात. नाहींतर खून माफ सुटतो. लांचलुचपत सापडतच नाहीं, दारूचे गुन्हे वाढलेले दिसतात, वगैरे चमत्कार घडूं लागतात. सामाजिक कायदे करतांना हा तरतमभाव अगत्याचा असतो. ‘ जगांत सर्व लोकांनीं दारूस हात लावूं नये ’, ‘ जगांत सर्वांनीं रामसीता व्हावें ’, ‘ सर्वांनीं देशाकरितां त्याग

करावा ', ' सर्वांनीं अहिंसेनेंच शत्रूस जिंकावें ' वगैरे स्वतःचा सर्व ध्येयवाद कायद्यानें समाजावर लादूं गेल्यास परिस्थिति चमत्कारिक होते. इंग्रजींतील म्हणीप्रमाणें स्वतःच्या इच्छेचें जर घोडें असतें, तर त्यावर सुखेनैव संचार करतां आला असता. सामाजिक महत्त्वाच्या गरजा कोणत्या हें लक्षांत घेतां स्वतःचीं ध्येयें लोकांवर लादण्याचा उद्योग म्हणजे कायदा असा भलता कायद्याचा वापर करणें योग्य नव्हे. पाश्चिमात्य देशांतून विवाहविषयक कायदे करतांना सामाजिक गरजा इत्यादि लक्षांत घेऊन हे कायदे केलेले नसून जुना ख्रिस्ती धर्म विचार व परंपरा यांचा या विवाहविषयक कायद्यावर फार महत्त्वाचा पगडा दिसून येतो. डॉ. किन्से लिहितात,

" Anglo-American Sex law is largely derived from and follows the religious codes on most items. " (Kinsey F. p. 261.)

यावरून स्त्रीपुरुष संबंधांबाबत इंग्लंड व अमेरिका इत्यादि पाश्चात्य ख्रिश्चन समाजांत धर्मश्रद्धेच्या कल्पनांचा पगडा विशेष लक्षांत घेतला आहे असें दिसून येईल. शिवाय वडिलोपार्जित धनदौलतीसंबंधीं कज्जे सोडविणें हा एक कायद्याचा दृष्टिकोन असणें अपरिहार्यच असतें. कायद्यासंबंधीं डॉ. केनेथ वॉकर लिहितात,

" They ( divorce laws ) were framed primarily as a measure of setting the disposition of property. Legal divorce therefore, was instituted solely for the purpose of safeguarding property. " ( K. Walker. p. 118. )

दोन व्यक्तींचा ' विवाह ' हा सामाजिक करार आहे असें समजून त्यांच्यांत जर कांहीं समरप्रसंग झाले तर त्यांच्या मिळकतीची विल्हेवाट लावण्यासाठीं हा घटस्फोटाचा कायदा अस्तित्वांत आला. म्हणजे सहजच या कायद्यांत सुखी विवाह, संततीचें ध्येय, व्यक्तिगत वैवाहिक गरजा, विवाहविषयक सामाजिक घडी, इत्यादि प्रश्नांचा विचार करून त्या अडचणी सोडविण्याची कोणतीहि तरतूद नव्हती. मिळकतीचे हक्क व त्यांची विल्हेवाट एवढाच या कायद्यामागें उद्देश असल्यानें विवाहांतर्गत सर्व विचार या कायद्याच्या कक्षेंतच येत नाहींत. पुढें हे कायदे सारखे सुधारत जात आहेत. परंतु अजूनहि त्यांची सुधारणा पुरी झालेली नसून त्यांत नव्या सुधारणा नेहमीं येतच असतात.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, धर्मश्रद्धा व कायदेशीर हक्क-संरक्षणाच्या गरजा या दोन गोष्टी प्रामुख्यानें पाश्चिमात्य समाजांतील स्त्रीपुरुषविषयक कायदे करतांना लक्षांत घेतल्या गेल्या आहेत. घटस्फोटाचा जो सध्यांचा कायदा आहे त्यांत स्त्रियांवर अन्याय करणारे बरेच मुद्दे घातले असले तरी संततिहीनत्व हा मुद्दाच नाहीं. हा मुद्दा घालावा असें पुष्कळ विचारी लोकांचें व रसेल साहेबांचें म्हणणें. एकपत्नीकत्वाच्या कायद्यामुळें घटस्फोट ही गोष्ट दुसऱ्या लग्नास तेथें जरूरच असल्यानें हें म्हणणें सयुक्तिकच आहे. पण अनेक वर्षे एकत्र राहिल्यावर' कदाचित् इतर पुष्कळ बाबींत पतिपत्नींचे संबंध ठीक असतात. पत्नी मध्यम वयास पोहोंचल्यावर संततीकरितां दुसरा विवाह पुरुषास करणें झाल्यास या घट-स्फोटित बाईनें जावें कोठें ? तिची व्यवस्था काय करावी ? व्यवस्था फक्त आर्थिक असते अशी पाश्चिमात्यांची समजूत दिसते. पण मानसिक व्यवस्था जास्त महत्त्वाची आहे एवढें लक्षांत ठेवावें. हे सर्व प्रश्न अनिर्णितच राहतात. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे पाश्चिमात्यांना ' सुखी विवाह ' हें ध्येय जरी मान्य असलें तरी कायद्यांत त्याचा विचार अजून नाहीं, हें दिसून येईल. घटस्फोटाच्या काय-द्यांत स्त्रीच्या हक्कसंरक्षणाच्या दृष्टीनें विवाहविषयक गुन्हे लक्षांत घेतले जातात. विवाहविषयक गुन्हा ( Doctrine of Matrimonial offence ) घडला तर त्या विवाहांत घटस्फोट ( Divorce ) देणें योग्य ठरतें. विवाहाच्या यशापयशांचा त्यांत विचार येत नाहीं. अगदीं अलीकडे १९५१–५५ या सालांत मॅरेज आणि डायव्होर्स यांसंबंधींच्या कायद्यांची सुधारणा करण्यासाठीं एक रॉयल कमिशन नेमलें जाऊन त्याचा एक रिपोर्टहि बाहेर आला आहे. ( Royal commission on Marriage & Divorce report 1951–1955. ) त्यांत बऱ्याच मंडळींचें असें मत पडलें कीं घटस्फोटाचा कायदा करतांना विवाहाचें यशापयश लक्षांत घ्यावें. ( Doctrine of breakdown of marriage ) हा विचार अजून पक्व नाहीं. पण हा विचार वाढत गेल्यास विवाहाचें यश कशावर अवलंबून असतें, तें जास्त लोकांना मिळावें याकरितां काय प्रयत्न करावेत इत्यादि योग्य विचारांस जास्त चालना मिळण्याची शक्यता आहे. परंतु घटस्फोटित स्त्रीचें यांत मोठें कल्याण होणार आहे असें दिसत नाहीं. यामुळें घटस्फोटित स्त्रीच्या सामाजिक प्रश्नांचा वेगळा विचार करावा लागणार. परंतु निदान या नवीन विचारानें ' संततिहीनत्व "

‘ संतति स्त्री निष्कारण नाकारीत असल्यास ’ वगैरे कारणांचा घटस्फोटाच्या कायद्यांत समावेश होण्याची शक्यता वाढली आहे.

दुसरा महत्त्वाचा कायदा म्हणजे द्विभार्यात्वाचा ( Bigamy ) कायदा पाश्चिमात्य देशांतील एकपत्नीकत्व फक्त कायदेशीर स्वरूपाचें आहे. एका स्त्रीस पत्नी या नात्यानें जवळ ठेवलें तर दुसऱ्या स्त्रीस त्याच नात्यानें कायद्यानें राहतां येत नाहीं, एवढाच याचा अर्थ. यांत ध्येयाविष्काराचा भाग नसून आर्थिक व कौटुंबिक गरज, समाजाची भीति, स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वासाठीं पुरुषानें राखावयाच्या मर्यादा अशा प्रकारच्या गोष्टींचा ही ‘चाल’ एक परिपाक आहे. नुसत्या कायद्यानें ध्येयवादी एकपत्नीकत्व निर्माण होऊं शकत नाहीं, हें सर्वांस मान्य आहे. पण घटस्फोट सोपा असल्यानें एकापुढें एक कितीहि विवाह करतां येतात. हा कायदा करतांनाहि समाजशास्त्र, मानसशास्त्र, सुखी विवाह, सुप्रजोत्पत्ति, सामाजिक घडण व अडचणी इत्यादि वाजवी मुद्यांचा फारसा विचार दिसत नाहीं. येथें धर्मश्रद्धा व कायदेशीर हक्कसंरक्षण या गोष्टी विचारांत घेऊं नयेत असें प्रतिपादन नसून फक्त याशिवाय बऱ्याच इतर गोष्टींचा वाजवी विचार होणें जरूर आहे, एवढेंच निदर्शनास आणावयाचें आहे. यामुळें एक महत्त्वाची गोष्ट अशी दिसते कीं एकपत्नीकत्वाचा कायदा सर्व ख्रिश्चन देशांत प्रसृत झाला असला तरी सामाजिक परिस्थिति तशी नाहीं. ध्येय आणि व्यवहार यांत सर्व देशांत, सर्व कालांत तफावत असतेच, त्यांत वावगें कांहीं नाहीं. पण ध्येय काय व व्यवहारांतील अडचणी कोणत्या याचा साकल्यानें विचार करून व्यवहारांतील अडचणींना योग्य ते परिहार शिल्लक ठेवून व्यक्तीस आणि समाजास ध्येयाजवळ पोहोंचविण्याची तजवीज कशी करावयाची, ध्येयदृष्टि अविचलित ठेवून व्यवहारांतील अडचणींना तोंड कसें द्यावयाचें किंवा अविचलित स्थिर ध्येय आणि अस्थिर व विविधतेनें नटलेला व्यवहार यांत सांगड कशी घालावयाची ही खरी बुद्धीची कसरत आहे. शिवाय सध्यांच्या स्त्रीलोकसंख्येचा विचार करतां पाश्चिमात्य देशांत कायद्यापलीकडे एकपत्नीकत्वाला काय अर्थ आहे ? देशकालपरिस्थित्यनुरूप बहुभार्यात्व पूर्वी सर्व समाजांत अस्तित्वांत होतें व आजहि आहे. उलट कायद्यानें बायकांची परिस्थिति याईट मात्र झाली, एवढें स्त्रियांच्या लक्षांत आल्यास पुढील सुधारणा योग्य दिशेनें होतील.

याबाबत भारतीय विचारसरणी जास्त निर्दोष आहे. प्रत्येकाची उंची सहा फूट असावी असें जरी ध्येय ठेवलें तरी व्यवहारांत सर्वांची उंची सहा फूट भरणें अशक्य आहे. हें जितकें सत्य तितकें कोणत्याहि आचारासंबंधीं ध्येय ठरविलें तरी व्यवहारांतील कमीजास्तपणा वा ' विविधता ' हीं ध्येयें न सोडतां ग्राह्य धरून चालावें लागतें या तत्त्वास धरूनच प्राचीन भारतीय विचारवंतांनीं ' एकपत्नीकत्व ' हें ध्येय व तें साध्य होण्यास कष्ट व काल यांची जरुरी, तें ध्येय मिळविण्याकरितां काय करावें याकरितां शास्त्रीय विचार आणि साधनें हीं सर्व तयार केलीं. प्रत्यक्ष आचारांत असा आचार पाहण्यास सांपडावा अशाकरितां ब्राह्मणांस हा आचार म्हणून सांगितलें आणि कांहीं विशेष कारणास्तव द्विभार्यात्व व बहुभार्यात्व यांचे आचार आपद्धर्म आणि कनिष्ठ लोकाचार म्हणून त्यास मान्यता दिली. ते अधर्म्य वा बेकायदा वगैरे ठरवून नवीन सामाजिक उत्पात आणि अडचणी उत्पन्न करण्यास मदत केली नाहीं. या अडचणी आणि उत्पात कोणते हें वर्णन मागें येऊन गेलेंच आहे. अशा पाश्चिमात्य समाजांत व्याभिचार व वेश्याव्यवसायास या कायद्यानें मदतच झाली आहे. डॉ. किन्से यांच्या मतें विवाहित स्त्रीच्या चाळीस वर्षांपर्यंत साधारणतः ४० टक्के स्त्रिया स्वतःच्या पतिव्यतिरिक्त इतर पुरुषांशीं समागम करतांना दिसतात. ही पद्धत दिवसेंदिवस पाश्चिमात्य समाजांत वाढत जात आहे. हें पण आतां प्रसिद्ध आहे.

तात्पर्य, एकपत्नीकत्वाचा सांचा कायद्यानें लादून यासंबंधीं ' विविध ' अडचणी आणि गरजा लक्षांत न घेतां, द्विभार्यात्व व बहुभार्यात्व ज्या समाजांत गुन्हा समजला गेला आहे त्यांत या कायदेशीर एकपत्नीकत्वाची काय दुरवस्था आहे, यांतून पहिल्या व्यावहारिक अडचणी नाहींश्या होण्याऐवजीं नवीन अडचणींची भर कशी पडत आहे, हें वर थोडक्यांत दिग्दर्शित केलें आहे.

ध्येयात्मक एकपत्नीकत्वाचा सर्वसमाजव्यापक कायदा करून, कायदा केल्याच्या तारखेपासून सर्व स्त्रीपुरुषांनीं रामसीता झाल्याचें मानावें असा दुराग्रह व दांभिकपणा भारतीय संस्कृतींत नव्हता. कायदा नव्हता म्हणून कांहीं समाजांत सर्व पुरुष बहुपत्नीक होते असें मानणेंहि मूर्खपणाचें ठरेल. कायदा नव्हता तेव्हां काय सर्व समाज दारूच्या व्यसनांत कुजत होता ? परंतु एकपत्नी हें उत्तम ध्येय ठेवून समाजांतील सर्व व्यक्तींस एकदम कायद्यानें ध्येयवादी करतां येणार नाहीं,

हें ते जाणत होते. ध्येय हें अत्युच्च परीक्षेंतील शंभरांपैकीं शंभर मार्क आहेत. ध्येय हें मनुष्याच्या प्रगतीची शेवटची पायरी आहे. असें ध्येय गांठण्यासाठीं श्रम व काल या दोहोंचीहि सारखीच आवश्यकता आहे. समाजांत प्रत्यक्ष अडचणीस धरून आचाराची भिन्नता येणें अपरिहार्य असतें. ही आचारभिन्नता, प्रत्येक व्यक्तीची प्रकृति, तिची परिस्थिति, गरजा, सामाजिक घडण, स्त्रीपुरुषांची लोकसंख्या, स्त्रीपुरुषांतील संस्कार, अशा अनंत कारणपरंपरेवर अवलंबून असल्यानें ध्येयप्राप्ती-साठीं साधनांची तरतूद करून ठेवून, मानवी आचारांची भिन्नता ग्राह्य धरावी लागते. नाहींतर सर्व ध्येयांची कायदेशीर दुरवस्था समाजांत दिसल्यावांचून राहणार नाहीं आणि तीच नेमकी पाश्चिमात्य समाजांत दिसून येते. सामाजिक सुधारणांचे कायदे कोणताहि खोल विचार न करतां करण्याची पद्धत दिसते. कायदेमंडळांतील सभासद किंवा कायदेपंडित विवाहविषयक कायदे करतांना किती निष्काळजी असतात याचें दिग्दर्शन करतांना डॉ. बोमन लिहितात कीं, हे कायदेपंडित खालीलपैकीं कांहीं दृष्टींनीं हे कायदे पास करतांना दिसतात.

(१) त्यांना विवाह ही आयुष्यांतील फार महत्त्वाची बाब आहे हें कळतच नाहीं.

(२) मतदानाकरितां लागणाऱ्या बुद्धीपेक्षां यांत कमी बुद्धीची जरुरी आहे असें त्यांना वाटतें.

(३) परंपरेशीं विसंगत कायदा करतांना ते धैर्यहीन असतात.

(४) त्यांचा खरा स्वार्थ (Interest) किंवा काळजी फक्त नवे कर, मोठे खर्च, रस्ते, पाणीपुरवठा, धरणें वगैरे योजना अशा ठिकाणीं असतो.

(५) त्यांच्या निदर्शनास आलेल्या कांहीं विवाहांतील तुरळक अडचणीच त्यांच्या डोळ्यांपुढें कायदे करतांना असतात.

(६) शेवटीं अत्यंत महत्त्वाचें कारण म्हणजे त्यांना 'विवाह' व तद्विषयक प्रश्न यांसंबंधीं फारच थोडें ज्ञान असतें. ह्या गाढ अज्ञानाच्या पोटीं कसलेहि कायदे कोणीं पुढें आणले कीं पास करून पुढें चला अशा थाटांत हा विवाहविषयक कायद्याचा सर्व पसारा मांडला गेला आहे.

(७) याशिवाय सर्वसामान्य मतदार याबाबत अत्यंत बेफिकीर, निष्काळजी आणि कायदेमंडळांतील अज्ञानी सभासदांपेक्षांहि फार निर्बुद्ध असल्यानें हा सर्व

खेळ ' समाजहित ' या नांवाखालीं चाललेला असतो, हें विसरतां कामा नये. शेवटीं डॉ. बोमन म्हणतात,

" Marriage laws are a clear-cut illustration of a cultural lag. The result is maladjustment. Our marriage laws are not adopted to the present-day social needs, although some progress is occurring. " ( Bowman. p. 332. )

सध्यांच्या सामाजिक गरजा, संस्कृति इत्यादि गोष्टींचा विचार या कायद्यांतून नाहीं आणि हा सर्व सावळागोंधळ शेवटीं समाजांत नव्या नव्या अडचणी आणि उत्पात उत्पन्न करण्यास मदत करतो एवढेंच.

वरील सर्व विवेचन करण्याचें कारण एवढेंच कीं, ज्या पाश्चिमात्य देशांतील कायद्यांचें अंधानुकरण या देशांत ' प्रगति ' या गोड नांवाखालीं चालू आहे. तेथील विचारवंतांची त्या कायदेबाजीसंबंधीं मतें आमच्याकडील अभ्यासकास उद्बोधक वाटावी आणि एखाद्यास तरी त्यांचा पोकळपणा कळून यावा कीं ज्यायोगानें त्याला पुढील सुधारणा करतांना जास्त काळजी घ्यावीशी वाटेल.

पाश्चिमात्य विवाहविषयक कायद्यांत कांहीं मूलभूत दोष असून ते सुधारावे म्हणून तिकडील विचारी मंडळींची खटपटहि चालू आहे. आतां असे कायदे आमच्याकडे जसेच्या तसे ' सुधारणा ' या नांवाखालीं लावणाऱ्यांना कांहीं स्वतंत्र बुद्धि व विचार आहे असें त्यांच्या परमभक्तांना तरी म्हणतां येईल काय ? आणि अशी कायदेबाजी आमच्या देशांत सुरू असून सर्व विवाहविषयक कायद्यांचा खेळ चालू झाला आहे. येथील विवाहविषयक बुद्धिगम्य कल्पना, त्यांतील चालीरीति व मूल्येंहि या कायद्यांत विचारांत घेतलीं नाहींत. उदाहरणार्थ, नवीन केलेल्या हिंदु विवाह कायद्याचा उद्देश सांगतांना आमचे कायदेपंडित विवाहचे आठ प्रकार सांगतात. विवाह हा दोन व्यक्तींचें आयुष्य एकत्र करणारा आहे असेंहि सांगतात, पण विवाह हा साधन असूनहि विवाहाचें ' सुप्रजा ' हें साध्य हिंदुशास्त्रकारांनीं ठिकठिकाणीं सांगितलेलें असूनहि तें या विद्वानांच्या लक्षांत आलेलें दिसत नाहीं. हा विवाहाचा खरा उद्देश आहे. याचा उद्देशकथनांतच पत्ता नाहीं. तेव्हां निष्प्रज विवाहाचा पुढच्या घटस्फोटाच्या कायद्यांत विचार नाहीं. द्विभार्यात्व अशा वेळीं हिंदु कायद्यानें संपूर्ण ग्राह्य धरलें. तेंहि यांनीं नव्या कायद्यांत काढून टाकलें.

एवंच हिंदु विवाहाचा कायदा पाश्चिमात्य पद्धतीवर रचून 'हिंदु' हें नांव देऊन खऱ्या हिंदु कायद्याशीं या नवीन कायदेपंडितांनीं एकंदरींत घटस्फोटच घेतलेला दिसतो.

**भारतीय व पाश्चिमात्य व्यवहारांतील फरक :** पाश्चिमात्य राष्ट्रांत कुटुंब व स्त्रीपुरुषसंबंधांत सध्याच्या कालांत काय व्यवहार उत्पन्न होत आहेत याचें वर कांहीं दिग्दर्शन झालें. भारतीय व पाश्चिमात्य व्यवहारांतील फरक तत्काल लक्षांत येण्याच्या दृष्टीनें खालीं हे दोन प्रकारचे वर्तणुकींच्या प्रकारांतील ( Patterns ) मुद्दे एकत्र सूत्र-रूपानें देत आहों.

| पाश्चिमात्य | भारतीय |
| --- | --- |
| ( १ ) ध्येय एकपत्नीकत्व. | ( १ ) ध्येय एकपत्नीकत्व. |
| ( २ ) कायदेशीर एकपत्नीकत्व (Legal monogamy). | ( २ ) ऐच्छिक एकपत्नीकत्व (Voluntary monogamy). |
| ( ३ ) व्याभिचाराची कांहीं चाल ( Adultery fashion ). | ( ३ ) व्यभिचार त्याज्य ( Adultery condemned ). |
| (४) बहुपत्नीकत्व एकीपुढें एक प्रमाणें ( Successive polygamy ). | ( ४ ) द्विपत्नीकत्व कांहीं प्रसंगांत ग्राह्य ( Bigamy under certain conditions ) बहुपत्नीकत्व श्रीमंतांचा शोक Polygamy — Luxury of the rich ). |
| ( ५ ) वेश्याव्यवसाय भूमिगत ( Underground economic prostitution ). | ( ५ ) वेश्याव्यवसाय भारदस्त आणि त्यांत कला व मूल्यें यांची जोपासना. ( Dignified prostitution ). |
| ( ६ ) कुमारीमाता, घटस्फोटिता, परित्यक्ता, विधवा, बेकायदेशीर मुलें, वाढते घटस्फोट इत्यादि कौटुंबिक विघटनांचे प्रश्न. | ( ६ ) हे सर्व प्रश्न कमी व कांहीं कांहीं तर अस्तित्वांतच नव्हते. |

वरील आचारांतील फरक दोन भिन्न दृष्टिकोनांतून उत्पन्न होतात हें खरें. स्त्रीपुरुषांची सर्व क्षेत्रांत समानता व स्पर्धा मान्य केल्यास पाश्चिमात्य घडण उत्पन्न होणें अपरिहार्य होतें. परंतु यांत स्त्रीचा शेवटीं तोटा असून हा दृष्टिकोन अशास्त्रीय आहे. ‘ स्त्री संरक्षणीय ’ व ‘ स्त्रीपुरुष पूरकत्व ’ हाच योग्य दृष्टिकोन आहे. भारतीय आचारांतून मनाची शांतता व समाधान, कुटुंबसौख्य, पुढील पिढीची वाढ व संस्कारपरंपरा कायम टिकावी याकरितां धडपड होती. श्रद्धेला स्थान होतें. भकासपणा कमी होता. आयुष्यांतील कोणत्याहि समस्येला निश्चित उत्तर होतें. आयुष्याबद्दल निश्चित दृष्टिकोन होता. त्याला धरून सर्व विवाहविषयक व्यवस्था होती. पाश्चिमात्यांत हें सर्व प्रायोगिक अवस्थेंत होतें. ध्येयनिश्चिति नव्हती. धर्मश्रद्धा विस्कळीत झाली होती. जडशास्त्र व उद्योगधंदे, शहरी जीवन, सत्ता, संपत्ति, साम्राज्यें, दारू व ऐषआरामाचीं साधनें यांची वाढ होत असल्यानें मूल्यविचार स्थिर नव्हता. आयुष्याबद्दल कोणताहि स्थिरस्वरूप दृष्टिकोन नव्हता. सामाजिक क्षेत्रांत सतत प्रयोग चालू होते; अभ्यासहि चालू होता. अशा परिस्थितींत ही पाश्चिमात्य संस्कृति हिंदुस्थानांत येऊन जो संघर्ष झाला त्यांतून कांहीं निश्चित परिणाम या देशावर झाले.

**ब्रिटिश अमदानींतील सामाजिक स्थित्यंतर :** ब्रिटिशांनीं या देशांत विद्या, शास्त्र व शासनपद्धति यांसंबंधीं ज्या सुधारणा घडवून आणल्या त्यांबद्दल त्यांनीं केलेल्या कष्टांचें कौतुकच करणें जरूर आहे. रॉक्सबर्ग, कोनिंग, कुक, डिमॉक इत्यादींचे वनस्पति व नैसर्गिक संपत्तींचे अभ्यास, मॅक्समुल्लर, मॅक्डोनेल इत्यादींचे संस्कृत वाङ्मयाचे अभ्यास, कॉटन, बेंटन, व्हीलर, ग्रीफिथ वगैरेंचें राजकारण व एतद्देशीय परिस्थितींचे अभ्यास कौतुकास्पद होत. एका लहान ब्रिटिश राष्ट्रानें त्या कालीं कितीतरी अभ्यासक, धाडसी, राजकारणधुरंदर आणि कर्तृत्ववान् पुरुष या देशांत पाठवले आणि त्यांतील कित्येकांनीं एतद्देशीय विद्या, भाषा, कला, शास्त्रें, भूगोल, राजकारण, इतिहास वगैरे गोष्टींवर परिश्रमपूर्वक ज्ञान संपादन करून त्या त्यांनीं वाढीस लावल्या. ब्रिटिशांचें एवढें गुणग्रहण आपण न करूं तर कृतघ्न ठरूं. परंतु त्यापुढें त्यांचें सामाजिक व कौटुंबिक बाबींतहि सर्व कांहीं उच्च होतें, हा आभास होता. आणि त्यांचें अनुकरण करणारे लोकहि थोडे होते, एवढेंच आमचें म्हणणें. आमचें तें सर्व अग्राह्य, टाकाऊ, हीन असा प्रच्छन्न प्रचार सर्वत्र चालू होता.

एतद्देशीय समाजांत मुसलमानांपर्यंत जें रूपांतर झालें नाहीं, तें ब्रिटिश राजवटींत झालें. याला ब्रिटिश राज्यकर्ते 'बौद्धिक स्वातंत्र्य' असें मोठें नांव देतात. वाम्बरी ( A. Vambery ) लिहितात,

" We have undertaken the intellectual emancipation of the Indian people. We are changing the habits of thought, the religious ideas, the moral level of the whole country."

( A. Vambery. p. 274 )

याप्रमाणें युरोपियन संस्कृतीनें हिंदुस्थानांत एतद्देशीय विद्या, कला, धर्मसमजुती, समाजसंघटना, आचार, विचार इत्यादि सर्व क्षेत्रांवर आपला पगडा बसविला. हा आमूलाग्र फरक कोणत्याहि सैन्याच्या किंवा मोठ्या कायद्याच्या जोरावर न करतां केवळ शिक्षणानें व प्रचारानें त्यांनीं घडवून आणला. जेत्या राष्ट्राचें श्रेष्ठत्व एतद्देशियांना पटवून त्यांच्याकडूनच हा फरक घडवून आणला.

यावरून एतद्देशियांकडूनच स्वराष्ट्र, स्वधर्म व आचार यांवर ब्रिटिश आमदानीच्या सुरवातीस जे कांहीं हल्ले झाले ते सर्व स्वयंप्रेरित नव्हते. हुंड्याच्या चालीबद्दल ब्राह्मण मंडळींनीं विजयानगर साम्राज्यांत केलेल्या सुधारणेसारख्या गोष्टी स्वयंप्रेरित होत्या. त्यांनीं विवाहविषयक सर्व आचारांवर शस्त्र उपसलें नाहीं. जी चाल अशास्त्रीय, घातुक, केवळ रूढी व स्वार्थ यांनीं शास्त्र बनूं पाहात होती, तेवढ्यासंबंधींच त्यांनीं शस्त्र उचललें. १९ व्या शतकांतील बहुतेक सामाजिक सुधारणा परप्रेरित होत्या. त्यामुळेंच स्वदेश, स्वविद्या, स्वभाषा इत्यादींसंबंधीं अनादर, तिरस्कार आणि अविचारी हल्ले यांची सर्व आंग्लविद्याशिक्षितांत जणूं अहमहमिकाच लागलेली दिसते. एका बाजूनें ख्रिश्चन मिशनऱ्यांचा विषारी प्रचार, दुसरीकडून आंग्लशिक्षणपद्धतींतून निघालेली 'साहेब' मंडळी व तिसरीकडून राज्यकर्त्यांचा खटाटोप या सर्व गोष्टींनीं येथें जो आमूलाग्र बदल घडवून आणला, त्यास यापूर्वींच्या इतिहासांत तोड नाहीं.

इंग्रज राज्यकर्ते म्हणून ते कर्तृत्ववान्, पराक्रमी, त्यांच्या धर्मकल्पना, सामाजिक कल्पना, आचार, विचार सारें कांहीं श्रेष्ठच असून, आपण आज हजारों वर्षें मूर्खपणानें बरबटलेल्या, अतएव पशुतुल्य स्थितींत काढलीं, अशी एकांगी विचार-

प्रणाली प्रथमतः पुढें आली. पाश्चिमात्य शिक्षण व संस्कृतीचे हे या देशावरील दुष्परिणाम आज सर्वमान्य आहेत. एवढेंच नव्हे तर युरोपीय अभ्यासकांचेंहि मत याप्रमाणेंच आहे.

" In England there has been evolution, not revolution. The change has been the result of natural spontaneous progress brought about by the action of internal forces. In India the change has been artificial and forced from without. It is the product of the relationship between the two civilisations.

The moving spirit of this revolution is English education. Under its solvent influence the old organisations are crumbling up and the Indian nations have entered upon a long career of transition, preparatory to the establishment of a new order. The immediate inevitable result is that of disturbance. Out of admiration for Western civilisation would be brought indeed, if we were not able to see that grave evils are likley to attend upon its transplantation to Indian soil.

But if we look at the West as it actually is, we find a state of utter coufusion in every department of human energy. Nations, churches and classes are at war with each other. The present anarchy, which prevails in Europe, characterises the transitional epoch.....but what does such anarchy become when transplanted in the East ? It is an agent of destruction, the disastrous effects of which will have to be carefully eliminated. " ( Coton p. 131–38 )

कॉटन म्हणतात, इंग्लंडमध्यें सामाजिक फेरफार उत्क्रांत होत गेले. हिंदुस्थानांतील समाजांत ते क्रांतिसारखे घडत आले. उत्क्रांत होण्याच्या क्रियेंत ते स्वयंप्रेरित, मागील सर्व इतिहास, घटना व आहे त्यांतील सर्व चांगल्या गोष्टी लक्षांत घेऊन होत असतात. तर हिंदुस्थानांत हे बदल परकीय संस्कृति लादीत होती आणि परकीय प्रेरणाच त्याला मुख्य कारण होती. युरोपीय व हिंदु संस्कृतींच्या संघर्षांचाच तो एक दूरगामी परिणाम आहे. पाश्चिमात्य शिक्षण हीच घटना या सर्व गोष्टींस मुख्यत्वें जबाबदार आहे. सर्व जुन्या संघटना आचार व विचार पाश्चिमात्य शिक्ष-

णाच्या या भट्टींत वितळत जात आहेत. पुढें पुन्हां सामाजिक स्थैर्य येईपर्यंत हे बदल असेच होत राहणार. त्यामुळें येथें सर्व सामाजिक क्षेत्रांत गोंधळ उडालेला दिसेल. ज्या पाश्चिमात्य समाजांचें येथें गुणगान व त्यामुळें अंधानुकरण चाललें आहे ते समाज, त्यांचे आचार व विचार स्थिर स्वरूपाचे नाहींत. तसेंच वर्गकलह, राष्ट्रकलह व धर्मकलह अशा नाना तऱ्हेच्या कलहांच्या परिस्थितींतून पाश्चिमात्य समाज वाहात आहे. त्यांचा हा सर्व गोंधळ आणि बजबजपुरी जशीच्या तशी हिंदुस्थानांतील मोठा ऐतिहासिक काल असलेल्या स्थिर व बळकट परंपरेचें सातत्य असणाऱ्या समाजांत आणून ठेवली, तर दुरवस्था न माजेल तर काय होईल? हें पाश्चिमात्य संस्कृतीचें येथें भारतांत संपूर्ण आरोपण करणें म्हणजे तसलाच नाश ओढावून घेणें असून, हे दोष शक्यतों लवकर काढून टाकले नाहींत, तर प्रसंग कठिण आहे.

हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेशीं दोन पिढ्या जवळचा संबंध असलेल्या एका मोठ्या पाश्चिमात्य अभ्यासकांचा हा अभिप्राय आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे हे गोंधळ नेमके कोणते हें या शतकांत प्रत्यक्ष परिचयाचे झाले आहेत. ख्रिश्चॅनिटी व भौतिक शास्त्रें यांच्यांतील सतत विरोधामुळें उत्पन्न झालेला 'अप्रगल्भ बुद्धिवाद', अप्रगल्भ म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, आचारास शास्त्र प्रमाण मानावयाचें, पण कोणताहि आचार वा सामाजिक प्रश्न सोडवितांना लागणारी त्यासंबंधीं शास्त्रीय माहिती, शास्त्र प्रगत होत असल्यामुळें पुरेशी उपलब्ध होत नाहीं. तेव्हां मध्यंतरींच्या कालांत जेवढी त्रोटक माहिती असते किंवा जेवढा बदल ग्रहण करावासा वाटतो तो घेऊन प्रयोग सुरू करावयाचा, म्हणून त्यास 'अप्रगल्भ बुद्धिवाद' असा शब्दप्रयोग केला आहे. औद्योगीकरण व त्यामुळें उत्पन्न झालेले शहरी थाटाचे, खर्चिक जीवनमानाचे व मजूर-मालक संबंधाचे प्रश्न, धर्मभावना नष्ट झाल्यामुळें, आणि आयुष्यावरील समाधानाचा कोणताहि निश्चित दृष्टिकोन नसल्यामुळें कुटुंबसंस्थेच्या विघटनेचे प्रश्न, ज्यांत विवाह-वयोमर्यादा, विवाहपूर्वसंबंध, लैंगिक नीतीचे आचार, घटस्फोट, कायदेशीर व बेकायदेशीर संतति, घटस्फोटित स्त्रिया, विधवा स्त्रिया, इत्यादींचे प्रश्न येतात. आणि शेवटीं पाश्चिमात्य समाजाच्या शास्त्रीय प्रगतीमुळें व औद्योगीकरणामुळें वाढलेलें जीवनमान टिकून राहावें, सोन्याचा धूर नेहमीं अमेरिकेंतच निघाला पाहिजे या

क्रमांक ... नों: दि:

हेतूनें, प्रत्येक राष्ट्राचा राजकीय स्वार्थ भरमसाट वाढल्यामुळें, जगावर आमचेंच प्रभुत्व राहावें, निदान आमच्या कच्चाय्यांत जगाचे व्यवहार असावेत या लोभामुळें ‘ युद्ध व शांतता ’ यांसंबंधीं जास्त गुंतागुंतीचे नानाविध प्रश्न हे सर्व पाश्चिमात्यांचे गोंधळ आमच्याकडे येऊं पाहात आहेत.

**विष्णुशास्त्र्यांचा पहिला हल्ला :** भारतीय संस्कृतीनें विवाहविषयक स्थिर स्वरूपाचा केलेला शास्त्रीय विचार, इंग्रजी राज्याच्या सुरुवातीच्या कालांत फारसा कोणाच्याहि ध्यानीं आलेला दिसत नाहीं. पाश्चिमात्य तें सारें ग्राह्य व आमचें तें मौर्ख्य या समीकरणास पहिला धक्का कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं दिला. सबंध निबंधमालेचा आणि त्यांनीं सुरू केलेल्या शिक्षणादि कार्यक्षेत्रांचा रोख लोकांच्या या विपरीत बुद्धीस आळा बसावा, गलितधैर्य झालेल्या मंडळीस धैर्य यावें, स्वाभिमानाचा स्फुल्लिंग पुन्हां प्रज्वलित व्हावा, स्वभाषा, स्वराष्ट्र यांचें तेज पुन्हां पडावें, जनतेनें पुन्हां देशोद्धाराच्या कार्यास लागून इंग्रजी शिक्षणानें उत्पन्न केलेल्या पाश्चिमात्य बौद्धिक गुलामगिरींतून देशाची मुक्तता करावी, स्वराष्ट्र व स्वविद्या यांतील गुण सर्वांच्या नजरेस यावेत, असाच आहे. त्यांच्या निबंधमालेंतील खालील उतारा हें स्पष्ट करील.

“ मागील मन्वंतरांतल्या तत्त्वज्ञानाचे दोन जबरदस्त सिद्धांत म्हणजे हे होत कीं, हिंदु म्हणजे मूर्खांतले मूर्ख व अकलेचे वांटेकरी म्हटले म्हणजे इंग्रज लोक, मिशनरी, बाटेमंडळी व इंग्रजीचा संस्कार झालेले विद्वान् ! ” ( नि. पृ. ९४२ )

“ पाश्चात्य विद्यारूप वारुणीच्या पहिल्या झुरक्याबरोबर आमची विद्वान् मंडळी झिंगली जाऊन त्या अंमलांत स्वदेशीविषयीं, स्वधर्माविषयीं, आपल्या रीतिभातींविषयीं वगैरे जें भयंकर पांडित्य त्यांच्या तोंडावाटें उचंबळत असे, त्यास अलीकडे पुष्कळच उतार पडला आहे. ” ( नि. पृ. २६१ ).

“ आम्ही आपल्यातर्फे आमच्या सर्व वाचकांस प्रांजलपणें कळवितों कीं, आमच्या राष्ट्राचा, जातीचा, धर्माचा वगैरे जरी आम्ही पूर्ण अभिमान बाळगतों तरी यथार्थ दूषणाचा कैवार आम्हीं कधीं घेणार नाहीं. सदोषत्व हें इहलोकीं कोणासच सुटलें नाहीं. पण आमच्या देशाची अलीकडे अशी चमत्कारिक स्थिति

झाली आहे कीं, त्यास कोणी धनी नाहीं, हवें त्यानें त्याच्याविषयीं काय पाहिजे ती बडबड करावी. जो जो जितकी अधिक अधिक बडबड करील तितका तितका तो जाडा पंडित व देशसुधारणा करणारा!" (नि. पृ. ९९१)

तात्पर्य, पाश्चिमात्य वैचारिक गुलामगिरीस पहिला जोराचा धक्का कै. विष्णुशास्त्री यांनींच दिलेला दिसतो. एकंदरींत निबंधमालेचे विषय पाहिले म्हणजे साधारणतः काव्य व शास्त्र यांसंबंधींच विशेषतः दिसतात. संस्कृत भाषा, मोरोपंतांची कविता, इंग्रजी भाषा, इतिहास, रसायनशास्त्र इत्यादि विषय शास्त्रीबोवांनीं चर्चेला घेतले होते. कदाचित् शास्त्रीबोवा जास्त जगते आणि त्यांना ही देशसेवा करण्याची संधि परमेश्वर देता तर निबंधमालेंतून कांहीं सामाजिक विषयहि चर्चेस घेतलेले आपणांस पाहण्यास मिळाले असते! पण तें कार्य त्यांनीं पुढील पिढीवर सोंपविलें व हा सतत देशहितार्थ तळमळणारा व त्याकरितां अविश्रांत स्वार्थत्यागानें श्रम करणारा जीव अल्पायुषी ठरला.

कै. लोकमान्य टिळकांचें लक्ष राजकारणावरच सर्वस्वीं केंद्रित होतें. सामाजिक प्रश्नांत त्यांनीं फारसें लक्ष घातलें नाहीं. कै. आगरकर इत्यादि मंडळींनीं समाजसुधारणा हेंच आपलें एकमेव कार्य ठरविलें. बालविवाहाचा अतिरेक, केशवपन, स्त्रीची गुलामगिरी इत्यादि अनिष्ट गोष्टींवर भरपूर हल्ले सुधारक वर्गानें चढविले. ही त्यांची कामगिरी स्वागतार्हच आहे. विवाहासंबंधींहि कांहीं लेखन या कालांत सुधारकांनीं केलेलें दिसतें. परंतु हिंदु विवाहपद्धति आणि जातिसंस्था अशा भारतियांच्या विशेष पद्धतींवर जे हल्ले आमच्या देशबांधवांकडून चढलेले दिसतात, त्यांत विचारापेक्षां परप्रत्ययनेयबुद्धीचाच जास्त वास येतो. त्यांना भारतीय पद्धतींतील गुणग्रहण फारसें करतां आलेलें दिसत नाहीं. स्वयंवरपद्धतीचें मंडन वात्स्यायनांनीं कसें केलें आहे तें पूर्वीं आलेंच आहे. यापेक्षां नवीन मुद्दा कै. आगरकर यांच्या लेखनांत दाखविणें कठिण आहे. समाजसुधारकांच्या प्रामाणिकपणाबद्दल आमच्या मनांत संदेह नाहीं. परंतु आज इतक्या वर्षांच्या अंतरावरून या गतकालाकडे ज्या वेळीं आमची पृथक्करणात्मक दृष्टि जाते, त्या वेळीं, जेत्यांच्या विजयामुळें व आपल्या पराभवामुळें त्यांच्यांत जेत्यांच्या सामाजिक मूल्याविषयीं भरमसाट कल्पना होत्या व त्या त्यांनीं अनभ्यस्त वृत्तीनें, एकांगीपणानें या समाजावर येथील रीतिभातींत व भारतीय जुन्या शास्त्रपरंपरेंत जणुं कांहींहि गुण नाहींत अशा भावनेनें लादल्या, हें म्हणणें अवास्तव ठरेल असें

नाहीं. केवळ स्वतंत्र विचाराचे सुधारकी हल्ले या समाजावर पूर्वींहि झाले होते. धर्म या नांवाखालीं जो भोंदूपणा व स्वार्थ सर्वत्र पसरलेला होता आणि ब्राह्मण म्हणून श्रेष्ठ, मग आचार कितीहि नीच असो, वगैरे अशास्त्रीय विचारसरणीवर शाहीर रामजोशांच्या लावणींतून, तुकाराम महाराजांच्या अभंगांतून, आणि एकनाथ महाराजांच्या वाणींतून पूर्वी अनेकदां हल्ले झालेले आहेत. ज्ञानेश्वरतुकारामादि संतांच्या चरित्रांत भोंदूपणानें या सात्त्विक वृत्तीच्या मंडळींना केवढा त्रास सोसावा लागला याचा पुरावा सांपडतो. स्त्रीवरील अन्याय हा सुधारकांचा विशेष विषय आणि त्यांच्या कामगिरीनें आज शूद्र व स्त्री या दोघांवरील अन्यायाचें पुष्कळच परिमार्जन झालेलें दिसेल. पण अन्याय दूर करण्याचा भाग कोठपर्यंत, भारतीय घटना व दृष्टिकोनांतील गुण कोणते, पाश्चिमात्य संस्कृतीचे धोके कोणते, ते धोके टाळण्यास सुधारणेची मर्यादा कोणती, भारतीय दृष्टिकोनांतील गुणांची जोपासना करून नेमकें अन्यायाचें परिमार्जन कसें करतां येईल, नुसतें पाश्चिमात्यांचें अंधानुकरण केल्यास पुढें काय परिस्थिति ओढवेल, इत्यादि चिकित्सक बुद्धि, तौलनिक अभ्यास व समत्वाच्या दृष्टीचा विचार या कालांत फारसा दिसत नाहीं.

कै. प्रि. गोळे यांच्या 'हिंदुधर्म आणि सुधारणा' ह्या ग्रंथासारखे कांहीं अपवाद आहेतच. अभ्यासू वृत्तीनें पौर्वात्य पद्धतींतील गुण व पाश्चिमात्य सुधारणांचे धोके यांची तारतम्य चर्चा करणारा हा ग्रंथ त्याच काळीं लिहिला गेला असूनहि, त्या कालांतील सुधारकांच्या दुंदुभीपुढें या टिमकीचा आवाजहि फारसा ऐकूं गेलेला दिसत नाहीं.

एकंदरींत या पहिल्या जहाल किंवा भडक सुधारकांनंतर यास कांहीं मुरड घालणारे विचार पुढें येऊं लागले. स्त्रीस पुरुषासारखेंच सर्व शिक्षण असावें हें सुरुवातीचें मत मागें पडून स्त्रीस वेगळा शिक्षणक्रम असावा, तिच्या शरिरावर शिक्षणाचा पुरुषाइतकाच मोठा ताण देणें योग्य नव्हे, 'सुगृहिणी' हेंच तिचें ध्येय असावें, इत्यादि विचार पुढें येऊं लागले. याप्रमाणें भडक विचारांस थोडी मुरड पडूं लागली. चिकित्सक बुद्धि व अभ्यास पुन्हां दिसूं लागला. एका बाजूस राजकीय आंदोलनांतहि स्त्रीस स्थान प्राप्त झालें. परंतु तिची खरी कर्तबगारी 'गृहदीप्ति' म्हणून आहे, हें सत्य पटूं लागलें. महात्माजींच्या चरित्रांत याची कांहीं जाणीव दिसते.

महात्माजींनीं या देशांत जें तत्त्वज्ञान उभें केलें तें मूलतः येथेंच निर्माण झालेलें आहे. “**अहिंसासत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम्। दयाभूतेष्वलोलुप्त्वं**” या सर्व गुणांची जोपासना येथेंच झालेली आहे. ग्रामीण जीवनाच्या व जनतेच्या दारिद्र्याची दखल घेऊनच स्वदेशीचा पुरस्कार महात्माजींनीं केलेला दिसतो. साधुत्व व राजकारणनिपुणता या व्यक्तींत एकत्रित झाल्यानें देशांतील निरनिराळ्या पंथांचे, मतांचे व जातींचे लोक एकत्र आणून, त्यांना कार्याची दिशा देणारा हा पुरुष स्वतंत्र बुद्धीचा होता. साधी राहणी व उच्च विचारसरणी प्रसृत करतांना पाश्चिमात्य दोषांच्या अंधानुकरणास कांहीं विरोध उत्पन्न करण्याचा प्रयत्न या कालांत झाला हें खरें. परंतु हा फरक मूलग्राही ठरला नाहीं. स्वातंत्र्यानंतर महात्माजींची शिकवण नाहींशी होत चालली. सत्ता व संपत्ति यांबरोबर सहज उत्पन्न होणारे मूर्खपणा, आंतरराष्ट्रीय दडपण आणि मूलभूत प्रकृतींतील दुर्गुण यांनीं स्वातंत्र्योत्तर कालांत उचल खाल्ली. त्यागाची अहमहमिका संपून भोगाची सुरू झाली. ध्येयनिष्ठ दृष्टि जाऊन संधिसाधूपणा आला. सत्तेचा अभिलाष वाढून, स्वतःचा संकुचित स्वार्थ पुरविण्याकडे दृष्टि वळली. सुरुवातीची निःस्पृह, निःस्वार्थी आणि कार्यतत्पर मंडळी मागें पडून वरपांगी मिरविणाऱ्या देशभक्तांची रेलचेल झाली. याबरोबरच महत्त्वाची गोष्ट ही कीं, युरोपियन संस्कृतीनें दिलेल्या पूर्वग्रहदूषित चश्म्यांतूनच भारताच्या सर्व स्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोन तसाच राहिला. परप्रत्ययनेयबुद्धि सर्व क्षेत्रांत सारखी दृष्टोत्पत्तीस येते. उद्योगधंदे, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, राजकारण इत्यादि विषयांपासून विवाह, कुटुंब व स्त्री या सर्वांच्या ठिकाणीं स्वातंत्र्योत्तरहि भारतियांचा दृष्टिकोन भारतीय संस्कृतीच्या पूर्वग्रहविरहित अशा अभ्यासांतून निष्पन्न झालेला नसून, तो ब्रिटिशांनीं दिलेल्या दृष्टींतूनच उत्पन्न झालेला दिसतो. ‘भारतीय’ या नांवाखालीं ‘बोधचिन्हें’ बदललीं, भाषा बदलण्याचा प्रयत्न चालू आहे. ब्रिटिशांचे पुतळे काढून भारतियांचे बसविणें चालू आहे. पत्रव्यवहारांतील मायने बदलले, नवे स्वातंत्र्योत्सव चालू झाले, प्रांतरचनेचा फेरविचार सुरू झाला, परंतु भारताची पांचवार्षिक योजना करतांना हा मुख्यतः शेतीप्रधान देश आहे, यांत अन्नाचा तुटवडा पडूं नये म्हणून प्रथम कालवे ( Irrigation ) व खतांची निर्मिति (Fertilisers ) यांवर भर देणें महत्त्वाचें आहे ही गोष्ट कांहीं लक्षांत आली नाहीं. सर्व शुचित्वांत अर्थशौच प्रथम महत्त्वाचें आहे हें भारतीय सामाजिक तत्त्व लक्षांत

न घेतल्यामुळें निस्पृहता व निःस्वार्थ बुद्धि यांची जोपासना न होतां सर्व अर्थसंकल्प फिके पडले. आज दहा वर्षांच्या आंत या देशांतील बुद्धिमान् लोक राजकारणांतून निवृत्त होत आहेत. परदेशांची आर्थिक गुलामगिरी पदरांत येत आहे. अन्नहि पुरेसें उत्पन्न होऊं शकत नाहीं. कुटुंब व गृहसौख्य यांवर अत्यंत महत्त्वाचा परिणाम ' अर्थ ' पुरुषार्थाचा असतो. " **कस्यार्थधर्मौ वद पीडयामि।** " अर्थ पुरुषार्थ नाहींसा झाला तर काम-पुरुषार्थ उत्पन्न होण्याचा संभवच नाहींसा होतो. म्हणून समाजाची व राष्ट्राची आर्थिक घडण सर्वांत महत्त्वाची ठरते. यांत अर्थशौच हा आचार लुप्त झाल्यास ही घडण बदलते. कुंपण शेत खाऊं लागल्यास शेतास त्राता राहात नाहीं. भारतियांच्या मूल्यविचारांत वित्त हें शेवटचें मान्यस्थान ठेवलें असून विद्या प्रथम ठेवली आहे. अशा मूल्यविचारांत वित्ताची स्पर्धा कमी होते व विद्येची जास्त होते. अर्थप्रधान मूल्यविचार उत्पन्न केल्यास अर्थशौच ठेवण्यास विशेष कष्ट पडतात. आपण एकदम ' अमेरिका ' उत्पन्न करण्याचा थाट रचला. या सर्व गोष्टींमुळें राष्ट्रीय जीवनावर विपरीत परिणाम झाले.

**कामवासना आणि सद्यःपरिस्थिति :** फक्त कुटुंबसंस्थेचा विचार करतां, कामपूर्तीचें एकमेव समाजांतर्गत साधन जें विवाह तें सद्यःकालीन संस्कृतींत सर्वसामान्य व्यक्तीस दुरावत चाललेलें दिसतें. यास कारणें व्यक्तिगत व सामाजिक अशीं दोन्ही प्रकारांचीं असलीं, तरी सामाजिक कारणें जास्त महत्त्वाचीं दिसतात. त्यांत मध्यम वर्गातील आर्थिक ओढाताण सद्यःपरिस्थितींत विशेष नजरेसमोर येते. याच वर्गातून निरनिराळ्या क्षेत्रांत कर्तृत्ववान् मंडळी निर्माण झालेली दिसतात. वाढत्या जीवन-मानामुळें पुरेसें मिळण्यासहि या वर्गातील मंडळींना आयुष्याचीं बरींच वर्षे घालविणें भाग पडतें. विवाहाचें वय त्यामुळें आपोआपच वाढत जातें. प्रौढ वयांत निसर्गानें जी शरीरांतर्गत चेतना परमेश्वरानें निर्माण केली तिची स्थिति वाढत्या विवाह–वयामुळें जास्तच कठिण होत चालली आहे असें दिसेल. वाढत्या वयोमर्यादेवर साहजिकच व्यक्तिमत्त्वाची घडण एकमेकांच्या सान्निध्यांत न घडल्यानें, किंवा प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र तऱ्हेनें घडत असल्यानें विवाह जुळणें व टिकणें कठिण होऊन बसलें आहे. व्यक्तिमत्त्वाची घडण स्वतंत्र तऱ्हेनें वयाचीं बरींच वर्षें होत असल्यानें प्रत्येक व्यक्तीच्या आशा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, आवडीनिवडी, दुसऱ्या

व्यक्तीसंबंधीं अपेक्षा आणि स्वतःसंबंधींच्या अवास्तव कल्पना या सारख्या वाढतच जातात.

शिवाय अर्थप्रधान संस्कृतींत आर्थिक स्पर्धा किती हीनात्वास पोहोंचत असेल, याची वेगळी कल्पना द्यावयास पाहिजे असें नाहीं. मग 'दुसऱ्याची गरज ती आपली संधि' अशी कल्पना उदयास येते. गरजवंत मुलीचा बाप विवाहाच्या रंगणांत उतरला म्हणजे मग त्याची हुंड्यांत फजीती होते. आर्थिक स्वातंत्र्यानें नटलेली प्रौढ कुमारिका या रंगणांत उतरली कीं, गरीब यजमानांची फजीती होते. श्रीमंत गरिबांस पिळतात; मालक मजुरांस झिजवतात; सोनार सोनें चोरतो; शिंपी कापड चोरतो; व्यापारी 'ब्लॅक मॉर्केट' करतात. ज्याच्या हातीं ससा तो पारधी; त्यांत माणुसकीचा भाग राहात नाहीं. सध्यां सर्व देशभर चाललेल्या कंत्राटें व इमारती यांच्या अहमहमिकेचें इंगित कदाचित् यांतच सांपडेल. सत्ते-करितां चाललेल्या झगड्याचा मूलभूत पाया हाच असेल. खोट्या त्यागाच्या अहमहमिकेचीहि हीच गुरुकिल्ली सांपडेल. आर्थिक समाजांत ढोंगी लोकांचा हा बाजार फार मोठा असतो. एका बाजूस सत्य आणि प्रामाणिकपणा यांच्या फार मोठ्या गप्पा हेच लोक मारतात.

या सर्व समाजासच मुक्तेश्वरांनीं 'राक्षससमाज' असें संबोधिलें आहे. लंकेचें वर्णन करतांना त्यांनीं एवंगुणविशिष्ट लंकेंतील राक्षसांचें मोठें बहारदार वर्णन करून अशा समाजांत "सीता ही चित्शक्ति सांपडावी कशी?" अशी पृच्छा केलेली आढळते. हें रूपक मुक्तेश्वरांनीं मोठें बहारीनें रंगविलें आहे. सारांश, आर्थिक स्पर्धेमध्यें व्यक्तीच्या कामपुरुषार्थाचें नुकसान होतें. एकंदर आर्थिक विघटनेमुळें कामपुरुषार्थावरील परिणाम खालीलप्रमाणें मांडतां येतील.

(१) विवाहाची वयोमर्यादा जीवनमानाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर आपो-आपच वाढत जाते.

(२) आर्थिक स्पर्धेमुळें विवाह जमण्यांत अडचणींची भर पडते.

(३) विवाहांतर्गत सुखांत कारणीभूत असलेल्या मुख्य गुणांकडे अर्थ-प्रधान मूल्यामुळें दुर्लक्ष होतें.

(४) प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा व अपेक्षा फार अवास्तव झाल्यानें विवाहांत आणखी अडचणी उत्पन्न होतात.

( ५ ) *स्त्रीहि या आर्थिक स्पर्धेत भाग घेऊं लागल्यानें* विवाहास स्त्री-पुरुषांचे जे एकमेकांस पोषक असे दृष्टिकोन लागतात त्यांऐवजीं स्पर्धेचे दृष्टिकोन येतात.

( ६ ) व्यक्तीमत्त्वाची एकजूट कठिण होते.

( ७ ) वाढलेल्या जीवनमानाच्या कल्पना टिकविण्यास मुलांची अडचण वाटत असल्यानें मुलें न व्हावीं किंवा फार कमी व्हावीं याकडे लक्ष असतें. (अर्थात् येथें कुटुंबांत किती मुलें पाहिजेत हें ठरविण्याच्या विरुद्ध आम्हीं नाहीं.) ही वृत्ति स्वतःच्या ऐषआरामांत व्यत्यय येतो म्हणून जास्त बोकाळूं देणें योग्य नव्हे एवढेंच नजरेस आणणें आहे.

( ८ ) मनुष्याचीं उच्च ध्येयें व भावना यांना हीं सर्व आर्थिक मूल्यें घातुक असून त्यामुळें मनुष्यप्राणी जास्त जडवादी होऊं पाहात आहे.

अशा परिस्थितींत अविवाहित स्त्रियांची संख्या जास्त होते. डळमळीत अर्थव्यवस्था व महत्त्वाकांक्षांची वाढ यांमुळें पुरुषांचें विवाहवय आपोआपच वाढतें. या अपरिहार्य कारणांनीं वाढीस लागलेलें पुरुषांचें विवाहवय आणि अनिवार्य कारणांनीं पुष्कळ स्त्रियांच्या नशिबीं आलेली प्रौढत्वापर्यंत कौमार्यावस्था यांमुळें ओढूनताणून ब्रह्मचर्य पाळण्याची सक्ति बऱ्याच मंडळींवर होते. याशिवाय मागें वर्णन केल्याप्रमाणें कामोद्दीपनाचीं सर्व साधनें अहर्निश प्रत्येकाच्या आटोक्यांत दिल्यानें व ब्रह्मचर्याश्रमाची खरी उपयुक्तता कोणासच पटवून देण्याची तसदी शिक्षणांत कोठेंच घेतलेली नसल्यानें, या सक्तीचें ब्रह्मचर्य पाळणाऱ्या स्त्री-पुरुषांवर मोठा अनिष्ट परिणाम घडण्याची शक्यता उत्पन्न होते. मागें दिग्दर्शित केल्याप्रमाणें अनुद्दीप्त सुप्त कामवासनेचें नियंत्रण व उद्दीप्त कामवासनेचें नियंत्रण यांत फरक आहे. एका बाजूस कामोद्दीपन व दुसऱ्या बाजूस सक्तीनें न पटणारें ब्रह्मचर्य लादून घेणें अपरिहार्य होत असल्यानें मनाची ओढाताण व त्याचे शारीरिक परिणाम अनिवार्य होऊन बसलेले दिसतात. अशा परिस्थतींत या सक्तीच्या ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम कोणावर किती होतात हें सांगणें दुरापास्त आहे. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरमनांच्या ठेवणीप्रमाणें हे परिणाम शून्यापासून शंभरापर्यंत कितीहि होऊं शकतात. जशी व्यक्ती-व्यक्तीची कामवासना सारखी नसते, त्याचप्रमाणें परिणाम फार भिन्न असतात. पूर्वीं ख्रिश्चन मिशनरी लोक तीव्रतेनें ब्रह्मचर्याचें पालन करण्याकरितां अत्यंत कठोर तपश्चर्या करीत व एकाकी, नीरस जीवनक्रम आक्रमीत असत. त्यांनाहि काम-

वासनेइतका कोणत्याहि मानसिक वासनेचा त्रास झाला नाहीं व तो त्यांना जन्मभर होत असे असा हॅव्हलॉक एलिस यांनीं निर्वाळा दिलेला आहे. आपल्याकडेहि फार मोठ्या ऋषींच्या तपश्चर्या याच एका वासनेच्या योगानें भंग पावल्या असल्याच्या कथा सर्वांच्या परिचयाच्या आहेत. याबाबत बलवत्तर काम-वासनेच्या मंडळींना तर फारच त्रास होत असतो. त्यांत त्या मंडळींना कांहीं धर्मभावना किंवा ध्येयवाद असला तर ठीक. कांही प्रमाणांत या दोन श्रद्धा त्यांना काम-वासनेचें नियंत्रण करून ती शक्ति दुसरीकडे वापरण्यास उपयोगाच्या ठरतात. पण सध्यांच्या युगांत धर्मश्रद्धा व ध्येयश्रद्धा या दोन्ही झपाट्यानें लयास जात आहेत. सर्व ठिकाणीं अर्थवाद पुढें येत आहे. अशा परिस्थितींत या वासनांस सक्तीनें घातलेलें नियंत्रण केवळ चोरट्या व्यापारास प्रवृत्त करण्यापलीकडे कोणत्याहि उपयोगास पडत नाहीं. एका बाजूस समाजाची भीति व दुसऱ्या बाजूस बलवत्तर कामवासनेचें नियंत्रण करणें अपरिहार्य, अशा परिस्थितींत या मंडळींची स्थिति खरोखर केवीलवाणी होते. मनावर फार ताण पडतो आणि मग निरनिराळे कामवासनेचे अपघात दृष्टीस पडतात. सध्यांच्या संस्कृतीची ही एक मोठी समस्या आहे. यांतून पुष्कळ शारीरिक व मानसिक दुष्परिणाम व त्यांबरोबर चोरट्या व्यापाराची वाढ आणि त्यामुळें सामाजिक दुःस्थिति वाढत जात असते. पण या सर्वांचा विचार करण्यास सवड कोठें आहे ! मनुष्याच्या मनाच्या या मूळ प्रवृत्तीचें समाधान कसें होईल, याचा फारसा विचार न करतां ‘बदल म्हणजे प्रगति’, ‘सर्व गतिमान् आहे तेव्हां बदल नसेल तर प्रगति कशी होणार ?’ इत्यादि कल्पना धरून ‘प्रगति’ या भरघोस नांवाखालीं कांहींतरी नवें करून दाखविण्याची सारखी गडबड चालू आहे. आमच्या देशांत सर्व समाज एकजिनसी नाहीं. वरील प्रकारचें वर्णन मुख्यतः उच्चवर्णियांना लागू पडेल. कारण पाश्चिमात्य संस्कृतीचा फैलाव प्रथम त्यांच्यांत झाला. महत्त्वाकांक्षा, कर्तृत्वशक्ति, बुद्धिची जोपासनाहि याच वर्गांत होत असे. परंतु समाजाच्या खालच्या थरांत अजूनहि कित्येक ठिकाणीं परंपरा व जुने संस्कार चालू आहेत. शिवाय नवीन अर्थव्यवस्थेंत मध्यम वर्गाची जरी पिळवणूक होत असली, तरी वैश्यशूद्र या दोन्ही वर्णांची आर्थिक स्थिति सुधारत आहे. तेव्हां त्यांच्यांत उच्चवर्णियांचे कौटुंबिक बदल जरा जपून व काळजीपूर्वक केले, तर अशास्त्रीय रूढीमुळें उत्पन्न झालेले दोष नाहींसे करतां येऊन प्राचीन भारतीय संस्कृतीचे सद्गुण कायम

राखण्याची शक्यता आहे. शिवाय 'पुढल्यास ठेंच, मागचा शहाणा' या म्हणी-प्रमाणें, उच्चवर्णियांत घडलेल्या चुका त्यांना दुरुस्त करतां येतील.

**पाश्चिमात्यांचें वैवाहिक अपयश :** यशस्वी विवाहाचीं साधनें म्हणून सुप्रजा, उत्तम रति व व्यक्तिमत्त्वाचें एकत्व यांसंबंधीं पाश्चिमात्य व पौर्वात्य विचारी मंडळींत बरीच एकवाक्यता आहे. डॉ. एलिस यांचें याबाबतचें मत तिसऱ्या प्रकरणांत पाहा. वैवाहिक यश हा 'बहुकारणयोग' ( Polycausal effect ) असून या परीक्षेंतील निर-निराळ्या विषयांत जेवढें यश प्राप्त करून घेतां येईल, तितकें एकंदर यश वाढणार आहे. उत्तम रति व सुप्रजा यांबाबत पाश्चिमात्यांच्या स्थितीवरून वैवाहिक यशाला पाश्चिमात्य परिस्थिति मोठी पोषक आहे असें नाहीं. कालाच्या ओघांत जे बदल घडले ते स्त्रीपुरुषांचें व्यक्तिस्वातंत्र्य व भौतिक शास्त्रप्रगतीचा ऐहिक ऐषआरामाकडे उपयोग, येवढ्याच दृष्टिकोनांतून घडलेले दिसतात.

पाश्चिमात्य देशांत कोणत्याहि वयांतील विवाहित स्त्रियांची प्रजोत्पादनक्षमता पूर्वींइतकी चांगली नाहीं. मग बाकीचीं अवांतर कारणें कांहींहि असोत. ही गोष्ट जर सत्य असेल, तर या समाजांची जीवनशक्ति ऱ्हासाप्रत चालली आहे असा त्याचा अर्थ होऊं शकेल. ज्या कालांत इंग्लंडदेशांतील लोक समुद्रपर्यटन करून नवे देश शोधून काढून पृथ्वीच्या पाठीवर वसाहतीस मायदेशापासून हजारों मैल दूर जात, तेथें भोगाव्या लागतील त्या हालअपेष्टा सहन करून साम्राज्य करीत, प्रत्येक शास्त्रांत व शस्त्रांत निष्णात शास्त्रज्ञ व योद्धे तयार होत, उत्तम राज्यशासक व राजकारणी मुत्सद्दी होत, त्या काळीं इंग्लंड देशाची जननसंख्या अशा केविलवाण्या दशेंत नव्हती. अर्थात् यास दुसऱ्याहि गोष्टी कारण असतील. नुसती जननसंख्या पुष्कळ असली म्हणजे भरभराट होते असें नाहीं. परंतु घटणारी लोकसंख्या हेंहि भरभराटीचें द्योतक नाहीं, येवढें खरें.

ही घटणारी लोकसंख्येची गोष्ट पाश्चिमात्य विचारवंतांच्या लक्षांत आल्या-वर पुन्हां ती वाढीस लागावी याकरितां पुष्कळ खटपटी झाल्या. त्या खटपटींत विवाहास मदत, प्रत्येक मुलामागें कांहीं आर्थिक मदत इत्यादि प्रकार येतात, परंतु हे सर्व प्रयत्न करूनसुद्धां त्याची फलनिष्पत्ति फार झाली नाहीं, एवढें येथें नमूद केलें म्हणजे पुरे. डॉ. कार सॉंडर्स लिहितात,

" The most that can be said about the result of the attempt to raise the birth-rate in France, Belgium and Italy upto date, is that the rate may have fallen less fast than it would otherwise have done. " (Carr Saunders. p. 241)

या देशांतून जननसंख्या घटण्याचें जें प्रमाण राहिलें असतें त्यापेक्षां या प्रयत्नांनीं तें थोडें कमी झालें एवढेंच. लोकसंख्या कमीजास्त करणें हें एखाद्या यंत्रांतील उष्णता कमीअधिक करण्याइतकें सोपें व यांत्रिक ( Mechanical ) नाहीं. त्यांत जीवनमान, लोकांच्या इच्छा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, आर्थिक स्थिति, समाजाची मूलभूत जीवनशक्ति इत्यादि बरेच गुंतागुंतीचे प्रश्न येतात.

साधी राहणी, उच्च विचारसरणी व संततीची विपुलता हीं मूल्यें जुन्या समाजांत पाश्चिमात्य व पौर्वात्य देशांत प्रसृत होतीं. यांत कर्तृत्वशक्तीचा व जीवन-शक्तीचा जास्त चांगला विकास होण्याची किल्ली आहे किंवा काय असा एक संशय हल्लीं विचारवंतांस येऊं लागला आहे. प्रो. कार्ल पिअरसन म्हणतात कीं, जुन्या इंग्लंडमधील साधी राहणी, उच्च विचारसरणी व संततीचें वैपुल्य हींच मूल्यें राष्ट्रोत्कर्षाच्या दृष्टीनें चांगलीं दिसतात. आर्थिक ओढाताणीच्या चालू काळांत संततीची विपुलता हें मूल्य यापुढें कोणत्याहि देशांत सांगितलें जाईल असें दिसत नाहीं. परंतु साधी राहणी टिकवतां आली, तर जीवनमानाचे प्रश्न जास्त सुटसुटीत होऊन, पुढच्या पिढीकडे जास्त लक्ष पुरवितां येणें कदाचित् शक्य होईल. एक गोष्ट खरी कीं, पुढच्या पिढीचा सुप्रजेच्या दृष्टीनें जास्त विचार केल्याशिवाय राष्ट्राचा ऱ्हास टाळतां येणें कठिण आहे. ' थोडीं व चांगलीं मुलें ' ही घोषणा उत्तम असली, तरी निसर्गांत ही शक्यता फारशी दिसत नाहीं. या दृष्टीनें बहुप्रज व अल्पप्रज कुटुंबांचा अभ्यास मनोरंजक होईल.

व्यक्तिमत्त्वाचें एकत्रीकरण ( Personality adjustment ) या नांवाखालीं बराच विषय पूर्वी आणला आहे. व्यक्तिमत्त्वाबाबत पाश्चिमात्य पर्याय स्त्रीपुरुषांनीं एकमेकांशीं जमवून घ्यावें असा आहे. आर्थिक व सामाजिक व्यक्तिस्वातंत्र्याच्या कालांत हाच पर्याय सुचविणें शक्य आहे. प्रथम पर्याय अंमलांत येणें दुरापास्तच आहे. एकमेकांनीं समजून जमवून घेणें ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं. विशेषतः फार बुद्धिमान् पुरुष व सामान्य बुद्धीची स्त्री एकत्र आल्यास जडच आहे. दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तींचे हक्क व कर्तव्यें यांची जाणीव देऊन एकत्रीकरण करण्याची

खटपट सफल झाल्यास सोन्याहून पिवळें. परंतु हा पर्याय त्रोटक शास्त्राच्या जाणिवेंतून आणि व्यक्तिमत्त्वाच्या अवास्तव वाढींतून उत्पन्न होणारा अप्रगल्भ बुद्धिवाद लक्षांत घेतां कठिण आहे. स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याबरोबर, सामाजिक विवेचनाबरोबर विवाहाची वयोमर्यादा वाढीस लागल्याबरोबर आणि स्त्रीचें वाढलेलें व्यक्तीमत्त्व लक्षांत घेतां दुसरा काय सल्ला देणार ? त्यामुळें दोन व्यक्तींनीं हें व्यक्तिमत्त्व समजुतीनें समजून घ्यावें असा सल्ला देणें अपरिहार्य आहे आणि बुद्धिवादास धरूनहि आहे. जें कांहीं व्यक्तिगत बुद्धीचें भांडवल, तें विवाहाच्या सर्व प्रश्नांवर मत देण्यास समर्थ आहे असें मानतात. साधारण ज्या वयांत विवाह होतात आणि मतदानाचा हक्क येतो त्या वयांत जें शिक्षण शाळा-कॉलेजें इत्यादि सरकारी, बिनसरकारी आणि विश्वविद्यालयीन संस्थांना धरून मिळतें, तें लक्षांत घेतां, या पुस्तकांत मागें वर्णन केलेल्या गोष्टी समजण्याची पात्रता काय असते हें वाचकांनींच ठरवावें. परंपरेचे कांहीं दृढ संस्कार नसल्यास अप्रगल्भ बुद्धिवाद येणारच. ‘ भावनावश प्रेम हाच विवाहाचा खरा पाया आहे. ’, ‘ संततीचीं जरुरी काय ? ’, ‘ कांहीं वर्षे तरी मजा करूं या. ’, ‘ घरापेक्षां खाणावळीचा डबा आणणेंच दोघांच्या दृष्टीनें सुटसुटीत. ’, ‘ वृद्ध माणसें म्हणजे घरांतील अडगळ होय. ’, ‘ स्त्री ही पुरुषाच्या पराक्रमांतील एक धोंड आहे. ’, ‘ पुरुषानेंहि स्त्रीस मदत करण्याकरितां घरकाम करण्यास हरकत असूं नये. ’, ‘ बाहेरून येण्यास उशीर होणें म्हणजे पुरुषास कांहींतरी नाद लागल्याचें लक्षण आहे. ’, ‘ दोघांच्या वयांत अंतर असण्याचें कारणच नाहीं. ’, ‘ परमेश्वर हें एक थोतांड आहे. ’, ‘ शास्त्रानें काय करतां येणार नाहीं ? ’, ‘ पाश्चिमात्य देश ॲटोमिक रिसर्च करतात तेव्हां त्यांच्या देशांतील सर्वच गोष्टी पुढारलेल्या अतएव अनुकरणीय. ’, ‘ नाट्य, नृत्य, संगीत आणि खेळ या गोष्टी अभ्यासाइतक्याच किंबहुना जास्त महत्त्वाच्या असतात. ’, ‘ धर्म इत्यादि जुन्या लोकांच्या वेडगळ कल्पना होत. ’, ‘ आईबापांनीं आपल्याकरितां काय केलें ? ’, ‘ त्यांच्या मजेंतच आमची उत्पत्ति आहे. ’, ‘ दोन भिन्न वर्ण व जातीच्या व्यक्तींचें लग्न म्हणजे क्रॉस-ब्रीडिंग. ’, ‘ भावनांना शिक्षणाची जरुरी नाहीं. ’, ‘ उत्क्रांति म्हणजे माकडांतून जन्म झाला. ’, ‘ लैंगिक भूक भागविणें हें अन्नाची भूक कोठल्याहि हॉटेलांत भागविण्यासारखें सहजच आहे. ’, ‘ ज्योतिषशास्त्र हें शास्त्रच नव्हे. ’, ‘ संततिनियमनाचीं उपकरणें हा मोठा शोध आहे. ’ अशा अनेकानेक आणि अचाट ‘ बुद्धिगम्य ’ कल्पना किती म्हणून सांगाव्या ? या सर्व बुद्धिगम्य कल्पनांना प्रत्यक्षांत अधिकार

आणि आचारांत वाव देणें हाच व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ आहे काय? तात्पर्य, या वयांत सध्यांच्या शिक्षणानें जरूर तें एतद्विषयक निश्चित मत बनविण्याचें सामर्थ्य येणार नाहीं. याप्रमाणें सध्यांच्या शिक्षणांत ज्या कांहीं वाङ्मय व शास्त्र या नांवाखालीं एखादें नाटक, कविता आणि कांहीं वर्णनात्मक रसायन, पदार्थविज्ञान वा प्राणिशास्त्र यांचीं पुस्तकें, बाहेर जे राजकीय आणि सामाजिक प्रयोग चाललेले असतात त्यांच्या जाहिरातीचें किंवा प्रचारी थाटाचें वाङ्मय, भाषणें आणि लेखन या सर्व अफाट सांठ्यावर प्रत्येक नव्या व्यक्तीचें ‘ व्यक्तिमत्त्व ’ आणि त्याला धरून ज्या कल्पना, कला वगैरे असतात ते निर्माण व्हावयाचें. अशा एका व्यक्तिमत्त्वाची दुसऱ्याशीं गांठ पडावयाची आणि मग ‘ संसार ’ रंगूं लागावयाचा. मग ‘ मतामतांचा गलबला, कोणी न विचारी कोणाला । ’ अशी अवस्था प्राप्त झाल्यास नवल काय? वाढलेलें व्यक्तिमत्त्व हें पुष्कळ वेळां एकमेकांशीं जुळवणूक होण्यास जड जाणारें आहे हें सर्वांस मान्य आहे. वयाच्या वाढीबरोबर तें वाढणें अपरिहार्यच आहे.

“ As persons grow older, their habits tend to set like concrete, they become rigid, lose their facibility and adaptability. ”
( Bowman p. 149. )

सध्यांच्या शिक्षणांत याबाबत विचार तर नाहींच उलट अविचारच आहे. उदाहरणार्थ, स्त्री व पुरुष हे मुख्यतः एकमेकांशीं सर्व गोष्टींत व सर्व प्रसंगांत स्पर्धा करणारे प्राणीवर्ग नव्हेत. ते एकमेकांशीं सहकार्य करतील तरच कुटुंब निर्माण होईल. सध्यांच्या शिक्षणपद्धतींत स्पर्धा हाच गुण शिकविला जातो. तोच सर्व ठिकाणीं मुद्दाम वाढविला जातो. ही गोष्ट सुखी विवाहाच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट आहे. याचा परिणाम स्त्रीमनावर जेवढा जास्त, तितकें तें व्यक्तिमत्त्व सुखी विवाहाच्या दृष्टीनें अनुपकारक, किंबहुना हानिकारक ठरतें. त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे शिक्षित स्त्रिया गृहिणीपदास नालायक ठरण्याचा संभव वाढतो. अशा संसारांतून व्यक्तिमत्त्वविषयक मतभेद अनंत असतात. हे फार वाढत गेल्यास मानसिक फाटाफूट, त्यापासून कित्येक वेळां मनसाधिष्ठित संततिहीनत्व, पुरुषांत नपुंसकत्व आणि शेवटीं या सर्व अडचणींमुळें घटस्फोट, या गोष्टी घडतांना दिसतात.

वर वर्णन केल्याप्रमाणें अपुऱ्या बुद्धीस ' बुद्धिगम्य ' म्हणून छाप मारल्यावर समाजांत ' व्यक्ति तितक्या प्रकृति ' ही म्हण प्रत्यक्षांत येऊं लागते. कोणतीहि गोष्ट स्वभाववैचित्र्यानुरूप, व्यक्तिगत प्रकृत्यनुरूप समाजांत घडूं लागते. त्यावर ' व्यक्ति-स्वातंत्र्य ' या नांवाखालीं कसलेंहि दडपण राहात नाहीं. हित काय आणि अहित काय याचा निवाडा करण्यास परंपरेचें ( Example ) साधन नाहींसें होत आहे व स्वतःची बुद्धि अपुरी आहे, हें समजत नाहीं. अशा परिस्थितींत भावनांचे अनेक खेळ पाहावयास सांपडतात, त्यांसच नवीन प्रामाण्य समजण्यांत येतें आणि जें घडेल तें घडेल, त्यास अगोदर शिक्षण नाहीं, परंपरेचा दाखला नाहीं, योजना कसलीच नाहीं आणि केवळ ' चान्स ' म्हणून चांगलेंहि होईल किंवा वाईटहि होईल. खोट्या बुद्धिवादाच्या कल्पनेस चिकटून राहिल्यानंतर शेवटीं ज्या वेळीं झालेला तोटा दुरुस्त करतां येत नाहीं, अशा वेळीं बरोबर समजून आलें, तरी त्यामुळें संसाराचा पडलेला गाडा, मोडलेलीं मनें आणि गेलेलें वय व त्या वयाची गंमत परत आणणें अशक्य असतें; म्हणून हा व्यक्तिगणिक प्रयोग अयशस्वी झाल्यास तो फार दुःखाचा आणि पश्चात्तापाचा झाल्याशिवाय राहात नाहीं.

वरील सर्व चर्चेवरून विवाह व कुटुंब यांत विसाव्या शतकांत कांहीं मूलभूत बदल पाश्चिमात्य समाजांत झाले आहेत आणि हे बदल करण्यांत शेवटीं काय साधावयाचें आहे, विवाहांतर्गत सौख्य कशावर नेमकें अवलंबून आहे, त्याकरितां स्त्रीपुरुषमनांवर कसे संस्कार करावयास हवेत, राष्ट्रांचे उत्कर्ष साधावयास सुप्रजेची वंशपरंपरागत जोपासना कशी करावी, इत्यादि सर्व बाबतींत विचारापलीकडे प्रगति नाहीं. जुन्या पाश्चिमात्य समाजांत जीं साधारण मूल्यें होतीं तीं आपल्यापेक्षां फार भिन्न होतीं असें नाहीं. त्यानंतर सारखे प्रयोग, नवीन कल्पना लढवीत लढवीत, आज ज्या दशेस ते समाज आले आहेत, तीच नेमकी आपली दशा त्यांच्या संगतीनें झाल्यास फारशी समाधानकारक आहे असें नाहीं.

पाश्चिमात्य समाजाच्या निर्बुद्ध अनुकरणानें आपण कांहीं सुखाच्या दिशेनें पावलें टाकीत आहोंत असा आभास निर्माण झाला असून, वरील चर्चेवरून हे बदल म्हणजे यशस्वी विवाहाच्या दिशेनें प्रगति नाहीं हें स्पष्ट दिसून येईल. पांढरपेशा, शिक्षित आणि शहरी, विशेषतः ब्राह्मणसमाजांतून आपल्या परंपरा टाकण्याची घाई दिसत आहे. या समाजांतलि थरांचें पाश्चिमात्यीकरण असेंच प्रगत झाल्यास त्याचें वैवाहिक

यश दूर पळून त्यांतून त्याचा वंशनाश होण्याची भरपूर शक्यता आहे. परंतु आमच्या देशांत समाजांतील निरनिराळ्या थरांत हें पाश्चिमात्यीकरण सारखें नाहीं. खालच्या थरांतून कांहीं परंपरा कायम टिकाव धरून आहेत आणि या परंपरांचा बुद्धिगम्य विचार करून त्यांतील घातुक रूढी तेवढ्याच नाहींशा करून यशस्वी विवाह व सुप्रजा यांच्या दृष्टीनें पाश्चिमात्य संस्कृतीचे खाचखळगे लक्षांत घेऊन जर सुधारणा केली तर आपलें नुकसान टळणार आहे आणि स्वतंत्र राष्ट्रानें एवढाहि स्वतंत्र विचार न दाखविला तर पुढल्याप्रमाणेंच मागच्याची दशा ठेवलेलीच आहे.

---

अनुक्रम ... वि. ...
क्रमांक ... नों: दि: ...

# प्रकरण ९ वें

## उपसंहार

**पाश्चिमात्यांचे सद्गुण — शास्त्रपद्धति व वर्गीकरण — निरनिराळ्या शास्त्रांची प्रगति — पाश्चिमात्यांचीं अनुमानें कांहीं वेळां अग्राह्य — श्रद्धेचें स्थान — भारतीय संस्कृतीचें सातत्य — बुद्धिगम्यतेचा अर्थ — ध्येय व आचार यांतील सनातन तफावत — स्त्रीपुरुषसमानता — सद्यःस्थितींत तडजोड — वैचारिक सुधारणा — विवाहपूर्व आचार — विवाहांतर्गत विचार — कांहीं महत्त्वाच्या सूचना.**

**पाश्चिमात्यांचे सद्गुण :** मागच्या सर्व चर्चेवरून प्रस्तुत लेखकास पाश्चिमात्य संस्कृतीबद्दल फक्त तिरस्कार आहे असा ग्रह होण्याचा संभव आहे. परंतु पाश्चिमात्यांच्या सद्गुणांबद्दल आम्हांस भरपूर आदर आहे. दोन शतकांपूर्वी इंग्लंडमध्यें फारसें शिक्षणहि नव्हतें. ॲडिसनच्या स्पेक्टेटरनें एकंदर तेथील लोकांत वाचनाचा प्रसार झाला. मिल्टनसारखा कवि त्याच्या आयुष्यांत अज्ञात होता. पुढें ३०–४० वर्षांनीं त्याची कीर्ति पसरली. जॉनसनसारखे ग्रंथकार त्यांच्या आयुष्यांत दारिद्र्यांतच राहिले. राजा व प्रजा यांचा झगडाहि चालूच होता. लांचलुचपतहि होती. परंतु या परिस्थितींतून कांहीं पिढ्यांत हे लोक वर आले, तेव्हां त्यांनीं कांहीं सद्गुणांची जोपासना केली नाहीं असें कोण म्हणेल ?

पाश्चिमात्यांतहि अर्थशौचावर फार मोठा भर दिला गेला. त्याचा दृश्य परिणाम त्यांच्या समाजांत सर्व आचारांवर दृष्टीस पडतो. इंग्लंडमध्यें काळा बाजार,

आदि अनिष्ट मार्गांनीं पैसे मिळवून झालेल्या श्रीमंतांस समाजांत फारसें मान्य-स्थान नाहीं. उद्योगधंदे व व्यापार यांतहि कांहीं मूलभूत प्रामाणिकपणा सर्वत्र आहे. वर्तमानपत्र विकण्यासहि मनुष्य लागत नाहीं. प्रवासांत हरवलेली वस्तु परत मिळण्याची शक्यता जास्त आहे. हिंदुस्थानांत मागच्या दीडशें वर्षांत कित्येक ब्रिटिश मंडळी राज्यशासनाप्रीत्यर्थ आली असतील. इकडे आल्यावर त्यांतील कांहीं मंडळींनीं स्वतंत्र सुभे थाटले असते, तर ब्रिटिश संस्थानिक हिंदुस्थानांत दिसले असते. जो माल दाखवावयाचा तोच द्यावयाचा ही प्रथा व्यापाऱ्यांत दिसते. राज्यशासनाची व इतर व्यवहारांची पाश्चिमात्यांची शिस्त वाखाणण्याजोगी आहे, हें त्यांच्या शत्रूसहि कबूल करावेंच लागेल. केवळ त्या शिस्तीमुळें ( Discipline ) हीं राष्ट्रें सुसंघटित व बलवान् झालीं. अत्यंत आणीबाणीच्या लंडनवरील सतत ९० दिवसांच्या बॉंबवृष्टींत लोकांनीं केवढें धैर्य व शिस्त दाखविली, याचें वर्णन वाचकांनीं सर विन्स्टन चर्चिल यांच्या युद्धविषयक साहित्यांत पाहावें. त्यांच्या समाजांत गुणग्राहकताहि बऱ्याच प्रमाणांत सांपडते. याबाबत लॉर्ड मेकॉले यांचें एक उदाहरण येथें देतों. मेकॉले यांचा एक विचारप्रवर्तक लेख प्रसिद्ध झाल्यावर कांहीं मंडळींनीं त्यांना ब्रिटिश पार्लमेंटमध्यें जागा द्यावी अशी खटपट केली व त्याकरितां कान्झर्व्हेटिव्ह पार्टीचीं मतें मी नेहमींच ग्राह्य धरणार नाहीं, ही अटहि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीनें मान्य केली. गिबनसारखा अभ्यासू मनुष्य अत्यंत कष्टानें जेव्हां मोठा अभ्यास प्रसिद्ध करतो, तेव्हां त्याचा राष्ट्रानें व खुद्द सरकारनेंहि मोठा सत्कार केला. जॉनसनला सरकारनें स्वतः होऊन न मागतां म्हातारपणीं पेन्शन दिलें. अर्थात्, शिस्त, गुणग्राहकता, राष्ट्रप्रेम, अर्थशौच इत्यादि इंग्लंड देशाचे गुण म्हणून आम्हीं वर्णन केले असले तरी त्यांत सर्वच माणसें सर्वत्र अशींच आहेत असें नव्हे. ‘ गांव तेथें महारवाडा ’ असणें स्वाभाविक आहे. फक्त आपल्या देशापेक्षां या गुणांची सर्वसाधारण पातळी तेथें जास्त उच्च दिसेल एवढेंच. आमच्याकडेहि वरील सर्व गुण पुष्कळ असलेल्या व्यक्ति सांपडतातच पण सर्वसामान्य पातळी या गुणांत कमी पडते. हे सर्व गुण त्या लोकांनीं काळजीपूर्वक वाढविलेले आहेत.

या सर्व गुणांबरोबर त्यांची ज्ञानजिज्ञासा व त्याकरितां सततोद्योग हा गुण-विशेष आहे. या गुणविशेषामुळें पाश्चिमात्यांनीं सर्व जड व जीवसृष्टीचा अभ्यास फार झपाट्यानें चालू केला. यांतूनच शास्त्रपद्धति ( Method of Science )

व निरनिराळीं शास्त्रें उत्क्रांत झालीं. या सर्व सद्‌गुणांचें अनुकरण आमच्याकडे फार थोडें झालें.

**शास्त्रपद्धति व वर्गीकरण :** येथें शास्त्र व शास्त्रपद्धति यांसंबंधीं थोडा विचार करणें जरूर आहे. म्हणजे विवाह व कुटुंब यांसंबंधींच्या ज्ञानांत पाश्चिमात्य नेमके कोठें आहेत, हें उमगण्यास उपयोग होईल. शिवाय अभ्यास करण्याची इच्छा असणाराला थोडें मार्गदर्शनहि होईल. शास्त्र हा भारतीय शब्द नेमका ‘ सायन्स ’ या शब्दाचा अन्वर्थक नाहीं. संस्कृत भाषेंत शास्त्र हा शब्द फार मोठा अर्थ दर्शवितो. निरनिराळ्या प्राचीन धर्मग्रंथांचा विधिनिषेधात्मक कार्याकार्यविचार येथपासून तर कोणत्याहि विषयासंबंधीं कांहीं पद्धतशीर ज्ञान, येथपर्यंत या शब्दाची व्याप्ति आहे. इंग्रजी ‘ सायन्स ’ (Science) हा शब्द फक्त कोणत्याहि विषयाचें पद्धतशीर ज्ञान, एवढाच अर्थ सुचवितो. कार्याकार्यविचार किंवा विधिनिषेधात्मक शास्त्र त्यांत अभिप्रेत नाहीं. आतां कोणत्याहि विषयाच्या ज्ञानावर कांहीं विधिनिषेध उत्पन्न होणें शक्य आहे. परंतु हे विधिनिषेध तात्पुरते राहतील. ज्ञानाच्या प्रगतीप्रमाणें हे बदलतील व त्यांस स्थिर स्वरूप येण्यास मोठा ज्ञानसमुच्चय व ज्ञानाच्या सर्व शास्त्रांचा साकल्यानें विचार व्हावा लागेल. विवाहाचा विचार करतांना इंद्रियविज्ञान, मनोविज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, रतिशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांचें पुरेसें ज्ञान उपलब्ध झाल्यावर, साकल्यानें विचार करून, मग जेव्हां मानवी आयुष्यावरील दृष्टिकोन व ध्येयनिश्चिति करावी, तेव्हांच विवाहविषयक योग्य व निश्चित विधि-निषेध सांगणें शक्य होईल. नाहींतर एका शास्त्राच्या आधारानें एक ग्राह्य तर दुसऱ्याच्या आधारानें तेंच त्याज्य दिसेल. प्रजोत्पादनाच्या दृष्टीनें विवाहाचें वय लवकरचें सांगावें लागतें तर उत्तम रतीच्या दृष्टीनें वय पुढचें सांगावें लागेल. भारतीय शास्त्रें या दृष्टीनें प्रगल्भ झालेलीं दिसतील. त्यांत कांहीं ज्ञानभांडार किंवा आगम-विचार होऊन गेल्यावरच व आयुष्याचा दृष्टिकोन निश्चित झाल्यावरच विधिनिषे-धात्मक निश्चित शास्त्र सांगण्यांत आलें असलें पाहिजे. नाहींतर हीं सर्व शास्त्रें म्हणजे केवळ कांहीं लोकांचें मनोरंजन व कल्पनातरंग असा अर्थ निष्पन्न होईल आणि हा अर्थ कोणीहि सुज्ञ मनुष्य ग्राह्य धरणार नाहीं.

सृष्टींतील सर्व पदार्थांचा विचार मनुष्याची चिकित्सक बुद्धि करूं लागल्यावर, सृष्टींतील अनंत वस्तूंचें ज्ञान मनुष्यास होऊं लागलें. हें सर्व ज्ञान एकत्रित केल्यावर

त्यास सृष्टीच्या कांहीं मूलभूत नियमांची माहिती होऊं लागली. हे मूलभूत नियम त्रिकालाबाधित व स्थलकालनिरपेक्ष आहेत, हें पण त्यास दिसून आलें आणि याप्रमाणें स्वतःच्या चिकित्सक निरीक्षणशक्तीनें ( Observation ) निर्माण केलेली आणि ती बरोबर वा चूक आहे, हें ठरविण्याकरितां प्रत्यक्ष प्रयोगानें निर्माण केलेली जी माहिती ( Data ), तीस धरून जे सृष्टीचे नियम ( Scientific Induction ) मानवानें बांधले, या सर्व ज्ञानपद्धतीस मुख्यतः शास्त्रपद्धति ( Scientific Method ) असें म्हणण्यांत येतें. नवीन ज्ञानाची प्राप्ति होण्यास हाच एक सर्वमान्य मार्ग असून यानेंच एकंदर शास्त्रांची प्रगति झालेली दिसून येते. मग सृष्टींतील निर्जीव ( Non-living ) वस्तूस ( Physical Sciences ) धरून तें ज्ञान असो किंवा सजीव ( Living ) प्राणीमात्रास ( Biological Sciences ) धरून तें ज्ञान असो. सजीव व निर्जीव वस्तुजातास धरून याप्रमाणें मुख्यतः ज्ञानाचे दोन भाग निर्माण होतात. यांतील दुसऱ्या भागांतूनच पुढें मनुष्य स्वतःचें शरीर, मन, समाज, संस्कृति, आरोग्य, वंश इत्यादि गोष्टींचा विचार करावयास लागला. त्यांतून वैद्यक, समाजशास्त्र, आनुवंश, सुप्राजाजननशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि शास्त्रें निर्माण झालीं. तेव्हां, हा सर्व ज्ञानाचा पसारा धरून ज्ञानाचे तीन भाग केले. एका भागास भौतिक शास्त्रें ( Physical Sciences ) जडवस्तुजातास धरून म्हणतात. दुसऱ्या भागास जीवशास्त्रें ( Biological Sciences ) सर्व जीवजातास धरून म्हणतात आणि तिसऱ्या भागास समाज, संस्कृति, त्यांचे उदयास्त, इत्यादि मानवाचीं शास्त्रें त्यास ( Social Sciences ) असें म्हणतात.

या तीन मुख्य भागांनंतर, मानवाचा आयुष्यावरील दृष्टिकोन काय असावा, सर्वांच्या सुखाची अशी कांहीं योजना असूं शकेल काय, वगैरे प्रश्नांचा मानवी बुद्धि विचार करूं लागली. जर सर्व शास्त्रांचा शेवट मानवी सुखांत भर टाकणें हा आहे, तर त्यांचा आढावा घेतां काय दिसतें ? मनुष्याच्या कल्पना आचारास गमक कशा बनतात ? या कल्पना निरनिराळ्या युगांत काय होत्या ? त्यांचा मनुष्याच्या आचारावर व समाजावर काय परिणाम झाला ? असे विचार उत्पन्न होऊन त्यांतून नवें ज्ञान उत्पन्न होऊन त्यांचेंहि शास्त्र बनूं लागलें. त्यास ' ह्युमॅनिटीज ' ( Humanities ) या नांवानें संबोधिलें जातें. निसर्गाशीं संबंधित शास्त्रें यांच्या हें जरा पलीकडील आहे. पण धर्मश्रद्धा व ईश्वर या विषयांशीं त्यांचा आज प्रत्यक्ष संबंध नाहीं. असो. या सर्व शास्त्रसंभारास जीं मूलभूत शास्त्रें तीं म्हणजे

अनुक्रम ............... वि: ...................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

तर्क, गणित व भाषाविषयक शास्त्रें होत. माहिती ( Data ) गोळा करतांना मुख्यतः मोजमाप ( Measurement ) येतें. ज्या गोष्टीचें मोजमाप करतां येत नाहीं, ती गोष्ट शास्त्रास निश्चितपणानें समजली, असें म्हणणें काठिण. किंबहुना, शास्त्रविषयाला मोजमापाची ( Measurement ) अत्यंत आवश्यकता आहे. डॉ. पर्सी नन म्हणतात,

" It is a common place that science only moves with security where she can measure. " ( Nunn. p. 83 )

ज्या ठिकाणीं मोजमाप करतां येतें, तेथेंच शास्त्राची वाटचाल होऊं शकते. सारांश, अभ्यासविषयाला धरून मोजमाप ही गोष्ट शास्त्रप्रगतीस अत्यंस आवश्यक असल्यानें, सर्व आधुनिक शास्त्रांत 'गणित' या मूलभूत शास्त्राचा उपयोग होत असतो. गणितागत पद्धति ( Statistical Method ) हल्लीं सर्व शास्त्रांत प्रगत होत असून, हें मूलभूत शास्त्र म्हणून सर्व ठिकाणीं मान्यतेस पावलें आहे.

पण मोजमाप केलें म्हणजे तेवढ्यानें होत नाहीं. सर्व माहिती काटेकोर गणितागत पद्धतीनें गोळा केल्यावर ती एकत्र मांडून, तींतील योजना समजावून घेऊन तिच्यांतून कांहीं निसर्गाचा गुप्त नियम दृग्गोचर होतो कीं काय हें समजण्यास खरी कल्पना व प्रेरणाशक्ति लागते. डार्विनच्या जीवशास्त्रावरील शोधांचा हाच इतिहास आहे. कवीच्या कल्पनाशक्तीसारखें शास्त्रज्ञास हवेंत फिरतां येत नाहीं. त्यास माहितीचा आधार नेहमीं डोळ्यांसमोर ठेवावा लागतो. तो आधार लक्षांत घेऊन जें पद्धतशीर तर्कानें सिद्धांत मांडावयाचें शास्त्र, त्यास तर्कशास्त्र ( Inductive Logic ) असें नांव देतात. तेव्हां मोजमाप घेण्याकरितां ' गणित ' हें जितकें मूलभूत शास्त्र ठरतें, तितकेंच त्या माहितीच्या आधारें, त्यांतून काय सिद्धांत निर्माण होतात व पुढें कशी प्रगति करावी हें ठरविण्याकरितां ' तर्कशास्त्र ' उदयास आलें. हें तितकेंच मूलभूत शास्त्र आहे. भाषेशिवाय तर कांहींच नाहीं, म्हणून शेवटीं भाषा, तर्क व गणित हीं मूलभूत शास्त्रें समजलीं गेलीं. बाकीचा सर्व निसर्गविचार, मग तो जीवसृष्टीचा असो वा जडसृष्टीचा असो, या मूलभूत शास्त्रांवर आधारला गेला. शास्त्राचे सिद्धांत स्थलकालनिरपेक्षत्वानें लावतां येणें जरूर आहे. ही गोष्ट समजल्यास त्यांत मोजमापाची जी आवश्यकता आहे, तितकीच वस्तुनिष्ठतेची ( Objectivity ) आहे. वस्तुनिष्ठता नसल्यास ' मला असें वाटतें ' या शब्द-

समुच्चयानें सर्व कारभार आटोपावा लागतो. मग प्रत्येकास वेगळें वाटण्याची शक्यता उत्पन्न होते. मग ते सिद्धांत स्थलकालनिरपेक्ष होऊं शकत नाहींत. तेव्हां, ' मला वाटतें ' हा शब्दप्रयोग जेवढा कमी करावा लागेल, तितकें आपण जास्त शास्त्रशुद्ध आहोंत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही वस्तुनिष्ठता किंवा स्वतःचे कल, आभास, संस्कार आणि मतें ( Subjectivity ) बाजूस सारून अभ्यासविषयाचें वस्तुनिष्ठ ज्ञान करून घेणें शास्त्रास अत्यंत आवश्यक असतें. तेव्हां कोणताहि अभ्यासविषय शास्त्र या संज्ञेस प्राप्त होण्यास दोन महत्त्वाच्या गोष्टींची आवश्यकता असते. ( १ ) मोजमाप ( Measuremant ) आणि ( २ ) वस्तुनिष्ठता ( Objectivity ).

**निरनिराळ्या शास्त्रांची प्रगति :** यानंतर धर्मश्रद्धा, तत्त्वज्ञान, ईश्वरविषयक ज्ञान इत्यादि विषय येतात. सध्यां शास्त्राच्या कक्षेंत ते येतच नाहींत. शास्त्र त्यांचा विचारच करीत नाहीं. ज्ञात प्रांतापलीकडे हा अज्ञात प्रांत आहे. यासंबंधीं आज आम्हांला कांहीं माहिती नाहीं. श्रद्धेचें मोजमाप नाहीं, तेव्हां त्याचें काय करावें, ईश्वराचें वस्तुनिष्ठ ज्ञान करून घेतां येत नाहीं. तो व्यक्तिगत अनुभव आहे. त्याचें शास्त्र होऊं शकत नाहीं. अशा प्रकारचा या सर्व अज्ञात प्रांतावर शास्त्राचा दृष्टिकोन उदासीनतेचा आहे. ज्ञात प्रांताचे जे आपण चार विभाग वर कल्पिले आहेत, तेथें तरी सर्व ठिकाणीं मोजमाप आणि वस्तुनिष्ठता शक्य झाली आहे काय, असें विचारतां पुन्हां ' नाहीं ' हेंच उत्तर स्पष्टपणानें देणें भाग पडतें. जडशास्त्रांत हें सर्वांत जास्त शक्य झालें, म्हणून तीं फार प्रगत झालीं आहेत. तर ह्युमॅनिटीजमध्यें त्याचा अजून फारसा कोठेंच मागमूस नाहीं. कांहीं जडशास्त्रज्ञ या भागास शास्त्र म्हणण्यासहि तयार नाहींत. मानवशास्त्रांतहि या गोष्टी साधारणच आहेत.

तेव्हां ज्ञानाच्या ज्ञात प्रांतांतहि शास्त्रप्रगति सारखीच झाली आहे, असें समजल्यास फार मोठी चूक होईल. ज्या शास्त्रांत अजून फार प्रगति नाहीं तींच नेमकीं मानवशास्त्रें ( Social Sciences ) व ह्युमॅनिटीज ( Humanities ) मनुष्याच्या आचाराच्या दृष्टीनें शेवटीं जास्त महत्त्वाचीं ठरणार आहेत. मानवास धरून त्याचें आरोग्य, आचार, मनोवृत्ति, समाधान, इच्छा, आकांक्षा व त्याचा आयुष्यावरील दृष्टिकोन, त्याचा इतिहास, त्यांतील त्याच्या कल्पना, त्यांचा त्याच्या

भवितव्यावर झालेला परिणाम, इत्यादि जर कळलें नाहीं तर पुढें नेमका कोणता आचार मनुष्याच्या समाधानास कारणीभूत होईल, हें कसें समजावें ? एवंच ज्या शास्त्रांवर मनुष्याची वर्तणूक व त्याचे परिणाम ठरवावयाचे, ज्या शास्त्राधारावर मनुष्याच्या भावना, वृत्ति आणि त्यांचें समाधान, हें ठरवावयाचें, जीं शास्त्रें मानवी ध्येयें व त्यांस धरून आचार निश्चित करूं शकतील, तीं शास्त्रें अजून परिणतावस्थेस पोहोंचलेलीं नाहींत. या शास्त्रांत नवे शोध व्हावयास हवेत, मनुष्याचें मानसिक, शारीरिक आणि सामाजिक ध्येय ठरवावयास या सर्व शास्त्रांचा साकल्यानें, एकत्रित व निरहंकार बुद्धीनें ऊहापोह व विचार व्हावयास हवा. शास्त्रास जरी श्रद्धा हा भाग कळत नसला, तरी निरनिराळ्या मानवसमाजांच्या ज्या निरनिराळ्या श्रद्धा आहेत, त्यांचाहि साकल्यानें मानवसमाजावर घडलेल्या परिणामांचा अभ्यास व्हावयास हवा. हें सर्व करतांना स्वतःचीं मतें, कल, भावना व संस्कार वाटेंत येऊं देतां कामा नये. एवढें घडल्यावर कदाचित् पाश्चिमात्य लोक ध्येयें व ध्येयाचार या विषयावर जास्त अधिकृत मत देऊं शकतील. आज ज्या शास्त्रानें मानवाची ही सर्व माहिती गोळा करावयाची आहे, तीं शास्त्रें पूर्णावस्थेस तर नाहींतच, पण प्रगतींतहि इतर जडशास्त्रांच्या फार मागें आहेत, ही गोष्ट शास्त्रज्ञांच्या लक्षांत आलेली नाहीं, असें नाहीं. यासंबंधीं खालील एकाच उद्धरणावरून हें सहज कळून येईल.

" The necessity of social invention is therefore even more pressing than that of Technological invention, despite the very real difficulties that the former presents. At least a tentative hypothesis that man could continue to live adequately more or less indefinitely at the present level of Technological invention, without a single new discovery in the field of physical and biological sciences. It is extremely dubious whether or not he can continue to exist in ordered Society, let alone live in safety and happiness, without important discoveries and advances in the social sciences. This disparity in the level of development, between Technology and Social invention, has been forcefully indicated by Hornell Hart, commenting upon the cultural lag between Technology and social invention, symbolised by the atomic-bomb. "

( F. E. Merrill. p. 112 )

याचा अर्थ असा कीं जडशास्त्रांच्या अभ्यासापेक्षां आतां समाजशास्त्रांतून शोध होण्याची फार आवश्यकता आहे. यापुढें जडशास्त्रांत एकहि शोध लागला नाहीं, तरी मनुष्याच्या आयुष्यांत कांहींहि कमतरता भासणार नाहीं. पण जर मानवाच्या स्वतःबद्दलच्या शास्त्रांतून प्रगति झाली नाहीं, तर त्याला व्यवस्थित समाजांत राहण्यास मिळेल किंवा काय, त्याला सुखासमाधानांत आयुष्य घालवितां येईल कीं नाहीं याची फार मोठी शंका येते. मानवाचें स्वतःबद्दलचें हें जें अज्ञान, तें हल्लींच्या पाश्चात्य संस्कृतींतील, जडशास्त्राशीं तुलना करतांना, मोठी कमतरता दाखवितें व त्याचेंच दृश्य फल म्हणजे एका बाजूस अॅटम बॉंब व दुसरीकडे काय? याप्रमाणें डॉ. मेरिल यांचा स्पष्ट इशारा आहे. 'अॅटम बॉंब' शोधून काढला, हवेवर जय मिळविला, साम्राज्यें स्थापन केलीं, वगैरे सर्व गोष्टी जरी खऱ्या, तरी त्याचा अर्थ त्यांचे वैवाहिक जीवनावरील आचारहि योग्य आहेत, असा होत नाहीं, हें येथें वाचकांस सहजच स्पष्टपणें कळून येणार आहे. सारांश, समाजविषयक शास्त्रें आज झपाट्यानें वाढत नसून हा सर्व जडशास्त्रांचा पसारा आहे. यानें मनुष्याच्या परिस्थितीवर जय मिळविण्याचीं अनंत साधनें उपलब्ध होत आहेत. त्याच्या परिस्थितिजन्य सुखांत, ऐषआरामांत भर पडत आहे. पण त्यानें त्याचें आयुष्य व समाज जास्त सुव्यवस्थित व सुखी होतील असें समजण्याचें कारण नाहीं. त्यास अंतर्मुख दृष्टि पाहिजे, स्वतःच्याच मनाची जास्त ओळख पाहिजे, स्वतःच्या इतिहासाची जास्त माहिती पाहिजे. स्वतःच्या कल्पना व वासना यांचा खोल अभ्यास पाहिजे आणि शेवटीं आयुष्यावरचें ध्येय व दृष्टिकोन पाहिजे. हें सर्व झालें, तरच मानवाचा व मानवजातीचा यापुढें तरणोपाय आहे. नाहींतर जडशास्त्रांच्या पसाऱ्यांत उत्पन्न झालेल्या विनाशक शक्ति व सोन्याचा धूर, पैसा आणि सत्ता यांची अनिर्बंध भोगेच्छा, यामुळें जगाचा नाश ओढविल्याशिवाय कसा राहील?

**पाश्चिमात्यांचीं अनुमानें कांहीं वेळां अग्राह्य :**

पाश्चिमात्यांचे समाजविषयक शास्त्रांचे अभ्यास पाहतांना, त्यांत शास्त्रीय पद्धतीनें गोळा केलेली माहिती पाहणें (Data) उद्बोधक असते. परंतु त्यांतील माहितीवरून काढलेलीं अनुमानें नेहमींच तेवढी तर्कशुद्ध व आत्मनिरक्षेप (unbiased) नसतात. अनुमानांवर (Inference) पुष्कळ वेळां त्यांची सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्वाची छाप येते. बर्ट्रंड रसेल

प्रजोत्पादनाशिवाय विवाह निरर्थक आहे हें सांगतात. परंतु प्रजाहीनत्वांत दहा पंधरा वर्षें जी स्त्री एका पुरुषाजवळ राहते तिचा प्रश्न नुसत्या घटस्फोटानें सुटत नाहीं, हें विसरतात. कांहीं मानसिक समाधान मिळण्याची तिला जरुरी असते. जगांतील आर्थिक प्रश्नांइतकेच भावनात्मक प्रश्नहि महत्त्वाचे असतात. हा सर्व विचार न करतां, अशा विवाहांत घटस्फोट देऊन टाकावा असें मत देतात. घटस्फोटानें स्त्री-पुरुषांस दुसरा विवाह करण्यास परवानगी मिळाली हें खरें, परंतु ही स्त्री वांझपणचा शिक्का घेऊन अगोदरच दुःखी असते. तिला पहिल्या विवाहानंतर पंधरा वर्षांनीं दुसरा विवाह करण्यास परवानगी असली तरी तें शक्य होईल का, याचा विचार नाहीं. येथें विवाह म्हणजे फक्त 'मॉनोगमस' हा त्यांचा संस्कार आड आला व त्यास धरून हें मत निर्माण झालें. अशा स्थितींत द्विभार्यात्व हा भारतीय आचार होता. त्यांत स्त्रीचें आर्थिक व मानसिक नुकसान न व्हावें अशी कल्पना होती.

डॉ. किन्से यांनीं विवाहांतर्गत रतिसुखाशीं विवाहपूर्व कामचेष्टांचा संबंध आहे असें दाखवून, यावरून रचलेलें तर्कविरुद्ध भारूड आम्हीं रतिसंबंधीं चर्चा करतांना वाचकांच्या नजरेस आणलेंच आहे. डॉ. हॅव्हलॉक एलिस यांनीं तरुण वयांत वीस वर्षांच्या आंत गर्भधारणा व बाळंतपण स्त्रीस जास्त सुलभ असतें असें दाखविलें. डॉ. बोमन सांगतात कीं, व्यक्तिमत्त्वाच्या जुळणीला लहान वयच चांगलें. हें सर्व शास्त्र सांगूनहि शेवटीं विवाहाचें वय निश्चित कमीच असावें; स्त्रीनें स्वतःच्या महत्त्वाकांक्षा सिद्ध करण्याकरितां विवाहाचें वय जाऊं देऊं नये, असा निश्चित सिद्धांत सांगण्याचें ही मंडळी टाळतात. कारण, असें करतांना स्त्रीस्वातंत्र्यास धक्का बसतो. किंग्स्ले डेव्हिस ( Am. J. Soc. Vol. LIII p. 250 ) नामक समाजशास्त्रज्ञ एका लेखांत १९३१ सालच्या हिंदुस्थानच्या सेन्सस रिपोर्टावरून या देशांतील निर-निराळ्या समाजगटांत प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नत्व ( Fertility Differentials ) दाखविण्याचा उद्योग करतात. माहितीमध्यें ( Data ) बऱ्याच चुका होण्याचा संभव ते मान्य करतात आणि शेवटीं अनुमान काढतात कीं, विधवा-विवाहास उच्चवर्णियांत बंदी असल्यानें हें भिन्नत्व असावें. यांत तर माहिती व अनुमान यांचा संबंध फारच थोडा. विधवा-विवाह ब्राह्मणांत नसणें हें रानटीपणाचें लक्षण आहे, असा त्यांचा ग्रह त्यांनीं या अनुमानांत ठोकून दिला. वरील उदाहरणावरून दिसून येईल कीं, पाश्चिमात्यांचे सामाजिक आंकडे व अभ्यास पाहतांना, त्यांचीं अनुमानें

स्वतंत्र विचारानें पडताळून पाहतां न आल्यास, फक्त कांहीं वितर्क व दुराग्रह आपल्यास मिळण्याचा संभव आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

समाजविषयक शास्त्रांची प्रगति कांहीं माहिती गोळा करण्यापलीकडे नाहीं आणि त्यांतील अनुमानें तर्कशुद्ध व साकल्यानें विचार करून काढलेलीं असतात, असें नेहमीं घडत नाहीं. ध्येयनिश्चिति व जीवनावरील निश्चित दृष्टिकोन नाहीं. यामुळें विवाहविषयक निश्चित आचार आज पाश्चिमात्य सांगूं शकत नाहींत. सध्यांची प्रायोगिक स्थिति बदलत जाईल व केव्हांतरी त्यांच्या ज्ञानजिज्ञासेंतून सत्याचें दर्शन होईल, असें मानण्यास हरकत नाहीं. अर्थात् भारतियांनीं ठरविलेल्या सर्वच गोष्टी बिनचूक आहेत असा दुराग्रह आम्ही धरीत नाहीं. परंतु जें कांहीं बुद्धिगम्य आहे तेंहि टाकतांना, पाश्चिमात्यांचें अंधानुकरण म्हणजे प्रगति नव्हे, एवढें मात्र खरें.

**श्रद्धेचें स्थान :** मनुष्याच्या ज्ञानजिज्ञासेंतून जो भौतिक शास्त्रांचा सर्व पसारा मागच्या दोन शतकांत सारखा वाढत गेला त्यामुळें मानवाच्या वस्तुजाताबद्दलच्या ज्ञानांत पुष्कळ भर पडली, यांत संशय नाहीं. जें माहीत नव्हतें तें माहीत झालें आणि त्यांचा उपयोग मनुष्याच्या आरोग्य, सुखसमृद्धि व ऐश्वर्य यांस झाला, हें पण खरें. परंतु मानवी संतोषांत कांहीं भर पडली काय? कीं असंतोषच माजत गेला! सुख व संतोष यांत कांहीं फरक आहे. सुख हें विशेषतः परिस्थितीस धरून इंद्रियजन्य आहे तर संतोष हा मनास धरून परिस्थितिनिरपेक्ष आहे. अर्थात् अत्यंत प्रतिकूल परिस्थिति संतोषास घातक आहे हें खरें. पण नुसती उत्तम आर्थिक परिस्थितीहि संतोषास कारण होतेच असें नाहीं हेंहि तितकेंच खरें. म्हणून '**संतोषमूलं हि सुखं दुःखमूलं विपर्ययः।**' असें मनूनें सांगितलें. असंतोषाचीं कारणें मात्र निरनिराळ्या देशांत नाना तऱ्हेचीं आहेत. व्यक्तीव्यक्तींत तीं भिन्नत्वानें आढळतील. परंतु त्यांत एक सामान्यत्व दिसेल. जें आहे त्यापेक्षां जास्त कसें मिळवितां येईल, ही भावना सर्वत्र असंतोषाच्या मूळ कारणांत दिसण्याची शक्यता आहे. या भावनेंतच मनुष्याच्या प्रगतीचें बीज आहे, हें जरी सत्य आहे, तरी वासनांचा पसारा संपणारा नाहीं. शास्त्रानें वासनांची अनिर्बंध वाढ होत जाते. एकापुढें एक याप्रमाणें सतत वाढणाऱ्या वासनांना अंत नसल्यामुळें वासनापूर्तीहि आटोक्याबाहेर जाते व संतोष दूर पळत

जातो. मनुष्याच्या वासनांना ( Desires ) अंत आहे काय ? याचें निःसंदिग्ध उत्तर भारतियांनीं दिलें आहे. **'मनोरथानां अगतिर्न विद्यते'** या लहान श्लोकार्धांत हें चिरकालीन सत्य कालिदासानें स्पष्ट सांगितलें. सत्ता, पैसा, कीर्ति व मान्यता यांचा कैफ अनावर असतो. तो वाढत चालला म्हणजे अनिर्बंध होतो. कितीहि झालें तरी समाधान होत नाहीं आणि त्यांतच लोभ हा विकार कायमचा जडतो. हा लोभ जडल्यावर इतर दुर्गुणांना तो फिका पाडतो. **'लोभश्चेद्गुणेन किं'** असेंच भर्तृहरीस म्हणावें लागलें. मनुष्याच्या सर्व कर्मांना कारणीभूत जरी वासनाच ( Desire ) आहे, तरी वासनांचा शेवट कोठें करावयाचा हें न समजल्यास त्यांतच मानवाचा अंत आहे. **'अकामस्य क्रिया काचित्'** प्राणी अकाम झाल्यास क्रिया-लोप होतो, असाच मनूनें सिद्धांत मांडला. त्याबरोबरच सर्वस्वीं अकामता व संपूर्ण कामात्मता किंवा वासनाधीनत्व योग्य नव्हे असें सांगितलें. त्यांतील कांहीं सुवर्णमध्य साधण्यास हवा असा मनूचा अभिप्राय दिसतो. संकल्पमूल कामांत कर्माची प्रवृत्ति उत्पन्न होते परंतु कामात्मतेंत बुडून न जातां या वासनेचा उपशम कसा करतां येईल यांतच मनुष्याचें बुद्धिकौशल्य असून, यासच धरून **'समत्वं योग उच्यते'** हा समत्वयोग भगवद्गीताकारांनीं सांगितला. तेव्हां जिवाच्या नानाविध वासनांना वळण देऊन त्यांना मर्यादित करणें व तृप्तीप्रत नेणें ही आधुनिक शास्त्राभ्यासांत शक्य होणारी गोष्ट नसल्यामुळें शास्त्रांचा पसारा ही गरज भागविण्यास असमर्थ ठरतो.

भौतिक शास्त्रांनीं अनिर्बंध उचंबळून येणाऱ्या वासनांना किंवा लोभास आळा घालण्याचें सामर्थ्य या शास्त्रानें उत्पन्न होणाऱ्या वस्तुज्ञानांत नाहीं. उलट भौतिक शास्त्रें या वासनांना फार मोठी गतीच देऊन त्यांना अमर्याद करण्याकडेच या शास्त्रांचा उपयोग होतो. म्हणून येथें दुसरी एखादी मानवी मनाचें नियंत्रण करणारी शक्ति लागते. हीच मनुष्यानें निर्माण केलेली श्रद्धा. ती परमेश्वर असो, धर्म असो वा राष्ट्र असो.

कार्याकार्यविचार करतांना भौतिक शास्त्रांचा फायदा कांहीं मर्यादेपर्यंत आहे. देवी टोंचून घेण्यानें देवी होत नाहींत तेव्हां देवी टोंचून घ्याव्या, हें खरें. पण सत्य, अहिंसा, अक्रोध या सद्गुणांचा परिपोष मानवानें कां करावा, याचें उत्तर शास्त्र देऊं शकत नाहीं. सद्यःफल व इंद्रियसुखप्राप्ति देणाऱ्या भोगांचा

त्याग कां करावा, हें शास्त्र सांगूं शकत नाहीं. निरपेक्ष सत्पात्रीं दातृत्वानें काय साध्य होतें याचा भौतिक शास्त्र विचार करूं शकत नाहीं. तेव्हां भौतिक शास्त्रानें उत्पन्न होणारें वस्तुज्ञान, हें सद्गुणांची जागा घेऊं शकत नाहीं.

येथें असा एक पक्ष उपस्थित होतो कीं समाजस्वास्थ्याकरितां सद्गुणांची जोपासना करावी, असें याचें बुद्धिगम्य उत्तर आहे. परंतु यांत एक अडचण आहे. प्रत्येक समजांत कांहीं अपरिहार्य वर्ग "व्यक्ति तितक्या प्रकृति" असल्यानें, एका वर्गाचें स्वास्थ्य दुसऱ्याचें स्वास्थ्यच होईल, असें नव्हे. एका व्यक्तीचें हित तें दुसरीचें अनहित होऊं शकेल. अशी स्थिति नेहमीं समाजांत कमीजास्त प्रमाणांत उत्पन्न होत असल्यानें कनिष्ठ स्थितींतील वर्गाला सद्गुणाचें फल काय सांगावयाचें ! त्याचें स्वतःचें सुख व समाजाचें हित यांचा संघर्ष झाल्यास तो स्वसुखावरच दृष्टि ठेवील कीं नाहीं ! एक वर्ग काळा बाजार करून मोटारी उडवीत असतांना भुकेलेल्या वर्गास त्यागाची शिकवण कशी पचेल ! अशा वेळीं परत श्रद्धेशिवाय बोलतां येत नाहीं. मग ती धर्म असो नाहींतर राष्ट्र असो. जुन्या कालांत 'धर्माकरितां मरा.' ही आरोळी होती तर आतां 'राष्ट्राकरितां त्याग करा.' ही घोषणा आहे. पण राष्ट्र व धर्म या दोनही मनुष्याच्या शास्त्रज्ञानांत न बसणाऱ्या व ज्याचें ऐहिक फल सांगतां येत नाहीं, अशा श्रद्धा आहेत, हें विसरून चालणार नाहीं.

यानंतर कांहींचें म्हणणें असें आहे कीं, शास्त्रास जे प्रांत अज्ञात आहेत ते ज्ञात व्हावयास लागले म्हणजे सर्व प्रश्न सुटतील. हा फक्त कांहीं कालाचा प्रश्न आहे. दोन शतकांपूर्वीच्या जगासंबंधीं मानवाच्या ज्ञानांत पडलेली भर पाहिली म्हणजे आणखी कांहीं शतकांनीं हें सर्व कोडें उलगडेल. भविष्यकालांत जगासंबंधीं मूलभूत प्रश्नावर किती प्रकाश पडेल हा फक्त मानण्याचा प्रश्न आहे. ज्ञानाच्या ज्ञात व अज्ञात प्रांताची तुलना करतां, अज्ञात जगत् ज्ञानाच्या मानानें फारच विस्तृत असून शास्त्राला शेवटीं हार खावी लागेल, असें मानण्यासहि पुष्कळच वाव आहे. शास्त्रप्रगतीचा विचार करतां फक्त भौतिक (Physical) शास्त्रांचा विचार करून चालणार नाहीं. शास्त्राच्या पूर्वी निर्देश केलेल्या सर्व शास्त्रांचा आजहि विचार करतां भौतिक शास्त्रांची प्रगति जरी आश्चर्यकारक असली, तरी इतर सर्व शास्त्रें फारच कमी प्रमाणांत प्रगत झालेलीं दिसतात.

शिवाय ध्येय, मानसिक समाधान व शांतताप्रिय निर्लोभी वृत्ति, या सर्व गोष्टी मनुष्याच्या अयुष्यावरील दृष्टिकोनावर अवलंबून राहणार. नुसतीं भौतिक शास्त्रें व त्यांमुळें उत्पन्न होणारा उन्माद किंवा रजतमात्मक वृत्ति पाहिल्या, म्हणजे यांतच मनुष्याचा शेवट होणार असेंच जास्त वाटूं लागतें. किंबहुना चालू असलेल्या प्रगतींत मानवजातीचा नाशच होण्याचा संभव वाढलेला आहे, असें पुष्कळ विचारवंतांचें म्हणणें आहे. भविष्यकालांत मानव जगाच्या मूलभूत ज्ञानापर्यंत पोहोंचून मानवी समाज स्थिरस्वरूप व शांततामय परिस्थितींत आपोआप येऊन पोहोंचेल, ज्ञानाच्या सर्व शास्त्रांवर सर्वत्र प्रकाश पडल्यानें तत्कालीन सर्व मानवप्राणी फार जाडे विद्वान् होणार आहेत आणि त्यामुळें श्रद्धा ही चीज अत्यंत निरुपयोगी होईल असा काल आमच्या दृष्टिपथांत येत नाहीं. म्हणून, हा काल येईल, असा नुसता मोहक संभव गृहीत धरून आज मनुष्याची सर्व श्रद्धा नाहींशी करून त्याचें मानसिक असमाधान वाढविण्याचा निष्फळ खटाटोप करावा, असें आम्हांस वाटत नाहीं. शास्त्रज्ञानाच्या मागें लागलेले जे कांहीं थोडे गाढे विद्वान् आहेत, त्यांनीं खुशाल श्रद्धा सोडावी. किंबहुना ती सुटतेच. पण इतर सर्व आबालवृद्धांनीं व अज्ञ जनांनीं आपलीं मनें भकास करावीं, अशी आज जरुरीहि नाहीं व त्याशिवाय या शास्त्रज्ञांचें कांहीं अडलेलेंहि नाहीं. भगवद्गीताकारांनीं याच मुद्द्याला धरून **'न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम्।'** हा श्लोकार्ध लिहिलेला दिसतो. विद्वान् माणसानें इतर अज्ञ जनतेचा बुद्धिभेद न करतां त्यांच्या श्रद्धेची जोपासना करावी, असा यांत सल्ला असून प्रत्येकास कांहीं श्रद्धा आहे व किंबहुना **'यो यत् श्रद्धः स एव सः।'** श्रद्धेंतच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन घडतें असा सामान्य सिद्धांतहि सांगून ठेवला आहे.

या सर्व तात्त्विक विवेचनानंतर श्रद्धेचा जीवनांत कांहीं निश्चित उपयोग आहे कीं नाहीं, हें पाहणें इष्ट ठरेल. श्रद्धेचा प्रमुख उपयोग भावनांना वळण लावण्याचा आहे. स्वार्थी व लोभी प्रवृत्तीस आळा घालून, मनुष्यास उच्च आचाराकडे प्रवृत्त करण्याकडे आहे. याचा प्रायोगिक पुरावा डॉ. किन्से यांच्या लैंगिक अभ्यासांत पाहावयास सांपडतो. विवाहपूर्व आलिंगन-चुंबनादि सर्व कामव्यापारांवर या धार्मिक श्रद्धेनें आपोआप मर्यादा येते. कामविषयक सर्व सामाजिक मर्यादा आणि अधर्म्य-

कामाचा सर्व आचार कमी करण्यास या धर्मश्रद्धेचाच उपयोग झालेला डॉ. किन्से यांना दिसून आला. ते म्हणतात,

" Because religious tradition has so largely shaped public thinking on these matters, it's restraining influence is apparent. ( Kinsey F. p. 247 )

कामविषयक एकंदर कल्पनांवर धर्मश्रद्धेचा परंपरेनें मोठा संस्कार झालेला असल्यानें, कामव्यापार मर्यादित करण्यास श्रद्धेचा फार उपयोग दिसून येतो असें डॉ. किन्से यांचें अभ्यासानंतरचें मत आहे. यापुढें ते असेंहि म्हणतात कीं, धर्म कोणताहि असला तरी चालतो. मुख्य मुद्दा त्या व्यक्तीची धर्मश्रद्धा किती आहे, हा महत्त्वाचा भाग असून तो कोणत्या धर्माचा आहे हा नव्हे.

" The differences were not dependent on their Protestant, Catholic, or Jewish backgrounds but upon the degree of their devotion in their religion. " ( Kinsey F. p. 209 )

श्रद्धाहीन व श्रद्धावान् स्त्रीपुरुषांतील सांपडलेले यासंबंधींचें फरक हे ते प्रॉटेस्टंट, कॅथोलिक किंवा ज्यू या धर्मपंथांवर अवलंबून नसून, त्यांची श्रद्धा किती बळकट आहे या गोष्टीवर अवलंबून असलेले दिसले. यावरून वस्तुनिष्ठ ( Objective ) अभ्यासांतूनहि श्रद्धा व संस्कार यांचा मनुष्याचे कामव्यापार मर्यादित करण्यास किंवा त्यांना वळण लावण्यास कसा उपयोग होतो, हें स्पष्ट दिसून येईल. आतां हीं नियंत्रणें घालून करावयाचें आहे काय ? जें घडेल तें घडेल. मंडळीं आपोआप स्वेच्छेनें केव्हांतरी समजून स्वतःस मर्यादा घालतील किंवा न घातल्यास त्यांत कांहीं तोटा नाहीं, असा दृष्टिकोन घेतल्यास श्रद्धेचा उपयोग नाहीं, असें म्हणण्यास हरकत राहणार नाहीं. भारतियांनीं काम ही महत्त्वाची शक्ति ठरविली असून, त्यांतून शेवटीं समाधान व आनंद यांची प्राप्ति घडून वंश व समाज यांचें सातत्य कसें राहील या गोष्टीवर भर दिल्यानें काम-व्यापाराचें नियंत्रण त्यांना अभिप्रेत होतें. याच हेतूस धरून त्यांनीं धर्म्य काम व अधर्म्य काम असे त्याचे दोन भाग करून धर्म-अविरुद्ध काम हा परमेश्वरस्वरूप मानला व त्याचेंच विवरण प्रजनास उपयोगाचा धर्म्य विवाह असा अर्थ धरून तो यशस्वी व्हावा याकरितां सर्व ' कामशास्त्र ' रचलें.

**भारतीय संस्कृतीचें सातत्य :** भारतियांची संस्कृति ( Culture ) जगाच्या धकाधकींत बरीचशी कायम टिकून राहिली ही गोष्ट कोणी नाकबूल करीत नाहीं. संस्कृति म्हणजे संस्कारसमुच्चयात्मक जीवनाचा नमुना. असा एकच नमुना जगांत सर्वत्र नाहीं. हे निरनिराळे नमुने एकमेकांपासून भिन्नत्वानें पाहतां येतात. हें भिन्नत्व पाहतांना, त्या नमुन्यांतील व्यक्तींच्या कल्पना, जगासंबंधींचें ज्ञान, व्यवहार, इत्यादि जरी लक्षांत घेणें जरूर असलें, तरी भिन्नत्व हें मुख्यतः त्या त्या समाजांतील आयुष्यावरील दृष्टिकोन काय आहे, यांत आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होईल, असें वाटत नाहीं. भारतियांचा आयुष्यावरील त्रिविध दृष्टिकोन, याच दृष्टीनें भारतियांचें इतरांशीं वैधर्म्य पाहण्याकरितां, सुरवातीस दिला आहे. वैधर्म्याप्रमाणें दोन संस्कृतींत साधर्म्यहि असूं शकतें. परंतु वैधर्म्यांतच संस्कृतीचें वैशिष्ट्य विशेष प्रत्ययास येतें. भारतियांच्या त्रिविध दृष्टिकोनांत ‘ चतुर्विध-पुरुषार्थ ’ हा जीवनावरील मूलभूत महत्त्वाचा सिद्धांत असून यानें व्यष्टिसमष्टीचें कल्याण त्यांना साधावयाचें होतें. हा सिद्धांत जरी भारतियांनीं विचारानें, निरीक्षणानें व अनुभवानें निर्माण केला असला, तरी तो कोणत्याहि समाजाला आज विसाव्या शतकांतहि स्थलकालनिरपेक्षत्वानें लागू केल्यास त्यांतून व्यष्टिसमष्टींचें हित व कल्याणच निर्माण होणार असल्यानें, तो खऱ्या अर्थानें ‘ सनातन ’ आहे. हा दृष्टिकोन हेंच भारतियांचें अत्यंत महत्त्वाचें समाजशास्त्रांतील संशोधन असून, तो समाजशास्त्रांतील ‘ ॲटम बॉंब ’ आहे असें म्हटल्यास अतिशयोक्तीची फार भीति नाहीं. भौतिक शास्त्रांतील ॲटम बॉंबमुळें मनुष्याचा नाश ओढवलेला असून या समाजशास्त्रीय ॲटम बॉंबमुळें जीवनांतील संतोष व त्यास धरून सुखोत्पत्ति वाढविण्यास मदत होणार असून, हा दृष्टिकोन ग्रहण केल्यास विश्वशांतीचें तें एक साधन ठरणार आहे.

भारतियांचे दृष्टिकोन निश्चित ध्येयास अनुसरून उत्पन्न झालेले असून, चतुर्विधपुरुषार्थांतील शेवटचा पुरुषार्थ ‘ मोक्ष ’ हाच भारतियांचा अंतिम ध्येयवाद आहे. ‘ मोक्ष ’ हा देवापाशीं असणारें गाठोडें नाहीं. प्रत्येक व्यक्तीनें आपआपल्या अर्थकामाच्या मर्यादा ओळखण्यांत व समष्टीचें कल्याण साधण्यांत जें शाश्वत समाधान आहे, तोच मोक्ष. हें समाधान दुसरा हिरावून घेऊं शकणार नाहीं.

व्यक्तीच्या दृष्टीनें हें शाश्वत समाधान प्राप्त होणें हाच संसाराचा उपरम असून समष्टीच्या दृष्टीनें ‘ शांतता ’ व परस्परप्रेमभाव हाच शेवट आहे. विश्वशांतीच्या अघळपघळ गप्पा मारणाऱ्या कोणालाहि ‘ हें विश्वचि माझें घर ’ यापेक्षां जास्त मोठी घोषणा करतां येण्यासारखी नाहीं. व्यक्तीच्या सर्व कामनांचा शेवट व प्रयत्नांचें फळ, हें फक्त ‘ मानसिक समाधान ’ हेंच असून, हें मानसिक समाधान धर्म, अर्थ वा काम या कोणत्याहि एकाच्या पाठीमागें अमर्याद लागण्यांत नसून, त्यांचा कांहीं बुद्धिगम्य विचार व तर्कशुद्ध आचार करण्यांतच शेवटीं प्राप्त होणार आहे. मानसिक समाधान हा ‘ बहुकारणयोग ’ ( Polycausal ) असून त्यांत या नानाविध कारणांचा साकल्यानें विचार व योजना करणें हाच समत्वयोग आहे, हेंच जगांतील कर्मांमधील खरें कौशल्य आहे. या कर्मकौशल्यासच ‘ योग ’ ही संज्ञा प्राप्त झाली असून, शाश्वत समाधान वा संसारांतील वासनाशांति किंवा उपरम हा त्याचा खरा शेवट आहे,

‘ अर्थ व काम ’ ह्या ऐहिक समाधानास धरून असलेल्या मोक्षपूर्व पुरुषार्थांचें आचरण कसें असावें, याचा त्यामुळें निश्चित विचार भारतियांनीं दिलेला आहे. कामपुरुषार्थ याचा सुटसुटीत लौकिक अर्थ ‘ यशस्वी विवाह ’ असाच सर्वत्र दिसून येतो. एकंदर कामवासनेच्या विविध अंगांचा समाचार या कामपुरुषार्थाच्या मूलभूत कल्पनेस धरून भारतियांनीं घेतलेला आहे. हा सर्व आचार पिढ्यानपिढ्या अबाधित राहावा, याकरितां कर्मांच्या विधिनिषेधात्मक चौकटींत सर्व नीट बसवून शिवाय उच्चवर्णियांत असे आचार उत्पन्न केले गेले कीं, ज्यांचा उपयोग उदाहरण म्हणून व्हावा.

•

संस्कृतीच्या उदयास्तांसंबंधीं हल्लीं नाना दृष्टिकोन अस्तित्वांत आहेत. त्यांत एक असा विचारप्रवाह आहे कीं, ज्याप्रमाणें कोणताहि प्राणी उत्पत्ति, वाढ, स्थिति, वृद्धापकाळ, क्षय व नाश अशा निरनिराळ्या स्थितींतून जातो; त्याप्रमाणें प्रत्येक संस्कृतीहि जाते आणि त्यामुळें कोणतीहि संस्कृति कांहीं कालांतरानें विलयास जाणें क्रमप्राप्तच आहे. शिवाय सध्यांच्या कालांत कोणतीहि एक संस्कृति स्वतःचें इतरांपासून अलग अस्तित्व टिकवून धरील असें म्हणणेंहि कठिण आहे. परंतु भूतकालाचा विचार करतां असें दिसतें कीं, भारतीय संस्कृतीवर जे आघात झाले ते सर्व पचविले गेले. या क्रियेंत कांहीं विचारक्रांतीहि झालेली असेल. बुद्ध व जिन

यांचा आघात ही फार मोठी क्रांति येथें होऊन गेली. परंतु या विपत्तींतहि भारतीय श्रेष्ठींनीं आघातापासून योग्य तो धडा घेतला. कांहीं मातृसावर्ण्यासारखे नवे कायदेहि अस्तित्वांत आणावे लागले. 'जाति' म्हणून ज्या म्हणतात, त्यांचा उदय बौद्ध-क्रांतिकालांत कांहीं विशेष गरज उत्पन्न झाल्यानें झाला व त्यामुळें समाजांत परत सुव्यवस्था निर्माण करतां आली, असा इतिहासाचार्य राजवाडे यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. त्रैवर्णिकांचा व बौद्धांचा झगडा अनेक शतकें होऊन, शेवटीं हें पाखंड लुप्त झालें; असें त्यांचें म्हणणें. यावरून मुख्य मुद्दा एवढाच ग्रहण करतां येतो कीं, भारतीय संस्कृतींत आपत्कालांत जगून राहण्याचा जो गुण आला आहे, त्याचीं कारणें कदाचित् खालील दोन असूं शकतील. एक तर देशांतील श्रेष्ठ वर्णांत संततिसातत्य टेवण्याची खटपट, त्याकरितां निश्चित उपाययोजना केली गेली. त्यांत 'सुप्रजा' हा विवाहाचा हेतु धरला जाऊन, हें पितृऋण फेडणें जरूर आहे असें मूल्य निर्माण केलें. शिवाय विद्येची जोपासना करणारा श्रेष्ठ वर्ग आर्थिक अडचणींत सांपडून चिरडला जाऊं नये याकरितां विद्या हें प्रथम मान्यस्थान व्हावें, अशी योजना केली. यामुळें विद्येची जोपासना करणारा बुद्धिजीवि वर्ग सर्व समाजाच्या आदरास प्राप्त होऊन, त्यांना अर्थोत्पादनाकरितां मोठा धंदा करण्याची जरुरी ठेवली नाहीं. यामुळें त्यांच्या प्रजोत्पादनांतील एक महत्त्वाची अडचण नाहींशी केली गेली. परंतु श्रेष्ठ वर्गांतील संततीचें सातत्य एवढाच भाग संस्कृतिसंरक्षणाच्या दृष्टीनें महत्त्वाचा नाहीं. आनुवंशानें समाजाचा जीवशास्त्रीय पिंडप्रधान पाया ( Biological Inheritance ) भक्कम होतो. परंतु संस्कारपरंपरा जर कायम न टिकेल तर उच्च आचार व मूल्यें टिकणें कठिण. तेव्हां ही संस्कारपरंपरा (Social Inheritance ) टिकविण्याकरितां भारतियांनीं मोठी खटपट केली. कोणत्याहि संस्कृतींतील संस्कारसमुच्चय हा याप्रमाणें एकापासून दुसऱ्यास संक्रांत ( Communicable ) करतां येतो. हें घडतांना शिक्षण व उदाहरण या दोनहि गोष्टींचा उपयोग होतो. या समाजशास्त्रीय सत्याचा भरपूर उपयोग करून, भारतियांनीं संस्कारपरंपरा ( Social Inheritance ) कायम राखण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. यामुळें आज हजारों वर्षें कांहीं सांस्कृतिक मूल्यें, कल्पना, विचार, ज्ञान, कायदे, नीति, भाषा, तत्त्वज्ञान व आचार या देशांत टिकून राहिलेले दिसतात. विवाहाचे हेतु, संस्कार व परंपरा हीं त्यांतील प्रमुख होत.

**बुद्धिगम्यतेचा अर्थ :** ही सर्व घडण बुद्धिगम्य आहे असें आम्ही ठिकठिकाणीं दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यांत आमच्यावर स्वमतपक्षपानाचा दोष (Ethnocentrism) येण्याचा संभव आहे. बुद्धिवाद आमच्या देशांत नव्हता असें नाहीं. किंबहुना चार्वाकाच्या पाखंडापासून शंकराचार्यांच्या अद्वैतमतापर्यंत सर्व प्रकार या देशांत होते. तेथें बुद्धिवाद माहीत नव्हता असें नव्हे. 'बुद्धियोगा'चा निर्देश भगवद्गीताकारांनींहि केलेला आढळतो. परंतु हा बुद्धियोग फार वेगळ्या प्रकारचा आहे. यांत मनुष्य परमेश्वरप्राप्ति करून घेतो. युरोपमधील बुद्धिवाद (Rationalism, Positivism) हा भौतिक शास्त्रांच्या प्रगतीनंतर उदयास आलेला आहे. शास्त्रज्ञ हा नेहमीं संशयग्रस्त असल्यानें, आणि प्रत्यक्षानुमानानें सिद्ध होईल तेवढ्यावरच विश्वास ठेवणारा असल्यानें, परमेश्वरादि सर्व गोष्टींबद्दल तो साशंक असतो. शास्त्रपद्धतीनें (Scientific method) तर्कशुद्धतेंत बसेल तें बरोबर. त्याशिवाय सर्वांविषयीं तो उदासीन असतो. पुष्कळ भौतिक शास्त्री हे याच श्रेणींतील लोक असतात. परंतु ज्ञान वाढत जाणार आहे, अज्ञात प्रांत मोठा आहे, आणि जें नवें ज्ञान उत्पन्न होईल, त्याचा आत्मनिरपेक्षपद्धतीनें (Dispassionate) करणें क्रमप्राप्त आहे. एवढा विचार शास्त्रज्ञांना मान्य असला पाहिजे. परंतु कित्येक वेळां हा बुद्धिवादी इतका समतोल राहत नाहीं आणि कित्येक वेळां तर तो आग्रही (dogmatic) दिसावयास लागतो. परंतु असा निर्विकार विचार करण्याचा येथें प्रयत्न केला आहे. शिवाय श्रद्धेचें निश्चित स्थान कोठें आहे, याचा विचार वर दिलेला असून, आम्ही स्वतः सश्रद्ध बुद्धिवाद्याची भूमिका घेऊं इच्छितों. श्रद्धा व बुद्धिवाद यांचा परस्पर विरोध नसून, त्यांचें परस्परपूरकत्वहि असूं शकतें. भारतियांस हेंच मान्य आहे. यांतूनच भारतियांचा भगवद्गीताकारांनीं सांगितलेला बुद्धियोग निर्माण होतो. शास्त्रीय प्रगतीनें नवीन नवीन पुरावे (facts) पुढें येतील. पण ध्येय (goals) हा श्रद्धेचाच विषय आहे.

"Science is more effective in reaching goals than in determining them. In the last analysis, goals are the expression of human values."

(F. E. Merrill. p. 531.)

शास्त्राचा उपयोग शेवटीं ध्येय ठरलेलें असल्यास त्या ध्येयाप्रत पोहोंचण्यासाठीं जास्त चांगला होईल. पण ध्येयें हीं मनुष्याच्या मूल्यविचारांतून ठरलीं

पाहिजेत आणि हा मूल्यविचार श्रद्धेचा भाग आहे. यावरून श्रद्धा व शास्त्र यांचा समन्वय शक्यच नव्हे तर जरूर आहे हें समजून येईल. जागतिक शांतता हें मूल्य घेतल्यास हें ठरविण्याचें कार्य भौतिक शास्त्र करीत नाहीं. परंतु भौतिक शास्त्राचा उपयोग मनुष्याचा नाश किंवा समृद्धि यांकडे करणें हें सर्वस्वीं मनुष्याच्या मूल्यविचारांवर, श्रद्धेवर आणि ध्येयनिश्चितीवरच अवलंबून राहील.

**ध्येय व आचार यांतील सनातन तफावत :** ध्येय आणि आचार यांत सर्व कालीं व सर्व स्थलीं नेहमींच तफावत असते. संपूर्ण ध्येय सर्व समाजांत सर्वत्र आस्तित्वांत कधींहि असणार नाहीं. परंतु प्रथमतः ध्येयांत एकवाक्यता हवी. भारतियांची अशी विवाहविषयक एकवाक्यता होती. ही एकवाक्यता त्यांच्या शास्त्र, काव्य व कला या सर्वांत स्पष्टपणें दृग्गोचर होते, हें प्रथम प्रकरणावरून सहज समजून येईल. आज ही ध्येयांतील एकवाक्यता लुप्त होत आहे. विवाहाचें ध्येय काय असावें याबद्दलहि स्पष्टपणें एकवाक्यता कमी, मग तें गांठावें कसें, यासंबंधीं आचारांची एकवाक्यता कोठून असणार! निरनिराळ्या ध्येयांचा सध्यां झगडाच सुरू आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्राराष्ट्रांतील झगड्यांत निरनिराळे सामाजिक ध्येयवाद दृष्टीस पडतील, तर व्यक्तीव्यक्तींतील झगड्यांत दृष्टिकोनात्मक भिन्नत्व दृष्टीस पडेल. शिवाय अशी ध्येयात्मक एकवाक्यता जरी असली, तरी त्यापुढें ध्येय व आचार यांतील अपरिहार्य सनातन तफावत राहतेच. ती लक्षांत घेऊन आचार ठरवितांना सर्व समाज ध्येयात्मक आचाराचा बनावा म्हणून कायदे करावयाचे नसतात. आचारांच्या विविधतेमागील कार्यकारणसंबंध लक्षांत घेऊन जर आचारांत श्रेष्ठकनिष्ठ भाव उत्पन्न केला, तर समाजांतील ध्येयात्मक आचारांच्या कायदेबाजीनें उत्पन्न होणारे समाजांतील उत्पात कमी होतात. शिवाय श्रेष्ठ आचारांकडे व्यक्तींची प्रवृत्ति होत राहते. भारतियांची विविध सामाजिक आचारांकडे पाहण्याची ही बुद्धिगम्य दृष्टि होती. त्यामुळें वेश्याव्यवसायांतहि त्यांनीं कलोपासना करणाऱ्या गणिका उत्पन्न केल्या. यशस्वी विवाहांत त्यांनीं आड येऊं नये आणि श्रीमंतांची संपत्ति खेंचून गरिबांकरितां दानांत खर्च करवावी, असा धर्म त्यांना लावून दिला. ब्राह्म

विवाहपद्धति श्रेष्ठ ठरवून इतर कमी प्रतीच्या ठरविल्या. कायद्यानें ध्येयें लादणें कधींहि शक्य होत नाहीं. कायद्यानें ध्येयें लादण्यांत फक्त ध्येयांची आबाळ होते. कायदे पाळणेंहि अशक्य होतें आणि कनिष्ठ आचार भूमिगत होतात. सद्य:परिस्थितींतील दारूसंबंधीं कायद्यानें वरील विधान कोणासहि पडताळून पाहतां येईल. परंतु सामाजिक महत्त्वाचे कायदे कायदेमंडळांतून निर्माण होतांना ते कोणत्याहि मूलभूत अभ्यासांतून उत्पन्न झालेले नसून, कांहीं लोकांच्या लहरींतून उत्पन्न होत असतात आणि इतर सभासद या कायद्यांकडे पाहतांना पुष्कळ वेळां उदासीनच असतात.

**स्त्रीपुरुषसमानता :** स्त्री व पुरुष यांस समान भूमिकेंतून पाहावें यास आधुनिक दृष्टिकोन म्हणतात. परंतु समानत्वाचें तत्त्व किती ताणावें याबद्दल आजहि दुमत आहे. समानत्व याचा अर्थ स्त्रीचें पुरुषीकरण नव्हे, आणि पुरुषांना स्त्रैण बनविणें नव्ह. अशी मर्यादा सर्व विचारी लोक सर्व देशांत घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारतीय विचारांत स्त्रीची परिणति उत्तम गृहिणी व माता याच सदरांत गेल्यानें होते असें आहे. स्त्रीनें कुस्ती जिंकली व पुरुषानें नाटकांत स्त्रीचें काम केलें, यांत स्त्रीत्व व पुरुषत्व परिणत होत नसून, स्त्री मोठ्या पराक्रमी पुत्राची माता झाली व पुरुषानें पराक्रम केला यांतच त्यांचें खरें व्यक्तिमत्त्व दृष्टीस येणार आहे. यामुळें स्त्री व पुरुष यांतील मूलभूत महत्त्वाचें भिन्नत्व लक्षांत घेऊन भारतियांनीं स्त्रीपुरुषांस भिन्न प्रामाण्यें ( Standards ) लावलीं. यांत समानतेच्या तत्त्वांचा भंग केलेला नसून समता व विषमता यांचा मेळ घातलेला दिसतो.

**सद्य:स्थितींत तडजोड :** आतां सद्य:स्थिति बदलतां येणें अशक्य आहे. यांत्रिक युगांतून मागें जातां येत नाहीं. जीवनमान वाढलेलें कमी करणें आपल्या हातांत नाहीं. युद्धें टाळणें आपल्या शक्तीपलीकडचें आहे. शिक्षणापासून विवाहापर्यंत सर्वत्र चाललेली कायदेबाजांची ढवळाढवळ आपण मर्यादित करूं शकत नाहीं. मग करावयाचें काय ? भारतियांचा दृष्टिकोन मोठा बुद्धिगम्य होता, असे कौतुकाचे चार शब्द बोलून हें सर्व विसरून जाऊन, प्रवाहपतिताप्रमाणें ‘ होईल तें होईल ’ असें म्हणत बसावयाचें कीं काय ! भारतियांचा दृष्टिकोन कितीहि

बरोबर आहे असें धरून चाललें, तरी त्याचा प्रत्यक्ष उपयोग करण्याची कांहीं युक्ति आणि सद्य:परिस्थितीशीं कांहीं तडजोड सुचविणें अवश्य आहे. याकरितां खालीं सूत्रपद्धतीनें कांहीं मुद्दे लिहिले आहेत. शिवाय सद्य:परिस्थितींत शैक्षणिक योजना काय कराव्यात हें पण शेवटीं सुचविलें आहे. तें मागील सर्व चर्चेपासून सद्य:स्थितींत ध्येय लक्षांत ठेवून आचार उत्पन्न व्हावा, याकरितां काढलेले निष्कर्ष समजण्यास हरकत नाहीं.

**वैचारिक सुधारणा :**

यांत प्रथमत: वैचारिक सुधारणांची जरुरी फार आहे. योग्य विचार हा जर योग्य आचाराचा पाया आहे तर असा विचार प्रसृत करणें, हें सुशिक्षितांच प्रथमकर्तव्य ठरतें. सध्यां या विषयासंबंधीं अप्रगल्भ बुद्धिवादानें पसरलेली वैचारिक कमतरता भरून काढणें इष्ट आहे. विसाव्या शतकांत आपण शास्त्रीय प्रगति विसरूं शकत नाहीं, आर्थिक घडण बदलूं शकत नाहीं आणि स्त्रीसंबंधीं घडलेले सामाजिक बदल नाहींसे करूं शकत नाहीं. हें सर्व लक्षांत घेऊन, खालील विचारप्रणाली मांडली आहे.

शिक्षित समाजांत विसाव्या शतकांत विवाह यशस्वी करणें, ही जास्त कठिण समस्या आहे, हें प्रथमच लक्षांत घेतलें पाहिजे. विवाहांतील संस्थाप्रधान (Institution) तत्त्वावरील भर कमी होत असून, व्यक्तिप्रधान (Individualism) जास्त बळावत चालला असल्यानें, सद्य:कालीन परिस्थितींत वैवाहिक यश दूर जात आहे. हा दृष्टिकोनांतील बदल पाश्चिमात्यांपासून अनुकरणानें उचलला जात असून त्यांच्याकडेहि मागच्या शतकांत विवाह संस्थाप्रधानच असे, हें पूर्वी दिग्दर्शित केलेंच आहे.

पूर्वींच्या काळीं पुष्कळ अपेक्षा स्त्रीपासून असत. त्या तिला पुऱ्या करतां आल्या पाहिजेत असा हट्ट असे. त्या पुऱ्या करण्याशिवाय तिला तरणोपायहि नसे. आतां व्यक्तिप्रधानत्वाच्या शतकांत तशी परिस्थिति नाहीं. आतां स्त्रीसहि पुरुषापासून कांहीं अपेक्षा आहेत. हें एका दृष्टीनें योग्यच झालें. आर्थिक स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य यांमुळें स्त्री आतां संपूर्ण पुरुषावर अवलंबून नसल्यानें, तिला पुरुषाच्या संपूर्ण अपेक्षा पुऱ्या करण्याची जरुरी राहिली नाहीं. असेंहि म्हणतां येईल कीं, पूर्वी ज्या परिस्थितींत स्त्री होती, त्यामुळें पुरुषास कुबुद्धि सुचल्यास तो तिला गुलामा-

सारखें वागवून कोणताहि अन्याय तिच्यावर करूं शकत असे. ती परिस्थिति जाऊन आज स्त्रीवर अन्याय होऊं नये म्हणून काळजी घेतली जात आहे. हें सर्व जरी खरें, तरी स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्रीचें अन्यायपरिमार्जन, म्हणजे स्त्रीची पुरुषाशीं सर्व क्षेत्रांत स्पर्धा आणि तिचें पुरुषीकरण नव्हे हें लक्षांत घेणें, वैवाहिक जीवन व कुटुंबसौख्य यांस धरून जरुरीचें आहे, हें स्त्रीच्या मनावर ठसविलें गेलें पाहिजे. त्याचप्रमाणें पुरुष म्हणजे सर्वाधिकारी अशी परिस्थिति नसून स्त्रीसहि कांहीं अपेक्षा असतात, त्या ओळखून पुऱ्या करणें जरुरीचें आहे, अशी पुरुषांची वैचारिक स्थिति पाहिजे. यासंबंधीं खालील मुद्दे लक्षांत घेणें जरुरीचें आहे. भारतीय वैचारिक तत्त्वें खालीलप्रमाणें सारांशानें सांगतां येतील.

( १ ) चतुर्विध पुरुषार्थ ही मूलभूत कल्पना बुद्धिगम्य असून त्यास धरून ' आश्रम ' हा आचार भारतियांनीं सांगितला.

( २ ) अर्थ व काम या दोन शब्दांत त्यांनीं जगांतील मानवाच्या सर्व ऐहिक इच्छा आकांक्षा एकत्रित मांडल्या असून, त्यांना उपरिनिर्दिष्ट समाज व व्यक्तिगत ध्येयास धरून वळण लावण्याकरितां, अर्थ-कामाच्या मागें ' धर्म ' सांगितला आणि पुढें या आचारानें वासनातृप्ति घडल्यावर त्यास चवथा पुरुषार्थ ' मोक्ष ' हा सांगून प्रवृत्ति व निवृत्ति यांचा यथायोग्य मेळ बसविला.

( ३ ) काम-पुरुषार्थ म्हणजे ' यशस्वी विवाह ' हाच अर्थ शास्त्रकारांना अभिप्रेत असून, या यशाकरितां जीं कारणें व साधनें, त्यांचा योग्य परामर्श घेऊन, त्यांनीं या निश्चित ध्येयास धरून कांहीं आचार व संस्कार धर्म्य म्हणून सांगितले. वैवाहिक यश मुख्यतः ( १ ) सुप्रजा, ( २ ) रति, ( ३ ) व्यक्तिमत्त्वाची जुळणी या तीन गोष्टींवर अवलंबून असून स्त्रीपुरुषांचे सर्व वैवाहिक आचार या विचारप्रणालीस धरून आंखलेले दिसतात. याविरुद्ध ' आचार ' म्हणजे काम-वासनेचें कसेंहि, कोठेंहि व कोणत्याहि ध्येयास धरून नसलेलें अनिर्बंध संतर्पण असा अर्थ करून "**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।**" या एका ओळींतच धर्मविरुद्ध काम त्याज्य आहे. ' धर्म्य काम ' ग्राह्य आहे आणि हा धर्म-अविरुद्ध काम परमेश्वरस्वरूप आहे हा छातीठोक सिद्धांत भारतियांनीं मांडला.

( ४ ) भारतियांच्या मतें स्त्री व पुरुष हे कोणतीहि स्पर्धा करणारे घटक ( Units ) नसून, ते दोन परस्परावलंबी ( Interdependent ) आणि परस्परपूरक

( complementary ) घटक ( units ) आहेत. तेव्हां त्याच्यांत कोणतीहि स्पर्धा अभिप्रेत नसून त्या दोघांनीं मिळून कुटुंब निर्माण करणें आहे.

( ५ ) कुटुंब म्हणजे पतिपत्नी असा अर्थ अभिप्रेत नसून पति, पत्नी व प्रजा या तीनहि घटकांना धरून ' पुरुष ' असा शब्द वापरण्यांत आला आहे.

( ६ ) स्त्रीस कोणत्याहि तऱ्हेनें हीन लेखणें भारतियांस मान्य नसून ' प्रजोत्पादन ' व ' गृहसौख्य ' उत्पन्न ' करणारी ती ' गृहदीप्ति ' आहे. अतएव तिची योग्य ती जोपासना व संरक्षण हें पुरुषघटकाचें कर्तव्य आहे, असा भारतियांचा दृष्टिकोन आहे.

( ७ ) स्त्री व पुरुष यांत मूलभूत भिन्नत्व ( difference ) असून तें शारीरिक, मानसिक आणि त्यास धरून भावनात्मकहि असल्यानें, दोघांस समान ' धर्म ' वा आचार नसावा, असें भारतियांचें म्हणणें. शिवाय प्रजोत्पादनाची मुख्य जबाबदारी स्त्रीघटकांवर असल्यानें स्त्रीधर्म पुरुषासारखे ठेवणें योग्य होणार नाहीं. स्त्री-पुरुषांचें व्यक्तिगत व एकत्रित सुख यास धरून आहे, असा त्यांचा दृष्टिकोन आहे.

( ८ ) यशस्वी विवाह ही कालावधीनें होणारी उत्क्रांति आहे. त्याकरितां निश्चित ध्येयाचार काय असावेत, याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें आहे. ध्येय हें कायद्यानें उत्पन्न होणारी बाब नसून, कष्टानें व कालानें उत्पन्न होणारें आहे.

( ९ ) मानवधर्मशास्त्राचे कायदे करतांना त्यांची दृष्टि विशाल पण ध्येयनिष्ठ होती असें दिसतें. निसर्गाचें वैविध्य ( Natural Variation ) ही गोष्ट परिस्थिति ( Environment ) आणि व्यक्ति ( Individual ) यांमुळें अटळ व अपरिहार्य असल्यानें, मानवाची एकंदर वर्तणूक आंखतांना किंवा त्यांत सवलती देतांना, त्यांना ही विशाल दृष्टि ठेवणें इष्ट वाटलें. त्याबरोबरच ही विविधता असूनहि माणसास त्याचें एक निश्चित ध्येय प्राप्त करून घेण्यास सवड मिळावी अशी व्यवस्थाहि त्यांना ठेवणें जरूर वाटलें. परिस्थितिजन्य वैविध्यांत मनुष्यप्राणी ज्या स्थितींत सांपडेल त्या स्थितींत त्यास स्थान प्राप्त करून देऊन वरच्या पायरीवर किंवा इयत्तेंत चढण्याची इच्छा व्हावी आणि प्रयत्न केल्यास चढतां यावें अशी ही योजना आहे. या योजनेस धरून कामवासनेसंबंधीं ' यशस्वी विवाह ' हें ध्येय,

त्यास धरून जरूर तो ध्येयाचार ( Ideal monogamy ) सांगून, विविध आचारांत मूळ ध्येयास न सोडतां श्रेष्ठकनिष्ठ आचार परिस्थितिप्रमाणें ग्राह्य धरले.

(१०) स्त्री ही संरक्षणीय आहे या मुद्द्यास धरून भारतियांनीं घटस्फोट त्याज्य ठरविला. घटस्फोट त्याज्य हा भारतियांचा दृष्टिकोन एका बाजूनें घ्यावयाचा आणि सुप्रजा व विवाह यांचा भारतीय साध्यसाधनभाव संपूर्ण विसरून पाश्चिमात्य स्वरूपाची नक्कल येथें ' हिंदु लॉ ' या नांवाखालीं करावयाची हें आपल्या बौद्धिक गुलामगिरीचें निदर्शक ठरतें. कामवासनेसंबंधीं ध्येय, ध्येयाचार आणि प्रत्यक्ष विविधतेस धरून आचारभेद लक्षांत घेऊन भारतियांनीं कायदे केलेले दिसतात.

(११) स्त्रीशिक्षण जुन्या भारतांत होतें. फक्त स्त्रीस शिकविण्याचीं शास्त्रें व कला या ' गृहसौख्य ', ' कुटुंबसौख्य ', ' स्त्रीपुरुषसंबंधांतील नैपुण्य ' आणि ' मनसोल्हास ' यांस धरून असत. त्यांत पुरुषी खडतर बुद्धीची कसरत त्यांना करावी लागूं नये अशी त्यांची विचारसरणी होती.

(१२) वरील परिच्छेदांत दिलेला विचार ही भारतियांची मूलभूत विचार-सरणी असून ती पुष्कळच खऱ्या अर्थानें बुद्धिगम्य आहे. वरील विचारसरणीचें सम्यग्ज्ञान आज विश्वविद्यालयांतून दिलें जात नाहीं. मनुष्याच्या वासनांना कांहीं वळण देणें जरूर आहे, पदार्थविज्ञान, रसायन आणि भाषा यांबरोबरच आपलें सुख-समाधान कशांत आहे, याविषयीं कांहीं शिक्षण जरूर आहे, असें आमच्या पुष्कळ मंडळींना आज पटत नाहीं. विशेषतः जुनी धर्मश्रद्धा नष्ट करण्याचा सारखा खटाटोप असतांना, भावनांना वळण द्यावें कसें हा खरा विचार आहे. पूर्वी दर्शविल्याप्रमाणें एकट्या यू. एस्. ए. मध्येंच पुष्कळ विश्वविद्यालयांतून हा विषय आतां शिकविला पाहिजे असें समजून आलें आहे. एवढेंच नव्हें तर प्रत्यक्ष आज हा विषय शिकविला जात आहे. कांहीं सुंदर पुस्तकेंहि या विषयावर बाहेर येत आहेत. आमच्या विश्व-विद्यालयांत हा विषय केव्हांतरी घेणें क्रमप्राप्त होईल. फक्त त्यांत यशस्वी विवाहाच्या भारतीय खऱ्या बुद्धिवादी दृष्टिकोनाची निदान योग्य माहिती तरी द्यावी. या विषयावर भारतीय संस्कृति इतर संस्कृतींस कांहीं नवीन दृष्टि देईल, एवढें ज्ञान भारतियांना होतें, एवढें जगापुढें आणल्यास पाश्चिमात्य शास्त्रज्ञहि भारतीय संस्कृतीच्या या पैलूकडे आदरानें पाहूं लागतील; किंबहुना, त्यांच्या याविषयींच्या

ज्ञानास हें फार पूरक होईल, अशी आमची खात्री आहे. यानंतर सद्यःपरिस्थितींत आचार कसा काय करतां येईल, साधारण त्या आचारास वळण देण्यास काय ध्येय दृष्टिसमोर ठेवलें पाहिजे यांबद्दल विचार करणें जरूर आहे. त्यांत विवाहपूर्व व विवाहांतर्गत असे भाग कल्पितां येतात.

**विवाहपूर्व आचार :** विवाहपूर्व आचारांत ब्रह्मचर्यास महत्त्वाचें स्थान आहे. ब्रह्मचर्य म्हणजे फक्त विवाहपूर्व वयांत लैंगिक आचार नसणें असा अर्थ नसून, हें एक पुढच्या आयुष्यास लागणाऱ्या सर्व प्रकारच्या तयारीचें व्रत आहे. त्यांत निरनिराळ्या विद्यांचें अध्ययन आहे. एवढेंच नव्हे तर मनुष्याच्या मानसिक भावनांस व आकांक्षांस वळण लावून घेण्याकरितां हा काल आहे. त्यानें गुरुजनांशीं आचार काय ठेवावा, स्त्रियांशीं आचार कसा असावा, इष्टमित्रांत त्यांची वागणूक कशी असावी, कामक्रोधादि भावना ताब्यांत ठेवण्यास काय करावें, इत्यादि स्वतःच्या समाधानास शेवटीं जें कारणीभूत वळण आहे, तें ग्रहण करण्याची ही दशा आहे. कामोद्दीपनाचीं साधनें पुरुषांनीं शक्यतों वर्ज्य करावीं हें बरें. कुविवाहानें कुळें नष्ट होतात. धर्मविरुद्ध अर्थ व काम हे दोन्ही योग्य नव्हेत. आपल्या पुष्कळ परंपरा चांगल्या आहेत. त्या सहज टाकून देऊं नयेत. आतां यापुढें मी ब्राह्मणकुळांत जन्मास आलों आणि वाटेल तसा वागलों तरी मी सर्वांपेक्षां श्रेष्ठ, हें म्हणण्याचे दिवस गेले. मनूनेंहि जन्म व उच्च आचार, हे दोन्ही ब्राह्मणत्वास जरुरीचे सांगितले आहेत. उच्च आचार जी व्यक्ति दाखवील, ती ब्राह्मणत्वास यापुढें पात्र होईल. नुसता ब्राह्मणजन्म नव्हे किंबहुना ब्राह्मणत्व म्हणजे उच्च आचार एवढेंच तत्त्व कदाचित् शिल्लक राहील. कारण बाकी सर्वच विश्वविद्यालयांतून शिक्के घेऊन बाहेर पडलेले दिसतील. पोटभरू विद्या ही सर्वांची सारखीच राहील. तात्पर्य, ब्रह्मचर्याश्रमांत हा उच्च आचार व विचार पचवून स्वतःस कांहीं वळण लावून शिवाय जरूर तें अर्थार्जनास योग्य असें ज्ञान संपादन करण्याचें हें वय आहे.

( २ ) दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विवाहासंबंधीं जरूर ती माहिती या वयांत घेणें जरुरीचें आहे. त्यांत प्रेमविवाहाचे फायदेतोटे, विवाहांत काय गोष्टी महत्त्वाच्या असतात, कोणत्या वयांत विवाह करणें योग्य, वगैरे सर्व आचारांची माहिती येते. त्यास धरून खालील मुद्दे लक्षांत ठेवणें जरूर आहे.

( ३ ) शक्यतों प्रेमविवाहांत पडूं नये. ब्राह्म विवाहपद्धति हीच चांगली आहे.

(४) प्रेमविवाहांत पडण्याचा प्रसंग आल्यास कोणाहि आपल्यापेक्षां वडील पण हितचिंतक अशा व्यक्तीकडून आपण पसंत केलेल्या मुलीसंबंधीं वा मुलासंबंधीं जास्त माहिती व विचार करवून घ्यावा व दोन्ही पक्ष नीट ऐकावे हें चांगलें. म्हणजे मागाहून दोष राहात नाहीं.

(५) विवाहाचें वय हें ध्येयाचार म्हणून जरी कांहींहि सांगितलें असलें, तरी 'अर्थ' या कारणानें त्यावर परिणाम होणें अटळ आहे. तरी यशस्वी विवाह या दृष्टीनें व 'अर्थ' हें कारण जेथें आड येत नसेल अशा कुटुंबांतून विवाहाचें वय महत्त्वाकांक्षा म्हणून वाढविण्याचें टाळल्यास बरें.

(६) मुलींबाबत शिक्षण ही गोष्ट वयास धरून आहे कीं नाहीं, एवढेंच पाहावें. मुलीला हें समजावून देणें जरूर आहे कीं, उत्तम विवाहाची संधि व शिक्षण यांत प्रथम स्थान उत्तम विवाहाची संधि या गोष्टीस देणें जरूर आहे.

(७) स्त्री व पुरुष यांत साधारण ७ ते १० वर्षें अंतर असणें चांगलें. 'प्रजोत्पादन' या हेतूनें आर्थिक कारणामुळें वा इतर कारणांनीं विवाह उंच वयांत करावयाचा प्रसंग आल्यास व प्रजोत्पादन हें विवाहाचें साध्य असल्यास, हें अंतर जास्तहि ठेवण्याची शास्त्रीय दृष्ट्या जरुरी उत्पन्न होते.

(८) विवाहपूर्व साधारणतः वधूवरांचें आरोग्य व कुल यांसंबंधीं जरूर ती माहिती उपलब्ध करून घेणें आवश्यक आहे. हल्लीं युरोपीय देशांत वधूवरांची कांहीं मूलभूत गोष्टींसंबंधीं वैद्यकीय तपासणी असावी, असें मत प्रसृत होत आहे. आमच्या मतें वैद्यकीय तपासणीचा उपयोग कांहीं गोष्टींत निश्चित होऊं शकेल असेंच आहे. स्त्रीच्या प्रजोत्पादनक्षमतेसंबंधीं जरी हा उपयोग फार होईल असें नाहीं, तरी पुरुषाच्या बाबतींत मात्र निश्चित कांहीं अपघात टळण्याचा संभव आहे. कुलांतील आनुवंशिक दोष व इतर कांहीं आरोग्यासंबंधीं महत्त्वाचे दोष नसणें, विवाहाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें असतें.

**विवाहांतर्गत विचार :**

(१) विवाहांतर्गत 'काम-पुरुषार्थ' मिळविण्यास 'आरोग्य' हें प्रथम कारण आहे. 'मनसोल्हास' हें दुसरें महत्त्वाचें कारण आहे आणि अर्थ हें तिसरें कारण आहे हें लक्षांत ठेवावें. नुसत्या अर्थानें सुखप्राप्ति होत नाहीं. उलट प्रथम दोन गोष्टी जर १०० टक्के असल्या तर अर्थ हा कधींच विवाहांतर्गत सौख्याच्या आड येऊं शकत नाहीं हें लक्षांत ठेवावें.

( २ ) विवाह हा संस्कार उत्तम असून तो अर्थ समजावून घेऊन वैदिक तऱ्हेनें करावा, हें चांगलें.

( ३ ) विवाहानंतर पहिल्या दोन वर्षांत प्रजोत्पत्ति व्हावी. कोणत्याहि कृत्रिम संततिनियमनाच्या साधनांचा उपयोग मनांत आणूं नये. अर्थ, शिक्षण, वगैरे कोणतेंहि कारण यांत आड येऊं देऊं नये.

( ४ ) प्रथम दोन वर्षांत जर सरळपणें गर्भधारणा झाली नाहीं, तर ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे असें समजून त्यासंबंधीं चांगला वैद्यकीय सल्ला घ्यावा.

( ५ ) वैद्यकीय सल्ला योग्य मिळावा याकरितां या विषयाचा अभ्यास केलेल्या मंडळींनीं चालविलेलीं 'स्टरिलिटि क्लिनिक्स' ( Sterility clinics ) आपल्याकडे शास्त्रीय पद्धतीवर चालू केलीं पाहिजेत. या केंद्रांत संततिहीनत्वाचीं कारणें व उपाय, यांवर शास्त्रीय माहिती या देशांत गोळा होणें आवश्यक आहे.

( ६ ) ज्याप्रमाणें पुरुषास बाहेर धंद्यांतील यशाकरितां कांहीं उमेदवारी करावी लागते त्याप्रमाणें स्त्रीसहि विवाहांत यशप्राप्तीकरितां कांहीं उमेदवारी करणें आवश्यक आहे असें समजणें बरें. या उमेदवारीच्या कालांत तिनें नवीन घर, त्यांतील माणसें, त्यांचे विचार आणि पतीचा स्वभाव, त्यांतील गुणदोष जाणून घेण्याचा व त्यांत समरस होण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे.

( ७ ) कुटुंबनियोजनाची चळवळ देशांत 'लोकसंख्या फार वाढली' 'त्यांना खायला कोण घालणार ?' वगैरे नेहमींचीं तत्त्वें पुढें करून जोरांत चालू झाली आहे. लोकसंख्येचे प्रश्न उष्णतामानाइतके सोपे नाहीत. त्यांचें समीकरण होऊं शकत नाहीं, असें मागें दर्शविलेंच आहे. तरीहि कुटुंबनियोजनांत मूलतत्त्व 'प्रजोत्पादन' करूं नये असें नसून, प्रजोत्पादन आपल्या परिस्थितीप्रमाणें व स्त्रीच्या आरोग्यास धरून नियंत्रणानें करावें, हें आहे. त्यांत साधारण दर कुटुंबांत चार मुलें येतात, कीं ज्यांत एक तरी मुलगा असावा. दोन मुलांत स्त्रीची प्रकृति व परिस्थिति या दोहोंस धरून कांहीं अंतर ठेवणें जरूर आहे. संततिनियमनाचीं साधनें वापरणें अपरिहार्य आहे. पण त्याबरोबर पहिलें मूल होईपर्यंत मात्र या साधनांचा उपयोग करूं नये असा स्पष्ट इशारा पूर्वी दिलाच आहे. स्त्रीसंबंध नियंत्रित ठेवणें शेवटीं हितावह आहे. तेव्हां तसा प्रयत्न ठेवावा.

( ८ ) स्त्रीनें अर्थोत्पादन व बौद्धिक कार्यांत प्रजोत्पादनाच्या कालांत शक्यतों कमी भाग घेणें चांगलें. यानंतर जरुरीप्रमाणें विविध परिस्थितीस तोंड देणें अपरिहार्य आहे. पण हें तत्त्व पटलें तर तें ज्यांना अंमलांत आणतां येईल, त्यांनीं आणण्याचा यत्न करावा.

( ९ ) प्रजोत्पादनाचें कार्य स्त्रीच्या तिसाव्या वर्षाच्या आंत व पुरुषाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत संपावें हें बरें. म्हणजे त्यांत पुढील संसाराची जबाबदारी संपविण्यास मदत होते.

(१०) जो विवाह प्रजोत्पादनक्षमतेसंबंधीं पुष्कळ वर्षांपर्यंत वैद्यकीय उपचार इत्यादि केल्यावरहि अयशस्वी ठरेल, तेथें दुसरा विवाह करण्याची शक्यता प्रथम पत्नीच्या सहकार्यानें लक्षांत घेणें इष्ट ठरण्याचा संभव असतो. कायद्याची योग्य ती सुधारणा याबाबत होणें जरूर आहे.

हल्लींचे कायदे लक्षांत घेतां तात्पुरती सूचना एवढीच करतां येईल कीं, अशा विवाहांत स्त्रीपुरुषांस त्यांच्या इच्छेनें घटस्फोटास परवानगी मिळावी. हें सर्व त्यांच्या इच्छेवरच सोडणें जरूर आहे. कारण विवाहांतर्गत सर्व भावना कोर्टांत मांडणें किंवा पुराव्यानें सिद्ध करणें शक्य नसल्यानें घटस्फोट घेणें असल्यास परवानगी ठेवली म्हणजे बाकी सर्व कौटुंबिक जुळवणी जो तो आपापल्या परिस्थितीप्रमाणें करून घेईल.

(११) विवाहांतर्गत ‘प्रजाहीनत्व (Infertility) ही गोष्ट वाटते इतकी पुढारलेल्या समाजांत थोडी नाहीं. प्रजाहीनत्व हें तुलनात्मक असतें. (Comparative infertility) १० ते १५ वर्षांनीं एखादी गर्भधारणा स्त्रीस होणें, म्हणजे ती सुप्रज (Fertile) आहे असें मुळींच नव्हे. तेव्हां ६ ते ८ वर्षें प्रजाहीन ठरविण्यास मर्यादित आयुष्याच्या दृष्टीनें पुरेशीं आहेत. प्रत्येक कुटुंबांत, विशेषतः विद्या, बुद्धि व कर्तृत्व इत्यादि ज्यांत विशेष दृष्टीस पडतें, अशा कुटुंबांत कांहीं कमींत-कमी संतति पाहिजेच असा आग्रह धरूनदेखील इतिहास हेंच दर्शवील कीं, अशीं अनेक कुटुंबें निष्प्रज झालीं आहेत. कर्तृत्ववान् पुरुषांचें वंशसातत्य पिढ्यानपिढ्या दाखविणें, ही गोष्ट आम्हांस सर्वांत कठिण वाटते. परंतु यांवरच राष्ट्राचें श्रेष्ठत्व शेवटीं अवलंबून असण्याचा संभव फार आहे. म्हणूनच ‘वंशसातत्य’ हें मूल्य

भारतियांनीं फार कसोशीनें समाजांत स्थिर केलें होतें. समाजांत उत्तम संततीची शाश्वती ठेवण्यासाठींच विवाह व पातिव्रत्य या योजना आहेत. ‘ **दारानपत्याय** ’ हें विवाहसंस्थेचें मूळ कोणीहि नाकबूल करूं नये.

(१२) सध्यांच्या देशांतील एकंदर विवाहविषयक कायद्यांवर पाश्चिमात्यांच्या बौद्धिक गुलामगिरीची छाप बसलेली आढळते आणि ‘ **दारानपत्याय** ’ हा साध्यसाधनभाव न समजल्यानें, हे कायदे हिंदु संस्कृतीस विघातक ठरणार आहेत. यामुळें पाश्चात्यांत ज्या कुमारी माता, अयशस्वी विवाहांची संख्यावाढ, बेकायदेशीर मुलें इत्यादि समस्या निर्माण झाल्या आहेत, त्याच येथेंहि होत आहेत. तेव्हां हे कायदे हिंदु संस्कृतीचें मर्म लक्षांत घेऊन सुधारले पाहिजेत. परंतु तें आपल्या हातांत नाहीं. तेव्हां समाजानें जुनी परंपरा श्रद्धेनें अस्तित्वांत ठेवल्यास कायदा त्यांचें कांहींहि नुकसान करूं शकणार नाहीं. भारतीय व पाश्चिमात्य दृष्टिकोनांतील भिन्नत्वांत उत्पन्न होणारें आचाराचें भिन्नत्व पूर्वीं स्पष्टपणें दर्शविलें आहे. भारतीय आचारांत कुमारी माता इत्यादि प्रश्न येतच नव्हते. आतां पाश्चिमात्यांतहि ‘ बेकायदेशीर ’ मुलें मानूं नयेत, अशी सुधारणा येत आहे. पाश्चिमात्य दृष्टिकोन घेतल्यास, आपल्याकडेहि हीच प्रगति दृष्टीस पडेल.

(१३) सामाजिक कायदे करण्याच्या भानगडींत हल्लींच्या कायदेमंडळांनीं पडूं नये हें बरें; पण त्यांना राहवतच नसेल, तर निश्चित आनुवंशिक रोग असणाऱ्या व मानसिक विकृतीच्या रोग्यांना संततिप्रतिबंध करतां येईल, अशा कांहीं योजना घेतल्यास समाजाच्या दृष्टीनें त्या जास्त उपयुक्त ठरण्याचा संभव आहे.

(१४) धर्मश्रद्धा ही चेष्टा करण्यासारखी गोष्ट नव्हे. भावनांचें वळण व नियंत्रण श्रद्धेनेंच होऊं शकतें. तें बुद्धिवादानें वा राष्ट्रवादानें होणार नाहीं. शिवाय बुद्धिवादानें नीतीचे आचार तसेच कां करावेत, हें पण सांगणें कठिण; याकरितां ‘ कामवासना ’ काबूंत ठेवण्यास धर्मश्रद्धेचा उपयोग आहे, हें लक्षांत आणावें.

(१५) मत्सर आणि द्वेष या दोन्ही भावना भारतियांनीं कुटुंबांत अत्यंत त्याज्य मानल्या आहेत. किंबहुना राष्ट्र वा कुल दोन्ही ठिकाणीं या भावनांचा नंगा नाच काय करूं शकणार नाहीं ? तेव्हां या भावना स्त्रींत असोत वा पुरुषांत असोत दंड्य असून, प्रेम हीच भावना वाढीस लावावी हें योग्य. ज्यामुळें मनसोल्हास वाढेल तें

योग्य व ज्यामुळें तो कमी होईल तें अयोग्य समजावें. अर्थात् यांत वर्तणुकीचे इतर नियम राहतीलच.

वरील एकंदर सारांश हा हल्लींच्या परिस्थितीस धरून यशस्वी विवाह, व्यक्तिगत सुख आणि त्यांतील सामाजिक व कायद्याचे प्रश्न यांस धरून पुरेसा आहे; ज्यास शक्य होईल त्यांनीं हल्लीच्या परिस्थितींतहि आचाराची काय योजना ठेवावी हें त्यावरून समजेल आणि खरी सुधारणा करणें असल्यास दिशा कोणती राहावी, हें पण यावरून उमगेल.

सुप्रजा व कर्तृत्ववान् वंशांचें 'वंशसातत्य' हा एक थट्टेचा व कुचेष्टेचा विषय नाहीं. यावरच कर्तृत्ववान् व विजिगीषु राष्ट्रांचें भवितव्य अवलंबून असतें आणि हें मूल्य टिकवून धरणें हेंच खऱ्या उत्तम कुटुंबसंस्थेचें खरें गमक असून अशी कुटुंबसंस्था हीच राष्ट्राचा खरा भरीव पाया होऊं शकेल. ती स्त्री व पुरुष यांनीं त्यागानें उत्पन्न करण्याची व टिकविण्याची गोष्ट आहे. भावनांच्या भराऱ्यांत व कुवासनांच्या तडाख्यांतून जपून आयुष्याचें तारूं हें व्यक्तीच्या समाधानाच्या, राष्ट्रोत्कर्षाच्या व कृतार्थत्वाच्या दिशेनें हांकण्यास मदत देण्याकरितांच 'चतुर्विध-पुरुषार्थ' ही अत्यंत शास्त्रीय चतुःसूत्री भारतियांनीं कष्टानें व अनुभवानें निर्माण करून, स्थलकालनिरपेक्षत्वानें जे जे मानवसमाज या कल्पनेचा उपयोग करतील, ते अमृतत्वाला, अर्थात्, अभ्युदय-निःश्रेयसाला प्राप्त करून घेतील, असा भारतियांचा सिद्धांत आहे. हेंच त्यांचें मानव-शास्त्रासंबंधींचें संशोधन. हाच तो त्यांचा सर्व मानवशास्त्रें धुंडाळून मानवाच्या संतोषाकरितां उत्पन्न केलेला 'ॲटम बॉंब'. ही कल्पना जर मानव-समाजांत पचवतां आली, तर सुखसमृद्धि उत्पन्न होईल. न आल्यास जडशास्त्रांच्या जबर वरवंट्याखालीं आणि त्यांतून उत्पन्न झालेल्या भस्मासुरी संस्कृतीखालीं त्यांचा चुराडा झाल्यास नवल काय ? वसिष्ठ ऋषींनीं श्रीरामचंद्रास जें अध्यात्मविषयक तत्त्वज्ञान सांगितलें, त्या योगवासिष्ठ ग्रंथांतील खालील श्लोक वाचकांस उद्बोधक ठरेल.

**" शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहंती वासनासरित् ।**
**पौरुषेण प्रयत्नेन योजनीया शुभे पथि ॥ "**

शुभाशुभ मार्गांनीं पळणारी वासना ही एक नदी आहे. स्वप्रयत्नानें ती शुभ मार्गानें नेल्यास तींतूनच आनंदवनें लागतील, समाधानाच्या बागा फुलतील,

नाहींतर वैराण वाळवंटांतून जातां जातां, जाणारा तर थकेलच व ही नदीहि आटून जाईल. यांत बराच गर्भितार्थ आहे. असो.

शेवटीं हल्लींच्या परिस्थितींत काय दिशा घ्यावी, म्हणजे कदाचित् सर्व गाडी योग्य रुळावर येण्याचा संभव आहे, याबद्दल मागील सर्व चर्चेस धरून आम्ही खालील सूचना सूत्ररूपानें वाचकांपुढें मांडतों. त्यांचा परामर्श अभ्यासू, समाजसुधारक, विद्यापीठाचे विद्वान् व राजकारणधुरंधर यांनीं घेतल्यास प्रगति निश्चित होईल.

( १ ) विश्वविद्यालयांत 'विवाह' हा विषय प्रौढ मुलामुलींच्या शिक्षणांत घालावा. तो ऐच्छिक असावा कीं नाहीं, वगैरे मुद्यांचा विचार तत्त्व मान्य झाल्यास कठिण नाहीं. आपणांस अमेरिकेचें अनुकरण करणें आहे असें जरी धरलें, तरीहि ही गोष्ट फार कठिण जाऊं नये.

( २ ) कुटुंबनियोजन म्हणजे कुटुंबनाश नव्हे. तेव्हां कुटुंबनियोजनाबरोबरच विवाहविषयक यशस्वी विवाहाच्या दृष्टीनें सल्ला देणारी संस्था ( Marriage counselling ) सुरू करावी. यांत माणसें कशीं असावींत, त्यांचें कार्य किती विविध असावें, हा सूक्ष्म विचार. पण हें तत्त्व मान्य होण्यासहि फार अडचण पडूं नये. 'गृहशिक्षण' ही संस्था रद्द झाल्यावर तें भरून काढण्यांत योग्य सामाजिक कार्यच हातीं घेतल्यासारखें होणार आहे.

( ३ ) या विषयावर योग्य व पद्धतशीर अभ्यास, लेख व ग्रंथ प्रकाशनास मदत करणें जरूर आहे.

( ४ ) कायदेमंडळाच्या सभासदांना विवाह व तत्संबंधीं सामाजिक विषयांवर माहिती व सल्ला देण्याची जरुरी आहे. त्याचा उपयोग भारतीय दृष्टिकोन समजून सामाजिक कायदे करण्यास होईल. शिवाय आधुनिक शास्त्रहि यासंबंधीं काय विचार करतें हें त्यांना समजेल.

( ५ ) या विषयासंबंधीं भारतीय संस्कृतीच्या पैलूंचा अभ्यास शास्त्रपद्धतीनें होण्याची आवश्यकता आहे. त्याबरोबरच पाश्चिमात्य समाजांतहि तौलनिक अभ्यास महत्त्वाचा ठरेल. तेव्हां हा सांस्कृतिक अभ्यास ( Cultural Studies ) उत्पन्न व्हावा, म्हणून खटपट करणें योग्य आहे. ती केल्यास भारतियांचे हे सामाजिक शोध पाश्चिमात्यांसहि उद्बोधक झाल्याशिवाय राहाणार नाहींत.

# Appendix

## A Note on the importance of the study of Differential Fertility in India.

[ *This note is being submitted to the Family Planning Commission for consideration.* ]

As early as in the year 1892 in the preface to his celebrated treatise on ' Hereditary Genius ', Sir Francis Galton seems to have first alluded to the problem in the following words:—

" The whole question of fertility under the various conditions of civilised life requires more detailed research than it has yet received. It is certain that the productiveness of different marriages differs greatly in consequence of unexplained conditions. The variation in fertility of different kinds of animals that have been captured when wild and afterwards kept in menageries is, as Darwin long since pointed out, most notable and apparently capricious. The majority of those which thrive in confinement and apparently enjoy excellent health, are nevertheless absolutely infertile, others, often of closely allied species, have their productivity increased. One of the many evidences of our great ignorance of the laws that govern fertility is seen in the behaviour of bees, who have somehow discovered that merely modifying the diet and the size of the nursery of any female grub, they can at will cause it to develop, either into a naturally sterile worker, or into a potential mother of a huge hive. " He further proceeds to define the problem in the human race as follows:—

"As an example of what could be sought with advantage, let us suppose that we take a number, sufficient for statistical purposes, of persons occupying different social classes, those who are the least efficient on physical, intellectual and moral grounds, forming our lowest class and those who are the most efficient forming our highest class. Do those persons who have honourably succeded in life and who are presumably on the whole, the most valuable portion of our human stock, contribute on the aggregate their fair share of posterity to the next generation?"[1] Enough is now known to state that the fertility differs in different classes.

The problem of fertility assumes importance owing to tha fact that many of the mental, physical and pathological characters are inherited. This fact does not appear to be sufficiently appreciated by the policy-makers on population problems of many states as regards its far-reaching effects on the general population trends of the efficient, mentally endowed and physically fit as compared with the less endowed and defectives.

Prof. Karl Pearson many years ago, gives in one of his lectures the fertility data of the pathological, normal, and intellectual families in England, and concludes, "It is once more obvious that degenerate stocks (deaf-mutes, tuberculouis, insane and criminals) under present social conditions are not short-lived. They live to have more than the normal size of the family. On the contrary, there is more than a suspicion of the suspension of the fertility of the fit."[2] The factors of Natural selection are suspended owing to the artificial conditions of the civilisation in which we live, owing to philanthropic and state measures to protect not only such pathological persons, but also owing to neglect to see that they do not leave a defective progeny which further increases a drain on the national income. On the contrary the comparative

infertility amongst the intellectuals is practically neglected. Dr. Heron, in an analysis of the birth–rates for London Boroughs further showed that the correlation of high birth–rate with lower social class had almost doubled between 1851 and 1901.[3]

It is now widely accepted that the birth–rates differ significantly not only in different families but in the different sections of the community. Intelligence has been one of the factors of intensive study in England and other countries and the conclusions have been reached which demonstrate low fertility in the highly intelligent. Sir Cyril Burt states for example that " It seems almost certain that there is in this country a negative correlation between innate intelligence and size of the family and that the size of the correlation is large enough (about -0.20) to demand urgent practical attention."[4]

These ' differentials ' in the fertility rates in the different sections of the society have been receiving special attention of the thinkers now as they are likely to affect the general ability and efficiency of the community under consideration. Considerable information is now pouring in from other countries regarding the ' differentials ' in the fertility or differential birth-rates and various factors which produce ' differentials ' are under study. For example, intensive research in the field of differential fertility according to socio-economic levels began in America in 1920. Series of reports have been publishrd based on the study conducted by the committee on social and psychological factors affecting fertility, sponsored by the Milbank Memorial Fund with grants from the Carnegie Corporation of New York. This committee formulated twenty-three ' hypotheses ' for investigation in this study. The factors like socio-economic conditions, were

found to be highly important in affecting fertility. In essence, factors related to socio–economic states can be reduced to three basic phenomena " Financial position, " ' Occupation ' and ' Education '.

The degree to which such individual factors interfere fertility is yet unknown. Even subjective factors can be studied as can be seen from the typical subjective hypothesis found by the Indianapolis study committee. " The greater the difference between the actual level of living and the standard of living desired, higher the proportion of couples practicing contraception effectively and smaller the planned families. "[6]

The competition, the sense of insecurity, personality manipulations, anxieties, tensions on nervous and physical energies, all these factors, which are concerned with the desired rise in the socio – economic status reflect adversely on the fertility of the family. Their desire to rise is termed in one phrase " Process of vertical motility ". A few studies conducted in Europe and in England so far indicate that those who have moved up have the smallest families and those who have moved down have the largest families.[7] This study is supposed to be the first undertaken by the Population Investigation committee and the Nuffield Research Unit of the London School of Economics. The subjective feelings involved in the desire to rise in the socio – economic status is closely linked up with the ambitions and aspirations of the intelligent and capable young persons in any society and this is a virgin field of research in fertility as it may be affected by such highly subjective factors.

The above discussion is enough to show that the fact of differential fertility is attracting enough attention from the point of view of its particular importance as ragards the

...२०

effects this fact may have on the national efficiency standards of any nation. Why is it all the more necessary to study the same in this country?

The population policies of states are often based on the assumption that population can be increased or decreased at will, with certain measures of increase or decrease. This assumption itself is open to doubts. It is now welkhown that the falling birth–rates of some countries, in which policy of population–rise was followed, did not sufficiently rise and the policies were not successful as desired. In fact, when the present author was discussing this problem with late prof. Mcbain of the National Chemical Laboratory the latter ably summarised the situation in a phrase, "The whole problem is simply mechanical and there is very little scientific about it." Scientific knowledge of any phenomenon presumes enough knowledge regarding the factors affecting any phenomenon together with the knowledge of exact measures which would effectively control the same. The ideal of "Optimum population" as defined by the economic experts is simply an ideal, as defined from the economic point of view and has a comparatively unsound basis on the grounds of scientific knowledge, necessary to regulate and control the phenomenon of the rise and fall of populations. No less an authority than Lord M. Keynes has admitted that, "The Theory of economics does not furnish a body of settled conclusions immediately applicable to policy". Prof. I. Bowen adds in his preface to the book on 'Population' that 'The connection between economic development and population is not simple. The classical economists bravely undertook to define the connection. When their generalisations had been exposed by events as over–simplifications, economists began to drop the discussion or merely restate the older doctrines."[8]

The mechanical aspects of the problem lie in the knowledge of mechanical obstruction to conception or destruction of the germ–plasm. It is submitted that unless all the factors underlying differential fertility are adequately exposed, and the knowledges of the measures necessary to control them is gained, it is only an adventure to frame bold state policies on population problems.

In fact some students on population have held that these differentials have arisen owing to the unevenly diffused knowledge of contraception in any population.[9] A. J. Jaffe has studied the differential fertility in the white populations in early America. As far as the data indicate, he states as one of the important implications of the same that, " These differentials existed prior to the introduction of modern contraceptive practices. "[10] The second implication of this study is that those differentials existed long before they were recognised. Jaffe thinks that they must have been developing since the beginning of the 18th. century, as it should take almost 3 to 4 generations to develop such differentials. These implications of this study are highly important from the Indian point of view. Here contraceptive measures are not introduced enough to vitiate the results. As such the differentials could be obtained as they may be in existence in the course of the imposition and development of Western civilisation in the different communities in India. Secondly, it is quite likely that they already exist, as the factors affecting birth–rate or producing differential fertility, like late age at marriage, the rise in the standard of living, ambitions, intellect and aspirations are in existence in India in all their variations in the different communities. Since the impact of Western civilisation, the family life is undergoing a tremendous change, much similar to that found in Europe and America, although the change is neither of equal

intensity and degree in the so called advanced and backward classes. The material thus will be highly instructive to find all the effects of the change in attitudes that is mainly involved in copying the West. The collection of data before the wide-spread use of contraceptives will not only help research in this field to a great extent but will disclose the position of Indian populations in a more accurate manner. This will be highly useful to formulate the policy of the Government in this matter, which should be based on the main principle not to affect the general efficiency of the nation.

Indian social organisation has a special feature in its 'Caste-system' Apart form the advantages and disadvantages of this system, caste forms a much more homogeneous group of population both from the genetic and environmental point of view. V. R. Khanolkar has demonstrated blood-group differences in the different castes and G. S. Pendse has also shown statistically significant differences in refraction and heights in the different commnities, which he attributes to genetic factors. It is now generally recognised by the students of sociology, medicine and social statistics that it is necessary and desirable to conduct studies by taking caste as a basic population unit in India. There is already some avidence, though small that fertility may differ significantly in the different castes. In the demographic studies conducted by the Gokhale Institute at Poona, V. M. Dandekar has alluded to this fact in Table No. 422 in publication No. 27. Demographic surveys conducted so far are useful in their own way but they do not provide the valuable details of differential fertility, which are necessary from the point of view of assessing the present situation of different classes as well as to formulate a sound policy. In fact, 'caste' forms a socioeconomic unit of population for study in this country. The subjective factors like ambitions and aspirations as well

as objective factors like intelligence can also be better studied with genetically homogenous endogamous groups of populations like 'castes' in this country. This facility does not exist in any other country at present and with the considerations mentioned above, India presents a unique opportunity for the study of differential fertility as it affects the trends of capable and fit populations. This should not be taken to mean that the backward classss in the country are unfit. Each caste has its own virtue and vice and each has its own capacities and abilities. This opportunity is likely to disappear after another generation or two and the policy based on inadequate knowledge in this matter may lead to irrepairable losses, once the disturbing factors are introducad to the maximum. The above discussion can be summarised as follows :—

(1) Differentials in fertility can be strongly suspected to exist in Indian populotion as in other countries.

(2) The various factors worked out so far, such as intelligence, capacities, socio-economic status, etc, are equally true to India and their knowledge will be highly important to form a better policy which must be such as will be least harmful in affecting the general ability and proper capacities of the differrent classes of population in the country.

(3) 'Caste' being a genetically more homogenous and endogamous group available in the country as a special feature, the various factors affecting fertility can be better studied here than elsewhere.

(4) It is necessary to study these factors before many influences like contraception, changes in attitudes towards a family ect. are introduced in the masses in this country, which is now inevitabce due to Western contact and Industrialisation.

*Stages of Study :—*

The stages of study can be considered as two.

(1) The first stage can be styled as descriptive in nature. As far as Indian conditions are concerned, this stage will reveal the ' dlfferentials ' in the different groups such as castes.

(2) The second stage is to work out the cause and effect relationships based on certain well considered hypotheses in this matter.

It is also possible to start both these stages simultaneously in one area. While undertaking a bigger survey of ' differentials ' in the castes, detailed efforts can also be undertaken on one caste in each province. Level of social strata, economic state, educational levels, ambitions and aspirations are found to exist at different levels of ' Vertical ' mobility even in one caste and a proper arrangement and plan of the details in one homoenous endogamous group will be useful to throw a good deal of light on many controvertial hypotheses in this matter.

Definite hypotheses previously considered could then be undertaken for investigation in a single community so that the results obtained will be more reliable than otherwise.

*Implications of this Study :—*

The main implication of the study is ' Eugenic ' in nature. The elements in the country which during the historical period have contributed substantially to the advancement of this nation in every respect, should not be neglected but encouraged in the future generations. This outlook has attracted the attention of many social and biological scientists in other countries and new data are being poured year after year by the eugenical and biometric laboratories all over. The beginning of research in this direction will be a nucleus

for a future biometric Laboratory of the country. This work will not only be useful to this nation but will be also very useful to other nations, as well as, to understand the trends of these ' differentials ' before any factors like contraception, change in attitudes etc. are introduced. Many thinkers of the west have painted highly pessimistic pictures of the future of the Western civiiization under the present cultural attitudes. It will be, therefore, like taking a precaution to prevent harm or take a lesson from the experience of the experiments conducted in the Western societies. It must be understood that the social sciences have still not reached any stage when ' Do's and Dont's ' can be said with all certainty and as such simple imitation of the laws and attitudes followed in the Western countries, is likely to prove disastrous. It is also necessary to realise that the Western socteties are in an exprimental stage all over and before adopting any measures on a very wide scale here, all the necessary lessons already learnt by the West through costly experiments, must be first assimilated. Ancient Indian culture has also to present very definite attitudes on many points of controversy and confusion and adequate studies of the Indian situation should be carried out as a necessary step before any wide measures and consequent experiments are contemplated.

The feregoing discussicn should not be interpreted as apathy or opposition to the general view held that the total number of mouths fed by the states should not exceed the resources of the nation. They become a drain than an asset. This also does not mean that the object of ' family planning ' is useless and that each family may have or even should have any number of children at the will of the parents, irrespective of financial or other consideraions. But if wishes were horses one could be able to ride them. All these wishes can not be achieved either by outlay of huge expenditures or injudicious

propaganda within a small period of time. For, there does not exist any adequate knowledge of the laws which govern the phenomena of growth and decline of populations and cultures, which can be applied like a machine in a mechanical way to solve the riddles of the subtle ' Nature '. It is, there fore, suggested that the study of a problems connected may be undertaken in the light of the good deal of costly experience of the West in this matter and measures applied should be cautious, so that they will be definitely beneficial or at least not prove harmful in the long run.

From this point of view the following concrete measures are suggested.

( 1 ) The study of differential fertility in the two stages may be undertaken in India under the guidance and supervision of the expert committees, which should consist of **statisticians, social scientists, medical men and some indepedent thinkers,** in the matter. A nucleus in this direction can be started at Poona as the Poona branch of the Indian Statistical Institute or independently as facilities permit. The details can be worked out in case the present general view-point is acceptable.

( 2 ) The birth-control measures should be introduced through medical or social workers only, on the consideration of the individual difficulties of families and not as a mass propoganda. The service may be first made available to the poorer classes in the society.

( 3 ) The definitely defectives, when defects are likely to be transmitted to the next generation in all probabilities, should be encouraged to undertake the measures of birth-control.

## REFERENCES


(1) Galton Francis, Hereditary Genius, 1950, Preface p. xxi–xxii.

(2) Pearson Karl, Lecture series, 1904, p. 36.

(3) Heron D., The Relation of Fertility in Man to Social Status. 1906.

(4) Sir Cyril Burt; Intelligence and Fertility, 1946, p. 5.

(5) C. F. Westoff; The changing focus of differential fertility research, the social mobility hypotheses; 1953, p. 5.

(6) Ibid

(7) Berent, Jerzy; Fertity and social mobility, Population studies, V. 3, 1952, p. 244–260.

(8) I. Bowen; Population; 1954, Preface, p. viii.

(9) Grotjahn, A; Die Hygiene der meschlichen Fortflansung. Berlin : Urban and Schwarzenberg, 1926. ( Hygiene und Gesund – hesits-gefahren ).

(10) A. J. Jaffe; U. S. Census Bureau. Differential Fertility in the White Population in Early America. Journal of Heredity ( Organ of the American Genetic Association ) Washington, D. C. Vol. XXXI, No. 9, September 1940.

(11) Khanolkar V. R. and Sanghavi L. D. : Ann. Eugenics, 15, pp. 52–64.

(12) Pendse G. S. Refraction & Body Growth; Indian Medical Research Memoir No. 38, 1954.

(13) Dandekar V. M. Survey of Fertility and Mortality in Poona District; Gokhale Institute of Politics and Economics; No. 27, 1953, p. 63.

---

ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थ
अनुक्रम ........ दि
क्रमांक ........ नं. 13

# परिभाषा

## *TERMINOLOGY*

(1) Accessaries उपप्रमुख वा पूरक भाग
(2) Adolescence प्रौढावस्था
(3) Bigamy द्विभार्यात्व
(4) Conditioning संस्कार
(5) Culture संस्कृति
(6) Differential Fertility प्रजोत्पादनक्षमतेंतील भिन्नत्व.
(7) Detumescence समाप्ति
(8) Data माहिती
(9) Erotics शृङ्गाररसशास्त्र
(10) Erotic Affectivity शृङ्गाररसात्मक भावनात्मकता
(11) Experimental Psychology प्रायोगिक मानसशास्त्र
(12) Extra-marital विवाहबाह्य
(13) Environment परिस्थिति
(14) Fertility प्रजोत्पादनक्षमता
(15) Heterosexual विजातीय
(16) Heredity आनुवंश
(17) Homosexual सजातीय
(18) Impotence षंढत्व
(19) Infatuation भावनोद्रेक
(20) Involuntary Sterility अनैच्छिक प्रजाहीनत्व
(21) Infertility प्रजाहीनत्व
(22) Love-Marriage गांधर्व-विवाह
(23) Marriage Counselling विवाहविषयक सल्ला देणारी संस्था
(24) Monogamy एकपत्नीकत्व
(25) Natural Variation नैसर्गिक वैविध्य
(26) Orgasm आनंद ( रतिनंतरचा ) रतावसानिक सुख
(27) Objective वस्तुनिष्ठ
(28) Personality Adjustment व्यक्तिमत्वाची जुळणी
(29) Psychological Inhibition मानसिक दडपण
(30) Polygamy बहुभार्यात्व
(31) Rational बुद्धिनिष्ठ
(32) Reflex Action प्रक्रिया
(33) Response प्रतिक्रिया
(34) Scientific Method शास्त्रपद्धति
(35) Social Rival सपत्नी
(36) Sexual Stimulation कामोद्दीपन
(37) Sperm पुरुषपिंड
(38) Standard प्रामाण्य
(39) Tradition परंपरा
(40) Tumescence वेग
(41) Values मूल्यें

# संदर्भग्रंथ

( *Bibliography* )

( ज्या ग्रंथांतील उतारे प्रस्तुत ग्रंथांत उद्धृत केले आहेत, त्यांचे संक्षेप ( Abbreviations ) त्या त्या ग्रंथाच्या पुढें कंसांत दर्शविले आहेत. )


( १ ) हिंदुधर्मशास्त्राचा इतिहास–( व्याख्यानें ) म. म. पां. वा. काणे. ( काणे. )

( २ ) हिंदुधर्माचीं मूलतत्वें–डॉ. राधाकृष्णन् ( राधाकृष्णन् ) अनुवाद-बाळूभाई मेहता.

( ३ ) श्रीमद्भगवद्गीता-भाष्यार्थ–विष्णुशास्त्री बापट

( ४ ) राधामाधवविलासचंपू प्रस्तावना–इ. राजवाडे ( इ. राजवाडे. )

( ५ ) गौतमधर्मसूत्र ( गौ. ध. सू. )

( ६ ) न्यायकोश ( न्याय. )

( ७ ) मनुस्मृति ( मनु. )

( ८ ) याज्ञवल्क्यस्मृति मिताक्षराटीकेसहित ( याज्ञ. )

( ९ ) कौटिलीय अर्थशास्त्र ( कौ. अ. )

(१०) कामसूत्र वात्स्यायनजयमंगला टीकेसहित–खेमराज श्रीकृष्णदास ( का. सू. )

(११) रघुवंश–कालिदास ( रघु. )

(१२) शाकुंतल–कालिदास ( शाकुंतल )

(१३) कुमारसंभव–कालिदास ( कुमार. )

(१४) अष्टांगहृदय वाग्भट डॉ. ग. कृ. गर्दे. ( वाग्भट )

(१५) चरकसंहिता चक्रपाणिदत्तटीकेसहित ( चरक-व-च. )

(१६) नासदीसूक्तभाष्य शं. रा. राजवाडे. ( राजवाडे )

(१७) छांदोग्य उपनिषद् ( छांदोग्य )

(१८) बृहदारण्यकोपनिषद् ( बृ. )

(१९) महाभारत आदिपर्व ( म. आदि. ) अनुशासनपर्व ( अ. )

(२०) गौतमन्यायसूत्र गंगानाथ झा ( गौ. न्या. सू. )

(२१) तुकाराम गाथा

(२२) वैदिक विवाहपद्धति–शिवरामशास्त्री गोरे ( गोरे )

(२३) हिंदूंचें समाजरचनाशास्त्र–गो. म. जोशी. ( गो. म. जोशी )
(२४) मृच्छकटिक–शूद्रक
(२५) ज्ञानेश्वरी
(२६) रामायण वाल्मीकि आयोध्याकांड ( रा. अयो. )
(२७) त्रिशतसांवत्सरिक शिवस्मारक ग्रंथावली
(२८) एकनाथी भागवत
(२९) निबंधमाला, विष्णुशास्त्री चिपळूणकर ( नि. )
(३०) योगवासिष्ठ
(३१) कै. आगरकरांचे निबंध
(३२) हिंदुधर्म आणि सुधारणा–शि. म. गोळे
(३३) ब्राह्मण आणि त्यांची विद्या–शि. म. गोळे
(३४) श्रीमद्‌भगवद्‌गीता
(३५) संस्कृत वाङ्मयाचा इतिहास, पेंडसे सयाजीराव ग्रंथमाला
(३६) गीतारहस्य–लो. बा. गं. टिळक
(३७) हिंदुधर्मसंग्रह, विद्यानिधि चित्राव
(३८) शिवमहिम्न स्तोत्र–पुष्पदंत
(३९) विवाहसंस्कार
(४०) कामशास्त्र–ना. वा. कुलकर्णी
(४१) धर्मदीपिका
(४२) ज्ञानकाश
(४३) शतपथब्राह्मण
(४४) दादोबा पांडुरंग, आत्मचरित्र–प्रो. प्रियोळकर
(४५) विष्णुशास्त्री चिपळूणकर, चरित्र
(४६) विविधज्ञानविस्तारांतील लेख
(४७) मुंबईचा वृत्तांत–आचार्य
(४८) सुबोध उपनिषत्संग्रह–वि. वा. बापट
(४९) अमरकोश अमरसिंह
(५०) सर्वदर्शनसंग्रह–म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर
(५१) काव्यप्रकाश–मम्मट
(५२) दशकुमारचरित–दंडी

(1) History of Sanskrit Literature; Arthur A Macdonell. (Macdonell)

(2) India in Transition or New India; H. J. S. Coton. (coton)

(3) The Soul of India; Howells. (Howells)

(4) History of Sanskrit Poetics; P. V. Kane (Kane His. San. poe.)

(5) Social Life in Ancient India; H. C. Chakladar. (Chakladar)

(6) A History of Prostitution; George R. Scott (Scott).

(7) Physiology of Sex; Kenneth Walker (K. Walker).

(8) Marriage for Moderns; H. A. Bowman (Bowman)

(9) Twelfth Night; (Shakespeare).

(10) Middletwon, A Study in American Culture; Lynd (Lynd).

(11) Fertility and Sterility in Marriage; Van De Velde (Van De Velde)

(12) British Medical Journal (B. M. J.).

(13) Journal of the American Medical Association (J. A. M. A.)

(14) Hereditary Genius; Francis Galton.

(15) Psychology of Women, Two Volumes, Helene Deutsch (Helene Deutsch).

(16) Marriage and Morals; Bertrand Russell (Russell)

(17) Text Book of Pathology; Boyd.

(18) The relation of Fertility in Man to Social Status; Heron D.

(19) Intelligence and Fertility; Sir Cyril Burt.

(20) The Changing focus of differential fertility research " The social mobility hypothesis; C. F. Westoff.

(21) Fertility and social mobility; Bercut, Jergy.

(22) Population; I. Bowen.

(23) Survey of Fertility and Mortality in Poona District; V. M. Dandekar.

(24) Annals of Eugenics ( Paper by V. R. Khanolkar and L. D. Sanghavi. )

(25) Refraction and Body-Growth; G. S. Pendse.

(26) Sexual Behavior in the Human Male and Female; Two volumes; A. C. Kinsey and Colleagues. ( Kinsey ).

(27) A Handbook of Social Psychology; Kimbal Young ( K. Young )

(28) Psychology, Principles & Applications; M. E. Madigan. ( Madigan ).

(29) Introductory Sociology; R. L. Sutherland, J. L. Woodward, M. A. Maxwell. ( R. L. Sutherland ).

(30) Social Psychology; D. Katz, R. L. Schanck. ( D. Katz ).

(31) Introduction to the science of Sociology; R. E. Park and E. W. Burgers (R. E. Park).

(32) An experimental study of the effects of co-operation and competition upon group processes, Vol. 2., Morton Deutsch. ( Morton Deutsch )

(33) Culture and Society; F. E. Merrill, and H. W. Eldredge ( F. E. Merrill )

(34) Social & Political life in the Vijayanagar Empire, 2 Volumes; B. A, Saletore ( Saletore ).

(35) Ashok; Mukerji.

(36) Social Structure; Murdock ( Murdock ).

(37) Studies in the Psychology of Sex; Havelock Ellis. ( Ellis )

(38) Report- Royal Commission on Marriage and Divorce.

(39) Report– Third International Conference on planned Parenthood Sec. VI; The Medical Evil of Abortion.

(40) Life in Ancient India. Mrs. Spiers.

(41) Spotlight on Woman; American pamphlet.

(42) American Journal of Sociology, 1947 ( Am. J. Soc.)

(43) Hindu Marsiage Act; S. V. Gadgil and others.

(44) Western Culture in Eastern Lands; A. Vambery. ( A. Vambery )

(45) Man and Woman; Havelock Ellis.

(46) World Population; A. M. Carr–Saunders ( Carr-Saunders )

(47) War Memoires; Sir. Winston Churchill.

(48) The Discovery of India; Pandit Jawaharlal Nehru.

(49) Life of Lord Maucauley

(50) Autobiography; Gibbon.

(51) History of the Roman Empire; Gibbon.

(52) The Aim and Achievements of Scientific Method. Dr. Percy Nunn ( Nunn ).

(53) Ballads of the Marathas; Acworth.

(54) India under British Rule; J. T. Wheeler.

(55) Ideas and Men; C. Brinton.

(56) Sex Equality and Modern Marriage; A. J. Brayshaw.

(57) Indian Moral Instruction & Caste Problems; A. H. Benton.

(58) Land of Vedas; R. W. Butler.

(59) Fertility in Marriage; L. Portony and J. Saltman.

(60) The Sex Habits of American Women; F. Wittels.

(61) The Changing Humanities; Stevens.
(62) Goals of Economic Life; A. D. Ward.
(63) Sexual Life in Ancient India. Meyer.
(64) History of Indian Philosophy S. N. Dasgupta,
(65) Heredity in relation to Eugenics C. B. Davenport
(66) Sexual life of our times, Bloch.
(67) A history of human marriage, Westermarck.
(68) Social Psychology, Mcdougal.
(69) An essay on the principles of population, Malthus.
(70) Studies in Indian Cultural History, Prof. P. K. Gode.

# सामान्य सूचि

## ( General Index )


अर्थशास्त्र ( कौटिलीय ) २९
अद्वैत १७
अप्रगल्भ बुद्धिवाद २६७
अश्मारोहण ९१
आनुवंश ९५
आपद्धर्म २०७
आर्यत्व ८
आयुर्वेद ( वैद्यकाखालीं पहा )
आरोग्य १२२
अंतःस्राव ग्रंथी १३०, १४७
उद्दीपन १३२, १३३, १३५, १३८
" –कृत्रीम १३०
" –नैसर्गिक १३०
उपप्रमुख भाग ६१
एकपत्नीकत्व १७०, १७९, २४९
एलिस हॅव्हलॉक ६९, १२५, १२६, २३१
कन्यादान ९०
कॅवेल एच् १०८, ११०
काट्झ् डी. १८९
काणे पां. वा. ( म. म.) १०, १४, ३३
काम ४१
" –कल्पना ६४
" –वासना २६१
" –व्याख्या ६०
" –शास्त्र ३०, ५०, ५३
कॉटन एच्. जे. एस् ९, १५, १६, २५५
कार् सॉंडर्स २२७, २६६
कालिदास ३३, ६४–६७, ९२, १०४, १४५
किन्से रिपोर्ट १२१, १२६, १२७, १२८, १३५, १३९, २३०, २७९
क्लीबत्व ११४
कुमारी माता २३८
कुटुंब २२२
–आद्यघटक १५७
–कार्य २२२
–परिणाम विघटनाचें २३६
–बदल २२४
–विघटन २३३
–सुधारणा २४१
–संस्था १५८, १५९
गर्भधारणा १०९, ११३
गाल्डन् फ्रॅन्सिस ११७
गांधर्व ३४, ६६, ८०, २०५
गृहसौख्य ६७
गृहप्रवेशनीय ९०, ९६
गोरे (शिवरामशास्त्री ) ९६
गोळे ( प्रि. ) २५९
घटस्फोट ११३, २३६, २४७
चकलदार ४६, ४९
चक्रपाणिदत्त ४९
चरक ४९
चिपळूणकर ( विष्णुशास्त्री ) २५७
चित्राव ( सिद्धेश्वरशास्त्री) १०
जातिसंख्या ११, १३, १४
जीवनमान ७२
जोशी गो. म. ११, १४, ९९
जेफ्कोट १०८

अनुक्रम ........... वि: ......
क्रमांक ........................ नों: दि: ........

टिळक लो. बा. गं. १०, २५८
डार्विन् ११७
डूश हेलन ९८, ९९, १६३
डूश मॉर्टन १६१
तीन ऋणें १८६
त्रिवर्ग २१, २६, ५७
दत्तक ११७
द्विभार्यात्व ११३, २४८
ध्रुवादिदर्शन ९१
ध्येयाचार–
–कामसूत्रांतील १७५
–भारतीय १६७, १८८
–ची दुःस्थिति १९९
–चा परिणाम १९४
नन् पर्सी २७५
नियोग ११४
परंपरा ४, १६४, १६७
परदारागमन ४३, ४४
( व्यभिचार या शब्दांतहि पहावें )
पार्क आर्. ई. १५९
पातिव्रत्य १८२
पिअरसन् कार्ल २१७, २६६
पुरुषार्थ–१९, २८६
–अर्थ ३८, ३९
–काम ४१
–काव्यांत ३२
–चतुर्विध १८
–धर्म ३६
–भगवद्गीतेंत २६
–महाभारतांत २५
–मोक्ष ३१, २८५
–वेदांत २०
–स्मृतींत २३
प्रक्रिया १२९
प्रगति
–व बदल २२५
–शास्त्रांची २७६
प्रजाहीनत्व १०२, १०७
–अनैच्छिक १०८
–परिणाम १०५
–स्त्रीमन ११४
प्रजोत्पादनक्षमता ७९
–भिन्नत्व ११७, १८६
प्रीतिप्रकार ८१, ८३, ८६
ब्रह्मचर्य ७७, १३४
बहुभार्यात्व २१२
बापट १८
बुद्धिगम्यता २८८
बोमन ६८, ७१, ७८, ८२, ८३,
८५, १६२, १६५, १६८, २३३
भगवद्गीताभाष्य १९०
भावनोद्रेक ८०
–परिणाम १४६
मधुपर्क ९१
मत्सर १४२
महात्मा गांधी २६०
मॅक्डोनेल ए. ए. ९, ९०
माडिगान १४७
मानसिक
,, –उल्हास ११२, १४४, १४५
,, –दडपणाचीं करणें १४१
,, –दडदण १३६, १३८
,, –षंढत्व १४४, ११३, १४५
मूल्यें ७, १८०, १९०, १९६
मुरडॉक २२३
मेरिल एफ्. ई. २७७, २८८
मेहता बाळूभाई ११
यंग के. १६२, १६५
यशोधर ४३, ६२
रति ६४, १२१, १४५, २१४

—अवसानिक १५१
—आरंभ १५०
—समाप्ति १५१
—सुख १४३
रसेल बर्ट्रंड १९, २४२
राजवाडे ( इ. ) १९
राजवाडे शं. रा. ४१
राधाकृष्णन् सर्वपल्ली १५, २२
लाजाहोम ९०
लाजाळूपणा १२३
लिंड ८३, २१५
लेहमन हार्वे सी. २४४
वस्तुनिष्ठता ९७, १६१, २७५
वर्णसंस्था १४
वॉकर के. १, ५९, ६९, ८२, १४५, २३५
वाग्भट ४८
वाजीकरण १११, ११२
वाङनिश्चय ९१
वात्स्यायन
—काल ४३
—ग्रंथ ५१, ५३
—पूर्वाचार्य ४२
—माहिती ४६
वाल्मिकी १९१
विवाह—
—अपयश २६५
—उद्देश ९५, ९६
—कायदा २४५, २५०
—प्रकार २०५
—नात्यांत १००
—पूर्वविचार ७२, ९९
—मोजमाप यशाचें ७०
—वय ७४
—विधि ६३
—शिक्षण ५, १७९
—साधनें यशाची ६८
—संस्कार ८९
विविधता २०२
विल्यमस् एम्. १२
विषयवासना ५८
वेग १३१, १३३, १४९
वेश्याव्यवसाय २१३
वैद्यक ३५
वंध्यात्व ११३
वंशनाश ११६, २२८
„ —सातत्य १८५
व्यक्तिमत्व १५५, १६४
व्यभिचार १८१, २३१
व्हॅन डी. वेल्डी १०६, १४४
शास्त्रपद्धति २७३
शृङ्गाररसशास्त्र ५४
शृंगार १४८, १२४
श्रद्धा २८०
सपत्नी ११६, २०९
सप्तपदी ९१
सातवळेकर २०
सालेटोर १९५
सुप्रजाजननशास्त्र ९४, ९५
सूदरलंड १५६, १६०
संतति—
—पुरुषप्रधान १०१
—नियमन २२७, २२८
संस्कार ८९, १२९, १६४, १६६, २८७
संस्कृति २२१, २८५, २८६
हॅविलस् १५
हिंदुत्व ९, १०, १२, १५, ४१

१०२५४
REFBK-0010254